
'मुद्रा' साहित्य सांस्कृतिक मंडळ प्रकाशित
आशय
दिवाळी २०१०
₹ ८०/-


सुग्रास भोजनाची लज्जत वाढवतो
'लिज्जत' पापड
उडीद । मूग । पंजाबी । लाल मिरची । लसूण
लिज्जत
पापड
श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड
( खादी आणि ग्रामोद्योग कमिशन द्वारा मान्यता प्राप्त )
ससा
डिटर्जंट पावडर व वडी
असली म्हणजे काळजीच नको
पैशांची, हातांची, शुभ्रतेची !
ससा
ससा
White
ससा
ससा ग्रीन
SASA
श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड
( खादी आणि ग्रामोद्योग कमिशन द्वारा मान्यता प्राप्त )

# आशय
दिवाळी २०१०

वर्ष पंधरावे

ही दीपावली
आमचे सर्व वाचक, लेखक, कवी
जाहिरातदार आणि हितचिंतक
यांना सुखदायी होवो.

**कृतज्ञता**
ऋतु क्रिएशन, पुणे.
अनुराधा कशेळीकर
वसुमती भंडारे
हेमंत आणि रोहिणी राळेरासकर
मिलींद पोतदार...सर्व पुणे
किशोरजी चंडक, सोलापूर
श्रावण पारसे, सोलापूर

हा अंक सुनील साळुंके, सचिव, मुद्रा साहित्य सांस्कृतिक मंडळ, सोलापूर, यांनी मुद्रा साहित्य सांस्कृतिक मंडळ यांच्यासाठी प्रिसिजन प्रिंटर्स, होटगी रोड, सोलापूर येथे छापून १४, संयुक्ता सहनिवास, २०८ द. कसबा, सोलापूर-७ येथे प्रसिद्ध केला.

**संपादक**
नीतीन वैद्य / जयंत राळेरासकर

**संपादन साहाय्य**
पुरुषोत्तम नगरकर

**जाहिरात**
रघुनाथ क्षीरसागर

**मुखपृष्ठ / मलपृष्ठ / रेखाटने**
शिरीष घाटे

**परिवार**
अमोल आणि सीमा चाफळकर
धनंजय आणि स्नेहा अवसरीकर, पुणे

**अक्षरजुळणी व प्रतिरूप मुद्रण**
ॲचिव्हर्स ग्राफीक्स, सोलापूर (०२१७ २६०५०९४)

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
नीतीन वैद्य
१४, संयुक्ता सहनिवास, २०८ दक्षिण कसबा,
शनी मंदिराजवळ, सोलापूर - ४१३००७
दूरध्वनी : ०२१७- २३२६०७७/ ८१४९१६७२९८
E- mail : vaidyanpsol@rediffmail.com

जयंत राळेरासकर
१५४, अ, 'निर्झर', इंदिरा नगर, विजापूर रोड,
सोलापूर - ४१३००४
दूरध्वनी : ०२१७- २३४१४२४ / ९०९६२५५९२४
E- mail : Jayantraleraskar@hotmail.com

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी
संपादक सहमत असतीलच असे नाही.

संवाद /

*मुबलकतेच्या देशात*
मेघनाद कुलकर्णी /६
*'संभ्रमाचे सर्ग' या कथेच्या सुरुवातीचे निवेदन*
संजय भास्कर जोशी /२४
*समाधी*
संतोष वरधावे /९८
*शुद्धिश्राद्ध*
सौ. मृणालिनी केळकर /१५३
*शॅलो फ्राय*
मैत्रेयरक्षित /१७१

*सुपर मण्डूक तोक्योला वाचवतो*
हारूकी मुराकामी, अनु. निशिकांत ठकार /६२
*कोणीही नसतो तो*
लता शर्मा, अनु. वनिता सावंत/८१

कविता /१०७

यशवंत मनोहर, गोविंद कुलकर्णी,
केशव सखाराम देशमुख, हेमकिरण पत्की,
प्रमोदकुमार अणेराव, विनय अपसिंगकर,
वसंत वाहोकार, कविता महाजन, सुनील साळुंके,
प्रवीण बांदेकर, विद्याधर म्हैसकर, दत्ता हलसगीकर,
प्रशांत असनारे, मोहिनी पिटके,
नारायण कुलकर्णी, लक्ष्मीकांत तांबोळी,
अंजली कुलकर्णी, सुनील शिनखेडे,
बाळ राणे, आश्लेषा महाजन, अनुराधा नेरुरकर,
शोभा बडवे, मुकुंदराज कुलकर्णी, सुरेश पाचकवडे,
अनिल जवंजाळ, अर्जुन देशमुख, हेमंत डांगे,
विश्राम प्रामाणिक, रवींद्र जवादे,
सुभाष वसेकर, निरंजन माधव, अशोक सोनवणे,
पुरुषोत्तम नगरकर, मुबारक शेख, तुकाराम खिल्लारे.

*'डांगोरा एका नगरीचा' : पत्रसंवाद* /१६०
संकलन- नीतीन वैद्य

*मराठी ग्रंथव्यवहार आणि वाचनसंस्कृती*
डॉ. प्रदीप कर्णिक /१८

*बदलत्या संदर्भात वाचनसंस्कृती*
नीतीन वैद्य /३३
*सुसंस्कृत समाजाच्या घडणीसाठी वाचनसंस्कृतीची आवश्यकता*
अशोक नीलकंठ सोनवणे /३४
*वाचन नावाची एक अदृश्य संस्कृती*
अवधूत परळकर/४१
*पुस्तकाच्या गुरुत्वाकर्षणाचे अनुभव*
निखिलेश चित्रे /५२
*वाचनसंस्कृती आणि माझे वाचन*
रणधीर शिंदे /५५


*मराठी ब्लॉगलेखन - अनुभव आणि प्रतिसाद*
मधुकर धर्मापुरीकर /७५
*'वाचू' या..... 'वाचवू' या!*
सुनीता तारापुरे /१२१
*काही समकालीन कवी : जाणिवा आणि आविष्कार*
राजशेखर शिंदे /१८१

*सुर्वेंना आठवताना... / ८८*
अरुण खोपकर, गो. पु. देशपांडे,
शांता गोखले, सतीश काळसेकर,
वसंत आबाजी डहाके

*मी सोलापूरकर ...*
आनंद कुंभार /१२९
*'चाफा' चे दिवस*
शिरीष देखणे / १४०
*जीवन त्यांना कळले हो*
राजशेखर शिंदे /१४४

*आशय- सूची : १९९६ ते २००८*
पुरुषोत्तम नगरकर /२१२

*With Best Compliments from*




# YASHODHARA SUPER SPECIALITY HOSPITAL

Yashodhara Super specialty Hospital is a 150 bedded multi-disciplinary, tertiary care centre which has achieved unprecedented success within a short span of 3 years. The centre is one of the best hospitals providing critical and tertiary care and the first choice for the practitioners to refer terminally ill patients. The hospital has eminent specialists, trained paramedical and technical staff, state of art infrastructure and advanced technology to provide high end medical care.

The following are a few milestones to mention:

* Successful kidney transplant surgeries at affordable package.
* Microscopic Neurosurgery facility for Brain Tumors
* Most advanced lithotripsy unit (Dornier) for non surgical kidney stone fragmentation.
* Full fledged cardiology department with TMT, portable color Doppler machine, flat panel cath lab for angiography, angioplasty, pace maker implantation etc.
* 24 hours mobile ICCU ambulance, laboratory and emergency services for all specialties, all under one roof.

*** Specialty services available ***

| | |
|---|---|
| * Nephrology | * Urology |
| * Cardiology | * General & Laparoscopic surgery |
| * Gastro-enterology | * ENT |
| * Diabetology | * Plastic Surgery |
| * Neurology | * Trauma and emergency medicine |
| * Neurosurgery | * Orthopedics & Joint Replacement |

*For ambulance services in emergency,* ***call 98901 14886.***

**6158, Siddheshwar Peth, Near Zilla Parishad, Solapur-413003, Maharashtra.**
**Ph.: (0217) 2323001, 2323002, Telefax : 0217-2323003**
**Visit us at - www.yashodharahospital.org , Email: yashodharahospital@yahoo.com**

# ***संवाद***

आशय' चा पंधरावा दिवाळी अंक. त्यासाठी वाचनसंस्कृतीची संबधित काही संवाद करावा असे मनात असताना, समोर 'मुक्त शब्द'चा आक्टोबरचा अंक आहे. त्यातील संपादकीयात म्हटलेय....

*' वाचनाची प्रक्रिया केवळ सहज फूल उमलावे तशी नैसर्गिक नाही, तिचेही प्रशिक्षण लागते. कागदावर छापलेल्या ओळींना किती प्रकारे अर्थ देता येतात, भाषेची वळणे, कोऱ्या जागा काय सुचवत असतात, लेखनात वापरलेले संकेतव्यूह कसे मूर्त करून घ्यायचे... यासारख्या प्रश्नांच्या उत्तरातून वाचनाचे साहित्यशास्त्र निर्माण होऊ शकते... साहित्यकृती आणि वाचनाची प्रक्रिया यामधील संबंधाना विचारांचा विषय बनवणारे वाचक हे कोणत्याही संस्कृतीचे मोठेच बळ ठरते*

*या बाबतीत आपण हौशी पातळीवर वावरतो आहोत का? सृजनशील साहित्यकृती वाचताना आपण नको एवढे नम्र होतो, तिच्यासमोर पूर्ण शरणागती पत्करतो का? तिला प्रश्न का विचारायचे नाहीत? तिच्याशी भांडायचे का नाही? अर्थ लावण्याच्या प्रक्रियेचे विश्लेषण का करायचे नाही? 'आस्वाद' नावाच्या मधूर संकल्पनेत किती दिवस अडकून पडायचे? आपली वाचनाची क्षमता टोकाला नेऊन पणाला का लावायची नाही?*

कुणाही गंभीरपणे वाचणाऱ्याने मनालाच कौल लावावा असेच हे प्रश्न आहेत. पण कसलाही अर्थिक लाभ नसलेले 'बौद्धिक कष्ट' समाजातून हद्दपार होण्याच्या काळात (स्वतंत्र बेटे हा अपवाद) ही अपेक्षा वास्तवाशी किती सुसंगत आहे याच्या उत्तरालाही काही काळ थांबावे लागेल. 'आस्वादा'ला कमी लेखून आपणही या युक्तिवादाला टोकाला नेतो आहोत, त्यातून ज्याला आवाहन करायचे असा वाचकांचा मोठा समूह परिघाबाहेर ठेवतो आहोत याचेही भान असावे असे वाटते. असो. 'कलाकृती ही एण्ड प्रॉडक्ट असते, तिच्यातून काही अपेक्षित असतं, हा बेसिक मुद्दा आपल्या वाङ्मयीन संस्कृतीतच आहे. पैकी एका टोकाला पुंडलिक आहेत तर, दुसऱ्या टोकाला मी' असं खुद्द नेमाडेंनी म्हटलंय, त्याला 'आस्वादा'चाच संदर्भ आहे. वाङ्मयीन मासिकांनी टोकाला उभे रहायचे का दुसऱ्या टोकाशी संवाद करीत अंतर कमी करायचा प्रयत्न करायचा हेही ठरवावे लागेल.

अंक तयार करताना वरील काही मुद्यांबरोबरच वाचनसंस्कृतीचे वेगाने बदलत जाणारे संदर्भही मनात होते. जाणिवांचे उन्नयन करणाऱ्या साहित्याची ताकत सार्वत्रिकपणे दिसायला हवी, प्रत्यक्षात मात्र सर्वत्र बाह्य शक्तींचेच प्रगटीकरण, उदात्तीकरण होतेय, हेच चित्र दिसते आहे. पुस्तके प्रचंड खपत (तुलनेने) असताना, त्यावर चर्चा झडत असताना, नवनवीन मार्गाने अभिव्यक्तीचा पूर येत असताना आपण मात्र दिवसेंदिवस अधिकाधिक असहिष्णू, हिंसक, प्रतिक्रियांवर काबू नसणारे होत चाललो आहोत हेही. त्यामुळे यावर काही चर्चा व्हावी असे वाटत होते. साहित्य व्यवहाराचा 'बोन्साय' हा अरुण जाखडेंनी वापरलेला शब्द या संदर्भात अन्वर्थक आहे.

मराठी साहित्यासाठी विशेषत: कवितेसाठी हे वर्ष पानगळीचे होते. ज्ञानपीठ विजेते विंदांनी बरेच वर्ष कवितालेखन ठरवून थांबवलं तरी त्यांचं असणंही धीर देणारं होतं. चित्रे गेले, संस्कृतीच्या सर्व क्षेत्रात अक्षरश: डोंगराएवढं काम करणारा दुसरा लेखक शोधावा लागेल. त्यांच्या जाण्याने आपलं सांस्कृतिक संचित आपण किती गमावलंय, याची मोजदाद करण्यासाठी, कदाचित एखादी पिढी जावी लागेल. सुर्वेंनी मराठी कवितेला सामाजिकता दिली. मार्क्सवाद त्यांनी मिरवला तरी कवितेला कधी कंठाळी, आक्रस्ताळी होऊ दिले नाही, म्हणून ते एकाकी बेट झाले नाहीत, त्यांचा प्रवाह झाला. या तिघांचं एकाच वर्षी जाणं म्हणून चटका लावणारं आहे.

शेवटी काय, केवळ साहित्यिक नव्हे तर एकूण सांस्कृतिक वातावरण, पर्यावरण, प्रदूषित होतेय, नव्हे झालेच आहे तरी आपली विचार करण्याची कुवत, तर-तम करण्याची वैचारिक क्षमता शाबूत ठेवण्यासाठी तरी डोळसपणे वाचायला हवे, तर हा दीपोत्सव, ज्ञानोत्सव होईल, बाराही महिन्यांचा....

तूर्त दिवाळी शुभेच्छा.....

# मुबलकतेच्या देशात

## (जगातील सर्वोत्तम सूट आणि बिलियन डॉलर मिंक कोटची कथा)

– मेघनाद कुलकर्णी

तुम्ही कधी मुबलकतेच्या देशात गेला आहात का? मुबलकतेच्या देशात सर्व काही मुबलक आहे. मुबलक संधी, मुबलक पैसा, मुबलक संशोधन, मुबलक विद्वत्ता, मुबलक विद्वत्ता-भांडवल, मुबलक करमणूक, मुबलक दारू, मुबलक अन्न, मुबलक वाहतूक, मुबलक साधनं, मुबलक पाणी, मुबलक नैसर्गिक साधन संपत्ती, मुबलक पायाभूत सुविधा ! इथे सर्व काही मुबलक आहे. म्हणून जगात काही करून दाखवण्याची इच्छा असलेले आघाडीचे तरुण/तरुणी जगाच्या कानाकोपऱ्यातून इथे येतात. तुम्ही नाही गेलात मुबलकतेच्या देशात? मीही नाही गेलो. पण अरुण आणि अरुणा गेलेत आणि आता याक्षणी ते वेगवेगळ्या रेस्टॉरंटमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी, पण मुबलक देशाच्या राजधानीच्या केंद्रस्थानी असलेल्या सर्वात मुबलक झोनमध्ये आहेत आणि वेगवेगळ्या ठिकाणी हातात कॉफीचा मग घेऊन आपल्या देशातील आठवणींचा विचार करताहेत. अरुण आणि अरुणा पती-पत्नी नाहीत, मित्र-मैत्रिणी नाहीत, त्यांची एकमेकांशी जुजबी ओळखदेखील नाही. तरीही त्यांच्यातील एक समान दुवा म्हणजे ते दोघेही भारतीय आहेत. संधी, आत्मसन्मान आणि मुबलकतेच्या शोधात या देशात आलेत.

मुबलकतेचे प्रतीक असणाऱ्या ग्रीक लक्ष्मी देवतेच्या हातात असलेल्या मशालीवरच्या सूर्यकिरणांतून थेट डोकावले तर विसाव्या मजल्यावर फिरत्या रेस्टॉरंटमध्ये बसलेला अरुण तुम्हाला दिसेल. त्याचा ड्रेस फॉर्मल आहे. ग्रे सूट, यलो ऑकर शर्ट आणि आडवे ब्ल्यू पट्टे असलेला पांढरा टाय त्याने घातलेला आहे. लंच ब्रेकमध्ये तो इथे आलेला आहे. त्याच्या कंपनीचं ऑफिस त्याच प्रतिष्ठित इमारतीत आहे. इमारत चाळीस मजल्यांची आहे. सर्व ब्ल्यू चीप, फ्रंट लायनर, टॉप ट्वेंटी कंपन्यांची ऑफिसेस या इमारतीत आहेत.

अरुण तसा उच्च विद्याविभूषित, मुंबई आय.आय.टी.चा इलेक्ट्रॉनिक इंजिनियर, आय.आय.एम. चा एम.बी.ए., स्टॅन्डफोर्डमधून पीएच.डी. आणि सध्या जगातील वीस आघाडीच्या कंपन्यांपैकी एका कंपनीचा चीफ एक्झिक्युटिव्ह (प्रोजेक्टस्). इतक्या क्वॉलिफिकेशन्सना साजेशी नोकरी मिळणं भारतात केवळ अशक्यच. शिवाय इथे चांगला जम बसलाय. सर्व देशांतील मित्र-मैत्रिणी आहेत. उत्तम दर्जेदार सोशल लाईफ आहे. कामातून उसंत मिळाली की सतारवादन आणि लिखाण चालू आहे. हे दोन्ही त्याचे छंद आहेत. पण दोन्हींतून त्याला उत्तम पैसेदेखील मिळतात. फ्यूजन संगीतात सतारीचा आणि तबल्याचा उत्तम आणि सढळपणे वापर होतोय. इंग्रजी कथालेखनातून उत्तम पैसे मिळतात. मराठीत ते शक्य नव्हतं. त्याला अनियतकालिकांचे दिवस आठवले. कोणाच्याच खिशात पैसे नसायचे. संपादक बाबुरावांच्यादेखील. पण ते दारूची आणि जेवणाची व्यवस्था करायचेच, कितीही नाही म्हटलं तरी. त्यानंतर प्लॅनिंग कमिशन बसायचं आणि अंकाचं प्लॅनिंग सुरू व्हायचं. त्यात नाटककार मित्र आणि विचारवंत मित्र असायचे. ते सर्व एकमेकांचे अंगरखे बदलायचे. नाटककार मित्र मग मुद्रक मित्राच्या अंगरख्यात जायचा आणि त्याच्याच प्रिंटिंग प्रेसमध्ये अंक तयार व्हायचा. अंक अतिशय दर्जेदार असायचा. तो कधीच वेळेवर निघायचा नाही. कारण ते अनियतकालिक होतं. निवडक वर्गणीदारांना तो पोस्ट केला जायचा. प्रत्येक कॉपीवर हाताने चुका दुरुस्त करून ! चुकादुरुस्तीसह बाकीच्या अंकांचे गठ्ठे बांधले जात आणि ते गठ्ठे मालक, मुद्रक, प्रकाशक यांच्या कार्यालयाच्या अधिकृत मालकी असलेल्या घराच्या माळ्यावर क्षणार्धात दुर्मिळ होत. पुढच्या अंकात हमखास एक जाहिरात असे 'सर्व अंक दुर्मिळ. आजच आपल्या प्रतीची नोंदणी करा. सवलतीची किंमत.....' अरुण बाबुरावांना गमतीने म्हणायचा, 'एक ओळ अंकात डिक्लरेशन म्हणून टाकली पाहिजे. आमचे हे अमुक अनियतकालिक मालक, मुद्रक, प्रकाशक यांनी अमुक ठिकाणी


OFFEE

छापून तमुक ठिकाणी प्रकाशित करून तिथल्याच माळ्यावर दुर्मिळ केलं.' तर बाबुराव आपले बग्ज बनीप्रमाणे पुढे आलेले दात दाखवत मिश्किलपणे हसत बडोद्याच्या आठवणीत तल्लीन होत. बॉर्न ॲण्ड ब्रॉट अप इन अमेरिका, आमच्यातला सर्वात लहान मामेभाऊ बाबुरावांना भेटल्यानंतर अरुणला म्हणाला होता, 'ही इज अ रेअर कमॉडिटी, अशी दुर्मिळ माणसं आमच्या इथे प्रकाशन क्षेत्राच्या फक्त इतिहासातच भेटतात.' तर अरुण त्याला म्हणाला, 'ही मे बी रेअर बट ही इज सर्टनली नॉट अ कमॉडिटी'. यावर सर्वात धाकटा मामेभाऊ म्हणाला, 'इंडियन पीपल हॅव ग्रेट स्पीरिट. मी बघतोय, इतकं दारिद्र्य आहे पण प्रत्येकाची विल पॉवर दुर्दम्य आहे. कुणी कचरा गोळा करतंय, कुणी जुनाट सायकल रिपेअर करून री-सायकल करतंय, कुणी डालड्याच्या डब्याची कुंडी करून संस्कृती री-सायकल करतंय.' यावर अरुण म्हणाला, म्हणायचं होतं 'इथे सगळं री-सायकल होतं. मराठी साहित्य तर इंग्रजीतून मराठीत आणि मराठीतून पुन्हा पुन्हा रिसायकल होतं' पण देशाच्या इभ्रतीचा सवाल असल्यामुळे तो गप्प राहिला.

अरुणला खरं तर कलाक्षेत्रात जायचं होतं. लेखक, दिग्दर्शक, नाट्य दिग्दर्शक, बातमीदार असं काही बाही व्हायचं होतं. पण अरुणच्या वडिलांनी त्याला जमिनीवर आणलं. ते स्वत: एक उत्तम लेखक होते. चांगल्या नोकऱ्या सोडणं हा त्यांचा क्रॉनिक छंद होता. अनेक नोकऱ्या सोडून ते कॉपीरायटिंग क्षेत्रात स्थिरावले होते. म्हणजे इतकं सगळं गमावून ते खऱ्या अर्थाने शेवटपर्यंत लेखक झालेच नव्हते. (म्हणजे जगाच्या आणि अरुणच्या आईच्या दृष्टीने) तसे ते बॉर्न लेखकच होते. वडिलांनी या क्षेत्रातील धोके दाखवून दिले. कलाक्षेत्रात स्वत:ला पूर्णपणे झोकून देणं शारीरिक आणि मानसिक आरोग्यास कसं हानिकारक असतं याचे वैधानिक इशारे आणि दाखले दिले आणि सुचवलं, 'सायन्समध्ये करियर कर. त्यातून एक तटस्थ वस्तुनिष्ठपणा येतो. तो कलेला अत्यंत पोषक असतो. कलाकृती आणि कलावंत यात एक क्लिनिकल सेफ डिस्टन्स हवा. नाहीतर कलाकृती कलाकाराला खाऊन टाकते,' असं म्हणून त्यांनी निर्णय अरुणवर सोपवला. अरुणने सायन्सला ॲडमिशन घेतली खरी, पण डिफरन्शियल कॅल्क्यूलस प्रॉबॅबलिटी, प्रो आणि फजी लॉजिक थर्मोमोडायनॅमिक्स, क्वॉँटम थिएरी, रिलेटिव्हिटी यातलं त्याला काही म्हणता काही कळेना. कधी कधी तो कलाशाखेतली तत्त्वज्ञानाची लेक्चर्स अटेंड करी. ती त्याला बऱ्यापैकी लवचिक आणि अघळपघळ वाटत. एकंदरीत शास्त्रीय अचूकपणा आणि कठोर शास्त्रीय कसोट्या काही केल्या त्याच्या अंगवळणी पडेनात. त्यामुळे त्याने फेरविचार करण्यासाठी एक वर्षाचा ब्रेक घेतला. कॉलेज अतिश्रीमंत उच्चभ्रू लोकांचं असल्यामुळे त्याला काही मित्र-मैत्रिणी नव्हत्या. पण या काळात जे काही मित्र झाले ते जन्मभर टिकले. काही दुरावले, काही रागावले. पण शेवटपर्यंत टिकले. कलाक्षेत्रातील एक मुलगा त्याचा जवळचा मित्र झाला. त्याच्याबरोबर काही एकांकिका लिहिल्या. एका मासिकात फुटकळ सदर लेख लिहिले. बाबुरावांकडे येणारे शाळेतले मित्र, बाहेरील मासिकांत लिहिणारे मित्र आणि त्यांचे मित्र. मासिक जिथे छापले जाई तिथले मित्र आणि इतर मासिकं छापायला येत ते मित्र आणि त्यांचे मित्र असे मित्र जमत गेले. ते सर्व कलाक्षेत्राशी या ना त्या प्रकारे निगडित होते. एक मित्र सोडल्यास कोणाचेही सायन्सशी फारसे देणे-घेणे नव्हते. ही सर्वच मंडळी पुढे फारच नावारूपास आली. कोणी आघाडीचा दिग्दर्शक, कोणी आघाडीच्या वृत्तपत्राचा मालक, मुद्रक, प्रकाशक, कुणी आमदार, कुणी सिने दिग्दर्शक, कुणी आघाडीचा चित्रपट निर्माता, कुणी आघाडीचा आवाज (व्हाईस ओव्हर आर्टिस्ट), कुणी आघाडीचा कॉपीराइटर, कुणी आघाडीची कवयित्री, लेखिका म्हणून गाजले. हे एकेकटे म्हणून भारी होतेच. पण एकत्रितपणे अख्खा मराठी मीडिया त्यांनी व्यापला होता. त्यांच्या व्यतिरिक्त मराठी मीडियाची कुणाला कल्पनाही करता आली नसती. दे रिअली मेड देअर प्रेझेन्स फेल्ट.

तर अशा पुढे अग्रगण्य होणाऱ्या मीडियाबरोबर अरुणची सतत उठबस, चर्चा होत होत्या. त्यामुळे एकंदर मराठी मीडिया, प्रायोगिक वगैरे कलावंतांबद्दल प्रचंड जिव्हाळा येत होता. इथे सायन्समध्ये काही गती येत नव्हती. फेरविचार करण्यासाठी शिक्षणात ब्रेक घेतलेला असल्याने कामधंदा काहीच नव्हता. त्यामुळे लिखाण वगैरे चालू होतं. वडीलदेखील नोकरी सोडून घरीच बसले होते. त्यामुळे घरात टोकाची भांडणं चालू होती. आई बिचारी काम करून करून दोन निरोद्योगी माणसांना जेवण घालत होती. आदळआपट, शिव्याशाप, दूषणं देत का होईना जेवण देत होती. हे असंच वर्षानुवर्षे चालू राहणं लॉजिकली शक्य नव्हतं. कारण त्यात मुळात काही लॉजिक नव्हतंच. त्यामुळे अरुणचे आई-वडील विभक्त झाले. हे कधीतरी होणारच होतं. त्यामुळे अरुण त्रिशंकूसारखा कधी इथे तर कधी तिथे असा फिरत होता. त्यातून नर्व्हस ब्रेक डाऊन झाल्यामुळे फेरविचारासाठी

घेतलेला ब्रेक वाढतच चालला होता. पण त्यातून बऱ्यापैकी लिखाण होत असल्यामुळे मानसोपचाराचा वगैरे काही वेगळा खर्च नव्हता. लिखाणातूनच सर्व निचरा होत होता. साधारीकरण, आत्मानुभव सर्व वेळच्या वेळी होत होतं. अशा वेळी लिखाण सोडणं म्हणजे मिळालेली लाईफ लाईन सोडण्यासारखं होतं. त्यामुळे पुन्हा सायन्सला ॲडमिशन घेण्याचा विचारही अरुणच्या मनात येत नव्हता. पुढचा काळ जागतिक आणि मानसिक डिप्रेशनचा होता. त्यानंतर नाही विषण्ण घटना घडल्या. एक कवी मित्र शांतपणे धडधडणाऱ्या गाडीसमोर चालत गेला. कविता सोडून जगण्याचं त्याच्याकडे दुसरं काहीच साधन नव्हतं. जातिवंत कवी असल्यामुळे इतर कॉपीरायटिंग करणारे लेखक त्याला कॉपीरायटिंगची संधीदेखील देत नव्हते. दुसऱ्या एका नाट्य-दिग्दर्शक मित्राने आत्महत्येचा प्रयत्न केला. कलाकृती तिचे बळी घेत होती. वडील म्हणत या मित्रांना सांभाळ. त्यांच्यामध्ये डेथविश आहे. या मित्रांसाठी काही विशेष आर्थिक मदत करू न शकल्याची खंत अरुणच्या मनात कायमची राहिली.

त्यानंतर वडिलांचा मृत्यू. वडील ढासळत गेले, एकटे पडत गेले. समाजात स्वत:च्या क्रिएटीव्हिटीचा आत्मसन्मान मिळवण्यासाठी सोसायटीशी भांडत राहिले. एके दिवशी पाय घसरून प्लॅटफॉर्मवर पडले. बरगड्यांना मुका मार बसला. नशिबाने अरुण घरीच होता. त्वरित हॉस्पिटलमध्ये भरती केलं. आर्थोपेडिक प्रकरण वाटत होतं. वडिलांनादेखील तसंच वाटत होतं. हॉस्पिटलमध्ये गप्पा होत. वडील म्हणाले, 'सायंटिफिक फिनॉमिनाकडे कलेच्या नजरेतून बघ. एक रचना म्हणून, एक आकृतिबंध म्हणून;' त्यांची ही इनसाईट अरुणच्या खूपच कामी आली. वडिलांच्या बाजूला एक पारशी पेशंट होता. पण त्याचा एकही नातेवाईट भेटायला येत नव्हता. त्यामुळे तो देवाचा धावा करीत होता. देव न आल्यामुळे तो 'नर्स, प्लीज सेव्ह मी' असा धावा करू लागला. त्याच्या या अँटीकना कंटाळल्याने नर्स पण येत नव्हत्या. मग तो वॉर्डबॉयच्या विनवण्या करू लागला. वडील म्हणाले, 'याच्याशी बोल अरुण.' त्याच्याशी बोललो तर त्याला बरं वाटलं आणि तो झोपी गेला. वडील अरुणला म्हणाले, 'सायन्सवर लक्ष केंद्रित कर.' कलेच्या भानगडीत पडू नकोस. 'आर्ट टेकस् इटस् ओन टोल.' ते त्यांचं शेवटचं वाक्य ठरलं. अरुण झोपायला घरी जात असताना भेटायला आलेला काका म्हणाला, 'काय झालंय बघ.' अरुण आत गेला तर कार्डियाक लाईन फ्लॅट होत होती. प्रमुख हार्ट सर्जन नव्हता. नर्सेसची एकच धावपळ सुरू झाली. सर्वांना बाहेर काढण्यात आलं. पारशी पेशंटचे नातेवाईक जगातून कुठून कुठून येऊन त्याच्या कानात सुरेल आवाजात प्रार्थना गुणगुणत होते. नर्स फोनवर डॉक्टरशी बोलत होती, 'डॉक्टर पेशंट हॅज गॉन इन अरेस्ट.' वृद्ध गर्भश्रीमंत पार्शाने अरुणच्या खांद्यावर प्रेमळपणे हात ठेवून म्हटले, 'प्रिपेर फॉर द व्हर्स्ट. ही व्होन्ट कम बॅक. इटस् ओव्हर.' त्या स्पर्शाने सर्व अश्रू आटून गेले. त्यांना फार पुढे म्हणजे आज वाट मिळतेय. या अतिभव्य आलिशान रेस्टॉरंटमध्ये कॉफी पिताना आज अरुणच्या डोळ्यात अश्रू येत आहेत. त्यावेळी मात्र अरुण आत गेला तेव्हा वडील निपचित पडले होते आणि बाजूचा पार्शी पेशंट नुकताच पुनर्जन्म झाल्याप्रमाणे त्याच्याकडे बघून प्रसन्न निर्व्याज हसत होता.

सर्वच नातेवाईक कुठून कुठून अचानक गोळा झाले. वर्षानुवर्षे संपर्क नसलेले भाऊ वगैरे. आयुष्य संपल्यावर त्याचा लेखाजोखा करण्याचा हिंदू रीतिरिवाज आहे. त्यानुसार थोरली पाती वेल्थ टॅक्सचे करदाते श्रीमंत काकासाहेब वदले, 'ही वॉज नेव्हर इन अ बॅड कंपनी बट ही वेस्टेड हीज लाईफ.' अशा अधिकृत भरतवाक्याने वडिलांचे आयुष्य संपुष्टात आले. वडिलांचे शब्द कानात घुमत राहिले. 'एव्हरी आर्टफॉर्म टेक्स इटस् टोल.' अरुणने पुढच्याच आठवड्यात सायन्सला ॲडमिशन घेतली. सायन्टिफिक फिनॉमिनाकडे कलेच्या अँगलमधून आकृतिबंध रचनाकृती, मिथक, पॅराबल वगैरे नजरेतून बघण्याचा प्रयत्न केल्यावर त्याला ते हळू कळू लागलं होतं. हळूहळू त्यात गती आली. पुढे रस आला. पुढे प्रभुत्व आलं. द रेस्ट इज हिस्टरी.

पण त्यामुळे अरुणचं शिक्षण मारुतीच्या शेपटीसारखं वाढत चाललं. गरज आणि इच्छा असून नोकरी करणं जमेना. अभ्यासक्रम अफाट होता. आवाक्यात न येणारा होता. त्यामुळे पुन्हा फुटकळ लेखन करून मिळेल तो पैसा आपला म्हणत होता. घरात पैसे देता येत नव्हते. आई थकत चालली होती. पाय सुजत होते. पण ती नोकरी सोडत नव्हती. तो तिचा आत्मसन्मान होता. एके दिवशी वयाच्या अठ्ठ्यांशीव्या वर्षी ती झोपेतच गेली. सर्व दुर्मिळ नातेवाईक पुनश्च जमले. 'ती एक धीट कामसू स्त्री होती. आयुष्यभर तिने दोन निरुद्योगी लोकांना सांभाळलं.' या भरतवाक्यावर एकमत झाल्यावर सर्व नातेवाईक पांगले. पुढे अरुण त्यांना आणि ते अरुणला कधीच भेटले नाहीत. कारकुनीमधल्या काळात सर्व मित्र खूपच पुढे निघून गेले होते. वेळच्या वेळी नोकरी पत्करल्याने आता उच्चपदस्थ झाले होते. मीडियातील मित्रांचे



वर्तुळ आता आंतरराष्ट्रीय झाले होते. सर्वांच्या परदेशवाऱ्या सुरू होत्या. साहजिकच या व्यापात नैसर्गिक न्यायानुसार त्यांच्या भेटीगाठी कमी होत नंतर पूर्णपणे ठप्प झाल्या होत्या. आईचं घर आणि संपत्ती बहिणीच्या हवाली केल्यावर अरुणकडे त्याच्या बौद्धिक संपदेशिवाय काहीच उरलेलं नव्हतं. आधीच श्रीमंत असणारा मेव्हणा आणखी प्रचंड किमतीची स्थावर मिळाल्याने खुश होता. त्यामुळे तो आता वडिलांच्या निधनाच्या वेळी उधार घेतलेल्या पाच हजार रुपयांवरून बहिणीला हिणवत नव्हता. त्यामुळे सर्व सुखी होते. म्हणजे रूढ अर्थाने उशिरा का होईना अरुणने त्याची सर्व कर्तव्ये पूर्ण केली होती. आईला भौतिक सुख देता न आल्याची खंत मात्र कायम होती. अशा रितीने सर्व बंधनांतून मुक्त झाल्याने अरुणचा मानसिक दबाव गेला होता. त्यामुळे आता निचरा, आत्मानुभव, साधारीकरण करण्यासाठी त्याला लिखाण वगैरे करण्याची गरज उरली नव्हती. त्यामुळे त्याने सायन्स, इलेक्ट्रॉनिक्सवर लक्ष केंद्रित केलं आणि करिअर आपसूकच होत गेली. फार प्रयत्न करावे लागले नाहीत. स्कॉलरशिप वगैरे सुदैवाने मिळत गेल्या आणि आज तो इथे होता, ओलावलेल्या डोळ्याने कॉफी पीत होता. पुष्कळतेच्या देशाने त्याला त्याचा हरवलेला आत्मसन्मान दिमाखात परत दिला होता. आता हा देश त्याचा देश होता. या देशाचा शत्रू त्याचा शत्रू होता. अगदी तो शत्रू त्याची स्वत:ची मातृभूमी का असेना. या देशानं त्याला आपलासा केला होता. आता फक्त एकच टप्पा पार करायचा होता 'ग्लास सिलिंग'. ते काही तुटता तुटत नव्हतं. कॉफी आणि सँडविच संपल्याने त्याची विचारांची शृंखला तुटली आणि त्याने आवाजाच्या दिशेने पाहिले. पार्किंगच्या मजल्यावर लिमोझिनच्या तांड्यातून तो आत आला. त्याने जगातील सर्वोत्तम सूट घातला होता. सर्वोत्तम गॉगल्स, सर्वोत्तम घड्याळ, सर्वोत्तम मोबाईल. त्यांच्या एकंदर देहबोलीत एक घरंदाज आब होता. तो शांतपणे हॉटेलमधल्या सर्वोत्तम टेबलवर बसला. सर्वोत्तम लॅपटॉप घेतलेल्या सर्वोत्तम हॅण्डपिकड सेक्रेटरी सर्वोत्तम बिझनेस स्ट्रॅटेजी प्लॅन करू लागल्या. जगातील सर्वोत्तम सूटचा आदब राखत हॉटेलचे सर्वोत्तम मॅनेजर वेटर्स आणि बेल बॉईज आदबीने, चिमणीच्या प्रोफेशनल सफाईने डिस्टर्ब न होईल अशा प्रोफेशनल रिमोटपणे आजूबाजूला वावरत होते. जगातील सर्वोत्तम सूटबद्दलचा नितांत सार्वभौम आदर सर्वत्र पसरला होता. तो कुणी क्रिमिनल नव्हता. आयटी क्षेत्रातील सर्वोत्तम टायकून होता. हे सर्व वैभव त्याने केवळ आपल्या बौद्धिक संपदेवर हासील केलं होतं. तो पुष्कळतेच्या देशातच जन्मला होता आणि पुष्कळतेच्या देशानं त्याला अमाप, अमर्याद संपत्ती दिली होती. हेच ते ग्लास सीलिंगच्या वर राहणारे लोक. टॉप ब्रास. असा सूट कधी आपल्या अंगावर येईल का? असा कुठूनही विचार केला तर उत्तर नकारार्थी येत होतं. पण तसा विचार अरुणच्या मनात येतच राहिला. एक उत्तम सूट शिवायला नऊ तरबेज शिंपी लागतात अशी म्हण आहे. तर सर्वोत्तम सूटसाठी किती ?

त्याच परिघात दोन इमारती सोडून दुसऱ्या एका भव्य बिझनेस सेंटरच्या तळमजल्यावरील काहीशा कोझी आणि

'कॉस्ट इफेक्टिव्ह' कॉफी शॉपमध्ये ब्लॅक कॉफीचे घुटके घेत अरुणा आपल्या लॅपटॉपवर तिने डिझाईन केलेली ज्वेलरी आणि विंटर कॉस्ट्यूमची डिझाईन्स नजरेखालून घालत होती. प्रेझेंटेशन सुरू व्हायला अजून दोन तास होते. प्रेझेंटेशन साध्यासुध्या व्यक्तीला करायचे नव्हते तर जगात सर्वत्र ज्वेलरी ॲक्सेसरीज, परफ्यूम्स, कॉस्ट्यूम्स, फाईव्ह स्टार हॉटेलची, बिच रिसॉर्टस्ची चेन असणाऱ्या मादाम वोव्हरीला करायचं होतं. डेम मादाम वोव्हरी. जगातील सर्वात श्रीमंत, सर्वात सुंदर बिझनेस वूमन. तिची स्टोरी 'रॅग टू रिचेस' अशी होती. अरुणाला आपलीही रॅग टू मॉडरेट रिचेस अशी सक्सेस स्टोरी आठवली.

अरुणा मूळची इंदौरची. तिचे आजोबा इंदौर संस्थानचे दिवाण होते. त्यांच्या वैभवाच्या किश्श्यांवर आणि घरंदाजपणावर तिचे दारिद्र्य सुसह्य झाले. आजोबांचं ठाकठीक असं कुटीर होतं. लोक सांगत तसा भव्य वाडा वगैरे काही नव्हतं. इंदौर संस्थान बडोदा संस्थानाइतकं वैभवशाली नसेल कदाचित. आजोबांची लहानपणीची एक अंधूक आठवण अरुणाच्या मनात होती. आजोबा (रेसमध्ये प्रचंड हरल्यामुळे) दारू पिऊन दिवाणावर लुडकले होते. पुढच्याच आठवड्यात त्यांना तिरडीवर ठेवले होते आणि नाकात कापसाचे बोळे कोंबले होते. पुढे अरुणाला कळलं ते लिव्हर सिरॉसिसने गेले. नंतर सर्वच आनंदी आनंद! आजोबांचं सर्वच गहाण होतं. त्यावर जप्ती आली. उरलेले पैसे वडिलांनी घामाच्या कमाईतून चुकते केले. वडील एअर लाईनमध्ये मेंटेनन्स इंजिनिअर होते. त्यामुळे कमाई बरी होती. अधिक चांगली होऊ शकली असती. पण वरकमाई वडिलांना पसंत नव्हती. आई संस्थानाच्या शाळेत कलाकुसर शिक्षिका होती. आजोबांचा 'भव्य' वाडा जप्त झाल्यावर वडील एअर लाईन क्वॉर्टरमध्ये घेऊन गेले. अगदी चैन नसली तरी आर्थिक स्थैर्य व स्थिती उत्तम होती. शाळा जवळच होती. वर्षातून एकदा देशात कुठेही जायची सोय होती. सर्व काही उत्तम चाललं होतं. पण नियतीच्या मनात वेगळंच काही होतं. का कुणास ठाऊक नियतीच्या मनात नेहमीच काही वेगळं असतं. आई-बाबा विमान प्रवासास गेले होते. परीक्षा असल्याने अरुणा घरीच थांबली होती. विमानाला अपघात झाला. सर्व प्रवासी ठार झाले. खरं तर विमान जुनं झालं होतं. मेंटेनन्सच्या पलीकडे गेलं होतं. पण ठपका मेंटेनन्स डिपार्टमेंटवर आला. प्रवाशांचे बळी घेणारा एक हलगर्जी मेंटेनन्स चीफ असा मरणोत्तर किताब तिच्या वडिलांना चिकटला तो कायमचाच. तिची हसतमुख आईदेखील नव्हती. आता अभ्यास कुणाच्या जोरावर करायचा? अरुणाला रडू फुटलं. एअर लाईन क्वॉर्टर सोडावे लागणार. वडिलांनी तिच्यासाठी भविष्यनिधी विमा वगैरे सर्व ठेवलं होतं. फक्त राहण्याचा प्रश्न होता. जवळचे नातेवाईक बहुतेक कोणी नसावेत. कारण कोणीच पुढे आलं नाही. शाळेच्या मुख्याध्यापकांनी तिची सोय निवासी आश्रमशाळेत करण्याचं ठरवलं. आता आश्रमशाळा, तिथे होणारे छळ वगैरे क्लिशे डोक्यात असतील तर ते बिलकूल काढून टाका. शाळेची इमारत जुनी पण देखणी होती. खोल्या हवेशीर होत्या. प्रत्येकीला स्वतंत्र खोली होती. स्वतंत्र कपाट, स्वतंत्र अभ्यासाचं टेबल होतं. मेट्रन प्रेमळ होती. मुलींना मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशक होते. आजारी पडल्यास डॉक्टर्स होते. अशा निवासी शाळा आज ऋषी व्हॅली किंवा सर्चमध्येच पाहायला मिळतील. उत्तम मेस होती. साधं पौष्टिक खाणं, दूध, फळं वगैरे मुबलक होतं. शाळेबाहेर लॉन होती. डून स्कूल किंवा तत्सम उच्चभ्रू शाळेतील हॉस्टेलवर घडतं तसं रॅगिंग वगैरे प्रकार बिल्कूल नव्हते. फक्त मुलींनी स्वत:ची कामं स्वत: करावीत अशी अपेक्षा होती. ते त्या आनंदानं करीत. शिवाय मेसमध्ये स्वयंपाक, भांडी विसळण्यास देखील मदत करीत. आठवड्यातून एकदा पूर्ण इमारतीची साफसफाई करण्यास मदत करत. अभ्यासाव्यतिरिक्त शाळेत व्यवसाय शिक्षण, पूरक शिक्षण, व्होकेशनल ट्रेनिंग असे अभ्यासक्रम होते. त्यात शिलाई, स्वयंपाक, चित्रकला, गायन, वादन, ज्वेलरी आणि कॉस्ट्यूम डिझायनिंग असे अभ्यासक्रम होते. अरुणाला दागदागिन्यांची पहिल्यापासून आवड होती. दागिने घालणं त्याच्या वजनामुळे आवडत नसे. त्यामुळे स्वाभाविक हालचालींना बाधा येते असा तिचा अनुभव होता. पण संस्थानिकांच्या घरातील बायकांच्या पारंपरिक आणि आधुनिक दागिन्यांची ती चित्ररूपाने नोंद ठेवत असे. तिच्या आईलादेखील दागिन्यांची उत्तम जाण होती. अरुणा आणि तिची आई रुखवत म्हणून तीळगुळाचे अप्रतिम दागिने 'मुकुट', 'बाजूबंद', 'कमरपट्टा', 'वाकी' वगैरे बनवत. नैसर्गिक आणि उपजत कुतूहलापोटी अरुणाने या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. तेव्हा तिला माहितीच नव्हतं आपला जन्मच लोकांच्या अंगावर दागिने आणि पेहराव चढवण्यासाठी झाला आहे. तिच्या बाईही तिच्या प्रगतीवर खुश होत्या. दागिन्यांची वेगवेगळी पुस्तकं त्या कुठून कुठून घेऊन येत. ते बघून अरुणा स्वत:ची डिझाईन्स करायला शिकली. अरुणा शाळेत उत्तमरित्या प्रथम वर्गात पास झाली. पण तिने स्वत:साठी फॅशन आणि ज्वेलरी डिझाइनिंगचं

क्षेत्र निवडलं. अहमदाबादला दुसऱ्या वर्षात असताना तिला एका मुलाच्या घरून लग्नाची मागणी आली. मुलगा लहानपणापासून बघण्यातला होता. तिने होकार कळवला आणि इथेच तिच्या दुर्दशेला सुरुवात झाली. लग्नानंतरचा पहिला महिना ठीकठाक गेला. नंतर त्या मुलाचे एकेक गुण पुढे येऊ लागले. नवऱ्याला कोकेनचे व्यसन होते. बायांचा नाद होता. जुगाराचा नाद होता. घरच्या बायका तिला समजावत. खानदानी रक्तात 'हे सर्व असतंच.' तिचं म्हणणं एकच 'हे सर्व मला आधी का नाही सांगितलं ?' बरं घर खानदानी दिसत असलं तरी 'बडा घर पोकळ वासा' अशी स्थिती होती.

नवऱ्याने तिचं शिक्षण बंद केलं. बाहेर जाणं बंद केलं. दररोज मारहाण, पाशवी बलात्कार सहन करत ती आतून उद्ध्वस्त, भ्रमिष्टासारखी झाली. तिचा आत्मविश्वास पार ढासळून गेला. मानवी पातळीखालील पशूसारखी तिची परिस्थिती झाली. एक दिवस भ्रमिष्ट अवस्थेत अंगावरील वस्त्रांनिशी तिने घर सोडलं ते कायमचंच. आश्रमशाळेतील तिच्या मेट्रनने तिची अवस्था पाहिली तेव्हा ती आतून हलून गेली. मग वैद्यकीय उपचार, समुपदेशन, व्यायाम यातून ती हळूहळू माणसात आली. मग न्यायालयीन लढाई, घटस्फोट, नवऱ्यास अटक या सर्व सोपस्कारात दोन वर्षे गेली. त्या काळात तिने मेट्रनच्या हाताखाली मेसचं प्रमुख काम केलं. इतर डिझायनिंगच्या कामातून पैसे साठवले व आपलं शिक्षण पुन्हा सुरू केलं. तिच्या कामाची गुणवत्ता शिक्षकांच्या डोळ्यात भरत गेली. अनेक बक्षिसं मिळवत ती फॅशन इंडस्ट्रीच्या डोळ्यात भरली आणि ती सर्वाधिक मार्क्स मिळवून देशातून सर्वप्रथम आली. त्यावेळी सरळ कॅम्पस् रिक्रूटमेंटने भारतातील एका आघाडीच्या फॅशन चेनमध्ये ट्रेनी म्हणून भरती झाली. भराभर बदल्या मिळत गेल्या आणि त्यानंतर तिने मागे वळून पाहिले नाही. (कारण मागे वळून पाहण्यासारखे काही नव्हतेच.)

व्यावसायिक यशाची एकेक शिखरं पादाक्रांत करत आज ती इथे होती. जगातील एका प्रसिद्ध चेनची चीफ डिझाइनर आणि ह्यूमन रिसोर्स चीफ. हाताखाली कित्येक लोकांचा ताफा होता. आता फक्त एक पायरी बाकी होती. 'ग्लास सीलिंग' मात्र तुटता तुटत नव्हतं. मोबाईलचा अलार्म ॲलर्ट वाजला. प्रेझेंटेशनला पंधरा मिनिटं बाकी होती. ती कॉन्फरन्स रूमच्या दिशेने चालू लागली.

सर्व सामग्रीची ट्रायल झाली होती. तिने एक सॅम्पल ट्रायल घेतली. सर्व अलबेल होतं. प्रकाश ड्रेपरी टेबलची काच, पॉलीश, फुलदाण्या, शोकेस, पुतळे, मॅनेव्हीनस् सर्व उत्तमरित्या मांडले होते. एअर कंडिशनरचं टेंपरेचर परफेक्ट होतं. प्रोजेक्शन, आवाज, प्रतिमा उत्तमरित्या येत होत्या. सर्वजण आपल्या जागी उत्तम पोशाखात स्थानापन्न होते. सेक्युरिटी, एमर्जन्सी सर्व्हिसेस, फायर डिपार्टमेंट सर्व ॲलर्ट होते. तिने अवाढव्य स्क्रीनखाली स्वत:ची जागा घेतली व लॅपटॉप कनेक्ट केला. बरोबर वेळेच्या ठोक्यावर डेम मादाम वोव्हरीनी त्या भव्य दालनात प्रवेश केला. तिचा जगातील सर्वोत्तम मिंक कोट पाहून सर्वजण आदराने उभे राहिले. त्या कोटची किंमत अब्जात होती. तिची फिगर आदर्श फिगर होती. तिचं चालणं खानदानी नाजूक होतं. त्यात मादकपणाचा लवलेशही नव्हता. तरीही जगातील सेक्सीएस्ट स्त्री म्हणून जग तिला ओळखत होतं. समोर उभी असलेली स्त्री ही कोणी शिड्या चढून आलेली गोल्ड डिगर नव्हती, हे सर्व साम्राज्य तिने आपल्या बुद्धीने आणि मेहनतीने उभं केलं होतं. मादामदेखील अरुणाप्रमाणे बोर्डिंग स्कूल, ऑर्फनेजमध्ये वाढली होती. ती ज्या माणसाच्या प्रेमात पडली तो माणूस 'ड्यूक' होता हे तिला नंतर कळलं. त्यांच्या आईच्या घराण्यातून आलेली फॅशन चेन होती. आणि ती जवळपास डबघाईस आली होती. मादामचं लग्न ठरलं त्यावेळेस ती बरोबर अरुणासारखीच कॅम्पस् रिक्रूटमेंटद्वारा एका जागतिक फॅशन कंपनीत ट्रेनी म्हणून रुजू झाली होती. ट्रेनिंग घेता घेता एकीकडे तिने फॅमिली बिझनेसची गाडी रुळावर आणायला सुरुवात केली. डबघाईत गेलेली कंपनी नफ्यात आणून दाखवली. दोघांचा सुखाचा संसार चालू असतानाच लग्नाच्या पाचव्याच वर्षात ड्यूकचे हार्टअटॅकने निधन झाले आणि मादामने पूर्णपणे फॅशन चेनला वाहून घेतले. एकेक प्रॉडक्ट रेंज सामील करत गेली. ज्वेलरी, कॉस्ट्यूमस् ॲक्सेसरीज, मग पंचतारांकित हॉटेलची चेन, अँटीक बीच रिसॉर्टस्, क्रूझस, कॅटेमेरॉन्स, गोल्फ कोर्सेस, वॉटर पार्कस्, एक अखंड मालिकाच सुरू झाली. मादामचं प्रत्येक डिझाईन, प्रत्येक रेंज, प्रत्येक बिझनेस स्ट्रॅटेजी, प्रत्येक हालचाल एक क्लासिक 'लिजंड' होऊन बसली. ग्रेसफुली स्थानापन्न झाली. प्रेझेंटेशन अर्ध्या तासाचचं होतं. अरुणाने आपल्या कंपनीचं पूर्ण काम शोकेस केलं. मादाम एकही शब्द बोलली नाही. प्रेझेंटेशन संपल्यावर 'वेल डन' इतकंच म्हणाली. अरुणाला आतून भरभरून आलं. यापुढच्या कामासाठी आणखी अर्धा तास ठेवला होता. मादामच्या क्वेरीजना उत्तर देण्यासाठी सर्व डिपार्टमेंटचे प्रमुख तयार होते. त्यानंतर सर्वात

कठीण काम ‘निगोसिएशन्स’. त्यासाठी संचालक मंडळ स्वत: सरसावून तयार होतं. मादाम काही बोलल्या नाहीत. शांतपणे उठून संचालकांना अभिवादन करत म्हणाल्या, ‘ॲण्ड नाऊ आय ॲक्सेप्ट यू ॲज माय बिझनेस पार्टनर्स, ॲण्ड फ्रँचाईसी इन फॅशन इंडस्ट्री. मे आय साईन द ॲग्रीमेंट ?’ ॲग्रीमेंट दोन दिवसांपूर्वीच मादामने आणि तिच्या तज्ज्ञांनी तपासून झालं होतं. अवाक् झालेल्या संचालकांनी ॲग्रीमेंट पुढे केलं. सोन्याच्या ज्वेलरी पेनने सही करून गुडघ्यातून अभिवादन करून मादाम राजेशाही चालीत दरवाजातून बाहेर पडल्या. काही अब्ज डॉलर किमतीच्या मिंक कोटच्या सुबक पाठीकडे दालनातील सर्व उच्चपदस्थ अवाक् होऊन पाहात राहिले. आपल्या बौद्धिक उंचीनं मादाम त्या अवाढव्य दालनास खुजा करून निघून गेली होती. डेम मादाम वोव्हरी अरुणापेक्षा फक्त चार वर्षांनी मोठी, फक्त अठ्ठावीस वर्षांची होती.

अरुणाच्या मनात विचार येत होता, असा मिंक कोट आपल्याला कधीतरी घालता येईल का ? पन्नास हजार वेळा जरी उत्तर नकारात्मक होतं तरी विचार मनात येतच राहिला. विचारांना सेक्युरिटीची माणसं थांबवू शकत नाहीत. त्यानंतर घडलं ते अरुणाच्या दृष्टीने अभूतपूर्व होतं. फीझफ्रेममध्ये गोठलेली ती आणि प्रशस्त दालनातील चाळीस उच्चस्तरीय माणसं मुक्त झाल्याप्रमाणे हवेत उड्या मारू लागली. “हीप हीप” ‘हुर्रे’च्या कोरसनी सर्व दालन दुमदुमून गेलं. स्वत: संचालकांनी सर्वप्रथम अरुणाला हस्तांदोलन करून तिचे मुक्तकंठाने अभिनंदन केलं. असं फक्त मुबलकतेच्या देशातच घडू शकतं. त्याचं त्याचं श्रेय ज्याला त्याला थेट दिलं जातं. भारतात श्रेय लाटण्यासाठी अख्खी उतरंड उभी असते.

त्यानंतर अरुणावर अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला. एकही माणूस असा नव्हता ज्याला अरुणाचं यश खुपत होतं. हेदेखील फक्त मुबलकतेच्या देशातच होऊ शकतं. नंतर सर्व दालन मोबाईलच्या रिंगटोनने दणाणून गेलं. अरुणाच्या टीमने तिला डोक्यावर उचलून थेट बँक्वेट हॉलमध्ये आणलं. वाचलेला अर्धा तास आणि लंच ब्रेकचा दीड तास, दोन घसघशीत तास होते. शँपेनची बुचं आणि फवारे हवेत उसळले. थ्री कोर्स डीनर आले. मनमोकळ्या गप्पा झाल्या. कंपनीच्या इतिहासात असं प्रथमच झालं होतं. कामाच्या शोकेसवर इतकं मोठं डील झालं होतं. कायद्याचा कीस नाही, निगोसियशन्स नाही, घासाघीस नाही. कर्मचारी कपात, अदलबदल नाही. डोक्यावर बाहेरून आणून बसवलेला कोणी तज्ज्ञ किंवा कन्सल्टंट नाही. पेनच्या एका स्ट्रोकमध्ये कंपनीला पहिल्यांदा दहा फ्रंटलाईनर्समध्ये आणून ठेवलं होतं. प्रेझेंटेशनच्या दरम्यान डेम मादा वोव्हरी काही बोलल्या नाहीत. कारण त्या टीमचं सर्व काम जवळजवळ परफेक्ट होतं आणि प्रश्न विचारण्यात वेळ न दवडता डेम मादाम वोव्हरी सर्व कामाची शोकेस बारकाईने पाहात होत्या. अख्खं अर्ध्या तासाचं प्रेझेंटेशन त्यांना पाठ झालं होतं. अरुणाला आज जरी स्वर्ग ठेंगणा झाला असला तरी मादाम तिला त्यांच्या चेंबरवर बोलवणार असतात. तिची आणि तिच्या टीमची मुक्त कंठाने स्तुती करणार असतात. मग प्रत्येक डिझाईनवर चर्चा करत समजा असं केलं तर ? म्हणून एक अत्यंत सूक्ष्म बदल सुचवणार असतात. अरुणा थक्क होऊन बघत राहणार असते. कारण ती प्रत्येक सूक्ष्म सूचना एक मास्टर स्ट्रोक असणार असतो. त्यामुळे प्रत्येक डिझाईन एका झटक्यात ऑल टाईम क्लासिक कॅटॅगरीत जाऊन बसणार असते. ऑल टाईम क्लासिक म्हणजे ग्रीक, रोमन, इजिप्शियन, मुघल, मौर्य, चालुक्य, राजपूत, बुंदेला, पेराना ते आजपर्यंत. मग अरुणाला कळणार असतं मादामना लिजंड का म्हणतात. कारण तिने आणि तिच्या टीमने आणखी दहा वर्षं काम केलं तरी हे त्यांना सुचलं नसतं. अरुणा मादामच्या पायांची मनातल्या मनात पन्नास हजार चुंबनं घेणार असते आणि तिला कळून चुकणार असतं की हे ग्लास सिलिंग तोडणं ‘मुश्कील ही नही नामुमकीन है ।’

पण ती नाउमेद न होता प्रयत्नांची शर्थ करणार असते. मादामला अल्टिमेट गुरू मानून एकलव्याप्रमाणे साधना करणार असते आणि ग्लास सिलिंगच्या वर खेचण्यासाठी कधी तरी मादामचा हात येईल अशी आशा करणार असते आणि तिने योग्य दिशेने काम केलं तर मादामचा हात येण्याची शक्यता नसते तर शंभर टक्के खात्री असते. असं फक्त मुबलकतेच्या देशातच होऊ शकतं. पण आता तरी अरुणाला याची कल्पना नसते कारण ती आज कंपनीच्या बँक्वेट हॉलमध्ये उत्सवमूर्ती आहे. तिचं वागणं नेहमीसारखं आहे. पण आतून यशाचं एक दालन पादाक्रांत केल्याची सुखद जाणीव आहे. इतक्यात घंटा वाजते आणि पार्टी संपते. लोक आपापल्या कामावर आणि आता वाढलेल्या अपेक्षापूर्तीसाठी, फ्यूचर प्रोजेक्शनसाठी त्वरित आपापल्या डेस्कवर बसतात. हे सुद्धा फक्त पुष्कळतेच्या देशातच घडू शकतं. तर्रर होऊ नये, झोपू नये म्हणून ते काय करतात ? एकेक बंपर ब्लॅक कॉफी पितात. अरुणाचं भारतीय ओरिजिन तिला सांगत




असतं आज सुट्टी घे, धमाल कर, इंदौरला मेट्रेनला फोन कर. शॉपिंग कर. सुट्टी घे. पण तिला माहीत असतं की तिची अख्खी टीम भविष्यकाळाची स्ट्रॅटेजी ठरवण्यासाठी कामाला लागलीसुद्धा. मग ग्रुप लिडरने सुट्टी घेऊन कसं चालेल. काहीशा नाखुशीनेच ती आपल्या वर्कस्टेशनसमोर बसते आणि दहा मिनिटांत आपल्या कामात इतकी मग्न होते की पहाटे घरी जाते. इतक्या तासांत तिच्या पाच वर्षांचा प्लॅन तयार झालेला असतो. चार तासांची आवश्यक झोप घेऊन ती पुन्हा टवटवीत होऊन दहा वाजता बरोबर रिपोर्टिंग टाईमवर कामावर हजर होते. तिच्या कामाची, तिच्या 'ओव्हरटाईमची' आणि तिच्या स्ट्रॅटेजीची योग्य ती दखल घेतली जातेय. एका रात्रीत केलेल्या प्लॅनचे वर्कस् तिच्या सो-कॉल्ड ओव्हरटाईमपेक्षा तिच्या शॉपिंग किंवा सुट्टीच्या आनंदापेक्षा कित्येकपटीने जास्त असतात. मनात आणलं असतं तर ती अर्धा दिवस सुट्टी घेऊ शकत होती. मुबलकतेच्या देशात कामाचे तास मोजत नाहीत, कामाचा दर्जा मोजतात. तुम्हाला दिलेलं एक दिवसातलं काम तुम्ही तीस सेकंदात संपवून घरी गेलात तर तुम्हाला डच्चू मिळत नाही तर प्रमोशन मिळतं. एक दिवसाचं काम तीस सेकंदात करायला असामान्य प्रतिभा लागते. मुबलकतेच्या देशात प्रतिभेची कदर आहे. म्हणूनच 'मी बोलत नाही, माझं काम बोलतं.' अशी धारणा असलेल्या खुद्दार माणसांना मुबलकतेचा देश खुणावतो, कारण भारतात एका कल्याणकारी प्लॅनवर चर्चा करायची आहे म्हटलं तर समोरचा राखीव जागांवर अधिकारी बनलेला, ज्याचं खाणं बाजरीची भाकरी, कांदा, भरली वांगी आणि हिरव्या मिरच्यांचा ठेचा असायचं तो एकदम रक्कम बघून म्हणतो, संध्याकाळी ताजमध्ये शामियानामध्ये भेटू. माहितीय रिझर्व्हेशनवाला म्हणतो पकडके रखो मालदार पार्टी आहे. आज ताजमध्ये गेलो. उद्या पॅरिस हिल्टनमध्ये जाऊ. पार्टीका दूध निकालके रखो. अर्थात रिझर्व्हेशनवाल्याचं हे स्वप्न पूर्ण होत नाही. कारण ऑफिसमध्ये गेल्या गेल्या त्याच्या हातात टर्मिनेशन ऑर्डर मिळते. मग तो स्कॉचची चव जिभेवर घोळवत घोळवत नेहमीच्या आंटीच्या गुत्त्यावर जाऊन ठर्रा मारतो आणि घरी जाऊन बायकोला तुडव तुडव तुडवतो. आता तुम्ही म्हणाल की मुबलकतेच्या देशातील परिकथा चालू असताना हे एकदम भारतातलं वास्तव. ते देखील इतक्या क्रूड पद्धतीने आणायची काही गरज आहे का?

तर आहे. नाही तर दोन देशांतील विरोधाभास कसा दिसणार?

तुमच्या या फॅशन आणि रोबोटीकची इथे काय गरज ? ते तुमचं तुमच्याप्रमाणे चालू दे. आमचं आमच्याप्रमाणे चालू दे.

असं चाललं तर एके दिवशी तुम्ही सर्व मराल आणि धिरुभाई पंतप्रधान असेल.

'मग तुम्ही इथे या.'

'आम्ही त्या गटारांत येणार नाही. तुम्ही तुमची गटारं साफ करा. आम्ही मदत करू.' असं अरुण अरुणा त्यांना म्हणाले असते. पण ते असो.

तर ही सर्व वस्तुस्थिती, देश, सापेक्ष, घाण, दलदल कथेत आणल्यावर आपण पुन्हा मुबकलतेच्या देशाकडे वळू. जसं रिझर्व्हेशन अधिकाऱ्याचं वास्तव हे पूर्ण देशाचं वास्तव नाही.

तसंच अरुण अरुणाची गोष्ट ही मुबकलतेच्या देशाचं पूर्ण वास्तव नाही. आतापर्यंत तुम्ही तसं मानून चालला असाल तर ती तुमची चूक आहे. घोडचूक ! माझी नाही. आता हे हिडीस वास्तव शुद्ध खानदानी वास्तवातून मध्येच डोकं का वर काढतंय हे मला माहीत नाही. याचं एक कारण असं असेल की मी लेखक होण्याच्या लायकीचा नाही. माझा माझ्या शब्दांवर ताबा नाही. कंट्रोल नाही. पण कदाचित असंही असेल की विद्रूप वास्तव, सौंदर्यात्मक सुखी समाधानी आणि सधन वास्तवाला सदैव असंच शिंगं मारत असावं.

इतर मुबकलतेच्या देशात महत्त्वाच्या ठिकाणी, म्हणजे राजकीय महत्त्वाच्या ठिकाणी नव्हे तर बिझनेस हबमध्ये सुद्धा ते सुद्धा जगातल्या सर्वात श्रीमंत महिलेच्या म्हणजे अर्थात बिलियन डॉलर मिंक कोट डेम मादाम बेव्हरी वय वर्षे अठ्ठावीस यांच्या शाही क्रूझरवर एक शाही पार्टी आहे. सगळे 'हू इज हू' इन्व्हायटीज् आहेत. अर्थात त्यात आय टी टायकून क्षेत्रातील सर्वोत्तम सूट, यूवर नाईटहूड, सर नाईटस् टेंपरल, जगातील सर्वोत्तम सूट ऑफ द ग्रँड ऑर्डर सर क्रिस्टोफर मार्लो यांना तर आग्रहाचे निमंत्रण आहे. अरुणाला तर जिव्हाळ्याचे प्रोफेशनल निमंत्रण आहे. अरुणनेदेखील आमंत्रण मॅनेज केलंय. पार्टीची थीम आहे. ''बी यूवरसेल्फ अॅण्ड फ्रीक आऊट'' त्यामुळे प्रत्येकजण मर्यादितपणे प्रोफेशनल आब राखून टोटल अॅबन्डन्स फ्रीक आऊटचा आव आणत आहे. आता निदान इथे तरी अरुण अरुणाची भेट व्हायला हवी. पण ते शक्य दिसत नाही. कारण अरुणा क्रिमी लेअर, बिग ब्रासच्या वरच्या डेकवर आहे आणि अरुण दूर खाली मर्यादित भोजनाच्या कक्षात बसून (मुबकलतेच्या देशात मर्यादित भोजनदेखील अमर्याद असते.) 'बी यूवरसेल्फ' टोटल फ्रीक आऊट होण्याचा प्रयत्न करतोय. तर तो अधिकाधिक गोंधळात पडतोय. 'मी कोण' या प्रश्नाचं उत्तर काही त्याला मिळत नाहीए. अर्थात ते 'तत्त्वमसि' सांगणाऱ्या वेदान्तींना, असं सांगणाऱ्या सॉक्रेटिसला किंवा 'नो देन दाय सेल्फ' जज 'नॉट मॅन टू स्कॅन प्रॉपर स्टडी ऑफ मॅनकाईंड' अशी कविता लिहिणाऱ्या अॅलेक्झांडर पोपला किंवा त्याच्या बापाला किंवा ब्रह्मदेवाच्या बापालादेखील सांगता येणार नाही. (आता प्रश्न असा आहे की ब्रह्मा, विष्णू, महेश हे जर मूळ तत्त्वं मूळ पुरुष तर ब्रह्मदेवाचा बाप कुठून आला) पण असा प्रश्न मुबलक देशातील नागरिकांना पडत नाही. कारण आपली व्युत्पत्ती पापातून झाली हेच त्यांना मान्य नाही. जे इतकं सुखद, हवंहवंसं शिवाय जे इतकं सार्वत्रिक ते पाप कसं ? मुबकलतेच्या देशातील लोक विज्ञानवादी आहेत. ते सदैव म्हणतात, 'प्रूव्ह इट' याच्या खालोखाल काय आवडतं वाक्य आहे. 'शो मी द मनी' हे देखील एक प्रकारचं आँटॉलॉजिकल प्रूफच आहे.

तर थोडक्यात सांगायचं तर 'लाईफ गोज ऑन, सो लेटस् कॅच अप.'

अरुणा इथे अजून मादामच्या जिनियसला सामोरी गेली नसल्याने ती स्वत:मध्ये गर्क आहे. दागिन्यांची डेफीनेशन सापेक्ष असते हे ती विसरलीय. गोंड माडियांचे मण्यांचे दागिने हे त्यांच्या दृष्टीने मौल्यवान दागिने असतात हे ती विसरलीये आहे. मणी देऊन मौल्यवान ऐतिहासिक वस्तू त्यांच्याकडून लुटल्यात हे ती विसरली आहे. रेड इंडियन्सना पिसहाचे दागिने देऊन, त्यांच्या खनिज दृष्टीने 'कठीण दगड' फोडण्यास निरुपयोगी ते हिरे मुबलकतेच्या देशाच्या स्थापकांनी लुटलेत हे ती विसरलीय. कार्पेट बॅगर्सच्या कत्तली ती विसरलीय. "A cuba drives for the fun of it. Me don't care whether the treasures he brings out are warn by a Queen or a whore"

असंही काही असतं, हेच ती विसरलीय.

'अॅम अॅन सॉरी' फोकस, एका नितांत सुंदर परिकथेत हे असे विषाणू घुसतील असं वाटलं नव्हतं.

तर त्या आलिशान पार्टीतले केंद्रबिंदू होते, आधी वेगवेगळ्या ठिकाणी, नंतर एकत्र आलेले अर्थातच यूवर ऑनर सर नाईटस् टेंपलर, यूवर नाईटस् सर क्रिस्टोफर मार्लो आणि होस्टेस् हायनेस डेम मादाम बेव्हरी. नंतर ते दोघे म्हणजे जगातला सर्वोत्तम सूट आणि जगातला सर्वात महाग मीलियन डॉलर मिंक कोट अखेरीस एकमेकांना भेटलेच. प्रथमच.

या जागतिक पेज थ्री इवेन्टेजला अरुण आणि अरुणा साक्षीदार होते. अरुण आणि अरुणा जर भेटले तर इथेच भेटू शकतात. पण ते इथेदखील वेगवेगळ्या ग्रुपमध्ये वेगवेगळ्या कोपऱ्यात आहेत. दोघांचं लक्ष मात्र जगातील सर्वोत्तम सूट आणि सर्वोत्तम बिलियन डॉलर मिंक कोट यांच्यावर आहे. त्यांच्या डोळ्यात अपार आदर आहे. मादाम आणि सर वॉल्टस् नृत्य करत आहेत. अरुण आणि अरुणाला बरं वाटतंय की दोघं एकमेकांना आवडले. पार्टी रंगत चालली आहे. नाच करता येत असता तर अरुण आणि अरुणा बॉल रुममध्ये भेटू शकले असते. पण दोघांनाही नाचता येत नाही. त्यामुळे ते तो दैवी नाच डोळ्यांत साठवतात. संथ आवाजात नाच चालू आहे. त्याला एक आदिम

लय आहे. पूर्ण क्रूझरवर कुठेही मोठ्या आवाजात बोलणे नाही. धांगडधिंगा नाही. एका शांत हार्मनीत सर्व मश्गूल आहेत. पार्टीत यायची वेळ होती. कारण सर्वांना क्रूझरवर आणायचे होते. पण जायची वेळ नव्हती. पण तरीही जायला तर पाहिजेच. उत्तररात्र झाली होती. झोपण्याची सोय असली तरी ते बरे दिसणार नव्हते. हळूहळू एकेक करून मादामला अभिवादन करून निघू लागले. मादाम आणि सर आता पोडियमवर उभे होते. मादाम सर्वांचं अभिवादन स्वीकारत होती. अरुण आणि अरुणा शेवटी निघाले कारण त्यांना निघवत नव्हते. सर्व घटना ते डोळ्यात साठवत होते. इथेही अरुण आणि अरुणाची भेट होऊ शकली असती. पण ती होऊ शकली नाही कारण ते दोघेही क्रूझरच्या दोन टोकांवरून निघत होते आणि ते स्वत:मध्ये इतके मश्गूल होते की ते एकमेकांच्या अगदी जवळ असते तरी एकमेकांशी बोलले नसते.

अरुण आणि अरुणा निघाले तेव्हा सर आणि मादाम एकमेकांत गुंग होते. अरुण आणि अरुणाला बरं वाटलं. दोघेही तरुण आहेत, अफाट श्रीमंत आहेत. एकमेकांना साजेसे आहेत. ते एकत्र येवोत.

सर्व जण निघून गेल्यावर जगातला सर्वोत्तम सूट आणि बिलियन डॉलर मिंक कोट एकटेच राहिले. ग्लास सीलिंगच्याही पार पलीकडे गेल्यानंतर तुम्ही एकटे असता. पण आता दोन एकटीच माणसं एकमेकांच्या सहवासात आली होती आणि गंमत म्हणजे त्यातील एक पुरुष आणि एक स्त्री होती. दोघेही तरुण.

अरुण आणि अरुणा आपापल्या अपार्टमेंटमध्ये या दोघांचं सहजीवन कसं चालेल याचा विचार करत होते. हे दोघं एकरूप झाले तर जग त्यांच्या खिशात असेल. दोघेही ग्लास सीलिंगचा विचार करत होते. अरुणा आयुष्यात कुठलाच रोमान्स न आल्याने सर आणि मादाम यांच्या रोमान्सचा विचार करत होती. जगातला सर्वोत्तम सूट आणि मीलियन डॉलर मिंक कोट यांचा रोन्मास कसा चालेल. इथे अरुणलाही वाटत होतं सर आणि मादाम यांनी भरपूर काम केलं. आता त्यांनी सेटल झालं पाहिजे, कुटुंब बनवलं पाहिजे. मग सेटल या शब्दावर तो हसला.

अरुण आणि अरुणाच्या मनात सर आणि मादामबद्दल आदरमिश्रित शुभेच्छा आहेत. दोघांचा रोमान्स सफल होवो अशी त्यांची इच्छा आहे.

पण इथं क्रूझरवर काय घडतंय, जगातला सर्वोत्तम सूट आणि बिलियन डॉलर मिंक कोट एकमेकांसमोर आहेत, इस्त्रीची घडी न मोडता खानदानीपणे. या कोटांच्या खिशात आज सर्व जग आहे. त्यामुळे त्यांनी जगाचा आस्वाद घ्यावा, एकमेकांचा आस्वाद घ्यावा.

जगातला सर्वोत्तम सूट बौद्धिक संपदेचा आविष्कार आणि बिलियन डॉलर मिंक कोट, बुद्धी आणि सौंदर्याची परिसीमा एकमेकांसमोर उभे आहेत एकाकीपणे, हँगरवर, इस्त्री न मोडता खानदानीपणे. त्यांच्या त्या कोटांच्या खिशात जग आहे. पण दोन्ही कोटांच्या आत कोणी नाही. आहे फक्त एक पोकळी. मौल्यवान वस्तू, सिक्रेट वॉर हेडस् काढून घेतल्यानंतर उरलेल्या अजस्र, रिकाम्या तिजोरीप्रमाणे.

अरुण आणि अरुणा अजूनही ग्लास सीलिंग आणि जगातील सर्वोत्तम सूट आणि मिंक कोटचा विचार करतायत. मुबलकतेच्या देशानं त्यांना मुबलक दिलंय. मुख्य म्हणजे 'आत्मसन्मान'. त्याची पैशांत किंमत करता येत नाही. सर्वोत्तम सूट आणि बिलियन डॉलर मिंक कोटची स्वप्नं पाहणाऱ्या अरुणाला हे माहीत नाही की त्या सूट आणि कोटाच्या आत काहीही नाही. आहे फक्त एक पोकळी.

प्रत्येक स्वप्नासाठी एक भ्रमनिरास असतो. त्यामुळे अरुण आणि अरुणाला हे कळलेलं नाही की सुखी माणसाचा सदरा तो स्वत:च शिवतो. अरुण आणि अरुणाने ते केलेलंच आहे. मुबलक देशातील सर्वोत्तम सूट आणि मिंक कोट अंगावर आला तर आत काही उरत नाही. अरुण अरुणाकडे मुळातच काही उरलेलं नाही. वडिलांच्या निधनानंतर अनोळखी पारशाने दिलेला धीर, भ्रमिष्ट अवस्थेत परतल्यावर अरुणाला झालेला मेट्रनचा वृद्ध खडबडीत स्पर्श हे मुबलकतेच्या देशात दुर्मिळ आहे. हे सर्व ते पाठी सोडून आलेत.

मुबलकतेचा देश आता अरुण अरुणाचा देश आहे. त्या देशांचा शत्रू हा त्यांचा शत्रू आहे. पण जर युद्ध झालंच तर मुबलकतेचा देश या दोघांना कफल्लक करून मायदेशी पाठवेल. मुबलकतेच्या देशात असंही होतं. अरुण, अरुणाला याची जाणीव नाही. ती होऊ नये आणि ही साठा उत्तराची कहाणी संपूर्ण सफल होवो !

०००

मेघनाद कुलकर्णी ,
'सागरशिल्प' दादर सी फेस जांभेकर महाराज पथ, दादर , मुंबई २८

HAPPY DIWALI



Deepak Kanegaonkar

1, Neel Tarang, Cadel Road,Mahim,
Mumbai - 400016

Tel : +91 22 24 44 39 72
Telefax : +91 22 24 45 44 81
Email : dkanegaonkar@gmail.com

# मराठी ग्रंथव्यवहार आणि वाचनसंस्कृती

डॉ. प्रदीप कर्णिक

मराठी ग्रंथव्यवहार आणि वाचनसंस्कृतीने गेल्या पन्नास वर्षांत विविध प्रकारची आणि अनेकानेक वाटांची वळणे घेतली आहेत. त्या सर्वांचीच नोंद घ्यायचे ठरवले तर तो एक मोठा पुस्तकाच्या लेखनाचा, संशोधनाचा विषय ठरेल. कारण एक तर मराठी ग्रंथव्यवहाराला व वाचनसंस्कृतीला २००५ सालीच २०० वर्षे पूर्ण झाली आहेत. महाराष्ट्र राज्य निर्मितीपूर्वीच मराठी ग्रंथव्यवहार दीर्घ वाटचाल करून, एका टप्प्यावर येऊन ठेपला होता. ही दीर्घकालीन परंपरा पाहिली तर ग्रंथव्यवहार हा त्या परंपरेचाच पुढचा प्रवाह आहे. त्यामुळे ही परंपरा नाकारता येणार नाही. दुसरे असे की, या ग्रंथव्यवहारात आपले छोटेमोठे योगदान देणारे इतके विविध घटक आहेत की, त्या सर्वच घटकांची साधी दखल घेणे हेही अवाढव्य काम होऊन बसू शकते. तिसरे असे की, गेल्या पन्नास वर्षांचा जरी केवळ विचार केला तरी, त्यातही इतके बदल झालेत, इतके नवनवे तंत्रज्ञान येऊन मिसळले आहे की, त्या साऱ्यांना अनेकानेक विषयांचा स्पर्श झाला आहे. गुंतागुंतीचे वलय निर्माण झाले आहे. हा प्रत्येक धागा सुटा करून समजून घेणे आवश्यक बनले आहे आणि त्याचमुळे हा पन्नास वर्षांचा आढावा सहजगत्या मांडणे किचकट आहे. चौथे असे की, आता फक्त महाराष्ट्राचा विचार केला आणि संपलं असे नाही, जागतिक पातळीचा विचार क्रमप्राप्त ठरतो, तो न करता मांडणी शक्य नाही.

मराठी ग्रंथव्यवहारावर ज्या घटकांचा लक्षणीय प्रभाव पडला तो घटक म्हणजे शिक्षणक्षेत्र. या शैक्षणिक क्षेत्रात गेल्या पन्नास वर्षांत इतके धोरणात्मक शासकीय बदल झाले की, त्या धोरणांमध्ये मराठी ग्रंथव्यवहार आतून बाहेरून ढवळून निघाला. याचे सर्वपरिचित उदाहरण म्हणजे पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाची निर्मिती आणि शासकीय पातळीवर होणारी पाठ्यपुस्तकांची निर्मिती. या धोरणात्मक बदलामुळे मराठी प्रकाशकांची आर्थिक घडीच बदलून गेली व त्याचा परिणाम ग्रंथनिर्मितीवर झाला. कित्येक प्रकाशन संस्था बंद झाल्या, काहींना कात टाकावी लागली. शैक्षणिक क्षेत्रात नव्याने स्थापन झालेल्या शिक्षणसंस्था, त्यांचे सम्राट, साक्षर, नवसाक्षर, प्रौढसाक्षर पिढी, संगणकाच्या युगात असणारी जुन्यांची नवसाक्षर पिढी तर नव्या पिढीची संगणकाबरोबर असणारी दोस्ती, या सर्वांच्या गरजा बदलल्या, स्वरूप बदलले. मुक्त विद्यापीठे, दूरस्थ शिक्षण व्यवस्था, व्हर्च्युअल क्लासरूम्स, पेपरलेस सोसायटी, अशा पूर्वी कधीच न विचार केलेल्या संकल्पना अस्तित्वात आल्या आणि सारे व्यवहारच बदलून गेले. घरबसल्या निर्मिती शक्य झाली, मग ती 'डाऊन लोड'च्या भाषेत सातत्याने येऊन, मराठी ग्रंथव्यवहाराचा चेहरा मोहराच बदलून गेली आहे. या 'प्रिंट आऊटस्'ना मराठी ग्रंथव्यवहारात कसे सामावून घ्यावे, हाच खरा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा अत्यंत गुंतागुंतीच्या वातावरणात सापडलेल्या मराठी ग्रंथव्यवहाराचा इतिहास किती नाजूकपणे हाताळायला हवा याची कल्पनाच केलेली बरी.

मे १९६० ते मे २०१० या पन्नास वर्षांच्या काळात मराठी ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृती यांचे सर्वसाधारण निरीक्षण केले तर त्यामध्ये तीन कालखंड दिसून येतात. १९६० ते १९८० असा वीस वर्षांचा पहिला कालखंड. यात नवे प्रयोग, नव्या संस्था तर नव्या चळवळी, संकल्पना उदयाला येत गेल्या. दुसरा कालखंड १९८१ ते १९९० या दहा वर्षांचा. या कालखंडात सर्वच पातळीवर शैथिल्य आले. एक प्रकारची कुंठितावस्था प्राप्त झाली आणि १९९१ नंतर संगणकात क्रांती झाली व त्यामुळे सर्व चेहरामोहराच बदलून गेला. मराठी ग्रंथव्यवहार या तीन प्रकारच्या कालखंडाच्या अनुषंगाने जर तपासला तर, एक प्रकारचे चित्र हाती सापडू शकते. तिसऱ्या कालखंडात क्रांतीबरोबरच काही आव्हाने, प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न, ही आव्हाने पूर्वीच्या कालखंडात नव्हती असे नाही, परंतु या कालखंडात त्याचे स्वरूप इतके बदलून गेले आहे की, ते केवळ ग्रंथव्यवहाराचे व वाचनसंस्कृतीचे प्रश्न राहिले नसून ते साऱ्या जगाचे आणि विविध क्षेत्रांनाही भेडसावणारे प्रश्न झाले आहेत. त्यांची ठराविकच उत्तरे नाहीत की त्यांचा समाधानकारक उतारा एखादी व्यक्ती किंवा संस्था देऊ शकेल असे नाही. अशा या प्रश्नांचा विचार करणे, काही एक प्रमाणात ग्रंथव्यवहारातील घटकांची जी काही एक जबाबदारी आहे वा असावी असे अनेकांना वाटते, तिचा किमान एका पातळीपर्यंत विचार करणे इथे अत्यावश्यक ठरू शकते.

मराठी ग्रंथव्यवहाराच्या संदर्भात विशेषत: काही तज्ज्ञांनी ग्रंथव्यवहाराचे इतिहास लिहिण्याचे कार्य आधीच करून ठेवले आहे. उदा. डॉ. शं. गो. तुळपुळे यांचे 'मराठी ग्रंथनिर्मितीची वाटचाल' हे पुस्तक किंवा अ. ह. लिमये यांचे 'मराठी ग्रंथप्रकाशनाची वाटचाल' अथवा अगदी नुकतेच प्रकाशित झालेले शरद गोगटे यांचे 'मराठी ग्रंथप्रकाशनाची दोनशे वर्षे' अशी काही पुस्तके. या पुस्तकांच्या बरोबरच, अनंतराव कुलकर्णी, शशिकला उपाध्ये, बा. द. सातोस्कर, ह. वि. मोटे, वा. दि. भट इत्यादी काही प्रकाशकांची आत्मचरित्रे, सदानंद भटकळ, कुमठाशेठ, कोठावळे यांचे वा यांच्यावरचे लेखन, वि. पु. भागवत, सोन्याबापू ढवळे यांच्यावरचे गौरव ग्रंथ, प्रा. अ. का. प्रियोळकर, बी.एस.केशवन, बापूराव नाईक, पु. बा. कुलकर्णी, सदानंद भटकळ यांनी लिहिलेली मुद्रणकलेवरची वा मुद्रणालयांचा इतिहास सांगणारी पुस्तके, मुद्रण प्रकाशसारखी नियतकालिके, मामासाहेब दाते, गणपत कृष्णाजी, जावजी दादाजी अशा मुद्रणमहर्षीवरील छोटेखानी लेख, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा व त्याचप्रमाणे इतर ग्रंथालयांचा इतिहास, स्मरणिका, त्यांचे वार्षिक अहवाल, कोशकार्याचे इतिहास, सूचिकार्याची दखल घेणारे अंक, ग्रंथप्रसाराला वाहिलेली नियतकालिके, वाङ्मयाचे इतिहास, साहित्यिक संस्थांचे इतिहास, वृत्तपत्रे-नियतकालिके यांचे इतिहास अशा विविध प्रकारच्या पुस्तकांमध्ये मराठी ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृतीचा इतिहास समाविष्ट झाला आहे.

इतके प्रास्ताविक केल्यानंतर आता आपण मूळ विषयाकडे वळू या.

## लघुअनियतकालिकांची चळवळ व ग्रंथव्यवहार

१९५५ साली रमेश समर्थ आणि दिलीप चित्रे यांनी 'शब्द' नावाचे लघुअनियतकालिक काढून प्रारंभ केला असला तरी नंतर 'अथर्व' (१९६०), 'असो' (१९६२) निघाले आणि त्याचे भरीव चळवळीत रूपांतर झाले. भारूड, येरू, फक्त, वाचा, त्रिशंकू, तापसी, विद्रोही, अबकडई, सनविवि, समग्र, कावळा, चक्रवर्ती अशी अनेकानेक अनियतकालिके कधी मुद्रित, कधी चक्रमुद्रित तर कधी हस्तलिखित स्वरूपात आली. १९७५ पर्यंत या चळवळीचा जोर होता. पुढे तो ओसरला.

या चळवळीवर अमेरिकेत प्रभावी असणाऱ्या बीट जनरेशन चळवळीचा मोठा प्रभाव होता असे म्हटले जाते त्यात तथ्य असावे. भारतभर आणि जगभरच लघुअनियतकालिकांच्या चळवळीचा जोर त्याकाळी होता. आवेश, आमुख, रंग, युयुत्सा, हस्ताक्षर, संचेतना, उत्कर्ष इत्यादी अनियतकालिके नवी दिल्ली, कलकत्ता, जबलपूर, लखनौ, जयपूर, हैद्राबाद, वाराणसी अशा ठिकठिकाणांहून प्रसिद्ध होत होती. 'चक्रवर्ती' या दैनिकात (अंक २ १९६८ पृ. ४) बंगाली, हिंदी भाषांतून प्रसिद्ध होणाऱ्या अनियतकालिकांची यादीच दिली आहे. याचा अर्थ सर्वत्र हे चळवळीचे पेव पसरले होते.

प्रस्थापित व्यवस्थेला धडका देणे, ६० पूर्वीच्या वाङ्मयाची चिरफाड करणे, साहित्य समीक्षेचीच नव्याने समीक्षा करणे ही बाब या चळवळीने घडून आली असली तरीही या चळवळीचे मोठे योगदान म्हणजे भालचंद्र नेमाडे, दिलीप चित्रे, वसंत आबाजी डहाके, अशोक शहाणे, सतीश काळसेकर, भाऊ पाध्ये, वसंत दत्तात्रय गुर्जर, तुलसी परब, राजा ढाले, वृंदावन दंडवते, चंद्रकांत खोत इत्यादी अनेक नव्या दमाचे, नवविचारांचे लेखक मराठी साहित्याला मिळाले. त्यांच्या साहित्याने कविता व समीक्षा यामध्ये आमूलाग्र बदल झाला. नेमाडे यांच्या 'कोसला'ने तर मराठी कादंबरीचा ढाचाच बदलला.

जुने संकेत मोडणारी भाषा, शिवराळ भाषा, लैंगिकपणा खुले आम मांडणारी शैली, टीका करण्याची बेधडक-बेपर्वा वृत्ती, शीर्षके, संपादनाची रूढ परंपरा, आकार, संपादकीय भूमिका, मुखपृष्ठाविषयीचे ठोकताळे या चळवळीने बदलून टाकले. पूर्वीच्या वाचन संस्कृतीतील सभ्य, सौम्य, सुसंस्कृत, हळुवार सवयी, लघु अनियतकालिकांनी बदलून टाकल्या. अशोक शहाणे यांनी 'मनोहर'मधून 'मराठी साहित्यावर क्ष किरण' टाकून संत साहित्य व जीए. विनोबा वगैरेंचे अपवाद वगळता १९६० पूर्वीचे साहित्य मोडीत काढून टाकले. नव्या साहित्याने वाचकांनाही 'बोल्ड' केले. बिनधास्तपणा लेखनात आला.१९६० नंतरचा जवळजवळ १५ वर्षांचा कालखंड या चळवळीने व्यापून टाकला होता.

या चळवळीला स्वत:चा वाचकवर्ग सापडला होता. वाचकवर्गाच्या शोधात ही चळवळ गेली नाही, तर चळवळीतील साहित्याच्या गुणांनी तरुण जाणता वाचकवर्ग त्यांच्याभोवती गोळा झाला. याचा अर्थ असा नव्हे की, 'सत्यकथा' मासिका भोवतीचा गराडा कमी झाला, वा त्यांचा वाचकवर्ग घटला. तो जेवढा होता तितकाच राहिला. उलट त्यांच्यात अधिक एकोपा

निर्माण झाला. संघटितपणा आला. आक्रमणाला मुकाटपणे तोंड देण्याची शक्ती त्यांना लाभली. या चळवळीचा जोर ओसरत गेल्यावर बंद पडणाऱ्या 'सत्यकथे'चे रूप पाहिले तर असे म्हणावेसे वाटते की, चळवळीने 'सत्यकथे'ला आणि 'सत्यकथे'ने लघु अनियतकालिक चळवळीला जगवले व दोघेही तरले.

दोन्ही प्रकारच्या साहित्याची गरज समाजाला होती व या दोन्ही चळवळींनी प्रस्थापित व बंडखोर (अँग्री यंग मॅन) प्रवृत्तीच्या संस्कृतीला वाचन साहित्य उपलब्ध करून दिले. या साहित्यावर जुन्या-नव्या पिढीचे पोषण झाले. लघु अनियतकालिके अजूनही निघतात. नव्वदच्या नंतर निघालेल्या अशा अनेक लघु अनियतकालिकांनी, याच चळवळीशी आपलं नातंही जोडलं आहे. याच नात्यातील एक अंक 'नवाक्षर दर्शन'ने तर 'लघु नियतकालिक विशेषांक'च अलीकडे (एप्रिल-मे-जून २००९) प्रकाशित केला आहे. त्यात या जुन्या-नव्या संपादकांच्या मनोगतातून मराठी ग्रंथव्यवहाराचा शोध घेतला आहे. पन्नास वर्षे ग्रंथव्यवहाराला पुढे नेणारी, उपयोगी ठरणारी आणि आजही जिचा शोध घ्यावा, वा त्याची चर्चा करावी अशी ही एक अत्यंत प्रभावी व क्रांतिकारी चळवळ आहे आणि या दृष्टीनेही तिचे महत्त्व आहे..

लघुअनियतकालिकांच्या चळवळीमधून किंवा चळवळीचा परिणाम म्हणून मराठी ग्रंथव्यवहारात इतर अनेक प्रकारच्या विविध विषयानुरूप, सामाजिक-सांस्कृतिक-वाङ्मयीन गरज म्हणूनही, अनेकानेक चळवळी निर्माण झाल्या व ग्रंथव्यवहार विस्तारत गेला.

**दलित साहित्य चळवळ आणि इतर वाङ्मयीन चळवळी** लघुअनियतकालिकांच्या चळवळी इतकीच किंबहुना त्याहीपेक्षा सामर्थ्यवान, सशक्त, भरीव योगदान असणारी चळवळ म्हणजे दलित साहित्याची चळवळ. लघु अ नियत कालिकवाल्यांनी दलित साहित्याच्या चळवळीचे श्रेय आपल्याकडे घेतले असले तरीही, राजा ढालेंसारख्या दोन्ही चळवळींत सक्रिय असणाऱ्या लेखक-कवी-कार्यकर्त्याने हे श्रेय लघुअनियतकालिकांना देण्यास ('नवाक्षर दर्शन'च्या अंकातील लेखातून) नकार दिला आहे. हे मात्र नक्कीच खरे आहे की, बाबूराव बागूल, शंकर खरात, अण्णाभाऊ साठे यांच्यासारखे लेखक चळवळीच्या आधीपासून लिहीत होते, पण दलित चळवळीने, विशेषत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या लढ्यांतून, संदेशातून, लेखन-प्रचारातून, पेटून उठलेल्या तरुणांच्या शब्दांना साहित्यनिर्मितीचे वजन लाभले, प्रेरणा मिळाली, शिक्षणांच्या सोयीमुळे व वाचन संस्कारामुळे प्रगल्भता प्राप्त झाली आणि दलित पँथरच्या राजकीय-सामाजिक लढ्याबरोबरच दलित साहित्याची चळवळ सत्तरच्या दशकात जोरदार फोफावली.

लघुअनियतकालिकांच्या चळवळीचं केंद्र मुंबईत होतं, ते दलित साहित्याच्या चळवळीत मुंबईसह औरंगाबादकडे सरकलं. तेथील मिलिंद महाविद्यालय व त्या महाविद्यालयाने निर्माण करून दिलेल्या 'अस्मितादर्श' नावाच्या व्यासपीठाने अनेक दलित साहित्यिकांना, नव तरुणांना लिहितं केलं. त्यातूनही चळवळीला बळ प्राप्त झालं. चळवळही वाढत गेली.

मुंबईत १९७५ च्या आसपास निर्माण झालेल्या 'ग्रंथाली वाचक चळवळी'ने प्रकाशित केलेल्या दलित आत्मचरित्रांचा इतका बोलबाला झाला की, त्याच्या प्रभावातून पुढील साहित्य सुटलं नाहीच; परंतु त्या साहित्याने इतर अनेक लेखकांना आत्मचरित्र लिहिण्यास प्रेरित केलं. (उदा. अक्करमाशी, आम्ही आणि आमचा बाप, कोल्हाट्याचं पोर इत्यादी)

ज्यांनी भोगलं त्यांनीच लिहिलं. जे भोगलं ते इतकं भीषण होतं की वाचून वाचक थरारून गेला. जातीयतेच्या नावाखाली वाट्याला येणारा भोग, अस्पृश्यता, हीन जीवनमान, जनावरांपेक्षाही खालच्या पातळीवरचे आयुष्य, पाण्याला, सन्मानाला, प्रतिष्ठेला वर्षानुवर्षे वंचित असणारी माणसे, काबाडकष्ट, ती भाषा, त्या बोली भाषेची नजाकत, सौंदर्य, शब्दसंग्रह सर्वच इतकं विलक्षण नवं, वेधक, वेचक व आक्रमक होतं की, पूर्वीच्या १५० वर्षाच्या साहित्याला दलित साहित्याने चांगलंच आव्हान दिलं. ग्रंथरूप घेऊन आलेल्या या विलक्षण आगळ्या वेगळ्या साहित्याने, वाचनसंस्कृतीची दिशा, आवड, रुचीच बदलून टाकली. वाचनसंस्कृतीला कधीही माहीत नसणाऱ्या संस्कृतीची ओळख झाली. दहा-पंधरा वर्षे कौतुक-आदर यांचा वर्षाव या साहित्यावर आणि साहित्यनिर्मितीकारांवर होत गेला. विद्रोही रूप असणारी कविता स्वीकारली गेली ती या आत्मचरित्राच्या पार्श्वभूमीवर. हळूहळू नाटक, कथा, कादंबरीतील विश्वरूपही बदलून गेले.

हळूहळू दलित साहित्यात तोच तो पणा येतो आहे याची जाणीव वाचकांना, समीक्षकांना, जाणकारांना येऊ लागली आणि प्रस्तुत या नव्या साहित्याची समीक्षा त्यातील साहित्यकारांसह इतरही जाणत्यांनी करायला सुरुवात केली. ही समीक्षा दलित

साहित्य अधिक डोळस व्हायला उपयुक्त ठरली आणि १९९० च्या दशकात अधिक सकस, अधिक प्रगल्भ साहित्य पुढे आले. लघुअनियतकालिकाची चळवळ समाजसन्मुख झाली नाही आणि त्यांची कविता वाचकसन्मुख होऊ शकली नाही. जनसामान्यांच्या दु:खाशी या चळवळीला काही देणेघेणे नव्हते. कवितेचे खेळ आणि प्रयोग यालाच नवता मानण्यामध्ये या चळवळीची इतिकर्तव्यता होती. असे सूचक विश्लेषण महेंद्र भवरे यांनी 'मराठी कवितेच्या नव्या दिशा' या त्यांच्या ग्रंथात (पृ. ५) केले आहे. याच प्रकारच्या सकस सजगतेमुळे, दलित साहित्यात भुजंग मेश्राम, अविनाश गायकवाड, माधव सरकुंडे, आनंद गायकवाड, अमोल बागूल, प्रकाश मोगले अशा अनेकानेक संपन्न साहित्य देणाऱ्या कवी-लेखकांची पिढी उदयाला आली. १९९० नंतरच्या नव्या पिढीचे लघु अनियतकालिकांचे कार्य, दलित साहित्यातील नवी पिढी आणि ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी इत्यादी चळवळीतून आलेले ग्रामीण संस्कृतीचे व महिलांच्या सबलीकरणाचे भान, यामुळे मराठी साहित्य विस्तारत गेले. त्यात भर पडत गेली.

दलित साहित्य चळवळीने जसे गावकुसाबाहेरच्या वर्गाला लिहिते केले, त्यांच्या संस्कृती-भाषा-जीवन शैलीसह, साहित्याच्या मूळ प्रवाहाला स्वीकारायला भाग पाडले, तसेच १९७०-७२ नंतर पुढे आलेल्या आणि १९७७ नंतर प्रामुख्याने मूळ धरू लागलेल्या ग्रामीण साहित्य चळवळीने व जन साहित्य चळवळीने ग्रामीण शेतकरी, शेतमजूर, रानावनात भटकणारा गावकरी, यांच्या जीवनसंस्कृतीला मूळ प्रवाहात अधोरेखित केले. ग्रामीण/जनवादी चळवळी आधी उच्चवर्णीय व उच्चवर्गीय वर्गातून आलेल्या साहित्यात ग्रामीण संस्कृतीचे चित्रण येत होते, पण मोडकळीस आलेल्या खेड्यातील संस्कृतीचे आणि पावसाकडे डोळे लावून शेती व्यवसायाचे दु:ख सोसणाऱ्या शेतकरी वर्गाचे ग्रामीण लेखकांनी रेखाटलेले चित्रण अधिक वेधक व वास्तव होते. कष्टकरी, भूमिहीन, अल्पभूधारक, शेतमजूर, देशोधडीला लागलेला, दुष्काळी भागातला सधन व निर्धन भूधारक यांचे चित्रण ग्रामीण भागातील लेखकांनी स्वत: केले.

दलित साहित्याचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, दलित समाजातील अनेकानेक तरुण ज्या प्रमाणे लिहिते झाले, तसेच गावकुसाबाहेर वावरणाऱ्या असंख्य इतर समाजातील तरुणांना लिहिण्याची, आपले सुद्धा दु:ख सांगण्याची, आपल्याही वाट्याला आलेल्या आयुष्याची कहाणी सांगण्याची प्रेरणा मिळाली. या प्रेरणेतून भटक्या जाती-जमातीमधील विमुक्त जीवन जगणारे लोक, देवदासी, गाढवावर संसार घेऊन जगणारे आणि दरोडेखोरीचा शिक्का माथी घेऊन हिंडणारे पारधी, बेडर, ज्योतिषी, डोंबारी, कामाठी, सफाई कामगार, हमाल, वेठबिगार अशा अनेक समाजातील तरुणांना लिहिण्याची, व्यक्त होण्याची ऊर्मी प्राप्त झाली. त्यामुळे मराठी ग्रंथविश्वात नवनव्या बिन ओळखीच्या संस्कृतीतून आलेल्या अनुभवांचा साठा होत गेला. या वेगळ्याच विश्वाने, वाचनसंस्कृती व वाचकवर्ग ढवळून निघत होता.

दलित, ग्रामीण साहित्याच्या चळवळीसारखीच, या सर्व चळवळीतून उठून दिसणारी आणि साहित्याला कसदारपणा बहाल करणारी आणखी एक महत्त्वाची चळवळ म्हणजे, स्त्रीमुक्तीची चळवळ. १९७५ ला जगभरातच स्त्रीमुक्तीची चळवळ जोराने पुढे आली आणि तिचे पडसाद भारतात, विशेषत: मुंबईत उमटले. स्त्रियांच्या कष्टांची, अस्मितेची, प्रतिष्ठेची, मान-सन्मान व समान वागणूक मिळण्याची अपेक्षा असणारी जाणीव निर्माण करणारी ही चळवळ, सत्तरच्या दशकातील अत्यंत महत्त्वाची चळवळ ठरली. प्रथम पुरुषांच्या बरोबरीचे हक्क मागणारी स्त्रीमुक्तीची चळवळ प्रारंभी वादग्रस्त जरी ठरली (आणि ते अपेक्षितच होते) तरी फुले, कर्वे यांच्या राज्यात, स्त्रीमुक्तीची चळवळ त्यामानाने लवकरच स्थिरावली. त्यातूनच स्वतंत्रपणे स्त्रीवादी साहित्याची निर्मितीही होऊ लागली. त्याला प्रतिसाद लाभला. स्त्रीवादी साहित्याने मराठी साहित्यात स्त्रियांच्या अनुभवविश्वाला, श्रमाला, अस्तित्वाला, स्वातंत्र्याला, नकार देण्याच्या हक्काला, पारंपरिक पद्धतीने निर्माण केलेल्या ठोकळेबाज प्रतिमेला नाकारण्याला, सन्मानाने स्थान दिले व स्त्रियांनी ते मिळवले सुद्धा. मिळवावे लागलेही. दलित साहित्याप्रमाणेच स्त्रीवादी साहित्याने मराठी साहित्याचा प्रमुख प्रवाह विस्तारला गेलाय.

साठोत्तरी साहित्यात, ज्याला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले नसले तरीही, एका मोठ्या लढ्याचे पाठबळ, संस्कृती ज्याच्या मागे होती, अशा साहित्याचा उदय म्हणजे कामगार साहित्य. नारायण सुर्वे यांनी अशा कामगारांच्या कष्टकरी, लढवय्या वर्गाचे चित्रण केले आणि हे साहित्य 'सत्यकथे'सारख्या प्रस्थापित व्यासपीठाद्वारे समोर आले. डाव्या विचारसरणीच्या कामगार संघटनेतून आलेल्या सुर्वे यांनी मराठी साहित्यात कामगार साहित्याचा आणखी एक नवा प्रवाह आणून सोडला. पुढे मात्र 'कामगार साहित्य' म्हणून विशेषत: कामगार रंगभूमीच्या माध्यमातून हे साहित्य आजही साकार होत आहे.

लघु अनियतकालिकांच्या चळवळीतून पुढे आलेला एक विचार म्हणजे नवसाहित्याचा, वास्तववादी साहित्याचा. या नवसाहित्याची पाठराखण या चळवळीने केली असेच म्हणायला हवे. लघु अनियतकालिकांच्या चळवळीत सक्रिय असणाऱ्या भाऊ पाध्ये, दिलीप अत्रे, गुर्जर, महानोर, चंद्रकांत खोत इत्यादी साहित्यिकांवर व त्यानंतर त्या पद्धतीने लेखन केलेल्या दळवी, कर्णिक, पाडगावकर, विंदा, सिनकर, काकोडकर इत्यादींवर अश्लीलतेचे आरोप झाले. विशेषत: भाऊ पाध्ये यांच्या 'वासूनाका,' चित्रे यांची 'केसाळ काळेभोर पिल्लू' पासून प्रारंभ झाला. आचार्य अत्रे यांनी त्यांना व अशाच प्रकारच्या साहित्याला धारेवर धरले. म्हातारी (सिनकर), पुरुषसिंह (पाडगावकर), चक्र (दळवी), माहीमची खाडी (कर्णिक), उभयान्वयी अव्यय (खोत), श्यामा (काकोडकर), गांधारी (महानोर), इंद्रियोपनिषद (काळसेकर) या साहित्यावर अश्लीलतेचे आरोप झाले. 'श्यामा'चा खटला तर सर्वोच्च न्यायालयात गेला होता.

श्लील-अश्लीलतेचा वाद समाजमनाला ढवळून काढणारा होता. बंदी, पोलीस केस, खटले, आरोप-प्रत्यारोप, नवसाहित्याची पाठराखण करणाऱ्यांनी घेतलेले परिसंवाद, कार्यक्रम, लेख-मुलाखती, अशा साहित्याने, वाद विवादाने वाचक नवसाहित्याच्या दृष्टीने घडत होता. त्याची जडण-घडण करण्याच्या प्रक्रियेत हे वाद-विवाद महत्त्वाचे कार्य करीत होते, बजावीत होते.

पारंपरिक प्रतिनिधित्व करणाऱ्या 'सत्यकथा' केंद्रावर लघु अनियतकालिकांनी हल्ले चढवले होतेच. ५ मार्च १९६९ रोजी सायंकाळी सहा वाजता खटाववाडीत, अगदी चक्क 'जाहीर बोलावणे' करून उच्चभ्रू मासिकांची होळी करण्याचा कार्यक्रम करून, शहाणे, नेमाडे, रमेश रघुवंशी, एकनाथ पाटील, तुलसी परब, वसंत गुर्जर, राजा ढाले यांनी 'सत्यकथे'चा अंक जाळला. या प्रातिनिधिक कृतीचे पडसाद नकळतपणे साहित्यविश्वात उमटले. 'सत्यकथेची सत्यकथा' हा राजा ढाले यांचा दीर्घ लेख व त्यातील सत्यकथेच्या वृत्तीची केलेली चिरफाड तर 'मनोहर' मधला अशोक शहाणे यांचा लेख, 'आमुख' या हिंदीमधील अनियतकालिकाची 'चक्रवर्ती'च्या अंकात भाषांतरित केलेली भूमिका, राजा ढाले यांची 'समग्र' मधील चळवळ कोणासाठीचे भाष्य अशा विविध प्रकारच्या साहित्याने 'साहित्याची (खरी) भूमी' कसली जात होती, त्यातून पिकवलेले साहित्य वाचून वाचकाचे भरण-पोषण होत होते. साहित्याकडे बघण्याची दृष्टी लाभत होती. नवसाहित्याचा वाचक असा विविध अंगाने घडत होता. लेखक तावून-सुलाखून निघत होता. अनुकरणप्रियता सोडून द्यावी लागली होती व स्वत:चा शोध घेणे क्रमप्राप्त ठरले होते.

अशोक शहाणे यांच्या 'क्ष' किरणातून चांगले ठरलेले साहित्य म्हणजे संत साहित्य. त्या संत साहित्याचे मात्र या धामधुमीकडे अजिबात लक्ष नव्हते. कीर्तन, प्रवचन, वारी यांच्या माध्यमातून मराठी संत साहित्याची पालखी, लाखो वारकऱ्यांच्या दिंडीत मिरवली जात होती. चित्रे-नेमाडे-कोल्हटकर यांच्यासारख्या लेखकांनी संत साहित्याची जाण, त्यातील सौंदर्य, विलोभनीयता, उच्चकोटीतलं कवित्व मराठी आधुनिक वाङ्मयात नव्याने मांडलं. इंग्रजी भाषेतून जागतिक पातळीवर नेलं आणि त्याचमुळे आपल्याच वाङ्मयाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून गेला. नव दृष्टी प्राप्त झाली. विविध वाङ्मयीन चळवळी ही १९६२ ते १९८० या वीस वर्षांच्या काळातली वाचक-लेखक घडवणारी मोठी कार्यशाळा होती.

**नियतकालिके, वर्तमानपत्रे आणि ग्रंथव्यवहार**

सत्यकथा, लघु अनियतकालिके यांचे उल्लेख मागे आलेच आहेत. दलित साहित्याच्या चळवळीच्या संदर्भात 'अस्मितादश'चाही संदर्भ येऊन गेलाच आहे. 'प्रतिष्ठान'सारखे मराठवाड्यातले मासिक. 'युगवाणी' सारखे विदर्भातले मासिक यांनी वाङ्मयाच्या संदर्भात मोलाचे आणि महत्त्वाचे योगदान दिले आहे. इतकेच नव्हे तर ही दोन मासिके म्हणजे मराठवाडा व विदर्भातली मोठी वाङ्मयीन सांस्कृतिक केंद्रे ठरली होती. स्थानिक पातळीपासून दूर पुण्या-मुंबईच्या साहित्यिकांचा, लेखकांचा सुद्धा शोध घेणारी ही मासिके 'सत्यकथे'च्या तोडीस तोड पण त्याच मार्गाने जाणारे कार्य करीत होती. 'सत्यकथे'च्या पश्चात ही मासिकेही मलूल झाली, त्यांचा जोम कमी झाला.

१९७७ च्या मध्यावर 'अनुष्टुभ' नावाचे द्वैमासिक डॉ. रमेश वरखेडे यांनी सुरू केले. काही वर्षांपूर्वी मुंबईकडे सरकलेले त्याचे केंद्र जरी असले तरी मुंबईबाहेरची, 'कला, साहित्य, समीक्षा, संस्कृती आणि आर्षविद्या' या संदर्भातली ही चळवळ होती आणि नंतर ती प्रामुख्याने समीक्षेच्या वेगळ्या वाटा चोखाळणारी 'वाटचाल' झाली. घटितार्थशास्त्रीय सौंदर्यमीमांसा, मानसशास्त्रीय समीक्षा, आदिबंधात्मक समीक्षा वगैरेंचा परिचय करून देण्याचे कार्य 'अनुष्टुभ'ने नेटकेपणाने केले. असे साक्षात

त्याचे एक खंदे संपादक प्रा.डॉ. म. सु. पाटील यांनीच नमूद केले आहे. (पृ. ४५ जाने-फेब्रु. २००९)

केवळ पुस्तक परीक्षणांसाठी ख्यातनाम असणारे आणि मराठी समीक्षेत प्रचंड दबदबा असणारे प्रा. वासंत दावतर यांचे 'आलोचना', हैद्राबादसारख्या परराज्यात असणारे 'पंचधारा' केवळ संशोधनाला वाहिलेले 'मराठी संशोधन पत्रिका', 'साहित्य संस्थांचे मुखपत्र न होणारे 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' आणि 'साहित्य' अशी काही वाङ्मयीन नियतकालिके, जी काहीच अपवाद करता सुरू आहेत, त्यांनी एकेकाळी आपापल्या हेतुनुसार वाङ्मयाची निर्मिती केली. लेखक-वाचक घडवले, शोधले, निर्माण केले.

'अंतर्नाद', 'अनुभव', 'ललित', 'रुची', 'आरती', 'नवभारत','मिळून साऱ्या जगी', 'भाषा आणि जीवन', ९० नंतरची अनियतकालिके उदा. खेळ, ऐवजी, नवाक्षरदर्शन, अभिधा, अभिधानंतर, अनाग्रात, सर्वधारा, सम्यक विद्रोही इत्यादी, प्रियरसिक, वाङ्मयवृत्त सारखी गृहपत्रे, 'साधना' सारखे साप्ताहिक आजही सुरू आहे. 'समाज प्रबोधन पत्रिके'चे नवे रूप ठसा उमटवू पहात आहे. यापैकी 'भाषा आणि जीवन' प्रथम 'मराठी अभ्यास परिषद ' (१९८२) स्थापन झाल्यानंतर १९८३ मध्ये सुरू झालं. 'गंभीर, वैचारिक, भाषाविषयक लेखन प्रसिद्ध करणारं' असं हे त्रैमासिक २७ वर्षे सातत्याने प्रकाशित होत आहे. 'भाषा' या घटकाविषयी जे जे गंभीरपणे करता येणे शक्य असते, ते ते हे त्रैमासिक करीत आले आहे. 'साधना' सारखे साप्ताहिक तर गेली ६० वर्षे सातत्याने प्रकाशित होत आहे. यदुनाथ थत्ते, वसंत बापट, ग.प्र. प्रधान, ना. ग. गोरे अशा मोठमोठ्या सामाजिक, वाङ्मयीन, सांस्कृतिक राजकीय चळवळींतील मोठ्या विचारवंतांच्या दृष्टिकोनातून पारखून आलेले साहित्य 'साधने' ने दिले आहे. 'अंतर्नाद' गेली १५ वर्षे अधिकाधिक लेखक-वाचकांना आपल्यात समाविष्ट करून अत्यंत चांगल्या तऱ्हेने वाचकप्रिय झाले आहे. या दोन्ही अंकांनी वाचनसंस्कृतीचा गंभीरपणे केलेला विचार वाचनसंस्कृती पुढे नेण्यास उपकारकच ठरला आहे. 'मिळून साऱ्याजणी' हे तर 'संवादा'चं व्यासपीठ म्हणूनच लोकप्रिय ठरलं आहे. गेली २० वर्षे स्त्रियांनी एक चळवळ म्हणून चालवलेलं हे मासिक सर्व थरांत लोकप्रिय आहेच, पण ग्रंथव्यवहाराला सतत स्थान देणारं असं हे मासिक आहे. 'विवेक' सारखं साप्ताहिक जे हिंदुत्ववादी विचारांतून निर्माण झालेली विचारधारा गेली ५० वर्षे व्यक्त करत आहे हे नाकारून चालणार नाही. याबरोबरच इतरही अनेक नियतकालिके आहेत व ती आजही सुरू आहेत. सर्वांचे उल्लेख शक्य नसले तरी 'नवभारत' सारखे मासिकही गेली ५० वर्षे विविध मोठमोठ्या विचारवंतांच्या नेतृत्वाखाली संपादित होत आले आहे. अगदी अलीकडं त्याने धारण केलेला नवा चेहरा वाचनीय असल्याचे 'साक्षी' पुरावे म्हणजे त्यातील विविधांगी लेखन, मुखपृष्ठ क्रमांक दोन वरील कविता, आणि बदललेली मुखपृष्ठे.

दिवाळी अंकांची संस्कृती तर महाराष्ट्राची खासियतच आहे. गेली शंभर वर्षे ही संस्कृती सुरू आहे. नवीन अंक दर वर्षी येतात, काही मरतात. जुन्यांची परंपरा मात्र कायम आहे. अक्षर, स्पंदन, दिनांक, माणूस, मौज, सत्यकथा, दीपावली, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, सकाळ, लोकमत, चिन्ह, इत्यादी अनेकानेक अंकांनी महाराष्ट्राच्या साहित्यनिर्मितीचे आणि वाचनसंस्कृतीचे उदरभरण केले आहे. त्यातूनच ग्रंथसंस्कृती जन्माला आली किंवा ग्रंथनिर्मितीला प्रेरणा मिळाली. 'माणूस' 'सोबत','दिनांक' सारखी साप्तहिके बंद पडली तरीही 'माणूस' चे आणि श्री. ग. माजगांवकरांचे योगदान विलक्षण मोठे आहे. हे काय ते पाहणे आवश्यक आहे.

१९६१ साली 'माणूस'चा जन्म झाला. प्रथम मासिक , मग पाक्षिक व पुढे साप्तहिक रूपातला देखणा 'माणूस' १९८६ साली बंद पडला. पुढे काही काळ दिवाळी अंकाच्या रूपाने येऊन नंतर त्या रूपातही बंद झाला. पण साधारण २५ वर्षे 'माणूस' चे योगदान महाराष्ट्राच्या वाङ्मयीन, सांस्कृतिक, सामाजिक राजकीय क्षेत्रात मोठे आहे.

ग्रंथव्यवहाराबरोबरच 'माणूस' चे आणखी एक मोठे योगदान आहे. ते म्हणजे, वाचनसंस्कृतीला दिलेली वेगळी दिशा. याची साक्ष अनेक वाचक-लेखकांनी दिली आहे. सर्वच नोंदी घेता येणे शक्य नसले तरी याही घ्यायला हव्यात. निशिकांत भालेराव यांनी असं नमूद केलं आहे की, ''पुढे मानवत हत्याकांडावरील निळू दामलेंच्या अनोख्या वृत्तांतामुळे माजगांवकरांशी मीच पत्रव्यवहार सुरू केला. 'व्होल्गा जेव्हा लाल होते', 'फिडेल, चे आणि क्रांती', 'नाझी', हे त्यावेळच्या तरुण मनाला आकर्षून घेणारे विषय या संपादकाला कसे सुचतात याचे आश्चर्य वाटून माजगावकरांनी माझ्या पिढीतील अनेक ऑक्टिव्हिस्टच्या मनात कधी घरोबा केला कळलेच नाही. अनिल बर्वेच्या 'रोखलेल्या बंदुका' वाचून अक्षरश: उठलो आणि

*पान १८६ वर...*




# संभ्रमाचे सर्ग

मी जे लिहितोय त्यावर तुमचा विश्वास बसायची शक्यता कमीच आहे. त्यातही छापलेलं काहीही वाचताना बहुतेक वेळा आपण लेखकाच्या अपेक्षेच्या नेमकं उलटं करतो. माझी पहिली कादंबरी 'नचिकेताचे उपाख्यान' साधारण माझ्याच आयुष्याच्या पर्यावरणाच्या पार्श्वभूमीवर होती, पण ती बव्हंशी काल्पनिक होती. म्हणजे कादंबरीतलं साहित्यकृतीतलं वास्तव साहित्यकृतीअंतर्गत जरी सुसंगत असलं तरी ते वास्तवातल्या वास्तवापेक्षा निराळंच होतं. शिवाय हे सारंच काल्पनिक असल्याची सूचनाही मी सुरूवातीला लिहिली होती. तरीही कित्येकांना ती माझीच गोष्ट वाटली. याउलट मी नंतर एक लेख लिहिला, माझ्या अकाली निवृत्तीवर. तर कित्येकांनी फोनवर माझी 'ती' कथा आवडल्याचे आवर्जून कळवले. त्यात मी प्रांजळपणे लिहिलेल्या माझ्याच आयुष्यातील घटना कित्येकांना कपोलकल्पित वाटल्या. नंतर मी एक कथा लिहिली 'स्वप्नस्थ' नावाची. त्यात निवेदकाला स्वप्नात एक मोबाइल फोन सापडतो आणि स्वप्न संपून जाग येताच तोच फोन त्याच्या पायजम्याच्या खिशात असतो अशी गमतीदार कल्पना केली. नंतर तो निवेदक-नायक मानसोपचार तज्ज्ञाकडे जातो वगैरे गमतीदार कल्पनाही लिहिल्या होत्या. उघडच ती एक पूर्णपणे काल्पनिक फँटसी होती. मात्र माझ्या आयुष्यातले काही तपशील मी बेमालूम शिताफीने त्यात गुंफले होते आणि एक दिवस मला एका मुलीचा फोन आला, की तुमची त्या मानसोपचारतज्ज्ञाची ट्रीटमेंट अजून चालू आहे का हो, जोशी?

अशा एकेक गमती. परंतु मी आता तुम्हाला जे सांगणार आहे त्यावर तुमचा विश्वास बसणार नाहीये. मी कितीही दाताच्या कण्या करून तुम्हाला हे सांगितलं की हे सगळं असंच घडलं आहे, तरी तुम्हाला ते सगळं काल्पनिकच वाटणार आहे. लेखक, नायक आणि निवेदक यांत आपण नेहमीच गल्लत करतो. ते एकच आहेत असे आपण गृहीतच धरतो. कित्येकदा ते तसे नसतात, कित्येकदा ते तसे असतातही. एकंदर लेखनप्रक्रिया म्हणजे मोठाच गुंतडा असतो. पण वाचकांचा विश्वासघात करू नये असेही मला वाटतेच. त्यामुळे आता मी जे तुम्हाला सांगणार आहे, ते खरेच खरे आहे का कल्पनेतले खरे आहे याबाबत मी काहीच सांगणार नाही. एक कबूल, की असे अनुभव काही आपल्याला नेहमी येत नाहीत. विश्वासार्हतेच्या कसोटीवर टिकणारा हा अनुभव नाहीये, याची मला जाण आहे. पण माझा नाइलाज आहे. त्यामुळे कथा, कादंबरी वगैरे साहित्यकृतीच्या सुरूवातीला जे निवेदन देतात ते मी काहीसे असे देणार आहे :

''प्रस्तुत कथेतली पात्रे, घटना, प्रसंग वगैरे काही जणांना वास्तवातील वाटतील तर काही जणांना काल्पनिक वाटतील. ज्यांना वास्तवातली वाटतील त्यांनी ते वास्तव समजावे आणि ज्यांना काल्पनिक वाटतील त्यांनी काल्पनिक समजावे. या लेखनाद्वारे कुणाच्याच भावना वगैरे दुखावण्याची शक्यता नसल्याने मी, या कथेचा लेखक या नात्याने ही मुभा वाचकांना स्वखुशीने देत आहे.''


हे निवेदन काहीसे दीर्घ आणि संदिग्ध झाले आहे हे कबूल, पण मला त्याशिवाय दुसरा पर्यायच नाही. असो. प्रस्तुत कथेत फक्त चार पात्रे आहेत. त्यातले एक अर्थातच मी स्वत: आहे. प्रत्यक्ष कथा मात्र मी तृतीय पुरुषी निवेदनात लिहिणार असल्याने मला या पात्राला (म्हणजे मला) कोणत्या तरी नावाने संबोधित करणे आवश्यक ठरणार आहे. कथेच्या सोयीसाठी मी मला विजय या नावाने संबोधणार आहे आणि या विजयचे व्यक्तिमत्त्व माझ्याशी जुळणारे असल्यास त्यात योगायोगाचा काहीच भाग नसून ते तसेच अभिप्रेत आहे. सोयीचेही आहेच. (म्हणजे ती लगेच माझी कथा होते असे अर्थातच नाही. पण लिहिताना सोयीचा विचार करण्यात काही गैर नाही.) अर्थात मी सुरूवातीला म्हणालोच आहे, की तुमचा याच्यावर विश्वास बसणे कठीणच आहे. शिवाय कथेत लैंगिक, अश्लील, गुन्हेगारी वगैरे तपशील नसल्याने माझ्याशी संबंधित कुणाला राग वगैरे यायचेही काही कारण नाही. (शिवाय ही कथा मीच लिहीत असल्याने मला राग येण्याचा प्रश्नच येत नाही.) तेव्हा मी अगदी नि:संकोचपणे लिहिणार आहे. कथेतील बाकी तीन पात्रांपैकी दोन मानवी आहेत. त्यापैकी एक आहे नायकाची एक परदेशस्थ मेहुणी. तिला आपण करुणा असे म्हणू या. (आता माझी स्वत:ची एक मेहुणी परदेशी असते हा भाग आवर्जून तुम्हाला सांगायची गरज नाही. त्यात योगायोग वगैरे काही नाही. कथेतले तपशील भरताना सोपे जावे म्हणून ही निवड. शिवाय ही काही तिची कथा नव्हे.) ही साधारण तिशीची करुणा अविवाहित असून तिला अध्यात्माचे विशेष वेड आहे. भारतातील एक आध्यात्मिक बाई हिची गुरू आहे आणि त्याकारणास्तव ही करुणा बऱ्याचदा भारतात येते. (करुणाविषयी मी तसे काहीच आक्षेपार्ह अथवा बदनामीकारक लिहिणार नसल्याने प्रत्यक्षातल्या तिच्या बहिणीच्या म्हणजे माझ्या पत्नीच्या भावना दुखावण्याचे काही कारण नाही.) कथेतल्या (विजय म्हणजे मी सोडून) उर्वरित

तीन पात्रांपैकी जी दोन मानवी पात्रे आहेत त्यातले दुसरे पात्र काहीसे खरे अन काहीसे काल्पनिक आहे. काहीसे काल्पनिक अशा अर्थाने, की ते थोडेफार माझ्या ड्रायव्हरच्या अंगाने रचणार आहे. त्याचे नाव मात्र मी बदलून दत्ताराम असे ठेवणार आहे. (माझ्याकडे आजपर्यंत एकूण ५ ड्रायव्हर होते. त्यापैकी एकाचे नाव दत्ता होते तर हल्लीच्या ड्रायव्हरचे नाव रामकृष्ण आहे. त्यामुळे या पात्रासाठी मी दत्ताराम असे नाव रचले, हे पात्र अधिक प्रातिनिधिक व्हावे अशासाठी. हे पात्र कथेतही ड्रायव्हरच असेल.)

कथेत माझ्या व्यक्तिरिक्त इतर तीन पात्रे आहेत त्यात दोन मानवी पात्रे आहेत असे मी म्हटले. ती दोन पात्रे नायकाची मेहुणी करुणा आणि नायकाचा ड्रायव्हर दत्ताराम असेही आपण पाहिले. पुन्हा पुन्हा मी दोन मानवी पात्रे म्हणतोय त्याअर्थी तिसरे पात्र अमानवी आहे हे उघड आहे. मी सुरुवातीपासून तुमचा या सगळ्यावर विश्वास बसणार नाही असे म्हणतोय आणि एक पात्र अमानवी असल्याचे सूचित करतोय याचा अर्थ हे तिसरे पात्र काही भूत वगैरे नाही. त्या अर्थाने ही कथा अविश्वसनीय नाहीये हे लक्षात घ्या. भुताखेतां शिवायही अनेक घटना, गोष्टी अविश्वसनीय असू शकतात. कित्येकदा रोज घडणाऱ्याही काही गोष्टी आपल्याला अविश्वसनीय वाटतात आणि कथेतले पात्र म्हणजे तरी काय, कथेच्या प्रवाहावर, आशयावर प्रभाव टाकणारे काहीही, नाही का? या अर्थाने कथेतले तिसरे पात्र आहे : माझ्या आगामी कादंबरीचा नायक.

आता हे जरा नीट स्पष्ट करून सांगायला हवे. अजून प्रत्यक्ष कथा सुरू झाली नसल्याने प्रथम पुरुषी निवेदनातच हे सांगतो. (प्रत्यक्ष कथा तृतीय पुरुषी निवेदनात असेल हे मी म्हणालोयच मघाशी. पण अधिक विचार करता ती प्रथम पुरुषी लिहिणे अधिक सोयीचे जाईल अशीही शक्यता आहेच. असो. ते प्रत्यक्ष कथा लिहिताना ठरवूया.) तर चार कादंबऱ्यांचा 'उपाख्यान चौरंग' लिहायचा संकल्प सोडून मला एक दशकाहून अधिक काळ उलटला. (हे मात्र कल्पनेतले वास्तव नसून वास्तवातले वास्तवच आहे.) त्यातली चौथी कादंबरी मला अजून लिहायचीच आहे. तिचे संकल्पित नावही मी जाहीर करून दशकाहून अधिक काळ गेला. पहिल्या तीन कादंबऱ्यांमध्ये मी जीवनाचा अर्थ आणि प्रयोजन अनुक्रमे भौतिकता (म्हणजे मटेरिॲलिझम या अर्थाने), प्रेम आणि आध्यात्मिकता (स्पिरिच्युॲलिझम या अर्थाने) अशा तीन अंगाने शोधायचा प्रयत्न केला होता. आणि चौथ्या कादंबरीसाठी 'अच्युतचे उपाख्यान' असे नाव मी जाहीर केले होते. काहीएक हेतू मनात धरून, काहीएक प्रतिपादन मनात पक्के करून मी ही योजना आखली होती. अच्युतच्या निमित्ताने माझे जीवनाचे आकलन मांडण्याचा माझा अर्थातच उद्देश होता. पण येनकेनकारणेन ते राहूनच जाते आहे. मध्यंतरी माझ्या संकल्पित कादंबरीचे नियोजित प्रतिपादनच बदलून गेले माझ्या मनात. त्यामुळे कथानकाची संपूर्ण पुनर्रचना करणे भाग पडेल असे दिसू लागले. या चार कादंबऱ्या एकाच कथानकावर आणि त्याच पात्रांभवती फिरत आहेत. नचिकेत हा नायक, त्याची पत्नी मृणाल आणि नचिकेतची ऑफीसातली सहकारी आणि जिवाभावाची मैत्रिण रेणू अशा तीन पात्रांभोवती पहिल्या तीन कादंबऱ्या फिरत होत्या. याच रेणूचा नवरा म्हणजे अच्युत. मृणाल चालवत असलेल्या विवाह केंद्रातला हा उत्साही कार्यकर्ता. त्याचे आणि रेणुकेचे प्रेम जमते आणि मृणालच पुढाकार घेऊन त्यांचे लग्न लावून देते. ही पात्रे जीवनाचा विविध अंगांनी शोध घेत आहेत. पण मध्ये इतका काळ लोटला की माझे स्वत:चे एक माणूस म्हणून असलेले जीवनाचे आकलन बरेच बदलले. वैयक्तिक आयुष्यात आलेल्या अनेक अनुभवांनी माझ्यातही एक परिपक्वता आली असेल. माणसामाणसातल्या नात्यांचे, वागण्याचे विश्लेषण मी आता अधिक पक्वतेने करू शकत असेन. या साऱ्यामुळे त्या वयात मला अभिप्रेत असलेले चौथ्या कादंबरीचे प्रतिपादन आता निराळेच रूप धारण करेल अशी शक्यता निर्माण झाली आहे. पण मी अच्युतचे उपाख्यान लिहिणारच आहे. (फक्त एक तपशील सांगतोच. पहिल्या कादंबरीअखेर मृणाल, म्हणजे नायक असलेल्या नचिकेतची पत्नी आत्महत्या करते आणि त्यावेळी लिहिलेल्या एका पत्रात 'अच्युतच आपले स्वप्न पुरे करेल असे लिहून ठेवते' असा भाग आलेला आहे. मृणाल या आदर्शवादी स्त्रीला श्रेष्ठ मानवतेचे स्वप्न अच्युतद्वारेच पूर्ण होईल असे मरताना वाटते असा त्या भागाचा सूचक सारांश आहे.) असो. बरेच विषयांतर झाले. तर सांगत होतो या कथेबद्दल. कथेतले तिसरे पात्र नियोजित कादंबरीचा नायक असल्याने हे सारे सांगावे लागले. त्याचे नाव अच्युत हे तर मी सांगितलेच. तसा तो मानवीच आहे, म्हणजे कादंबरीत तो एक माणूसच आहे. पण तसा तो वास्तवातला माणूस नव्हे, या अर्थाने तसे म्हटले 'अमानवी' असे.

कथेत काही काल्पनिक आणि काही वास्तवातले प्रसंग



असणार आहेत. कथेची सुरुवातच एका विलक्षण कल्पनेने करणार आहे. माझी मेहुणी करुणा (जी खरेच माझी मेहुणी आहे आणि वास्तवातीलच आहे हे मी सांगितलेच आहे) हिला एक ईमेल (म्हणजे संगणकात इंटरनेटवरून येणारे पत्र) येते आणि हे ईमेल अच्युतने लिहिलेले आहे. कल्पना अशक्यप्राय वाटेल, हे कबूल. पण त्यामागे प्रयोजन आहे. पण हे कसे सुचले हे आधी सांगतो. मध्यंतरी माझा एक मित्र मला गमतीने म्हणाला, अरे काल रात्री रस्त्यावरून तुझा अच्युत तुला शिव्या घालत हिंडताना दिसला होता रे. म्हणजे मी इतकी वर्षे होऊनही चौथी कादंबरी लिहिली नाही म्हणून माझा मित्र मला टोकत होता, टोचत होता, चिडवत होता. पण त्यासाठी त्याने वापरलेले शब्द मला गमतीचे वाटले. संकल्पित कादंबरीचा नायक, मी ती कादंबरीच न लिहिल्याने अस्वस्थ होणे ही कल्पना मला विलक्षण वाटली.

आणि त्यात करुणाचेच मला ईमेल आले. 'की बुवा कोण हा अच्युत? मला त्याचे ईमेल आलेय.' मी चक्रावलोच. खरेच असे काही होईल अशी सुतराम शक्यता नव्हती. मग कसे झाले हे? एकच शक्यता होती की माझ्या मित्राने, (श्रीराम त्याचे नाव) खोडसाळपणाने असे ईमेल लिहिणे शक्य होते. कारण असली भन्नाट कल्पना (अच्युत भेटण्याची) त्यानेच केली होती. पण श्रीरामला माझी अशी अशी एक मेहुणी अमेरिकेत आहे याची कल्पना असणे शक्यच नव्हते. खरे तर श्रीराम माझा असा घरगुती मित्र नव्हे. त्यामुळे कथेची ही सुरुवात चमत्कारिकच वाटेल तुम्हाला. कथेचे सुरुवातीचे हे निवेदन जरा लांबते आहे हे मला कळतेय, पण असल्या चमत्कारिक कथेपूर्वी थोडी पार्श्वभूमी सांगणे अगत्याचे आहे असे मला वाटते.

बरे श्रीरामने करुणाला सांगण्याचा प्रश्नच उद्भवत नाही आणि करुणाने स्वत: माझ्या कादंबऱ्या वाचल्याही नाहीयेत. ती शक्यताच नाही. म्हणजे तसा मेहुणा म्हणून तिला माझ्याविषयी प्रेम, ममत्व आदर वगैरे आहेच, पण जन्मल्यापासून अमेरिकेत असलेल्या या मेहुणीला इतके मराठी वाचणे अशक्यप्रायच आहे. म्हणजे तसे अट्टाहासाने तिच्या आई-वडिलांनी तिला मराठी शिकवलेय. बऱ्यापैकी मराठी बोलते ती, पण कादंबरी वाचणे केवळ अशक्य. (आमचा पत्रव्यवहारही इंग्रजीमध्येच होतो.) त्यामुळे ती असा काही खोडसाळपणा करणेही शक्य नाही. त्यामुळे तिचे मला ईमेल आले, की बुवा कोण हा अच्युत? त्याने मला का ईमेल पाठवले आहे? तेव्हा मला धक्का बसणे साहजिकच होते. करुणाने अच्युतचे तिला आलेले ईमेल मला फॉरवर्डही केले होते. ते असे होते :

(टीप : अच्युतचे करुणाला लिहिलेले मूळ ईमेल इंग्रजीमध्ये होते. इथे मीच जमेल तसा अनुवाद केला आहे.)

'मा. करुणा मॅडम,

तुम्हाला हे पत्र वाचून आश्चर्यच वाटेल. कारण तुम्ही मला ओळखतच नाही. माझे नाव अच्युत. तुमचे मेहुणे विजयसरांनी केलेल्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी मी हे पत्र लिहीत आहे. हे आत्ताचे ईमेल केवळ टेस्ट मेल म्हणून पाठवत आहे. ते बरोबर तुम्हालाच मिळाल्यास कृपया फक्त पोच द्या, म्हणजे मी सविस्तर पत्र लिहीन.

आपला,

अच्युत.

बस. इतकेच होते अच्युतचे पत्र. सोबतचे करुणाचे पत्र मात्र मोठे होते. त्यात या अच्युतबद्दल दोन तीनच वाक्ये होती आणि इतर बराच मजकूर होता, ज्याचा आपल्या कथानकाशी काही संबंध नाही. म्हणजे त्यात काही खाजगी होते असे नव्हे. पण उगाच संदर्भ नसलेल्या गोष्टी कथेत आणून वाचकाची दिशाभूल करण्याचे तंत्र मला या कथेत तरी वापरायचे नाही. काहीवेळा ते तंत्रही चांगलेच प्रभावी ठरते हे खरे आहे. पण इथे ते आवश्यक नाही.

करुणाने लिहिलेल्या ईमेलमधले इतर मजकुरातले एक वाक्य मात्र आवर्जून सांगतोच. कारण ते कदाचित आपल्या कथानकात उपयुक्त ठरू शकेल. ते वाक्य होते – 'बाबाचे शर्ट अन पँटी दत्ताराम वापरतो ना? मजाच आहे त्याची.' दत्ताराम म्हणजे माझा ड्रायव्हर हे तुम्हाला सांगितलेच आहे. ही करुणा मध्यंतरी भारतात आमच्याकडे आली होती तेव्हा तिने तिच्या वडिलांचे जुने शर्टस् अन पँटी वगैरे दत्तारामला दिल्या. त्याचा संदर्भ वरील वाक्याला आहे. भारतात येताना हे अमेरिकन नातेवाईक अशा बऱ्याच जुन्या वस्तू घेऊन येतात, इथे तिथे वाटायला. ते मला स्वत:ला तितकेसे पसंत नाही, पण दत्ताराम मात्र खुष झाला खरा. असो.

प्रत्यक्ष कथेला सुरुवात करण्यापूर्वी काही गोष्टी सांगणे आवश्यक आहे असे म्हटले त्याचे कारण प्रत्यक्ष कथेत कदाचित वास्तवाला इकडे तिकडे ताणून कथांतर्गत वास्तव तयार होईल. ते सारेच विश्वसनीय असेल असे नव्हे. त्यात माझ्या कल्पनेचा बराच भाग असू शकेल. तेव्हा त्याचे निदान संदर्भ तुमच्या मनात असले म्हणजे तुम्हाला सोयीचे जाईल. उदाहरणार्थ करुणाचे ईमेल (आणि सोबत अच्युतचे ईमेल) आल्यावर तातडीने मी एक गोष्ट केली. ती म्हणजे त्यात असलेल्या अच्युतच्या (संगणकीय) पत्यावर तातडीने असे पत्र लिहून टाकले.

'प्रिय अच्युत,

अच्युत, तू हा काय चावटपणा चालवला आहेस? करुणाला ईमेल लिहायचे काय कारण? मुळात करुणाचा ईमेल अॅड्रेस तुला मिळालाच कसा? आणि तिचा इथे संबंधच काय? शिवाय मी केलेल्या 'अन्यायासंदर्भात' वगैरे लिहायचे काय कारण होते तुला? साहित्य वगैरे गोष्टींचा तिचा दूरान्वयाने सुद्धा संबंध नाही, तेव्हा तिला अन्याय म्हणजे भलतेच काही वाटले तर? तिला माझ्याविषयी पुरेपूर आदर आहे. तू असला काही खोडसाळपणा करू नयेस हे बरे. काय ते मला लिही. हवे तर मला भेट. पण जस्ट कीप हर आउट ऑफ धिस, ओके?

तुझ्या उत्तराची वाट पाहात आहे.

विजय'

शेवटी तुझाच, सस्नेह, सप्रेम वगैरे काहीच लिहावेसे वाटले नाही मला. पत्राच्या सुरवातीला देखील क्षणभर 'प्रिय चि.' असे लिहायचा विचार माझ्या मनात आला, पण संकल्पित कादंबरीत मी अच्युतच्या बालपणापासून म्हातारपणापर्यंतचा प्रवास रेखाटणार होतो, त्यामुळे चिरंजीव लिहायला त्याचे वय कोणते गृहीत धरणार, नाही का? असो. त्याचबरोबर मी करुणालाही एक मेल लिहून टाकले, की तू ते अच्युत वगैरे सरळ विसरून जा. हल्ली नेटवर वाट्टेल ते चावटपणे चालतात. त्यावर कुणाचाच काही कंट्रोल नाही. तेव्हा अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करणे बरे. आणि तिथे मला धक्का बसेल अशी एक गोष्ट झाली. करुणाचे मला उलट मेल आले त्यात तिने म्हटले होते, 'मला वाटते अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करणे बरोबर नाही. न जाणो उद्या काही भानगड व्हायची. तेव्हा मी त्या अच्युतला रिप्लाय केले आहे, की मीच करुणा आहे आणि त्याने काय ते मला लिहावे.' आता हा नवाच तिढा निर्माण झाला. एकीकडे मी अच्युतला दम भरला, की त्याने करुणाला यात ओढायचे कारण नाही आणि दुसरीकडे करुणा उगाच या भानगडीत शिरत होती. बरे अन्याय अन्याय म्हणजे तरी काय? मी अजून कादंबरी लिहीत नाही हाच ना? त्यात भयानक अन्याय वगैरे काही नाही. माझी मर्जी. मी हवे तेव्हा लिहीन. माझे चिंतन अजून पुरे व्हायचे आहे त्या विषयावर, मग मी घाईघाईत का लिहावे? यात न्याय-अन्यायाचा काय संबंध येतो ? निव्वळ चावटपणा आहे हा.

एकीकडे मी असा विचार करत आणि अच्युतच्या

उत्तराची वाट बघत असताना चार दिवस गेले तोच अचानक करुणाचेच ईमेल आले. ते वाचून मला धक्का बसला. आणि आता मात्र हे प्रकरण आपण समजतो तितके साधे अन् सोपे नव्हे अशी माझी खात्री पटली. (खरे तर नेमके याच वळणावर या सगळ्याची कथा लिहावी असा माझा विचार झाला.) कारण करुणाने अत्यंतिक आश्चर्यचकित होत मला लिहिले होते, 'विजय, आय कांट बिलीव्ह धिस. अच्युतच्या बायकोचे आणि तुझे काही 'तसले' संबंध आहेत? अच्युतनंच लिहिलंय तसं. एक सांग विजयदादा, डझ ताई नो अबाउट इट? माहिती आहे हे ताईला? रीअली...आय ॲम शॉक्ड. शी विल बी शॅटर्ड... पार पार उद्ध्वस्त होऊन जाईल रे ताई अशाने...'

हा मलाच धक्का होता. (करुणाने उल्लेख केला ती 'ताई' म्हणजे अर्थातच माझी बायको.) अच्युतच्या बायकोचे अन् माझे तसले संबंध? तसले म्हणजे करुणाच्या मते विवाहबाह्य, व्यभिचारी वगैरे. बापरे! हे नवेच. अच्युतची बायको म्हणजे रेणू. रेणुका. हिचा पहिला नवरा धीरेन कुवेत का कुठे गल्फमध्ये नोकरीला जाताजाताच कार ॲक्सीडेंटमध्ये गेला. मग ही माझ्या पहिल्या कादंबरीच्या नायकाच्या, नचिकेतच्या ऑफीसात कामाला लागली. नचिकेतच्या निर्मळ मैत्रीतच तर तिने आयुष्याचा अर्थ मिळवला आणि मग या अच्युतशी लग्न करून सुखी झाली. आणि करुणा म्हणतेय की अच्युतच्या बायकोशी माझे 'तसले' संबंध आहेत असा आरोप करणारे पत्र (ईमेल) अच्युतने करुणाला लिहिले आहे. एक तर रेणूला असे 'अच्युतची बायको' म्हणणेच मला कसेतरीच वाटतेय. अच्युतच्या जन्माआधीपासून ओळखतोय मी रेणूला. कवितेवर प्रेम करणारी, तरल मनाची, एखाद्या मधुर भावगीतासारखी रेणू. तिच्या कविताही तिच्यासारख्याच. भावमधुर पण गूढ. पौर्णिमेच्या रात्री चंद्र ढगाआड लपल्यासारख्या.

हे असंच होतं. रेणूचा विषय निघाला की मीही असा सेंटिमेंटल अन् ईमोशनल अन पोएटिक होतोच. रेणू म्हणजे जणू प्रत्येक संवेदनाशील पुरषाचं स्वप्न. निरपेक्ष, निर्मळ प्रेमाचं. कवितेच्या दोन ओळींमधल्या जागेसारखं. दोन श्रावणसरींच्या मधल्या गारव्यासारखं. तीव्र मध्यमावरून रिषभावर उतरताना क्षणभर रेंगाळावं तसं. जाऊ दे. रेणूविषयी लिहायला लागलो तर मूळ कथा राहायची बाजूला. पण आता तर ही कथा उलटीपालटी होत चालली. अच्युतनं थेट करुणाला लिहावं, की माझे अन् त्याच्या बायकोचे संबंध आहेत. अन् हा अन्याय?

एक गोष्ट लक्षात घ्या. करुणाला अजून तरी अच्युत नावाचा कुणी खरा माणूस आहे असंच वाटत होतं. त्यामुळे तिच्या दृष्टीने हा तिढा विचित्र पण समजण्यासारखा होता. समजण्यासारखा म्हणजे 'ॲक्सेप्ट' या अर्थाने नव्हे तर 'अंडरस्टँड' या अर्थाने समजण्यासारखा होता. आपल्या बहिणीच्या नवऱ्याचे असे संबंध असणे गैर असले, अमान्य असले, संतापजनक असले तरी भौतिकदृष्ट्या अशक्य नाही हे तिला समजत असणार. माझ्या दृष्टीने हे अशक्य आहे. म्हणजे फीजिकल इंपॉसिबिलिटी या अर्थाने. पुन्हा हेही लक्षात घ्या, की असे संबंध असणे कितीही गैर असले तरी अशक्य नसतात हे मला समजते. पण रेणू? नो वे... नो वेऽऽ. जस्ट इंपॉसिबल. प्रत्यक्ष कथेत मी काय लिहिणार आहे हा भाग तूर्तास बाजूला ठेवूया. किंवा क्षणभर माझ्याच संकल्पित कादंबरीतले पात्र माझ्या प्रत्याक्षतल्या मेहुणीला कसे काय ईमेल लिहील हाही असंभवनीय वाटणारा भाग बाजूला ठेवूया. तरीही अच्युतने असा आरोप करावा याचे मला सखेद आश्चर्य वाटले हे मात्र खरे. हो, अगदी सखेद. धिस इज सॅड. सिंप्ली सॅड. खिन्न वाटावे अशीच गोष्ट आहे ही. एखादी गोष्ट खरी असली तरच तिचे वाईट वाटते असे नव्हे. आपण कित्येकदा आपल्या किंवा आपल्या कुणा प्रिय व्यक्तीच्या मृत्यूचा विचार करतोच की. काही वेळ त्या कल्पनेत आपल्याला विलक्षण दु:ख होते. नंतर ते दु:खद दिवास्वप्न आपणच थांबवतो. पण इथे जरी 'खरे नसले' तरी अच्युतची ही मेलबाजी थांबवणे माझ्याही हातात नाही. कारण करुणाचे 'माझे अन् अच्युतच्या बायकोचे तसले संबंध असल्याबद्दल अविश्वास, चीड , दु:ख व्यक्त करणारे' ईमेल आले आणि दुसऱ्याच दिवशी मला अच्युतचे ईमेल आले. त्याने लिहिले होते –

'विजयसर,

करुणा मॅडमना मी यात ओढले त्याबद्दल सॉरी, पण त्यामागची भूमिका लक्षात घ्या प्लीज. मला खरेच तुम्हाला तसे डिस्टर्ब करायचे नव्हते. अन्यथा तुमच्या इथल्या एखाद्या मित्राला किंवा थेट सौ.वहिनींना पत्र लिहिता आले असतेच की. पण मला व्यक्त तर व्हायला हवेच ना? कृपया गैरसमज करून घेऊ नका. पण माझ्या संसाराची वाताहत होताना मी गप्प राहावे अशी तुमची अपेक्षा असेल तर ती तरी बरोबर आहे का?'

अच्युतने पत्रात अजूनही बरीच आर्ग्युमेंट्स केली होती. त्यातली काही लॉजिकल होती, तर काही आक्रस्ताळी अन त्रागा-कांगावा करणारी होती. 'हा' अच्युत तर मलाही परका

होता. पूर्णपणे अनोळखी होता. पहिल्या तीन कादंबऱ्यांतला अच्युत तर किती वेगळा होता. भावुक, भाबडा, आदर्शवादी होता. मृणाल तर म्हणते, 'आपले स्वप्न अच्युतच पूर्ण करेल.' आणि हा अच्युत? असा? मलाच कॉर्नर करणारा? रेणूबाबतच्या माझ्या सुंदर भावनांवरच संशय घेणारा?

आत्तापर्यंत कथेची पार्श्वभूमी म्हणून या सुरूवातीच्या निवेदनात मी हे सारे लिहितोय पण सुरूवातीला दत्तारामचा उल्लेख कथेतले एक पात्र म्हणून केला याचे तुम्हाला आश्चर्य वाटत असेल. त्याचा या घटनेशी आणि कथानकाशी काय संबंध असेही तुम्हाला वाटत असेल. तर त्याबद्दलही थोडे सांगतोच. प्रत्यक्ष कथेत दत्तारामचा प्रवेश तसा बराच उशिरा होईल.

पण इथे नुसते सांगून ठेवतो त्याचे या कथेतले प्रयोजन. ते थोडेसे प्रतीकात्मक अर्थानेही घ्यायला हवे. दत्ताराम हा ड्रायव्हर माझ्याकडे काही वर्षांपूर्वी कामाला होता, पण मग तो मद्याच्या आहारी गेल्याने मीच त्याला काढून टाकले. त्याचे ड्रायव्हिंग चांगले होते, वागणूकही चांगली होती, पण आयुष्यात काही गोष्टी अशा असतात की नाही घेऊ शकत आपण कोणतीच रिस्क. अनेकवेळा माझ्या गाडीतून मी नसताना तो बायकोला, मुलांना कुठेकुठे सोडायला जात असे. अलीकडे रस्त्यावरची रहदारीही किती वाढली आहे. अशा वेळी मी कोणताच धोका पत्करू शकत नाही ना ! दारू पिऊन तो कधी गाडी चालवायला बसला असे नाही, पण रस्त्यावरची नजर कोणत्याही कारणाने क्षणभर देखील ढळणे किती महागात पडू शकते हे मी सांगायची गरज नाही. असो. तर मग मध्यंतरी मी त्याला काढून टाकले तरी त्याचे माझे संबंध संपले असे नव्हे. मधून मधून घरी येत असे तो. ख्यालीखुशाली सांगत असे. त्याचे दारूचे व्यसनही पूर्णपणे सुटले. दुर्दैवाने त्याची नोकरीही गेली तेव्हा मी मोठ्या मनाने त्याला पुन्हा कामावर घेतले. (स्वत:विषयी सहसा आपण 'मोठ्या मनाने' असा शब्द वापरत नाही खरे तर, पण हे तसे कथेपूर्वीचे अनौपचारिक निवेदन असल्याने मोकळेपणाने तसे म्हटले.) आता मात्र तो पूर्ण व्यसनमुक्त झाला आहे. प्रत्यक्ष कथेत दत्तारामचा प्रवेश उशिरा होतो म्हटले ते अशा अर्थाने, की एक दिवस दत्ताराम मला घेऊन एका साहित्यिक कार्यक्रमाला जात असताना गाडीत मागे वळून म्हणाला, 'अच्युतसाहेब आले नाहीत बऱ्याच दिवसात, साहेब?'

मी अर्थातच चमकलो. म्हणालो, 'कोण अच्युतसाहेब?' मला अच्युत नावाचा कुणी मित्र आठवेना. अच्युत गोडबोले नावाचा लेखक तसा माहिती आहे मला, पण तो कधी माझ्याबरोबर गाडीतून कुठे यायचा प्रश्नच नाही, की ज्यायोगे तो दत्तारामला माहीत व्हावा. त्याची अन् माझी काही मैत्री नाही. तोंडओळख आहे इतकेच. दत्तारामच पुढे म्हणाला, 'ते हो अच्युतसाहेब, आपल्या रेणूताईंचे मिस्टर. तुम्ही अन् ते नाही का नेहेमी, चांदणी चौकातल्या त्या हॉटेलात जाता.'

दत्ताराम तसा माझ्याकडे अनेक वर्षे नोकरीला आहे. बऱ्याच वेळा गाडीतून जाताना तो माझ्याशी बोलत असतो. काही वेळा चक्क आमच्या गप्पाही होतात. काही वेळा माझ्या काही मित्रांना घरी सोडायलाही तो गेला आहे. माझ्या बऱ्याच नातेवाइकांनाही तो चांगला ओळखतो. एकूणात तसे आमचे संबंध इतक्या वर्षांनंतर बरेचसे घरगुती झाले आहेत. मध्यंतरी आम्ही सगळे माझ्या एका नातेवाइकाकडे कोकणात गेलो होतो तेव्हा हा दत्ताराम तिथे अगदी घरच्यासारखा वावरला होता. बरेच वर्षे ज्यांच्याकडे असा एखादा ड्रायव्हर कामाला असेल त्यांना मी काय म्हणतोय ते कळेल. शिवाय काही वेळा रात्री पार्टीहून उशिरा येताना आपणही गाडीत त्याच्याशी अंमळ अधिक मोकळेपणाने बोलतो. एकूणात दत्तारामने माझ्या कुणा मित्राविषयी असे विचारणे काही गैर नव्हते. पण तो अच्युतविषयी विचारत होता. वर पुन्हा, आपल्या रेणूताईंचे मिस्टर असे म्हणत होता. दत्ताराम पुढे म्हणाला, 'पण लै वाईट झालं बघा रेणूताईंचं. अच्युतसाहेबांसारख्या जंटलमन माणसानं असं वागवावं रेणूताईंना म्हणजे फार वाईट झालं साहेब. आपल्या रेणूताई पण काय, एकदम जंटलमन बाई आहेत खरं तर, साहेब. छ्या. वाईट झालं. पण साहेब तुम्ही किती वेळा त्या चांदणी चौकातल्या हॉटेलात बसून समजावून सांगीतलतच की अच्युतसाहेबांना. अन् एकदा तर गाडीत इतकं समजावलंत, घरी आल्यावर गाडीतून न उतरता तासभर तुम्ही दोघं गाडीत बसून त्यांना सांगत होता. पण तुम्हाला एक सांगतो साहेब, ही माणसं अशी नाही सुधारायची. आता राग येईल तुम्हाला साहेब, पण अशा लोकान्ला चार फटके टाकायला हवेत एकदा...'

दत्ताराम बऱ्याचदा मागे गाडीत माझे कुणाबरोबर काय बोलणे होते ते ऐकत असणारच. तसा तो अनेक वर्षे असला तरी शेवटी नोकरच. म्हणून मीही कधी तो ऐकतोय याचा बाऊ करत नाही किंवा पर्वा करत नाही. गाडीत बसून फोन केला की कधी एखाद्या जवळच्या मैत्रिणीशी गमतीने लाडिक बोललं जातं, एखाद्या मित्राशी फोनवर बोलताना थोडं चावट, अश्लीलही

बोललं जातं, एखादा घाणेरडा विनोद केला जातो एखाद्या मित्राशी बोलताना, एखाद्या जवळच्या मैत्रिणीशी भांडण वगैरे झालेलं असेल तर फोनवर समजूत काढताना अंमळ अधिक प्रेमानं बोललं जातं. गाडीत बसून असं काहीही बोलताना दत्ताराम असल्याचा मला कधी संकोच वाटला नाही किंवा कॉंशस व्हायला झालं नाही. दत्ताराम आत्ता जे म्हणत होता त्याचा मथितार्थ असा दिसत होता, की मी असाच अच्युतशी गाडीत बसून खूप बोललो. आणि तेही तो रेणूला काही त्रास देतो म्हणून समजावून सांगायला. आणि दत्ताराम ज्याअर्थी म्हणतोय, की अशा माणसांना चार फटके टाकायला हवेत, त्याअर्थी काहीतरी फारच त्रास देत असावा अच्युत रेणूला.

हे माझ्या आकलनाबाहेर चाललं आता. पुन्हा एकदा कसा तिढा बसलाय बघा. हे दोन अर्थांनी अशक्यप्राय आहे. एक तर असा कसा दत्तारामने अच्युत बघितला असेल. म्हणजे फीजिकल इंपॉसिबिलिटी या अर्थाने. आणि दत्तारामला कशी रेणू माहीत असेल? आणि फीजिकल इंपॉसिबिलिटीचा मुद्दा बाजूला ठेवला तरी दुसरे म्हणजे अच्युत कसा काय रेणूशी असा वाईट वागू शकेल? रेणूशी? तिचा हात हातात घेऊन मृणालला (माझ्या कादंबरीच्या नायकाच्या पत्नीला) , 'मृणालताई, द्याल ना तुमची रेणू मला?' असे भावूकपणे म्हणणारा अच्युत? रांगडा पण भाबडा आणि भावूक असणारा अच्युत? तो अन् रेणूला त्रास देणार? अन् इतका त्रास की दत्तारामसारख्याने म्हणावे की अशा माणसाला चार फटके द्यायला हवेत. इतका बदलू शकतो अच्युत? पहिल्याच कादंबरीत मी अच्युत आणि रेणूचे प्रेम जमल्याचे आणि ते लग्न करणार असल्याचे सूचित केले होते आणि दुसऱ्या अन् तिसऱ्या कादंबरीत तर त्यांच्या लग्नानंतरचाच भाग आहे. अन् तो किती छान आहे. मोहक आहे. लोभस आहे. हो. रेणूबाबत सगळे लोभस अन् मोहकच हवे. कारण रेणूच लोभस आहे. रेणू म्हणजे जणू प्रत्येक संवेदनशील पुरूषाचं स्वप्न. निरपेक्ष, निर्मळ प्रेमाचं. कवितेच्या दोन ओळींमधल्या जागेसारखं. दोन श्रावणसरींच्या मधल्या गारव्यासारखं. तीव्र मध्यमावरून रिषभावर उतरताना क्षणभर रेंगाळावं तसं. रेणूबद्दल हे मला वाटते, आधीही एकदा लिहिलंय मी. कथेपूर्वीचे हे निवेदन भलतेच दीर्घ होत चाललेय. पण कथेचे अन्वयार्थ मला हवे तसेच पोचवायचे तर हे सारे नीट स्पष्ट करायला हवे. आणि या कथेत तर सुरूवातच चमत्कारिक करणार आहे मी. ते वर लिहिलेच आहे मी. करुणाच्या मेलबद्दल.

एक प्रश्न आहे. हा काही बदल नव्हे अच्युतमधला. बदल म्हणजे आधी एक वेगळाच अच्युत होता का? का मला कधी कळलाच नाही अच्युत? कशी अन् कधी कळतात आपल्याला माणसे? आपणच निर्माण केलेले माणूस तरी कळते आपल्याला? अच्युत असा वागू शकतो? रेणूशी? माझ्याशी? वर पुन्हा करुणाला तसे मेल लिहिणे म्हणजे तर कांगावखोरपणाच झाला अच्युतचा.

त्यात करुणाचे ईमेल आलेय. त्या मेलनंतर अच्युतचे काहीच मेल आले नाही नंतर म्हणून अस्वस्थ झालीय करुणा. आता माझे रेणूशी तसे काही संबंध नसल्याचे विचारतेय. (ग्रॅमॅटिकली विचित्र झाले हे वाक्य.) पण माझ्या म्हणण्याचा आशय असा, की आमचे आता तसे काही संबंध उरले नसतील अशी आशा, अपेक्षा व्यक्त केलीय तिने. अमेरिकेत वाढलीय करुणा. त्यामुळे तसे काही संबंध असले अन् आता ते नसले तरी तिला पुरण्यासारखे आहे. वर शेवटी मेल मध्ये तिने एक इंग्रजी वाक्य लिहिलेय. म्हणते, आय होप देअर विल बी नो कमबॅक्स, विजय. नो कम बॅक्स. म्हणजे, पुन्हा काही नव्याने उपटू नये यापैकी. म्हणजे तिच्या दृष्टीने अच्युतचे पुन्हा काही मेल आले नाही म्हणजे सारे आता संपून सुरळीत झाले आहे. विशफुल थिंकिंगसारखे लिहिलेय करुणाने. नो कमबॅक्स याचा अजून एक अर्थही होऊ शकतो. स्वत:विषयी असा विचार करायला कसेतरीच वाटते, पण तिच्या म्हणण्याचा अर्थ यातून काही मूल वगैरे भानगड नसावी या अर्थाने नो कम बॅक्स. विचित्र आहे हे सारे. रेणूविषयी असा काही विचार करणेही संकोचाचे, काहीतरी घाणेरडे वाटतेय मला. हे काय भलतेच लचांड होऊन बसले. सुदैवाने माझी बायको असल्या ईमेल वगैरे भानगडीत नसते. तिचा ईमेल अकाउंट देखील नाही म्हणा. करुणा कशाला असला काही उद्योग करेल ?

अच्युतने तरी कशाला असला उद्योग करावा? म्हणजे दोन्ही. एक तर रेणूला त्रास द्यायचे कारण काय? दत्तारामच्या बोलण्यावरून तरी अच्युत रेणूला मारहाण करण्यापर्यंत त्रास देत असावा असे दिसते. एरवी कशाला दत्ताराम, अशा माणसाला चार फटके टाकायला हवेत असे म्हणेल? बायकोला मारहाण करण्यापर्यंत जावी अच्युतची मजल? एखाद्या फुलावरच्या दवबिंदूसारखी कोवळी, नितळ, सुरेख रेणू. अन् तिला पार मारहाण करण्यापर्यंत मजल जावी अच्युतची? आणि दुसरा उद्योग अर्थातच करुणाच्या मनात भलतेसलते भरवायचा. तो

तर कळस आहे या माणसाच्या नालायकपणाचा. मुख्य म्हणजे खोटेनाटे. रेणूबाबत माझ्या भावना नेहेमीच शुद्ध होत्या अन् आहेत. त्या पार्श्वभूमीवर अच्युतच्या वागण्याला नालायकपणा म्हणावे नाही तर काय?

आता थोडा निराळ्या अंगाने विचार करूया. मुख्य आणि प्रत्यक्ष कथेपूर्वीचे हे स्पष्टीकरणात्मक निवेदन आता खरे तर आवरते घ्यायला हवे, पण कथेतून काही तरी भलतेच अन्वयार्थ वाचकाने घेऊ नयेत म्हणून ही काळजी घेणे गरजेचे आहे. म्हणजे मला असे म्हणायचे नाही की कथेतून वाचकांना लेखकाच्या व्यक्तिगत जीवनाबद्दल काही चुकीचे संकेत मिळू नयेत म्हणून मी असे निवेदन लिहितोय. लेखकाबाबत असे नाही, पण कथेतल्या पात्रांबाबतही वाचकाने चुकीच्या दिशेने विचार करत जाणे, काही चुकीचे पूर्वग्रह निर्माण करून घेणे धोक्याचे असते. लेखकाच्या, म्हणजे माझ्या व्यक्तिगत जीवनाचा इथे काही संबंध नाही. अर्थात काही वेळा वाचक देखील लेखक, निवेदक अन नायक यात गल्लत करतो हे या निवेदनाच्या सुरूवातीला सांगितलेच मी. असो.

तर आता थोडा निराळ्या अंगाने विचार करूया. उद्या रेणूदेखील असे काही माझ्या कल्पनेबाहेरचे वागली तर? अच्युतचे तिच्याशी वागणे समर्थनीय ठरेल असे काहीतरी तिच्या वागण्यात असेल तर? तिच्या वर्तमानकाळात किंवा भूतकाळात असेल तर? जे मला माहीत नसेल. किंवा आत्ता माहीत नाही असे म्हणू. उद्या कदाचित तेही माहीत होईल. हे सगळेच अशा कोणत्या दिशेला जायला लागले तर मी काय करावे? कबूल मुळात माझ्या पहिल्या कादंबरीच्या नायकात मी होतोच. आणि चौथ्या कादंबरीत बहुदा अच्युत त्या जागी विराजमान होईल असे मला वाटत होते. तशा दिशेने त्याचे व्यक्तिमत्त्व घडवत आणलेच होते ना मी पहिल्या तीन कादंबऱ्यांत. पण मग हे काय नवेच? माझ्याच पात्रांना काहीएक अज्ञात भूतकाळ असू शकतो हे मी का गृहीत धरू नये? जो मला माहीत असेलच असे नाही. तसे कशाला, जगताना आपल्याला कितीएक माणसे भेटतात, त्यांच्याशी आपले संबंध प्रस्थापित होतात. आपल्या अनुभूतीनुसार ते सलोख्याचे, मैत्रभावाचे बनत जातात किंवा वैराचे होत जातात. पण त्या त्या व्यक्तीलाही काही एक भूतकाळ असतोच. असे आपल्या संबंधातल्या सगळ्यांचे भूतकाळ माहीत करून घेणे आपल्याला शक्यही नाही किंवा आवश्यकही वाटत नाही. मला माहीत नसलेला असा एक अच्युतचा भूतकाळ असू शकतो. चार दोन वाक्यांत मी लिहून ठेवले असेल त्याबद्दल. पण तरी त्यात कितीतरी असे असेल की जे मला माहीतच नसेल. तेच रेणूचे. आणि तेच मानसीचेही असू शकेल.

सॉरी. सॉरी. मानसी मी आपले एक उदाहरण म्हणून नाव घेतले. असे कोणते पात्र नाही. आपण सुरूवातीलाच म्हटले आहे. अशी कोणीही मानसी नाही. या प्रस्तावित कथेत चारच पात्रे आहेत. एक मी. मी सोडून दोन मानवी पात्रे म्हणजे करुणा आणि दत्ताराम. आणि आधी सविस्तर सांगितले त्यानुसार मी सोडून तीन पात्रे आहेत, दोन मानवी, जी करुणा अन् दत्ताराम अन् तिसरे पात्र जे म्हटले तर मानवी नाही, ते म्हणजे अच्युत. यात मानसीला स्थान नाही. नाही म्हणजे नाहीच.

आता प्रत्यक्ष कथेला सुरूवात करूया मला वाटते. कथेचे नाव 'संभ्रमाचे सर्ग' असे ठेवणार आहे मी. तेच एकूण आशयाला उचित वाटेल.

संभ्रमाचे सर्ग

मानसीने आवेगाने माझ्या खांद्यावर डोके टेकले आणि ती म्हणाली, 'विजय, पण तुला अशक्य वाटत असले तरी हे सत्य आहे...'

००००

संजय भास्कर जोशी
ई-३, गजानन सोसायटी, कृष्णा कॉलनी, 'वनाझ'जवळ,
पौड रोड, पुणे ४११०२९ मोबाइल : ९८२२००३४११

e-mail - swaraart_swapne@yahoo.com.

**शुभेच्छा**

सोलापुरात दि. १३ व १४ नोव्हेंबर २०१० रोजी होणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा सोलापूर आयोजित विभागीय साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा.

या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ समीक्षक, अनुवादक आणि आशय परिवाराचे सुरुवातीपासूनचे मार्गदर्शक निशिकांत ठकार यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

**– आशय परिवार**



# बदलत्या संदर्भात वाचनसंस्कृती

(..आणि वाचलीच पाहिजेत अशी अलिकडील पुस्तके)

नव्या, आवडणाऱ्या पुस्तकांचा सुखावणारा वास, मनात कुठेतरी त्याबद्दलची उगवलेली स्वामित्वभावना, अर्धवट वाचलेलं पुस्तक मनात उलगडत असताना, रुंजी घालत असताना रोजची पोटाची तारेवरची कसरत करताना होणारी तारांबळ, सायासानं मिळवलेला एकान्त, पुस्तक तसेच पालथे ठेवून घेतलेली कॉफी, बाहेर पावसाचा पारदर्शी पडदा.. वगैरे वगैरे सारे कालबाह्य होऊन अडगळीत पडले त्याला बरेच दिवस झाले. तरी पुस्तके निघताहेत, संपताहेत... नवे प्रयोगही होताहेत... अगदी ललित साहित्याच्याही आवृत्त्या निघताहेत, नवनवीन दिवाळी अंक दिमाखात निघताहेत. तीनचार वर्षांत मिळवलेल्या पुरस्कारांची पानभर यादी मिरवताहेत... पुस्तक प्रदर्शनं साड्यांइतकीच नियमित, गर्दीची झालीत.

तरी तहान लागलेली आहेच...

वाचनसंस्कृतीच्या दृष्टीने सारे आलबेल आहे असे म्हणता येईल का? मुळात पुस्तकखरेदी आणि वाचन याचा थेट संबंध आहे काय? ज्या अर्थाने वाचनसंस्कृती हा शब्द आपण वापरतो, त्या अर्थाने 'वाचावे' असे समाजातल्या 'निदान' मध्यमवर्गाला तरी वाटतेय का? वाचन ही गरज उरलीय का? पुस्तकं वाचावीत न् जगणे समजून घ्यावे, समृद्ध होत जातानाची सुखद जाणीव (किंवा उसवणारीही!) अनुभवावी इतकी उसंत (मानसिक न् शारीरिकही) किती जणांजवळ आहे? नसेल तर–

भरभराटीला येत असलेला प्रकाशन व्यवसाय–पैसे घेऊनही प्रकाशकांकडे रांगा लावणारे लेखक... उंची, वातानुकूलित पुस्तकांची दुकाने–नव्या–पायरेटेड का होईना–पुस्तकांनी भरलेले फुटपाथही...महिन्याकाठी बाजारात येत असणारी न् बऱ्यापैकी नियमित चालणारी (निर्मितीत कसली काटकसर न करताही) वाङ्मयीन मासिकं, ब्लॉगवर लिहिणाऱ्यांचीही होत असलेली संमेलनं... (ई–सभा), एसएमएसद्वारे कादंबरी, ई–बुक–दुकानात जाऊन पुस्तक हवं ते समोरच छापून घेणं इ.चा जवळ येत चाललेला पायरव......

हे काय आहे? अन् असं असूनही –

'आपण अधिकाधिक अविचारी, असहिष्णू, हिंसक, प्रतिक्रियांवर काबू न ठेवू शकणारे, बेबंद का होत चाललो आहोत?'

अशा सगळ्या संभ्रमात, गोंधळलेल्या, धूसर, शंकास्पद सभोवतालात धाडसाने, तरी निखळ, वादरहित असे काही म्हणता येईल काय? सकारात्मक विचाराने वाचन संस्कृतीसाठी (म्हणजे काय? पुन्हा गोंधळच) काय करता येईल? सारे खरे तर स्वान्त सुखाय वगैरे असताना हे काय म्हणून करावे? एरवी चर्चासत्रे, व्याख्याने, महावाचक स्पर्धा, ग्रंथदिन, मराठी दिन इ. प्रकारचे सणवार नसतानाही.

**नीतीन वैद्य**

# सुसंस्कृत समाजाच्या घडणीसाठी वाचनसंस्कृतीची आवश्यकता

अशोक नीलकंठ सोनवणे

१

'पार्लमेंट ऑफ द फाऊल्स' हे चॉसर नावाच्या लेखकाचं पुस्तक जॉन मस्फिल्ड या हमालाच्या हाती पडलं. त्यानं ते वाचलं आणि पुढे तो थोर कवी झाला हे सर्वांनाच ठाऊक आहे.

कवी माधव ज्यूलीयन चिंताक्रांत झाले की गांधीचरित्र वाचत. त्यामुळे त्यांचं मन शांत होई. लेखक रा. ग. गडकरी सतत वाचनात नि विचारात मग्न असत. मोठा लेखक होण्यात त्यांना वाचनाचा उपयोग झाला. आचार्य अत्र्यांनी तर पुस्तकांना आपल्या धंद्याची हत्यारेच मानली. हरिभाऊ आपटेसुद्धा स्वत: भरपूर वाचन करीत असत अन् त्यातला उत्तमोत्तम भाग मित्रांना वाचून दाखवीत.

गोपाळ गणेश आगरकरांनी वाचनाला ज्ञानसंग्रह करण्याचे प्रधान साधन म्हटलं होतं ते उगाच नाही. तर एक थोर विचारवंत सॅम्युएल जॉन्सन यांच्या मते अविरत वाचन म्हणजे ज्ञानाचा पाया! आणि ज्ञान तर संस्कृतीची पाठराखण करणारा महत्त्वपूर्ण घटक.

२

बेकनच्या मते, 'वाचन हा एक अविस्मरणीय अनुभव असतो. कारण विचारपूर्वक वाचनाने आपले मन विशाल होते. त्यामुळेच तर जीवनाचं खरखुरं दर्शन घडतं. वाचनाने वाचकांच्या अंतरात विविधांगी चेतना निर्माण होते. वाचकांत आमूलाग्र बदल होतो. मोठी क्षितिजंही समोर येतात. आपल्या मनात सहानुभूतीचा अथांग थर दाटून येतो. सुसंस्कृत समाजाच्या जडणघडणीत वाचनाचा वाटा महत्त्वाचा आहे कारण व्यक्तीच्या जीवनाला विधायक वळण लावण्यास, बदलवण्यास वाचन कारणीभूत ठरते. परिणामी समाज आणि संस्कृतीची, वैचारिक श्रीमंतीची अभिवृद्धी होते.

३

सफदर हश्मींची वाचनसंस्कृतीचं वाचन अलौकिकत्व अधोरेखित करणारी ही कविता तर सर्वांनाच परिचित आहे -

''पुस्तकं सांगतात गोष्ट वाहून गेलेल्या दिवसांची,
युगायुगांची.
विश्वाची, माणसांची, आजची, कालची, उद्याची,
एका-एका क्षणाची.
झाड-हिरव्या पानांची सळसळ व्हावी अशा सुखाची.
निष्पर्ण फांदीच्या एकाकीपणासारख्या दु:खाची.
वाऱ्यावर डुलणाऱ्या रंगीत पुष्पाची,
युद्धात मायबाप हरपल्या बाळाची...
पुस्तकं काही सांगू इच्छितात.
तुमच्या सावलीत रांगू इच्छितात.
पुस्तकात पक्ष्याची चोच बोलते.
पुस्तकात हिरवंगार रान हलते.
... पुस्तकातल्या शब्दांना करुणेची झाक आहे.
सर्वे सन्तु निरामय: विज्ञानाची हाक आहे.
पुस्तकं म्हणजे वसुधैव कुटुंबकम्
आयुष्यपथावरचा नया कदम.
मग येणार ना तुम्ही या रस्त्यावर
(वाचनाच्या) चालण्यासाठी?
रस्त्यावर चालताना आपण दुकानावरच्या पाट्या वाचतो,
तेवढ्या सहज पुस्तकं वाचायची बस्स ...!
अहो, वाचायला तर लागा, म्हणजे पोहोचायला लागाल-
हव्या त्या ठिकाणी!! ...''

वाचनाने हे हव्या त्या ठिकाणी पोहोचायला लागणे वाचन संस्कृतीच्या आवश्यकतेकडेच अंगुलीनिर्देश करते. 'वसुधैव कुटुंबकम्'च्या माध्यमातून वाचन माहात्म्य वर्णन करणारी ही कविता ज्ञानेश्वर माउलींच्या पसायदानाला समांतर चालत वाचनसंस्कृतीचे भागधेय सुसंस्कृत समाजाच्या घडणीत कसे साध्याकडे नेते याचाच तर प्रत्यय देते.

वाचन आहे उ:शाप, दिशा हरपल्या तरुणांच्या परिस्थितीने शापित जीवनाचा. म्हणूनच तर पुस्तकांशिवाय घर हे खिडकीविना घर मानलं जातं. शिक्षणाने माणसे सुशिक्षित होतात तर जाणीवपूर्वक वाचनाने ती सुसंस्कृत होतात. 'इसम' न राहता जो 'माणूस' बनतो, तो वाचनसंस्कृतीत वाढल्यावर...

४

खाजगीकरण, व्यापारीकरण, जागतिकीकरण, चंगळवाद, अज्ञान, गरिबी, अंधश्रद्धा, दहशतवाद, भ्रष्टाचार, जातीयता, धर्मांधता, आर्थिक विषमता, उदारीकरण.... अशा सर्व पातळींवर चाललेला भ्रष्ट काळाबाजार... सामाजिक

अध:पतन हे सारे संस्कृती विनाशक, विदारक, विघातक घटक कमी व्हावेत म्हणून वाचनावर भर देणे गरजेचे आहे. सर्व वयोगटांसाठी वाचन हा मुक्त-मार्ग आवश्यक आहे. लोकशाहीच्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या मूल्यांची रुजवण बालपणापासून होण्यासाठी त्या त्या प्रकारचे वाचन मुलांकडून हेतूत: किती सुजाण पालक करून घेतात?

असे (सु) संस्कार बालमनावर घडवल्यास त्यांच्या आचार, विचार, प्रचार, संचारात विधायक बदल घडून ते चारित्र्यसंपन्न व्हायला मदतच होते. कुणीसं म्हटलं आहे -

''मदरसा है वतन अपना, दुनियासे हमें क्या लेना?
मरेंगे किताबोंकी ढेरपर, वर्ख होगा कफन अपना!''

ते किती सार्थ आहे. पुस्तकाच्या ढिगावर हा असा मृत्यूच संस्कृती वर्धिष्णु करतो! प्रत्येक गोष्टीमागे काही ठोस साध्य नियोजित असते, उद्देश असतो. वाचनाने तो वर्तनबदल घडून सुसंस्कृत व्यक्तीची, पर्यायाने समाजाची बांधणी-घडणी होते. सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. प्रयत्नपूर्वक प्रयत्नांनी सामाजिक बांधीलकी स्वीकारणाऱ्या जीवनमूल्यांची सुरक्षित/विधायक चौकट वाचनातून मांडता येते.

५

आज या ढासळत्या मूल्यांना दैनंदिन वैचारिक प्रदूषणातून वाचवणे हे केवळ संस्कारांवर अवलंबून आहे आणि संस्कार हे शिक्षणाबरोबरच वाचन या घटकाद्वारेच होऊ शकतात. माशांप्रमाणे पाण्यात नि पक्ष्यांप्रमाणे अंतराळात विहरणारा विज्ञानावर स्वार माणूस तरच 'माणसा'सारखा वागेल. वाचनाची ही संजीवनी अनेकांना उत्तम जीवन जगण्याचे बळ देऊ शकते.

किती आईवडील मुलांना महिन्याकाठी निदान एक मराठी वा अन्य भाषेतलं पुस्तक विकत घेऊन देतात आणि त्याची वाचनाची भूक भागवतात? हा वेगळा विषय असला तरी मुलांच्या निकोप, सुदृढ बौद्धिक वाढीसाठी त्यावर विचार होणे आज अगत्याचे ठरत आहे. निदान आपला मुलगा पाठ्य-पुस्तकां व्यतिरिक्त काही पुस्तकं ग्रंथालयातून आणून वाचतो का, याची जर चौकशी करायलाही आमच्याकडे सवड नसली तर मुलांची आवड कळणे ही गोष्ट दूरच. मुले काय वाचतात हेही बघणे आवश्यक आहे आणि असे होत नसेल तर आपल्या जागृत पालकत्वावरचं प्रश्नचिन्ह अटळ आहे.

६

किती आई वडील मुलांना महिन्याकाठी निदान एक मराठी वा अन्य भाषेतलं पुस्तक विकत घेऊन देतात आणि त्याची वाचनाची भूक भागवतात ? हा वेगळा विषय असला तरी मुलांच्या निकोप, सुदृढ बौद्धिक वाढीसाठी त्यावर विचार होणे आज अगत्याचे ठरत आहे. निदान आपली मुलं पाठ्यपुस्तकां व्यतिरिक्त काही पुस्तकं ग्रंथालयातून आणून वाचतात का, याची जर चौकशी करायलाही आमच्याकडे सवड नसली तर मुलांची आवड कळणे ही गोष्ट दूरच. मुले काय वाचतात हेही बघणे आवश्यक आहे. आणि असे होत नसेल तर आपल्या जागृत पालकत्वावरचं प्रश्नचिन्ह अटळ आहे.

७

मुलांना शहाणी करून सोडणारी, व्यवहारज्ञान शिकवणारी, कल्पक नि साहसी बनवणारी, त्यांचा वयोगट लक्षात घेऊन खास लिहिलेली संस्कारक्षम, स्वतंत्र वा उत्तमरित्या अनुवादित, मुलांचा बुद्ध्यांक वाढवणारी, वाचून झाल्यावर सुन्न नव्हे तर प्रसन्न करून काही आदर्श मनात बराच काळ रेंगाळायला भाग पाडणारी, विचारप्रवर्तक, अद्भुततेपेक्षा मनोरंजकशा वास्तवाकडे नेणारी, इतिहासातली सुवर्णपाने उलगडवणारी आणि देशाचा भूगोल सांगणारी, उद्याचा नागरिक घडवणारी, विज्ञानासह श्रमनिष्ठेलाही जपणारी... गुणी पुस्तकं सुदैवी मुलांच्या वाचनात बालपणी आली, तर विधायक मूल्यांच्या जपणुकीबरोबरच सुसंस्कृत समाजाची घडण दूर नाही.

डेव्हिड मॅक्लेलँड म्हणतात, 'ज्या देशात वास्तव अन् कार्यप्रवृत्त करणारं बालसाहित्य अधिक निर्माण झालं होतं वा केलं गेलं होतं त्या देशाच्या वीस वर्षांनी मोजलेल्या उत्पादकतेत फार मोठी वाढ झाली.'

पण उत्पादकतेबरोबरच संस्कृतीसंवर्धनही अपेक्षित असेल तर विज्ञाननिष्ठा, समाजाभिमुखता, समानता, मानवता आणि समरसता यांचा समावेश पुस्तकात लेखकाने जाणीवपूर्वक करणेही काळाची गरज ठरतेय. मुलांच्या सहजप्रवृत्तींना उदात्तीकरणाची ताकद पुरवते ते दूरगामी वाचनच! राजा, राणी, जादू, परी हे विषय कालबाह्य ठरवून अवकाश, विज्ञान, संगणक, यंत्रमानव, क्लोनिंग, परग्रह आदी विषयांना प्राधान्य देणारंही लेखन सध्या बालसाहित्यात सुरू आहे. हे चित्र आशादायी असलं तरी उद्याची पिढी मानवाकडे केवळ यंत्र म्हणूनच बघेल एवढी भावनाशुष्कता येऊनसुद्धा चालणार नाहीये. म्हणून मनाचा, भावनांचा विचार करणारं लेखनही आज तितकंच आवश्यक आहे. उद्याच्या

पिढीच्या अंतरात ओलावा निर्माण होणंही सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी आणि दृढ संस्कारांचा पुण्यपावन असा उजेड निर्माण होण्यासाठी गरजेचं आहे. पर्यायाने अशा अपेक्षा पूर्ण करणाऱ्या पुस्तकाचं वाचन होणं नव्या पिढीकडून अपेक्षित आहे... नाही तर 'काला-कौआ काट खायेगा...' सारखी अभद्र, निरस, निरर्थक गाणी या मुलांच्या ओठी असतील; मुले, समाज, संस्कृती सर्वांना ऱ्हासाकडे नेणारी....!

८

सामाजिक जाणिवा आणि संकेत यामध्ये लक्षणीय बदल होणाऱ्या वर्तमानात येणारं सामाजिक संक्रमण लक्षात घेता, केबल संस्कृती वाचनसंस्कृतीवर ताबा मिळवते आहे, असं चित्र आज सर्वत्र दिसू लागलं आहे. ज्ञान-मनोरंजनादी हेतू त्यामुळे साध्य होत असतीलही तरी मुलांची विचार करण्याची कुवत घटण्याचा धोकाही निर्माण झाला आहे.

९

'माणूस' घडविण्याच्या उद्योगात प्राचीन संस्कृतीतले आवश्यक ते जपण्याचा विवेक पुस्तके सदैव राखतात. त्यांचं वाचन अवघ्या समाजाचा स्तर उंचावते. वाचन हे माणूस घडवणारं केवळ संयंत्र न राहता ते याच उद्योगाचं जनित्र व्हावं. त्यामुळे कुणा एकट्या वाचकाचीच केवळ बौद्धिक उंची न वाढता सोबतच्या अज्ञानी, पीडित आणि शोषित समाजाचा संपूर्ण स्तर उंचावत जाईल. राष्ट्रउभारणीच्या कामी वाचनसंस्कृती म्हणूनच उपयुक्त ठरते. सामान्यांचा आत्मयज्ञ पेटण्याकामी, त्यांचे अश्रू पुसण्यास सामर्थ्य देण्याचं बळ देते ती वाचनसंस्कृती सुसंस्कृत समाज घडवते. वेळप्रसंगी जीवनातले क्षुद्रत्व दूर करून चांगुल पणावर बोट ठेवते. भले त्यात काही उणिवा असतील पण चुका नसतात.

१०

नामदेव, चोखा, सेना, गोरोबा, जनी, नरहरी ते ज्ञानेश्वर तुकाराम यांच्या अंतरीचा सामान्य जनांविषयीचा कळवळा... फुले, शाहू, आंबेडकर, भाऊराव ते साने गुरुजी, बहिणाबाई यांचं पोटतिडीकेनं आलेले प्रबोधन... गांधी, नेहरू, शिवाजी, आमटे ते दादोजी कोंडदेव या मंडळींचं ऐतिहासिक संचित.... न्यूटन, आइन्स्टाईन, रामन, बोस ते नारळीकर आदी शास्त्रज्ञाचं वैज्ञानिक सत्य... धौम्य, कण्व, द्रोण, गौतम, सांदीपनी ते परमहंस, सावित्रीबाई फुले या आद्य शिक्षकांचं वंद्य गुरुत्व... माडगूळकर, बोरकर, गडकरी, फडके, अत्रे, माडखोलकर, शेळके, कुसुमाग्रज ते महानोर, बापट, पाडगांवकर यांसारख्या सारस्वतांचं आनंददायी- प्रत्ययकारी लेखन... इत्यादी विविध विषयांचा समावेश असणारं सर्वांगसुंदर वाचनीय आदर्श संमेलन जेव्हा पुस्तक रूपानं अवतरतं तेव्हा तो आपल्या जीवनपेढीतील शिल्लक टाकण्याचा काळ असतो. या काळात विद्यार्थी जे भागधेय संचित करेल, जास्तीत जास्त वाचन करील त्याचा उपयोग त्याला उत्तर आयुष्यात सुजाण, संस्कारित मानव म्हणून जगताना निश्चित होईल. पुस्तके स्वत:बरोबरच इतरांसाठीसुद्धा जगण्याचं गुपित सांगतात... शिकवितात, स्पंज बनून ज्ञान स्वीकारायला- शोषायला शिकवितात, जीवनमूल्ये नि आचारसंहिता देतात, सत्प्रवृत्तीची शिदोरी देतात, वाणी तसेच वर्तनाचा मंत्र देतात, जन्मत:च तोडलेली नाळ समाजाशी अलगद जोडून देतात, नव्या संपन्न आयुष्याची सुंदर-निर्मळ पायवाट भेट देतात... अशी पुस्तके आदर्श मार्गदर्शक वा जिवलग मित्रांहून कमी नसतात...! कवी दत्ता हलसगीकरांच्या शब्दात -

'ज्यांची बाग फुलून आली
त्यांनी दोन फुलं द्यावी,
ज्यांचे सूर जुळून आले
त्यांनी दोन गाणी गावी...'

अशी भावना विचक्षण संवेदनशील 'वाचकाची' होते.

११

जगण्याचा अर्थ उलगडून सांगणारी पुस्तकं, आयुष्यात कसं जगावं, राहावं, प्रसंगी धीरानं उभं राहावं हे उलगडणारी बुकं, सत्यसुंदरशिव यांचा पाठपुरावा देणारी पोथ्या पुस्तकं, विवेक, विकास अन् विजय अशा त्रिसूत्रीचा तपशील पुरवणारी विवेचक बाडं, नीती-संस्कृती-संयम आणि विवेकाची शिकवण देणारे ग्रंथ... 'वाचन' संस्कृतीचे दीपस्तंभच आहेत!

रामायण, महाभारत, गीता, कुराण, बायबल, ग्रंथसाहेब हे धर्मग्रंथ वाचणाऱ्याला -

'मंदिर मस्जिद गिरिजाघरमें
बाट दिया भगवान को
धरती बाटी, सागर बाटा
मत बाटो इन्सान को....'

- असं सांगायची वेळ येत नाही. आयुष्य लढावं लागतं तेव्हा पुस्तकं वाट दाखवतात. शांततेच्या काळात कलांचा आस्वाद घ्यायला शिकवतात.

कथा, कादंबरी, काव्य, नाट्य, समीक्षा, चरित्र आदी

पुस्तकं अक्षरवाटेनं वाचकांच्या मनात उतरतात, हृदयाला हात घालतात, प्रश्नांना उत्तरं देत असतात. आत्म्यावरची धूळही प्रसंगी झाडतात. तुटलेली नाती/मनं जोडतात. शिणलेल्या मर्गळल्या मनाला तजेला देतात. दु:खावर फुंकर घालतात. प्रेमाचा वर्षाव करून चित्तवृत्ती प्रसन्न करीत रसिकत्व देतात. साकल्याचा प्रदेश विस्तारतात.

तुकयाची गाथा असो वा रामदासांचा दासबोध, कबीराचे दोहे असोत वा मीरेचे अभंग, नाथवाणी असो वा भागवत.... रवी ताकात जी फिरते ती लोणी काठावर आणते तशी ही पुस्तके (खरं तर जीवनग्रंथच) आयुष्याचा गहन अर्थ परिपाक म्हणून आपल्या हाती देतात. भावभावना विश्वात्मक करतात. विश्वबंधुत्वाची अमर संकल्पना साकारतात. म्हणूनच आपण ज्ञानदेवांना माउली म्हणून संबोधतो.

१२

केशवसूत, तांबे, बालकवी, यशवंत, अनिल, संत, सुर्वे आदींचे काव्य असो वा नेमाडे, यादव, जोग, पाटणकर, गाडगीळ, जाधव, वालंची समीक्षा असो, लोकहितवादी, आगरकर, चिपळूणकर, टिळक, परांजप्यांचे निबंध वा लेख असोत की सावरकर, कर्वे, सरदार, माटे, भावे, कुरुंदकर, बागूल नि ढसाळ, सुर्व्यांचं लेखन असो मराठी वाचकांचं मन तुडुंब भरून येते... नाटककार नाटकवेड्यांना संतुष्ट करतात तर मंगळवेढेकर, करंदीकर, ताम्हनकर, नाथमाधव, शेळके, थत्ते, मतकरी, भागवत, रेगे, परांजपे, भाजेकर नि निरंजन घाटे यांचं बालसाहित्य ईश्वराशी नातं जुळवावं तसं बालकांचं मनो/ज्ञानरंजन करतं.....

सूरदास, तुलसीदास, प्रेमचंद, अज्ञेय, सुमित्रानंदन, महादेवी, दिनकर, बच्चन, निराला, शेवडे, मैथिलीशरण, नीरज यांच्यापासून ते चंदबरदाई, अमीर खुसरो, जायसी पर्यंतच्या मंडळींनी हिंदी भाषेचं-आपलं दालन समृद्ध केलंय... साहित्य सृष्टीच्या पुस्तकांनी.....

डॉन क्विझोट, वॉर अँड पीस, इलियड, ओडिसी, पॅराडाइज लॉस्ट, दास कॅपिटल, हॅम्लेट, किंग लिअर, ऑथेल्लो सारख्या साहित्यकृती इंग्रजीत प्रसिद्ध आहेत... पुस्तक रूपानं...

सर्वच भाषाभगिनींची ही वाङ्मयीन अपत्ये, 'वाचेल तो वाचेल' असं मानणाऱ्या आणि 'मनाची मशागत वाचनानेच होते' - हे कबूल करणाऱ्या वाचकांसाठीच जन्मतात. त्याचा लाभ घेणारे या वाचनसंस्कृतीचे शिलेदारच सुसंस्कृत समाजाची जडणघडण करतात हे निर्विवाद सत्य आहे....!

१३

डॉ. प्रभाकर मांडे सरांच्या भाषेत -

''कुणी कितीही बुद्धिभेद केला
तरी आम्ही सांस्कृतिक धार कायम ठेवू
येवो कितीही आडवी काजळी
आम्ही बंधुभाव सतत जागाच ठेवू!''

- अशी ठाम भूमिका वाचनानेच तयार होऊ शकते. सांस्कृतिक पुनर्बांधणी जर वाचनसंस्कृतीची देणगी असेल तर ती हवीच आहे. सामाजिक समरसता निर्माण होण्यासाठीही त्याची गरज आहे. बंधुभाव हे त्याचं सुंदरसं फलित आहे. ज्यांनी रामानुजाचार्य, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, महात्मा बसवेश्वर, संत गाडगेबाबा, स्वा. वीर सावरकर, डॉ. हेडगेवार अशा समाजसुधारकांच्या विचारांची व चरित्रांची पुस्तकं वाचली असतील तेच लोक समाजप्रबोधन आणि परिवर्तनाचे हक्कदार ठरू शकतात. त्यामुळे विषमता, जातीयता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा आणि भेदाभेद यांचं उच्चाटन करणं सहज शक्य आहे. तरच आमच्या स्वातंत्र्याला अर्थ, लोकशाहीला न्याय मिळेल. अत्याचार, भ्रष्टाचार, आर्थिक असमानता दूर होऊन महात्मा गांधींसारख्या द्रष्ट्या महापुरुषांनी अपेक्षिलेल्या भारताची प्रतिमा साकार होऊ शकेल!.... हे सारं वाचनसंस्कृतीने समाजाच्या स्वास्थ्यासाठी फेडलेलं ऋण आहे जणू....

१४

'विश्व जालिया वन्ही, संत सुखे व्हावे पाणी' मुक्ताबाईंची ही प्रसिद्ध उक्ती आहे. 'कांदा-मुळा-भाजी, अवघी विठाई माझी' असं संत सावता माळी म्हणून गेले. लोभापाई कानूस झालेल्या माणसाला बहिणाबाई 'कधी व्हशील माणूस' असा व्याकूळ प्रश्न करतात... हे सर्व छापील अशा स्वरूपातलं वाचणारा वाचक, वाचनाचं अमृत लाभल्याच्या आनंदात दुर्दैवी विषमतेच्या विषापासून नक्कीच मुक्त होईल. आणि....

कवी यशवंत मनोहर माणसांसाठी 'ज्यांच्या गावात सूर्य नाही, त्यांच्या हातात उजेड देतो'.... अशी आरती करतात. नीळकंठ महाजन 'हा घोडा हे मैदान' या कवितासंग्रहात नगराध्यक्ष महाशयांना विचारतात, 'मला माणसापासून माणसापर्यंत अप-डाऊन करायची पास द्या.' तर पू. साने गुरुजी 'हातात हात घेऊन हृदयास हृदय जोडून, ऐक्याचा मंत्र जपून, या कार्य करायला हो....' असं आवाहन करतात... अशा असंख्य पुस्तकातल्या अनंत ओळींमधून मानवतेची फुंकर घातलेली दिसते तीच मुळी अनेकांचे जन्म सफल करणारी ठरते... असा आपुलकीचा गहिवर

वाचनाने वाहत असेल तर समाजाचं कल्याणच होणार. कुणी दुबळा राहणार नाही. असा निर्धारच सुसंस्कारित समाज घडवेल. मग या ओळी आठवतात...

'मी जगाचे ओठ झालो, बोलतो सारे खरे,
दु:खितांचे दु:ख माझ्या अक्षरातुन पाझरे...!' किंवा
'दिले प्रत्येक वस्तीला, आम्ही आकाश सोनेरी
जिथे जातो तिथे हाका, उषेच्या वाटतो आम्ही...!'

– असं मानव्याचं अमूर्त दर्शन, वाचनसंस्कृती घडवत असेल, जीवनाबद्दल सकारात्मक दृष्टी देत असेल, लंगड्याचा पाय, आंधळ्याची काठी होत असेल तर आयुष्याचं सार्थक झालं असंच म्हणावं लागेल. अंधारातील अनाथांच्या उशाशी जणू ते दिवा लावणंच ठरेल!

१५

आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री. श्री. रविशंकरजींच्या 'जीवन म्हणजे सुंदर उत्सव' या विधानातले जीवन अधिकाधिक सुंदर नि अर्थ /भावपूर्ण व्हावयाचे असेल तर पुस्तकापरायण व्हावे. आईबाप, गुरू, देव, धर्म, देश व राष्ट्र याबद्दलची श्रद्धा दृढ करण्याचं पुण्यकर्म पुस्तकंच तर करतात... आचारविचारातलं प्रदूषण दूर होण्यासाठी, न्यायप्रियता, वचनबद्धता, प्रामाणिकपणा, शीलसंपन्नता, त्याग, प्रेम, नि:स्पृहता, नैतिकता बाणवण्यास वाचनाचा सहभाग किती महत्त्वपूर्ण ते सांगायला का हवे? वाचनाने केवळ सुशिक्षित पिढी निर्माण न होता संस्कारित पिढी बनते हे महत्त्वाचे आहे.

१६

चंद्र, मंगळादी ग्रह-गोलांवर मालकी सांगण्याच्या काळात क्लोनच्या तंत्राने नवा 'माणूस' तयार होणाऱ्या, सायबरमॅन बनण्याच्या या युगातही आम्ही अमेरिकन टॉवर्समध्ये विमान घुसवतो. अफगाणात बुद्धपुतळा तोफेच्या गोळ्यांनी उडवतो. दलाई लामांच्या शब्दात –

'इमारतींची उंची वाढली पण माणुसकीची कमी झाली...
रस्ते रुंद झाले पण दृष्टी अरुंद झाली...
औषध भरपूर पण आरोग्य कमी झालं...
बाहेरचा परिसर आपण जिंकत चाललो, पण
आतल्या हरण्याचं काय?घरातल्या युद्धाचं काय..इ..इ..

– विषम वास्तवाला योग्य दिशा देणं केवळ वाचनाच्याच पर्यायाने पुस्तकांच्याच कृतार्थ हाती आहे. तरच कायापालट होईल अन् नवी पहाट उगवेल..संस्कारांची..संस्कृतीची... सहृदयतेची!

१७

आणि तरीही नव्या संदर्भानिशी वाचनसंस्कृतीच्या उद्देशाला समांतर इतरही अनेक कार्यक्रमांची रेलचेल आणि सांप्रतच्या काळात नव्या जगात नवनवे प्रयोग होताहेत. दिवाळी अंकांच्या सीडींपासून वेब संस्कृतीतलं लेखन-वाचन अमाप होताहेत. ब्लॉग वगैरेही समृद्ध होत आहेत.

प्रसारमाध्यमांची पुस्तकांवरची अतिक्रमणेही सुरू आहेत. वाचकांची अभिरुची खालावते की काय वाटायला लावणारी. स्टेशनवरची वेळकाढू हलकीपुलकी पुस्तकं चांगल्या विचारांचं ओझं (?) न लादणारी, प्रवासात लोक घेतात. अर्धवट वाचल्यानेही न बिघडवणारी आणि वृत्तपत्रे लगेच शिळी होणारी. साहित्याऐवजी केवळ तपशीलात नेणारी... लक्षात राहील असं काही न देणारी.

अलीकडे वाङ्मयीन नियतकालिकं, पुस्तकं, दिवाळी अंक यांची वाढती संख्या, रतीब घालणाऱ्या त्याच त्या कविता दर संमेलनात सादरकर्त्या ज्येष्ठ कवींसारखी, वाढत आहे हेही नाकारता येत नाही.... पुस्तकांची दुकानेच्या दुकाने विकत घेऊन पुस्तकं वाचायला लावणारी...

मात्र वाचकांची सकारात्मकता वर्धिष्णु व्हावी असं लेखन शब्दप्रभूंकडून व्हावं, असं चांगुलपणाकडे नेणारे हाती लागावं वाटतं. विचारी, सहिष्णु, संयमी माणूस बनवणारं.. वैचारिक प्रदूषणावर इलाज करणारं लेखन पुस्तकातून अपेक्षिणे करण्यात वावगं ठरू नये!

०००

● संदर्भ ग्रंथ

१. समरसता यात्रा विशेषांक (सामा. समरसता मंच देवगिरी प्रांत) १६.२.२००५

२. शिक्षक दिन चिंतनिका (शिक्षक सेवा ट्रस्ट : औरंगाबाद) ५.९.२००१

३. विकास मूल्यशिक्षण मार्गदर्शन व नोंदवही इ. १० वी

४. तुकारामाची काठी : पुरुषोत्तम पाटील, सुजय प्रकाशन, धुळे

अशोक सोनवणे, २७, 'नीलअंश', सहयोग कॉलनी
चोपडा जि. जळगाव-४२५१०७

*With Best Compliments From*



- **SHARES**
- **MUTUAL FUNDS**
- **INVESTMENTS**

**(S.E.B.I. REGD.)**

Since 1990

# SHARE SPOT

## DANTKALE & JAVALGEKAR ASSOCIATS

BSE/NSE On Line Trading

INVESTMENT CONSULTANT

**Office**

'Arth Vishwa', 190/A-1, Goldfinch Peth, Opp. Lokmangal Bank, Solapur -7.
Ph : (0217) 2622 476, 2628 101 to 2628 105
E-mail : vrj8899@yahoo.com
website : www.wimalandsons.com

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**श्री. गंगाधर प्र. कवठेकर**

अथश्री अपार्टमेंट, परांजपे स्कीम्स्, पिरंगुट रस्ता, पुणे
मो. : ९८८११२९३६२

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**APURVA / HARSH RALERASKAR**

7/2, Saheel Appartment,
U. WST. Bank colony, Karve Nagar, Navshyadri,
Pune - 411 052, Ph. : (020) 2544 0457

# वाचन नावाची एक अदृश्य संस्कृती

– अवधूत परळकर

*ज्या भाषेत मी जन्माला आलो*
*तिथेही अनाथ वाटते मला – ग्रेस*

दिवस अफवांचे आहेत. वाचनानं माणूस सुसंस्कृत होतो, त्याचं जीवन वैचारिक दृष्ट्या समृद्ध होतं अशा अफवा समाजात मोठ्या प्रमाणात पसरल्या आहेत. वैचारिक दृष्ट्या समृद्धी ही काय चीज आहे? माणसाचा सुसंस्कृतपणा नेमका कशात दडलेला आहे? वाचन म्हणजे तरी नेमकं कशाचं वाचन? माणसाला बदलून टाकायचं सामर्थ्य खरोखरच वाचनात आहे का? असे बरेच प्रश्न या संदर्भात निर्माण होतात. त्यांच्याशी न भिडता आपण आपलं घोकत राहतो की वाचनानं माणूस सुसंस्कृत होतो. ही आपली थोर परंपरा आहे. आपलं पूर्ण ज्ञान घोकंपट्टीवर बेतलेलं आहे.

तर ते असो. वाचन ही गोष्ट थोर आहे याबद्दल समाजात आज जवळजवळ एकमत आहे. पुस्तकं वाचणाऱ्यांप्रमाणे न वाचणारेही या मताचे आहेत. माझ्याबद्दल विचाराल तर मला स्वत:ला पुस्तकावाचून जगण्याची कल्पना सहन होत नाही. पण हा माझा व्यक्तिगत आवडी निवडीचा प्रश्न झाला. सर्वांनी आपल्या जीवनात पुस्तकाला इतकं महत्त्व द्यावं असं मला वाटत नाही. मी विशिष्ट आवडीनिवडी घेऊन जगतो; मला नृत्य आवडत असेल; वेगवेगळी वाद्यं वाजवायला आवडत असतील; घराच्या भिंतीला लाल रंग द्यावासा वाटत असेल तर तो माझ्या जीवनशैलीचा; माझ्या आनंदाचा प्रश्न झाला. इतरांनीही माझ्याच मानसिकतेनं, माझ्याच पद्धतीनं जगावं; मला सतार वाजवायला आवडते म्हणून त्यांनीही सतारी विकत घ्याव्यात आणि वाजवाव्यात असा आग्रह धरणं ठीक आहे का? या प्रश्नांची टोचणी सतत मला असते. मी माझ्या जीवनात पुस्तकांना, वाचनाला आणि त्यावरल्या चर्चांना सर्वोच्च स्थान देतो. म्हणून ते इतरांनी द्यावं असं मला वाटत नाही.

वाचनसंस्कृती लयाला चालली आहे म्हणून आसवं ढाळण्याचे प्रकार अलीकडे खूप चालतात. अगदी जाहीर व्यासपीठावरून आवंढा गिळत या प्रकाराचं बोलणं चालतं. गंमत अशी की या शोक-समारंभात पुस्तकं न वाचणारी मंडळीही सामील असतात. सुरक्षा रक्षकांच्या सभांना चोर-दरोडेखोरांनी व्यासपीठावर बसावं तसा हा प्रकार. ही मंडळी भोकाड पसरून जे बोलतात त्यात एक कॉमन मुद्दा असतो तो हा की टीव्हीनं आपल्या वाचनसंस्कृतीची वाट लावली. वाचनसंस्कृती लयाला जाण्याचं मुख्य कारण म्हणजे टी.व्ही., इंटरनेट ही आधुनिक माध्यमं आहेत असा जो या मंडळींचा दावा आहे तो तपासून पाहायला हवा. मला ही हाकाटी पटत नाही.

या माध्यमांचं आगमन झाल्यामुळे वाचनप्रेमिकांचं लक्ष काही प्रमाणात वाचनापासून विचलित झालं असेल, नाही असं नाही. पण त्याचा वाचनसंस्कृतीवर लक्षणीय परिणाम घडला असेल असं वाटत नाही.

माझं निरीक्षण महाराष्ट्रापुरतं मर्यादित असल्यानं तेवढ्यापुरतंच बोलूया. मी जो काही महाराष्ट्र पाहिला आहे त्या महाराष्ट्रात खूप मोठ्या प्रमाणात पुस्तकं वाचली जाताहेत; बसमध्ये, लोकलमध्ये वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा झडताहेत असा अनुभव मला तरी कधी आला नाही. इतिहासातही अशा प्रकारचे दाखले नाहीत. चार दशकांपूर्वीची स्थिती पाहू. जुने दिवस आठवले की मला आमचा वर्ग दिसायला लागतो. आमच्या वर्गात बेचाळीस मुलं होती. त्यात पुस्तकं वाचणारी मुलं होती सहा-सात. बाकीची मुलं शाळेनं लावलेल्या क्रमिक पुस्तकांखेरीज दुसरं काही हातात घ्यायची नाहीत. त्यातही कल मूळ क्रमिक पुस्तकापेक्षा सार रूपानं त्यातला आशय सांगणारी गाईड वाचण्याकडे. शाळेत छोटेखानी लायब्ररी होती. लायब्ररी म्हणजे लहानशी खोली आणि टेबलावर गोष्टीची पुस्तकं ठेवलेली तीन फूट लांबीची शेल्फ. आम्ही सहा सातजण मधल्या सुट्टीत लायब्ररीत जाऊन वाचत होतो. तिथून ये जा करणाऱ्या इतर विद्यार्थ्यांना आम्ही आत बसून काय वाचतोय याचं कुतूहल देखील नसायचं. काहींना अशा प्रकारची लायब्ररी आपल्या शाळेत आहे याचाही पत्ता नव्हता.

आम्ही शाळेत होतो तेव्हा टेलिव्हीजन नव्हता, कंप्युटरचा तर क देखील ठाऊक नव्हता. समाजात वाचन कमी व्हायची कारणं म्हणून आज या गोष्टी पुढं करणाऱ्या लोकांसाठी हे मी मुद्दाम सांगतो आहे. टी.व्ही.शून्य, इंटरनेटशून्य, ऑरकेस्ट्राशून्य असा हा कालखंड. अशा या कालखंडातील वाचनसंस्कृतीचं हे

असं भीषण चित्र. याबद्दल काय म्हणायचं? तेव्हाच्या या वाचनशून्यतेचं समर्थन करण्यासाठी कोणत्या सबबी पुढं करायच्या? शंभरात बारा विद्यार्थी वाचनप्रेमी. म्हणजे संपूर्ण देशात दहा-बारा टक्के लोकांच्या हातात पुस्तकं. या आकडेवारीतून निरक्षर समाजाला वगळलं आहे. सांगायचं हे की टीव्ही, कम्प्युटर, इंटरनेट या सबबी आहेत. आपली वाचनाविषयीची नावड किंवा आळस लपवायच्या सबबी.

अक्षरओळख असूनही अक्षरांशी वैर करण्याची वृत्ती समाजाच्या अंगी फार पूर्वीपासून भिनली आहे. टीव्ही, इंटरनेट यामुळे तिला काही प्रमाणात उत्तेजन मिळालं असेल, नाही असं नाही. म्हणजे पूर्वी ८५ टक्के लोक वाचनाच्या भानगडीत पडत नसत आता ९० टक्के लोक वाचनाच्या भानगडीत पडत नाहीत. वाचनाला भानगड शब्द वापरल्याबद्दल वाचन प्रेमिकांनी मला क्षमा करावी.

पण वाचन ही खरोखरंच एक विचित्र भानगड आहे. अनेकांना तर ती जगण्यातली अडगळ वाटते. नेमाडेंचे शब्द वापरून आपण तिला एक समृद्ध अडगळ म्हणूया.

आता दुसरं चित्र पाहू..... वाचक-लेखकांच्या दुनियातलं.

आमच्या कॉलेजच्या कालखंडात आमच्या मित्र परिवारात एक अवलिया होता. तो बऱ्यापैकी कवी होता. मात्र स्वत:ला तो चांगल्यापैकी कवी मानत असे. आम्हीही त्याला म्हणायचो तू आहेसच श्रेष्ठ कवी. कारण तो आमचा मित्र होता; आणि एवढा गर्व सोडला तर तो स्वभावानं चांगला होता. आयुष्यात त्यानं कामधंदा कधी केला नाही. घरचा शेठ होता असंही काही नाही. आमचे काही मित्र त्याला अधूनमधून पैसे द्यायचे. ते कमी पडले की तो आणखी मागून घ्यायचा आणि कमी पडायचेच. त्यामुळे कोणी भेटला की तो नेहमी पैशाचीच मागणी करायचा. त्याच्या अशा प्रकारच्या जिण्याची आम्हाला लाज वाटायची. पण त्याला कधी त्याची लाज वाटली नाही. ग्रंथसंग्रहालयाच्या दाराशी तो बसून असायचा आणि तिथं बसून खंडणी वसूल करावी तसा संग्रहालयात प्रवेश करणाऱ्या आमच्याकडून अधिकारानं पैसा गोळा करायचा.

एका कवीला जिवंत ठेवायसाठी ही खंडणी. तेव्हापासून माझ्या मनात प्रश्न घोटाळतो आहे. कवी जिवंत असणं ही समाजाची गरज आहे काय? किंवा त्याला जिवंत ठेवणं ही समाजाची जबाबदारी आहे का? आमचा मित्र म्हणायचा माझी कविता तुम्हाला महत्त्वाची वाटते का? कवी म्हणून मी तुम्हाला महत्त्वाचा वाटतो का? समाजाच्या सांस्कृतिक समृद्धीसाठी चांगले साहित्यिक, चांगले साहित्य समाजात असावं असं तुम्हाला वाटतं का ? तसं वाटत असेल तर तुम्ही माझ्यासारख्या कवीला जगवलं पाहिजे. ते तुमचं कर्तव्य ठरतं. आपल्या खिशातले पैसे देऊन जगवावं अशा योग्यतेचा आमचा हा मित्र होता की नव्हता हा वादाचा विषय आहे. पण त्यानं मांडलेला विचार स्वतंत्रपणे दखल घेण्याजोगा आहे.

साहित्यानं समाज समृद्ध होतो वगैरे बोलल जातं. साहित्य संमेलनात तर साहित्य हे मानवी जीवनाचं सर्वात श्रेष्ठ अंग असल्याचं सारखं बोललं जातं. संमेलनाची झिंग काही वेगळीच म्हणावी लागेल. साहित्याबद्दलचं फाजील प्रेम प्रदर्शित करायची ती जागा. पुस्तकं विकत न घेणारी माणसं देखील तिथं पालखीत ग्रंथ ठेवून दिंड्या काय काढतील; लेखकांच्या स्वाक्षऱ्या मिळवण्यासाठी धक्काबुक्की काय करतील, काही विचारू नका. हे सगळं पाहिलं की वाटतं – इतकं जर महत्त्व असेल साहित्याचं तर आमचा कवी मित्र आमच्याकडून जी अपेक्षा करतो ती विचारात घेतली पाहिजे. साहित्याची निर्मिती करणाऱ्या माणसांच्या जगण्याचा समाजानं नीट विचार केला पाहिजे. शेतकऱ्याला जगवणं हे जसं आपलं कर्तव्य तसं आपल्या मेंदूची मशागत करणाऱ्या माणसांना जगवायची जबाबदारी आपण घेतली पाहिजे. शेवटी साहित्यिकाच्या समृद्धीवरच साहित्याची समृद्धी अवलंबून नाही का ? मराठी जगवण्यासाठी मराठी पुस्तकं खरेदी करा असा प्रचार केला जातो. मराठीला जगवणं म्हणजे मराठी साहित्याला जगवणं आणि मराठी साहित्याला जगवणं म्हणजे मराठी साहित्यिकांना जगवणं हे ओघानं आलंच, नाही का?

म्हणजे पुस्तकं वाचण्यासाठीच पुस्तकं खरेदी केली पाहिजेत असं नाही. मराठी साहित्यिकांना जगवणं हाही पुस्तकं खरेदी करण्यामागचा हेतू असायला हवा. साहित्यिकांना किमान दर्जेदार जीवन जगता यावं यासाठी काहीतरी केलं पाहिजे. हे खरंच आहे की साहित्यनिर्मिती हा काही माणसाला रोजी-रोटी मिळवून देणारा व्यवसाय नव्हे. साहित्याला मिळणाऱ्या मानधनातून कुटुंब पोसता येईल अशी स्थिती मराठी भाषेत तरी अस्तित्वात नाही. शिवाय दोन वेळचं जेवण इतकीच काही माणसाची गरज नसते. साहित्यिकांनी तर इतर विविध अनुभव मिळवले पाहिजेत. सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध जीवन जगलं पाहिजे;

दूरवरचा प्रवास केला पाहिजे. थोडक्यात, साहित्यिकांना जगण्यासाठी आवश्यक अशा सुविधा उपलब्ध होतील हे पाहिलं पाहिजे. साहित्यिकांना धड जगता येत नसेल तर त्यांच्याकडून कसली डोंबलाची साहित्यनिर्मिती होणार? साहित्यिकांना जगणं मुश्कील झालं तर मग वाचनसंस्कृतीचं काय?

ज्यांना साहित्य ही जगण्यासाठी आवश्यक गोष्ट वाटते त्यांना असे प्रश्न पडायला पाहिजेत. पण डोक्यात असाही उलटा विचार येतो. जो या योजने विरोधात जातो तो म्हणजे साहित्यिकांना शक्यतो सुस्थितीत ठेवू नये. त्यांच्याकडून चांगलं साहित्य प्रसवण्यासाठी हे आवश्यक आहे. हलाखीत दिवस काढणाऱ्यांनी, कष्टमय जीवन जगणाऱ्यांनी अधिक उत्तम लिखाण केलं आहे असं एक सामाजिक निरीक्षण आहे.

असो. हे झालं साहित्य आणि साहित्यवाले, वाचणारे आणि लिहिणारे यांचं जग. या जगात वावरणाऱ्यांना कायम आपण म्हणजेच जग असे सारखे भास होत राहतात. शहामृगानं वाळूत तोंड खुपसावं तसे हे पुस्तकात तोंड खुपसून बसतात. बाहेरचं विशाल जगही ते पुस्तकाच्या पानातून समजून घेऊ पाहतात. वाचनसंस्कृती नावाची संज्ञा या मंडळींनी स्वत:ला प्रतिष्ठेचा दर्जा मिळण्यासाठी अस्तित्वात आणली की काय कोण जाणे. संस्कृती या संकल्पनेमागच्या मूळ आशयाचा मानवी जीवनातील मंगल, अमंगल, चांगलं-वाईट या मूल्यांशी संबंध जोडला जातो. वास्तवात संस्कृतीचा या गोष्टींशी संबंध नाही. मानवी समूहाच्या जगण्याच्या शैलीशी हा शब्द अधिक निगडित आहे.

वाचन नावाची संस्कृती या आधी कधीकाळी आपल्या देशात अस्तित्वात होती का असा प्रश्न विचारला तर उत्तर नकारात्मक येईल. प्राचीन काळी माहिती आणि ज्ञान इथं मौखिक परंपरेतून एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे सरकत राहायचं. ग्रंथातले श्लोक किंवा काव्यरचना घडाघडा पाठ म्हणता येणं ही ऋषी मुनींच्या काळातली ज्ञानाची संकल्पना होती. ब्राह्मणी संस्कृतीनं ज्ञानाची हीच परंपरा पुढं चालू ठेवली. मुलाला गीतेतले अध्याय मुखोद्गत करायला लावणं आणि आपला मुलगा किती हुशार आहे याचं प्रदर्शन करण्यासाठी पाहुण्यांसमोर त्याला एखादा अध्याय न अडखळता बोलायला लावणं यासारखे हास्यास्पद प्रकार आजही उच्चभ्रू समाजात चालतात. गीतेतल्या श्लोकाची जागा फारतर बा बा ब्लॅकशीपनं घेतली असेल. पण पाठांतर हीच हुशारी. पाहुणाही त्याच समाजाचा घटक असल्यानं मुलांच्या पाठांतरानं प्रभावित होऊन जातो. आज वारकरी संप्रदायही संतवाङ्मयाचं वाचन करण्याऐवजी संतांची शिकवण समजून घेण्यासाठी प्रवचनकारांना आपले गुरू बनवून मौखिक परंपरेचा आश्रय घेताना दिसतो. अगदी खेडोपाडीही जायला नको; आपल्या शहरातील आजची शिक्षणव्यवस्था विचारशक्तीपेक्षा पाठांतरावर  बेतली असल्याचं जगजाहीर आहे.

त्यातून बरेच घोटाळे जन्माला आले आहेत. आपल्याकडे वैज्ञानिक , भाषा पंडित तयार होतात ते सेमिनारमध्ये फाडफाड बोलण्यात बाकबगार असलेले. स्वतंत्र संशोधन हा प्रकार सर्वच क्षेत्रात अभावानं आढळतो. जी मोजकी मंडळी ते करताहेत त्यांच्याकडे शासनाचं, समाजाचं आणि माध्यमांचं सरसकट दुर्लक्ष आढळतं. वाचन नावाच्या संस्कृतीची मूळ बैठकच अशा भुसभुशीत पायावर झालेली.

काय वाचायचं ? कशासाठी वाचायचं याबद्दल कोणतीच निश्चित भूमिका नाही. वाचनानं विचारप्रक्रियेला चालना मिळायला हवी. प्रत्यक्षात वाचणाऱ्यांत वाचलेलं स्वीकारायची वृत्ती मोठ्या प्रमाणावर आढळते. आपल्या विचारांना दुजोरा देणारं वाचायची वृत्ती यातूनच बोकाळते.

कोणत्या प्रकारच्या वाचनाचा संबंध ज्ञानाशी आहे किंवा वाचनाचा ज्ञानाशी काय संबंध आहे--- माहिती गोळा करून तिची सुसूत्र मांडणी करणं म्हणजे ज्ञानविधान केलं असं मानायचं का याबद्दलही समाजात चांगल्यापैकी गोंधळ आढळतो.

खूप वाचणारी संशोधनाला वाहून घेणारी माणसं आपल्या समाजात आहेत. नाही असं नाही. पण त्यांचं बरचसं संशोधन देवदेवता, प्राचीन इतिहास, पुराणातली मिथकं यात रमणारं; समाजाला कौतुकही याच प्रकाराच्या संशोधनाचं. सर्वसाधारण नागरिकाला वर्तमानापेक्षा इतिहासाचा अभिमान. उज्ज्वल असतो तो इतिहास आणि भविष्यकाल अशी धारणा मनात पक्की बसलेली. संशोधक जुन्या मूल्यांचं नकळतपणे पुनरुज्जीवन करत राहतात. वाचन बव्हंशी चालतं ते पोथ्या पुराणाचं, इतिहासाचं. वर्तमानकालीन भकास, नैराश्यमय वातावरणामुळे भूतकाळाला कवटाळून बसण्याची ही वृत्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

समाज केवळ इतिहास वाचत राहील तर त्याला नवं काही दिसणं, समाजात नवे विचार रुजणं याची शक्यता मंदावत जाते. वाचणारा जो लहानसा समाज आहे त्याची अवस्था अशी असेल तर तो डोळ्यासमोर ठेवून, वाचनामुळे समाजाचं प्रबोधन होतं; समाज शहाणा होतो अशा वल्गना करणं म्हणजे आत्मवंचना



करून घेणं. वाचणारे समाजाला मार्गदर्शन करतात हे खरं मानलं तर अशा प्रकारच्या वाचनावर पोसलेले पंडित समाजाला काय प्रकारचं मार्गदर्शन करणार हा प्रश्न निर्माण होतो.

समाजाचं वाचन याच दिशेनं जाणार असेल तर समाजाचा एक मोठा घटक आज वाचन-बिचन करण्याच्या भानगडीत पडत नाही ही एक अर्थी चांगली गोष्ट नाही का ?

म्हणूनच समाज वाचतो हे महत्त्वाचं नाही तर तो काय वाचतो हे अधिक महत्त्वाचं.

पण अशा प्रकारच्या चिकित्सक वृत्तीचं अस्तित्व समाजात अभावानंच आढळतं. अगदी अलीकडली घटना.

यंदाच्या नाट्यसंमेलनात कोट्यवधी रुपयांची पुस्तकं संपली अशी सनसनाटी बातमी पेपरात झळकली. याचा संमेलनावाद्यांनी खूप गाजावाजा केला आणि संमेलन हा उत्सव नसून वाचनसंस्कृतीला हातभार लावणारा उपक्रम आहे याचा हा पुरावा म्हणून ते मिरवू लागले. पण संमेलनात कोणत्या प्रकारची पुस्तकं किती संपली याचा तपशील द्यायचं या मिरव्यांनी शिताफीनं टाळलं. संमलेनाच्या जत्रेत नेमकी कोणत्या प्रकारची पुस्तकं अधिक विकली जातात हे समजलं असतं तर मराठी वाचकांच्या वाङमयीन जातकुळीवर प्रकाश पडला असता. संमेलनाला कोणत्या पद्धतीचा वाचक जमतो हेही कळलं असतं.

योगविद्या, बायबलचं मराठी रुपांतर, वास्तुशास्त्र, चुंबकीय उपचारपद्धती या सारख्या पुस्तकांची आजकाल तडाखेबंद विक्री होते. वाचन या प्रकाराच्या वाट्याला न जाणाऱ्या

लोकांनाही ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा आपल्या घरच्या कपाटात असावी असं वाटतं. ज्यांच्या घरी रोजच्या टाइम्स ऑफ इंडिया ची घडी उलगडली जात नाही त्यांच्या घरी एनसायक्लोपेडिया ब्रिटानिकाचे सगळे व्हॉल्युम असतात. वाचनसंस्कृतीचा पूर्ण अभाव असणाऱ्या घरात संस्कृती-कोशाचे खंड असतात.

अर्थात अशी फसवी परिस्थिती असली तरी वाचनाचं वेड असणारा एक लहान वर्ग प्रत्येक समाजात असतो हे मान्य करावं लागेल. या वाचनवेड्यांपैकी बरेचसे अभ्यासक लेखक, समीक्षक असतात. शंभरात पाच इतकी या गटाची संख्या असली तरी त्यांच्यापैकी काही समाजाचं बौद्धिक नेतृत्व करताना दिसतात. वाचनसंस्कृतीच्या बाजूनं बोलायला हा चांगला मुद्दा आहे. पण हा मुद्दा पुढं आणणं म्हणजे समाजात वाचनसंस्कृतीचा अभाव असल्याचं मान्य केल्यासारखं होतं.

थोड्या लोकांनी वाचावं आणि इतरांनी त्यांच्या ओंजळीनं ज्ञानामृत प्यावं अशी स्थिती त्यातून निर्माण होते. स्पष्ट बोलायचं तर स्वातंत्र्यपूर्व काळापासून आपल्या देशात अशी व्यवस्था आहे. जेव्हा इंटरनेट नव्हतं तेव्हा तर अशा वाचनपंडितांना समाजात अनन्यसाधारण मूल्य होतं. यात काही राजकीय नेते, समाजसुधारक होते. सामाजिक बांधीलकी मानणारी ही माणसं होती. वाचन व्यासंगानं ते स्वत:चा वैचारिक विकास घडवत.

समाजाविषयी असलेल्या कळकळीपोटी ते आपल्या वाचनव्यासंगाचा वापर समाजाला शिक्षित करून सोडण्यासाठी करत. अशाप्रकारे दहा पंधरा लोकांनी संपादन केलेल्या ज्ञानाचं वाटप भाषण आणि ग्रंथलेखन या दोन्ही माध्यमांतून सर्वसाधारण जनतेत होत असे. सर्वांनी ग्रंथ वाचनाच्या मागे धावायची आवश्कताच नसे. समाजाचा वैचारिक विकास होण्यासाठी संपूर्ण समाजानं वाचन व्यासंग वाढवण्यावर भर दिला पाहिले असं काही नाही. उदाहरणार्थ: दास कॅपिटल ग्रंथ प्रत्येक कामगाराने वाचायची गरजच काय? त्यांच्या कॉम्रेड नेत्यांनी देखील तो पूर्णपणे कुठं वाचलेला असतो. त्यांनी त्यांच्या वरिष्ठांकडून तो समजून घेतलेला असतो.

वाचनप्रसार महत्त्वाचा. तो झाला की समाजप्रबोधन साधलं जाईल असा विचार या वातावरणात कधी कसा निर्माण झाला समजत नाही. पण लोकांनी ग्रंथवाचन करावं, आमच्या बोलण्यावर विसंबून राहू नये अशा विचाराचे काही प्रबोधनकार तेव्हाही असावेत.

पाश्चात्याकडले प्रगत तत्त्वज्ञान, प्रगत विचारधारा आपल्या देशात येऊन पोहोचल्या त्या वाचनप्रसारामुळे यात शंका नाही. भले त्या एका लहान समाज वर्तुळात मर्यादित राहोत. नेते आणि अनुयायी अशी एकूण समाजरचना असल्यानं हे वर्तुळही समाजप्रबोधनाच्या दृष्टीनं मोलाचं ठरलं. नेत्यांची मानसिक जडणघडण, वाचनाच्या आवडीनिवडी, बौद्धिक मर्यादा याचा परिणाम समाजाच्या मानसिक जडणघडणीवर होत गेला. आजही स्थिती वेगळी कुठे आहे. त्याकाळी प्रबोधनाचं काम मुख्यत्वे मौखिक परंपरेतून चालायचं. जाहीर सभा, भाषणं यावरच राजकीय पुढारी, समाजसुधारकांचा जोर असायचा. वृत्तपत्रातील मुलाखती-लेख यातूनही ते चालायचं. पण वाचनाची सवय नसलेल्या समाजात या साधनांचा कितीसा प्रभाव असणार? आज भाषण-प्रवचनाला उतरती कळा लागली असली तरी इलेक्ट्रॉनिक माध्यमं आपल्या परीनं हे काम करताहेत. आजचे प्रवचनकार टीव्हीवरून आपल्या बऱ्या-वाईट विचारांचा प्रसार करतात.

प्रवचनकार आणि भाविक अशी समाजिक विभागणी ज्या समाजानं स्वीकारली आहे तिथं आत्मप्रबोधनाचे व्यक्तिगत प्रयत्न अप्रस्तुत ठरतात.

व्यक्तिगत वाचन हे मानवाचा शैक्षणिक आणि आत्मिक विकास साधणारं प्रमुख साधन आहे हे मान्य करूनही स्वप्रबोधनासाठी व्यक्तिगत वाचन करायला हवं हा वाचन संस्कृतीवाल्यांचा मुद्दा यामुळे कमकुवत ठरतो.

आणखी बरीच नवी सत्यं आता नजरेसमोर येऊ लागली आहेत. फॉरवर्डसच्या रूपात प्रवचनकार आजकाल नेटवरही भेटत असतात. मजकूर कागदावर असो की संगणकाच्या पडद्यावर मुलं वाचताहेत ना, काहीतरी लिहिताहेत ना यावर समाधान मानणारा एक गट आहे. पण चाट, फेसबुकवरला मजकूर वाचला की या प्रभावी माध्यमांचा आपल्याकडे किती बालिश विनियोग चालला आहे हे जाणवते. माध्यम महत्त्वाचं नाही, अभिव्यक्ती महत्त्वाची हे सगळं खरं. पण अभिव्यक्ती थोडी वरच्या इयत्तेतली असली तर ते चांगले नाही का. माध्यमांनाही प्रतिष्ठा नाही का प्राप्त होणार.

संगणकपटावरलं आजचं वाङ्मय पाहिलं की वैचारिक आघाडीवरली आजच्या पिढीची पातळी कालच्यापेक्षा विदारक आहे हे सत्य अंगावर येतं. नवी माध्यमं ही नीटपणे वापरली तर पुस्तकांची जागा घेऊ शकतात हे सिद्ध करण्याची धडपड आता चालू आहे. आज ती आपल्याला केविलवाणी वाटत असली

तरी उद्या ती परिपक्व रूप धारण करण्याच्या सर्व शक्यता आहेत.

सार्वजनिक विचारप्रसारासाठी, समाजपरिवर्तनासाठी ग्रंथ वाचन हे माध्यम झपाट्यानं कालबाह्य ठरत चाललं आहे हे आपण रोजच्या रोज अनुभवतो आहोत. अशा स्थितीत वाचन हेच विचार प्रसाराचे परिणामकारक साधन हा हेका आपण किती काळ चालू ठेवणार?

वाचनसंस्कृतीच्या समर्थकांपाशी मग उरतो तो वाचनानंदाचा मुद्दा.

पुस्तकांचं वाचन हा थोर अनुभव असतो त्याची तुलना इतर कोणत्याही आनंदाशी होऊ शकणार नाही असा ग्रंथ-प्रेमींचा दावा आहे. मी स्वत: ग्रंथ-प्रेमी असल्यानं माझाही हा दावा आहे. मात्र या विधानाला शास्त्रीय आधार नाही हे अलीकडे माझ्या लक्षात येऊ लागलं आहे. कोणता आनंद श्रेष्ठ, कोणता कनिष्ठ याच्या काही मोजपट्ट्या नाहीत. आनंदाचं अस्सलपण आणि कम-अस्सलपण ठरवण्यासाठी कोणतीच शास्त्रीय कसोटी नाही. ग्रंथवाचन हा सर्वोत्तम आनंद का तर तो मला सर्वोतम वाटतो म्हणून. या पलीकडे त्याला आधार नाही. अगदी ज्ञानानंदात त्याची गणना केली तरी तो व्यक्तिगत म्हणावा लागेल. आनंद, दु:ख, वेदना, क्रोध या संवेदनांची केंद्रं मानवी मेंदूत असतात. आनंददायक गोष्टींचा जेव्हा आविष्कार घडतो तेव्हा मेंदूतलं विशिष्ट केंद्र प्रज्वलित होतं हे खरं आहे. पण मानवी मेंदूचा विशेष हा की तो उच्च प्रतीचा आनंद, तुलनेनं कमी प्रतीचा आनंद अशी आनंदाची प्रतवारी करत नाही. मला पुस्तक वाचनातून ज्या प्रतीचा आनंद मिळतो त्याच प्रतीचा आनंद एखाद्याला स्वीमिंग पुलात पोहताना मिळत असेल; दुसऱ्या एखाद्याला प्रस्तरारोहणामध्ये, किंवा फुटबॉल खेळण्यात मिळत असेल. आपला आनंद तेवढा श्रेष्ठ, इतरांचा कमी श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असं काही म्हणता येईल का? तरीही आपण म्हणतो ग्रंथ वाचनात जो आनंद आहे त्याची सर कशालाही नाही. अशा प्रकारची निरीक्षणं आपण आपल्या मनाला बरं वाटावं म्हणून खुशाल करावी पण ती अडाणीपणाची आहेत हे सत्य मनात बाळगावं. वाचनानं एवढं शहाणपणही येत नसेल तर सगळा वाचन-व्यासंग वायाच गेला म्हणायचा. आनंददायक अनुभव म्हणून वाचनाकडे पाहायला हरकत नाही. पण सर्वश्रेष्ठ आनंददायक अनुभव ?

वाचनानंदाचा मुद्दा अशाप्रकारे निकालात निघाला की वाचन-संस्कृतीवाल्यांपाशी आणखी एक मुद्दा शिल्लक राहतो. तो म्हणजे ज्ञानसंपादनाचा मुद्दा. व्यक्तिगत पातळीवर का होईना वाचन हे माणसाला सुसंस्कृत करून सोडणारं साधन आहे की नाही अशी या मंडळींकडून विचारणा होईल. याला ठाम उत्तर देता येईल... ते म्हणजे नाही. वाचन हे काम करते असं म्हणता येणार नाही. वाचन करणारे सुसंस्कृत, अधिक वाचन करणारे अधिक सुसंस्कृत हा विचार मान्य केला तर आपण तेवढे सुसंस्कृत बाकीचे निरक्षर असा वेडगळ निष्कर्ष निघतो. सर्वसामान्य चाकरमाने, वाचता येत असूनही फारसं काही न वाचणारे खेडूत, शेतकरी, शेतमजूर, गवंडी, आदिवासी हे सर्व असंस्कृत ठरतात.

ही वस्तुस्थिती आहे काय? स्वत:लाच प्रश्न विचारा. वाचन या शब्दाला 'संस्कृती' या शब्दाशी जोडण्यात आपली काहीतरी गफलत होते आहे असं आता वाटू लागलं आहे. वाचनाशिवाय जगणारे सर्व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकात आहेत असंही काही नाही. सचिन तेंडुलकर हा कवी आणि प्राध्यापक रमेश तेंडुलकर यांचा सुपुत्र. वाचन नावाच्या संस्कृतीचा त्याचा संबंध आहे काय? लता मंगेशकर सारखी दिग्गज गायिका वाचनाच्या भानगडीत कधी पडली असेल असं वाटत नाही. अर्थशास्त्रज्ञ, नामवंत डॉक्टर, सर्जन, नामवंत वकील, कुशल इंजिनिअर, संशोधक यांच्यापैकी अनेकांचं अवांतर वाचन यथातथाच असतं; म्हणून त्यांना अडाणी आणि असंस्कृत असं ठामपणे म्हणता येईल का ?

तथाकथित सुसंस्कृत वाचन-प्रेमींकडे नजर टाकली तर काय आढळतं याचाही विचार करू. प्रचंड वाचन असलेल्यांची यादी तयार केली तर त्यात असे कितीतरी सापडतील ज्यांच्या वर्तनाचा, जीवनपद्धतीचा आणि वाचन-व्यासंगाचा काही ताळमेळ बसत नाही. किंबहुना व्यवहारातलं त्यांचं वर्तन अनेकदा उबग असणारं असतं. वर्तनाचा विचार केला तर सर्वसामान्य माणसं परवडली इतके ते विचित्र वागतात. हेवेदावे त्यांच्यात असतात. अत्यंत असमंजस वृत्तीनं हे वाचनप्रेमी एकमेकांशी, मित्रपरिवाराशी आणि नातेवाईकांशी व्यवहार करताना आढळतात. पुस्तक वाचनानं माणूस प्रगल्भ होतो; अधिक संवेदनशील, सहृदय होतो असा आपला जो समज आहे तो ग्रंथ-प्रेमिकांच्या समीप दर्शनानं कोलमडून पडतो. वाचनशून्य लोक जितके गैरव्यवहार करतात तितकेच हे वाचनप्रेमी करतात.

जगात गुन्हे करणारे सर्व वाचनशून्य समाजातून आलेले असतात असं आजवरच्या कोणत्याही पाहणीत आढळून आलेलं नाही. वाचणाऱ्या समाजात कर्तव्यचुकार आणि स्वार्थी लोक आहेत, आज एक बोलायचं उद्या दुसरं अशा वृत्तीचे बेजबाबदार

आणि तत्त्वशून्य असे महाभाग आहेत; प्रागतिक विचारांची, बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंतांची पुस्तकं उशाशी घेऊन झोपणारे आणि प्रत्यक्ष व्यवहारात सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा पाळणारे वाचनप्रेमी मला भेटलेत. चांगल्यापैकी वाचनव्यासंग असणाऱ्यांत धर्मवेडे लोक आहेत; भोंदू बुवा महाराज आहेत, आर्थिक भ्रष्टाचार करणारेही आहेत. वाचनप्रेमीत स्त्रियांचा मानसिक, लैंगिक छळ करणारे आहेत, मित्राचा विश्वासघात करणारे आहेत.

थोडक्यात स्वच्छ व्यवहार, सद्वर्तन, विवेकबुद्धी याच्याशी वाचन या छंदाचं काही नातं नाही. सात्त्विक लेखनही माणसाला सात्त्विक बनवत नाही. परिवर्तनवादी लिखाण वाचकात अपेक्षित परिवर्तन घडवून आणत नाही.

खूप न वाचणारा आणि अजिबात न वाचणारा यात मूल्यात्मक भेद नसेल तर वाचनाशेजारी संस्कृती हा शब्द कशासाठी जोडत राहायचे. कॅरम खेळायला आवडणारे लोक आहेत तसे वाचायला आवडणारे लोक आहेत असं बोलू हवं तर. खरोखरीच हा इतका साधा मामला आहे तर कशाला वाचन या छंदाचं इतकं उदात्तीकरण करायचं?

वाचन आणि वाचनप्रेमी यांच्याविषयी समाजात ज्या अंधश्रद्धा पसरल्या आहेत त्या दूर होणं गरजेचं आहे. स्वत: वाचनवेडा माणूस असून मी हे लिहितोय. वाचनासारखी आनंददायी आणि अद्भुत गोष्ट नाही असं माझं व्यक्तिश: मत आहेच. मात्र आपल्या या व्यक्तिगत आवडीचा टेंभा मिरवावा असं मला कधी वाटलं नाही. वाचनाच्या वाटेला न जाणारे कितीतरी सज्जन माझ्या मित्रपरिवारात आहेत; आणि पुस्तकी किडा म्हणून ओळखले जाणारे कितीतरी अहंभावी आणि व्यवहारशून्य माझ्या ओळखीचे आहेत.

तेव्हा वाचन नावाचा छंद आपल्यात किती परिवर्तन घडवून आणतो; वाचन हे जीवन-व्यवहारात कितपत उपयुक्त भूमिका बजावते याविषयी माझ्या मनात संशय आहे.

नावाडी आणि पुस्तकी पंडिताची गोष्ट आपल्या सगळ्यांना ठाऊक आहे.

तू हे वाचलंस का; ते वाचलंस का म्हणून नावाड्याला विचारणारा आणि नसशील वाचलंस तर तुझं जीवन वाया गेलं म्हणून तुच्छतेनं नावाड्याकडे पाहणारा पुस्तकी-पंडित वादळात नाव बुडायला लागल्यावर घाबराघुबरा होतो आणि तुम्हाला पोहता येतं का? नसेल तर तुमचं जीवन वाया गेलं या नावाड्याच्या उद्गारानं गर्वगळीत होतो.

आपला वाचनाविषयीचा गर्व काही काळ बाजूला ठेवून माझ्या वाचनप्रेमी मित्रांनी आता पुस्तकातून डोकं वर काढून थोडं अवतीभवती पाहिलं पाहिजे. भोवताल वाचला पाहिजे. पुस्तकी विश्वाबाहेरही एक जग आहे आणि मानवी जीवन समृद्ध करून सोडणाऱ्या कितीतरी गोष्टी त्यात आहेत याचं भान सतत बाळगलं पाहिजे. या मंडळींना हे मुद्दामहून सांगायला पाहिजे. कारण कदाचित पुस्तकात त्यांना त्यासंबंधी एकही ओळ सापडणार नाही.

## अभिमान बेशिस्त वाचनाचा

पुस्तकवाचन हे एक वेडच आहे. नजीकच्या भविष्यकाळात पुस्तकवाचन कदाचित मनोविकारही मानला जाईल. या वेडाची लागण झालेल्या नागरिकांत लहान गट आहेत. काहींना कादंबऱ्या तेवढ्या वाचायला आवडतात. कथा वाचायच्या भानगडीत ते पडत नाहीत. काहींना फक्त चरित्रात्मक साहित्य वाचायला आवडते. कविता या वाङ्मय प्रकारावर मनापासून प्रेम करणारेही बरेच आहेत. माझ्यासारखे सगळे वाङमय प्रकार आवडणारेही आहेत. सर्व प्रकारचं साहित्य वाचायला मी धडपडत असतो. मजेत कसे जगावे, मन करा रे प्रसन्न, किंवा कोट्यधीश कसे बनावे या प्रकारची पुस्तकं मात्र मला आवडत नाहीत. तसंच रेकी, चुंबक उपचार यासारखी भंपक शास्त्रावरली, नर्मदा परिक्रमा या यासारखी अंधश्रद्धात्मक पुस्तके, यापासूनही मी स्वत:ला दूर ठेवतो.

माझं वाचन हा एकूण बेशिस्त प्रकार आहे. वाचनाला शिस्त असावी असं काल परवापर्यंत मला वाटत होतं. पण माझ्या बेशिस्त वाचनानं मला जे काही दिलंय त्याचा विचार केला तर आपल्या बेशिस्त वाचनाचा आपल्याला अभिमान वाटायला पाहिजे असं आता वाटू लागलं आहे. बेशिस्तिमुळे अफलातून विषयावरली विविध प्रकारची पुस्तकं वाचून झाली. काही अर्धीमुर्धी वाचून सोडून दिली; काही पुन्हा पुन्हा वाचून काढली. नमुन्यासाठी मला विशेष आवडलेली पुस्तकं देतो आहे. काही पुस्तकं आवडूनही स्मरणशक्ती तल्लख नसल्यानं त्यांची शीर्षकं आज आठवत नाही आहेत. त्यामुळे ती या यादीत समाविष्ट होऊ शकली नाहीत त्याबद्दल उदार मनानं आपण मला माफ करालच.

राजन खान यांना मध्यम फळीतले लेखक का म्हणतात

मला ठाऊक नाही. त्यांचा लिखाणाचा वेग अद्‌भुत आहे. साधारणत: भाराभर लिहिणाऱ्या लेखकांच्या लेखनाचा दर्जा चांगला नसतो. राजन खान या नियमाला अपवाद आहेत. सत ना गत..., आणि अगदी अलीकडची... रस अनौरस... ही दोनच पुस्तकं त्यांचं लेखन किती अव्वल दर्जाचं आहे हे सांगायला पुरेशी आहेत. उदकाची आर्ती... आणि झेन गार्डन... पासून मी मिलिंद बोकील यांच्या लेखनाकडे आकर्षित झालो. त्यांच्या प्रत्येक नव्या निर्मितीवर माझी नजर असते. समुद्र... ही त्यांची लहानशी कादंबरी, माझ्या मित्रांनी त्यातले काही गंभीर दोष दाखवूनही मला आवडली. ती वाचताना एखादा बंगाली चित्रपट पाहात असल्याचा भास मला झाला. एकम... चं कलात्मक यश तर वादातीत आहे. उदय निगुडकरांचं लोकल ग्लोबल हे प्रत्येक तरुणांनी वाचलं पाहिजे असं पुस्तक आहे. पुस्तकातल्या मुद्यांबाबत मतभेद असूनही मला ते आवडलं. मुद्यांबाबत मतभेद असूनही आवडलेलं दुसरं पुस्तक म्हणजे भानू काळेंचं अंतरीचे धावे. लेखकाच्या समग्रतेचा त्यात जो प्रत्यय येतो तो थक्क करून सोडणारा आहे. अत्यंत शांत, संयमित मांडणीमुळे हे पुस्तक वाचणं हा एक समृद्ध अनुभव बनून जातो.

डॉ. वि. ना. श्रीखंडेंचं आणि दोन हात आणि सिद्धार्थ पारधेंचं कॉलनी या दोन्ही पुस्तकात महत्वाचं साम्य म्हणजे त्यातल्या अनुभव कथनात थोडीही साहित्यिकगिरी नाही. दोघेही त्या अर्थानं साहित्यिक नाहीत. असाहित्यिकी माणसांना साहित्यिकी भाषा वापरून आपणही साहित्यिकांप्रमाणे लिहू शकतो हे दाखवायची जबर हौस असते. हे दोघे याला अपवाद निघाले. श्रीखंडे, पारधे दोघेही भिन्न सामाजिक थरांतले असले तरी प्रांजळपणात एकमेकांशी स्पर्धा करणारे. डॉ. श्रीखंडेंच्या पुस्तकात त्यांच्या वैद्यकीय व्यवसायातले अनुभव आहेत. पण त्या निमित्तानं त्यांनी पाहिलेलं वैद्यकीय जग आपल्यासमोर उभं राहतं आणि या व्यवसायातले अंतर्गत तपशील आणि ताण तणाव आपल्यासमोर येत राहतात. तळागाळातला कष्टकरी तरुण मध्यमवर्गीय शेजाऱ्यांच्या साहाय्यानं गर्तेतून वर कसा येतो याचं मनमोकळं चित्रण पारधेंच्या पुस्तकात सापडतं.

सिनेमा विषयावरली चार पाच दर्जेदार पुस्तकं मध्यंतरी वाचनात आली. रवींद्र जोशींचं 'माझी चित्तरकथा,' गणेश मतकरींचं 'फिल्ममेकर्स,' विजय पाडळकरांचं 'सिनेमाचे जादूगार,' राणी दुर्वेचं 'शब्देविण संवादु,' यशवंत राजंणकरांचं 'वॉल्ट डिस्ने' या सर्वांचं वाचन हा एक प्रगल्भ अनुभव ठरला. रवींद्र जोशी हे बांधकाम व्यवसायातले नावाजलेले. त्यांनी काही वर्षांपूर्वी दोन मराठी चित्रपटांची निर्मिती केली. या निर्मितीचा अनुभव त्यांनी इतक्या बहारदारपणे वाचकांसमोर मांडलाय की हे पुस्तक सहज चाळायला घेतलं तरी वाचक संपूर्ण वाचल्याशिवाय खाली ठेवणार नाही. वास्तविक या क्षेत्रातले जोशींचे अनुभव विदारक आहेत; पण ते त्यांनी हसत खेळत आपल्यापुढं पारदर्शीपणे मांडले आहेत. 'एक आंधळा आणि दहा हत्ती'.. हे जोशींचं अगदी अलीकडील पुस्तकही विलक्षण वाचनीय आहे. पाडळकरांच्या पुस्तकात जगातल्या अभिजात चित्रपटाचं रसग्रहण आहे. फिल्म सोसायटीच्या प्रेक्षकांना ते कदाचित पृष्ठस्पर्शी वाटेल. त्यांच्यासाठी ते नाहीच आहे. देशाबाहेरील सिनेमांच्या वाट्याला न गेलेल्या वाचकांसाठी ते आहे. पाडळकरांनी पेश केलेला अभिजात कलाकृतींचा.... सिनेमायाचे जादूगार हा रसास्वाद या सर्वसामान्य प्रेक्षकांचे परदेशी सिनेमाबद्दलचे कुतूहल वाढवेल; त्यांची सिनेसाक्षरता वाढवायला मदत करेल. गणेश मतकरींचं पुस्तक मात्र सिनेमाचा गंभीर आणि खोलवर अभ्यास करू इच्छि णाऱ्यांनाच अधिक भावेल. सिनेमाच्या वैचारिक अंगाबरोबरच सिनेतंत्राचा विचार करणाऱ्या गणेश मतकरी यांच्या आगामी लेखन प्रकल्पांकडे मी उत्सुकतेनं पाहतो आहे.

रूढ अर्थानं साहित्यिक जमातीत न मोडणाऱ्या अनेकांनी आणि त्यांच्या लेखन कौशल्यानं मला चकित केलं आहे. अशा पुस्तकांच्या मी कायम शोधात असतो. वसंत आबाजी डहाकेंच्या साहित्यकृती इतकाच डहाके यांच्या विचारसरणीचा मी चाहता आहे. 'आपले वाङ्‌मयवृत्त' नियतकालिकात त्यांनी केलेलं लिखाण..'मालटेकडीवरून' या नावानं आता पुस्तकरुपात प्रसिद्ध झालं आहे आणि आता माझं एक आवडतं पुस्तक बनून गेलं आहे. 'चाळेगत' हे माझ्या दुसऱ्या एका आवडत्या कवीचं कादंबरी लेखन. 'चाळेगत'च्या अभिनव शैलीमुळे अनेकांना चक्रावल्या सारखं झालं तर नवल नाही. मला ते नेमकं त्याच्या मांडणीतल्या या प्रयोगामुळेच अनोखं वाटलं आणि अनोख्या पुस्तकांची मला पहिल्यापासून ओढ आहे. कादंबरीकार प्रवीण दशरथ बांदेकर यांच्या पिढीचा वैचारिक गोंधळ त्यांनी अंगीकारलेल्या शैलीमुळे अधिक परिणामकारक झाला आहे.

डॉ. श्रीराम लागूंच्या 'लमाण' कडून खूप अपेक्षा होत्या. 'लमाण' चा सुरुवातीचा भाग लक्षवेधक वाटला पण नंतरचं सर्व

डॉक्टरांनी हातचं राखून लिहिल्याप्रमाणे वाटलं. तरी पण वडील पिढीचं सुबुद्ध चित्रण म्हणून 'लमाण'कडे पाहायला पाहिजे. 'शोधयात्रा' या पुस्तकामुळे राजा शिरगुप्पे नावाचा मनमोकळा लेखक आवडत्या लेखकांच्या यादीत जाऊन बसला.

कविता महाजन ही आजची बहुचर्चित लेखिका. तिच्या कादंबरी क्षेत्रातल्या पदार्पणालाच भरघोस दाद मिळाली. पण दोन कादंबऱ्या नंतरचे तीन काव्यसंग्रह आणि ग्राफीटी वॉल हे ललित लेखाचं पुस्तक या तिच्या साहित्यनिर्मिती असाधारण तुलनेनं दुर्लक्षित राहिल्या. ही तिन्ही पुस्तकं मराठीतली अजोड पुस्तकं आहेत. खास करून 'ग्राफीटी वॉल'मधलं चिंतन कविताच लिहू जाणे या शैलीतलं आहे. उत्तम वैचारिक बैठक या लेखिकेपाशी आहे याचा प्रत्यय तिची ही पुस्तकं वाचताना आला.

वाचकप्रियता आणि पुस्तकाची गुणवत्ता या दोन गोष्टी भिन्न आहेत याचा अनुभव मराठी साहित्याच्या दुनियेतनं फेरफटका मारताना अनेकदा येतो. ....अफवा खरी ठरावी म्हणून.... हे प्रज्ञा दया पवारचं नवं पुस्तक तिच्या एकूण साहित्याला वेगळं वळण देणारं; तिच्याविषयी नव्या अपेक्षा निर्माण करणारं पुस्तक आहे. समस्या अशी की कादंबरीच्या गुणवत्तेबद्दल सहज ठाम विधान करता येतं तसं कथासंग्रहाबद्दल करता येत नाही. कारण संग्रहातल्या कथांच्या दर्जात बऱ्याचदा चढउतार असतो. प्रज्ञाच्या कथासंग्रहाबद्दल हेच झालं आहे. पण कथांच्या आशयावर आणि मांडणीवर प्रयोग करण्याचा तिचा हा पहिलाच प्रयत्न आवर्जून कौतुकाचा असा आहे. माझा जुना मित्र सतीश तांबे आता कथाकार म्हणून चांगला स्थिरावला आहे. .....राज्य राणीचं होतं.... मधूनच त्यानं आपली लेखणी आणि आपली साहित्यिक नजर वेगळी असल्याचं सूचित केलं होतं. मला आकर्षून घेणारा पुरेसा चक्रमपणा जोवर त्याच्या लेखनशैलीत आहे तोवर मी त्याची पुस्तकं प्रेमानं वाचत राहीन. ....विचारक्षितिजे..... लिहिणारे दीपक घारे हे गेली दहा वर्षे साहित्य आणि कला अशा दोन्ही क्षेत्रांतले माझे शिक्षक बनून गेले आहेत. खास करून कलेच्या विश्वातल्या विविध तत्त्वज्ञानांचा आणि शैलींचा परिचय माझ्यासारख्या वाचकाला करून द्यायचं काम निष्ठेनं करत आहेत. चित्रकला या कलाशाखेचं सुप्त आकर्षण असल्यानं ते माझे आवडते लेखक आहेत. त्यांचं नवं पुस्तक बाजारात आलं आणि मी वाचलं नाही असं आजवर झालेलं नाही.

'खेकसत म्हणणे आय लव्ह यू', 'उत्सुकतेनं मी झोपलो' या कादंबऱ्या लिहिणाऱ्या श्याम मनोहर यांच्या खट्याळ लेखनाच्या मी प्रेमात आहे. इतरांनी कितीही नावं ठेवली तरी त्यांची प्रत्येक कलाकृती मला खूप तात्त्विक आनंद देऊन गेली आहे.

जे श्याम मनोहरांच्या बाबतीत तेच नेमाडेंच्या बाबतीत. भालचंद्र नेमाडेंची 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' मी गेले कित्येक दिवस वाचतो आहे आणि मला ती न आवडणं कठीण आहे. वाचकांचे पूर्वद्वेषी दृष्टिकोन असतात तसे काही लेखकांच्या आणि त्यांच्या लेखनाबाबतीत माझे पूर्वप्रेमी दृष्टिकोन असतात.

गेली काही वर्षे इतर प्रादेशिक भाषांतील साहित्याचे मराठी अनुवाद धडाक्यात प्रकाशित होताहेत. पण चांगला अनुवाद वाचायला मिळणं ही दुर्लभ गोष्ट आहे. जयप्रकाश सावंतांकडे मी आदर्श अनुवादकार म्हणून बघतो. उदय प्रकाश या ग्रेट हिंदी लेखकाचा परिचय त्यांनी मला करून दिला त्याबद्दल मी त्यांच्या ऋणात आहे. ते नवनवीन असं जे काही भाषांतरित करताहेत ते ते वाचायची माझी धडपड चालू असते.

या खेरीज अनुवाद क्षेत्रात बलवंत जेऊरकर, चंद्रकांत पाटील, गणेश विसपुते या मंडळींनी चालवलेले सर्व प्रयत्नही मला मोलाचे आणि दाद देण्याजोगे वाटतात. विशेष म्हणजे अनुवादासाठी त्यांनी निवडलेल्या साहित्यकृती त्यांचा चोखंदळपणा दाखवून देतात.

कविता महाजनच्या संपादनाखाली मनोविकास प्रकाशनानं देशभरातलं लक्षणीय स्त्री साहित्य प्रकाशित करण्याचा जो उपक्रम चालवला आहे, तोही थोर आहे. अत्यंत अनोखं असं साहित्यविश्व त्यातून आपल्यासमोर उलगडत राहतं.

नंदा खरे यांचं उत्क्रांतीवरलं पुस्तक आणि आनंद जोशी, सुबोध जावडेकरांचं 'मेंदुतला माणूस' हे मेंदु विज्ञानावरलं पुस्तक ही दोन्ही सामान्य वाचकांचे मानसिक बदल घडवून आणायचं सामर्थ्य असलेली पुस्तकं आहेत. 'किमयागार' हे अच्युत गोडबोलेंचं पुस्तकही हा परिणाम साधतं. दुसऱ्या एका पुस्तकाचा माझ्या मनावरला परिणाम कधीच पुसला जाणार नाही. हे पुस्तक म्हणजे विलास सारंगांचं 'सर्जनशोध आणि लिहिता लेखक'. नव्या पिढीतल्या वाचकांना विलास सारंगांच्या वैचारिक उंचीची कल्पना येण्यासाठी त्यांच्या हाती हे पुस्तक द्यावं अशी मी शिफारस करीन. ज्ञानेश्वर मुळेंचं 'नोकरशाहीचे रंग' हे पुस्तकही नव्या पिढीनं आवर्जून वाचायला पाहिजे. अधलंमधलं कोणतंही पान उघडून चाळावं असं हे पुस्तक आहे.

वेश्यांचं जग वाचलं, पाहिलं असूनही प्रतिमा जोशींचा

'जहन्नम' हा कथासंग्रह त्यातल्या रोखठोक मांडणीनं वाचकाच्या अंगावर येतो. सुन्न करून सोडणाऱ्या या अनुभवातून बाहेर पडणं मला कठीण झालं आहे. आवडतं पुस्तक पुन्हा एकवार वाचून काढायची माझी सवय आहे. पण 'जहन्नम' पुन्हा वाचायचं धाडस माझ्याच्यानं होत नाही.--आपले विचारविश्व --हा ग्रंथ लिहून के. रं. शिरवाडकर यांनी समस्त मराठी वाचकांवर अनंत उपकार केले आहेत. जगभराचे तत्त्वज्ञ या ग्रंथाच्या निमित्तानं माझ्या घरी मुक्कामाला आले आहेत.

शिरवाडकरांच्या भाषेतल्या सोपेपणामुळं आणि सरळपणामुळं हा ग्रंथ रिडर्स फ्रेण्डली बनला आहे. जगभरातलं तत्त्वज्ञान अशा पद्धतीनं मराठीत येणं आत्यंतिक गरजेचं होतं. दीर्घकाळ उलटसुलट चर्चा झडत राहावी असे विषय आणि आशय घेऊन आलेली काही आगळीवेगळी पुस्तकं असतात--सर आणि मी:-- हे ज्योत्स्ना संभाजी कदम याचं पुस्तक या प्रकारात मोडणारं आहे. वाचता वाचता आपल्या मनातच या चर्चेला सुरुवात होते. चिंतनाला उद्युक्त करणारी पुस्तकं लिहिली जाणं, आणि ती आपल्या वाचनात येणं हा वैचारिक आनंदाचा भाग आहे असं मी मानतो. खरं सांगायचं तर वर उल्लेखलेल्या कितीतरी पुस्तकांनी या स्वरूपाचा आनंद मला कमी जास्त प्रमाणात दिला आहे. एरवी मी त्याचा इथं उल्लेख केलाच नसता. जागेअभावी मनावर विशेष प्रभाव टाकणाऱ्या सर्व साहित्यकृतींची नोंद इथं घेता येणार नाही पण त्यांचा धावता उल्लेख केल्यावाचून राहावत नाही. उल्लेख धावता असला तरी आधी उल्लेखलेल्या पुस्तकांपेक्षा ही पुस्तकं कोणत्याही दृष्टीनं गौण नाहीत हे वाचकांनी समजून घ्यावं.

वाद्यवेध आणि भारतीय संगीताची मूलतत्त्वे ---भास्कर चंदावरकर/अर्थात---अच्युत गोडबोले/आलेख विश्वसंस्कृतीचा---आशा दामले/आहे कॉर्पोरेट तरी ---संजय जोशी/भारतीय रेल्वे: द टर्न अराऊंड स्टोरी---विवेक खरे/अल्पसंख्य---विजय पाडळकर/रानगंधाचे गारूड---संपादन प्रकाश होळकर/सर आणि मी: ज्योत्स्ना संभाजी कदम/अगस्तीचे अंगण---संपादन: विलास खोले, रेखा इनामदार साने/तेंडुलकर असेही...तसेही---संपादन: मुकुंद टाकसाळे/धर्मवादळ---निळू दामले/बुद्धिबळ आणि झब्बू ---चं.प्र. देशपांडे/भर चौकातील अरण्यरुदन--- रंगनाथ पठारे/तहान--सदानंद देशमुख/जाता नाही जात---सिद्धार्थ कांबळे/किंबहूना----रवींद्र किंबहूने/आवाज नष्ट होत नाही----गणेश विसपुते/वाद्यवेध---भास्कर चंदावरकर/प्रकाशवाटा---डॉ. प्रकाश आमटे/दिक्‌काल---चंद्रकांत पाटील/जगणं वेचताना----मुक्ता मनोहर/अनुभवाच्या आकाशात चंद्र----लीलाधर जगुडी. अनुवाद: कविता महाजन/स्त्री माझ्या आत--- पवनकुमार, अनुवाद: बलवंत जेऊरकर/रेषालेखक: वसंत सरवटे--- मधुकर धर्मापुरीकर, दिलीप माजगावकर.

ही यादी अर्थातच सर्वसमावेशक नाही. वाचलेली आणि आवडलेली पुस्तकं आणखी बरीच आहेत. मात्र आवडण्याजोगी पण काही कारणामुळं वाचायची राहून गेलेली चांगली पुस्तकं त्याहून अधिक आहेत याची खेदजनक कबुली मला इथं द्यायला पाहिजे.

० ० ०

अवधूत परळकर
रोझ ब्लॉसम बी १२, सितलादेवी मंदिर मार्ग, माहीम,
मुंबई ४०० ०१६ भ्र. ध्व. ९९८७०१६६५८
ई-मेल aedhooot@rediffmail.com

***With Best Compliments from***

# Ashok K. Patil

Vasant Tara, Kothrud
Pune

*With Best Compliments From*





**Vishal Bansal**
Ph. 2651402


Shree
**Siddheswar**
MARBLE UDYOG

**For Best Quality Marble, Granite, Kota, Kadappa, Tandur & Other Stones, Ceramic Wall & Floor Tiles**

159, M. I. D. C., Akkalkot Road, Solapur.








# पुस्तकांच्या गुरुत्वाकर्षणाचे अनुभव

– निखिलेश चित्रे

वाचणं ही माझ्यासाठी अगदी श्वास घेण्याइतकी सहज आणि आपोआप घडणारी क्रिया आहे. पद्धतशीर आणि शिस्तबद्ध वाचनाचे फायदे मला ठाऊक आहेत. पण माझं वाचन कायमच बेशिस्त आणि आडवंतिडवं होत आलेलं आहे. त्याला शिस्त लावण्याचे माझे निकराचे प्रयत्न सुरू आहेत, पण ते प्रत्येक वेळी फसतात असा अनुभव आहे. उदाहरणार्थ, आता मला नॅटोलॉजी म्हणजे निवेदनशास्त्रावर काही वाचायचं आहे, म्हणून मी रोलां बार्थचं पुस्तक वाचायला घेतो. ते वाचून होतं. पण त्यात उल्लेखलेल्या कादंबऱ्या डोक्यात शिरून बसतात आणि मग मी नॅरॅटोलॉजीवरचं दुसरं पुस्तक वाचण्याऐवजी फ्लोबेरची 'सेंटिमेंटल एज्युकेशन' ही कादंबरी वाचायला सुरुवात करतो. मग ती वाचताना फ्लोबेरची पत्रं वाचावीशी वाटतात म्हणून ती वाचतो. ती वाचता वाचता मध्येच 'पॉल व्हॅलरी'च्या 'नोट बुक्स'चे देखणे खंड खुणावतात म्हणून त्यात घुसतो. तेवढ्यात एखादी नव्या दमाच्या मराठी लेखकाची बाजारात आलेली कादंबरी हाती येते, त्यात बुडून जातो. अशी पाच-सहा पुस्तकं समांतर वाचत वाचत पूर्ण करणं ही माझी सवय. अर्थात या सवयीचे फायदे-तोटे दोन्ही आहेत. पण सवयी काही सहज सुटत नसतात. सुदैवानं विकत घेतलेली पुस्तकं आणि वाचलेली पुस्तकं यांचं प्रमाण मी अजून तरी पन्नास-पन्नास टक्के राखलेलं आहे. काही जणांच्या बाबतीत हे प्रमाण वीस : ऐंशी असं होताना मी पाहतो. म्हणजे शंभर पुस्तकं विकत घेतली तर त्यातली वीसच वाचून होतात, ऐंशी वाचल्याविना राहतात.

प्रत्येक पुस्तकाचं स्वत:चं असं गुरुत्वाकर्षण असतं. वाचकानं त्याच्या गुरुत्वाकर्षण कक्षेत प्रवेश केल्यावर ते पुस्तक त्याला स्वत:कडे ओढायला सुरुवात करतं. एखाद्या पुस्तकाचं गुरुत्वाकर्षण जेवढं अधिक तेवढं ते पुस्तक लवकर आणि आनंदात वाचून होतं. ज्या पुस्तकाचं गुरुत्वाकर्षण कमी ते वाचायला महिनोन् महिने लागतात. हे गुरुत्वाकर्षण अर्थातच पुस्तकाच्या पृष्ठसंख्येवर अवलंबून नसतं. ते पुस्तकाच्या आशयात खोलवर कुठे तरी दडलेलं असतं. पण एकदा त्याच्या तावडीत सापडलं की, त्यातून सुटका नसते. मग त्या पुस्तकातून आरपार गेल्याशिवाय गत्यंतर नसतं. गंमत म्हणजे एकाच पुस्तकाचं गुरुत्वाकर्षण प्रत्येक वाचकासाठी कमी-जास्त असू शकतं. उदारहणार्थ, कादंबरी हा साहित्यप्रकार आवडणारा असा एक ढोबळ वाचकवर्ग घेतला तर त्यातल्या प्रत्येकाला प्रत्येक कादंबरी वाचायला आवडते असं नाही. म्हणजे वाचक पुस्तकाची निवड करत नसून, पुस्तकच स्वत:चे वाचक निवडतं. पुस्तक वाचकाला स्वत:कडे खेचून घेतं. वाचक असहाय असतो. माझ्यासाठी पुस्तकाकडे जाण्याच्या वाटा नेहमी दुसऱ्या पुस्तकातूनच फुटतात.

एखादं पुस्तक अस्तित्वात आहे, याचा पत्ता दुसऱ्या एखाद्या पुस्तकातून लागतो. मग ते मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू होतात. हे प्रयत्न नेहमीच यशस्वी होतात असं नाही. मग ते पुस्तक एखाद्या दाट रानातल्या गूढ घराप्रमाणे झपाटून टाकतं. खास अप्राप्य वस्तूंबद्दल असलेलं आकर्षण त्या पुस्तकाबद्दल निर्माण होतं. ते हातात येईपर्यंत विचित्र अस्वस्थता असते. गेल्या वर्षभरात ज्यांच्या गुरुत्वाकर्षणानं मला खेचून घेतलं अशा काही पुस्तकांचा परिचय थोडक्यात पुढे देण्याचा प्रयत्न करतो.

**(१) क्याप - लेखक : मनोहर श्याम जोशी (हिंदी)**

साधारणपणे मनोहर श्याम जोशी आपल्याला 'हमलोग' किंवा 'बुनियाद' अशा मालिकांचे लेखक म्हणून माहीत असतात. पण उदयप्रकाश यांच्या 'ईश्वर की आंख' या पुस्तकातला जोशी यांच्या 'हरिया हर्क्युलस की हैरानी' या कादंबरीवरचा लेख वाचला आणि हा 'आपला' लेखक आहे, याची तीव्र जाणीव झाली. 'हरिया हर्क्युलस...' चा शोध घेताना त्यांची 'क्याप' ही कादंबरी अचानक सापडली. 'अफसोस, यह कहानी पहले लिखी जा चुकी है।' या पहिल्याच वाक्यानं खेचून घेतलं आणि सुमारे दीडशे पानांचं हे पुस्तक एका बैठकीत वाचून झालं. स्वातंत्र्यपूर्वकाळ ते वर्तमानकाळ असा विशाल कालिक विस्तार, मार्क्सवादाचं विघटन, शोकांत प्रेमकथा, जातीयतेवरचं भाष्य आणि या सगळ्या कथासूत्रांना जोडणारी एक भन्नाट रहस्यकथा - असं अद्‌भुत रसायन या कादंबरीत आहे. त्याची नशा बरेच दिवस उतरत नाही. मनोहर श्याम जोशी हे केवळ चांगले लेखक नसून जागतिक स्तरावरचे थोर लेखक आहेत, याचा साक्षात्कार ही कादंबरी वाचून झाला. मग त्यांच्या 'हरिया हर्क्युलस की हैरानी', 'कसप', 'कुरु कुरु स्वाहा', 'हमजाद' 'ट-टा प्रोफेसर' अशा सगळ्याच कादंबऱ्या मिळवून वाचल्या आणि अजूनही पुन्हा पुन्हा वाचतोच आहे.

**(२) कंम्प्लीट वर्क्स अँड अदर स्टोरीज् - लेखक ऑगुस्तो मॉन्तेरोसो.** (स्पॅनिशमधून इंग्रजीत अनुवादित)

'..... तो झोपून उठल्यावरही डायनोसॉर तिथेच होता.' ही बहुधा जगातली सगळ्यात चिमुकली कथा असावी. मारिओ वार्हास योसा या माझ्या आवडत्या लेखकाच्या 'लेटर्स टू अ यंग नॉव्हेलिस्ट' या पुस्तकात मॉन्तेरोसोच्या या कथेविषयी वाचल्यानंतर या लेखकाविषयी कुतूहल निर्माण झालं. 'कंम्प्लीट वर्क्स अँड अदर स्टोरीज्' हे बोलकं नाव असणारं पुस्तक मिळालं. त्यात वर उल्लेखलेली 'डायनोसॉर' ही कथा होतीच. त्याशिवाय इतरही अनेक चिमुकल्या आणि मोठ्या कथा होत्या. त्यातल्या काही पानभर लांबीच्या कथा म्हणजे विशिष्ट मनोवस्थेचं नेमकं प्रतिमांकन करणाऱ्या कविताच. या माणसाचा भाषेवर असणारा ताबा अनुवादित कथांतूनही जाणवतो. अत्यंत छोट्या भाषिक अवकाशात अर्थाचे अनेक प्रस्तर ठासून बसवणं आणि रोजच्या जगण्यातल्या लहान-सहान संदर्भांना कवितेच्या पातळीवर सहजतेनं नेणं ही मॉन्तेरोसोची वैशिष्ट्यं. 'कोणतंही पान उघडून वाचावं' या प्रकारातलं पुस्तक.

**(३) वन मिनिट स्टोरीज् - लेखक : इशत्वान ओर्केनी** (हंगेरियनमधून इंग्रजीत अनुवादित)

मॉन्तेरोसोप्रमाणेच ओर्केनी इटुकल्या कथा लिहितो. त्यांना 'मिनिटभराच्या गोष्टी' हे समर्पक नाव त्यानं दिलंय. या कथा वास्तवातल्या रुक्ष तपशिलांचं रूपांतर अचानक अद्‌भुताच्या इंद्रजालात करतात. त्यांचं रूपकात्म असणं त्यांना आधुनिकोत्तर नीतिकथांचा दर्जा देतं. ओर्केनीनं 'फाइव्ह मिनिट स्टोरीज' सुद्धा लिहिल्या आहेत.

**(४) लास्ट लव्ह इन कॉन्स्टँटिनोपल - लेखक : मिलोराद पाविच** (सर्बियनमधून इंग्रजीत अनुवादित)

मिलोराद पाविच हा माझा अत्यंत लाडका लेखक. त्याचं डिसेंबर २००९ मध्ये निधन झालं. त्याची प्रत्येक कादंबरी वाचकाला वेगवेगळ्या प्रकारे वाचायला उद्युक्त करते. या कादंबरीसोबत टॅरोकार्डस्‌चा संच मिळतो. प्रत्येक टॅरोकार्डवरचं चित्र हे कादंबरीच्या प्रकरणाचं शीर्षक आहे. आपल्या टॅरोकार्डची जशी जुळणी आपण करू त्या क्रमानं कादंबरीची प्रकरणं वाचता येतात. थोडक्यात, ही कादंबरी असंख्य प्रकारे वाचणं शक्य आहे. प्रत्येक वाचनात तिचा अर्थ बदलत जातो. एकरेषीयता धुडकावून वाचकाला कादंबरीच्या निर्मिती प्रक्रियेत सहभागी करून घेणारा पाविच हा एक असामान्य प्रतिभावंत होता. त्यानं अवघ्या आठ कादंबऱ्या लिहिल्या. त्या सगळ्याच आशय आणि संरचनेच्या दृष्टीनं अपूर्व आहेत. पाविचनं वाचकाला त्याची गमावलेली शक्ती परत मिळवून दिली. कादंबरीच्या संरचनेची लवचिकता अगदी टोकाला जाऊन तपासली. गद्य आणि कवितेच्या सरहद्दीवरचं लेखन केलं. मौखिक कथावाङ्‌मयाचा कादंबरीच्या संघटनात अर्थपूर्ण वापर केला. त्याच्या कादंबरीची प्रत्येक ओळ एका विलक्षण चैतन्यानं भारलेली आहे. हे चैतन्य एका परिणत प्रज्ञेतून स्फुरलेलं आहे. पाविचची कोणतीही कादंबरी वाचली

की त्यातली ऊर्जा वाचकात संक्रमित होते. वाचक त्या ऊर्जेनं प्रभारित होतो. मनावरचा गंज क्षणार्धात नाहीसा होतो. 'लास्ट लव्ह इन कॉन्स्टॅन्टिनोपल' बरोबरच त्याच्या 'डिक्शनरी ऑफ खजार्स' आणि 'लँडस्केप पेंटेड विथ टी' या सर्वार्थानं अद्‌भुत कादंबऱ्या ही माझी ऊर्जाकेंद्रं आहेत.

**(५) सिनेमा वन आणि सिनेमा टू - लेखक : गिल दल्यूज** (फ्रेंचमधून इंग्रजीत अनुवादित)

या शतकातला अत्यंत मौलिक प्रज्ञेचा फ्रेंच तत्त्वज्ञ गिल दल्यूज याची ही जुळी पुस्तकं किंवा 'सिनेमा' या एकाच पुस्तकाचे दोन भाग. बर्गसाँ या दुसऱ्या श्रेष्ठ तत्त्वज्ञाच्या काल-संकल्पनेच्या चौकटीवर दल्यूजनं आपलं सिनेमावरचं चिंतन उभारलं आहे. चित्रपट आणि काळ या दोन स्तंभांवर हे चिंतन उभं आहे. पहिल्या भागात दल्यूज संकल्पनांची विस्तृत मांडणी करतो. ती करताना बर्गमन, अंतोनिओनि, रेन्वा, चॅप्लिन अशा अनेक प्रतिभावंत दिग्दर्शकांच्या चित्रपटांची उदाहरणं घेतो. अवघ्या एक-दोन पानांत तो एखाद्या दिग्दर्शकाच्या कर्तृत्वाचं अगदी अनवट आकलन इतक्या नेमकेपणानं आपल्यापुढे मांडतो की आपली त्या सिनेमाकडे पाहण्याची दृष्टीच बदलते. पुस्तकाच्या दुसऱ्या भागात पहिल्या भागातल्या संकल्पनांच्या आधारे चित्रपट माध्यमाविषयी काही अत्यंत मूलभूत विचारव्यूह दल्यूजनं स्पष्ट केले आहेत. त्यासाठी बर्गसाँच्या तत्वज्ञानाचा आधार घेत स्वत:च्या अशा खास संज्ञा विकसित केल्या आहेत. तत्वज्ञान आणि चित्रपटसमीक्षा यांचा एवढा सुंदर मेळ क्वचितच झालेला दिसतो. दल्यूजची तत्त्वज्ञानाची वैचारिक बैठक आणि कवीची संवेदनशीलता या दोन्ही पुस्तकांतून हातात हात घालून वावरतात. पण सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्याचं चित्रपटावरचं प्रेम. पुस्तकाला एक चौथी मिती लाभते ती त्यामुळेच.

**(६) ज्बिगिन्यू हर्बर्त : कलेक्टेड पोएम्स** (पोलिशमधून इंग्रजीत अनुवादित)

साठच्या दशकात पोलंडमध्ये उदयाला आलेल्या प्रतिभावंत कवींमध्ये ज्बिगिन्यू हर्बर्त शीर्षस्थानी मानला जातो. ठाम राजकीय भूमिका असलेल्या हर्बर्तनं आपल्या तिर्यक् शैलीत सभोवतालच्या क्रूर आणि कोमल अनुभवांचं बहुकोनी काव्यस्फटिकांमध्ये रूपांतर केलं. दुसऱ्या महायुद्धाचे ओरखडे उठलेल्या कवींपैकी तो होता. अनुभवांचं खाजगी आणि सार्वजनिक असं वर्गीकरण नाकारून रोजचं जगणं टीप कागदाप्रमाणे शोषून घेणारी कविता त्यानं लिहिली. त्याच्या समग्र कविता एकत्रित वाचणं हा विलक्षण अनुभव आहे. त्यात त्याच्या कवितेची स्थित्यंतरं तर न्याहाळता येतातच शिवाय त्याची वाङ्‌मयीन भूमिकाही स्पष्ट होते. 'भविष्यकथन', 'अश्रूंचं बांधकाम', 'माझ्या ड्रॉवरला उद्देशून' अशा जबरदस्त कविता एकत्र वाचायला मिळणं म्हणजे कोणत्याही काव्यवेड्यासाठी अमृतानुभवच.

**(७) कुवलयमाला - लेखक : उद्योतन सूरी** (मूळ प्राकृत आणि हिंदी अनुवाद)

उद्योतनाची 'कुवलयमाला' हा पाचव्या शतकाच्या सुमाराला लिहिला गेलेला प्राकृत गद्य कथाग्रंथ. याची भाषा महाराष्ट्री प्राकृत आणि अपभ्रंश यांच्या मिश्रणातून तयार झालेली आहे. कथेतून कथा निघणाऱ्या भारतीय परिमंडल कथाशैलीचा हा अप्रतिम नमुना. कुवलयमालेची एकूणच संरचना आजच्या आधुनिकोत्तर कादंबरीला जवळची आहे. काळाचा कल्पक वापर, बदलता निवेदक आणि प्रसंगकथनातली भन्नाट कल्पकता या सगळ्या वैशिष्ट्यांमुळे ही अत्यंत आजची कादंबरीच वाटते. आज लुप्त झालेल्या 'चूलिका पैशाची' भाषेतला एक परिच्छेद यात असल्यामुळे 'कुवलयमाला' भाषाशास्त्रीय दृष्ट्याही अनमोल आहे.

वर्षभरात वाचलेल्या निवडक पुस्तकांविषयी वर थोडक्यात सांगितलं. वाचून झालेल्या आणि आवडलेल्या सगळ्याच पुस्तकांविषयी लिहिणं काही शक्य नाही. या पुस्तकांच्या जबरदस्त गुरुत्वाकर्षणानं मला खेचून घेतलं आणि माझ्या जगण्याविषयीच्या आकलनात अगदी सूक्ष्म पातळीवर पण फार मोलाची भर घातली. काही मतांमध्ये नकळत बदल घडवले. सभोवतालची माणसं आणि समाज यांच्यासह स्वत:ला समजून घेण्याच्या प्रक्रियेत हातभार लावला. आत्मविश्वास वाढवला. असुरक्षित समाजात जगण्याचं भय कमी केलं आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे स्थळ आणि काळ यांच्या मितींमधून काही काळ सुटका करणारा उच्च प्रतीचा आनंद दिला. या पुस्तकांच्या गुरुत्वाकर्षणानं मला खेचून घेतलं नसतं तर मी या आध्यात्मिक आनंदाला मुकलो असतो.

०००

निखिलेश चित्रे
इ-०१, अर्पिता, रानाराम तावडे मार्ग, दहिसर(प.) मुंबई -४०००६८
भ्र. ध्व. ९८१९१००१७६

# वाचनसंस्कृती आणि माझे वाचन

– रणधीर शिंदे

*१९३४-३५ साली पंडित जवाहरलाल नेहरूंचे आत्मचरित्र नुकतेच इंग्रजीत प्रसिद्ध झाले होते. त्यावेळी या पुस्तकाला फार मागणी होती. या ताज्या पुस्तकाची एक प्रत कोल्हापूरच्या माझ्या एका मित्राकडून मिळवून ती कशी वाचली, याची आठवण माझ्या मनात ताजी आहे. आम्हाला हे पुस्तक चार दिवसांसाठीच मिळाले होते आणि वाचणारे तर पाच सहा जण. मग आम्ही एकत्र बसलो. एकाने ते मोठ्याने वाचायचे आणि इतरांनी ते ऐकायचे असा कार्यक्रम सुरू झाला. उन्हाळ्याचे दिवस. कराडचे आमचे घर खूप तापायचे. पण आमचा उत्साह इतका अमाप होता की आम्ही ते पुस्तक तीन दिवसांतच संपविले. ते दिवस मंतरलेले होते. स्वातंत्र्यचळवळीने आमची मने भारून टाकलेली होती. काही नव्या प्रेरणा घेऊन, देशाच्या आकांक्षाची क्षितिजे उंचावणाऱ्या विचारांची झेप असलेल्या एका तरुण नेत्याचे जीवन समजून घेण्याची ओढ होती.*

– यशवंतराव चव्हाण (माझी साहित्याची रुची)

हे उद्गार आहेत मा. यशवंतराव चव्हाण यांचे. वाचनानुभवाची ओढ, जिज्ञासा काय असते याचा प्रत्यय या प्रकारच्या घटनेतून आपल्याला येतो की जे आज दुर्मिळ झाले आहे. महाराष्ट्रातील वाचनसंस्कृतीचा विचार केला तरी अनेक गोष्टी आपल्या ध्यानात येतात. महाराष्ट्राची लोकसंख्या, साक्षरतेचे प्रमाण, नागरी-ग्रामीण परिसरातील वाचन, आधुनिक काळातला माध्यमांचा विळखा आणि वाचनसंस्कृती अशा अनेक बाबी ध्यानात घ्याव्या लागतात. वाचनातील बहुविधताही आपल्या ध्यानात येते. सद्य स्थितीत महाराष्ट्रात वर्षभरात जवळपास ३००० ते ३५०० पुस्तके प्रकाशित होतात. ४०० च्या आसपास दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. नियतकालिके, वर्तमानपत्रे, रविवार आवृत्त्या याही आहेतच. वाचनाचा परीघ मुख्यत्वे मध्यमवर्गापुरता बराच काळ सीमित राहिलेला दिसतो. सद्यस्थितीत वाचनाबद्दलचा अभिप्राय मित्रांजवळ व्यक्त करावा, त्याच्या संबंधीची चर्चा करावी असा मोठा अवकाश फारसा दिसत नाही. जीवनाची गती मोठी वाढली आहे. आजूबाजूला मोहविणारी नवी तंत्रसाधनांची रेलचेल आहे. अशावेळी निवांत समरसून ग्रंथवाचनाचा आनंद घ्यावा असा वावर आजूबाजूला नाही. विविध ठिकाणच्या मध्यमवर्गीय नोकरदारांना मोठमोठाल्या पगारात वाढ झाली आहे. तरीही मराठीतील हजारेक प्रतीची आवृत्ती संपवायला प्रकाशकांची दमछाक होते आहे. दुसऱ्या बाजूला हौशी लेखकांची रेलचेल झाली आहे. हौसेखातर पुस्तके प्रसिद्ध केली जात आहेत. मध्यंतरी मराठी विषयाच्या एका प्राध्यापकाला विचारले; अमूक एक महत्त्वाची कादंबरी आली आहे ती घेतली आहे का? तर ते म्हणाले विकत कशाला घ्यायची? कादंबरी एकदा वाचली की पडून राहते, ती विकत कशाला घ्यायची? अशी मराठी वाचकांची स्थिती आहे. या काळात प्रकाशन व्यवसायाचा विस्तारही मोठा झाला आहे. खेडोपाडी तालुक्याच्या गावीही उत्तमोत्तम पुस्तके छापली जाऊ लागली आहेत. यामधून ग्रंथव्यवहारालाही चालनाच मिळाली आहे. यामध्ये काही चांगली पुस्तकेही प्रकाशित झाली. उच्च मध्यमवर्गीयांमध्ये ग्रंथ हे प्रदर्शनाची, दिखाऊपणाची गोष्ट झाली आहे. अनेक मोठ्या घरांमध्ये पुस्तकासाठी एक आकर्षक; चकचकीत कपाट तयार केले जाते. त्यात एन्सायक्लोपिडिआ, विविध प्रकारचे कोश व आकारमानाने मोठाले ग्रंथ ठेवले जातात. मात्र ती पुस्तके कधी हाताळलीही जात नाहीत. अशी एक दिखाऊपणाची हौस आपल्यात वाढीला लागते आहे.

अर्थात सर्वत्रच असे निराशेचे चित्र नाही. महाराष्ट्राच्या विविध भागांतून वाचनसंस्कृतीबद्दल आशावाद बाळगावा अशी काही सुचिन्हेही दिसत आहेत. वेगवेगळ्या साहित्य संमेलनातून कोट्यवधी रुपयांची पुस्तके विकली जात आहेत. विक्रमी उलाढाल यामधून होते आहे. ग्रंथप्रसारासाठी मराठीतील प्रकाशक आपआपल्या प्रकाशनाची मुखपत्रे प्रसिद्ध करत आहेत. त्याद्वारे प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची माहिती लोकापर्यंत पोहचत आहे. वाचक हा सांस्कृतिक व्यवहारातला एक महत्त्वाचा घटक आहे. साहित्यव्यवहाराला परिपूर्णता अणणारा घटक. वाचन हा एक सर्जक असा उद्देश आहे. वाचन हा एक उन्नतपणाकडे जाणारा

प्रवास आहे. वाचनाने आपल्यात काहीएक बदल होतो. वाचनापूर्वीचे आपले व्यक्तिमत्त्व आणि वाचनानंतरचे आपले व्यक्तिमत्त्व यात फरक पडतो. वाचन आपली जगण्या विषयीची समज आणि उमज वाढविते.

आपल्याला वाङ्मयाभिरुचीत विविधता मोठ्या प्रमाणात दिसते. सामान्यत: आपल्याला समाजात विविध लोक, विविध तऱ्हेचे वाचन करताना दिसतात. त्यांचे उद्देश, हेतू वेगवेगळे असतात. वाचनाचे निमित्त वेगवेगळे असते. काही साहित्य व्यावहारिक गरजांच्या पूर्ततेसाठी वाचले जाते. आरोग्य शास्त्रावरचे ग्रंथ, विज्ञानविषयक ग्रंथ, पर्यटनविषयक ग्रंथ, पाककला आदी विषयावरचे ग्रंथ व्यावहारिक गरज म्हणून वाचले जातात. हे वाचन तात्कालिक स्वरूपाचे असते. माहिती देणे एवढे त्याचे इप्सित असते. दुसऱ्या बाजूला लोकप्रिय वळणाचे साहित्यही विपुल प्रमाणात वाचले जाते. रंजकता हा या साहित्याचा प्राण असतो. हे साहित्य कोणत्याही काळात लोकप्रिय असते. वेगवेगळ्या काळात त्याचे नवे पॅटर्नस् बंध तयार होतात. एकरेषीय, गुंतागुंत नसणे, सुलभता हा या साहित्याचा विशेष होय. वाचकांच्या अंत:करणातील भावबंधाला हात घालण्याचे त्यामध्ये सामर्थ्य असते. इतिहासकाळातील विभूती, देशप्रेम, भावभक्ती, पूर्व दिव्याबद्दल भाबडे प्रेम त्यामध्ये असते. सुखान्त प्रेमकथा हाही त्याचा प्राण असतो. या प्रकारच्या लोकप्रिय वळणाच्या साहित्याचे वाचन करणारा वाचकवर्ग हा साऱ्याच भाषांमध्ये विपुल प्रमाणात पाहायला मिळतो. एक प्रकारचे सपाट सुलभीकरण, सोपेपण त्यांना अभिप्रेत असते. जीवनातील गुंत्यांचा, वास्तवाचा विसर पाडणे व त्यातील कृतक कल्पित राज्याची सफर त्याला हवीहवीशी वाटते. तो त्यात रेंगाळतोही. मात्र कधीकधी गंभीर वाचनाकडे जाण्यासाठी लोकप्रिय वळणाची वाट साहाय्यभूत ठरू शकते. मात्र तसे घडत नाही. बहुसंख्य वाचकवर्ग या मोहजाळ्यात अडकतो. तिथेच रुळतो, रुजतो. आपल्या वाचनाच्या कक्षा तो विस्तारीत नाही. आपल्या वाचनाचे रिंगण तो सीमित करतो. एक प्रकारचे स्थिरत्व व एकारलेपण त्याच्या वाचनात येते.

वाचकांच्या जाणिवा विस्तारित करणारे, समृद्ध करणारे, साहित्य हे वरच्या दर्जाचे साहित्य होय. ते गंभीर आणि आव्हानात्मक स्वरूपाचे असते. एक समृद्ध जीवनानुभवाची प्रचिती ते देते. या साहित्याच्या वाचनाने अस्वस्थता प्राप्त होते. जगण्याची समज आणि उमज वाढविणारे हे साहित्य असते. हे साहित्य मौलिक स्वरूपाचे असते. मात्र याचा वाचकवर्ग हा अत्यल्प असतो. मराठीत वैचारिक व समीक्षात्मक स्वरूपाच्या लेखनाचा वाचकवर्गही अत्यल्प असा आहे. मुख्यत्वे या प्रकारचे लेखन मराठीत कमीच आहे. प्रकाशकही या प्रकारचे साहित्य छापायला अनुत्सुक असतात. या प्रकारच्या लेखनासाठी पोषक असे वाङ्मयीन पर्यावरण तयार व्हायला हवे. चांगल्या दर्जाचे वैचारिक लेखन त्या त्या भाषिक परंपरेतील सांस्कृतिक व्यवहाराच्या उंचीसाठी, बलवर्धनासाठी आवश्यक ठरते. चांगल्या दर्जाच्या वाङ्मयाकडे जाण्याची वाट वैचारिक आणि समीक्षात्मक लेखनातून निष्पन्न होऊ शकते. हे लेखन चांगले वाङ्मय वाचकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करू शकते.

निकोप अशा वाचनसंस्कृतीच्या वृद्धीसाठी जाणीवपूर्वक काही प्रयत्न व्हायला हवेत. वाचनाच्या संख्यात्मक विस्ताराबरोबरच गुणात्मक विस्तारही मोठ्या प्रमाणात व्हायला हवा. वाचकांचे जाणीवविश्व समृद्ध करणारी वाचनसंस्कृती विकसित व्हायला हवी. समृद्ध अशा वाङ्मयाभिरुचीच्या माध्यमातून सरस अशी वाचनसंस्कृती उभी राहावी यासाठी विविध उपक्रम राबविले पाहिजेत. यासाठी वाचनालये, विविध नियतकालिके, महाविद्यालये, छोटे छोटे वाचन गट, विविध माध्यमे यांचे साहाय्य घेतले पाहिजे. वाचनसंस्कृतीच्या विकासासाठी विविध प्रकारच्या चर्चासत्रांचे, व्याख्यानांचे जाणीवपूर्वक आयोजन करायला हवे. वेगवेगळ्या पुस्तकांवर नियतकालिकातून वेगवेगळ्या दृष्टिकोनातून समीक्षा लेख, ग्रंथ परीक्षणे सतत प्रसिद्ध व्हायला हवीत. (दैनिकांच्या रविवार पुरवण्यांमधील वाङ्मयविषयक मजकुरांचा, परीक्षणांचा अवकाश गेल्या दोन दशकात किती आक्रसला आहे हे आपण जाणताच) या समीक्षा लेखनांतून, परीक्षणाच्या वाचनातून, मूल्यमापनातून तो ग्रंथ वाचकापर्यंत पोहचला जाईल.

असे काही प्रयत्नही महाराष्ट्रात झालेले आपणाला दिसतात. वाचकाच्या वाङ्मयाभिरुचीचे वेगवेगळ्या प्रकारे सर्वेक्षण व्हायला हवे. केतकरांनी म्हटले आहे, वाचकरूपी जनता हे शेवटचे न्यायालय आहे. त्याचा निर्णय लेखकाला मान्यच करावा लागतो. सुबुद्ध वाचकाच्या वाङ्मयाभिरुचीचा धाक नेहमीच लेखकाला राहतो. अभिरुचीचा स्तर तपासण्याचे काही सर्व्हे मराठीत झाले आहेत. स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात मुंबई आकाशवाणीने आवडलेली दहा पुस्तके या अनुषंगाने एक सर्व्हे घेतला होता. अर्धशतकातील दहा श्रेष्ठ पुस्तके यातून दहा

पुस्तके पुढे आली. ललित मासिकही दरवर्षी एप्रिल महिन्यात वाचकांची ग्रंथ शिफारसीची सूची प्रकाशित करते. लोकवाङ्मयगृहाचे मुखपत्र *आपले वाङ्मयवृत्त* मध्ये सतीश काळसेकर वाचण्याची रोजनिशी हे सदर सातेक वर्ष लिहीत होते. त्यामधून त्यांनी कोणती पुस्तके वाचावीत याचा एक दिशादर्शक संवादच उभा केला आहे. नुकतेच हे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित झाले आहे. साहित्य अकादमी सारखी संस्था, लेखक आपल्या भेटीला असे उपक्रम राबवीत आहे. काही प्रकाशनांनी ग्रंथ प्रसारासाठी काही पावले जाणीवपूर्वक उचलली आहेत. ग्रंथाली व राजहंसचे कार्य याबाबतीतील माहिती असेलच. ग्रंथालीने विविध विषयांवरची शंभरेक पुस्तके अल्पदरात उपलब्ध करून दिली होती. अलीकडेच कोल्हापूरच्या श्रमिक प्रतिष्ठानने अण्णा भाऊ साठे यांच्या दहा पुस्तकांचा संच केवळ ४०० रुपयांत उपलब्ध करून दिला. त्याची विक्रीही मोठ्या प्रमाणात झाली.

आता संपादकांनी सुचविल्याप्रमाणे माझ्या वाचनाविषयी व गेल्या वर्षभरात वाचलेल्या पुस्तकांविषयी. लेखन वाचनाची कोणतीही परंपरा नसणाऱ्या अवकाशात माझी घडण झाली. शालेय जीवनात अभ्यासक्रमात जो काही पाठ्यक्रम असतो त्या व्यतिरिक्त वाचनाशी अक्षरांसी फारसा कधी संबंध आला नाही. आला असेलच तर तो एसट्यांच्या, गावांच्या, दुकानाच्या पाट्या वाचनाचा. मात्र पाठ्यक्रमातील काही गोष्टींनी, कवितांनी चुटपूट लावली. त्याचे ओरखडे मनावर उमटणे स्वाभाविक होते. कारण शालेय पाठ्यपुस्तके ही अभिरुचीच्या वृद्धीसाठी, संस्कारासाठी महत्त्वाची ठरतात. आकस्मिक काहीतरी व्यक्तिमत्त्व घडणीत वाचनाचा काहीएक संस्कारठसा निर्माण होतो. नवव्या इयत्तेत असताना आमच्या शेजारी कीर्तक नावाचे एक कुटुंब होते. मूळचे कर्नाटक, जमखंडीचे. पुण्यात शिक्षण झालेले. एम.एस.ई.बी.मधून निवृत्त झाले होते. ते नेहमी महाराष्ट्र टाईम्स व काही साप्ताहिके घरी आणायचे. त्यांची मुले मोठी होती. तीही वडिलांप्रमाणे वाचन करणारी. त्यांचा मोठा मुलगा *षटकार* हे त्या काळातील लोकप्रिय क्रीडा साप्ताहिक तसेच *फिल्मसिटी* हे चित्रपटविषयक नियतकालिक आणायचा. त्यांच्या सहवासामुळे आरंभी आरंभी चित्रे पाहणे, नंतर नंतर मजकूर वाचणे असा वाचनाकडे माझा ओढा निर्माण झाला. रविवार आवृत्त्यांमधील विशेष लेख वाचण्याची आवड निर्माण होऊ लागली. यात वृत्तपत्रांचा खचाखच समावेश होता. जुन्या रद्दीतील पेपर वाचणे, एखाद्या दुकानाच्या पुडीतील मजकूर वाचणे असा हा क्रम होता. अजूनही मला आठवते, नववीत असतानो शेजारच्या एका महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलीने ग्रंथालयातून 'महानंदा' हे पुस्तक (त्यावेळी कोणतेही पुस्तकच असा समज. प्रकारभेद ही कल्पना माहिती नव्हती.) आणलेले होते. उत्सुकता म्हणून वाचायला घेतले आणि त्यातील गोष्टीने शेवटपर्यंत वाचन माझ्याकडून करवून घेतले. या कादंबरीतील गोष्टीचा शेवट काय असावा या जिज्ञासेने हे पुस्तक झपाटून वाचले होते. पुढे दहावी नंतर सोलापुरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना जाण्याची काही एक आवड निर्माण झाली. आवडीला अधिक वाटा प्राप्त झाल्या. त्यात हिराचंद नेमचंद वाचनालयाचा मोठा वाटा होता. कोणत्या क्षणी मी त्याचा सभासद झालो आठवत नाही. मात्र या वाचनालयातून वाचनाची माझी मोठी भूक भागविली, ती तृप्त केली. साधारणतः दररोज पुस्तके बदलण्याचा छंदच मला जडला. आडवे तिडवे वाचन होत होते. वाचनानं आपल्यात काहीतरी बदल होतो आहे हे सूक्ष्म पातळीवर कुठेतरी जाणवत होते. पुढे हे पुस्तकांचे विश्व वेगळे आहे, त्याची सफर हवीहवीशी वाटायला लागली. या विश्वातून आपल्याला काहीतरी मिळते आहे असे जाणवायला लागते. एम.ए.ला कोल्हापुरातही हा क्रम चालूच राहिला. पुन्हा सोलापूरला आल्यावर प्रा. गो.मा. पवार सरांच्या सान्निध्यात आलो. त्यांनी त्यांच्या ग्रंथाचे विश्वदालन उपलब्ध करून दिले. त्यांच्यामुळेच माझ्या विस्कळीत वाचनाला शिस्त लागली. सुसूत्रता प्राप्त झाली. जाणीवपूर्वकता, हेतूपूर्वकता वाचनात आली. पीएच.डी.च्या प्रबंध लेखना वेळी मार्गदर्शक डॉ. रोहिणी तुकदेव यांच्यामुळेही वाचनाला नेटकेपणा आला. पुढे पुढे मूळची आवड व व्यवसाय शिक्षकी पेशाचा त्यामुळेही उत्तरोत्तर ही जाणीव वृद्धिंगत होतच राहिली. कदाचित ती माझ्यातील आंतरिक गरज आहे. त्या निकडीपोटी वाचनाचे हे वेड नाही तर स्वतःला अधिकाधिक उन्नत, विकसित करत जाण्याचा हा मार्ग आहे. या वाचन विकासाबद्दल विस्ताराने लिहिणे शक्य आहे परंतु लेखाचा विस्तार मोठा होईल.

'आशय' च्या संपादकांनी गेल्या वर्षभरातील वाचनाविषयीही टिपण लिहावे असे सुचविले आहे. आता गेल्या वर्षभरातील वाचलेल्या पुस्तकांविषयी. वेगवेगळ्या निमित्ताने हे वाचन घडते. ते विविध प्रकारचे असते. चर्चासत्रासाठी वेगवेगळे, निबंध लिहिण्यासाठी विविध तऱ्हेचे पुस्तकांचे वाचन घडते. अध्यापनासाठी म्हणून विविध पुस्तकांचे वाचन घडते. याबरोबरच

आपल्या आवडीच्या ग्रंथाचे वाचनही घडते. अशा काही पुस्तकाविषयी. आता इतक्यात वाचलेल्या पुस्तकाविषयी. गेली तीनेक दशकभर भालचंद्र नेमाडे यांच्या ज्या कादंबरीची चर्चा होती त्या हिंदू कादंबरीचा पहिला भाग नुकताच प्रसिद्ध झाला आहे. मराठी वाचकांमध्ये या कादंबरीविषयी उत्सुकता होती. ती विषयीच्या अपेक्षाही मोठ्या प्रमाणात होत्या. ६०३ पृष्ठांची ही दणकट बृहद् अशी कादंबरी. मराठीत वैचारिक कादंबरी लेखनाची परंपरा फारशी नाही. एक समृद्ध, संपन्न असा वाचनानुभव ही कादंबरी देते. वाचकांची दमछाक व्हावी असा तिचा पैस आहे. वाचकांची समज व जाणिवा अधिक विस्तारणारी ही कादंबरी आहे. विशाल अशा मानवसमूहाचे त्या काळाचे, त्यांच्या संवेदन स्वभावाचे, विविध व्यक्तींचे चित्रण या कादंबरीत आहे. एका कादंबरीच्या पोटात अनेक कादंबऱ्या आहेत. या कादंबरीचे उपशीर्षक आहे. जगण्याची समृद्ध अडगळ. नेमाडे यांच्या सबंध लेखनामध्ये विचारांची ठाम अशी बैठक आहे. विशिष्ट अंत:सूत्र आहे. भारतीय परंपरा अनेक गोष्टी आपल्यात सामावून घेते. आपल्यात अनेक गोष्टी रिचवते. जतन हा तिचा धर्म आहे. टाकून देणे तिला मानवत नाही. ही अडगळच माणसाचं जीवन अधिक आनंददायी, चैतन्यदायी करते. म्हणून ती जगण्याची समृद्ध अडगळ. हिंदू लोक काहीही फेकून देत नाहीत. सिंधुकाळापासून सगळी अडगळ आम्ही तळघरात गच्च जपून ठेवली आहे. सगळं तिथे अंधारात कुठेतरी जपून ठेवलेलं असतं. ते न दिसू दे. स्मृतीतून सुद्धा जाऊ दे. काही बिघडत नाही. केव्हाही सापडेल. सिंधू धर्म आहे. बौद्ध धर्म आहे. जैन धर्म आहे. वैदिक ब्राह्मणही आहे, असा तिचा आवाका.

कादंबरीचा नायक खंडेराव हा पुरातत्ववेता आहे. साऱ्या मानवजातीच्या इतिहास संस्कृतीचे हे उत्खनन आहे. तिचे पुनर्वाचन आहे. व्यक्तीव्यक्तींमध्ये भूतकाळ काठोकाठ वाहत असतो. लांबून लांबून जिकिरीचा प्रवास करत आपला एक वंशवृक्ष, एक वेळूचं बन जाणवणं या आपल्या खऱ्या फलश्रुतीचा प्रत्यय इथे येतो. याची प्रचिती ही कादंबरी देते. तुम्ही कितीही नवं व्हायचा प्रयत्न केला तरी आधीचं सगळं संपूर्ण नष्ट करता येत नाही, ते नाहीसं होत नाही याचा प्रयत्य देणारी कादंबरी. खंडेरावचा हा जीवनप्रवास. त्याच्या नजरेतून हे सारे इतिहास संस्कृतीचे उत्खनन. स्थानांतर, भटकते मानवसमूह, तिथल्या जीवनरीती, त्या रीतीत साफल्य मानणारे मानवसमूह इथे उभे केले आहेत. स्त्रियांच्या परवडीच्या दु:खाच्या अगणित व्यथाकथा या कादंबरीत आहेत. त्यांच्या काळवंडलेल्या करुण कहाण्यांनी या कादंबरीचा अवकाश व्यापलेला आहे. मात्र त्यांच्यातील जिद्द व धाडस त्यांना तगून राहण्याचे धैर्य प्राप्त करून देते. अनेक व्यक्तिस्वभावाचे नमुने त्यांनी या संरचनेत पेश केले आहेत. जीवनाबद्दलचे प्रगाढ असे चिंतन आहे. शेतकऱ्यांबद्दल तो नायक म्हणतो, हिंदू शेतकरी दुनियेचं फक्त देणंच लागतो? त्याला कोणी काही देऊ नये, म्हणून तो म्हणतो, *शिवलीलामृत बदलावं लागले. भौ. शिवशंभू एकांतात क्रीडा करत असताना एक गंधर्व चुकून त्यांच्या खोलीत घुसला, त्याला शाप दिला शंभूनं, जा तू महाराष्ट्रात शेतकरी व्हशील.* या प्रकारचे चिंतन तीमध्ये आहे. रूपाच्या दृष्टीनेही या कादंबरीची महत्ता ही मोठी आहे. या आधीच्या त्यांच्या कादंबरीचे जे रूप होते त्यापेक्षा वेगळी रीत त्यांनी येथे अवलंबिली आहे. अतिशय प्रगल्भ अशी भाषा रूपे व विविध तऱ्हेच्या आविष्कार रूपांनी या कादंबरीची संहिता सिद्ध झाली आहे. अतिशय उच्च दर्जाची, काव्यात्म अशी अभिजात शैलीरूपे तीमधून प्रकटतात. व्यक्तीची भाषा असो, विशिष्ट प्रदेशातील रूपे त्यांनी यथातथ्यपणे चित्रित केली आहेत. शब्द वापराची, गद्यशैलीची अनंत अशी प्रयोगरूपे तीमध्ये आहेत. त्यांनीच या कादंबरीत म्हटल्याप्रमाणे प्रत्येक शब्द, प्रत्येक वाक्य *उफनून, पाखडून, अडसून, चाळून घ्यावा लागतो सप सप* तद्वत नेमाडे यांनी या कादंबरीतील प्रत्येक शब्द न् शब्द योजिला आहे. या कादंबरीविषयी चर्चा करताना एकदा गोव्याचे प्रा. वासुदेव सावंत म्हणाले, ही कादंबरी म्हणजे आधुनिक जीवनाचे महाभारतच आहे. अशी महत्ता असणारी व वाचकांना एक समृद्ध वाचनानुभव देणारी कादंबरी मराठीत आहे हे मराठी भाषेचे वैभव आहे.

प्रवीण बांदेकर या तरुण लेखक कवीची *चाळेगत* ही कादंबरी शब्दालय प्रकाशनाने प्रकाशित केली आहे. गेल्या दोन दशकातील कोकणातील समूहजीवनाचे, प्रदेशाचे अंतर्भेदी चित्रण करणारी ही कादंबरी. या काळातील समाजकारण, राजकारण, भांडवली व्यवस्था एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला नाडला जाणारा सामान्य कष्टकरी, श्रमकरी, कोकणी समूह इथे चित्रित झाला आहे. *पांडुरंग सांगवीकर, चांगदेव पाटील, गोपीचंद रहाणे,*

*रघु चिलमी, कबीर कांबळे, गौतम सहस्तबुद्धे, एकनाथ तनपुरे, मुकुंद जोशी, प्रफुल्ल उर्फ फुलाताई या वाटाड्या दोस्तान्याला* त्यांनी ही कादंबरी अर्पण केली आहे. यावरूनही त्यांचे आस्थाविषय आपल्या ध्यानात येतात. हीही अतिशय सकस, गुणवान अशी कादंबरी. या मोठ्या कादंबरीत एका मुख्य गोष्टीबरोबर अनेक छोट्या छोट्या गोष्टी आहेत. 'माझ्यातल्या अनेकानेक एलमेंटस्‌सकट नि माझ्या सोबत वावरणाऱ्या गोतावळ्यासकट अनेकांना मी माझ्या मनातल्या नियोजित कादंबरीत इन्हॉल्व्ह करून घेत जातोय', असे तो निवेदक म्हणतो. संकासुराचा खेळ माझा इतका ताबा घेईल असं वाटलं नव्हतं. असा या खेळातून दुसरा खेळ, एका गोष्टीतून दुसरी गोष्ट उलगडणारे विश्व या कादंबरीत आहे. कोकणातील समाजजीवनाला, निसर्गाला, पर्यावरणाला अशुभाच्या लाटेने जोराचा तडाखा बसला आहे. नाडले जाणाऱ्यांचा, चिरडले भरडले जाणाऱ्यांचा चेहरा जगात सगळीकडे सारखाच असावा? जशी दु:खाची परिभाषा सारखीच आहे. जसे असतात वेदनेचे चटके सारख्याच रंगरूपाचे, एकाच मापाचे याची प्रचिती ही कादंबरी देते. आजचे वातावरण हे या विनाशकारी चाळ्यांची कृत्यं आहेत. चालगत, चालगती कालगती? कलागत? कला? कळा? शुल्ककाष्ट? पीडा? साडेसाती? अवदसा? विनाशक शक्तीचा हा अवकाश आहे याचे सूचन करणारी ही कादंबरी अस्वस्थ करते. भणाणणारा खारा बोचणारा वारा, चावरी थंडी आणि लाटांची गाज आणि मासळीचे दर्प व कोकणी बोलींचे जिवंत दर्प या कादंबरीभर पसरून ठेवले आहेत. या शतकाच्या पहिल्या दशकाच्या शेवटच्या वर्षी प्रसिद्ध झालेली ही कादंबरी समकालातील अनेक गोष्टी आपल्यात रिचवते आहे. वाचकाला अस्वस्थ करण्याचे सामर्थ्य तीमध्ये आहे. एकेका तासात एक चौरस किलोमीटर एवढ्या वेगानं समुद्राचा तळ खरडून काढणाऱ्या व ते पाहणाऱ्या सामान्यांचे हतबल विश्व उभी करणारी ही महत्त्वाची अशी कादंबरी आहे.

गतवर्षीचा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेल्या वसंत आबाजी डहाके यांच्या *चित्रलिपी* हा काव्यसंग्रह महत्त्वाचा असा आहे. आजचे जीवन अनेक अंतर्विरोधांनी आकाराला आलेले आहे. त्यातले पेच ती मांडू पाहते आहे. आजच्या मानवाने निर्माण केलेल्या संहारसत्रात जनावरं आणि पाखरंदेखील मरून पडत आहेत. अशा अगतिक आणि भयग्रस्त काळवंडलेल्या अवकाशाचीही ही कविता आहे. या शतकाची अखेर जवळ आली आहे. जगण्यातील संपूर्णत: समग्रताच नष्ट झाली आहे. याचा उदास, करुण असा स्वर त्यांच्या कवितेमध्ये आहे. झाड तोडायचे, कापायचे, लगदा करायचा, कागद बनवायचा, त्यावर लिहायचे, ते छापायचे, मग वाचायचे एवढा खटाटोप कशासाठी? सरळ झाडच वाचावे ? असा संवेदनस्वभाव जपू पाहणारी ही कविता आहे.

मराठीतील एक ज्येष्ठ कवी नामदेव ढसाळ यांचा यावर्षीच प्रसिद्ध झालेला *निर्वाणा अगोदरची पीडा* हा कवितासंग्रही फार महत्त्वाचा आहे. *पूर्वानुभवाचे पंचाग ठरू लागले आहे खोटे! आता काळ मागे सरकतो आहे की पुढे तेही कळणे नाही । फार भयाण अनुभव आहे हा । असह्य आहे हे जगणे । या पोकळीला कुठले नाव देऊ ?* याची खंत मांडणारी ही कविता. ढसाळांच्या कवितेचा एक वेगळा विकासक्रम सूचित करणारा हा संग्रह आहे. मिल्स संपून मॉल्सच्या जमान्याचे विश्व ही कविता उभी करते. श्रमकऱ्यांना हद्दपार करून ग्लोबल संस्कृतीच्या नांदणाऱ्या गोकुळाची ही कविता आहे. महानगरांच्या आकांताचे, आक्रोशाचे एक सूत्र या कवितेत आहे. वर्तमान चहूबाजूनी निराधार ठरते आहे. असे शोकात्म संवेदन मांडणारी ही कविता आहे. या साऱ्या भवतालाच्या सर्व तृष्णांच्या पलीकडचा नाद आता त्याला ऐकू येतो आहे. ही जाणीव तीमधून व्यक्त होते. याशिवाय गेल्या वर्षभरात वर्जेश सोळंकी यांचा *ततपप,* जयराम खेडेकर यांचा *भुई, नीरजा* यांचा *वेणा*, श्रीधर तिळवे यांचा *आत्मचरित्रातले काल्पनिक क्षण टचीटचेबल ॲण्ड अनटचेबल* असे काही वैशिष्ट्यपूर्ण संग्रह प्रकाशित झालेत ते वाचावेत असे.

गद्यसाहित्य प्रकारात श्री.मा. भावे याचा *जीर्णोद्धार* हा महत्वाचा ग्रंथ प्रकाशित झाला. २००४-०५ या काळात नवभारत मासिकातून प्रसिद्ध झालेले हे लेख. एका विशिष्ट अंत:सूत्राने लिहिले गेलेले. एकोणिसावे शतक व विसाव्या शतकाचा पूर्वार्ध, त्या काळातील समाजजीवन व साहित्यनिर्मिती यांचा वेध घेणारे हे पुस्तक आहे. या काळातील अतिशय महत्त्वाच्या परंतु विस्मरणात गेलेल्या दुर्मिळ पुस्तकांवरचे हे लेखन आहे. तत्कालीन कालस्वर व समाजमन, त्यातील अंतर्विरोधांनी निर्माण झालेला अवकाश या ग्रंथाद्वारे उलगडतो. वसाहत

काळातील एका बाजूला प्रबोधन शतकाचा झालेला आरंभ व दुसऱ्या बाजूला इथले वास्तव व त्यातले पेच या पुस्तकातून उमटतात. या लेखांना पार्श्वभूमी म्हणून या कालासंबंधी दिशादर्शक ठरेल अशी दीर्घ, विस्तृत प्रस्तावना त्यांनी लिहिली आहे.

याशिवाय  दिलीप पुरुषोत्तम चित्रे व रंगनाथ पठारे यांच्याशी संवादचर्चेचे पुस्तकही प्रसिद्ध झाले आहे. (प्रत्यय आणि व्यत्यय) पठारे यांच्या साहित्यासंबंधीची उभयतातील ही चर्चा आहे. राजन गवस यांचे साधनेमध्ये लोकप्रिय ठरलेले सदर लेखनही असेच महत्त्वाचे आहे. (कैफियत)

पुस्तके प्रसंगी तुम्हाला हाका देऊन बोलावतात

वाचन हा माझ्यासाठी स्वेच्छेने स्वीकारलेला आनंदाचा सोहळा आहे.

ग्रंथाचे वाचन आपले आयुष्य समृद्ध करते.

ग्रंथाची अनावर ओढ, तिला आवर घालणे मात्र आजही जमत नाही.

ही वाक्ये आहेत सतीश काळसेकर यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या *वाचणाऱ्याची रोजनिशी* या ग्रंथातील. लोकवाङ्मयगृहाने हा ग्रंथ अतिशय सुंदर व आकर्षक रूपात प्रसिद्ध केला आहे. कुणाही वाचकाजवळ, ग्रंथप्रेमीजवळ हा ग्रंथ असायला हवा. ग्रंथातील कोणतेही पान उघडावे व वाचावे, मैत्रभावाने प्रकट झालेला हा वाचनसंवाद. २००३ ते २००८ मध्ये आपले वाङ्मयवृत्त, साधना या नियतकालिकातून हे छोटेखानी सदर चालू होते. त्याचे हे देखणे ग्रंथरूप, मराठी, भारतीय व जगभरातील उत्तमोत्तम ग्रंथाची माहिती देणारे हे लेखन आहे. ग्रंथवाचनाचे व मिळविण्याचे व्यसन काय असते व समृद्ध वाचनानुभव काय असतो याची प्रचिती देणारा ग्रंथ. ग्रंथाच्या शेवटी मराठी व इंग्रजीमधील पुस्तकांविषयीची पुस्तके अशी सूची दिली आहे तीही उपयुक्त आहे. तर अशा या गेल्या वर्षभरातील काही निवडक वाचनाविषयीच्या नोंदी. विस्कळीत स्वरूपाच्या.

० ० ०


रणधीर शिंदे

प्लॉट नं. २०४, प्रथमेश अपार्टमेंट, राऊत कॉलनी, अंबाई डिफेन्स परिसर, कोल्हापूर. मोबा. ९८९०९१३०३






**प्रसिद्ध झाला**

**नव्या जाणिवेचे तरुण कवी**

**प्रशांत असनारे यांचा**

**पहिला कवितासंग्रह**

# मीच माझा मोर

**किंमत : रु. १००/–**

**प्रकाशक : पाऊस प्रकाशन, मुंबई**

**वितरक : मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई – ४००००४. दूरध्वनी : २३८७१०५०**

***With Best Compliments from***

# M/s. Bespask

**An ISO 9001 Company**

***Manufacturer of all types of machined Aluminium and Zinc die casting parts. Office & Works***

B-15, MIDC, Gokul Shirgaon, Kolhapur - 416 234
Ph. : 0231 - 2672339

Email : kpr_baspask@sancharnet.in

# सुपर मण्डूक तोक्योला वाचवतो

मूळ कथा : हारुकी मुराकामी
अनुवाद : निशिकांत ठकार



आपल्या अपार्टमेंटमध्ये एक मोठा बेडूक आपली वाट पाहात असल्याचे कातागिरींना आढळले. तो अत्यंत बळकट देहधारी, सहा फुटाहून अधिक उंचीचा, आपल्या मागच्या पायावर उभा होता. त्याच्या जबरदस्त आकारमानाने कातागिरी पार दडपून गेले होते.

''मला 'मंडूक' म्हणून हाक मारा.'' बेडूक स्वच्छ पण वजनदार आवाजात म्हणाला.

कातागिरी दारातच खिळून उभे राहिले. त्यांच्या तोंडातून शब्दही फुटेना

''घाबरू नका, मी इथे तुम्हाला कसलीही इजा करायला आलेलो नाही. सरळ आत या आणि दार बंद करून घ्या, प्लीज.''

उजव्या हातात ब्रीफकेस, ताज्या भाज्यांची पिशवी आणि डाव्या हातात सॅमन माशांचा कॅन अशा अवस्थेत कातागिरींना पुढे येण्याची हिंमतच होईना.

''प्लीज, मि. कातागिरी, लवकर या आणि दार बंद करून घ्या आणि तुमचे बूटही काढून ठेवा.''

आपल्या स्वत:च्या नावाचा उच्चार ऐकल्यामुळे कातागिरी त्या मन:स्थितीतून बाहेर आले. आदेशाप्रमाणे त्यांनी दार बंद करून घेतले. भाजीची पिशवी खाली लाकडी जमिनीवर ठेवली. एका हातात ब्रीफकेस दाबून धरत बुटाचे बंद सोडले. मंडुकाने त्यांना किचन टेबलाजवळ बसायचा इशारा केला. त्याप्रमाणे ते बसले.

''तुम्ही घरात नसताना मी तुमच्या घरात घुसलो याबद्दल मला तुमची क्षमा मागितली पाहिजे, मि. कातागिरी'' मंडूक म्हणाला. ''मला इथे पाहून तुम्हाला धक्का बसेल याची मला कल्पना होती. पण माझ्याकडे दुसरा पर्यायच नव्हता. एखादा कप चहा चालेल का ? मी म्हणलं की आता थोड्याच वेळात तुम्ही घरी याल तर तोपर्यंत थोडं पाणी उकळून ठेवू.''

कातागिरींनी आपली ब्रीफकेस अजूनही काखेत दाबून धरलेली होती. त्यांना वाटलं की कोणीतरी आपली गंमत करत आहे. कोणीतरी ह्या भल्यामोठ्या बेडूक वेषात शिरून आपली टवाळी करत असावं. पण मंडुकाला चहाच्या भांड्यात उकळतं पाणी ओतताना स्वत:शीच गुणगुणत असलेलं पाहिलं तेव्हा त्याचे अवयव आणि त्याची हालचाल ही खऱ्या बेडकाची आहे हे त्यांना कळून चुकलं. मंडुकाने कातागिरींच्या पुढ्यात ग्रीन टीचा कप ठेवला आणि स्वत:साठीही एका कपात चहा ओतून घेतला.

चहाचे घुटके घेत मंडुकाने विचारले, ''शांत झाला का?'' पण तरीही कातागिरी बोलू शकले नाहीत.

''मला माहीत आहे, तुम्हाला भेटण्यासाठी मी तुमची अपॉइंटमेंट घ्यायला हवी होती, मि. कातागिरी. औचित्याची मला चांगलीच जाण आहे. आपल्या घरी एक मोठा बेडूक आपली वाट बघत बसलाय् याचा कुणालाही धक्का बसेल. पण एका फार जरुरीच्या कामासाठी मला इथं यावं लागलं. प्लीज, मला क्षमा करा.''

''फार जरुरीचं काम?'' अखेर कातागिरींनी शब्दांची जुळवाजुळव केली.

''होय खरंच.'' मंडूक म्हणाला. ''नाहीतरी मी एखाद्याच्या घरात घुसायचं स्वातंत्र्य कशाला घेतलं असतं? अशा तऱ्हेची गैरवर्तणूक ही काही माझी नेहमीची रीत नाही.''

''ह्या 'कामाचा' माझ्याशी काही संबंध आहे का?''

''होय आणि नाही'' आपलं डोकं झुकवत मंडूक म्हणाला.

''नाही आणि होय.''

कातागिरींना वाटलं, आपण स्वत:वर चांगला ताबा मिळवायला हवा. ''मी धूम्रपान केलं तर तुमची काही हरकत नाही ना?''

''मुळीच नाही, मुळीच नाही.'' मंडूक हसत म्हणाला. ''हे तुमचं घर आहे. तुम्हाला माझी परवानगी विचारायची गरज नाही. जेवढं पाहिजे तेवढं धूम्रपान करा. प्या. मी स्वत: धूम्रपान करत नाही पण माझी तंबाखूची नावड मी एखाद्याच्या घरात त्याच्यावर नाही लादू शकत.''

कातागिरींनी आपल्या कोटाच्या खिशातून सिगारेटचे पाकिट बाहेर काढले आणि काडी पेटवली. सिगारेट पेटवताना आपला हात कापतोय हे त्यांना दिसले. त्यांच्या समोर बसून मंडूक त्यांची प्रत्येक हालचाल निरखून बघत होता.

अखेर कातागिरींनी हिंमत करून विचारले,

''तुमचा एखाद्या गँगशी काही संबंध असण्याची शक्यता आहे का ''

''हा: हा: हा: हा: हा: हा:! तुम्हाला विनोदाचं मोठं अजब अंग आहे बुवा मि. कातागिरी! '' आपल्या पसरट पंजाने मांडीवर थापा मारत मंडूक म्हणाला. ''कुशल कामगारांची उणीव असेलही सध्या पण आपल्या घाणेरड्या कामासाठी कुठली गँग बेडकाला भाड्याने घेईल हो? त्यांचं हसं नाही का होणार?''

''बरं, तुम्ही पैसे परत करण्यासंबंधात काही वाटाघाटी



**हारूकी मुराकामी**
१२ जाने १९४९, जपान

उत्तर आधुनिक साहित्यातील जागतिक स्तरावरील महत्त्वाचे लेखक आणि अनुवादक.

१९८६ साली जपान सोडून युरोपचा प्रवास करीत अखेर अमेरिकेत स्थायिक झाले.

'काफ्का ऑन दि शोअर', 'आफ्टर दी डार्क', 'स्पुटनिक स्वीटहार्ट, १९८४ ' आदी १२ कादंबऱ्या, 'मिस्ट्रीज ऑफ टोक्यो', 'ब्लाईंड विलो स्लिपिंग वूमन' आदी ४६ कथा, 'बर्थडे स्टोरीज' सारखे संपादन तसेच ६ लेखसंग्रह प्रकाशित.

इमन कपोते, जे. डी. सालिंगर, बिल क्रो आदी नामवंतांच्या साहित्यासह अनेक अनुवाद. स्वत: मुराकामींचे साहित्य ही मराठीसह जगातील ४३ भाषांतून अनुवादित झाले आहे. फरांज काफ्का पुरस्कारासह अनेक प्रतिष्ठित मानसन्मान.

प्रस्तुत कथा (सुपर फ्रॉग सेव्ह टोक्यो) त्यांच्या १९९९ साली प्रकाशित 'आफ्टर द केक' संग्रहात प्रसिद्ध झाली आहे.

करायला आला असाल तर तुम्ही तुमचा वेळ वाया घालवत आहात. असले निर्णय घ्यायचा मला अधिकार नाही. माझे वरिष्ठच फक्त याबाबतीत काय ते करू शकतात. मी फक्त आदेश पाळतो. मला तुमच्यासाठी काहीही करता येणार नाही.''

''प्लीज मि. कातागिरी,'' आपले पसरट बोट वर करत मंडूक म्हणाला, ''मी असल्या किरकोळ कामासाठी आलेलो नाही. तुम्ही तोक्यो सिक्युरिटी ट्रस्ट बँकेच्या कर्ज विभागाच्या शिंजुकू शाखेचे सहायक प्रमुख आहात हे मला चांगले ठाऊक आहे. पण माझ्या भेटीचा संबंध कर्जवसुलीशी नाही. मी इथे तोक्योला विध्वंसापासून वाचवण्यासाठी आलेलो आहे.''

कातागिरींनी खोलीचे बारकाईने निरीक्षण केले. एखाद्या भयंकर भागनडीत मला बळीचा बकरा करण्यासाठी कुठे छुपे कॅमेरे तर बसवलेले नाहीत ना? पण कुठेही कॅमेरे नव्हते. ते लहानसे अपार्टमेंट होते. कुणाला लपून बसण्यासारखी जागा नव्हती.

''नाही.'' मंडूक म्हणाला. ''इथं आपण दोघंच आहोत. मला माहीत आहे की तुम्हाला मी कुणीतरी वेडा आहे असं वाटत असावं, किंवा आपल्याला कसलं तरी स्वप्न पडलेलं आहे असं वाटत असावं, पण मी चक्रम नाही आणि तुम्हाला स्वप्न पडलेलं नाही. ही अगदी शुद्धपणे विधायक अशी गंभीर गोष्ट आहे.''

''तुम्हाला खरं सांगायचं तर मंडूक महाशय -''

''प्लीज,'' आपलं एक बोट वर करीत मंडूक म्हणाला, ''मला नुसते मंडूक म्हणा एकेरी.''

''तुला खरं सांगायचं तर, मंडुका, हे काय चाललं आहे ते मला काही नीटसं उमगलेलं नाही. माझा तुझ्यावर विश्वास नाही अशातली गोष्ट नाही, पण परिस्थिती नेमकी काय आहे हे काही मला समजलेलं नाही. मी तुला एखाद-दुसरा प्रश्न विचारला तर तुझी काही हरकत नाही ना?''

''मुळीच नाही. मुळीच नाही.'' मंडूक म्हणाला. ''परस्परांना समजून घेणं निर्णायक महत्त्वाची गोष्ट आहे. काही जण म्हणतात की, समजून घेणं म्हणजे सगळ्या गैरसमजांची निव्वळ बेरीज करणं होय. हे मत मला मजेशीर वाटतं एक प्रकारे पण, अशा प्रकारच्या सुखद वादविवादात रमण्याची ही वेळ नाही. अत्यंत जवळच्या मार्गानेच आपण परस्परांना समजून घ्यावं हे उत्तम! तेव्हा तुम्हाला जेवढे प्रश्न विचारायचे असतील तेवढे नि:शंकपणे विचारा.''

''आता, तू खराच बेडूक *आहेस*, होय ना?''

''अर्थात् होय. तुम्ही पाहताच आहात ना. मी खराखुराच बेडूक आहे. मी रूपकाची निर्मिती नाही, संकेत नाही, किंवा विरचनाही  नव्हे, नमुना नाही मी किंवा असल्याच आणखी कुठल्या तरी गुंतागुंतीच्या प्रक्रियेचा परिणाम नाही. मी शुद्ध बेडूक आहे. मी तुम्हाला ओरडून दाखवू का?''

मंडूकाने आपले डोके थोडे मागे झुकवले आणि आपल्या गळ्याचे स्नायू फुगवले. ''डराव! ड-रा-व! डराव-डराव-डराव! डराव! डराव! ड-र-आ-व! त्याच्या प्रचंड डरावकाळीने भिंतीवर टांगलेली चित्रे खडखडली.

''छान, कळलं मला, कळलं मला.'' कातागिरी म्हणाले. पण त्याचवेळी त्यांना या सुमार अपार्टमेंटच्या पातळ भिंतीची काळजीही वाटू लागली.''हे थोरच आहे. अगदी नि:संशयपणे, तू खराच बेडूक आहेस.''

''मी सर्व बेडकांची बेरीज आहे असंही कुणी म्हणू शकेल. अर्थात् त्यामुळे मी बेडूक आहे ही वस्तुस्थिती काही

बदलू शकणार नाही. मी बेडूक नाही असे जो कोणी म्हणेल तो तद्दन खोटारडा असेल. मी अशा माणसाचे तुकडे तुकडे करीन!''

कातागिरींनी मान हलवली. स्वत:ला शांत करण्याच्या आशेने त्यांनी कप उचलला आणि तोंड भरून चहा प्यायला.

''मघाशी तू म्हणालास की तू तोक्योला एका मोठ्या विध्वंसापासून वाचवण्यासाठी आला आहेस.''

''बरोबर. मी तेच म्हणालो होतो.''

''कसल्या प्रकारचा विध्वंस?''

''भूकंप.'' मंडूक अत्यंत गंभीरपणे म्हणाला.

तोंडाचा आ वासून कतगिरींनी मंडुकाकडे पाहिले आणि मंडुकाने काहीही न बोलता कातागिरींकडे पाहिले. काही काळ ते एकमेकांकडे असेच बघत राहिले. आता तोंड उघडण्याची मंडुकाची पाळी होती.

''एक खूप खूप मोठा भूकंप फेब्रुवारीच्या अठरा तारखेला सकाळी साडेआठ वाजता तोक्योवर आघात करणार आहे. गेल्या महिन्यात कोबे येथे झाला त्यापेक्षा खूपच मोठा भूकंप होणार आहे. अशा प्रकारच्या भूकंपामुळे मृतांचा आकडा दीड लाखाहून अधिक होण्याची शक्यता आहे – आणि तो कशामुळे तर व्यवस्थेच्या वाहन अपघातांमुळे, रेल्वे घसरल्यामुळे, वाहने पडल्यामुळे, त्यांच्या टक्करीमुळे, उंचावरून नेलेले एक्स्प्रेस रस्ते कोसळल्यामुळे, जमिनीखालून जाणारे मार्ग दबून गेल्यामुळे, ट्रक आणि टँकर यांच्या स्फोटामुळे. इमारतींचे रूपांतर दगड मातीच्या ढिगाऱ्यात होऊन जाईल. त्यातले रहिवासी पडझडीत मरून जातील. सगळीकडे आगी लागतील, मार्गव्यवस्था कोसळून पडेल. ॲम्ब्युलन्स आणि अग्निशामक दलाच्या गाड्यांचा काही उपयोग होणार नाही. लोक इतस्तत: मरणासन्न पडलेले असतील. दीड लाख लोक! अक्षरश: नरक! ज्याला अपण 'नगर' म्हणतो ती सघन सामूहिकता ही वस्तुत: किती क्षणभंगुर आहे हे लोकांना जाणवल्याशिवाय राहणार नाही!!'' डोकं हलक्याने हलवत मंडूक म्हणाला, ''या भूकंपाचे केंद्र शिंजुकूचे वॉर्ड कार्यालय असणार आहे.''

''शिंजुकू वॉर्ड कार्यालयाजवळ?''

''नेमकं सांगायचं तर ते तोक्यो सिक्युरिटी ट्रस्ट बँकेच्या शिंजुकू शाखेच्या बरोबर खाली असेल.''

यानंतर दाट शांतता पसरली.

''आणि तू'' कातागिरी म्हणाले, ''हा भूकंप थांबवण्याची योजना आखतो आहेस?''



''अगदी बरोबर.'' मान हलवीत मंडूक म्हणाला. ''अगदी हेच मी करायचं ठरवलं आहे. तुम्ही आणि मी तोक्यो सिक्युरिटी ट्रस्ट बँकेच्या शिंजुकू शाखेच्या भूमीखाली जायचं आणि **कृमी** नामक प्राण्याशी मरणाची मारामारी करायची.''

ट्रस्ट बँकेच्या कर्ज विभागाचा अधिकारी म्हणून कातागिरीने अनेक लढाया लढत मार्ग काढलेला होता. विद्यापीठातून पदवी मिळवून बँकेच्या स्टाफवर कामाला लागल्यावर पहिल्या दिवसापासून त्यांनी सोळा वर्षे रोज संघर्ष करतच दिवस काढले होते. थोडक्यात सांगायचे तर ते एक वसुली अधिकारी होते – आणि या पदाला तशी काही लोकप्रियता नव्हती. त्यांच्या विभागातला प्रत्येकजण कर्ज द्यायला उत्सुक असायचा. विशेषत: चलन फुगवट्याच्या काळात. त्या दिवसात त्यांच्याकडे इतका पैसा असायचा की जमीन वा शेअर किंवा काहीही गहाण टाकण्यासारखे असले की मागेल तेवढे कर्ज देण्यासाठी कर्जपुरवठा अधिकाऱ्याला पटवता येत असे. किंबहुना जेवढे मोठे कर्ज तेवढी त्यांची कंपनीतली प्रतिष्ठा वाढत असे. त्यातली काही कर्जे कधीच फेडली जात नसत. ती 'बुडीत' समजली जायची. त्यांची वसुली करण्याचं काम कातागिरींकडे असायचे आणि जेव्हा फुगवटा फुटायचा तेव्हा ही कामं वाढायची. आधी शेअर घसरायचे, मग जमिनीच्या किमती आणि गहाण

ठेवलेल्या गोष्टींना काही अर्थ उरायचा नाही. ''तिकडे जा'' बॉसने त्यांना आदेश द्यायचा ''आणि त्यांच्याकडून जेवढं काही पिळून काढता येईल तेवढं काढा.''

शिंजुकूच्या शेजारच्या काबुकिचो हा भाग म्हणजे हिंसाचारांचे नंदनवनच होता. पारंपरिक टोळ्यांचे गुन्हेगार, कोरिअन हुल्लडखोर, चिनी माफिया, बंदुका आणि नशीले पदार्थ, एका अंधाऱ्या अड्ड्यातून दुसऱ्या अड्ड्याकडे गुप्तपणे वाहत जाणारा पैसा, येता जाता नाहीसे होणारे धुराच्या भपकाऱ्यासारखे लोक. कोबुकिचोत बुडित कर्जाची वसुली करण्यासाठी बुडी मारणाऱ्या कातागिरींना हुल्लडबाजांनी अनेक वेळा मारून टाकण्याची धमकी दिलेली होती, पण ते कधीच घाबरले नाहीत. बँकेसाठी धावपळ करणाऱ्या एका माणसाला मारून त्यांना असं काय मिळालं असतं ? त्यांना हवं असतं तर त्यांनी त्याला भोसकून मारून टाकलं असतं. त्यांनी त्याला मारहाणही केली असती. वसुली अधिकारी पदासाठी ते अगदी योग्य होते. बायको नाही, मुलं नाहीत. आईवडील वारलेले. ज्या भावाबहिणींचं कॉलेज शिक्षण केले ती लग्न करून निघून गेलेली. तेव्हा त्यांना मारून टाकलं तरी काय होणार? कुणासाठी काहीही फरक पडणार नाही – अगदी कातागिरींना स्वत:साठीसुद्धा.

थंड आणि शांत अशा कातागिरींना पाहून त्यांच्याऐवजी त्यांना घेराव घालणारे ठगच खचून जायचे. त्यांच्या दुनियेत लवकरच एक कडक माणूस म्हणून त्यांची ख्याती पसरली. पण आत्ता यावेळी ह्या कडक माणसाला काहीच कळेनासे झाले. हा बेडूक कशाबद्दल बोलतो आहे? कृमिनामक प्राणी?

''कोण आहे हा कृमी?'' त्यानी थोडे चाचरतच विचारले.

''कृमी पाताळात राहतो. एक महाकाय जंतू आहे. त्याला जेव्हा राग येतो तेव्हा तो भूकंप घडवून आणतो.'' मंडूक म्हणाला. ''आणि आता त्याला खूप खूप राग आलेला आहे.''

''त्याला *कशाचा* राग आलेला आहे?'' कातागिरीने विचारले.

''मला काही कल्पना नाही.'' मंडूक म्हणाला. ''कृमी आपल्या काळोख्या डोक्यात कसला विचार करतो ते काही कुणालाच सांगता येणार नाही. खूप थोड्या जणांनी त्याला पाहिलं आहे. तो बहुधा झोपलेलाच असतो. खरं तर त्याला एवढंच आवडतं. लांब लांब डुलक्या घेणं. तो वर्षानुवर्षे, दशकानुदशकं उबदार आणि अंधाऱ्या पाताळात झोपलेला असतो. तुम्ही कल्पना करू शकता की झोपून झोपून त्याचे डोळे कसे क्षीण झालेले असतील आणि त्याच्या मेंदूची जेली होऊन गेली असेल. मला जर विचाराल तर माझा असा अंदाज आहे की तो काहीच विचार करत नसावा. तिथे नुसतं पडून रहात तो त्याच्यापर्यंत येणारे सर्व लहान सहान आवाज, गडगडाट वा प्रतिध्वनी आपल्या शरीरात जिरवत साठवून ठेवत असावा आणि कुठल्या तरी रासायनिक प्रक्रियेने त्यांचे क्रोधात रूपांतर करत असावा. हे का घडत असावं ते मला नाही सांगता येणार. मी कधीच त्याचा खुलासा करू शकणार नाही.''

मंडूक गप्प बसला. आपल्या शब्दांचा काय परिणाम होतो याची वाट बघत राहिला. मग पुढे म्हणाला,

''कृपा करून माझ्याविषयी गैरसमज करून घेऊ नका. खरं तर कृमीविषयी माझ्या मनात कसलीही वैयक्तिक वैरभावना नाही. दुष्टत्वाचे साकार रूप म्हणून मी त्याच्याकडे पाहात नाही. मला त्याचा मित्र व्हायचं आहे अशातलीही गोष्ट नाही. मला असं वाटतं की या जगाच्या बाबतीत म्हणाल तर एक प्रकारे त्याच्यासारख्याचं अस्तित्व असणं हेही *बरोबरच* म्हणावं लागेल. हे जग म्हणजे एखाद्या मोठ्या ओव्हरकोटासारखं आहे आणि त्याला विविध प्रकारचे आकार आणि आकृत्या सामावण्यासाठी खूप खिसे आवश्यक असतात. पण आत्ता या क्षणी कृमी अशा अवस्थेला येऊन पोहोचला आहे की त्याच्याकडे दुर्लक्ष करणं हे फार घातक ठरेल. गेल्या कित्येक वर्षांपासून अनेक प्रकारचे द्वेष त्याने रिचवले आणि आपल्यामध्ये साठवून ठेवले आहेत. त्यामुळे त्याचं हृदय आणि शरीर प्रचंड प्रमाणात फुगलं आहे. आत्तापर्यंत कधी नाही एवढं. आणि दुष्काळात तेरावा महिना यावा याप्रमाणे गेल्या महिन्यातल्या कोबेच्या भूकंपाने त्याला त्याच्या सुखद झोपेतून गदागदा हलवून जागं केलं आहे. त्याच्या आत दबलेल्या प्रचंड रागानं त्याला जाणीव करून दिली आहे. आता प्रचंड मोठा भूकंप घडवून आणण्याची त्याची वेळ झालेली आहे आणि तो इथे या तोक्योत घडवणार आहे. मि. कातागिरी, मी काय बोलतो आहे हे मला समजते आहे. पाताळातल्या माझ्या जवळचे मित्र असलेल्या काही जीवांनी भूकंपाची वेळ आणि त्याचे प्रमाण याविषयी विश्वसनीय माहिती पुरवलेली आहे.

मंडुकाने झपकन् आपलं तोंड बंद केले आणि गोलगोल डोळे मिटून घेतले. तो थकला होता हे दिसत होते.

कातागिरी म्हणाले, ''म्हणजे तू म्हणतोस त्याचे तात्पर्य असे की तू आणि मी दोघांनी मिळून पाताळात जायचे आणि

भूकंप थांबवण्यासाठी कृमीशी लढायचे.''

''अगदी बरोबर.''

कातागिरी आपला चहाचा कप घेण्यासाठी पुढे झाले, कप उचलला आणि पुन्हा ठेवून दिला. ''मला अजूनही कळत नाही,'' ते म्हणाले,''तू तुझ्याबरोबर येण्यासाठी *माझी* निवड काय म्हणून केली?''

मंडूकाने कातागिरींच्या डोळ्यात थेट पाहिले आणि म्हटले, ''मला तुमच्याविषयी अतिशय आदर वाटत आला आहे मि. कातागिरी. सोळा वर्षांच्या दीर्घ कालावधीत तुम्ही मुकाट्याने अतिशय धोक्याच्या आणि कसलेही आकर्षण नसलेल्या कामगिऱ्या पार पाडत आला आहात – इतरांनी टाळला असता असा व्यवसाय – आणि तुम्ही तो अतिशय छानपणे पार पाडत आला आहात. तुमच्यासाठी हे किती कठीण होते हे मी पुरेपूर जाणून आहे आणि मला माहीत आहे की तुमच्या वरिष्ठांनी किंवा तुमच्या सहकाऱ्यांनी तुमच्या या कर्तृत्वाचे करावे तेवढे नीट कौतुक केलेले नाही. ते आंधळे आहेत. सगळेच्या सगळे आंधळे. कामाचे कौतुक नाही, वरची श्रेणी नाही, तरीही तुम्ही एकदाही तक्रार केली नाही.

''तुमच्या कामापुरतीच ही गोष्ट नाहीये. तुमचे आईवडील गेल्यानंतर तुमच्या लहान भावाबहिणीला तुम्ही एकहाती वाढवले, त्यांना कॉलेजपर्यंतचे शिक्षण दिले आणि त्यांची लग्नेसुद्धा लावून दिली. आणि यासाठी तुम्ही तुमच्या वेळेचा आणि धनाचाही त्याग केला. किंबहुना स्वत:च्या लग्नाच्या भवितव्याचाही तुम्ही विचार केला नाही. असे असूनही तुमच्या भावाने किंवा बहिणीने तुम्ही त्यांच्यासाठी ज्या खस्ता खाल्ल्या त्याबद्दल एकदाही कृतज्ञता व्यक्त केली नाही. कृतज्ञता तर सोडाच पण त्यांनी तुमचा कधी आदरही केला नाही. उलट तुमचा प्रेमळ दयाळूपणा विचारात न घेता तुमच्याशी क्रूर तुच्छतेने वागले. माझं तर असं मत आहे की त्यांचं वागणं हे अत्यंत अनुचित आहे. माझी तर अशी इच्छा आहे की तुमच्या वतीनं त्यांना चांगला ठोकून काढून त्यांचा चेंदामेंदा करावा. पण, मी पाहतोय् की तुमच्या चेहऱ्यावर रागाचा कसलाच मागमूसही नाही.


''प्रामाणिकपणे सांगायचं झालं तर मि. कातागिरी, तुमच्याकडे पाहण्यासारखं काही नाही, तुमच्याजवळ बोलण्याचं कौशल्य नाही. त्यामुळे तुमच्या आसपास जे लोक आहेत ते तुमच्याकडे उपेक्षेनेच बघतात. पण, मी तुमच्याकडे एक समजूतदार आणि साहसी माणूस म्हणून बघतो. संपूर्ण तोक्योत असलेल्या लाखो लोकांत तुमच्याशिवाय एकही माणूस असा नाही की जो माझ्या बाजूने लढायला उभा राहील असा विश्वास त्याच्यावर टाकावा.''

''मला सांगा, मंडूक महाशय'' कातागिरी म्हणाले.

''कृपा करा,'' मंडूक पुन्हा एकदा आपले बोट वर करत म्हणाला, ''मला नुसतं मंडूक म्हणा.''

''मला सांग मंडुका'' कातागिरी म्हणाले, ''तुला माझ्याबद्दल इतकं कसं काय माहीत ?''

''त्याचं काय आहे मि. कातागिरी, इतकी वर्षं काही मी नुसतीच बेडूकगिरी करत नव्हतो. जीवनातल्या महत्त्वाच्या गोष्टींकडे माझे लक्ष असते.''



''तरी पण, मंडुका'' कातागिरी म्हणाले, ''मी काही फार बलवान नाहीये आणि जमिनीखाली काय घडतंय् याचे मला तिळमात्रही ज्ञान नाही. खालच्या अंधारात कृमीशी लढा द्यायला योग्य असे माझे स्नायू नाहीत. माझी खात्री आहे, माझ्यापेक्षा बलवान माणूस तुम्हाला नक्की मिळेल. उदाहरणार्थ कराटे करणारा माणूस किंवा आत्मसुरक्षा दलातले कमांडो.''

मंडूकाने आपले मोठे डोळे गरगरा फिरवले. ''मि. कातागिरी.'' तो म्हणाला, ''तुम्हाला खरं सांगायचं तर लढण्याचं जे *काम* आहे ना ते मीच करणार आहे. पण मी ते एकटा नाही करू शकत. त्याची गुरुकिल्ली हीच आहे. मला तुमच्या साहसाची आणि न्यायासाठी तुमची जी चाड आहे त्याची गरज आहे. तुम्ही माझ्या पाठीशी उभे राहून असं म्हणण्याची गरज आहे की, ''चल पुढे, मंडुका ! तू मोठं काम करून राहिला आहेस! तू जिंकणार याची मला खात्री आहे ! तू चांगली लढाई लढतो आहेस!''

मंडुकाने आपले हात लांब पसरले. मग पुन्हा खाली आपल्या मांडीवर पसरट हाताने थापा मारल्या.

''मि. कातागिरी, अतिशय प्रामाणिकपणे सांगायचं झालं तर अंधारात कृमीशी लढा द्यायची मला फार भीती वाटतेय्. गेली अनेक वर्षे मी शांततावादी, कलाप्रेमी, निसर्गात रममाण होणारा म्हणून राहात आलो आहे. लढणे ही काही मला आवडणारी गोष्ट नाही. मी ते करतो आहे कारण मला ती केली पाहिजे. आणि ही जी विशिष्ट लढाई आहे ना ती खूप भयंकर असणार आहे यात संशय नाही. मी त्यातून वाचणारही नाही. त्या प्रकारात माझे एकदोन अवयवही जायबंदी होतील. मला नाहीच पळून जाता येणार – मी नाहीच पळून जाणार. नीत्शे म्हणाला होता ना, निर्भयता म्हणजेच सर्वोत्तम शहाणपणा. मला तुमच्याकडून काय पाहिजे आहे माहिती आहे, मि. कातागिरी ? तुम्ही फक्त तुमची साधी हिम्मत मला द्यायची. खऱ्या मित्राप्रमाणे संपूर्ण हार्दिक आधार मला द्यायचा. मी तुम्हाला काय सांगायचा प्रयत्न करतोय् ते तुमच्या लक्षात येतंय् का ?''

कातागिरींना यातल्या कशाचाच अर्थ लागत नव्हता. पण तरीही त्यांना असं वाटलं – खोटं वाटेलही कदाचित– की मंडुकाने जे सांगितलय् त्यावर आपण विश्वास ठेवू शकतो. मंडुकाच्या चेहऱ्यावरचे भाव, त्याची बोलण्याची पद्धत – यात काही तरी असं होतं की त्याच्या स्वच्छ प्रामाणिकपणाच हृदयाचा ठाव घेणारा होता. सिक्युरिटी ट्रस्ट बँकेच्या सर्वात कठीण अशा विभागात अनेक वर्षे काम केल्यानंतर कातागिरींना अशा गोष्टींचा अर्थ समजण्याची शक्ती लाभलेली होती. त्यांच्यासाठी हा त्यांचा दुसरा स्वभावच झालेला होता.

''तुम्हाला हे सर्व समजून घेणं खूप अवघड आहे याची मला जाणीव आहे. एक प्रचंड मोठा बेडूक धाडकन् तुमच्या निवासस्थानी येतो आणि तुम्हाला या चमत्कारिक गोष्टीवर विश्वास ठेवायला सांगतो. त्यावरची तुमची प्रतिक्रिया अगदी स्वाभाविक आहे आणि म्हणून मी अस्तित्वात आहे यासंबंधी तुम्हाला पुरावा द्यायची माझी इच्छा आहे. मला सांगा, मि. कातागिरी, बिग बेअर ट्रेडिंगला जे कर्ज बँकेने दिले ते वसूल करायला तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागतो आहे की नाही?''

''खरं आहे तुम्ही म्हणता ते'' कातागिरी म्हणाले.

''ठीक. या घटनेमागे त्यांचे अनेक खंडणी बहाद्दर कामाला लागलेले आहेत आणि ते दंगेखोर लोकात मिसळून काम करतात. कंपनीचं दिवाळं वाजवायचं आणि आपण कर्जमुक्त व्हायचं अशा प्रकारची त्यांची योजना आहे. तुमच्या बँकेच्या कर्जपुरवठा अधिकाऱ्याने नीट चौकशी न करताच त्यांच्यापुढे थैल्या रिकाम्या केल्या आणि नेहमीप्रमाणेच आता साफसफाई करायचं काम तुमच्याकडे आलेलं आहे, होय ना मि. कातागिरी ? आणि या लोकांच्यावर कारवाई करणं तुम्हाला फार कठीण जात आहे. ते काही कच्च्या गुरूचे चेले नाहीत. त्यांच्या पाठीशी एखादा बाहुबली पुढारीही असण्याची शक्यता आहे. सत्तर कोटी येनची भानगड आहे. या परिस्थितीचा सामना तुम्ही करत आहात. मी म्हणतो ते बरोबर आहे ना?''

''खात्रीनं बरोबर आहे तुम्ही म्हणता ते.''

मंडुकाने आपले हात लांब पसरले. त्याच्या बोटातले पडदे दुबळ्या पंखासारखे उघडे पडले. ''काळजी करू नका मि. कातागिरी, ते सगळं माझ्यावर सोडा. उद्या सकाळपर्यंत ह्या वृद्ध मंडुकाने तुमचे सगळे प्रश्न सोडवलेले असतील. आराम करा आणि रात्री सुखाने झोपी जा.''

चेहऱ्यावर मोठे स्मित करीत मंडूक उठला. वाळून गेलेल्या समुद्री प्राण्याप्रमाणे अंग सपाट करीत बंद दाराच्या बाजूला असलेल्या सापटीतून मंडूक बाहेर पडला. आत कातागिरींना एकट्याला सोडून. कातागिरींच्या स्वयंपाक घरातील टेबलावरचे चहाचे दोन कप हीच अपार्टमेंटमध्ये मंडूक येऊन गेला याची एकमेव निशाणी.

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता कातागिरी कामावर गेले त्याच क्षणी त्यांच्या टेबलावरचा फोन घणघणला.

''मि. कातागिरी,'' एका माणसाचा आवाज आला. तो थंड आणि व्यावसायिक सुरातला होता. ''माझं नाव शिराओका. बिग बेअर प्रकरणात मी ॲटर्नी आहे. पेंडिंग पडलेल्या कर्ज प्रकरणाबद्दल आज सकाळीच माझ्या अशीलाकडून मला फोन आला. संपूर्ण रक्कम ठरलेल्या तारखेपूर्वी परत करण्याची पूर्ण जबाबदारी त्यांनी घेतली आहे असे तुम्हाला कळवायला सांगितले आहे. या अर्थाचे हमीपत्रही ते तुम्हाला लिहून देणार आहेत. त्यांची तुम्हाला एकच विनंती आहे की तुम्ही पुन्हा मंडुकाला त्यांच्या घरी पाठवू नये. मी पुन्हा एकदा सांगतो. तुम्ही मंडुकाला त्यांच्या घरी कधीही पुन्हा जायला सांगू नये. याचा एकूण अर्थ काय आहे तो मला समजला आहे असे नाही पण तुम्हाला तो स्पष्ट झाला असेल असा विश्वास मला वाटतो. मी म्हणतो ते बरोबर आहे ना मि. कातागिरी ?''

''अगदी बरोबर आहे तुम्ही म्हणता ते.'' कातागिरी म्हणाले.

''मंडुकाला हा संदेश पोहोचवण्याची कृपा तुम्ही कराल असा विश्वास मला वाटतो.''

''मी ते काम करीन. तुमच्या अशीलाला मंडूक पुन्हा कधीही दिसणार नाही.''

''तुमचे खूप खूप आभार. मी उद्यापर्यंत तुमच्यासाठी हमीपत्र तयार करून ठेवतो.''

''प्रशंसा केली पाहिजे तुमची'' कातागिरी म्हणाले.

फोनचे कनेक्शन तुटले.

दुपारच्या भोजनाच्या सुट्टीत मंडुकाने त्यांची ट्रस्ट बँकेच्या कार्यालयात भेट घेतली.

''ते बिग बेअरचे प्रकरण आता तुमच्यासाठी मार्गी लागले असावे असे मला वाटते ?''

कातागिरींनी अस्वस्थपणे इकडे तिकडे पाहिले.

''काळजी करू नका.'' मंडूक म्हणाला. ''फक्त तुम्ही एकटेच मला पाहू शकता. पण मी खरोखरच अस्तित्वात आहे या विषयी तुमची खात्री झाली असेल यात मला शंका नाही. मी काही कल्पनाजन्य उत्पादन नाही. मी कृती करू शकतो आणि परिणामही घडवून आणू शकतो. मी एक खराखुरा सजीव प्राणी आहे.''

''मला सांगा, मंडूक महाशय –''

''कृपा करा,'' मंडूक म्हणाला, ''मला नुसते मंडूक म्हणा.''

''बरं, मला सांग मंडुका'' कातागिरी म्हणाले, ''तू त्यांना काय केलेस ?''

''ओह् ! काही विशेष नाही.'' मंडूक म्हणाला, ''कोबीचा लहान गड्डा उकळण्यापेक्षाही कमी गुंतागुंतीची क्रिया. मी त्याला फक्त जरासं घाबरवलं. बस् थोडीशी मानसिक दहशत. जोसेफ कोन्राडनं ऐक ठिकाणी लिहिलं होतं ना, की कल्पनेतल्या भुताचीच माणसाला खरी दहशत असते. पण ते जाऊ द्या. तुम्ही नका लक्ष घालू, मि. कातागिरी. मला बिग बेअरच्या प्रकरणासंबंधी सांगा. ते ठीक चाललंय् ना ?''

कातागिरींनी मान हलवली आणि एक सिगारेट पेटवली. ''असं दिसतंय् खरं.''

''तर मग गेल्या रात्री मी ज्या गोष्टीबद्दलची चर्चा सुरू केली होती तिच्यासंबंधी तुमचा विश्वास संपादन करण्यात मी यशस्वी झालो आहे असं म्हणायला हरकत नाही ना ? कृमीविरुद्धच्या लढाईत तुम्ही मला साथ देणार ना ?''

निश्वास सोडत कातागिरींनी आपला चष्मा काढून त्याच्या काचा साफ केल्या. ''तुला खरं सांगायचं तर त्या विचारानं मी काही फार वेडा झालेलो नाही पण त्यातून बाहेर पडायला तेवढं पुरेसं आहे असेही मला वाटत नाही.''

''नाही'' मंडूक म्हणाला, ''ही गोष्ट जबाबदारीची आणि सन्मानाची आहे. तुम्ही त्या विचारानं फार 'वेडे' झाला नसालही पण आपल्यापुढे पर्याय नाही. तुम्हाला आणि मला जमिनीखाली जाऊन कृमीला सामोरे जायलाच हवे. या कारवाईत आपले प्राण गेले तर आपल्याला कुणाचीही सहानुभूती मिळणार नाही आणि जरी आपण कृमीला हरवू शकलो तरी आपली कुणी प्रशंसा करणार नाही. आपल्या पायाखाली खोलवर अशी काही लढाई झाली आहे याची खबरही कुणाला असणार नाही. फक्त तुम्हाला आणि मलाच माहीत असणार मि. कातागिरी. निकाल काहीही लागो, लढाई फक्त आपली एकांतिक असणार आहे.''

कातागिरींनी एकवार आपल्या हाताकडे पाहिले मग आपल्या सिगारेटमधून वर येणाऱ्या धुराकडे पाहिले. अखेर ते म्हणाले, ''मंडूक महाशय, तुम्हाला तर ठाऊकच आहे की मी एक अगदी सामान्य माणूस आहे.''

''कृपा करून फक्त मंडूक म्हणा.'' मंडूक म्हणाला, पण कातागिरींनी त्याकडे दुर्लक्ष केले.

''मी अगदी अति सामान्य माणूस आहे. सामान्यापेक्षाही कमीच. मला टक्कल पडू लागलं आहे. ढेरी सुटू लागली आहे. गेल्या महिन्यात मी चाळिशी ओलांडली. माझे पाय सपाट झाले आहेत. डॉक्टरांनी मला नुकतेच सांगितलय् की माझ्यात मधुमेहाची लक्षणे दिसायला लागली आहेत. बाईबरोबर मी गेल्या तीन महिन्यांपासून झोपलेलो नाही आणि त्यावेळीही मला पैसे मोजावे लागले आहेत. कर्जवसुली करतो म्हणून आमच्या विभागात मला थोडीफार मान्यता मिळते पण तो काही खरा आदरभाव नव्हे. माझ्या कामाच्या ठिकाणी किंवा माझ्या व्यक्तिगत आयुष्यात मी ज्याला आवडावा असा एकही माणूस नाही. लोकांशी कसं बोलावं ते मला कळत नाही. अनोळखी लोकांशी मी नीट वागत नाही. त्यामुळे मी कधीही मित्र करू शकलो नाही. माझ्यात कसलेही क्रीडाकौशल्य नाही. मला संगीताचा कान नाही. मी बुटका आहे. मला दूरचे दिसत नाही – आणि माझ्या डोळ्यात फूल पडलेलं आहे. खाणे, झोपणे आणि शी करणे एवढ्याच गोष्टी मी करतो. मी का जगतो आहे हेही मला ठाऊक नाही. तोक्योला वाचवायला माझ्यासारखा माणूस काय कामाचा ?''

''कारण, मि. कातागिरी, तोक्योला तुमच्या सारखीच माणसं वाचवू शकतात आणि तोक्योला वाचवण्यासाठी मी जे प्रयत्न करतो आहे ते तुमच्यासारख्या लोकांसाठी.''

कातागिरींनी पुन्हा निश्वास सोडला. ''ठीक आहे तर मग, मी काय करावं असं तुम्हाला वाटतं?''

•••

मंडूकाने कातागिरींनी आपली योजना सांगितली. १७ फेब्रुवारीच्या रात्री आपण जमिनीखाली जायचे. (भूकंप होणार त्याच्या एक दिवस आधी) तोक्यो सिक्युरिटी ट्रस्ट बँकेच्या शिंजुके शाखेच्या तळघरात असलेल्या बॉयलर रूमखाली रस्ता असेल. रात्री उशिरा आपण तेथे भेटू. (ओव्हर टाईम करण्याच्या बहाण्याने कातागिरी त्या इमारतीतच थांबतील.) एका भिंतीच्या मागे काटकोनात आत उतरण्याचा मार्ग असेल. दीडशे फुटाच्या दोरीच्या शिडीच्या साहाय्याने खाली तळाशी गेल्यावर आपला कृमी सापडेल.''

''तुझ्या डोक्यात लढाईची काही योजना आहे का ?'' कातागिरींनी विचारले.



''अर्थातच आहे. लढाईची व्यवस्थित योजना असल्याशिवाय कृमीसारख्या शत्रूला हरवण्याची कल्पना देखील करता येणार नाही. तो सडसडीत प्राणी आहे. त्याचं तोंड कोणीकडे आणि मागचं अंग कोणीकडे हे काही सांगता येणार नाही आणि तो पॅसेंजर ट्रेनइतका मोठा आहे.''

''तुझी लढाईची योजना काय *आहे*''

विचारपूर्ण विराम घेतल्यानंतर मंडूक उत्तरला, ''हंऽऽ, ते काय म्हणतात ना, मौनं सर्वार्थ साधनम्''

''म्हणजे मी विचारू नये असं तुला म्हणायचं का?''

''असं म्हणण्याची ती एक शैली आहे.''

''शेवटच्या क्षणी मी घाबरलो आणि पळून गेलो तर ? तर मग मंडूक महाशय, तुम्ही काय कराल ?''

''मंडूक''

''मंडुका, मग तू काय करशील ?''

मंडुकाने यावर थोडा वेळ विचार केला आणि म्हणाला, ''मी एकटाच लढत राहीन. वेगाने जाणाऱ्या रेल्वे इंजिनाला मागे टाकण्याची जेवढी संधी ॲना करेनिनाला होती त्यापेक्षा कदाचित जास्त संधी मला त्याला हरवण्याची आहे, मि. कातागिरी. तुम्ही 'ॲना कॅरेनिना' वाचलीत का ?''

कातागिरींनी ती कादंबरी वाचलेली नाही हे ऐकल्यावर मंडुकाने त्यांच्याकडे अशा काही नजरेने पाहिले की, जणू म्हणत असावा, ''लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे.'' मंडुकाला *ॲना कॅरेनिना* फारच आवडत असावी हे उघड दिसत होते.

''तरीही, मला असा विश्वास वाटतो, मि. कातागिरी की,

तुम्ही मला एकट्याला लढायला सोडून पळून जाणार नाही. मी खात्रीनं सांगू शकतो. वृषण शाबूत असण्याचाच हा प्रश्न आहे. दुर्दैवाने मला ते नाही. हा: हा: हा:!'' मंडूक मोठं तोंड करून हसला. मंडुकाला वृषण नव्हते एवढेच नाही तर त्याला दातही नव्हते.

अर्थात् अनपेक्षित गोष्टी या घडतच असतात.

फेब्रुवारीच्या सतरा तारखेला संध्याकाळी कातागिरींना गोळ्या घालण्यात आल्या. दिवसभराचा दौरा आटोपून शिंजुकूच्या रस्त्यावरून ते ट्रस्ट बँकेच्या दिशेने परत चालले होते तेव्हा लेदर जॅकेट घातलेला एक तरुण त्यांच्यासमोर येऊन टपकला. त्या माणसाचा चेहरा निर्विकार होता आणि त्याच्या एका हातात एक लहान काळे पिस्तुल होते. ते पिस्तुल *एवढे* लहान आणि इतकेकाळे होते की खरेच वाटत नव्हते. कातागिरींनी त्या माणसाच्या हातातील त्या वस्तूकडे पाहिले पण त्याने ती आपल्यावर रोखली आहे आणि तिचा चाप तो ओढतो आहे ही गोष्टही त्यांच्या ध्यानात आली नाही. घटना अतिशय वेगाने घडली; त्यांना काही कळलेच नाही. पण पिस्तुल खरोखरच चालवले गेले होते.

पिस्तुलाची नळी हवेत उठलेली कातागिरींना दिसली आणि त्याच क्षणी आपल्या उजव्या खांद्यावर कोणी तरी घणाघात केला आहे असे त्यांना जाणवले. त्यांना वेदना झाल्या नाहीत. पण या धक्क्याने ते रस्त्याच्या कडेला आडवे पसरले. त्यांच्या उजव्या हातातली लेदरची ब्रीफकेस उडून उलट्या दिशेला जाऊन पडली. त्या माणसाने पुन्हा त्यांच्यावर नेम धरला. दुसऱ्या गोळीचा आवाज आला. बाजूच्या खाद्य पदार्थाच्या दुकानाच्या पाटीचे त्यांच्या डोळ्यासमोर तुकडे तुकडे झाले. लोकांच्या किंकाळ्या त्यांना ऐकू आल्या. त्यांचा चष्मा उडून गेला होता. सगळं काही अंधुक झालं होतं. एक माणूस पिस्तूल रोखून आपल्याकडे येत आहे असं अस्पष्ट काही त्यांना जाणवत होतं. त्यांना वाटलं, आपण आता मरणार. माणसांना खरी दहशत ही त्यांच्या कल्पनेतूनच बसत असते असे मंडूक म्हणाला होता. कातागिरींनी कल्पनेचा स्विच तोडून टाकला आणि वजनरहित मौनात ते बुडून गेले.

जेव्हा त्यांना जाग आली तेव्हा ते बिछान्यावर पडलेले होते. त्यांनी आपला एक डोळा उघडला, आसपासची काय परिस्थिती आहे याचा क्षणभर अंदाज घेतला आणि मग दुसरा डोळा उघडला. त्यांच्या दृष्टीच्या कक्षेत पहिल्यांदा जर कुठली गोष्ट आली असेल तर बिछान्याच्या वरच्या अंगाला असलेला एक लोखंडी स्टॅण्ड आणि त्या स्टँडपासून ते झोपले होते तिथपर्यंत आलेली एक शिरेत जाणारी नळी. नंतर त्यांना पांढऱ्या शुभ्र वेषातली नर्स दिसली. आपण एका कठीणशा बिछान्यात पाठीवर झोपलेलो असून कसल्या तरी विचित्र कपड्यात आपल्याला गुंडाळलेले आहे आणि आत आपण नागडेच असणार बहुतेक.

अरे हो, त्यांना आठवले, आपण रस्त्याच्या कडेने जात असताना एका माणसाने आपल्यावर गोळी झाडली होती. बहुतेक खांद्यावर. उजव्या. मनातल्या मनात त्यांनी ते दृश्य उभे केले. त्यांना जेव्हा त्या तरुण माणसाच्या हातातले लहानसे काळे पिस्तूल आठवले तेव्हा त्यांच्या हृदयाला एक अस्वस्थ करणारा धक्का बसला. रांडेचे मला ठार मारून टाकणार होते ! त्यांना आठवले. पण मी त्यातून सुखरूप वाचलो असं दिसतंय्. माझी आठवण जागी आहे. मला काही वेदनाही होत नाहीयेत आणि नुसत्या वेदनाच नाही, मला कसलीच जाणीवही होत नाहीय्. मला माझा हात उचलता येत नाहीये....

इस्पितळाच्या खोलीला खिडक्या नव्हत्या. दिवस आहे की रात्र आहे हे त्यांना काही समजत नव्हते. संध्याकाळी पाचच्या सुमारास त्यांना गोळ्या घालण्यात आल्या होत्या. त्यानंतर किती वेळ झाला असेल ? मंडुकाला भेटायची ठरलेली वेळ टळून गेली असेल का? कातागिरींनी खोलीत घड्याळ कुठे दिसते आहे का यासाठी इकडे तिकडे पाहिले. पण चष्मा नसल्यामुळे त्यांना अंतरावरचे काहीच दिसू शकले नाही.

''माफ करा,'' त्यांनी नर्सला बोलावले.

''हे प्रभु! अखेर तुम्ही शुद्धीवर आला म्हणायचे.'' नर्स म्हणाली.

''आता किती वाजले आहेत?''

तिने आपल्या घड्याळाकडे पाहिले.

''सव्वा नऊ.''

''रात्रीचे?''

''काहीतरीच काय, सकाळ झाली आहे.''

''सकाळचे सव्वा नऊ?'' कातागिरी विव्हळून म्हणाले. उशीवरून मोठ्या कष्टानेच ते डोकं उचलू शकत होते. त्यांच्या घशातून जो खरखरीत आवाज आला तो दुसऱ्याच कुणाचा तरी आवाज असावा असं वाटत होते. ''१८ फेब्रुवारीच्या सकाळचे सव्वा नऊ?''

''बरोबर'' नर्स म्हणाली. आपल्या डिजिटल वॉचवरची

तारीख न्याहाळण्यासाठी पुन्हा एकदा हात वर करून तिने पाहिले.

''आज सकाळी तोक्योत मोठा भूकंप नाही झाला?''

''तोक्योत?''

नर्सने मान हलवली. ''मला तरी ठाऊक नाही.''

त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला. काही काही का झाले असे ना, अखेर भूकंप टळला एवढे खरे.

''माझी जखम कशी आहे?''

''तुमची जखम?'' तिने विचारले, ''कसली जखम?''

''मला जिथे गोळी लागली होती ती.''

''गोळी ?''

''हो. ट्रस्ट बँकेच्या प्रवेशदारापाशी कुण्या तरुणानं मला गोळी मारली होती. मला वाटतं उजव्या खांद्यावर.''

नर्सने काळजी वाटून त्यांच्याकडे पाहात स्मित केले. ''माफ करा, मि. कातागिरी, पण तुम्हाला कुठेही गोळी लागलेली नाही.''

''मला गोळी लागलेली नाही? खात्री आहे तुमची?''

''आज सकाळी भूकंप झालेला नाही ही जितक्या खात्रीची गोष्ट आहे, तितक्याच खात्रीची ही पण आहे.''

कातागिरी दिङ्मूढ झाले. ''तर मग मी इथं या इस्पितळात काय करतो आहे?''

''कुणी तरी तुम्हाला रस्त्यात बेशुद्ध होऊन पडलेलं पाहिलं. शिंजुकूच्या जवळच्या काबुकिचो भागात. तुम्हाला बाह्य स्वरूपात कोणत्याही जखमा झालेल्या नाहीत. तुम्ही फक्त काहीसे गारठलेले होता. ते का ते आम्हाला अजूनही समजलेलं नाही. लवकरच इथे डॉक्टर येतील. तुम्ही त्यांनाच विचारलेलं बरं.''

रस्त्यावर बेशुद्ध पडलो होतो? आपल्यावर पिस्तुलाने नेम धरलेला होता आणि त्यातून गोळी सुटलेली होती याविषयी कातागिरींना शंका नव्हती. त्यांनी एक खोल श्वास घेतला आणि आपले डोके सरळ ठेवण्याचा प्रयत्न केला. सर्व घटना व्यवस्थित मांडून पाहिल्या पाहिजेत पहिल्यापासून.

''काल संध्याकाळपासून या इस्पितळातल्या बिछान्यावर मी पडून आहे असं तुम्ही मला सांगत आहात, बरोबर?''

''बरोबर.'' नर्स म्हणाली. ''आणि तुमच्यासाठी रात्र खरोखरच फार वाईट गेली, मि. कातागिरी. तुम्हाला काहीतरी भयंकर वाईट स्वप्न पडलं असावं. ''मंडूक, अरे मंडूक!'' असं काही तरी तुम्ही बरळत असलेलं मी ऐकलं. तुमच्या कुण्या मित्राचं टोपण नाव आहे का मंडूक म्हणून?''

कातागिरींनी डोळे मिटले आणि आपल्या आयुष्याचे क्षण टपकून नेत असल्याप्रमाणे आपल्या हृदयाचे मंद लयीतले ठोके ऐकले. आपल्याला आठवतंय् त्यातलं खरं खरं किती घडून आलंय् आणि किती आभास होता? मंडूक खरोखरच अस्तित्वात होता का? त्यानं भूकंप थांबवण्यासाठी कृमीशी लढाई केली का? का ते सगळं एका दीर्घ स्वप्नाचा भाग होतं? खरं काय याची कातागिरींना कल्पना नव्हती.

● ● ●

त्या रात्री मंडूक इस्पितळात आला. ते जागे झाले तेव्हा भिंतीकडे पाठ करून एका घडीच्या लोखंडाच्या खुर्चीवर अंधुक उजेडात बसलेला तो त्यांना दिसला. मंडुकाच्या मोठ्या टपोऱ्या हिरव्या पापण्या एका आडव्या सरळ फटीत मिटलेल्या होत्या.

''मंडुका!'' कातागिरींनी त्याला मोठ्याने हाक मारली.

मंडुकाने सावकाश आपले डोळे उघडले. त्याच्या श्वासोच्छ्वासाबरोबर त्याचे पांढरे पोट खालीवर होत होते.

''वचन दिल्याप्रमाणे मी तुला बॉयलर रूमच्या खाली भेटायला यायचे ठरवलेले होते'' कातागिरी म्हणाले. ''पण संध्याकाळी मला एक अपघात झाला – अगदी अनपेक्षितपणे – आणि ते मला इथे घेऊन आले.''

मंडुकाने आपले डोके किंचित् हलवले. ''ठाऊक आहे मला. ठीक आहे. काळजी करू नका. माझ्या लढाईत तुमची खूपच मदत झाली मला, मि. कातागिरी.''

''माझी मदत झाली?''

''होय. तुमची मदत झाली. तुमच्या स्वप्नातून तुम्ही खूप मोठी कामगिरी पार पाडली. त्यामुळेच कृमीशी लढाई करून त्याला संपवणे, मला शक्य झाले. माझ्या विजयाबद्दल मला तुम्हाला धन्यवाद दिले पाहिजेत.''

''मला काही समजले नाही.'' कातागिरी म्हणाले. ''संपूर्ण वेळ मी बेशुद्धच होतो. मला शिरेतून भरवले जात होते. स्वप्नात मी काही केले का ते मला काही आठवत नाही.''

''हे बरेच झाले, मि. कातागिरी. तुम्हाला आठवत नाही ही चांगलीच गोष्ट आहे. ती सर्व भयंकर लढाई कल्पनेच्या कुरुक्षेत्रावर पार पडली. आमच्या युद्धभूमीचा नेमका तोच प्रदेश होता. तेथेच आपण आपला विजय आणि पराजय अनुभवत असतो. आपल्यापैकी प्रत्येक जण एका मर्यादित कालखंडात अस्तित्वात असतो. आपातत: आपण सगळेच पराभूत होत असतो. पण अर्नेस्ट हेमिंग्वेने स्वच्छपणेच हे पाहिले होते की

आपल्या आयुष्याचे अंतिम मूल्य आपण कसे जिंकतो यापेक्षा आपण कसे हरतो यावर ठरत असते. तुम्ही मि. कातागिरी आणि मी, आपण दोघे मिळून तोक्योला विध्वंसापासून वाचवू शकलो आहोत. दीड लाख लोकांना आपण मृत्यूच्या जबड्यापासून वाचवले आहे. कुणाला ते कळणारही नाही, पण आपण हे काम पूर्णत्वाला नेलेले आहे.''

''तू त्या कृमीला कसं काय हरवू शकलास? आणि मी काय केलं?''

''आपण आपल्याला जे काही करणे शक्य होते ते सर्व अगदी शेवटपर्यंत केले. आपण -'' मंडूकाने फटकन् आपले तोंड मिटून घेतले आणि एक दीर्घ श्वास घेतला ''- मि. कातागिरी आपण आपल्या हाताला लागेल त्या शस्त्राने लढा दिला. जमेल तेवढे धैर्य एकवटले. अंधार हा आपल्या शत्रूचा मित्र होता. तुम्ही पायाने चालवायचा जनरेटर आणला आणि आपल्या अंगच्या संपूर्ण शक्तीने ती जागा प्रकाशाने भारून टाकली. कृमीने तुम्हाला अंधाराच्या पिशाच्यांचे भय दाखवण्याचा प्रयत्न केला पण तुम्ही आपल्या भूमीवर ठाम राहिलात. भयंकर लढाईत अंधाराने प्रकाशाची बरोबरी करण्याची कोशिश केली आणि मी त्या प्रकाशात राक्षसी कृमीशी झटापट केली. त्याने माझ्याभोवती वेटोळे घातले आणि त्याच्या घाणेरड्या गिळगिळीत द्रवात मला न्हाऊन टाकले. मी त्याचे तुकडे तुकडे केले. तरी पण तो मरत नव्हता. लहान लहान तुकड्यातून तो पुन्हा जिवंत होत होता. आणि मग -''

मंडूक मौन झाला. पण लगेचच आपली उरली सुरली शक्ती एकवटून त्याने पुन्हा बोलायला सुरुवात केली. ''देवाने ज्यांना सोडून दिलेले आहे त्यांचे फ्योदोर दोस्तोवस्कीने अतुलनीय अशा नाजूकपणाने चित्रण केलेले आहे. ज्या माणसांनी देवाचा शोध लावला त्यांनाच देवाने सोडून दिले या भयंकर विरोधाभासात त्याने मानवी अस्तित्वाचा एक मूल्यवान गुण शोधून काढला. अंधारात कृमीशी झगडत असताना मी दोस्तोवस्कीच्या 'व्हाईट नाईटस्' च्या विचारात बुडालेलो होतो. मी ....'' मंडूकाचे शब्द विरून जातात की काय असे वाटायला लागले. ''मि. कातागिरी, मी एक लहानशी डुलकी घेतली तर तुमची काही हरकत आहे का? माझी पुरती दमछाक झालेली आहे.''

''अवश्य.'' कातागिरी म्हणाले, ''चांगली गाढ झोप घे.''

''अखेर कृमीला हरवणं मला शक्य झालं नाही.'' मंडूक आपले डोळे मिटून घेत म्हणाला.'' मी भूकंप तर थांबवू शकलो कसा तरी पण लढाई काही निकाली होऊ शकली नाही. मी त्याला जखमी केले. त्याने मला जखमी केले. पण तुम्हाला खरं सांगायचं तर मि. कातागिरी.....''

''काय ते, मंडुका?''

''मी खरोखर शुद्ध मंडूक आहे खरा पण त्याच वेळी मी न-मंडूक जगतालीही एक गोष्ट आहे.''

''हं, तू काय म्हणतोस ते मला काही उमजले नाही.''

''मलाही नाही'' मंडूक म्हणाला. त्याचे डोळे अजूनही मिटलेले होते. ''बस्. मला असं काही तरी वाटतंय. आपण आपल्या डोळ्यांनी बघतो ते खरंच असतं असं नाही. माझा शत्रू हा इतर अनेक गोष्टींप्रमाणे माझ्यातला मीच आहे. माझ्या आत न- मी आहे. माझ्या मेंदूचा चिखल व्हायला लागलाय्. इंजिन येऊ लागलंय्. पण मी काय म्हणतोय् ते तुम्हाला खरोखर कळायला हवं मि. कातागिरी.''

''मंडुका, तू दमला आहेस. झोपी जा. तुला बरं वाटेल.''

''मी हळूहळू चिखलाकडे परत जाऊ लागलोय् मि. कातागिरी. आणि तरीही.... मी.....''

मंडुकाचा शब्दांवरचा ताबा सुटला आणि तो कोमात गेला. त्याचे हात थेट जमिनीपर्यंत लोंबकळू लागले आणि मोठे पसरट तोंड उघडे पडले. कातागिरी प्रयत्नपूर्वक त्याच्या शरीराकडे दृष्टी वळवून पाहू लागले तेव्हा त्यांना त्याच्या संपूर्ण शरीरावर अनेक जखमा दिसल्या. त्याच्या कातड्यावरून पांढऱ्या रेघा ओढल्या गेल्या होत्या. त्याच्या डोक्यावरच्या खोलगट भागातून मास ओरबाडून काढल्यासारखे दिसत होते.

कातागिरींनी बराच वेळ टक लावून मंडुकाकडे पाहिले. तो झोपेच्या जाड आवरणात लपेटून बसलेला होता. त्यांनी विचार केला की, इस्पितळाहून बाहेर पडल्याबरोबर आपण 'ॲना कॅरेनिना' आणि 'व्हाइट नाईटस्' विकत घ्यायची आणि दोन्ही वाचून काढायची. नंतर मग आपण मंडुकाबरोबर त्यांच्या संबंधात मनसोक्त वाङ्मयीन चर्चा करायची.

थोड्याच वेळात मंडूक सगळ्या अंगांनी आखडायला लागला. सुरुवातीला कातागिरींना असं वाटलं की या झोपेतल्या नैसर्गिक आपोआप होणाऱ्या हालचाली असाव्यात. पण लगेचच आपली चूक त्यांच्या लक्षात आली. मंडुकाच्या शरीराला हिसके बसत होते आणि ते काही नैसर्गिक वाटत नव्हते. कुणीतरी एखाद्या मोठ्या भावलीला मागाहून धरून_हिसकाहिसकी करावी असे

वाटत होते. कातागिरींनी श्वास रोखून धरला आणि ते पाहात राहिले. त्यांना मंडुकाकडे धाव घ्यावी असे वाटत होते पण त्याचे स्वत:चेच शरीर अपंग झालेले होते.

काही वेळानंतर मंडुकाच्या उजव्या डोळ्यावर एक मोठा फुगवटा तयार झाला. तसलेच एक मोठे घाणेरडे गळू फुटले आणि मंडुकाच्या खांद्यावर, बाजूला आणि सर्व अंगभर त्याचा द्रव पसरला. मंडुकाला हे काय होते आहे याची कल्पनाही कातागिरी करू शकत नव्हते. कसाबसा श्वासोच्छ्वास करत ते या दृश्याकडे टक लावून बघत होते.

मग अचानकच एक गळू मोठा आवाज करत फटकन् फुटले. कातड्याचे तुकडे उडाले आणि चिकट द्रव बाहेर उसळून आला. सर्व खोलीभर त्याचा दुर्गंध पसरला. बाकीची गळवेही फटाफट फुटू लागली आणि द्रवाचे शिंतोडे भिंतीवर उडत होते. शिसारी आणणारा असह्य वास इस्पितळातल्या खोलीत भरून गेला. जिथे गळवे फुटली त्या जागी मंडुकाच्या अंगावर काळी भोके शिल्लक राहिली होती आणि त्यातून विविध रूपांची आणि आकारांची जंतूंची पिल्लावळ वळवळत सरपटत बाहेर पडत होती. त्यांच्या मागोमाग गोमेसारखे शंभर पायांचे प्राणी सळसळ आवाज करत बाहेर आले. त्या भोकांतून या असल्या प्राण्यांचा अविरत प्रवाह बाहेर येत राहिला. मंडुकाचे शरीर किंवा आता मंडुकाचे शरीर म्हणून जे काही बाकी राहिले होते ते पूर्णपणे या रात्रिंचर प्राण्यांनी  झाकले गेले होते. त्याच्या खोबणीतून दोन मोठे डोळ्यांचे गोळे खाली जमिनीवर पडले. ते काळ्या कीटकांनी आपल्या मजबूत जबड्यांनी गिळंकृत करून टाकले. लहान लहान कृमींच्या झुंडी भिंतीवरून छताकडे जाण्यासाठी एकमेकींशी स्पर्धा करत होत्या. त्यांनी विजेचे दिवे झाकून टाकले आणि धुराच्या धोक्याचा अलार्म पोखरून टाकला.

खोलीतली जमीनही कृमी कीटकांनी झाकली गेली होती. ते दिव्यावर चढले आणि त्यांनी प्रकाश अडवला. ते अर्थातच मग कातागिरींच्या बिछान्यातही घुसले. शेकडो प्राणी त्यांचे पांघरूण पोखरू लागले. ते त्यांच्या पायावर चढले, त्यांच्या झोपण्याच्या कपड्यात शिरले. त्यांच्या मांड्यांमध्ये वळवळू लागले. सगळ्यात लहान जंतू त्यांच्या गुद्द्वारात, कानात आणि नाकात सरपटू लागले. गोमांनी त्यांचे तोंड उघडले आणि एका मागोमाग एक त्या आत शिरू लागल्या. तीव्र निराशेने कातागिरी किंचाळून उठले.

कोणीतरी बटन दाबले आणि खोली प्रकाशाने उजळून निघाली. ''मि. कातागिरी!'' नर्सने हाक मारली. कातागिरींनी प्रकाशाच्या दिशेने डोळे उघडले. त्यांचे अंग घामाने चिंब भिजून गेले होते. किडे नाहीसे झाले होते. भयंकर गिळगिळीतपणाची एक संवेदना मागे ठेवून ते सगळे निघून गेले होते. ''आणखी एक वाईट स्वप्न, होय ना? गरीब बिचारे?'' झटकन् कर्तव्यदक्ष चपळाईने नर्सने इंजेक्शन तयार करून त्याची सुई त्यांच्या दंडात टोचली. त्यांनी एक दीर्घ श्वास घेतला आणि सोडून दिला. त्यांचे हृदय वेगाने विस्तारत आणि संकोच पावत होते.

''तुम्ही कसले स्वप्न बघत होता?''

वास्तव आणि स्वप्न यात फरक करणे कातागिरींना खूप त्रासाचे जात होते. ''आपण आपल्या डोळ्यांनी पाहतो ते खरेच असते असे नाही.'' त्यांनी स्वत:लाच मोठ्याने सांगितले.

''हे अगदी खरं आहे'' स्मित करत नर्स म्हणाली. ''विशेषत: स्वप्नांच्या बाबतीत.''

''मंडुका!'' ते पुटपुटले.

''मंडुकाला काही झाले का?'' तिने विचारले.

''त्याने तोक्योला भूकंपाच्या विध्वंसापासून वाचवले. अगदी एकट्याने.''

''हे छानच झाले'' जवळपास रिकामी झालेली सलाईनची बाटली काढून दुसरी बदलून लावत नर्स म्हणाली. ''तोक्योत आपल्याला आणखी भयंकर गोष्टी घडायला नको आहेत. आधीच त्या काही कमी नाहीत.''

''पण त्यासाठी त्याला आपले प्राण गमवावे लागले. तो गेला. मला वाटतं तो चिखलात परत गेला असावा. तो पुन्हा कधीच परत येणार नाही.''

हसत नर्सने त्यांच्या कपाळाचा घाम पुसला. ''तुम्हाला मंडूक खूप आवडत होता. होय ना, मि. कातागिरी ?''

''इंजिन'' कातागिरी अडखळत म्हणाले. ''कुणाहीपेक्षा जास्त.''

मग त्यांनी आपले डोळे मिटले आणि निवांत रहित स्वप्न झोपेत ते बुडून गेले.

० ० ०

निशिकांत ठकार
सूरसंगत ,राघवेन्द्र नग रसुरारजी पेठ, सोलापूर भ्र. ध्व. ९८२३९३९९४६

# मराठी ब्लॉगलेखन : अनुभव आणि प्रतिसाद

– मधुकर धर्मापुरीकर

■ ■ ■

लेखन वाचन व्यवहार आज धोक्यात आले आहेत असं म्हटलं जातं; पण इंटरनेटवर ब्लॉग्जचं अफाट विश्व पाहिल्यावर वाटतं, लिहिण्या–वाचण्यानं उलट आज केवढ्या विस्तृत माध्यमात प्रवेश केला आहे! आज प्रचंड संख्येनं ब्लॉग्ज लिहिले जातात. एरवी लिहिण्याच्या नादाला न लागलेला माणूस आज आपल्या ब्लॉगमधून भराभर व्यक्त होतो आहे. मराठी ब्लॉग्जची संख्यासुद्धा भरपूर आहे. विषेशत: आयटी क्षेत्रातली तरुण पिढी या माध्यमाचा मुक्त वापर करीत आहे. एखादी तत्कालिक घटना, प्रसंग घेऊन आपल्याला जे वाटलं, ते या ब्लॉग्जमधून मांडलं जातं. कधी अनुभव सांगितले जातात, कधी माहिती तर कधी आठवणी, शब्दांतून मांडलेल्या मुद्याच्या समर्थनार्थ छायाचित्रे, चलत्‌चित्रे यांचा मुक्त उपयोग केला जातो.

पण या सगळ्या 'वेब साहित्या'तून वाङ्मयीन प्रकृती लाभलेलं लेखन किती असतं, असतं का?

'जानिबे मंझील' आणि 'हसण्याचा आकार' हे दोन ब्लॉग्ज गेले वर्षभर यशस्वीरित्या हाताळणारे कथालेखन मधुकर धर्मापुरीकर हे आज ब्लॉग्ज लेखन करणाऱ्या तुरळक मराठी साहित्यिकांपैकी एक. उर्दू शायरी आणि व्यंगचित्रांच्या आस्वादाच्या निमित्ताने लिहिलेल्या त्यांच्या या लेखनाला उत्कृष्ट असं ललित लेखनाचं स्वरूप लाभलेलं आहे.

या निमित्ताने, या वेगळ्या अशा अनुभवांवर मधुकर धर्मापुरीकरांचा हा लेख, आणि त्या सोबत या दोनही ब्लॉग्जमध्ये प्रसिद्ध झालेली काही टिपणं....

■ ■ ■

संग्राहक वृत्तीचा एक अनुषंगिक गुण असा तयार होतो, की अशा माणसाला आपल्या संग्रहातल्या चिजांचं महत्त्व, त्याचं मोल इतरांना सांगण्याची ओढच लागते. गाण्यांचा, व्यंगचित्रांचा, उर्दू शे'रचा माझा सग्रंह जसजसा वाढता झाला, तसं तसं त्या त्या विषयाच्या रुचीचे मित्र मला भेटू लागले. या उपक्रमातला महत्त्वाचा भाग म्हणजे, माझी लिहिण्याची सवय. आवडलेल्या गोष्टीबद्दल भरभरून लिहायची खुमखुमीच.

गाण्यांबद्दल आणि व्यंगचित्रांबद्दल मनसोक्त लिहिताना, आवडलेल्या उर्दू शेर बद्दल लिहायची इच्छा राहून जाऊ लागली. शाळेत असल्यापासून मिळतील तिथून मी शेर मिळविले होते, वहीत साठवून ठेवले होते. पुढे, शायरीच्या प्रेमापायी दिल्लीच्या 'जामिया मिल्लिया इस्लामिया' विद्यापीठाचा 'खत किताबत उर्दू कोर्स' (पत्र व्यवहाराचा) केला होता. उर्दूचं प्राथमिक शिक्षण मिळालं, छापील मजकूर वाचता येऊ लागला. दरम्यान, विविध विषयानुसार शेर लिहून घेऊ लागलो. अधून मधून ललित लेखांमध्ये शेरचा वापरही करू लागलो. पण या विषयावरच्या स्वतंत्र लेखनाची इच्छा राहूनच गेली होती.

चार पाच वर्षं झाली, व्यंगचित्रकार अभिमन्यू कुलकर्णींचे भाऊ अनिरुद्ध कुलकर्णी यांचा परिचय झाला. 'सर्चिंग फॉर लाफ' या त्यांच्या ब्लॉगची माहिती मिळाली. ब्लॉग या प्रकाराची ओळख तिथेच झाली. व्यंगचित्रांसोबतच वेगवेगळ्या विषयांचं प्रचंड वाचन असलेला हा अफलातून माणूस. ब्लॉगवरची त्याची टिपणं वाचून थक्क झालो. या माध्यमाचा परिचय इथेच झाला.

मग वाटून गेलं, की उर्दू शायरीवर आधारित असा एक ब्लॉग आपण सुरू करावा का. एखाद्या शेरवर टिपण लिहून ठेवायचा मी प्रयत्न केला होता, पण उत्साह नव्हता. आता ब्लॉगची माहिती झाली आणि या कल्पनेने मूळ धरले. संगणकाची माहिती होणं, मराठी टंकलेखन करता येणं आणि इंटरनेटच्या अफाट विश्वाची ओळख होणं अशा गोष्टी कारणीभूत झाल्या आणि नादाला लागलो. ब्लॉग्जसाठी 'ब्लॉग स्पॉट' आणि 'वर्ड स्पेस' अशा साईटस् असतात याची माहिती झाली. मग ब्लॉगचं शीर्षक 'जानिबे मंझील' असं निश्चित करून ब्लॉगची नोंदणी वगैरे केली आणि कामाला लागलो.

श्री. श्री. बा. जोशी या थोर लेखकाचे 'गंगाजळी' हे संग्रह माझ्या अत्यंत आवडीचे. असं लेखन व्हावं असं मला नेहमीच वाटत आलेलं आहे. या संग्रहातील टिपणात केवळ माहिती नसून त्याला एक हलकी फुलकी लय आलेली आहे आणि ललित लेखनाचं स्वरूप आलेलं आहे. ब्लॉगची सुरुवात करताना तेच लक्षात होतं, आणि लिहायला लागलो. एका

विषयाचे तीन चार शेर घेऊन त्यावर टिपणं लिहिताना झालेला आनंद आजही आठवतो आहे. नवीन माध्यमाच्या ओळखीचा तो आनंद. कागद पेन घेऊन लिहिल्यावर मग त्याचं फेअर करणं, मग कुण्या मासिकाला ते पाठवणं, त्याच्या स्वीकृतीची आणि मग प्रसिद्धीची वाट पाहाणं... लेखन तसं चालू होतंच. पण 'वेब'ची ही सायकल हाती आली, आणि निर्मिती प्रक्रियेची गंमतच वाटू लागली. मनात सुचलेली कल्पना लेखणीतून शब्दरूप घेऊन कागदावर उतरते, तेव्हा तो कागद, ते मासिक, ते पुस्तक आपल्या 'हाती' असतं. पण त्याच मनातल्या कल्पना जेव्हा कागदाशिवाय नेटवर उतरतात–आपल्या 'हातून' निघतात. तेव्हा असं वाटतं, आपल्या कल्पनांना आता कागद नाही–पॅराशूट लाभलं आहे. विशाल अशा वेब–विश्वाचं.

आणि ब्लॉगवर मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया, जगातल्या कुठल्याही कोपऱ्यातला वाचक आपली मतं नोंदवितो. त्याची ही मतं, त्याच्या प्रतिक्रिया आपल्या लेखनाबद्दलचं कौतुक किंवा टीकेच्या नसतात.त्या प्रतिक्रिया म्हणजे सहभागासाठीच्या असतात, सहमतीच्याही असतात. 'जानिबे–मंझील' हे शीर्षकच ज्या शे'र मधून निवडलं आहे, त्याचा प्रत्यय येत असतो–

***मैं अकेला ही चला था जानिबे–मंजिल मगर***
***लोग साथ आते गए, और कारवां बनता गया...***

'मजरूह' सुलतानपुरी

वाचणाऱ्यांचा सहभागाची अशी जाणीव लेखन साहित्यात कधी झाली नव्हती. या अशा सहभागामुळे छान वाटू लागलं. या उत्साहामुळे व्यंगचित्रांवरच्या ब्लॉगची कल्पना उभी राहिली आणि त्याच्याही नादाला लागलो. आवडलेलं व्यंगचित्र स्कॅन करणे, ते ब्लॉगच्या लायब्ररीमध्ये जमा करून ठेवणं आणि जेव्हा केव्हा त्या चित्राबद्दल काही सांगायची ऊर्मी येईल तेव्हा मग 'लिहितं' व्हायचं असं होऊ लागलं. मुळात हे अद्भूत माध्यम सापडल्याची अगदी शाळकरी जी खुशी झालेली आहे, ती अद्याप सरलेली नाही. दोन ब्लॉग्जचा सांभाळ करताना, आवळ्या जावळ्या पोरांच्या आईसारखी मजेदार तारांबळसुद्धा उडते आहे. सुरुवातीला आठवड्यातून एकदा हे ब्लॉग प्रसिद्ध करीत होतो, आता महिन्याच्या एक, अकरा आणि एकवीस अशा तारखांना प्रसिद्ध करतो आहे.

'हवाओं पे लिख दो' हे टिपण (दि.३१ मार्च २०१०) लिहिताना या ब्लॉग लेखनाबद्दलच्या भावना शायरीच्या अनुषंगाने मांडता आल्या.

० ० ०

मधुकर धर्मापुरीकर
२४,भाग्यनगर, नांदेड, ४३१ ६०५   भ्र.ध्व. ९८६००२०४८६

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



**गिरीश बक्षी**

**मंजिरी बक्षी**

कर्वे नगर, पुणे – ४११०५२

# हसण्याचा आकार

## व्यंगचित्रातील एक मुशाफिरी

मधुकर धर्मापुरीकर


## वाकडी वाट...गमतीची.

*वाकडी वाट गमतीची असते.*
*ती गमतीच्याच माणसाला सुचत असते.*
*सरळ वाटेचा माणूस–नाकासमोर पाहणारा असतो.*
*नाकासमोर पाहणाऱ्याला निश्चित केलेलंच तेवढं दिसत असतं.*
*वावगं त्याला काही आवडत नसतं, समजत नसतं, कळत तर नसतंच.*
*असा माणूस सभ्य असतो, प्रामाणिक असतो, कामाचा असतो, प्रगती करणारा असतो.*

*वाकड्या वाटेचा माणूस वाईट असतोच असं नाही, तो चतुर असू शकतो.*
*वेगळ्या तऱ्हेने विचार करायची क्षमता त्याच्यात असू शकते.*
*तोही चालणाराच; पण परिसराचं भान ठेवणारा असतो.*
*कर्तव्यासोबतच इतरही काही असतं, याची जाणीव–*
*सदैव बाळगणारा तो कलावंत असतो.*

*म्हणूनच वाकडी वाट त्याला वावगी नसते.*
*आणि म्हणूनच–*
*वाकड्या वाटेवर कविता गवसते,*
*सत्य सापडते...*

*० ० ०*



# हसण्याचा आकार

व्यंगचित्रातील एक मुशाफिरी

मधुकर धर्मापुरीकर

## हिंदोळा


*मॉन्ट्रीयलच्या आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र प्रदर्शनातलं हे मजेदार व्यंगचित्र.*

*व्यंगचित्रात चटकन लक्ष वेधून घेतात, ते धावत गेलेले समांतर रूळ. पोलादाचे ते रूळ जणू निघून गेलेल्या गाडीचा पाठलाग करणारे. मग आपलं लक्ष जातं रुळांच्या भोवताली आणि गंमत वाटते. गवती फुलांसारखी ती छान रोपं अन् त्यांच्या त्या जोड्या. आपापले फुललेले चेहरे घेऊन एकमेकांच्या जणू गळ्यात पडून मग्न झालेल्या, शिवाय असं वाटतं, की फोटो काढून घेण्यासाठी 'स्माईल' देत एकमेकांच्या गळ्यात पडून ही फुलवाली रोपं उभी आहेत. विस्तृत मोठ्या अशा निर्जन परिसरात फुलांच्या रोपांच्या या नि:शब्द आनंदाच्या फुगड्या चालू आहेत; याच नि:शब्द सोहळ्यामधून निघून गेलेल्या त्या रुळांची जोडी-म्हटलं तर स्थिर असणारी पोलादांच्या रुळांची ती जोडी... आणि लक्ष जातं, एकमेकांवर झुकलेल्या फुलांच्या जोड्यामंध्ये एकाकी असलेलं हे फूल-चक्क झुकलेलं आहे पोलादी रुळावर. कोणता हा परिणाम आहे-कसा आहे... वातावरणात प्रेमाची जी लहर आली आहे, त्यात सगळीजण आपापल्या साथीदारांच्या गळ्यात गळा घालून डुबली आहेत आणि एकाकी हे फूल एका रुळाशी रुळून घेण्याच्या प्रयत्नात (?) आहे.*

*...आणि या हसणाऱ्या, फुलणाऱ्या-नि:शब्द वातावरणात धावत गेलेल्या रुळांची ही जोडी-त्यांची कधीच भेट होणारी नाही. म्हटलं तर ही जोडी; पण दूरवर दूरवर नुसतंच धावणारी-भेटीशिवायची, मिलनाशिवायची त्यांची ती संगत, वर्षोनवर्षांची.*

*त्या पोलादी जोडीच्या तुलनेत, चिमूटभर जीव असलेली, मूठभर आयुष्य असलेली वितवितभर फुलांची ही रोपं-सोबत्यांच्या गळ्यात गळे घालून सहजीवनात रमून गेलेली... पण त्या सगळ्यांमधून पुन्हा आपण या एकट्या फुलाजवळ येतो... आपण त्याच्याशी हितगुज करायला पाहतो. व्यंगचित्र आपल्याला स्वत: होऊन काही सांगत नसतं. किंवा असं म्हणता येईल की त्याचं ते सांगणं गवतीफुलांच्या हालचालीसारखं असतं केवळ. संवेदनेच्या नजरेतून पाहिलं की आपल्याला ती हालचाल जाणवते. आपण गती घेतो-अर्थांच्या हिंदोळ्यावर रमत राहतो...गमत राहतो.*





# जानिब-ए-मंझिल

उर्दू शायरीसाठीचा एक प्रवास

**मधुकर धर्मापुरीकर**

## हवाओं पे लिख दो

लेखनव्यवहार हा कष्टाचा असतो. कष्टाचाच असायला पाहिजे. पण हे कष्ट घेताना- ते घेतल्यावर किती हलकं वाटतं, हे ते कष्ट घेतल्यावर लक्षात येतं. निर्मितीप्रक्रिया जेवढी गूढ असते; तेवढीच - म्हटली तर छान, म्हटली तर गमतीदार असते. यातला गमतीचा भाग म्हणजे प्रसिद्धीप्रक्रिया. आपलं लेखन प्रसिद्ध होणं- पुस्तक होणं, या आनंदाला पुत्रप्राप्तीच्या आनंदाशिवाय दुसरा शब्द नाही. नवोदित लेखकाची ती तारांबळ केवढी अवखळ असते? सापडलेली शंखशिंपलं पटकन मुठीत धरून पोराने चटकन आईबाबांना आणून दाखवावेत, तशीच घाई नव्या मार्गाच्या लिहिणाऱ्याला असते.

लेखन प्रसिद्ध होत जातं. ते शंभरांनी वाचल्याची खात्री ठेवून वावरावं अन् ते वाचलेलं असतं दहाएक जणांनी- हे नंतर कळत जातं. त्याची मग सवयही होत जाते. मी अगदी आतून सुचलं तरच लिहितो, उगीच्या उगीचंच लिहिणं- पाट्या टाकणं, तसं मी लिहीत नाही- दुसऱ्यासारखं, माझं लेखन स्वत:साठी-प्रसिद्धीत मला रुची नाही हे असं सगळं बोलणं भ्रमांना जपण्यासारखं. खरं म्हणजे, प्रसिद्धीची/प्रतिसादाची जाणीव न ठेवता लेखन करीत राहणं, हे अविवाहित राहण्याइतकंच अनैसर्गिक.

आपलं लेखन हे अक्षरसाहित्य आहे, कायम आहे, उत्तम आहे, या भावनांचे दगडगोटे मग आपल्या झोळीत जमा होतात. हे लेखनाच्या पुढच्या टप्प्याचे अनुभव. लेखनाबद्दल- महत्त्वाचं म्हणजे प्रसिद्धीबद्दल, लोकप्रियतेबद्दल आडमूठ ठामपणा, आडमूठ अपेक्षा, आडमूठ धुंदी वगैरे ठेवत लिहिणारा माणूस स्वत:कडे केव्हा तोंड करून बसतो, त्यालाही खबर राहत नाही. आपलं नाव-आपली ओळख- आपलं छापून आलेलं लेखन साहित्य, याबद्दल त्याची जेवढी आग्रही भावना-स्वत:ला गोंजारणारी, अपरिहार्य अशी तयार होते, ती एका अर्थाने मोठ्या कारुण्याची असते.

थडग्यावर-कबरीवर मृताचे नाव, त्याचा जन्म-मृत्यू वा अन्य माहिती कोरून ठेवायची जी प्रथा आहे, त्याबद्दल रवां या शायरने स्वत:लाच म्हटले होते-

**है संगे-मजार पे तेरा नाम रवां**
**मर कर भी उम्मीदे-जिंदगानी ना गयी**

खरंच की आपण गेल्यावर आपली स्मृती राहावी, ही इच्छा जगण्याच्या लोभातून निर्माण झालेली असते, का आणखी काही असतं त्याला कारण?

तर ते असो. ब्लॉगवर लेखन सुरू झालं आणि माझी अवस्था कशी झाली, हे सांगण्याची अनिवार इच्छा होते आहे; खरं म्हणजे कशी झाली हे वाटून घ्यायची इच्छा होते आहे. कागदावरचे शब्द आता कागदाशिवाय व्यक्त होत आहेत. उन्हात वाळत घातलेल्या कुरड्या-पापड्यांचे कापड मग संध्याकाळी ओसरीवर घेऊन त्यावर पाठीमागून पाण्याचे सपकारे मारतात. मग खरपूस वाळलेल्या त्या कुरड्या-पापड्या सुट्या होतात. दुरडीत जमा होतात. माझे शब्द कागदावरून संगणकात जमा होताना मी पाहतो आणि हे आठवत राहतं. दोन बोटांत लेखणी धरून होणाऱ्या लेखनाला, धावता धावता पंख फुटून जमिनीवरून उचललं जावं, तसं दहा बोटांचे पंख लाभले. वाचकाला-प्रसिद्धीला- कौतुकाला चिकटून बसलेले हे शब्द आता अवकाशात झेपावले. वाचणारे इथेही आहेत, बऱ्यावाईटाची नोंद इथेही आहे; पण ज्या तऱ्हेने यात गुंतून होतो, ते आता कुठं आहे नाहीच की. सुचलेल्या कल्पनांचा आकार करून ब्लॉगवर नोंदविणं हे कागदी होडी करून पाण्याच्या प्रवाहावर

*सोडण्यासारखं आहे. ही होडी कुठे कुठे जाईल, डुलत डुलत जाईल की बुडत बुडत जाईल, सांगता नाही येणार. आपली खुशी त्या कल्पनेची – त्या कल्पनेला अधांतरी केल्याची. नाही तरी आपलं लेखन छातीशी कवटाळून बसणं हा एका तऱ्हेनं पाहिलं तर हट्टीपणाच. मिर्जा गालिब या शायर टीकाकारांच्या, निंदकांच्या वागण्याने अचंबित झाला आहे. त्याला सांगायचं आहे की, मी काही शाश्वताचा आग्रह धरून आलो नाही, ना माझा तसा दावा माझ्या साहित्याबद्दल आहे. मी जाणारच आहे, राहणार नाही. मग असं असताना माझ्याबद्दल कोणती भीती ठेवून तुम्ही माझ्याशी असं वागता बरं–*

**यारब! जमाना मुझको मिटाता है किस लिए**
**लोहे–जहान पे हर्फ–ए–मुकर्रर नही हूं मै**

*या कायमस्वरुपी–लोखंडी अशा दुनियेवर कोरून ठेवलेल्या शब्दासारखा मी थोडाच आहे?*

*असो. आपल्या अखत्यारीत काही न ठेवता, आपल्या कल्पना अंतराळाच्या हवाली करणं हा रम्य अनुभव असतो. गुलजार यांनी आपल्या शब्दांतून अशीच एक गुफ्तगू केली आहे– 'दो दुनी चार' मध्ये किशोरकुमारच्या मार्फत–*

**हवाओं पे लिख दो, हवाओं के नाम**
**हम अनजान परदेसीयों का सलाम**

*साहित्यिकांचे सीमित वर्तुळ, ओळखीचा परिसर, नावं ठेवणं–दुर्लक्ष करणं, अतिरिक्त कौतुक, भाबड्या भावना या सगळ्यांशी विरहीत अशी ही ब्लॉगची निर्मिती. संवेदना हा ब्लॉगनिर्मिती प्रक्रियेला उत्तेजना देणारा, नव्या रूपात मांडणारा. (खरं म्हणजे ब्लॉगचं साहित्य हे मुद्रित साहित्यापेक्षा जादा कायम–हर्फ ए मुकर्रर; पण असं असलं तरी ते बाळगता येत नाही. मिरविता येत नाही ही किती मजेदार बाब आहे!) ग्लोबल भाषेत सांगायचं झाल्यास परसदारातल्या शेवग्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देणारा. ही बाजारपेठ अभिव्यक्तीची–धंद्याचे, नफानुकसानीचे व्यवहार, हिशोब न ठेवणारी.*

*ब्लॉगला पर्यायी शब्द मराठीत नाही. अद्याप नाही. आणि इंग्रजीतही त्याचा स्पष्ट अर्थ तसा नाही. वेब–लॉग या शब्दाचा तो संकोच असून दहा–बारा वर्षांपूर्वी ब्लॉगचा जन्म झाला असे समजले. स्वत:साठीच लिहिलेली दैनंदिनी आणि प्रसिद्धीसाठी पाठविलेलं साहित्य; या दोहोंच्या दरम्यान या ब्लॉगचं अस्तित्व आहे, त्याची जागा अन् त्याचं महत्त्व शोधायला पाहिजे. अभिव्यक्तीसाठी एकाच वेळी शब्द–दृश्य–चित्र–श्रवण अशा चोहो बाजूंनी उपलब्ध असलेल्या या अद्‌भुत माध्यमाला तूर्त चौफेर असं म्हणायला काय हरकत आहे?*

*किशोरकुमारने ते गाणं अशा पद्धतीने म्हटलं आहे, की तो जणू हवेत ब्लॉग लिहितो आहे–*

**ये किस के लिए है, बता किस के नाम**
**ओ पंछी तेरा ये, सुरीला सलाम**

*लिहिलेल्या शब्दांचं मोल अबाधित राहणार आहेच; तेव्हा एखाद्या वेळी वही सोडून वेबचा आधार घ्यावा, आपलं जडत्व कमी करावं. काय हरकत आहे?*

*मार्च ३१, २०१०*


*With Best Compliments from*

**In Fond memory of**
**Late Shri. Narsinha Manurkar**

**MR. RAHUL MANURKAR**
**MRS. VRINDA MANURKAR**

PUNE

Mobile : 9822635597

# कोणीही नसतो तो...

मूळ हिंदी कथा : लता शर्मा
अनुवाद : वनिता सावंत


''धत्त... साला! आक्ख्या फलाटफारमाचा संडास केला.'' सखाराम किंचाळलाच. त्याचा बूट विष्टेनं भरला होता, ''ऐऽऽरजिया, इदर देक. तुजा छोकरा काय केला! आता तुजं सामान उचल आन जा ठेसनाच्या भायर... एक मिनटबी थांबू नगस. पुना कदी दिसलीस तर तंगड्या मोडून ठेवन... क्या!''

रजियाचा मर्द इनायतनं बाजू सावरली. टी स्टॉलवाल्याला मोठ्यानं हाक मारली.

''ऐऽऽ बाबूऽऽ साबना मलाई मारके पेशल चा आण. सोट्याऽऽ ओऽ सोट्याऽऽ किदर मर गया साला ! आक्खा दिवस उनाडकी करताय, कामाच्या वखत दिखताइच नई. सोट्याऽऽ सोट्याऽऽ रे!''

पॉलिशवाला पोरगा घाबरत – घाबरत जवळ आला.

''हांऽऽ इदरमें... सोट्या, साबचा बूट एकदम झक्कास



कपडा मारकर चमकाना. आरसा माफिक... चांगला पालिश वापरना. अबी जा, कामपे लग.'' पोरगा बूट साफ करू लागला. बाबू चहा घेऊन आला. इनायतनं सखारामला चहा दिला.

''बोलो साब, कइसा चलता धंदापानी ?''

''तेरी माँका धंदा जइसाइच चलता... सामान उचल आन भाग.'' सखाराम चहा घोटत म्हणाला.

''जातो साब... अबीच जातो... ऐऽऽ रजिया... साली हरामदाजी... छोकरा लोकाकू पकडके नई रकती... सुबू सुबू साबचा मूड खराब कर दिया.''

''अबी जाव दे साब! मी बोत मारता उस हरामीको... रातको आती न उदरमें बराबर?''

''सामानपन उठानेका, क्या?''

''अबीच उचलती साब.''

सखाराम लाठी घुमवत निघून गेला.

सात चाळीसची इंटरसिटी निघून गेली होती. काही प्रवासी अजूनही पुलाच्या पायऱ्या चढत होते. चहा-कॉफी, वडा-पाव आणि थंड पेये विकणारे मुलगे परत आले होते, पुढच्या ट्रेनवरील विक्रीच्या तयारीला लागले. फळं विकणारेही नव्या प्रकारे टोपल्या सजवत होते. बडोदा एक्सप्रेस येतच असेल. चार-पाच हिजडे मोठमोठ्यानं भांडत येत होते. त्यांनी सखाराम शिपायाला पाहिलं, मग विजेच्या वेगानं प्लॅटफॉर्मवरून उड्या मारून, रूळ ओलांडले आणि स्टेशनच्या बाहेर पळाले. सखारामनं एका मागोमाग चारही प्लॅटफॉर्म तपासले. राधा कुठं दिसला नाही. त्यानं रेल्वे पोलीस रामखिलावनला विचारलं. तो तंबाखूच्या तंद्रीत होता, त्यानं पुलाकडे बोट दाखवलं. सखाराम वैतागून पूल चढू लागला. इंच-इंच जागा बळकावून बसलेत साले! प्लॅटफॉर्मवरून हाकललं तर पुलावर, पुलावरून हाकललं तर प्लॅटफॉर्मवर. रेल्वे प्रॉपर्टीचा कबजा घेऊन मजेत राहतात, चिंध्यांची गाठोडी आणि घाणेरड्या चिकट चादरी. पुलाच्या कोपऱ्यात राधा दिसला. मोहना चटईवर पडलेला आणि राधा त्याचे पाय दाबत होता. जवळ जाऊन बघितलं. काळाकुट्ट मोहना, अर्धवट टक्कल पडलेलं, मेलेल्या कुत्र्यासारखा तोंड उघडं टाकून पसरला होता. हडकुळा जबडा आणि पिवळ्या पडलेल्या दातांवर माश्या भिणभिणत होत्या. राधा कधी माशा हाकलवी, कधी डोक्यावरून हात फिरवी, मग पाय दाबू लागे. काय सोंग आहेत. त्यानं राधाला लाठीनं हलवलं.

''ऐऽऽ उठ, चल अबी... तेरेकू हवालदारसाबनं बोलीवलं?''

''मैं? .... पन मैं काय केला?''

''त्यानलाच इचार. अबी चल... एक्सप्रेस येतीय, भोत गर्दी हो जायेगा.''

''पन साब... मैं आक्खा रात इदरीच थी. मैं काय केला, बोलो. मुजकू कायको बुलाता?''

''जास्ती खिटखिट नई पायजे. क्या? चल... नई तो...'' त्यानं लाठी सरसावली.

''मैं चलती साब... पन मेरा मरद बोत बीमार ए. बोत ताप चढेला ए इसकू...''

''साला... गांडू...'' सखारामाला राग आला, ''हिजडा साला... मरद मरद करतू. चल साले, नय तो तेरे मरदको बी बंद करुंगा.''

''नई... नई... इसकू मत छूना... साब, बीमार ए... मै चलती ना... मैं चलती ए...''

त्यानं बेहोश मोहनाच्या डोक्यावरून हात फिरवला. पाणी भरवण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. हताशपणे त्याच्यावर चादर पांघरली. पाय घसटत पोलिसाच्या मागून चालू लागला. रस्ताभर तेच तेच बोलू लागला, ''मैं काय केला नाय, मेरा मरद बीमार ए, मुजे जाने दो...''

स्टेशनच्या अगदी समोर पोलीस चौकी. तिथं पोचल्यावर सखारामानं राधाला एका बाजूला बसवलं. झाडाखाली, भिंतीला टेकून, उघड्या गटाराजवळ. तिथं आधीच एक बाई आणि तीन पुरुष बसलेले होते. राधाला पाहिल्यावर ती तिघंही बाजूला सरकली. राधा गपचूप बसला. साडीच्या पदरानं डोकं आणि खांदे नीट झाकून घेतले. मन मोहनाजवळ... किती वखत लागंल काय मालूम. सुबू इंटरसिटीपर पंदरा रुपया कमाया. बाबू टी स्टॉलको खास बोलकर पेशल चा और मस्का पाव लिया, मोहनाके वास्ते. चा पन पिया मोहना. बोत बोलनेके बाद मस्का पावका दो टुकडा खाया. खायगा नई तो ताकद कइसा आयगा ? मस्का पाव गडबड किया. उलटी हो गया. पेटका चा बी बाहर आया.

''सांग साल्या... सगळं सांग... हरामी तमाशा करतो.'' चौकीच्या आतून कोणीतरी जोरात किंचाळलं. नंतर फडाफड मारण्याचे आवाज आणि रडणं-ओरडणं. राधा घाबरला, हात-पाय थंड पडले.

--- मुजकू बी मारा तो? अइसा पहले कदीच नई हुआ. मोहनाका इज्जत हय इदरमें. कदी पुलीसबराबर राडा नाय... कदी

गंदा धंदा नाय केला... पुलके कोनेमें सांतीसे रहता अम... रेल्वे पुलीस रामखिलावन बोत हरामी हय... राती अंगावर हात डाला.... मोहना दस इंचका चाकू निकाला... ऐ सिपाई, अपनी औरतकडे जायचा, नायत रंडीके कोठेपर... ये धंदा इदर नई, क्या? राधा अमारा औरत हय... पुना कदी अइसा किया तो पेट फाडून आतडी गल्यात डालीन... अइसा बोला मोहना... तेचा सगावालाबी आया, ताली बजाबजा सिपाईला फटकारला. हप्ता वसूल करता सब बराबर, मंग ये सब क्या ? वो दिवसबाद मोहनासे कोणबी लोचा नाय लेता. पुलाच्या कोनेमें चुपचाप ऱ्हयता अम लोग. आक्खा दिवस ट्रेन पकडनेका आन दो वख वडा-पाव खाकर झोपनेका. आजून तलक राडा-तंटा नई. पन आज ये सब क्या?---

किती वेळ निघून गेला, काही समजत नाही. लांबलचक शिटी ऐकू आली... सयाजी एक्सप्रेस. राधा व्याकूळ झाला.

''मैं जाऊ साब? उदर मेरा मरद...''

''चौप्प! मरद ... मरद... आक् थू...!'' शिपाई फडके जवळ-जवळ त्याच्यावरच थुंकला. आत सगळं शांत. अचानक कोणीतरी इतक्या करुण स्वरात रडलं. बाहेर बसलेल्या लोकांचं रक्त गोठलं. ती बाई उठून उभी राहिली. राधाची सावली ओली झाली. फडकेनं लाठी सरसावली, ''बस... साली... बैठ...''

बाईनं पदरानं डोळे पुसले आणि खालती बसली. लोक येत-जात राहिले. सखाराम बाहेर आला, ''एऽऽ तू! ... अंदर!''

''मैं?'' राधा घाबरला.

''तू नई रे... वो नीली कमीज... चल अंदर... तेरा बाप बुलाता है.''

राधा गुढग्यावर डोकं ठेवून बसला. आता काय होणार कुणास ठाऊक! ... मोहना ... तू किदर रे! मैं क्या करू बोल. तू तो कबी मुजकू धूप और पाऊस में बी निकलने नई दिया. अबी इदर कौन देकेगा मुजकू, बोल? ... क्या बोलेगा मोहना ? ... ताप चढेलाए. कितना भला मानुस! ... कइसा प्यारसे रकता मुजकू! अबी वो उदर जलता... इदर मैं! ... या खेपेला शिटी ऐकू आली नाही. राधा गुढघ्यात मान खुपसून बसला होता म्हणून असेल. ट्रेनचा आवाज ऐकून हडबडला... ये पन गुजरात मेल होयेंगा. तब तो एक बज गया बरोबर. भूखा होयेंगा मोहना... क्या पता जागता है ... सोता है. गुजरातपर खुबीच पइसा मिलता पन. मोटा गुजराती सेठ लोकका गाडी ए...

''साब, मुजकू जाने दो अबी. सुबूसे चा तलक नई पिया.''

''चा होना तेरेकू?'' शिपाई फडके उठून आला, पँटची झिप खोलू लागला, ''मैं पिलाता तेरेकू चा.''

''नई... साब... नई.'' राधा घाबरून आकसला, ''कुच नई पायजे... अबी एकदम चूप बइठेगा... अइसा नको करनेका.''

फडके लाठी घुमवत गेला.

राधा पुन्हा गुढग्यात घुसला. आज देवा आक्खा खुंदक एक साथीच निकालेंगा... इतना दिवस चांगला गया... जबसे होश संभाला... मोहनाके पासीच रहा... वो कबी खालीपीली बूमाबूम नय किया... कबी मारापीटा नई... फिलीम दिकाता... आयसक्रिम खिलाता... गत आयुष्याची फिल्म चालू राहिली, पूर्ण दोन तास. राधा गपचूप बसून विचार करत राहिला... मुजकू मालूम किदर तकलीप कइसा होता ? आज देवा मटकाभर तकलीप भेजा एकसाथ... उदरमें मोहन तापमें, इदरमे ये हरामी पुलीसवाला... थाने के अंदर घडयाल पन जरुर होयेंगा, गजर कायकू नई बजाता? क्या मालूम कितना दिन जाता... धूप पन फिका दिखता... तीन बज गया क्या? सिटी कौन बजाता? ... सौराष्ट्र मेल... साडे तीन बजा! ये सब क्या होता? कब तलग चलेगा अइसा? मुजकूबी भूक-प्यास लगता... उदर मोहना तापमें पडेला ए! सगावाला ट्रेन देखता, झटपट धंदा करता... मोहनाको कौन देखेंगा? ये सिपाई फडके. कइसा मवाली ए! इसकोबी घर होयेंगा. बीबी-बच्चा होयेंगा. कुच दरद नई पन! सुबुसे इदरमें बिठाके रक्खा ए. उदर मोहना तापमें जलता ए... सखारामको मालूम ए... कुच दुकता नई इन लोककू... मुजको बी जान ए, समजता नई क्या? एकीच उपरवाला बनाया सबकू... कइसा मजाक किया वो बी पन... एक अंग बनाना भूल गया, पेट बनाना नई भूला... दिल बी दिया, दिमाक बी... भूक-प्यास लगती ए... सरदी-गरमी लगती ए... फडके अइसा जिप खोलके आया... सरमबी लगी, गुस्साबी आया... मोहना मुजकू प्यार करता, मैं मोहनाको, खिटखिट कायकू? ... प्यार तो जानवर बी करता अपने सगेवालेको, फिर अमको क्यों नई होना? ... कुच बी नई होना अम लोककू? ... कौन बनाया ऐसा कानून?

सखाराम बाहेर आला, 'नीली कमीज' वाल्या बाईला म्हणाला, ''बाई, घरला जा, थोडं पइसे आण, नाय तर जातो तुजा मरद अंदर.''

बाई थोडा वेळ उदासपणे उभी राहिली, मग हळूहळू चौकीच्या बाहेर निघून गेली.

''आता तुजा नंबर... उठ!''

राधा थरथर कापत आत गेला. देवा... देवा ... फिलममदे दाखीवतात वैसाच ठाणा. चार सिपाई... एक साब कुर्सीपर... जरा दूर और एक साब ... सबके हातमें दंडा... कुर्सीवर बसलेला साब काई लिवतो...

''एऽऽ इकडे... तेरा नाम?''

''राधा.''

''खोली नंबर? पक्का पत्ता पायजे.''

''खोली किदर ए साब ? आमाला कौन खोली देतो? झोपडपट्टीतबी खलीफा पाच हजार रोकडा मागताय. बोलो, किदरसे...''

''चौप्प ! विचारतो त्याचा जबाब दे. काम?''

''काम किदर ए? ट्रेनमदी सेठ लोग रुपीया दो रुपीया देते. साब ... बस, वोईच!''

''इंटरसिटीका पासिंजर रिपोर्ट कियेला है. पाकिट काढला. खिशात अढाई हजार रुपया होता. तुमा लोकांचा काम हाय असा बोलला वो. जा, चुपचाप लेके आ...''

''नई साब... गलत रिपोर्ट हय ... आमी नाय काटला पाकिट... अम किदरसे लायेंगा इतना पइसा?''

''पइसा नाय देगा तर इदरीच बैठना पडेगा.''

सखारामनं त्याला तिथंच एका कोपऱ्यात बसवलं.

मेजाच्या मागे असलेल्या भिंतीवरील घड्याळाचे काटे पालींसारखे एकमेकांचा पाठलाग करू लागले. असंच बसून बसून किती वेळ निघून गेला कोणास ठाऊक. तो काही बोलण्याचा प्रयत्न करू लागताच, शिपाई त्याला दटावून गप्प बसवत होता. भूक-तहान लागली होती, पाच वाजले संध्याकाळचे. डाऊन ट्रेनच्या शिट्ट्या ऐकू येऊ लागल्या. मोहनाची अवस्था आठवून राधा तडफडू लागला.

''साब, अबी मैं जाऊ?'' तो उभा राहिला, हात जोडले.

''पइसा आणाचा... फिर जा...''

''इदर बइठा बइठा पइसा कइसा लायेगा, साब? बोलो.''

''तुजा सगावाला येयल, त्येला बोल.''

राधा उभाच राहिलेला, डोळे डबडबलेले, ''माजा मरद बिमार ह्य, साब. वो किदरसे पइसा लायेगा?''

सखाराम लाठी फिरवत जवळ आला, ''तेरा पास पइसा नाय?''

''नाय.''

''तो आज राती इदर आनेका, बडे साबको होनेका, क्या?''

राधा शहारला.

''नको साब. मैं धंदा नाय करती. माजा मरद मुजकू काटकर दरियामदे सोडून देयल.''

सखारामनं सर्व शक्ती लावून लाठी त्याच्या ढुंगणावर मारली. राधा कळवळून रडू लागला.

''मरद... मरद... आई गं, सती सावित्री. पाय दाबीत व्हता मरदचा ! जा, बैठ उदर. पइसा नाय तर हाजिरी दे.''

''पन मी कदीच धंदा नाय केला. कदीच गैर मरद साथ नई गया, देवाचा शपथ. साब, मुजकू जाव दे. माजा मरद बीमार हय. पूलपर अकेला झोपता होगा. आक्खा दिवस हुवा. कुच चा-पानीबी नई मिला होगा. कोन देखेगा उसकू?''

सखारामनं खांदे पकडून आणखी दोन थपडा लगावल्या.

''मुजकू कायकू मारता साब? मी पाकिट नई मारा.''

''कौन साला बोलता, तू पाकिट मारला? बडे साबला आज राती कोई होना, बस! इत्ताच काम. तू साला कमर हिलानेकी जगह जीभ हिलाताय.''

''पन साब, मैं नाय जानती ये सब! माजा मरद कबी नाय भेजा इदर-उदर. आजून तलक दुसरा मरद नाय केला अपुन. मोहना तापमें पडेला हय. नाय तर कइसेबी पइसा लाता.''

''अबे साले, तेरा पइसा नाय, तू होना... इत्ता सीधा बात नाय घुसत तुज्या भेजामदी?''

''अबी जाव दे साब. अमारा मरद बोत तापमें पडेला हय.''

''तुजा मरद... साला हिजडा... तुजा मरद?'' सखाराम खदाखदा हसला, संपूर्ण चौकीही खदखदून हसली.

''मुजकू देकता हय. हलकट मवालीसे बचाता हय. खानेकू देता. तो मरदच बोलेगा न? बोलो.''

''अपने मरदसाथ झोपता न तू? क्या ? सब म्हायत हाय मेरेकू. आता जास्ती नखरा नाय करनेका. वो साब बैठेला हय, भोत कडक हय. ज्यादा बूमाबूम करशील तर ये डंडा बग. अबीच करेगा पीछू में. आक्खा मामला फिट! काय?''

''पन मी धंदा करत नाय साब. तुमी युसुफको बोलो.

उदर जूली हय, उसकू बोलो. अमारा सगावाला कई लोक ये धंदा करता. पन मैं नाय करत. अबी छोड दो, साब ... माजा मरद आक्खा दिवस काय बी नई खायेला हय. कइसा होगा, मालूम नई. जाव दे साब, मैं तुम्हारा पाँव पडती.''

फडके पुढे सरकला, कचकचून दोन लाठ्या मारल्या. राधा किंचाळला. फडकेवर कसला परिणाम होणार?

''असा नाय मानणार हा साला हिजडा. याला कडी लावा.''

''अबी ये कडी क्या?'' राधा खूप घाबरला. ''मैं जाती ना साब. नाराज कायको होता? पन मैं कुच नई जानती. कदीच धंदा नाय केला...''

''चौप्प.'' खूप थपडा बसल्या. राधा जमिनीवर पडला.

''जास्ती स्याणपंती नाय दिखानेका. जैसा बोला वैसाईच करनेका. क्या?''

राधा अश्रू पुसत उठला. हुंदकत होता. चोळीतून प्लॅस्टिकची लहानशी पिशवी काढली, ''साब गिनकर देखो. बरोबर पचास रुपया हय. चौकस? अबी जाव दे. मेरा मरद बोत तकलीप में हय... छोड दो, साब...''

सखारामनं ती पिशवी हिसकावून घेतली, खिशात टाकली.

''देख, चिकणे, वरसून आडर आयेला हय. काय करने का बोल? आमालाबी बालबच्चा हायेत. नौकरीत लोचा कैसा झेलेंगे? वो बाजूमें साब बैठेला हय, तेचाशी बोल.''

राधा थरथर कापत मोठ्या-मोठ्या मिशावाल्या हवालदाराकडे गेला. तो खुर्चीवर गपचूप बसून तमाशा पहात होता.

राधानं त्याच्या पायावर डोकं ठेवलं, ''साब, देवाच शपथ. मैं धंदा नाय करती. बाजूवाले पूलपर सिपाई भेजनेका, तपास करो, साब. उदर मेरा मरद झोपता हय, बोत ताप हय. आजून आठ दिवसचे जादा हुआ. कायबी खाता-पिता नाय. जो मिलता ... दवा खरीदून देती मैं. ताप पन सोडता नाय. सिपाईको पचास रुपया दिला. साब, मुजकू जाने दो.''

''तुजा नाच बगायचा शौक नाय. काम हाय म्हणून बोलीवलं. बडा साब तपासणीला येतो. त्याला तुईच होना. राती चौकीवर ये.''

''पन मैं साबला जानती नाय. कबी धंदा नाय किया. तुम जूलीको बोलो.''

फडकेनं मागून त्याचा नकली अंबाडा पकडला, दोन थपडा लगावल्या. ''जीभ चालीवतो साला... आता ऐक... लफडा नही मांगता. चूपचाप आनेका! काय? नाय तर आताच तुला बंद करतो.''

''साला हिजडा... मर्दासाठी रडतोय.''

राधा जमिनीवर पडून रडत राहिला. फडकेनं हवालदाराकडे बघितलं. ''साब, आता बास झालं. साला कंटाळा आला. हिजडा लोक कमी हायेत? बोला, किती पायजेत? आता हजर करतो. या सडक्या हिजड्याचं मेरा मरद ... मेरा मरद ऐकून आपुनचा तर भेजाच सरकला.''

''सगळे साले बीमार आहेत.'' हवालदार पुटपुटला. ''हमालांकडून बातमी मिळालीय. हाच साला चांगला आहे.''

''आसं काय?'' फडकेनं आपल्या बुटानं राधाला हलवलं, ''एऽऽ उठ ... जास्ती नखरा नको... चल उठ!''

राधा कसातरी उठला, कण्हत म्हणाला, ''तुमचा बालबच्चा जिये साब. मुजकू जाव दे अबी. मेरा मरद ताप में...''

हवालदारानं जोरात लाथ मारली, राधा कोपऱ्यात जाऊन पडला, ''साला हिजडा! तुझा मरद. मग तर पोरगा-पोरगीपण असेल. ती हरामी कुठं गेली? इंग्रजी शाळेत शिकायला?''

''साब, अमकू कायकू मारता! उपरवाला पहलेईच मारकर नीचू में फेकेला ए. अबी अम क्या करे बोलो? तुमकू अमारे जइसा औलाद हो जाये, तो क्या करेगा? अमारे जइसाइच होगा ना? वो बी अइसाईच मरद - औरतका खेल करेंगा!''

साल्या हिजड्याची इतकी हिम्मत! शिपाई तुटून पडले. मार-मारून अर्धमेला केला. हवालदारानं थांबवलं.

''एऽऽ फडके... हात आवर. साला मेला तर फुकटचा राडा. आपल्या चौकीवर लफडा नको. एऽ सखाराम, थोडं पाणी शिंपड... काय तरी खायला दे.''

दोन तास झाले, राधा कोपऱ्यात बसून राहिलेला, गपचूप रडत होता. सखाराम वडा-पाव, भजी आणि फुल चाय ठेवून गेला. त्यानं हातही लावला नाही.

हवालदार शिपायांबरोबर सल्ला-मसलत करू लागला.

''अबी बोल. तेरेकू जाव दिलं तर रातच्याला आयेगा?

खाडकन सौ रुपये मिळतील. मरदाला मोठ्या डाकतराकडे ने. ही तुजी थैलीबी ठेव.'' सखारामनं थैली पुढे केली.

कसा तरी बोलला, ''रातको आयेगा अम.''

''नक्की ना... जा!''

''ये वडा-पाव?''

''घेऊन जा, तुज्या मरदासाटी.'' शिपाई हसले. राधानं फाडक्या कागदाचा तुकडा गुंडाळून घेतला आणि गेला.

''आक् थू.'' हवालदार तिरस्कारानं थुंकला. ''कसले कसले ऑफिसर पोलीस फोर्सात आलेत. आधी मांस-मच्छी आणि बाटली. मग छोकरी हवी. कोणी कोणी नवा पोरगेला ऑफिसर छोकऱ्याची फमाईश करतो. पण हा साला हरामी, मिनिस्टरचा मेव्हणा! साल्यानं हिजडा आणायला सांगितलं. आम्ही सरकारी नोकर की रांडांचे दलाल!''

''साब, जास्ती मगज खराब करू नको. हे हिजडे धंदा करतात. राधा थोडा भाव खातो. आणखी काय नाय. थोडे फटके मारले, धूळ झटकली. फिट! राती येईल. बरोबर येईल.''

''करमरकर... जरा हॉटेलची खोली चेक कर. सगळा बंदोबस्त चांगला पायजे. इन्स्पेक्टरसाब येतीलच. फौजदारसाबना फोन कर. सांग, सगळं फिट आहे.''

चौकीत नीट बंदोबस्त होऊ लागला. मोठ्या साहेबांच्या दौऱ्याची तयारी सुरू झाली. बर्फ? बाटली? तंदुरी कोंबडी, तळलेले मासे ? फरसाण सांगा. सॅलड मागवा. साला ऑफिसर काय मागेल ते सांगता येत नाही.

साहेब आले. सोबत सरकारी गोतावळा. चौकी पाहिली. हॉटेलमधील खोलीतील व्यवस्था पाहिली. खुश झाले. साहेब खुश तर सगळे खुश!

आता मजा सुरू झाली. फडकेनं व्हिस्कीची बाटली टेबलावर ठेवली.

''ओ नो.... रम आणा, फडके ... रम ... दूर करे गम...''

फौजदारसाहेब जुने जाणकार होते. थ्री एक्स रमची बाटली हजर केली. साहेब खुशालले.

रम... व्हिस्की... देशी ... नारंगी ... सफेदा आणि गुलाब! सगळं सुरू झालं. बाटल्या फिरू लागल्या, चौकी झुलू लागली.

हॉटेलचा पोरगा पटापट रिकामी प्लेटी बाजूला ठेवून, नवीन प्लेटी आणू लागला. साहेबांच्या आनंदातच सगळ्यांचा आनंद.

''पाटील, तुला माहीत आहे, या बाटलीवर काय लिहिलंय?'' साहेबांनी बाटलीचं लेबल फौजदाराच्या दिशेनं सरकवलं.

''यस सर... थ्री एक्स रम ... सर!''

''थ्री एक्स रम म्हणजे ? थर्टी डेज रेग्युलरली युजफुल मेडिसिन.'' साहेब खो खो हसले. हसण्यावर हसणं.

गुलाबी डोळ्यात मादकता. साहेब विनोदी चुटके सांगू लागले. मग आपल्या बहादुरीच्या गोष्टी सांगितल्या. अचानक गाऊ लागले.

साहेब खुश झाले. सगळ्यांना हायसं वाटलं.

गाणं म्हणत म्हणत साहेब गप्प झाले. खूप दुःखी दिसू लागले. काहीतरी गडबड आहे. साहेब फौजदाराकडे रोखून पाहू लागले. हवालदार अस्वस्थ. कसला घोटाळा? साहेबांनी शांतपणे भुवया उंचावल्या... जणू विचारत आहेत - 'काय आहे? कुठं आहे?'

अरे! असं आहे तर!

''सखाराम... साहेबांना आराम करायचा आहे... खोली दाखव.''

''आजून तो आला नाय.'' सखारामनं हळूच सांगितलं. पण साहेबांनी ते ऐकलं.

''साले! मादरचोद!'' ते गरजले, ''सगळी चौकी उलटी टांगेन. समजता काय? हा इंतजाम झाला?'' साहेब अगदी धडपडत उठले. पडणारच होते, तर फडकेनं सावरलं. थप्पडेच्या आवाजानं खोली झणझणली.

''फडके, तू माझा हात पकडलास?''आणखी एक थप्पड.

''हरामखोर साले!''

थप्पडा, ठोसे आणि लाथांनी साहेब चौकीचा नीट बंदोबस्त करू लागले. कुठला शिपाई आणि कुठला फौजदार! साहेबानं सगळ्यांच्या आया-बहिणींना आपल्या ताब्यात घेतलं. इन्स्पेक्टरनं सखारामला खुणावलं आणि तो बाहेर पडला.

''काय हात-पाय चालीवतो, बाप रे! फडकेला काय ठोकला! ... पन हा साला राधा आला का नाय? धत् सगळी

माती जाली. दोन–चार बाटल्याबी फुटल्या. राधाला फरफटत आनतो, हपिसरासमूर टाकतो. काय वांदा नाय. मोप बाटल्या हायेत, मटानबी. पुना सुरू होयल. आजून आक्खी रात हाय!'' सखाराम मजेत गुणगुणत निघाला.

बहुतेक फ्लाईंग राणी, खूप गर्दी आहे. सामानानं वाकलेले हमाल आणि प्रवाश्यांमधून वाट काढत सखाराम पुलाकडे गेला. आज रात्री मजा येईल. आयुष्य सालं मजेत जातंय. रजिया, गुलबदन, मेरी, ज्यूली सगळ्या पाळीपाळीनं येतात. सखाराम अचानक थांबला. पुलावर इतकी माणसं कसली धमाल करतायत? सगळीजण खाली वाकून–वाकून काय बघताहेत? तिकडे प्लॅटफॉर्मवरही गर्दी आहे. हे साले हिजडे रुळावर उतरून काय करताहेत?

लफडा झाला काय?

रेल्वेचे पोलीस धावत जात होते, सखाराम धावला.

''एऽऽ रामखिलावन... काय झाला?''

रामखिलावन दबत्या आवाजात संतापानं फुसफुसला, ''साल्या हिजड्यांनी रेल्वे पोलिसांना अडकवलं. प्लॅटफॉर्मवर किती लोक राहतात, कसली गणती?'' रामखिलावन तरा–तरा चालत होता. सखारामनं डोकं झटकून मेंदूवर पसरलेलं धुकं दूर करण्याचा प्रयत्न केला. तो रामखिलावनबरोबर धावू लागला.

''पन झाला काय?''

''तो साला हिजडा मोहन मेला. राधा कुठं गेला होता कुणास ठाऊक, रात्री आला. सगेवाले प्रेताची राखण करत बसलेले. पैसे जमवायला चादरपण पसरली होती. राधानं हे सगळं पाहिलं आणि वेडा झाला. छाती पिटू लागला, डोकं आपटू लागला. नुसती रडारड. हिजड्यांनी खूप समजावलं. पण त्याचा एकच राग ... मेरा मरद मर गया... आता मी कशासाठी जगू? – पतिव्रता काय रडेल, इतकं तो साला हिजडा रडला.''

अचानक रामखिलावन थांबला. लाचारीनं दोन्ही हात पसरले. म्हणाला,

''साल्यानं कसल्या झंझाटात टाकलं... ऑगस्ट क्रांतीसमोर उडी मारली... मरून गेला!''

० ० ०

वनिता सावंत
सोमवार पेठ, मु.पो. मालवण, जि. सिंधुदुर्ग– ४१६६०६
भ्र.ध्व.९८६००२१९२२

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

डॉ. अरविंद वाकडे

सोलापूर



# सुर्व्यांना आठवताना.....

नारायणराव सुर्व्यांची आणि माझी ओळख ही एकोणीसशे बासष्ट साली झाली. तेव्हा मी सतरा वर्षांचा होतो. आमचे मित्र केसरी प्रधान *भारूड* हे सायक्लोस्टाईल अ-नियत कालिक काढीत असत. त्यात नारायणरावांच्या त्यांनी उदारपणे दिलेल्या काही कविता छापल्या होत्या. मासिकाच्या निमित्ताने ताराबाई रेड्डींच्या घरी सुर्व्यांची पहिली भेट झाली.

आता ह्या पहिल्या भेटीवर अनेक दशकांचे, अनेक आठवणींचे थर चढलेले आहेत. शांता गोखले ह्यांनी पटकथा लिहिलेल्या नारायणरावांवरच्या चित्रपटनिर्मितीच्या दरम्यान, नारायणराव आणि कृष्णाबाई यांच्याबरोबर माझ्या अनेक भेटीगाठी, मुलाखती आणि चर्चा झाल्या. त्यातून एक जवळीक निर्माण झाली. ही जवळीक केवळ व्यक्तिगत नव्हती. तिच्यातून मला नारायणराव माणूस म्हणून जसे कळत गेले तसेच कवी म्हणूनही कळत गेले. माणूस आणि कवी असे व्यक्तीचे विभाजन करणे योग्य नाही. पण एखादी गोष्ट नीट समजावून घेताना प्रयोगशाळेप्रमाणे काही रचनाघटक निदान तात्पुरते तरी वेगवेगळे

करून अभ्यासावे लागतात, तसेच हे विभाजन.

नारायणरावांनी अनेक सभा गाजवल्या होत्या, टेलिव्हिजनवर अनेक मुलाखती दिल्या होत्या. त्यांच्यावर चित्रपटही झाले होते. मात्र अभिनय करण्याचा त्यांना कधी प्रसंग आला नव्हता. त्यात सगळ्यात कठीण अभिनय हा स्वत:च्या भूमिकेचा. नारायणरावांचे, किशोर कदमबरोबर, कृष्णाबाईंबरोबर आणि एकट्यांचे असे काही सीन्स होते. ते करताना नारायणराव भांबावून जात असत. कुठे बघायचे, कॅमेरा आणि माईकचे भान कसे राखायचे हे सांभाळता सांभाळता ते अगदी एखाद्या शाळेतल्या लहान मुलासारखे व्हायचे. दिपोटीने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिल्यावर मुलाने शिक्षकाकडे पाहावे तसे ते शॉट संपायच्या आतच माझ्याकडे बघत. त्यामुळे तोपर्यंत चांगला झालेला शॉट वाया जाई. मग ते अगदी संकोचून ओशाळून विचारत, काय परत तोच प्रॉब्लेम का? मग कधीतरी मी माझी सहायक सुचित्रा साठे हिला ऑर्डर्स द्यायला सांगायचो आणि लपून बसायचो. पण मी कुठे आहे ह्याची नारायणरावांना कल्पना असल्याने शॉट संपण्यापूर्वी ते हमखास माझ्या दिशेने बघत. मग शॉटचा बोऱ्या. त्या उलट कृष्णाबाई सराईत अभिनेत्रीप्रमाणे शांतपणे शॉट देत. तेव्हा नारायणराव त्यांचे मन:पूर्वक कौतुक करीत.

कवितेच्या वाचनाचे शॉट्स् घेताना मात्र हे सर्व बदलायचे. मग हलकेच दोन बोटांनी ताल धरून ते कविता म्हणत. तेव्हा ते कॅमेऱ्याला आणि आम्हा सर्वांना विसरून जात. बहुतांशी मराठी कवींना फड जिंकण्यासाठी काव्यवाचनात उपरे नाट्य आणि भळभळा भावना आणण्याची दुष्ट खोड असते. एखादा गायक आपला आवाज वरती चढेनासा झाला की नजर आणि बोट वर करतो आणि गळ्याने न घेतलेले स्वर दाखवू लागतो तसाच हा प्रकार. नारायणरावांचे कवितावाचन ऐकल्यावर मला जाणवले की त्यांनी मराठी काव्याला जशी नवी दृष्टी दिली तसा नवीन कान दिला.

सुर्व्यांची कविता ऐकणे हा एक विशेष अनुभव असायचा. ते कविता सादर करीत आहेत असे न वाटता ते आपल्याशी बोलताहेत असे ऐकणाऱ्याला वाटायचे. त्यांच्या वाचनात नाट्य आणि निवेदन असले तरी अभिनिवेश नसायचा. त्यांच्या आवाजाला खर्जाचे वजन होते. त्यांच्या आवाजाचे जे चढउतार ऐकू यायचे त्यात कधी संताप असायचा, कधी करुणा असायची, कधी मिष्कीलपणा असायचा, कधी रोमांच असायचे. भावना कुठली का असेना, भाषा दैनंदिन व्यवहाराची असायची. मात्र रोजच्या भाषेतला विस्कळीतपणा त्यांच्या वाचनात नसायचा. ते सुरीले, तालिये कवी होते. त्यांचे कवितावाचन किंवा गायन ह्याला एका उत्तम बांधलेल्या बंदीशीची शिस्त होती. त्यांच्या पहिल्या भेटीत मला हे अंधुक जाणवले आणि ते नीट कळता, कळता बरीच वर्षे गेली.

लिहिलेला शब्द आणि बोली शब्द असे शब्दांचे दोन प्रकार मानतात. बोली शब्दातली कविता ही लेखी शब्दाच्या कवितेच्या आधीची. इतिहासात लेखी शब्द येण्यापूर्वीदेखील थोर काव्याची निर्मिती झाली होती. छंद हा बोली कवितेचा आविष्कार. अभंगाच्या मुळाशी असलेल्या ओवीसारख्या मराठी छंदाच्या बांधणीत, रचणाऱ्याला आपल्या मनाप्रमाणे शब्द लांबवण्याची, आकुंचित करण्याची सूट होती. हे छंद निरक्षर पण सर्जनशील कवींच्या हाताशी असलेले आविष्काराचे साधन होते. त्यातूनच परंपरा आणि नवतेचे सतत द्वंद्व असणाऱ्या अनेक धारांचे संतसारस्वत निर्माण झाले. सुर्व्यांची कविता ह्या बोली भाषेचा अलीकडच्या काळातील एक समर्थ नमुना आहे.

संतांच्या कवितेत येणारा शब्द दैनंदिन लोकव्यवहारातून येत होता. त्याला भावनेचा उमाळा होता. श्रमाचा ताल होता. बलुतेदारांच्या कामाचा घाम होता. जिंवत रक्ताचे प्रवाहीपण होते. आणि तो शब्द त्यांच्या टाकाच्या टोकावर नसून जिभेच्या टोकावर होता. त्यामुळे त्यातले स्वर आणि व्यंजने, हेल, वळणे ह्यांना एक वेगळा जिवंतपणा होता. सुर्व्यांचा शब्द हा सर्वसंकर असणाऱ्या मुंबईच्या संस्कृतीतून येत होता. ह्या विराट शहराच्या उदरात किती भाषा गडप झाल्या आहेत आणि त्यांचे पचन झाल्यावर नवीन रूपाने त्यांनी ह्या शहराच्या रुधिराभिसरणाला कसे चैतन्य दिले आहे त्याची गणतीच नाही.

सुर्व्यांच्या कवितेत कवीच्या आवाजाखेरीज अनेक आवाज ऐकू यायचे. एखादा आवाज कधी पोस्टर कवितेतल्या चौदा वर्षाच्या मुलाचा असेल, कधी अब्दुलचाचाचा असेल, कधी नावगाव नसलेल्या शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रीचा असेल. ह्या सगळ्यांना आपापल्या आयुष्यातले जे काही सांगण्यासारखे असेल ते सांगण्याकरता सुर्व्यांनी आपल्या कवितेत एक मुक्त व्यासपीठ तयार केले.

मात्र सुर्व्यांनी केवळ ह्या बोलीभाषेची नक्कल केली नाही. तिच्यातले छंद शोधले, लयी शोधल्या. त्यातील खाचाखोचा समजून घेतल्या. स्वत:ची लयीची जबरदस्त समज

वापरून ह्या अनेक लयींना एकसमयावच्छेदे बांधले आणि त्यातून मराठी कवितेला आणि भाषेला एक वेगळे वळण दिले. सुर्व्यांच्या मानवतावादाबद्दल, मार्क्सवादाबद्दल बरेच लिहिले गेले आहे. खुद्द सुर्व्यांनीही लिहिले आहे. पण त्यांच्या कवितेमागच्या सूक्ष्म निरीक्षणाबद्दल, अस्सल बंदिशीबद्दल विशेष विचार झाला नाही. ते रास्तच आहे. विषयाचा विचार सोपा असतो. आशयाचा विचार कठीण असतो. त्याला बारकाईने बघणारे डोळे लागतात, कान तीक्ष्ण असावे लागतात, सहज पालवी फुटणारी त्वचा लागते, गंधाची हलकी झुळुक ओळखण्याची क्षमता लागते, चवीत रेंगाळणारी जिव्हा लागते आणि शोधाचा रियाज लागतो.

कविता, संगीत, नृत्य आणि सिनेमा ह्या लयबद्ध कला आहेत. लय चुकली तर सगळेच मुसळ केरात. सुर्व्यांना कविता म्हणताना मी शेकडो वेळा पाहिले आहे. गायन किंवा वाचन सुरू करण्याआधी त्यांच्या उजव्या हाताच्या तर्जनीचे आणि मधल्या बोटाचे सूक्ष्म, लयबद्ध, चलन होत असे. एखादा खयाल गायक चीजेला सुरुवात करण्याआधी तिचे एकाग्र चित्ताने ध्यान करतो, तो जेव्हा तिची लय पकडतो तेव्हा त्याचे संपूर्ण शरीर ती लय व्यापून टाकते. तिचे बाह्य दर्शन मात्र केवळ बोटांच्या दिसत्या न दिसत्या स्पंदनातून होत असते.

सुर्व्यांनी मराठीच्या छंदोरचनेत जी मोलाची भर टाकली आहे त्यामागे मराठीच्या मौखिक परंपरेचा मोठा प्रवाह आहे. मुक्तछंदाचा खरा अर्थ हा छंदोरचनेचा जाणीवपूर्वक विस्तार करणारा छंद असा आहे. भाषेच्या गाढ अज्ञानातून आलेला अचकटविचकट, बेताल आचरटपणा असा नाही. सुर्व्यांशी बोलताना हे मला जास्त जास्त जाणवू लागले. ते ज्या वातावरणात वाढले तिथले बोली कवितेचे अनेक प्रकार त्यांनी आतून पाहिले. मग ती ओवी असो, भजन असो, उर्दू शायरी असो, तमाशातले शाहिरी काव्य असो. सुर्वे ज्या झोकात गिरणीची लावणी म्हणायचे, बारीक हरकती, आलाप आणि ताना घ्यायचे त्यातून बोली कविता ही किती रसाळ आहे ह्याची प्रचिती यायची. मला सुर्व्यांच्या काही उत्तम कवितांत एका समर्थ ख्यालगायकाचे चित्र दिसते. ख्यालगायकाला ख्यालाबरोबर ध्रुपद, ठुमरी, कजरी, चैती, भजन इ. अनेक प्रकार माहीत असावे लागतात. प्रसंग येताच त्यांच्या रंगीत सावल्या त्याच्या ख्यालावरून तरंगत जातात. त्याच्या गायनात क्षणकाव्य असते, नाट्य असते, निवेदन असते. सुर्व्यांच्या श्रेष्ठ कवितांत हे सारे आहे.

ख्यालाच्या बहुतेक रचना ब्रजभाषेत केल्या आहेत. सुर्व्यांच्या भाषेसारखी ती बोली भाषा आहे. तिच्यातला शब्द जास्त लवचिक आहे. कारण तो स्टँडर्डाईझ केला नाही. त्यामुळे भावानुसार आणि नायिकेनुसार त्याचे विविध उच्चार होऊ शकतात. तसेच नारायणरावांच्या कवितेचे आहे ह्याची प्रचिती मला त्यांच्या कवितांच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी आली. त्यांच्या आवाजाचा बदलणारा विस्तार, शब्दांची अचूक फेक, आवाजाच्या रेषेची रुंदी कमीजास्त करण्याची खुबी, मध्य आणि मंद्र सप्तकांचा वापर, त्यांच्या आवाजातील ऊब आणि पखवाजासारखी किंवा ढाल्या तबल्यासारखी दीर्घ आस असणारी विलंबित आणि मध्यलय ह्यातून त्यांच्या *माझे विद्यापीठ* सारख्या कवितेला बडा ख्यालाने भव्यत्व यायचे.

चित्रीकरणासाठी आम्ही नारायणरावांच्या निवडक कविता संपूर्ण ध्वनिमुद्रित केल्या. त्या अनेकदा ऐकल्या, कॅमेरामन, एडिटर यांना ऐकवल्या. मग त्या लयीच्या अनुरोधाने त्यांचे चित्रण केले, संकलन केले. संकलन करताना नारायणरावांच्या लयीचे सामर्थ्य उकलू लागले. एक फ्रेम सेकंदाचा चोविसावा भाग असते. नारायणरावांच्या कवितावाचनातून जेव्हा ह्या चोविसाव्या भागापर्यंत जुळणारे लयबंध तयार होऊ लागले त्यातून हा एक जबरदस्त तालिया आहे हे पुन्हापुन्हा प्रतीत झाले. त्यांच्या शब्दातच नव्हे तर त्यांच्या पॉजेसमध्येही त्यांच्या लयीची वीण ढिली पडत नाही. शब्दाची आस संपेपर्यंत ते पुढचा शब्द उच्चारीत नाहीत. त्यांच्या पॉजेसला एक चोविसांश सेकंदाची मोजपट्टी लावली तरी त्यांचा अनाहत नाद नियमितपणे ऐकू येतो.

सुर्व्यांचे काव्यवाचन आणि लेखन यात नाट्य आहे. त्यांच्या अनेक कवितांत स्वगते किंवा संवाद येतात. रॉबर्ट फ्रॉस्ट जसा नावे न घेता केवळ बोलण्याच्या लकबीवरून पात्र उभे करतो तसेच सुर्व्यांचे आहे. त्यांच्या अनेक पात्रांची ओळख त्या पात्रांनी बोललेल्या एकदोन वाक्यांतच होते. मग कधी त्यांचे नाव येते किंवा येतही नाही. त्याची गरजही नसते.

सुर्व्यांची पात्रे समाजाच्या दाबून टाकलेल्या थरातली आहेत. त्यांचा कामगारवर्गाशी निकटचा संबंध आहे. सुर्व्यांचे कामगारवर्गाशी नाते सांगितले जाते ते केवळ विषयापुरते मर्यादित नसून एका जीवनशैलीशी निगडित आहे. विविध लघुपटांच्या निर्मितीच्या निमित्ताने माझा पुष्कळ काळ कारखान्यात चित्रिकरण करण्यात गेला. त्या निमित्ताने मला अनेक कसबी कामगार भेटले आहेत. त्यांना आपल्या यंत्राबद्दल अभिमान असायचा. आपल्या

यंत्राला तेलपाणी देऊन, त्याची वेळोवेळी तपासणी करून, त्यात जाणाऱ्या मालाची चाचणी करून, यंत्र सुरू करून मग एकाग्रतेने त्याची संपूर्ण क्रिया संपेपर्यंत त्याला वाहून घेणारे हे अनेक कामगार माझ्या आजही डोळ्यासमोर आहेत. त्यातल्या कित्येकांनी यंत्रात सुधारणा सुचवून निर्मितीचा दर्जा आणि वेग वाढवला आहे. त्याबद्दल त्यांचे राष्ट्रीय सन्मान झाले आहेत. सुर्वे हे कवितेच्या कारखान्यातले असे कसबी कामगार होते. त्यांचे आपल्या यंत्रावरचे लक्ष ढळत नसे.

सुर्व्यांच्या कवितांबद्दल बोलताना कित्येक समीक्षक आणि कवी आजसुद्धा त्यांच्या कवितेला ओबडधोबड म्हणतात. मला ह्याचे आश्चर्य वाटत नाही, खेद वाटतो. कारण मराठी कवितेला एका आत्मकेंद्रित सुबकपणाची सवय झाली आहे. कवीने उपासना करण्याच्या सुंदर वस्तूंचे एक पोते आहे. त्यात चंद्रापासून उसाशापर्यंतचा मालमसाला असतो. नंतर सामाजिक बांधीलकी असे लेबल असलेले दुसरे पोते आहे. त्यात दलितांच्या, स्त्रियांच्या, बालकामगारांच्या समस्या असा तयार माल ठेवलेला असतो. ह्या पोत्यातल्या वस्तूंच्या वेगवेगळ्या मांडणीला कविता असे नाव देण्यात येते. नारायणरावांच्या शब्दात सांगायचे म्हणजे –

*आयुष्य दिसायला पुस्तकाच्या कव्हरासारखे*
*गोंडस, गुटगुटीत, बाळसेदार*
*आत खाटकाने हारीने मांडावीत सोललेली धडे,*
*असे ओळीने टांगलेले उच्चार*

नारायणरावांच्या उत्तम कवितेत ही धडे आणि त्यातली हाडे येतात. ती पुस्तकाच्या कव्हरात मावत नाहीत. त्यांना त्यातले जे जीवन दिसते, मृत्यू दिसतो ते डोळ्यानी पाहिलेले सत्य असते. शब्दांचा एक शोध असतो. निवेदनाचा एक नवीन प्रकार असतो. कवितेचा एक नवीन आकार असतो. म्हणूनच माझे विद्यापीठ ह्या कवितेच्या चार पानांनी त्यांच्या आयुष्यातली सहा वर्षे घेतली.

जर्मनमध्ये कवितेला *डिश्टुंग* हा शब्द वापरतात. शिवाय आटून घट्ट करणे ह्या क्रियेलाही हाच शब्द वापरतात. सुर्व्यांच्या श्रेष्ठ कवितात हा आटीवपणा आहे. कालप्रवाहात ही आटीव कविता वर्षानुवर्षे विरघळत रहाते. त्याची चव आणि रंग बदलत असते.

सुर्व्यांच्या कवितेचे लोकमानसाशी किती जवळचे नाते होते त्याबद्दलचे हृद्य अनुभव स्वत: नारायणरावांनीच लिहिले आहेत. मला आलेला एक अनुभव सांगून शेवट करतो. आमच्या चित्रपटाच्या शेवटच्या सीनमध्ये नारायणराव बी.डी.डी. चाळीबाहेरच्या एका बाकावर बसले आहेत. त्यांची भूमिका करणारा किशोर कदम त्यांच्याशेजारी येऊन बसतो. सुर्व्यांच्या चष्म्यासारखा आपला चष्मा खिशात टाकतो. निघून जातो. नारायणराव सरळ कॅमेऱ्यात बघतात आणि म्हणतात.

*आता आलोच आहे जगात,*
*वावरतो आहे ह्या उघड्यानागड्या वास्तवात*
*जगायलात हवे; आपलेसे करायलाच हवे;*
*कधी दोन घेत; कधी दोन देत.*

हे चित्रीकरण खऱ्या लोकेशनवर करायचे होते. शनिवारची संध्याकाळ. गजबज, गर्दी– नेहमीची आणि शूटिंगला आलेल्या बघ्यांची– वाहनांनी वर्दळ, टीव्हीचे आक्रोश, दाणदाण संगीत, नारायणराव येणार म्हणून चाळीत उत्सवाचे वातावरण होते. तिथल्या चाळकमिट्यांना सिंक शूटिंग म्हणजे काय ते मी समजावून सांगितले. शांतता राखण्याकरता त्यांचे सहकार्य मागितले. त्यांनी शांतता राखायची जबाबदारी घेतली. चाळकऱ्यांच्या सभा घेतल्या. डझनावारी लहान मुलांना स्वयंसेवक म्हणून नेमले. कोणत्याही घरातून टीव्हीचा आवाज येताच ती मुले धावत जाऊन तो आवाज बंद करायची. आमच्या शूटिंगला पोलीस नव्हते, पैसे नव्हते. आमचे भांडवल होते नारायणरावांबद्दलचा लोकमानसातला आदर आणि प्रेम. शनिवारी संध्याकाळी सात वाजता बी.डी.डी. चाळी शांत होत्या आणि आमचे शूटिंग यशस्वी झाले.

आजच्या महाराष्ट्रात भीती आणि दहशतीपोटी येणारी स्मशानशांतता निर्माण करू शकणारे अनेक साईझेसमधले सम्राट गल्लोगल्ली आहेत. त्यांचे चेहरे आपण रस्त्यावर येताजाता होर्डिंग्जवर पहातो. पण प्रेमाचे राज्य करून उत्साहाची, आतुरतेची शांतता निर्माण करणारा शेवटी एक कवी आहे. तो म्हणजे आमच्या चित्रपटाचा चरित्रनायक नारायण गंगाराम सुर्वे.

० ० ०

अरुण खोपकर
२१२, अे. कल्पतरू हॅबिटॅट सीएचएस, एस.एस. राव रोड, परळ.
मुंबई ४०००१२

*

सुर्वेंच्या निधनाने मराठी कवितेचे काय नुकसान झाले हे सांगणे अवघड आहे. त्यांच्या अंत्ययात्रेच्यावेळी राज्य सरकारने दिलेली एकवीस तोफांची सलामी एका अर्थाने परिस्थितीचे सार सांगते. राज्यकर्त्यांना सुर्वेंच्या मोठेपणाचा साधारण अंदाज होता पण नक्की कशामुळे ते मोठे आहेत याबद्दल सरळसरळ शंका होती. अशा परिस्थितीत तोफांच्या सलामीने त्यांचा हेतू साध्य झाला. मोठा आवाज तर झाला पण कसला आवाज ते कळले नाही. अलीकडेच सुप्रसिद्ध अभिनेते निळू फुलेंचे निधन झाले, तेव्हा सातारा-कोल्हापूर हायवेवरील एका खेड्याने त्यांच्या चित्राचा मोठा फलक लावायचा ठरवलं. त्यावर फक्त दोन शब्द होते. त्या शब्दांच्या साधेपणातच त्यांचं सौंदर्य होतं. 'मोठा माणूस'. आजही तुम्ही कोल्हापूरला जायला निघालात की पुणे सोडल्यावर थोड्या वेळातच तुम्हाला तो दिसेल. त्यात कुणा रसिकांची वा हितचिंतकांची नावे नाहीत. सध्या आपण अशा काळात आहोत की महाराष्ट्रातल्या सगळ्या शहरांचे रस्ते नेत्यांच्या पन्नास किंवा साठाव्या वाढदिवसाच्या मोठमोठ्या फलकांनी सुशोभित झालेले असतात. या फलकांवर कार्यकर्त्यांची शेकडो नावे आणि फोटो असतात. त्याउलट निळूभाऊंना श्रद्धांजली वाहणाऱ्या या फलकावर एकही नाव नाही. एका अर्थाने हा जनतेचा आवाज आहे. अनोळखी आम जनतेचा आवाज. सुर्वेंच्या बाबतीत मात्र राजकारण्यांनी खात्री केली की सुर्वेंना श्रद्धांजली वाहण्याची संधी सर्वसामान्यांनी राजकारण्यांकडून हिरावून घेऊ नये. कारण सुर्वे खऱ्या अर्थाने लोककवी होते आणि आयुष्यभर तोफांच्या सलामीसारख्या गोष्टींपासून लांब राहिले होते आणि राजकारण्यांचा जय झाला. सुर्वे सरकारी सलामी टाळू शकले नाहीत. मृत्यूनंतर त्यांना ती स्वीकारावीच लागली. त्यांना निरोप द्यायला सर्व सरकारी नेतृत्व तिथे हजर होते. खरेतर सुर्वेंना अखेरचा निरोप देण्याची घटना सरकारी यंत्रणेने स्वत:च्या पद्धतीने घडवली. अर्थातच आपण तक्रार करू शकत नाही. या सगळ्या गदारोळात एकच संभाव्य धोका होता आणि तो म्हणजे सुर्वे स्वत:च अचानक उठून बसतील आणि त्यांनी न मागितलेल्या त्या शेवटच्या सन्मानाला तोफांच्या आवाजापेक्षाही मोठ्या आवाजात विरोध करतील अशी शक्यता. ते म्हणाले असते, ''मी कम्युनिस्ट आहे आणि कामकऱ्यांचा कवी आहे. तसेही महाराष्ट्रात आज मला दुर्लक्षाने, कधी कधी तुच्छतेने वागवले जाण्याची सवय आहे. म्हणून आता त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न करू नका.''

आणि हे खरेच आहे. आज अगदी टोकाच्या पुरोगामी व्यक्तीसमोरही तुम्ही वर्गाचा, विशेषत: कामकरी वर्गाचा विषय काढू शकत नाही. कारण तसे केले तर लगेच तुम्ही इतर विषय काढून जातीचे महत्त्व कमी करण्याच्या ब्राह्मणवादी कटाचा भाग ठरता. असे का असावे? कोणी सांगू शकत नाही. जुन्या पुरोगाम्यांना जातीसारख्या इतर सामाजिक-राजकीय गटाचे औचित्य माहीत नाही असे नव्हे. पण आजच्या मराठी जगात 'वर्गा'बद्दल बोलणे हे सरळसरळ प्रतिक्रियावादी ठरते. अर्थातच मग तुम्ही वर्ग आणि वर्ण (जात) दोन्हींचा उल्लेख करून सुरुवात करता. पण तिथेच बोलणे संपते. असाही एक काळ होता जेव्हा राजकारणी आणि डावे विचारवंत वर्ग आणि वर्णाबद्दल चर्चा करण्यात दंग होते. आता मात्र वर्गाचे उल्लेख कमी कमी होत चालले आहेत. सुर्वे बौद्धिक वादात पडले नाहीत पण ते कामगारांबद्दल बोलत राहिले. सुर्वे एक मान्यताप्राप्त लेखक होते. खरोखरच होते. तुम्ही म्हणाल, कुणाची मान्यता? तर या प्रश्नाचं उत्तर देणं अवघड आहे. उदार सौंदर्यवाद्यांना सुर्वेंच्या लेखनातला आदर्शवादाचा सूर आवडत नव्हता. उच्चभ्रू अभिजाततावाद्यांना त्यांच्यातल्या विशिष्ट 'पार्टी'वाल्याचा जुनाट आशावाद त्रासदायक होत होता. देशीवाद्यांना कदाचित त्यांच्या लेखनातली क्रांतीची भाषा खटकत होती. मग ते कोणाला आवडत होते? कोणालाच नाही आणि तरीही सर्वांनाच आवडत होते. या सर्व समीक्षकांना त्यांचे मोल समजले होते. बरेच जण त्यांच्यावर वैतागलेले असत. पण हा वैताग एखाद्या व्रात्य छोट्या मुलाबद्दल होता. त्यांच्यामध्ये खरेच थोडेसे मूल-पण होते.

हे लक्षात ठेवलं पाहिजे की ते असे लेखक होते, ज्यांची मुळे शाहीर अमर शेख आणि अण्णाभाऊ साठेंपर्यंत जातात. त्यांची जगाची जाण आणि समज सुर्वेंमध्ये होती. गंमत म्हणजे ते डांगेंचे 'मूल' होते पण कम्युनिस्ट पार्टीचं विभाजन किंवा डांगेवरची टीका त्यांना कधीच समजू शकली नाही. पार्टीची तोडमोड ते कधीच स्वीकारू शकले नाहीत हे खरे आहे. कम्युनिस्ट सिद्धांतावर विश्वास ठेवून ते जगत राहिले. ती त्यांच्यासाठी श्रद्धेची बाब होती.

एका अर्थाने त्यांची कविता शुद्ध होती. वेगळ्याच पूर्वसुरींचा वारसा ती पुढे चालवत होती. लोकप्रिय मराठी कवितेप्रमाणे ती भावरम्य नव्हती. अर्थात कम्युनिस्ट पार्टी अथवा विचारधारेवरची त्यांची श्रद्धा काहीशी भावुक होती असे म्हणता येईल. (पण मग अगदी एखादा निहिलिस्टसुद्धा जर निहिलिझमबद्दल भावुक असेल तरच निहिलिझमवर श्रद्धा ठेवू

शकतो) पण सुर्वेंच्या भावुकतेत करुणेचे तत्त्व होते. त्यांच्या लेखनात शोषण करणारा समाज आणि शोषित जीवनाचे दु:ख नेहमीच असे. त्या अर्थाने ते क्रांतीच्या कवीपेक्षा जास्त करुणेचे कवी होते.

खूपच कमी आधुनिक कवींना पारंपरिक छंदबद्द अलंकार प्रचुर कवितेची समज असते. सुर्वेंना निदान गेल्या तीनशे वर्षातल्या मराठी कवितेची समज होती. त्यांची लय-ताल-यमकाची जाण किंवा पारंपरिक छंद वृत्ताची माहिती नोंद घेण्यासारखी होती. त्यांनी अभंग किंवा ओव्या केल्या नाहीत. पण इतर अनेक रचनाप्रकार आणि ताल त्यांनी हाताळले. खरं तर मराठी मातीची जाण त्यांना होती. त्यांची कविता कधीच गद्य आणि उपदेशात्मक नव्हती. एखाद्या क्रांतिकारी कवीसाठी उपदेश करण्याचा गुण विशेष महत्वाचा असतो. त्यांच्या कवितेत विचारधारा नेहमीच अंतर्भूत असायची, पण तुम्हाला तिकडे दुर्लक्ष करायचे असेल, तरी कवितेचा आनंद घेता यायचा. लोकांचा कवी असल्याने लोकांना आवडेल त्याप्रकारे कविता वाचण्याचे स्वातंत्र्य त्यांना देणे सुर्वेंना भाग होते. म्हणूनच त्यांच्या 'मोठेपणाबद्दल' आणि सोविएट युनियनच्या अस्तानंतरही त्यांच्या लेखनाच्या काळाशी वाढत्या सुसंगतपणाबद्दल थोडे साशंक का असेना, पण एकमत आहे. भारतातल्या अनेकांप्रमाणेच सोविएत युनियनचा अस्त हा त्या मार्गाचा अस्त मानायला त्यांनी नकार दिला. पण आशावाद किंवा श्रद्धाळूपणाशिवायही त्यांना वाचायला वाचक स्वतंत्र आहेत. या सगळ्यानंतरही तुम्ही त्यांच्या कवितेचा आनंद घेऊ शकता, हे महत्वाचे. त्यांची कविता वाचताना हा सुर्वेंशी आंतरिक संवाद चालला आहे, जो एकाच वेळी खाजगी आणि जाहीर आहे, असे वाटत राहते. तुम्ही मराठी साहित्याचे किंवा साधारणपणे बंडखोर कवितेचे वाचक असाल तर तुम्हाला जाणवेल की हा असा एक कवी होता, जो सुर्वेंसकट अनेक गोष्टींबद्दल तुम्हाला पुन्हा पुन्हा विचार करायला लावेल. त्यांच्या करुणेने तुमच्या मनात घर केले आहे आणि तुमच्या विचारांचा कब्जा घेतला आहे, असे तुमच्या लक्षात येईल.

० ० ०

(सौजन्य-इ.पी.डब्ल्यू)

गो.पु. देशपांडे
बी/ १०, अथश्री, परांजपे स्कीम, सुस रोड पाषाण पुणे ४११ ०२१
फोन ०२० २५८६३२५६ भ्रमणध्वनी ९८९०६८७०८५
मराठी अनुवाद- सीमंतिनी चाफळकर

*

वृत्तपत्रांनी सांगितलं की मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते. सुर्वे कदाचित ८६ वर्षांचेही असतील. रस्त्यावर सापडलेल्या एखाद्या मुलाचं वय त्याला शाळेत घालताना कसं ठरवायचं? गंगाराम सुर्वे एक गिरणी कामगार होते. त्यांनी रस्त्यावरून सुर्वेंना उचललं. त्यांना तो दिवस, तो महिना, ते वर्ष आठवणं अवघड होतं.

म्हणून मग, मी त्यांच्यावर चित्रपट लिहिला. त्यात एक बिनचेहऱ्याचा आवाज, आपल्या जगात कुठल्याही माणसाची ओळख ठरवणारे चार प्रश्न सुर्वेंना विचारतो. जात? माहीत नाही. वय? ७२ आणि ७५ च्या मध्ये. शिक्षण? व्हर्नाक्युलर फायनल, प्राथमिक शिक्षण प्रमाणपत्र. काम? बाल-गिरणी कामगार, शाळेत शिपाई, प्राथमिक शिक्षक, आता निवृत्त.

मग एक पाचवा प्रश्न आला... आवडीचे काम? कम्युनिस्ट पार्टी सभासद आणि कवी. या दोन जुळ्या व्यक्तिमत्त्वांनी या एकेकाळच्या भणंग माणसाला जीवनात आणि साहित्यात महत्त्वाचे स्थान मिळवून दिले. ते म्हणाले, ''मी जन्मलो तेव्हा मला नाव नव्हतं; पण मी जाईन तेव्हा एक नाव मागे सोडून जाईन.''

नारायण सुर्वेंच्या चेहऱ्यावर रेषांचे एक जाळे होते. त्यातून त्यांच्या कवितांच्या ओळी बोलत -

*'चालेन तेवढी पायाखालची जमीन होती*
*दुकानांचे आडोसे होते,*
*मोफत नगरपालिकेची फुटपाथ खुलीच होती'*

फुटपाथ हे त्यांचे विद्यापीठ होते. तिथं त्यांनी अवघड परीक्षा दिल्या.

*'आता आलोच आहे जगात,*
*वावरतो आहे घ्या उघड्यानागड्या वास्तवात*
*जगायलाच हवे; आपलेसे करायला हवे;*
*कधी दोन घेत; कधी दोन देत'*

जीवनातल्या विरोधाभासाकडे पाहून ते नेहमी हसत. स्वत:चा तृतीय पुरुषी उल्लेख करत. ''नारायणा'' ते म्हणत, ''हे तू काय करून ठेवलंस?'' ते स्वत: कॉलेजात कधी गेले नाहीत. पण त्यांची कवितांची पुस्तके विद्यापीठातून अभ्यासासाठी नेमलेली पाहून त्यांना मोठी गंमत वाटे.

पत्नी कृष्णाबाईंचं दु:ख आज सांत्वन करण्यापलीकडचं

आहे. त्यांच्या आग्रहावरून हा चौथी पास शिपाई पुन्हा पुस्तकांकडे वळला. एकोणतिसाव्या वर्षी मुलाबरोबर सातवीची परीक्षा त्यांनी दिली आणि ते पास झाले. पुढे प्राथमिक शिक्षकाचे प्रमाणपत्र मिळालं, ज्याने त्यांना जरासं बरं आयुष्य जगण्यासाठी हात दिला.

त्यांचं आयुष्य कधीच सोपं नव्हतं, तरी त्याबद्दल बोलताना त्यांच्या मनात कडवटपणा नसे. ते आनंदी होते. समाधानी, लोकांची आवड असणारे, मूल्यांशी कधीही तडजोड न करणारे, मार्गावरच्या प्रत्येक पावलासाठी संघर्षाची तयारी असणारे होते. जीवनाप्रमाणेच कवितेतही त्यांना कोणी पूर्वज नव्हते. त्यांनी लिहायला सुरुवात केली तेव्हा त्यांच्या आजूबाजूला शाहीर अण्णाभाऊ साठे, अमर शेख आणि गवाणकरांच्या क्रांतिगीतांचा आवाज दुमदुमत होता. त्यांनीही एक गाणं लिहिलं.

*डोंगरी शेत माझं गं मी बेनू किती*
*आलं वरीस राबून मी मरावं किती*

ते गाणं इतकं गाजलं की, रेकॉर्डिंग कंपनीने त्याची रेकॉर्ड काढली आणि सुर्वेंना त्याकाळी पंधरा रुपयांची दणदणीत रॉयल्टी मिळाली.

पण आपण शाहीर नाही हे त्यांच्या लगेचच लक्षात आलं. अति आलंकारिक, सनसनाटी, मध्यमवर्गीय कविता त्यांना भावली नाही. त्यांना बा.सी. मर्ढेकरांच्या आधुनिक कवितेतला ताल आवडला, पण त्यांच्या परिचयातल्या उत्साही बाया माणसांचा मर्ढेकरांच्या कवितेत मागमूसही नव्हता. मर्ढेकरांना उद्देशून लिहिलेल्या कवितेत त्यांनी विचारलं,

*'तुमचा माणूसच पुसला,*
*तर, नंतर काय हो उरते ?'*

निर्भय सुर्व्यांनी स्वत:ची लढाई स्वत: लढली. प्रत्येक प्रकारच्या कामगाराला आवाज दिला. वेश्या गावाकडे पाठवण्यासाठी पत्र लिहवून घेते आणि लिहिणाऱ्याला काळजीने विचारते,

*'कटाळा आला असंल तुमाला*
*सगळंच कटाळल्यागत हाय.*
*येत जा तिकडं मदनंमदनं...'*

खाटिक दाऊदचाचा कवीला लिहिताना बघतात आणि म्हणतात,

*'एक ध्यानमदी ठेव बेटा !*
*सबद लिखना बडा सोपा है*
*सब्दासाठी जीना मुश्किल है'*

सुर्वेंची कविता रस्त्यावर भर उन्हात उभी राहिली. कसलेही साहित्यिक आव तिने आणले नाहीत. उलट प्रस्थापित साहित्यिकांची त्यांनी क्षमा मागितली.

*'सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे'*

सुर्वे गेले असले तरी त्यांचे हे मोहक गुन्हे आपल्यासोबत आहेत आणि राहतील आणि ते नावही राहील-जे मागे सोडून जायची त्यांची इच्छा होती-

नारायण गंगाराम सुर्वे.

०००

शांता गोखले
लालिम इस्टेट, ५ हरिश्चंद्र परळकर मार्ग, भंजरवाडा,शिवाजी पार्क दादर
मुंबई २८
अनुवाद : सीमंतिनी चाफळकर

*

नारायण सुर्वे सर्वांसाठी केवळ मराठी भाषेचे एक श्रेष्ठ कवी इतकेच नव्हते. आमच्या गेल्या पन्नास वर्षांच्या साहित्यिक व्यवहारात ते सर्वाधिक महत्त्वाचा आधाराचा खांब होते. त्यांनी आम्हाला 'आमची कविता' कशी असायला हवी; तिचा विषय, तिचा आशय, तिचे रूप याचा एकात्म, आटीव, पीळदार घट्ट, बांधेसूद आणि प्रभावी आविष्कार कसा असावा याचे प्राथमिक आणि उच्चतर असे धडे घालून दिले. ते आपल्या माणसापर्यंतच नव्हे तर एकूणच मराठी 'सारस्वता'पर्यंत कसे पोहोचवावे - महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांपर्यंत सोयी/गैरसोयी यांचे वर्गीय अडथळे पार करत कसे पोहोचवावेत-याचे धडे देणारे कवितावाचनाचे पाठ अखेरपर्यंत घेतले. कविता लिहिण्याचा आणि ती जनसामान्यांपासून भद्र लोकापर्यंत कशी न्यावी याचा ते साक्षात वस्तुपाठच होते. त्यांचे हे ऋण खरोखरच अनन्यसाधारण आहे.

नारायण सुर्वे यांच्या कवितेचे, कवितावाचनाचे सामर्थ्य आता त्यांच्या जाण्याने अधिकच ठळक झाले आहे. ते आमच्या अनेक मित्रांनी या काळात अधोरेखित केले आहे. ते अजूनही पुरेसे आणि सर्वांगांनी झाले आहे असे मात्र म्हणता येणार नाही. सातशे-आठशे वर्षांची मराठीची लेखन परंपरा, अन्य भारतीय भाषांतील साहित्याची परंपरा, मराठीच्या आरंभीच्या लेखन व्यवहारातला घाम गाळणाऱ्यांचा सामूहिक सहभाग, जगण्या-लिहिण्यांतली अभेद्य सहजता, तुमचा काळ, त्या काळातला

बदललेला साहित्य व्यवहार, त्या व्यवहारातला तुमचा वर्गीय–वर्णीय–जातीय हस्तक्षेप, तुम्ही तुमची नाळ कुठल्या परंपरेशी जोडता, कुठल्या अन्य भाषांचे प्रभाव तुम्हाला विद्यमान काळात हाका देतात–हे सगळे गुंतागुंतीचे रसायन तुम्ही तुमच्या लेखनात व कवितेत कसे पचवावे आणि त्यावर तुमची मुद्रा कशी उठवावी अशा खूप बाबी नव्याने अधोरेखित करण्याची गरज आजही आहे.

लेखन ही जोखीम आहे. तिचे भान जागते ठेवणे; तिची कालबद्धता आणि त्याच वेळी तिची कालातीतता टिकवून धरणे आणि वाढवत नेणे किती कठीण आणि गरजेचे आहे हे नारायण सुर्वे या कवीने आपल्यासमोर ठेवले आहे. प्रतिभा ही अद्‌भूत गोष्ट तर आहेच पण ती केवळ गूढ अशी गोष्ट आहे इतक्या समजुतीवर सगळे निभावून नेता येणार नाही. आणि सुर्वे ज्या वर्गासाठी, ज्या तळागाळातल्या समूहासाठी लिहीत होते त्यांना हे परवडणारे नाही हे या घटकेला सांगायलाच हवे.

० ० ०

(सौजन्य – आपले वाङ्मय वृत्त, सप्टेंबर २०१०)

सतीश काळसेकर, द्वारा पीपल्स बुक हाऊस १५ मेहेर हाऊस,
कावसजी पटेल स्ट्रीट मुंबई ४०० ००१
भ्रमणध्वनी ९४२२६८९५५९

## श्रद्धांजली

गो. वि. उर्फ विंदा करंदीकर
दिलीप पुरुषोत्तम चित्रे
भास्कर लक्ष्मण भोळे
मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष
ग. प्र. प्रधान
वि. म. कुलकर्णी
चंद्रकांत वर्तक
स. ह. देशपांडे
सुहासिनी इर्लेकर
नारायण सुर्वे
प्रभाकर पेंढारकर

सर्वांनाच आदरांजली !

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

सुधीर मंगळवेढेकर
अंजली मंगळवेढेकर
शंतनू मंगळवेढेकर

'बहर' ४३/११, नवसह्याद्री सोसायटी,
कर्वेनगर, पुणे. फोन : २५४६०४६२

# कवींची मरणं अथवा  सुर्वे गेले त्या वेळची कविता

– वसंत आबाजी डहाके

मी पाहतो आहे
माझ्या पिढीतला, समकालीनांमधला एकेक कवी काळाच्या पडद्याआड जाताना,
स्वत:ला पुसून कविता मागे ठेवून जाताना.
ही सुरुवात नेमकी कोणी कधी केली ते मला आठवत नाही,
कदाचित जयंत नेरुरकर असेल, किंवा दिलीप धोंडो कुलकर्णी असेल,
संजीवनी खोजे, किंवा विवेक मोहन राजापुरे असेल. किंवा आरती प्रभू.
मुंबईत आल्या आल्या सदानंद रेगे
ब्रह्यांडाच्या नाक्यावर फिरायला गेल्याचे कळले;
त्यांच्या कवितेची अन् माझी चांगली मैत्री होती
हे त्यांना कळण्याची सुतराम शक्यता नव्हती,
तरी देखील दादरच्या स्मशानभूमीत त्यांच्यासाठी स्वत:ची कविता वाचली.
मनोहर ओकने तर स्वत:चे मरण स्वत:च रचले,
सगळ्यांहून प्रियतम अंधाराचे आयाळ कुरवाळीत,
माल्हवीत माल्हवीत गगन वल्हवीत तो नाहीसा झाला.
बॉम्बस्फोटाच्या दिवशीच तो मेल्याने सतीश काळसेकरचे गंडांतर टळले.
गुरुनाथ धुरीने तर आपण मेलो आहोत की जिंवत आहोत हे अद्याप सिद्ध केले नाही;
अश्वत्थाम्यासारखाच तो वावरत होता दिल्लीच्या, मुंबईच्या रस्त्यांवरून.
अजूनही असेल.
एक लालकोवळा काळोख त्याच्या अस्तित्वाच्या क्षितिजावर पसरलेला होता.
अरुण कोलटकर फोर्टातनं हिंडताना, एशियाटिककडे जाताना, पीपीएचमध्ये डोकावताना,
इराण्याच्या रेस्तरामध्ये बसलेला असाच दिसतो; सकाळी पांघरूण बाजूला सारावं
तसं त्याचं मरण अंगावेगळं झालं, आणि
एकदा मरून जाऊन त्यानं सिद्ध केलं की त्याला आतडं होतं आणि ते
कायम पिळवटत होतं.
मोरासारखा उघडून एका शतकाच्या दु:खाचा पिसारा
टाहोएवढ्या निळेपणात दिलीप मिसळून गेला.
आज मी आहे, उद्याही असणार म्हणत स्वत:चं असणं
नसणं करून टाकलं शरद साटमनं.
मधुकर केचे, सुरेश भट, संभाजी कदम, शंकर रामाणी, वसंत सावंत, दया पवार, केशव मेश्राम
सगळेच आपापल्या कविता मागे ठेवून पुढे निघून गेले.
आताआताच स्वत:लासुद्धा काहीही न कळवता भुजंग मेश्राम अन् अरुण काळे अन्
ऋत्विज काळसेकर निघून गेले मरणाची सुपरफास्ट एक्सप्रेस पकडून
कालपरवापर्यंत ह्या उघड्यानागड्या वास्तवात
कधी दोन घेत, कधी दोन देत वावरत असलेले सुर्वे गेले;
त्यांचे विद्यापीठ झुंज देत उभे राहणार आहे
ते पाडून त्यावर शॉपिंग मॉल होईपर्यंत.

०००

वसंत आबाजी डहाके
'कॅक्टस', दक्षिण मालटेकडी, परिगणित कॉलनी अमरावती ४४४६०६, मो.९८९०३६२७०३

*सिमास ट्रॅव्हल्स्च्या विशेष सफरी सवलतीच्या दरात*

**दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !**



**लक्षद्वीप सिनीयर सिटीझन्स विशेष सवलतीसह स्पेशल बॅच**

## एम. व्ही. लक्षद्वीप-सी

मर्यादित जागा

**नवीन जहाज**

**फक्त २ बेडेड ए.सी. केबिन्स**

*२२ जाने. २०११ व ४ फेब्रु. २०११*

**सोबत कोचीन लोकल साईट सीईंग**

**पुणे ते पुणे ९ दिवस सर्व खर्चासह.**

**२ बेटांची सफर** 1) Kalpeni 2) Kavaratti

## एम. व्ही. अरेबियन-सी

मर्यादित जागा

**फक्त ४ बेडेड ए.सी. केबीन्स**

*४ फेब्रु. २०११*

**पुणे ते पुणे १० दिवस सर्व खर्चासह.**

**सोबत कोचीन लोकल साईट सीईंग**

**३ बेटांची सफर** 1) Minicoy 2) Kalpeni 3) Kavaratti

**अधिकृत प्रतिनिधी :- लक्षद्वीप टुरीझम, हिमाचल टुरीझम, केरळ टुरीझम, गुजरात टुरीझम, गढवाल मंडळ विकास निगम लि. युपी टुरीझम, गोवा टुरीझम, दिल्ली टुरीझम, अनिडको अंदमान टुरीझम.**

SIMAS Travels

Head Office :- शॉप नं. १५, पूर्वा प्लाझा, ज्ञानप्रबोधिनी शाळेजवळ, ५१५, सदाशिव पेठ, पुणे-३०
फोन : (०२०) २४४५३७८२, २४४६६९९५५, २४४९३४६३ फॅक्स (०२०) ६६०२२९५७
E-mail : simastravels@gmail.com
Website : www.simastravels.com

SIMAS *Holidays Pvt. Ltd.*

**For International packages (वैयक्तिक व ग्रुपसाठी) Air Ticket, Visa, Hotel Booking**
Branch :- शॉप नं. २. बेडेकर बिल्डींग, विजय टॉकीज चौक, पंकज म्युझिक हाऊसजवळ, लक्ष्मीरोड, पुणे-३०. फोन : (०२०) ३२३३३४००, २४४५९२२०, २४४५९०८०
फॅक्स (०२०) ६६०२२९५७
Website : www.simastravels.com



# ॥समाधी॥

– संतोष वरधावे

हमरस्त्याच्या एका कडेला विष्णू महाराजांचा मठ होता. गावातल्याच गवंड्यांची ओबडधोबड कारागिरी दाखविणारी आठ फूट उंचीची मठाची भिंत ज्या ठिकाणी संपत होती, तिथून पुढे एका प्रचंड वटवृक्षाचा ऐसपैस विस्तार पसरला होता. त्या वडाखाली एस.टी. बसचा थांबा होता. दिवसभरात चार–सहा बसेस त्या थांब्यावर मिनिटभरासाठी ब्रेक लावीत. तालुक्याच्या ठिकाणी जाणाऱ्या येणाऱ्यात बहुतेक गावातलेच प्रवासी असत. एखादा दुसरा पाहुणा येई, तेवढाच.

थांब्याच्या शेडला खेटूनच, वेशी पलीकडच्या गावातल्या विधवा केराबाई आणि तिच्या चड्डीकरी पोराने एक टेबल मांडले होते. चहा, गोडंतेल, रॉकेल सांडून आणि भांड्या कढयांची काजळलेली बुडं घासून टेबलाची फळी गुळगुळीत काळ्या पाटीसारखी झाली होती. टेबलावर ठेवलेल्या भरभऱ्या स्टोव्हला पंप मारून स्टोव्ह पेटता ठेवण्याचा उद्योग पोरगा दिवसभर करीत असे.

टेबलासमोर टाकलेल्या दोन–चार लाकडी बाकड्यांवर बसलेल्या रिकामटेकड्या गावकऱ्यांकडून अधून मधून चहाची मागणी होत असे. प्रसंगी भज्यांचीही फर्माइश व्हायची. अशावेळी, झाडाच्या बुडाशी सदैव भरून ठेवलेली तेलाची कढई स्टोव्हवर चढवून केराबाई सरमिसळ पिठाचे भजे तळत असे.

कापूस पिंजल्यासारखा, तोच तो विषय पुन्हा पुन्हा पिंजत बसणाऱ्या रिकामटेकड्यांची त्या ठिकाणी नियमित ये–जा असे.

उधारी खात्यावर जास्त रक्कम पडून असल्याबद्दल केराबाई कुरकुर करू लागली की भज्यांसाठी डाळ पाडायला शेतातला हरभरा घेऊन जा किंवा कांदे-मिरच्या घेऊन जा असे काहीतरी सांगून तिला गप्प करण्यात येई.

संध्याकाळी रस्त्याच्या दुसऱ्या कडेला असलेल्या देशी दारूच्या खोपटीतही वर्दळ माजायची. त्यामुळे चहाची गिऱ्हाईकी कमी होऊन भज्यांची मागणी वाढायची. उकळत्या तेलात पिठाचे घाण्यामागे घाणे पडायचे. कढईतून उसळणारा धूर पारब्यांना टांगलेल्या कंदिलाच्या प्रकाशात फांद्याफांद्यांतून पसरायचा. एखाद्या भज्यातली मिरची अचानक फुटून फट्कन आवाज व्हायचा. धुरामुळे आधीच सावधलेले वडावरचे पारवे अंधारात भरारून पुन्हा झाडावर परतायचे. सभोवतालच्या शेतातून चाललेल्या रातकिड्यांच्या किरकिराटाला पारव्यांच्या त्रासिक गुटूरऽ गू ची साथ मिळायची.

तालुक्याकडून येणारी एखादी चुकार बस त्या थांब्यावर धडकायची. दिवसभराच्या कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी गेलेल्या गावातल्या एखाद्या बाप्प्याने मटक्याचा निकाल आणलेला असायचा. निकालाचा चिठोरा याच्या त्याच्या हातातून फिरत असताना मटका जिंकलेल्या - हरलेल्यांचा हल्ला-गुल्ला माजायचा.

आकाशात चंद्र कलला की बाकड्यांवरची एक एक व्यक्ती उठून अंधारात मिसळून जायची. केराबाईचा मुलगा बाकडे उचलण्यासाठी आला की उरलेल्यांचाही नाइलाज व्हायचा.

मुलगा झाडाच्या खोडाशी टेबल-बाकडे रचून लोखंडी साखळीने बांधत असतानाच केराबाई हवा सोडून स्टोव्ह विझवायची. आतून-बाहेरून डांबर चोपडल्यासारखा दिसणाऱ्या डब्यात कढईत शिल्लक असलेले तेल ओतायची.

जमा झालेला गल्ला मोजताना, उग्र तेलाच्या वाफाऱ्याने दिवसभर ताणलेला, केराबाईचा चेहरा सैलावयाचा. गालातल्या गालात हसत ती मोजलेल्या नोटा व नाणी वेगवेगळ्या फडक्यात काळजीपूर्वक बांधायची.

गंज चढलेल्या एका भल्या मोठ्या लोखंडी बादलीत कपबशा, प्याले, ताटल्या धुण्यासाठी पाणी ठेवलेले असायचे. दिवसभर कपबशा बुचकळवून चहाच्या रंगावर आलेले ते पाणी पोरगा झाडाच्या खोडाशी ओतायचा. रिकामे कप, बशा, झारे, भांडी, प्याले, ताटल्या बादलीत भरून, एका हातात कंदील व दुसऱ्या हातात बादली धरून पोरगा चालू लागायचा. त्या पाठोपाठ, डोक्यावर कढई ठेवून, तारेने बांधलेल्या स्टोव्हला हेलकावे देत केराबाई निघायची.

क्षीण होत जाणाऱ्या कंदिलाच्या प्रकाशात वेशीपलीकडे दोन मानवी आकृत्या विरघळून जायच्या.

इतका वेळ मठाच्या पायरीवर दगडासारखा निश्चल बसून, त्या दोघांकडे चोरट्या नजरेने बघत असलेल्या म्हादबासाठीही दिवस संपायचा. जबडा ताणून जांभई देत तो शरीर उजवीकडे-डावीकडे पिळवटून मोडायचा. सर्वत्र सामसूम झालेली आहे या जाणिवेने त्याचं मन हलकं व्हायचं.

मठाच्या भिंतीचा आडोसा सोडून तो रस्त्यावर उतरायचा. आता त्याला 'एकहात्या' म्हणून हिणवायला कुणी नसायचं आणि कुणी हिणवलं तरी ऐकायला नि हसायला केराबाई नसायची. त्यामुळे झोप येईपर्यंत, निर्जन बेटावर असल्यासारखा तो मठाच्या परिसरात स्वैर भटकायचा -

म्हादबाचे झोपण्याचे ठिकाण मोसमानुसार बदलतं. उन्हाळ्याच्या उकाड्यात तो मठासमोर असलेल्या टिनच्या शेडमध्ये अंग टाकायचा. दिवसा त्या ठिकाणी भाविकांच्या चपला ठेवण्यासाठी लोखंडी स्टॅण्ड मांडण्यात येत. हिवाळ्या-पावसाळ्यात मठाच्या आत, प्रवेशद्वाराला लागूनच असलेल्या खोलीत, हातपाय पोटाशी दाबून तो पडायचा. कधी कधी एखादं भटकं कुत्रं किंवा मोकाट गाय त्याला सोबत करायची. त्या लहानशा खोलीला 'कार्यालय' अशी जुनाट, पुसट पाटी ठोकलेली लाकडी चौकट होती. कडाक्याच्या थंडीत, मुसळधार पावसात झरोका-खिडकी नसलेली ती बसकी, अंधारी खोली कोरडी, उबदार असायची.

खोलीच्या मधोमध असलेल्या जुनाट लाकडी टेबलामागे एकमेव तकलादू खुर्ची होती. मठाच्या पुजाऱ्याचा मुलगा सोपान दिवसभर त्या खुर्चीत बसून डुलक्या घ्यायचा.

पिठाचा गोळा थापल्यासारखा खुर्चीत पडलेला सोपानचा देह पाहून म्हादबाला त्याचा भारी हेवा वाटायचा. सोपानच्या नशिबी असलेले काम आपल्याला का मिळू नये या विचाराने त्याचे तोंड कडवट पडायचे.

बुटक्या चौकटीतून वाकून, एखादा भाविक टेबलासमोर उभा राहिला की सोपानचे विझत आलेले डोळे अंधारात पुन्हा चमकू लागत.

''या साहेब!'' खुर्चीत ओघळलेला देह सरळ बसता करत तो उत्साहाने म्हणत असे. ''बोला अभिषेक, जिर्णोद्धार का फक्त किरकोळ देणगी?'' टेबलावरचे तीन पावती पुस्तकं, पत्ते पिसल्यासारखे पिसत तो विचारत असे.

एकदा का पैसे घेऊन पावती फाडली की सोपान पुन्हा डुलक्या घ्यायला मोकळा असायचा. संध्याकाळी तो लाकडी

टेबलाचा खण खस्सकन् ओढून काढायचा आणि टेबलाच्या मधोमध पालथा मारायचा. नोटा वेगळ्या, चिल्लर वेगळी करून खांद्यावरच्या कळकट उपरण्याच्या वेगवेगळ्या गाठीत बांधायचा. पावती पुस्तकांची जुडी मांडीवर आपटत, मठाच्या कोपऱ्यात असलेल्या आपल्या पत्र्याच्या घराकडे निघायचा. जाताना मठाच्या पायरीवर बसलेल्या म्हादबाला ''काय एकहात्या काही कामधंदा करतूस का नाय?'' किंवा ''काय म्हादबाशेट कधी वाजवता लग्न?'' असं काही तरी विचारून डिवचायचा.

सोपान घरी जायचा तेव्हा मठात येणाऱ्यांची वर्दळ ओसरलेली असायची. खोबरं काढून घेतलेल्या नारळाच्या करवंटीसारखं पोकळ तोंड हलवत, गावातलाच एखादा म्हतारा येऊन दारातला घंटा टणकावत चौकातल्या दत्ताच्या मूर्तीसमोर हात जोडत असे. घंटेच्या आवाजामुळे, मूर्तीवर छत्र धरून असलेल्या जुनाट उंबराच्या झाडावर, पानागणिक लगडलेल्या किलकिलाटी चिमण्यांची भिर्री दचकून आकाशात उधळायची. पिकली उंबरं मूर्तीवर उभारलेल्या पत्र्याच्या मंडपीवर टपटपायची. मग पुन्हा शांतता व्हायची.





सभोवताली दाट अंधार झिरपायला सुरुवात झाली की खिडक्या-झरोके नसलेल्या त्या खोलीचे रूपांतर अंधाऱ्या चौरसात व्हायचं. खोलीच्या मधोमध मांडलेली टेबलखुर्ची अंधारात विरघळायची. म्हादबा त्या अंधारात बसून राह्यचा. दाराच्या चौकटीतून त्याला दिसायची ती त्याची आई – अगदी जशी आठवत होती तशी. कपाळावर कायम काळा बुक्का माखलेली; चिरगुटलेले जीर्ण लुगडे गुंडाळलेली आई. त्यानंतर प्रगटायचे कोल्ह्यासारख्या निमुळत्या तोंडाचे, डोक्यावर गांधी टोपी घातलेले, पिंपळाच्या सालीसारखी जरठ कातडी असलेले शाळा मास्तर.

''कौसल्याबाई, पोरानं नुसतं वाचायला शिकून काय उपयोग? त्याला लिहिताही आलं पाहिजे. त्यासाठी आधी त्याचा हात दुरुस्त करून घे. मगच पाठव त्याला शाळेत.'' लहानग्या म्हादबाच्या निर्जीव हाताला झोका देत मास्तर म्हणायचे.

आणि मास्तरांनाही शाळेत मुलं नकोच असत. जेव्हढी मुलं जास्त तेव्हढं काम जास्त; डोक्याला ताप जास्त. त्यातल्या त्यात म्हादबासारखी घरदार नसलेली, शेतीवाडी नसलेली मुलं तर त्यांना अजिबात नको असत. बाकीचे मुलं आपल्याला कुवतीप्रमाणे जोंधळा, गहू, बाजरी काही नाही तर एखादा डांगर आणून मास्तरांचं घर भरत. पण दोन वेळच्या जेवणाला मोताद म्हादबाकडून काय अपेक्षा करावी?

''तुम्हीच एखादी दवा सांगा, मास्तर.....''

आईचं हे वाक्य पूर्ण होण्याआधीच मास्तरांची मान नकारार्थी हलू लागायची–

''कौसल्ये, कशी अडाणीबाई तू ? मुलाच्या हाताने जन्मता जीवच धरला नाही, त्याला माझ्या औषधांची मात्रा कशी चालेल?''

शाळेच्या जवळच मास्तरांचे दोन खोल्यांचे, वर पत्रे टाकलेले घर होते. समोरच्या खोलीत, टेबल-खुर्ची टाकून मास्तर फावल्या वेळात दवाखाना चालवायचे. 'खोकल्याची गोळी', 'सर्दीचे औषध', 'जुलाबाची पावडर' अशा चिठ्ठ्या लावलेल्या असंख्य बाटल्या टेबलावर हारीने उभ्या असायच्या. तालुक्याहून स्वस्तात आणलेले औषधं-गोळ्या गावकऱ्यांना दहा-पाच पैशांनी महाग विकून मास्तर थोडेफार पैसे काढायचे.

''हा, एक मात्रा लागू होऊ शकते.'' मास्तरांचं बोलणं ऐकताना म्हादबाच्या आईचा चेहरा भाबडा व्हायचा. ''पारधी वस्तीवर जाऊन पारव्याचं उष्ण रक्त आणून मुलाच्या हातावर चोळत जा. हळूहळू जीव धरेल त्याचा हात. सशाची सागुतीही करून खायला घाल; येईल हालचाल त्याच्या हातात.''

त्यानंतर पारध्यांची खुशामत करणारी आई म्हादबाला आठवायची. गलोल, गोफणी, जाळी, तिरकमठे घेऊन जंगलात उरफोड करत पकडलेल्या पारव्यांचं रक्त किंवा सशाची सागुती फुकटात द्यायला पारधी राजी होत नसत.

म्हादबाचा निर्जीव हात हातात पेलून आई तासन्तास पारधी वस्तीसमोर दीनवाणी उभी राहायची. अखेरीस एखाद्या झोपडीतल्या म्हातारीला तिची दया यायची. वर्तमानपत्राच्या कागदात गुंडाळलेले सशाचे मांस आणि जुनाट, चेमटलेल्या टमरेलात पारव्याचं रक्त ती म्हादबाच्या आईच्या हाती गुपचूप आणून देई.

अल्युमिनियमच्या भांड्यात सशाची सागुती शिजेपर्यंत, आई म्हादबाच्या हाताला पारव्याच्या उग्र दर्प मारणाऱ्या, चिकट, डांबरी रंगाच्या रक्ताने चोळत असे.

त्याची आई संकोची, भिडस्त होती. मठात कीर्तन, प्रवचन असलं की दाराजवळच्या कोपऱ्यात बसून ऐकायची. संपलं की छोट्या म्हादबाला कडेवर उचलून लगेचच बाहेर पडायची.

पण, मुलाखातर तिने एक दिवशी हिंमत केली. प्रवचन संपल्यावर भाविकांची गर्दी तुडवत ती थेट विष्णू महाराजांसमोर उभी राहिली –

''तुम्ही आता प्रवचनात बोललात, परमेश्वर दयाळू आहे. मग त्यानं माझ्या लेकरावर अवकृपा का धरावी ?'' आईचा सूर रडवेला झाला.

''काय झालं बाई तुझ्या मुलाला?'' पायावर डोकं टेकवून नमस्कार करणाऱ्या म्हादबाची पाठ हलकेच थोपटत महाराजांनी विचारले.

''म्हाद्या, दाखव बाबा तुझा हात...'' आता मात्र आईला हुंदका आवरला नाही.

गुडघ्यांच्या खाली लोंबकळणाऱ्या पांढऱ्या सदऱ्याची उजवी बाही म्हादबाने वर उचलली –

ज्वारीच्या वाळक्या धांडासारखा चिपाड हात आणि त्याखाली लोंबकळणारा मेलेल्या चिमणीच्या पायासारखा आत वळलेला पंजा पाहून महाराजांच्या चेहऱ्यावर स्मित मावळलं.

''बाई, शक्तीचा देव महाबली हनुमान. त्याच्या मूर्तीवरचा ओला शेंदूर चोळत जा, पोराच्या हातावर. येईल शक्ती आपच.'' स्वत:ला सावरून महाराज बोलले.

पण व्यर्थ. सर्व उपाय करूनही म्हादबाच्या लोंबकळत्या हाताने जीव धरलाच नाही.

म्हादबाला आज प्रश्न पडायचा, दोष द्यावा तरी कुणाला? संसाराकडे पाठ करून विठोबाच्या पालखीसोबत निघून गेलेल्या बापाला, नकारार्थी मान डोलावणाऱ्या मास्तरांना, गळ्यावर सुरी फिरण्यापूर्वी फडफडाट करणाऱ्या पारव्यांना, मानेवर सोट्याचा फटका पडताच तंगड्या ताणून कापसाचा ओला गोळा होऊन पडलेल्या सशांना, सीताफळाच्या बी सारखी मधोमध आडवी, पांढरी रेघ असलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे रोखून बघणाऱ्या हनुमानाला का जाळीत गुंडाळून ठेवलेल्या वाळक्या काशीफळासारखा सुरकुतलेला चेहरा असलेल्या आईला?

कायम चिंताक्रांत असणारा आईचा चेहरा आठवून म्हादबाला गलबलून आलं. बाभळीची काटेरी फांदी गिळल्यासारखे त्याच्या घशात दु:ख दाटले.

आईने मात्र कधी कुणाला दोष दिला नाही. घरदार वाऱ्यावर सोडून बाप निघून गेला तेव्हा म्हादबा अगदीच लहान होता. त्याला बापाचा चेहराही आठवत नव्हता. पण त्या बिन चेहऱ्याच्या बापाबद्दलही आई कधी कडवट बोललेली त्याला आठवत नव्हते.

छोट्या म्हादबाला बोटाशी धरून ती नियमितपणे मठात येत राहिली. मठाच्या चौकातल्या उंबराखालचा दत्त, बाहेरच्या भिंतीशी असलेला शनीचा गोटा, मठाच्या मागे असलेल्या धाकट्या वडाच्या झाडाखालचा हनुमान, नदीच्या वाटेवरचा गणपती असे मुक्काम घेत ती नदीकिनारी असलेल्या विष्णू महाराजांच्या समाधी शेजारी येऊन बसे.

आयुष्याचं ओझं एकट्याने ओढताना आई अकालीच थकली. कमरेत धनुष्यासारखी वाकली. एका हातात आधारकाठी तर दुसरा हात, मिसरुड फुटू लागलेल्या, म्हादबाच्या खांद्यावर रोवून ती बदक चालीने नदीकाठी येऊ लागली. नदीच आपल्या जिवाभावाची सखी असल्यागत तिलाच आपलं दु:ख सांगू लागली. 'घे बाई आता माझेही हाडं पोटात!' म्हणून नदीला विनवण्या करू लागली.

पुढे, जमिनीला हनुवटी टेकण्याइतपत आई वाकली. तिला अंथरुणात उठणं अवघड झालं. हगणं-मुतणं अंथरुणातच, खाणपिणं बंद. अर्धवट बेशुद्ध अवस्थेत ती अंधाऱ्या खोपटात पडून होती.

आता जाते का मग जाते अशा अवस्थेत तापाने फणफणणाऱ्या आईच्या कानाला तोंड लावून, शेजारी राहणारी गिरजामावशी म्हणाली,

''कौसल्ये, अग जमिनीला खेटण्यापूर्वी सून आणली असतीस तर केलं असतं तिनं तुझं.''

पण आता राहून गेलेल्या गोष्टींबद्दल बोलून दैवगतीने

आखलेली वाट थोडीच बदलणार होती. एके दिवशी आईच्या शरीरातली धुगधुगी विझलीच.

कावळ्याने पिंडाभोवती एक फेरी मारली. वाकडी मान करून तो वाळूत दूरवर जाऊन बसला.

''कौसल्ये, नको रेंगाळूस बाई! म्हादबा राहिल माझ्या पदराखाली.'' गिरजामावशी बोलली. कावळ्याने लगेचच झडप घालून पिंडाला चोच लावली.

म्हादबाला पदराखाली घेण्याचं वचन देणाऱ्या, जख्ख म्हाताऱ्या गिरजामावशीच्या आयुष्यमाळेतील मणी सहा महिन्यांतच संपले. तिचेही पिंड वाळूत मांडले गेले.

दाढी-मिसरुड फुटलेला, आवाज घोगरलेला म्हादबा पुन्हा पोरका झाला. अंधाऱ्या खोपटातला एकांत त्याला खायला उठू लागला. तेव्हा तो खोपटी सोडून कायमचा मठाच्या आश्रयाला आला. त्या ठिकाणी करमणुकीला काही कमी नव्हती. वेळ कुठे जातो ते कळतही नव्हते. खाण्या पिण्याचाही प्रश्न नव्हता. भंडारा, अन्नदान, प्रसाद अशा विविध निमित्ताने एकवेळ का होईना, अन्न मिळत होते.

मठात नेहमीच वर्दळ असायची. दादा महाराजांनी मठाची सूत्रं हाती घेतल्यापासून तर भक्तांचा ओघ वाढला होता. शहरातूनही मोठ्या संख्येने भक्त येत होते. ट्रकच्या लांबीची स्पर्धा करणाऱ्या लांबलचक मोटारगाड्या येत. त्यातून विलायती गायींसारखा चौड्या अंगाच्या गोऱ्यापान बायका, कापसाच्या पोत्यांसारखे थुलथुलीत अंगाचे बाप्पे आणि चेंडूला वरून-खालून ओढल्यासारखे दिसणारे टगे पोरं-पोरी उतरत. तेव्हा शंभर अगरबत्यांची जुडी एकत्र लावल्यासारखा सुवासाचा भपकारा उसळून येई.

पक्ष्यांनी टोचून टाकलेल्या सुरवंटासारखे महारोगी, लुळे, पांगळे, आंधळे, भिकारी दिवसा मठाच्या रस्त्यावर, भाविकांची याचना करत दुतर्फा पडून असत. दिवस मावळला, भक्तांचा ओघ ओसरला की भिकारी मंडळी मठाच्या भिंतीला बाहेरच्या बाजूने चिकटत. तेथेच त्यांच्या चुली पेटत. चिलमी-विड्यांच्या फैरी झडत; पाठोपाठ खोकल्यांच्या उबळी उठत. अर्धी रात्र उलटली की भिकारी भिंतीला खेटूनच ढेपाळत.

देशी दारूच्या खोपटातला, काजळी ओकणारा, रॉकेलचा टेंभा मात्र त्यानंतरही जळत राही. ग्रामपंचायतीने विष चारलेल्या कुत्र्यांसारखे, दारूडे खोपटाच्या बाहेर येऊन पडत. अंधारात लडखडत पुन्हा चालू लागत. पुन्हा पडत.

डोम्या भोयी तर दारूच्या खोपटाचा रोजचा वारकरी. दुसऱ्या कोळ्यांनी नदीच्या प्रवाहात ताणलेल्या कंडाळातले हाती लागतील तेव्हढे मासे, पहाटफुटीच्या आधी टोपल्यात ओरबाडून घ्यायचे. पहाटेची बस धरून तालुक्याला जायचे. विनासायास मिळालेले मासे तालुक्याच्या बाजारात मिळेल त्या किमतीला फुंकून टाकायचे. आलेले पैसे उडवायचे. रात्री उशिराच्या बसने पुन्हा खोपटासमोर उतरायचे. खिशात शिल्लक असलेल्या पैशाचे भजे खायचे, वरून दारू सोडायची आणि पहाट होण्याची वाट पहात मठाच्या भिंतीशी लवंडायचे. असा डोम्याचा नित्यक्रम होता.

बगळ्याने चिखलातून बेडूक अचूक टिपावेत तसा, दारूड्यांच्या बेताल गलक्यातून, डोम्या बातम्या नेमक्या उचलायचा.

दादा महाराज दूरच्या प्रांतातून फरार होऊन मठाच्या आश्रयाला आले आहेत. त्यांच्या नावावर एकाच्या खुनाचा गुन्हा आहे. त्यांच्याशी झालेल्या बेबनावामुळेच विष्णू महाराजांनी अन्नत्याग करून प्राण सोडला. ह्या बातम्या म्हादबासमोर सर्वप्रथम तोच बरळला होता.

म्हादबासारखाच डोम्याही पोरका होता. त्यामुळे त्याला म्हादबाबद्दल विशेष उमाळा होता.

''तू काळजी लावून धरू नकोस'' दारूची तार ओसरलेला डोम्या त्याच्या पाठीवर थोपटत म्हणे. ''माणूस रोटी बगैर चार-सहा दिस राहू शकतो. पाण्याबगैर कैक घंटे राहू शकतो. पर हवे बगैर पलभर राहणी मुश्किल, गड्या ! माशाला पाण्याबाहेर काढणं काय नि माणसाला पाण्याखाली दाबणं काय... श्वास तुटला की खेळ खल्लास ! म्हणून तर देवानं साऱ्यांना हवा बिनपैशांची दिली आहे. रोटी कपड्यासाठी कोण काय करतं ह्येच्याशी देवाला काय घेणं देणं नाय. ते ज्याचं त्यानं पाहावं.''

पहाटे मासोळी चोरण्यासाठी नदीवर जाण्यापूर्वी डोम्याचा युक्तिवाद ठरलेला असायचा –

''अरं म्हादबा, पोटासाठी चोरी केली तर काय बिघडलं? आन् मासोळी काय ह्यांच्या बाने सोडली नदीत? कंडाळातून थोडी ओढली तर ह्याचं काय जातं?''

रोजीरोटीसाठी काय करता येईल याचा विचार तर म्हादबा रोजच करत होता. परंतु अद्याप त्याचा निर्णय झाला नव्हता. किंवा निर्णयाप्रत येण्याची तीव्रता त्याला अद्याप भासली नव्हती.

कोल्हाट्याचा चंदर बसथांब्याशेजारी तीन चकत्यांचा खेळ मांडायचा. तो खेळ म्हादबाच्या मनात घर करून बसला होता. तीन पैकी एका चकतीच्या पोटावर लाल गोल तर उरलेल्या दोन चकत्यांवर काळे गोल असायचे.

''लाल पे माल!'' असे ओरडत चंदर उकिडवा बसायचा.

सभोवती गर्दी जमेपर्यंत हातातल्या चकत्या शिताफीने फिरवून समोरच्या पोत्यावर पालथ्या टाकून उचलायचा. पुन्हा टाकायचा.

गर्दीत बेमालूम उभे असलेले चंदरचे साथीदार चकत्यांवर पैसे लावायला सुरवात करायचे आणि मूठ, मूठ भरून नोटा जिंकायचे. ते पाहून खऱ्या सावजांची भीड चेपायची. हळूहळू लोक चकत्यांवर पैसे लावून हरायचे. चंदरचा खिसा नोटांनी ठासला जायचा.

हे किंवा यासारखं एखादं काम म्हादबाला हवं होतं. त्याचा उजवा हात धड असता तर त्यानेही चंदरसारखं 'लाल मे माल' म्हणत चकत्या उडवल्या असत्या.


पुजाऱ्याचा सोपान करत असलेले पावत्या फाडायचे कामही त्याला आवडत होते. अभिषेकासाठी निळ्या रंगाची, जीर्णोद्धारासाठी गुलाबी रंगाची, किरकोळ देणगीसाठी पांढऱ्या रंगाची अशा तीन रंगाच्या पावत्या आता म्हादबाला पाठ झाल्या होत्या. पैसे घ्यायचे. भाविकाचे नाव लिहायचे. पावती फाडून देऊन टाकायची. झालं काम!

कशासाठी कुठल्या रंगाची पावती द्यायची ते लक्षात ठेवणं सोपं होतं. छिद्राछिद्रांच्या रेषेवरून पावती फाडणं सोपं होतं. पण भाविकांची नावं लिहायचे काम आपल्याला जमेल का? ह्या शंकेने म्हादबाचा हिरमोड व्हायचा. तिसऱ्या इयत्तेत तुटलेल्या शिक्षणाच्या जोरावर सोपान मोडकं-तोडकं लिहू तरी शकत होता आणि मुंगळे चिरडल्यासारख्या अक्षरात त्याने लिहिलेले नाव पुन्हा कधी वाचण्याची कुणाला गरज पडत नव्हती. पण आपल्याला तेव्हढीही अक्षर ओळख नाही या जाणिवेने म्हादबाचा उत्साह मावळायचा.

अलीकडच्या मनोराज्यात त्याने विधवा केराबाईच्या नवऱ्याच्या जागी स्वत:ला चिकटवून टाकलं होतं. एकदा का केराबाईची समजूत पटली आणि तिने आपल्याशी दुसरे लग्न मांडले की सगळ्या गोष्टी कशा आयत्याच मिळतील या कल्पनेने तो हुरळून गेला होता. ऐन तारुण्यात वैधव्य आलेली, नाकी डोळी तिखट असलेली केराबाईसारखी कमावती बायको, कामधंद्यात मदत करणारा तिचा मुलगा आणि तेजीत असलेला चहा-भज्यांचा धंदा अशा सर्व गोष्टी विनासायास त्याच्या होणार होत्या.

केराबाई भजी तळते आहे, चहा गाळते आहे, तिचा मुलगा गिऱ्हाईकांना भजी-चहा देतो आहे आणि सर्वांवर देखरेख करत आपण गिऱ्हाईकांकडून पैसे घेऊन गल्ल्यात टाकतो आहोत, असे स्वप्न त्याला जागेपणीही पडत असे.

मात्र, गेल्या आठवड्यात डोम्याने सांगितलेल्या बातमीमुळे त्याच्या ह्या स्वप्नाच्या चिंधड्या उडाल्या होत्या.



''दादा महाराज पैसा देणार आहेत, म्हणे बाईला. तालुक्याच्या बसस्टॅण्डवर मुलासाठी हॉटेल थाटणार म्हणते बाई!'' दारूच्या नशेत डोम्या बोलून गेला.

ते ऐकून म्हादबाला आश्चर्याचा झटका बसला. दादा महाराजांनी केराबाईला का म्हणून पैसे द्यावेत? शंखासारख्या गुळगुळीत शरीराच्या शहरी बायका त्यांच्याकडे येत असताना, काळ्या-सावळ्या, खेडवळ केराबाईत दादा महाराजांनी काय पाह्यलं असावं?

''हायब्रीड वाणाच्या जोंधळ्याचा गुळभेंडीपुढं काय पाड?'' म्हादबाच्या मनातला गोंधळ ओळखून डोम्या हसत म्हणाला आणि दारूच्या नशेत एका अंगावर कलंडला.

त्या दिवसापासून म्हादबाने केराबाईवर तिच्या नकळत लक्ष ठेवले. चहा-भज्यांचे काम पोरावर सोडून ती दिवसभरात अनेकदा मठात जाते हे त्याच्या लक्षात आले. रोज रात्री स्टोव्ह विझविण्यापूर्वी, कागदाखाली झाकलेली भज्यांची बशी आणि चहाचा प्याला घेऊन ती न चुकता मठात जात असते हेही त्याने पाहिले.

पण त्याची नजर लोखंडी जाळी ठोकलेल्या व्हरांड्यापर्यंतच तिच्या पाठमोऱ्या आकृतीचा पाठलाग करू शकत होती. तेथून पुढे, दादा महाराजांच्या निवासस्थानाकडे

जायला सर्वसामान्य भाविकांना मज्जाव होता. जाळीच्या दरवाज्याशी बसलेल्या रखवालदाराकडे दुर्लक्ष करून केराबाई मात्र बिनदिक्कत आत जात होती.

दादा महाराजांच्या शयनगृहाची एक भली मोठी खिडकी नदीच्या पात्राच्या दिशेने उघडत होती. लघवी करण्याच्या निमित्ताने मठाच्या मागच्या भिंतीशी जाऊन, त्या खिडकीतून डोकावून बघण्याचा प्रयत्न म्हादबाने अनेकदा करून पाहिला होता. परंतु रंगीत कापडाचा जाड पडदा, त्यानंतर दुधी रंगाची काच, काचेवरती लोखंडी जाळी आणि शेवटी डास आत येऊ नयेत म्हणून खिडकीवर ठोकलेली नॉयलॉनची बारीक जाळी या पलीकडे तेलाच्या एकमेव मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात काही दिसणं शक्य नव्हतं. त्यातच शयनगृहाच्या कोपऱ्यात ठेवलेल्या धूपपात्रात जळणाऱ्या उग्र वासाच्या धूपातून उठणारे धुरांचे ढग आत तरंगत असायचे.

आणि आत काय चाललंय ते पाहून तरी आपण काय करू शकणार आहोत, या विचाराने म्हादबा दरवेळी खजील होत असे. दादांच्या कारस्थानापुढे जिथे विष्णू महाराजांना अन्नत्याग करून प्राण सोडावे लागले होते; मठाच्या पुजाऱ्याला दादांच्या ताटाखालचे मांजर होऊन राहावे लागत होते; तिथे आपल्यासारख्या एका सामान्य आणि तेही एका हाताने अधू माणसाचे काय चालणार?

सहा फूट उंचीचे, आडव्या अंगाचे दादा महाराज बाहेरच्या प्रांतातले आहेत हे तर त्यांच्याकडे पाहूनच कळत होते. दूध-हळदीने रोज स्नान करत असल्यासारखी तेजाची कांती. स्फटिकातून कोरून काढल्यासारख्या दिसणाऱ्या दंतपंक्ती. मागे वळवून व्यवस्थित बसवलेल्या केसांखालचे भव्य कपाळ आणि घारे डोळे. अशा वर्णनाच्या माणसाची उपज पंचक्रोशीतल्या गावातही नव्हती.

विष्णू महाराजांचा शिष्य म्हणून मठाच्या आश्रयाला आलेल्या दादांनी हळूहळू मठाच्या कारभारावर कब्जा केला. मठाच्या तिजोरीत देणग्यांच्या नावाखाली टोपल्याने पैसा पडे. त्या पैशातूनच दादा महाराज अडल्या-नडल्या लोकांना व्याजाने पैसे देऊ लागले. त्यामुळे पैशाला लागून पुन्हा पैसा येऊ लागला.

विष्णू महाराजांनी देहत्याग केल्यानंतर दादांनी त्यांची राहती खोपटी पाडून स्वत:साठी ऐसपैस लांबी रुंदीचं शयनगृह बांधलं. हत्ती चारही पाय ताणून आरामात झोपू शकेल एवढा मोठा सागवानी पलंग तयार करून घेतला.

मठात चालणारे कीर्तन, भजनं, प्रवचनं बंद झालेत. त्यांच्या जागी ध्यानधारणा, हातातून अंगारा काढणे, जळता कापूर जिभेवर ठेवणे, निखाऱ्यावरून चालणे असे प्रकार सुरू झाले. योगसाधनेच्या बळावर स्वत:ला जमिनीखाली गाडून घेण्याचा दादा महाराजांचा चमत्कार तर सर्वदूर मशहूर झाला होता. दादांनी तो प्रयोग दोनदा यशस्वी करून दाखविला होता. पहिल्या वेळेस दोन दिवसांसाठी स्वत:ला जमिनीखाली गाडून घेतले होते, तर दुसऱ्या वेळेस तीन दिवसांसाठी. दोन्ही वेळेस भक्तांच्या अलोट ओघाबरोबरच वृत्तपत्रांचे वार्ताहर, छायाचित्रकार, दूरचित्रवाणीचे लोक ह्यांची तुडुंब गर्दी दाटली होती. हवा, अन्न-पाण्यावाचून दादा महाराज जमिनीखाली राहतातच कसे याचा छडा लावण्यासाठी शहरातून आलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन वाल्यांशी दादांच्या भक्तांनी तुंबळ हाणामारी झाली होती. त्यामुळे दोन्ही वेळेस मोठा पोलीस बंदोबस्त लावावा लागला होता.

आदल्या दिवशीपासून दादांनी तिसऱ्या वेळेस तो प्रयोग आरंभला होता. यावेळी मात्र सर्व प्रकाराबाबत गुप्तता पाळण्यात आली होती. शहरातून आलेल्या निवडक भक्तांखेरीज गावातल्या कुणालाच प्रयोगाबद्दल माहिती नव्हती. शेवटच्या दिवशी म्हणजेच चौथ्या दिवशी दादा महाराजांना खड्ड्याबाहेर सुखरूप काढतानाच वृत्तपत्राच्या वार्ताहरांना, दूरचित्रवाणीवाल्यांना आमंत्रित करण्यात येणार होते. तरीही अंधश्रद्धा निर्मूलनवाल्यांनी काही गडबड करू नये म्हणून दादांचे शहरी भक्त आलटून-पालटून प्रयोगस्थळाची राखण करत बसले होते.

केराबाईवर बारकाईने नजर ठेवून असलेल्या म्हादबाला ती दोन दिवस मठाकडे न फिरकल्यामुळे आश्चर्य वाटले होते.

''बेडूक बसलाय चिखलात त्वांड घालून!'' डोम्या त्याच्या कानाशी खुसफुसला. ''शहरी लोकं आल्येत ह्येचा चमत्कार पाह्यला... चमत्कार!'' कुत्सितपणे हसत डोम्या म्हणाला.

चमत्काराविषयी बराच वेळ बडबड करून डोम्या पेंगाळला. तोंड उघडे टाकून, फुत्कारे टाकत घोरू लागला. म्हादबा मात्र टक्क जागा होता. दादा महाराजांना संपविण्याच्या कल्पनेने त्याच्या मेंदूतले रक्ताभिसरण वेगाने सुरू झाले. त्याची झोप पार उडाली. एखाद्या निशाचर श्वापदाच्या सावधतेने तो उठला. मठाला वळसा घालून मागच्या बाजूला आला.

नदीच्या पात्रावर तरंगणाऱ्या चंद्रबिंबासमोरून ढगांचा पडदा सरकताच चंद्रप्रकाश प्रखर झाला. शांत, नितळ पाण्याच्या पृष्ठभागावरून परावर्तित होणाऱ्या चंद्रप्रकाशामुळे आसमंत उजळून गेला. पिंपळाच्या जुनाट झाडाखालचा विष्णू महाराजांच्या समाधीचा दगडी चौथरा स्पष्ट दिसू लागला. त्या

पलीकडे रंगीत कनाती ताणून मंडप उभारला होता. मंडपाच्या मधोमध असलेल्या वाळूच्या चौरस ढिगाऱ्याखाली दादा महाराजांनी जिवंत समाधीचा प्रयोग आरंभला होता.

म्हादबाच्या अपेक्षेप्रमाणे, राखण करणाऱ्या भक्तांच्या दोन्ही खुर्च्या रिकाम्या होत्या. नदीकिनारीच्या थंडीत कुडकुडत न बसता, भक्तांनी मठात पथारी पसरून ताणून दिली होती.

आजूबाजूला कोणी नसल्याची खात्री होताच म्हादबा अलगद वाळूत उतरला. दुतर्फा बेशरमाची झाडी वाढलेल्या सांदीतून पात्राच्या दिशेने चालू लागला.

नदीच्या उबदार प्रवाहात डुबकी मारून त्याने सरपटायला सुरुवात केली. पुढे सरकताना किनाऱ्यावर असलेले मातीचे टेकाड वेड्या राघूंच्या बळदातून हात घालून पाहताना एके ठिकाणी त्याला प्लॅस्टिकच्या पाईपचा स्पर्श झाला.

सावजाचा कंठ अचूक जबड्यात आलेल्या वाघाच्या समाधानाने तो हुंकारला.

मांडीच्या जाडीचा तो पाईप वाळूच्या खालून बेमालूमपणे दादा महाराज समाधी लावून झोपलेल्या खड्ड्यापर्यंत गेलेला आहे हे त्याला डोम्याच्या बडबडण्यातून कळाले होते. बाहेरची शुद्ध हवा पाईपाद्वारे खड्ड्यात पोहोचत होती.

पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत आलेली काळी चिकण माती त्याने पाईपाच्या तोंडावर थापायला सुरुवात केली. तोंड पूर्णपणे हवाबंद झाल्यावर, ठासलेल्या मातीवर गढूळ पाण्याचे बुडबुडे येऊन फुटले.

चिखलाने माखलेला हात प्रवाहात धुऊन म्हादबा पाण्याबाहेर आला. आवाज न करता, बेशरमीच्या झाडांचा आडोसा घेत तो कनाती जवळ पोहोचला. वाळूच्या पसरट ढिगापाशी गुडघे मोडून बसला. त्याने ढिगाला कान लावला.

खड्डा बुजविण्यापूर्वी, वाळू आत ढासळू नये म्हणून खड्ड्याच्या तोंडावर टाकलेल्या फळ्या आतून ठोकल्या जात असल्याचा आवाज त्याच्या कानी पडला.

डब्यात अडकलेल्या उंदराची खूडखूड ऐकून हसणाऱ्या मुलाचे खट्याळ हसू त्याच्या चेहऱ्यावर पसरले. तो झपाट्याने पुन्हा नदीकिनारी आला. श्रमाने थकलेले शरीर त्याने ओल्या कपड्यानिशी वाळूवर झोकून दिले.

पश्चिमेला सरकणाऱ्या चंद्राने आता ढगांच्या आड दडी मारली होती. त्या काळोखात नदीच्या पात्रातून अचानक एक मानवी आकृती प्रगटली. वाळूवर निपचित पडलेल्या म्हादबाच्या हृदयाचा एक ठोका निसटला.

दादा महाराज तर वाळू खालून, गुप्त मार्गाने सरपटत येऊन पाण्यातून प्रगटले नाहीत ना? या कल्पनेने त्याचे ओले शरीरही घामेजले.

पडल्या जागेवरूनच तो त्या आकृतीच्या दिशेने पहात होता. ती आकृती त्वरेने किनाऱ्याच्या दिशेने आली.

वाळूत पडलेले कपडे उचलून शरीरावर चढवणाऱ्या डोम्या भोयाला म्हादबाने ओळखले. कंडाळातून ओरबाडून आणलेल्या माशांनी भरलेली टोपली उचलून तो त्याच्या शेजारून झपाट्याने चालता झाला. अंधारात निपचित पडून असलेल्या म्हादबाकडे त्याचे लक्षही गेले नाही.

घाई गडबडीने पळणाऱ्या डोम्याच्या टोपलीतून उसळलेला हाताच्या पंज्याच्या आकाराचा एक टपोरा, चंदेरी रंगाचा मासा म्हादबाच्या चेहऱ्यापासून हातभर अंतरावर पडला.

डोम्या निघून जाताच म्हादबा उठून बसला. पहाटेच्या थंडगार, झोंबऱ्या वाऱ्यापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी त्याने डावा हात गुडघ्याभोवती गुंडाळून घेतला. त्याच्यासमोर चंदेरी मासा श्वासासाठी धडपडत होता.

पहाटेची चाहूल लागताच, कावळ्याची एक जुगती जोडी नदी किनारी अवतरली. पात्रात चोची बुडवून दोघांनी घशात पाणी ओढले. तरतरी येताच कावळ्याने शेपूट फडकावत घशातून 'क्रू... क्रू...' असा लडिवाळ आवाज काढायला सुरुवात केली. मानेवरची पिसं पिंजारून तो कावळीला लगटू लागला. पण कावळीचे लक्ष म्हादबासमोर आता निश्चल पडलेल्या, वाळूने लडबडलेल्या माशाकडे लागून राहिले होते.

''घे तुझ्या आयला!'' म्हणत म्हादबाने मेलेला मासा उचलून कावळीच्या दिशेने भिरकावला.

मासा हवेतल्या हवेत धरून कावळी दूर उडाली. पाठोपाठ कावळा झेपावला.

पहाटवारा उरात खोलवर भरून घेत म्हादबा स्वत:शीच समाधानाने हसला. कपड्यांना चिकटलेली वाळू झटकत तो उभा राहिला. त्याचं शरीर पिसासारखं हलकं झालं होतं. स्वत:च्याच तंद्रीत तो मठाच्या दिशेने चालू लागला.

मठात टाळ, नगारा, घंटा, झांजीच्या तालावर सुरू झालेली काकड आरती त्याच्या कानावर पडू लागली.

ढगातून निसटणारी उगवतीच्या सूर्याची किरणे मठाच्या कळसावर पडताच सोन्याचा मुलामा चढवलेला तो कळस नव्या तेजाने झळाळू लागला.

० ० ०

- संतोष वरधावे
'श्रावण', प्लॉट नंबर ४५,शंभू महादेव नगर, सहकार नगर समोर,
औरंगाबाद ४३१००१ भ्रमणध्वनी ९४०४५१५८६९

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

# कॉ. गोदुताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., अ. ब. क., सोलापूर.



*आशिया खंडातील सर्वात मोठी महिला कामगार गृहनिर्माण योजना पूर्णत्वास आली आहे याचा आम्हाला अभिमान वाटतो.*

**संस्थापक प्रवर्तक : आ. कॉ. नरसय्या आडम मास्तर**

M.L.A. Vice President of C.I.T.U. (Maharashtra State)

**कॉ. सौ. सुनंदा सिद्राम बल्ला**
चेअरमन अ संस्था

**कॉ. शकुंतला दयानंद पाणीभाते**
चेअरमन ब संस्था

**कॉ. फातिमा फरिद बेग**
चेअरमन क संस्था

**कॉ. नसिमा घुडुभाई शेख** (नगरसेविका)
सेक्रेटरी अ, ब, क संस्था


**कॉ. बालाजी यलय्या महेशन**
मॅनेजर अ, ब, क संस्था

१७६२, दत्तनगर, सोलापूर - ४१३ ००५
फोन : २७२२८१८ / २३२७६१७

# हे कवी..

हे कवी ! माझे तडफडते काळीज विझणे तुला मान्य नाही
पाय गेले आहेत रक्ताळून आणि माझे थांबणे तुला मान्य नाही
मान्य नाही तुला माझ्या जीवघेण्या जखमांची ठणक थांबणे
वणव्यांच्या तुरुंगातून माझी सुटका होणे तुला मान्य नाही

हे कवी ! तू मला भोवतीच्या वर्गीकरणाच्या अतीत केलेस
माझे असीम कोणत्याही सीमेत मावणे तुला मान्य नाही
तुझी ताकीद अशी की माणूसच नायक असावा कवितेचा
मी प्रेताच्या डोक्याने कविता लिहिणे तुला मान्य नाही



हे कवी ! मला लिहायला लावतोस तू पिंजरे तोडणाऱ्या हातांची कविता
लोकांना धुक्यात फसवून दुबळे करणे तुला मान्य नाही
कविता नसावी शब्दचलाखी करणारे जादूचे रंजक प्रयोग
कवितेने कोणाच्याही डोळ्यात धूळ फेकणे तुला मान्य नाही

हे कवी ! तू फेकतोस मला दु:खांच्या वादळी महासागरात
मी कूपमंडूक होणे आणि यशस्वी होणे तुला मान्य नाही
तू मला लिहायला लावतोस दु:खान्ताची शूरवीर कविता
कीटकांच्या तृप्त गर्दीत, मी कीटक होणे तुला मान्य नाही

हे कवी ! तू माझ्यापुढे मांडतोस उजेडाला बेसावध करणारी कारस्थाने
माझ्या ज्वालांच्या तोंडी विझलेले शब्द तुला मान्य नाही
तू मला तुटून पडायला लावतोस जिंकणाऱ्या असत्यांवर
माझ्या विद्रोही आशयाने प्रवाहपतित होणे तुला मान्य नाही




हे कवी ! तुला वाटते माझ्या कवितेने सैनिक व्हावे माणसाच्या विजयासाठी
काखेत झोळ्या घेऊन फिरणारे शब्द तुला मान्य नाहीत
तुला किळस वाटते नशेतील बेताल बडबडण्याची
प्रस्थापितांची थुंकी चाटणाऱ्या जिभा तुला मान्य नाहीत.


हे कवी ! तू करतोस मला अस्वस्थ कवितांनी पेटणारा गुलमोहोर
मी वठून जाणे आणि गोठून बसणे तुला मान्य नाही
तुला वाटते मी विजा बांधाव्यात मनस्वी, माझ्या गर्भार छंदात
मरणाला मारावे वंचितांनी, वंचितांचे मरणे तुला मान्य नाही

हे कवी! तुला वाटते; कणा ताठ राहील माणसांचा अशी कविता मी लिहावी
दुनिया जळत असताना मी आगीबाहेर असणे तुला मान्य नाही
कफन बांधून संकटांमागे धावत आहेत वंचितांचे थवे
तुला हवा आहे संघर्षाचा भडका, समतेचा पराभव तुला मान्य नाही.

हे कवी ! तुला वाटते मी निराशेच्या बर्फावर उन्ह पसरावे
माणसातील चांदण्यात स्मशान शिरणे तुला मान्य नाही
वाताहतीच्या पोटीच जन्माला येतात क्रांत्यांची सूर्यमंडळे
तुला हवे आहे वंचितांचे लढणे, त्यांचे रडणे तुला मान्य नाही.

**डॉ. यशवंत मनोहर**

## पक्षी



पक्ष्यांचं नातं ईश्वराशी असतं
माणसांची गाणी पक्षी गात नाहीत
पक्ष्यांचं गाणं आनंदाचं गाणं असतं
पक्ष्यांचं गाणं प्रकाशाचं गाणं असतं

पक्षी पक्ष्यासारखं जगतात
जगण्याचा खराखुरा आनंद लुटतात
आकाशातून उडत उडत आलेले पक्षी
देवदूतासारखे वाटतात !

०००

**गोविंद कुलकर्णी**



## नदी

आमची म्हैस वाहून गेली म्हणून काय नदीच्या पाण्यावर
आम्ही मारल्या नाहीत काठ्या ;
सगळा पिकांचा हंगाम गेला पाण्याखाली
म्हणून काय नदीची गावात उठवली नाही आम्ही
बदनामीची आरोळी !

चोच दिल्यावर चाराही द्यायचं नदीला कळतं
कुणी पाण्यात बुडून मरू पाहताना
जीवितांच्या रक्षणाची ढाल नदीच्या पाठीवर आहेच बांधलेली !

फक्त तुलामला कळायलाच हवे की;
नदीच्या फार नादी लागायचं नाही
तरलं काय अथवा बुडलं काय,
नदीच्या नावानं बोटं मोडून फार सांगत सुटायचं नसतं !!

हे गोदामाय, जगायची भाषा मी तुझ्याच
पाण्यावर लिहून शिकून घेतली आहे !

०००

**केशव सखाराम देशमुख**



## अपार एकटेपणात

आरशावर खूपच धूळ साचलीय.
चेहरा पाहावा तर धूळच धूळ.
कपाळावरल्या रेघा अंधुक अंधुक...
मग, आपलं धूळ झाडणं चालूच.
स्वच्छ झाल्यासारखा दिसतोय आरसा,
पण प्रतिमा लख्ख नाहीच.
न दिसणारे कण
आरशाला चिकटून बसलेले.


कुणीतरी सारखं सांगत असतं;
''आरशाहून कुठे वेगळी असते प्रतिमा ?''

दिवस ढळतात.
रात्री सरतात.
मनामध्ये उमलतात
इच्छांची फुलं.
मनातच कोमेजत
पुन्हा मनोमय होऊन जातात.

आता, अपार एकटेपणात
निनावी सांगात्याची आठवण.
पाहता, पाहता पाहणंच विसरून,
अनायास आपल्याठायी आपण.

०००

**हेमकिरण पत्की**



# राहवले नाही

मला काही म्हणायचं नव्हतं जे चालले आहे पुढे त्याच्याविषयी
मला काहीच म्हणायचं नव्हतं जे माझ्या आत चाललं आहे त्याच्याविषयी
मला काहीच म्हणायचं नव्हतं घेरून आलेल्या अंधाराविषयी
मला काहीच म्हणायचं नव्हतं खचत चाललेल्या घराविषयी, धीराविषयी.


पाठीवर उठणाऱ्या वळांविषयी माझी तक्रार नव्हती
हृदयात उठणाऱ्या कळांविषयी माझी तक्रार नव्हती
रक्तात लहडलेल्या झळांविषयी माझी तक्रार नव्हती
साचलेल्या तळ्याविषयी माझी तक्रार नव्हती

मी मौनच होतो छाटल्या जरी प्रश्नांच्या गर्दनी
मी मौनच होतो जरी आटून गेले समुद्राचे पाणी
मी मौनच होतो रानाला लागली जरी आग
मी मौनच होतो अस्तित्वाला वेटाळले जरी नाग

खूप वेळ झोपेतच होतो, आता आता उठलो आहे
वाटांसोबत मीही असा सुसाट सुसाट सुटलो आहे
पृथ्वी थरथरली तेव्हा स्थिर राहवले नाही
होरपळू लागली कविता तेव्हा मौन साहवले नाही.

० ० ०

**प्रमोदकुमार अणेराव**




# वानवळा

तुराट्याचं व्हडगं
बैलगाडीच्या साट्यात मावणारे उंच
पाटलीच्यावर वितभर,
तेवढं भरून दररोज आंबे यायचे शेतातून.
खुडी अन् गंजवा रिकामा नेत नसत
पाड लागलेली झाडं उतरायला लावलेले उतारी.
एक दोन फाडी टाकून नेत शिवाय
मजुरी नेत शेकडा सहा फाडी.
कळायचा नाही मला हिशोब त्या वयात.
वीस फाडीचा शेकडा
माप छकडीचं !
वीस फाडीचे आंबे व्हायचे
एकशेवीस,
त्याला शेकडा म्हणायचं छकडीच्या मापानं !
वानवळा म्हणून दोन दोन फाडी
शेजाऱ्या पाजाऱ्यांना
नेऊन द्यायचो आम्ही लहान मुलं
आईच्या सांगण्यावरून;
आडीला आंबा पिकल्यावर.
मुगाच्या शेंगा, हरभऱ्याचे ढाळे
भुयीमुगाच्या शेंगा
यांच्या वानवळ्यांचीही
व्हायची देवाण घेवाण.
चारा दिसला की पाखरूसुद्धा
हाक घालतं आपल्या थव्याला.....
आई सांगायची
'एकटाच खातो तो पाप खातो.'
निरक्षर आईनं वाचली नव्हती गीता
वाचली होती माणसं;
पाहिली होती पाखरं.
खरंच मला आजही वाटतं
एक तीळ सात जणांनी
वाटून खाल्ला असेल .....?
वानवळा मात्र आज
लोपला आहे.

० ० ०

**विनय अपसिंगकर**

# तूर्त इतकंच



अवघा पसारा कवट्यात घेताना पुढे
कवितेबद्दलही सांगणे आलेच ना.

अरे हो. ही माझी कविता, माझीच.
हिला स्वत:ची अशी ओळख नाही.
आपला म्हणता येईल असा चेहरा नाही.
नाही घरंदाजपणाही
अवतीभवती ठसक्यात
नांदणारा.
मान्य केलंच पाहिजे,


हिला नाही सोसवत नाद लय ताल तोलाची भरजरी पैठणी
छंद-वृत्त अलंकारांच्या दागिन्यांचे ओझेही नाही झेपत
सकवारपणाची जोडवी... टचटचतात बोटांना
आणि लडिवाळपणाच्या अंगठ्यांनी हात थरथरतात उगीचच.
ठसठशीत कुंकू तेवढे भाळी असले
म्हणजे
ही सौभाग्याची.


आहे जराशी गावंढळ... शिवराळ... फटकळ...
आणि
वेळ पडल्यास सरळ मनगट धरणारी.
जी तुमची
आणि
आमची
तीच तिची भाषा आणि तिचे व्याकरण.

कवितेबद्दलचे तूर्त इतकेच
पुढचे पुढे.

० ० ०

**वसंत वाहोकार**





# नवी त्वचा येण्याच्या काळात


नवी त्वचा येण्याच्या काळात
मांसल ओला लिबलिबित दगड होऊन गेलेले असते शरीर
खबदाडीतील अशी एखादी सुरक्षित अवघड जागा
शोधून लपवून ठेवावे लागते स्वत:ला
की टोचू नयेत खडेकाटे किंवा अगदी एखादे वाळके पानही
येऊ नयेत तिथे किडेमुंग्यादेखील, दुसऱ्या थोर जीवांची तर
सावली सुद्धा नको
निपचित पडून राहावे लागते आतल्या घडामोडी अनुभवत
किती तुटते मोडते मरते जन्मते आतल्या आत
निमूट सोसावे लागते सारे अपरिहार्य
पुन:पुन्हा वाटत राहते की संपते आहे सारे आता
आता फक्त वाट पाहायची अंतिम क्षणाची
लवकर घडावे नष्ट होणे इतकीच क्षीण प्रार्थना
अशक्य जगणे जिवंत राहणे अशक्य आता

प्रत्यक्षात अजिबात ज्ञात नसते की आहे हे
केवळ कात टाकणे !

० ० ०

**कविता महाजन**

# तू न् मी



खण हरवलेल्या भिंतींआत
मांडून ठेवलेली प्लॅस्टिकची आरास
भिंतीवर टांगलेला प्लॅस्टिकचा समुद्र
प्लॅस्टिकच्या लाटा.
प्लॅस्टिकचे निळेभोर क्षितिज.

तुझ्या कपाळावर प्लॅस्टिकचे कुंकू
दाट काळ्याभोर भरगच्च केसात
तू आवडीने खोवलेलं प्लॅस्टिकचं फूल
अन्
तुझ्या देहगच्च काळोखातून ऐकू येणारी
तुझ्या बांगड्यांची प्लॅस्टिकची किणकिण.

आपण नाही अनुभवू शकत
परस्परांतील
सहकंप. सहसंवेदन. सौहार्द्र

तू उडवायचीस अंगणभर विखुरलेले निळेभोर पक्षी
अन् पसरू द्यायची नाहीस दारातली चंद्रफुले
तुला नाही उमजायची
दारात थांबलेली घनव्याकूळ संध्याकाळ.

मी नाही पेलू शकत
घरात उतरलेले तुझे प्लॅस्टिकचे महानगर.
भिंतीतून पाझरणारी भव्य पोकळी.

तरीदेखील
तू न् मी
मी न् तू.
एवढाच खेळ दोघांत
परस्परांच्या अनोळखी प्रदेशात.
आजन्म... अनिवार्य .....

० ० ०

**सुनील साळुंके**

# बहुधा हेही पुस्तकाविषयीच बोलतोय आपण...



१
नव्यांना सामावून घ्यायला कुरकुरतात अलीकडे काही आधली मातब्बर मंडळी
खरंतर आधल्यांचं स्थान अबाधितच असणार आहे
नव्यांसाठी जागा करून देताना फार फार तर थोडं अंग चोरून घ्यावं लागेल
थोडं दाटीवाटीनं बसावं लागेल इतकंच



२
वैतागून एकदा मी आधल्यांतले काही बाजूलाच काढले
मनात म्हणत की, हे फक्त ॲवार्ड विनर म्हणून ग्रेट दुनियेसाठी
आणि हे कायम अभ्यासक्रमात इथेतिथे म्हणूनच केवळ आपण सांभाळतोय यांना
परवडत नसतानाही खिशाला कात्री लावून आणलेले कुठून कुठून
बाकी आपल्याला एरव्ही त्यांचं कधी पटलेलं नाही काही
आपले प्रश्न, आपलं जगणं, आपली मूल्ये
आपल्या कशाशीच यांचा काही संबंध आला नाहीये आजवर...

३
खरंय की, यांतल्याच कित्येकांनी जागतं ठेवलंय समृद्ध करून अहोरात्र,
हलवून सैल करायला लावलीत पिढ्यान् पिढ्यांपासून ठाकून ठोकून बसवलेली पाचरं...
वर्तमानाचं बोट धरून धावायला शिकवताना स्वत: मात्र कधीच बदलले नाहीत
आपल्या आपल्या काळातच गोठून राह्यलेले हे हट्टी म्हातारे



आपणच आता थोडं आक्रसून घ्यायला हवंय तोकड्या अवकाशातल्या
घरात आपल्या, आपुलकीच्या या पुतांना सामावून घ्यायला आयुष्यभरासाठी.

**प्रवीण दशरथ बांदेकर**


## पाखरू

तुम्ही धरू पाहता पाखराला
ते हवं म्हणून
तुमच्या कह्यात
राहावं
तुमचं गाणं ऐकून
त्यानं नाचावं
किंवा वाजवावी टाळी
भाषण ऐकून
आणि कधीही
मारली हाक तर बसून दाखवावं
खांद्यावर अन्
तळहातावरचे
नको असताना
दाणे टिपावेत म्हणून.

खरं तर रूप देखणं
अन् चमकदार रंग
काढून घेता येत नाहीत
नाही तर तेही तुम्ही
जडवले असतेत
आपल्या अंगावर
पाखरांना हे सगळं
माहीत असतं
म्हणून तर ती
थाऱ्याला थांबत नाहीत
तुम्ही त्यांच्या मागं असता
आणि ती पुढं पुढं
दूरदूर जात राहतात.

०००

**विद्याधर म्हैसकर**



## बहर मी

हिरव्या हिरव्या ऋतूतला
सळसळ पानाफुलातला
रंगातला गंधातला अंतर्बाह्य बहर मी

झुळझुळणाऱ्या झऱ्यातला
वेळूबनातील वाऱ्यातला
मनाच्या मंदिरातला हरिनामाचा गजर मी


आषाढाच्या घनातली
पाऊसभिजल्या वनातली
मोराच्या नर्तनातली उत्कट लहर मी

गाण्यासाठी आतुरलेला
तीर्थासाठी तहानलेला
नि:शब्दशा मौनामधला फूलकोवळा अधर मी

उष:काल पवित्र सुंदर
माध्यान्हीचा नीरव स्वर
ऐलतटावर पैलतटावर हळवा सायंप्रहर मी

० ० ०

**दत्ता हलसगीकर**



## मौन



स्मशानात
माणसांसोबत जळतात झाडं
तोडलेली... वाळलेली.

मग स्मशानात राख होते
माणसांची...
अन् झाडांचीही !

सावडताना ओळखूही येत नाही
कोणती राख माणसांची
अन् कोणती झाडांची ?

पण मग श्रद्धांजली वाहताना
आपण भरभरून का बोलतो फक्त माणसांबद्दल ?
का चकार शब्दही बोलत नाही झाडांबद्दल ?

आता यापुढे आपण एक करूया...
दोन मिनिटांच्या मौनापैकी
एका मिनिटाचं मौन माणसांसाठी
अन् एका मिनिटाचं मौन झाडांसाठी राखून ठेवू या !

मग चला,
झाडांसाठी म्हणा -
ओम शांती ! शांती ! शांती !

० ० ०

**प्रशांत असनारे**



## जन्म जन्म

एक चुंबनच काय
सारा देहच ओवाळून टाकीन तुझ्यावर
पण कृष्ण होऊन ये
आपल्या राधेकडे
जे फक्त आणि फक्त तुझेच आहे
ते हक्काने घेऊन जा
तू स्वामी... तू प्राणसखा
येऊ नकोस लुटारूसारखा
मी थांबले आहे रे येथे
युगायुगांच्या वळणावर
प्राणांची पंचारती नि
देहाचा कापूर घेऊन
वासनेच्या वाऱ्या-वादळाने
विझून जातील ना नेत्रनीरांजने
प्राणांचा शेला आड धर
मग तुझेच आहे हे तन- हे अधर
रिमझिमती धार काय
मुसळधार वृष्टी काय
नाही थोडीच म्हणते सृष्टी
तो तर तिचा ध्यासच असतो
तहान असते
ओंजळीने पिऊन घेईन मी घटाघटा
ते अमृतवादळ मरेपर्यंत
जन्म-जन्म !

० ० ०

**नारायण कुलकर्णी**

## सुगंध

किनाऱ्यावर हिंडत होतो स्वस्थचित्त आत्ममग्न
किंचितसा आत्मभग्नही
पायाखालून सरकणाऱ्या वाळूचे वाटत होते भय
पण वाटत होती ती हवीशीही
सुटत नव्हता मोह तिथे रमण्याचा
एकाएकी आलं अंधारून
मत्त हत्तींचे तांडव सुरू
मावळत गेली 'आषाढस्य प्रथम दिने'ची रमणीयता
तुफानात झाकोळले किनारे
पाण्यात जागला वडवानल अन् तेही पेटले
कुठल्या काठ्यांनी पाण्यात मारल्या सीमारेषा नकळे !
कुठल्या रसायनांनी मळवून टाकली
इथली प्राणदायक हवा
अमंगलाच्या किडीनं पोखरून टाकला बुंधा न् बुंधा
म्हणून आठवतंय् घेतलाच न् आपण वसा
'सहनाववतु सहनौभुनक्तु'चा
मन आणि हात गुंफून शिखराकडे वाटचाल करण्याचा
'सहवीर्यं करवावहै'
माणसामाणसांना जोडीत यशाला नवे आयाम देणाऱ्या
'परस्परे पडो मैत्र जीवाचे'
म्हणणाऱ्या ज्ञानेशाच्या मोगऱ्याचा
सुगंध जागता ठेवण्याचा !


० ० ०


**मोहिनी पिटके**

## झड

पाऊसझडीत -
एका पानावरून दुसऱ्या पानावर ओघळताना,
थेंबाला काय वाटते?
हे पानाला तरी कुठे कळते.
ते आपले आपल्यातच,
झुलत असते. आणि,
पानझडीत -
एक एक पान गळताना,
पानाला काय वाटते?
हे झाडाला तरी कुठे कळते.
ते आपले आपल्यातच,
झुरत असते.
-म्हणतात की झड लागली की असेच घडते!

**लक्ष्मीकांत तांबोळी**





# डोह

निळासावळा डोह हा अंतरंगी जरी स्तब्ध वरुनी जळे सारखा
जरी पृष्ठभागी न हाले न चाले तरी आत शांतीस हा पारखा

दिसे ना जरी आतले विश्व मोठे तरी कृष्ण विवरात याच्या झरे
जरी दाट काळ्या थरांतून जाई सूर्यास्त सोने तरी पाझरे

न दावी जरी सावल्या भोवताली घनदाट वृक्षांस हा वेढूनि
फिरे मध्यरात्री पक्षीण कोणी पंखास तुटक्या सांभाळुनी

न आता न नंतर, न खोटे न सत्य, कालावकाशाचे या वावडे
नको अंत आणि नको जन्म घाली चिरंजीव आत्म्यास हा साकडे

० ० ०

**अंजली कुलकर्णी**

# ऋतू फुलतो

ऋतू फुलतो, ऋतू फळतो
ऋतू छळतो
सोसल्यावर सावकाश
ऋतू कळतो !

सळसळतो, दूर गळतो
ऋतू ढळतो
त्यास घाई, तुरु तुरु तुरु
ऋतू पळतो !


आकळतो, साकळतो
ऋतू तळमळतो
धुंदगती गंधवतीत
ऋतू विरघळतो !

० ० ०

**सुनील शिनखेडे**

# संजीवनी

घरासमोरच्या बगिच्यात
झारीनं पाणी घालतोय
टवटवीत हिरवी हिरवी झाडं
फुलांचा दरवळ
त्याभोवती भ्रमरांचा गुंजारव
सारं काही तसंच आहे...
परंतु तू असताना
भल्या पहाटे तू बाग शिंपताना
पूर्ण उमललेल्या फुलासारखी
तुझी सतेज भावमुद्रा
झुळझुळणाऱ्या वायुलहरींबरोबर
भुरभुरणारे तुझे केस
तुझ्या गाणाऱ्या गळ्यातून
सुरावणारे पहाटगाणे
हा जीवघेणा भूतकाळ
आता क्षणोक्षणी अस्वस्थ करत राहतो...



झारीतून नित्यनेमानं ओघळणारं
हे पाणी फक्त ठरावीक वेळेपुरतं
माझ्या डोळ्यांतून तर
सतत अश्रुधारा वाहत राहतात
तुझ्या आठवणींची बाग शिंपत...
शिशिरात बगिच्यातल्या झाडांचं
एकेक पान गळू लागतं
माझ्या आठवणींच्या बागेत मात्र
कधीच पानझड होत नाही
त्याच बळावर तर मी जगतोय
तुझ्यावाचून पोरकं झालेलं
तरीही संजीवनी प्राप्त झालेलं हे आयुष्य !

० ० ०

**बाळ राणे**

# कान्ह्या, रानभरी झाले

देह संसारी गुंतला, मन तुजपाशी
कान्ह्या, रानभरी झाले प्राण अहर्निशी

लागला रे चकवा कान्ह्या, तुझ्या अरण्यात
राधिका हरवली तेथे, गर्द निबिडात

वंशवनातला पावा घुमे काळजात
देहभाव विरघळला रे, तुझ्या मंथनात

पालापाचोळ्याचा येई गंध गोड तान्हा
आदिमाचा स्पर्श होता, फुटे प्रेमपान्हा

अंतरिक्ष भेदून जावे, दूर अनंतात
जन्महीन व्हावे श्वास, गूढ दिगंतात

मोरपीस फिरवुनी जाता, विलोपली भ्रांत
'मी-तू-पण' वाहून गेले, सारे शांत शांत...

० ० ०

**आश्लेषा महाजन**



# मौन राग

मौन बोलते मनात, मौन ऐकते कानात
खोल उचंबळे काही, काळजाच्या अंतरात

मौन सांगते कहाणी, दु:खा फुटतसे वाणी
किती उमलत्या कळ्या कोमेजती अंधारात

मौना फुटती धुमारे, स्पर्शातुनी ते मोहरे
गात्रा-गात्रातून होई चांदण्याची बरसात

मौन न्हाते प्रकाशात, मौन भिजते धारांत
होउनी तुक्याची वीणा, मौन बोले अभंगात

असे मौन भावनांचे, बोल-स्वरातून साचे
घेउनिया शब्दगंध, रात बोलते मौनात

० ० ०

**अनुराधा नेरुरकर**



# माझ्यात मी

रिकाम्या मनाने कधी चालते मी
मुक्याने स्वत:शी कधी बोलते मी

मला शब्द वाहूनिया दूर नेतो
किनाऱ्यास अर्थाचिया लागते मी

कधी हाय वाटे जिण्याचेच ओझे
जरा हासुनीया तया पेलते मी

व्यथा पेरली अन् तिचा वृक्ष झाला
तयाची सुगंधी फुले झेलते मी

कधी मी कुणाला कमी लेखले ना
अशी का स्वत:लाच अवहेलते मी

दिला शब्द तो पाळणे ब्रीद वाटे
जिवाहून थोर तया मोलते मी

समाधान सांडे भरूनी उरात
दिले तू उदारा, कुठे मागते मी

० ० ०

**शोभा बडवे**

# मनीप्लँट आणि जोंधळा



चकचकीत दिवाणखान्यातील मनीप्लँट,
सर्वज्ञ, हुशार, धोरणी
त्याच्या लेखी शिवारातला जोंधळा,
मूर्ख, लाजिरवाणा, अडाणी
मनीप्लँटला वेढून बसलेला अहंकाराचा भुजंग
अवतीभवती उन्हाळा तरी मनीप्लँटचा हिरवागार रंग
त्याच्याभोवती नेहमी राजहंस-सिंह-गरुड-कमळ
त्याला वाटते शिवारात फक्त कावळे-उंदीर-झुरळ-बाभळ
त्याचा शाखाविस्तार परदेशात, अमेरिका त्याचा मोक्ष,
समृद्धीच्या पाण्यावर वाढताना, मातीशी संबंध
येऊ नये याबाबत तो कमालीचा दक्ष.
कधी येतो चुकून शिवारात तेव्हा,
गाढ ओळखीचा, प्रेमळ, हसरा, आप्त
दिवाणखान्यात परतताच,
पुन्हा एकदा अनोळखी, कोरडा, अलिप्त,
'दिवाणखान्याबाहेर रोपं उगवतातच कशी?
आणि उगवली तरी जगतातच कशी?'
याचे त्याला कुतूहल केवढे...
आणि 'मनीप्लँटही आपल्यासारखा कोमेजतो
पिवळा पडतो आणि यथावकाश सुकूनही जातो कसा?'
याचे जोंधळ्याला नेहमीच पडते कोडे.

० ० ०

**मुकुंदराज पं. कुलकर्णी**



# काळोख दारी

नदीच्या पात्रासारखी आटत चाललीयत मनं
ज्याचं, त्याचं अंगण दिसतेय इथं सुनं सुनं.

अंधारगुहेतून जाता हरवत जातो आपण
स्वप्नांना फुटावे पाय असे करावे जागरण.


फडफड करती पाखरं कंटाळले का जीवन ?
आयुष्याच्या भोवती यांच्या वेदनांचे गोंदण.

झाडांचे हिरवे हात गेले उन्हाने करपून
त्यांचे माथी बसत का नाही कुणी सावली धरून ?

कोण कुणाच्या मनातले काटे घेतो वेचून
काळोख दारी पडतो तेव्हा दीप जातो विझून.

० ० ०

**सुरेश पाचकवडे**



# मळवाट

कुणाला तसदी द्यायची नाही, घ्यायची
हा माझा विचार
अन् कधीतरी हातून आक्रित घडतंय

मी चालत असलेल्या स्वच्छ वाटेला
मग समांतर मळवाट निर्माण होते


कोणी एक वाटसरू
कुठल्या एका क्षणी
मला मळवाटेवर बघतो
अन् क्षणात
मी मैलो अंतर चालून आलेलो स्वच्छवाट
मळवाटेत विलीन करतो

हेच खरं
काळ्यात पांढरं दिसत नाही
पांढऱ्यात काळं मात्र उठून दिसतं

० ० ०

**अनिल जवंजाळ**






# आई

आई मोलमजुरी करते
माझ्या मामाच्या हाताखाली...
अन् झाकते आपलं दारिद्र्य
त्याच्या श्रीमंती लक्तरानं.

कष्टानं माती झालेली आई..
तिची मातीशीच जुळलीय नाळ.
खुरपणी, कापूसलावणी – वेचणी
ज्वारीकाढणी अशा कामांच्या वेळी
आईचे डोळे मातीत हुंदके पेरतात
आणि माती शहारते
हुंदके रुजून उगवून येते मातीतून
हिरवी माया आईसाठीच.



अजूनही कधी कधी आई
जात्यावर दळताना
मामाच्या नावानं ओवी गुंफून गाते
आयुष्य पीठ पीठ झालं तरीही.

० ० ०

**अर्जुन देशमुख**

# देवदास भाग–२

कितीतरी दिवसांनी मी भेटलोय् मला
उर्फ माझे नाव धारून वावरणाऱ्या निरर्थी देहाला
प्रथम तो ओळख दाखवायलाच तयार नव्हता
बिचाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वातून त्याच्या प्रेयसीच्या
आवडी–निवडी डोकावत होत्या...
मेंदूत फिरणारी आत्मनाशी विचारचक्रे,
बिनबुडाच्या बघ्यांच्या हशासाठीच्या
त्याच्या केविलवाण्या कृती,
बेभरोशी दिशोद्धाराच्या संकल्पात फरफटणारे
अनियंत्रित पाय
– अशी पोखरण दाखवून म्हणाला,
'तुला आता भेटून उपयोग काय?'
मी म्हणालो, 'मी आता तुझ्यातच राहणार आहे'
मग त्याच्या हाती कर्म दिले भाकरीचे
त्याच्यातल्या कलावतींना व्यासपीठी स्थापले
त्याच्या आवडीनिवडींना लटकू लागल्या
डझनवार उत्कट पोरी
प्रश्नांकित आरोपांची लाठी आपटताच
बघ्यांची पांगापांग झाली
त्याच्या दमदार पावलाशी मग
लोळण घेतली प्रस्थापित दिशांनी
तो बनला जनमान्य मनमान्य अँगल्सनी परिपूर्ण
तेव्हा मी म्हणालो, 'आता माझे काम –
तुला करायचेय्.... इतरांसाठी.'

० ० ०

**हेमंत डांगे**





# दिवास्वप्न

आजूबाजूच्या खेड्यापाड्यांतून
कोकिळांचा कुहू–कुहू स्वर
कानावर पडला अन्
शहराचा देह रोमांचित झाला
प्रियकराने प्रेयसीच्या देहावर
पहाटे पहाटे अलगद मोरपीस फिरवल्यासारखा.
शहराला जाग आली
वसंताच्या चाहुलीने
ते पाहू लागले दिवास्वप्न :
आपला अगडबंब, दणकट,
सुजलेला, रंगीबेरंगी देह
झाला आहे
इथे–तिथे, छुटपूट, इवलासा का होईना
कोवळा
हळवा
हिरवा !

० ० ०

**विश्राम प्रामाणिक**

# गोवऱ्या

पहाटे पिटाळी माय आम्हाला
शेण आणायला सडासारवणासाठी.
शेणाचा मक्ता घेणारे आमच्या टोपल्या
जमा करून घेत कधीकधी.

उरल्यासुरल्या शेणाच्या गोवऱ्या थापी माय
वाड्याच्या दगडी भिंतीवर बाहेरून,
दिवसेंदिवस पिवळट पडणारा हा हिर्वा मळवट
भिंतीचा शृंगार वाढवी.
गवत-काडी-माती-कचरा सर्वांना घेऊन उठते,
कशाचेही वावडे नसते गोवरीला मायसारखे.

काही मुटकुळेही वळायची माय शेणाची
ही रेटके सुकली की,
रोडगे-बट्ट्या शेकायला कामी येत
सणासुदीला, स्वयंपाकाला मानतेच्या.

कधी बाळबाळंतिणीला खाटेखालून
ऊब देतात गोवऱ्या आईच्या मायेगत.
कधी बोलतात थेट पितरांशी धूरातून.
आगारीच्या होमपात्रातून धुमसत्या गोवऱ्या.

म्हातारी माणसं कोरड्याठक्क गोवऱ्यांसारखीच.
म्हणूनच स्मशानात गौरवलं जातं गोवऱ्यांना
'फुलं' म्हणून.....

० ० ०

**अशोक नीलकंठ सोनवणे**



# काही हायकू

१
झुंजुमुंजु झाले...
तू दिलीस माझ्या हाती
ओंजळभरून फुले

२
बाळाला आली जाग
एक चिमणी भिरभिरत
उतरली अंगणात

३
हे चित्रही मोहक तितकेच
स्तब्ध फुलपाखरू फुलावरले
आता उडते इतकेच

४
नितळ तळ्यात निरभ्र आकाश
एखादी लहर चुकार
या चित्राची छेडित तार

५
ढगाला पळभर
रुपेरी झालर
चंद्र येता कुशीत

६
खिडकीतून सहज डोकावलं
तो झुलणाऱ्या फांदीवर
कोवळं पान फुटलेलं

७
शिणलेली रात्र
झरझर चाललेली
चंद्रकोर मात्र


८
पाहता पाहता पावसाला आला पूर
प्रवाहात सोडली कागदाची नाव
गेली गेली दूर.....

० ० ०

**पुरुषोत्तम नगरकर**



# शहर



प्रत्येक शहराला
एक वेगळाच अजब
वास असतो
आजोबाच्या बोटांना येणाऱ्या

विडीच्या वासासारखा
जुन्या शहरातली गल्लीबोळं
तर थेट मायाळू असतात
आजीच्या कापऱ्या हाताप्रमाणं...

काही पेठा
अत्यंत गुंतागुंतीच्या
ताईच्या वेणीसारख्या...
काही वस्त्या उद्धट
जणू दादाची अरेरावीच !

पोलीस आयुक्तालया समोरून
जाताना पप्पाचा दरारा आठवायचा
तर बागेसमोरून जाताना
मम्मीची हास्याची मंद लकेर
आठवायची

एकंदर शहर म्हणजे
आपलं कुटुंबच !
पण हल्ली
बॉम्बस्फोटांच्या दहशतीनं
सारं शहर
पांढरं फटफटीत पडलंय
विधवेच्या कपाळासारखं !

० ० ०

***मुबारक शेख***

## एक पत्र गावाकडचं

मित्रा,
तू गेल्यानंतर गाव कसं उदास झालंय.
तुझ्या सुखद स्वप्नात रंग भरणारा
पारावरचा पिंपळ अलीकडे पानांची टिपं गाळतोय
ज्या गावरस्त्यावर फिरस्ती राहायची
आपली उजाड पावलं दिवसभर
तो रस्ताही आता एकाकी झालाय
गावपाणंदीच्या चिंचेचा आंबट स्वादही
हरवलाय कधीचाच
बोरवनानंही गमावलाय गाभुळल्या बोरांचा
अवीट गंध
आंबराईतील देखणे मोर
अन् फांद्यांवरचे रावे हिरवे
निघून गेल्येत रानाच्या शोधात
नदीकाठी ऐकू येत नाहीत आता
गाईंचे व्याकूळ हंबर  अन् बिल्वरांचा हळवा निनाद
मंदिरातल्या भूपाळीचे मंगल स्वर
नि सांजारतीची आर्तता नाही घुमत गावभर
ऐसपैस अंगणांना पडलीयत
दगडविटांची निर्जीव कुंपणं...
मित्रा,
ह्या सगळ्या बदलाला  हरकत नव्हती रे
पण माणूसही बदलू लागलाय आताशा
तेव्हा काळजी वाटते....!

० ० ०

***रवींद्र जवादे***



## मुला....


मुला,
ओलांडलेस सात सागर
सात दऱ्या केल्यास पार
चढून सात पर्वत
गाठलंस उत्तुंग शिखर...

खाली बघ,
बाहू फैलावून
उभा आहे पायथ्याशी
तुझा पिता –
त्याच्या इवल्याशा काळजात
आता सामावलंय
अवघं अवकाश
अगस्तीनं प्यालेल्या
समुद्रासारखं.

० ० ०

**सुभाष वसेकर**

## कोंब



पापणीच्या आत
गोठलेला थेंब
सर्जनाचा कोंब
वाळलेला.


अगा मी ऐसा तो
काय गुन्हा केला
पदोपदी ज्वाला
मार्गी माझ्या.



निळे चंद्र झाले
सर्वदूर काळे
आतड्यांना पिळे
दिनरात.



वासनेच्या वेगे
कुठल्याशा पेठी
आणी जगजेठी
मला आज.



कर ना रे लाही
अस्तित्वाची सर्व
गोंद उन्हपर्व
रोमरंध्री.



तुझ्या कृपेची रे
तेवढीच ओढ
बाकी नुरे चाड
कशाचीही.

० ० ०


**निरंजन माधव**

## ।। ओवीरूप धम्मपद ।।

('ओवीरूप धम्मपद' या आगामी पुस्तकातील काही ओव्या)

पुण्य संपादनासाठी । लागे यज्ञयागापाठी
प्राण्याची दावण मोठी । आहुतीला
वर्षभर केले यज्ञ । झाला समाधानी तज्ञ
परी किती किती अज्ञ । समजेना
भिक्खुसंघास केला । एक नमस्कार भला
शतपट पुण्य गोळा । होईल की

पूज्य बुद्धी नम्र वृत्ती । आदरयुक्त कृती
अशी असते व्यक्ती । सज्जनच
वयोवृद्धां मानितो । सेवा सन्मान करतो
वाईट मार्गा न लागतो । कधीच जो
त्याचे आयु वाढते । वर्ण कांती चकाकते
सुख बळही लाभते । जीवनात



भ्रष्टाचारी वागला । मन्मनी तो खचला
शंभर वर्षे जगला । निरुपयोगी
वृत्ती दुराचारी । आचार विचार अव्हेरी
त्याची नसते बरी । संगतही
शीलवान असणे । ध्यानधारणा करणे
त्याचे पळभर जगणे । श्रेयस्कर

जाती दुष्ट दुराचारी । कुकर्माच्या आहारी
वाटतात पापे बरी । करावया
दुष्ट बुद्धी त्यांची । वाण असे विचाराची
अशाच्या जगण्याची । नोंद नसे
प्रज्ञावान जगला । एक दिवसच भला
त्याचा होई गलबला । चहुकडे

० ० ०

***तुकाराम खिल्लारे***

---


### ।। मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास ।।

**राज्य मराठी विकास संस्थेची प्रकाशने**

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २२६५ ३९ ६६ / फॅक्स- २२६३ १३ २५

- मराठी लेखन मार्गदर्शिका-यास्मिन शेख - मूल्य ८०रु.
- कोश व सूची वाङ्मय : स्वरूप आणि साध्य - संपा . सरोजिनी वैद्य, सुषमा पौडवाल, अनिता जोशी, कविता महाजन - मूल्य २०० रु.
- शालेय मराठी शब्दकोश - वसंत आबाजी डहाके, गिरीश पतके - मूल्य १०० रु.
- शिक्षण , शिक्षक व अभ्यासक्रम - वासुदेव ब. पटवर्धन - संपा.रमेश पानसे - मूल्य १६० रु.
- मराठी भाषा : वाढ आणि बिघाड - श्री. के.क्षीरसागर - मूल्य १७५ रु.
- 'वृद्धि:' भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन - दिनेश द. माहुलकर - मूल्य १६० रु.
- बेलभाषा - सुमन बेलवलकर - मूल्य १००रु.
- भाषा आपली सर्वांचीच - अविनाश बिनीवाले - मूल्य १५० रु.
- महाराष्ट्र साहित्य परिषद - म. श्री. दीक्षित - मूल्य ५०रु.
- व्याकरणकार मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य - कृ.श्री.अर्जुनवाडकर - मूल्य १५० रु.
- काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य - मृणालिनी जोगळेकर - मूल्य १५०रु.
- गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य - हेमंत वि. इनामदार - मूल्य ६० रु.
- बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य - मोहिनी वर्दे - मूल्य ६० रु.
- मातृसेवा संघ - विनया खडपेकर - मूल्य ६०रु.
- सकाळ वृत्तपत्र आणि वृत्तसमूह - स्वाती सुहास कर्वे - मूल्य ६० रु.
- शंतनुराव किर्लोस्कर : व्यक्ती आणि कार्य - भा. र.साबडे - मूल्य १६०रु.
- डॉ.अ.का.प्रियोळकर : व्यक्ती आणि कार्य - डॉ.वि.बा. प्रभुदेसाई - मूल्य १४० रु.
- मद्रासची मराठी हस्तलिखिते - संपा. डॉ. वसंत जोशी - मूल्य १५० रु.
- हैदराबादची मराठी हस्तलिखिते - संपा. डॉ. श्री. रं. कुलकर्णी, डॉ. व.दा.कुलकर्णी, प्रा. द.पं.जोशी - मूल्य १००रु.
- कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते - संपा. डॉ भीमाशंकर देशपांडे - मूल्य १५० रु.
- तंजावर सूची - संपा. भीमराव केसकर - मूल्य २०० रु.
- दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास - तंजावर खंड संपा. डॉ. वसंत जोशी - मूल्य ५००रु.
- दाक्षिणात्य साहित्य - संस्कृतीचा मराठीशी अनुबंध - डॉ. माणिक धनपलवार - मूल्य ३०० रु.
- साहित्यसेतू - श्री.रं.कुलकर्णी - मूल्य ४५ रु.
- दखनी भाषा - मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार -श्री.रं.कुलकर्णी - मूल्य ४५रु.
- आंध्र - कर्नाटक खंड - संपा. डॉ. वसंत जोशी, डॉ. द. दि. पुंडे - मूल्य ५००रु.
- मराठी ग्रंथसूची - भाग १ व २. संपा. कै. शंकर गणेश दाते - मूल्य २६०० रु.
- मराठी ग्रंथसूची भाग - ३ (१९५१-१९६२)- संपा. शरद साठे - मूल्य १००० रु.
- मराठी ग्रंथसूची भाग - ४ (१९६३ -१९७०) संपा. शरद केशव साठे - मूल्य ११०० रु.
- वाचू आनंदे - माधुरी पुरंदरे. भाग १ ते ४, संचाचे - मूल्य ३०० रु.
- यंत्रालयाचा ज्ञानकोश - संपा. शंकर गोपाळ भिडे - मूल्य १६०० रु.
- विज्ञान संकल्पना कोश - संपा. प्रा. रा. वि. सोवनी - मूल्य २२५ रु.
- मराठी कोश व संदर्भसाधने यांची समग्र सूची - (१८००-२००३) संपा. डॉ. व. वि. कुलकर्णी - मूल्य २०० रु.
- शिक्षणाचे अंतरंग - लीला पाटील - मूल्य १७५ रु.
- फार्सी - मराठी व्युत्पत्तिकोश - डॉ.यू. म. पठाण - मूल्य ६०० रु.
- वस्त्रनिर्मिती माहितीकोश खंड १ तंतुनिर्माण व तंतुविज्ञान मूल्य ४०० रु.
- वस्त्रनिर्मिती माहितीकोश खंड २ सूतनिर्माण मूल्य ४०० रु.
- पालघर तालुका - बोली, समाज व संस्कृती - संपा. डॉ. प्रतिभा कणेकर मूल्य ६५०रु.

**संस्थेच्या इतर दर्जेदार प्रकाशनांसाठी प्रकाशनसूची मागवा.**

**संस्थेचे संकेतस्थळ - http://rmvs.maharashtra.gov.in**

# ‘वाचू’ या......‘वाचवू’ या!

सुनीता तारापुरे

दोन हजार सहा सालच्या मार्च महिन्यात, दुर्गानं, माझ्या लेकीनं प्रश्न केला ‘‘आता उन्हाळ्याच्या सुट्टीत काय करायचं?’’

त्यावर मीच तिला प्रतिप्रश्न केला, ‘‘तुला काय काय करायला आवडेल?’’

मग तिला जे जे करावंसं वाटतंय त्याची एक यादीच तिनं माझ्यापुढं ठेवली.... पण त्यात ‘वाचना’चा समावेश नव्हता. ती लहान असल्यापासून आम्ही सारेच कुटुंबीय तिला वाचनाचा नाद लागावा म्हणून खूप प्रकारची पुस्तकं आणून देत असू. नवीन पुस्तकं ती चाळायची, थोडीफार वाचायचीही, पण नंतर त्याकडं ढुंकायचीही नाही. अगदी पुस्तकप्रदर्शनांना भेटी देऊन तिला तिच्या आवडीची पुस्तकं निवडायला लावून ती आणली तरी असंच घडायचं. घरात बहुतेकांना वाचनाची आवड असल्यानं तिचं पुस्तकांसाठी वेडं न होणं आम्हाला खटकायचं. चित्रकलेत ते रमते, छान रांगोळी काढते, पेंटिंग करते म्हणून न वाचण्याचा दुर्गुण तोवर आम्ही दुर्लक्षित होतो. नंतर अवांतर वाचनाची गोडी तिला लागावी म्हणून पुस्तकं वाचून दाखवण्याचा प्रयोग मी सुरू केला. गोष्टी ऐकण्यात मात्र ती रंगून जायची. मग गोष्टी क्लायमॅक्सला पोचली की वाचन थांबवण्याचा प्रयोग करून बघितला. हेतू हा की, उत्कंठेपोटी ती पुस्तक घेऊन वाचेल. पण हा प्रयोग अयशस्वी झाला.

मग सुट्टीत गल्लीतल्या तिच्या काही समवयस्क मैत्रिणींना एकत्रित करून सगळ्यांना संध्याकाळचा एक दोन तास वाचनात घालवण्यासाठी उद्युक्त केलं. घरात अशा दहा–बारा वर्षे वयाच्या मुलांना आवडतील अशी खूप पुस्तकं होतीच. त्यातून आपापल्या आवडीनुसार मुली पुस्तकं निवडायला लागल्या आणि थोडा वेळ का होईना वाचू लागल्या. एकमेकींना आपण वाचलेल्या पुस्तकातल्या गंमती जंमती सांगू लागल्या. सुरुवातीला रोज सगळ्यांना हाका माराव्या लागायच्या, पण नंतर न बोलावता येऊ लागल्या. ‘‘गोड गोड गोष्टींचे सगळे भाग आपल्याकडं आहेत?’’ अशी विचारणा सुरू झाली. मग त्यांनाच कपाटातली पुस्तकं नीट लावा आणि शोधा तुम्हाला हवंय ते असं सांगितलं. हे काम करताना तर त्यांचा उत्साह नुसता ओसंडून वाहत होता. एकमेकींना ‘तू हे वाचलंस का? वाचच!’ असा आग्रह चाललेला. ते पाहून वाटलं, हाच प्रयोग थोड्या व्यापक स्तरावर करून पाहूया का? पण तोवर सुट्ट्या संपत आलेल्या असल्यानं घाईघाईत नियोजन शक्य नव्हतं, त्यामुळं मनातील गोष्ट मनातच राहिली.

नंतर ‘संवाद’ आणि ‘आस्था’ या संस्थांच्या माध्यमातून मी आणि रजनीश जोशी यांनी संयुक्तरित्या ‘सूत्रसंचालन आणि आवाज साधना’ तसंच ‘रेडिओ जॉकिईंग’ अशा विविध विषयांवरच्या कार्यशाळांचं आयोजन केलं होतं आणि त्यांना अतिशय उत्साहवर्धक प्रतिसाद मिळालेला होता. तो प्रतिसाद पाहूनच मुलांसाठी वाचन कार्यशाळा घेण्याच्या इच्छेनं पुन्हा उचल खाल्ली.

मला असं प्रामाणिकपणे वाटतं की, साधारणत: बारा–चौदा वर्षे वयापर्यंत मुलांची वाचनक्षमता विकसित व्हायला हवी, अन्यथा मुलं एका दुष्कचक्रात अडकतात. म्हणजे असं की वाचनाची गोडी वा आवड नाही म्हणून वाचन केलं जात नाही. परिणामी वाचनात गती नाही. त्यामुळं शब्दसाठा मर्यादित राहतो. मग वाढत्या वयानुरूप पुस्तकं वाचताना शब्द अडायला लागतात. वाक्प्रचार अनोखे वाटतात. संदर्भ लागत नाहीत. त्यामुळं वाचलेलं कळत नाही. मग वाचलेल्या मजकुराचा अर्थबोध न झाल्याने पुन:पुन्हा वाचावं लागतं. त्यात वाचनाची गती मंदावते, खूप वेळ जातो. परिणामस्वरूप वाचनातली गोडी कमी होते आणि मग वाचनाकडं साफच दुर्लक्ष होतं.

शैक्षणिक स्तरावही याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. वाचनात गती नसल्यानं, वाचून समजून घेऊन उत्तरं लिहिण्यापेक्षा गाईडचा सोपा पर्याय निवडला जातो. पण मुळात विषयाचं पुरेसं आकलनच न झाल्यानं आणि केवळ घोकंपट्टी केलेली असल्यानं परीक्षेत ऐन वेळी काहीच न आठवणं वा उत्तरांमध्ये गोंधळ उडणं असे प्रकार घडतात. अर्थातच, मार्क्स कमी पडतात. तेव्हा मुलं अभ्यासात मागे म्हणून आपण पालक त्यांना ट्यूशन्सच्या भट्टीत झोकतो. मग तर ही मुलं शाळा, गृहपाठ नि ट्युशन्सच्या चक्रात गरगरत राहतात आणि बालपणालाच मुकतात. ना खेळण्यासाठी

वेळ, ना आपल्या आवडीच्या गोष्टी करण्याकरता. या लहानग्यांच्या आयुष्यातला आनंदच हिरावून घेतो आपण. 'एवढे सगळे अनर्थ एका न वाचण्यानं' होतात तर आपण हा प्रयोग करून पाहावाच असं प्रकर्षानं वाटू लागलं.

रजनीश जोशी यांच्याकडं मुलांसाठीच्या वाचन कार्यशाळेची कल्पना मांडली. त्यांनीही लगेचच ही कल्पना उचलून धरली. पण वयोगट बारा ते पंधरा वर्षे. दोघांपैकी कुणीही ना शिक्षक ना शिक्षणतज्ज्ञ. इतकंच काय दोघांनीही यापूर्वी या वयोगटातल्या मुलांबरोबर कुठल्याही स्वरूपाचं कामही केलेलं नव्हतं. त्यामुळं ते एक आव्हानच होतं. कार्यशाळेचं स्वरूप निश्चित करताना ते पारंपरिक पद्धतीचं नसावं असं ठरवलं. कार्टून नेटवर्क, पोगो, निक अशा मुलांसाठीच्या चॅनेल्समुळं मुलं पुस्तकं वाचायची टाळाटाळ करतात, ही पालकांची नेहमीची ओरड. मग या चॅनेल्सइतकंच रंजक, खिळवून ठेवणारं, मुलांना एखाद्या गोष्टीचा कंटाळा येण्याच्या आत नवं काहीतरी सुरू करणारं असं कार्यशाळेचं स्वरूप हवं. केवळ पुस्तकं चाळायला देऊन वा तिथं बसून वाचायला लावून वा त्यावर बोलून वा बोलतं करून भागणार नव्हतं.

वाचन कशासाठी? काय वाचावं नि कसं वाचावं? आपलं छोटं ग्रंथालय कसं असावं? पुस्तकांची निगा कशी राखावी? पुस्तक वाचल्यानंतर काय? चिकट वही वा संदर्भ वही कशी असावी? शब्दांपलीकडं जाऊन माणसं, निसर्ग कसा वाचावा? शब्दांशी कसं खेळता येतं? अभिव्यक्तीची इतर माध्यमं म्हणजे चित्र-नृत्यादी कलांचं आस्वादन, अशा अनेक गोष्टींची तोंडओळख मुलांना करून द्यायची होती. त्यामुळं कार्यशाळेचं स्वरूप, कालावधी, कार्यशाळेतल्या विविध दिवसांची आखणी, त्यातले विविध उपक्रम कसे असावेत यावर अगदी बारकाईनं समग्र विचार केला आणि पाच दिवसीय कार्यशाळा घेण्याचं निश्चित केलं. त्याकरता हिराचंद नेमचंद वाचनालयानं पूर्ण सहकार्य देऊ केलं. त्यांच्या सहकार्यामुळंच वीस रुपये अशा नाममात्र शुल्कात या कार्यशाळेचं आयोजन (मुलांना रोज दिल्या जाणाऱ्या खाऊसह) शक्य झालं.

कार्यशाळेचं उद्घाटनही आम्ही सफदर हाश्मी यांची दासू वैद्य अनुवादित कविता म्हणून केलं. कार्यशाळेत सहभागी प्रत्येक मुलाला कवितेची एक प्रत आधीच दिलेली होती. त्यांना ती वाचायला सांगितली होती. त्यामुळं

''पुस्तकं सांगतात गोष्ट-
वाहून गेलेल्या दिवसांची,
युगायुगांची, विश्वाची, माणसांची,
कालची-आजची-उद्याची,
एका-एका क्षणाची.....
......................
ध्यानात असू द्या -
पुस्तकं काही सांगू इच्छितात...
तुमच्या सावलीत
रांगू इच्छितात...''

एकमुखानं ही कविता म्हणताना, कवीचे विचार मुलांना पटल्याचं जाणवत होतं.

अगदी सुरुवातीलाच ग्रंथालय भेटीचा उपक्रम ठेवल्यानं ग्रंथालय ही संकल्पना तर मुलांना स्पष्ट झालीच, पण पुस्तकांचं वर्गीकरण, त्यांची नोंदणी, संगणकीकरण, पुस्तकांची देवाणघेवाण, निगा अशा तांत्रिक बाबींची ओळखही झाली. प्रथमच मुलांना पुस्तकांचं विश्व इतकं अफाट असल्याचं जाणवलं. हिराचंद नेमचंद सार्वजनिक वाचनालयातले विविध विभाग आणि नव्वद हजारांच्या वर असलेली पुस्तकसंख्या पाहून आपण थक्क झाल्याचं मुलांनी आवर्जून आपल्या मनोगतांमधून लिहिलंय. काहींना तर ती 'अलिबाबाची गुहा'च वाटली. ग्रंथालय पाहून मुलं परतताहेत तोवर आम्ही शब्दखेळाला सुरुवात केली. 'गाढव' या शब्दाचा समावेश असलेल्या कोणकोणत्या म्हणी आपण नेहमी वापरतो, असा प्रश्न करताच मुलं खुदूखुदू हसायलाच लागली. मग सगळ्यांनाच एकदम 'अडला हरी गाढवाचे पाय धरी' ही म्हण आठवली. पुन्हा खुदूखुदू. मग 'गाढवाला गुळाची चव काय?', 'गाढवापुढं वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता', 'गाढवांचा गोंधळ नि लाथांचा सुकाळ', 'गाढवाच्या पाठीवर साखरेची गोणी', 'वेळ न वारी नि गाढव आलं दारी' असा म्हणींचा पाऊस पडला. त्यांचे अर्थ नि यथोचित वापर याविषयी बोलताना सुरुवातीला मुलं अडखळली. पण काही उदाहरणं आम्ही देताच त्यांच्या कल्पनाशक्तीला जो काही बहर आला म्हणता... त्याचं नाव ते!

गाढवानंतर पाळी आली घोड्याची. तोवर मुलं चांगलीच खुलली होती. मराठीत असलेल्या नसलेल्या सगळ्या म्हणी त्यांच्या ओठातून पटापट बाहेर पडू लागल्या. वातावरण असं मोकळं झाल्यावर आजवर काय वाचलंय? त्यांना काय आवडलं? याविषयी मुलांना बोलायला सांगितलं. जे काही

वाचलं होतं त्याविषयी सांगण्याचा प्रयत्न काही मुलांनी केला. मदतीला आम्ही होतोच. त्यामुळं बाकींच्यानाही धीर आला. 'देणारं झाड' ही छोटीशी कथा मग मुलांना वाचून दाखवली. कथेविषयीच्या त्यांच्या प्रतिक्रिया अतिशय बोलक्या होत्या. बऱ्याच मुलांनी कथेचं नेमकं मर्म जाणलं होतं. नि:स्वार्थ बुद्धीनं देणारा निसर्ग आणि कृतघ्न माणूस अशा भावार्थापासून ते लोक आपल्याशी कसेही वागले तरी आपण त्यांच्याशी चांगलंच वागावं, आपला स्वभाव बदलू नये अशी लक्षणार्थापर्यंत विविध अर्थ त्यातून उलगडले. या काहीशा गंभीर चर्चेनंतर 'एक काना फरक पहा ना!' यासारखा गंमतीशीर शब्दखेळ आम्ही सुरू केला. मग तर मुलांच्या स्मरणशक्तीला अगदी पंखच फुटले! एक शब्द घ्यायचा आणि त्याला काना लावून त्यापासून अर्थपूर्ण दुसरा शब्द तयार होतो का हे पाहण्यात सगळी मुले बुडून गेली. नग – नाग, कळ– कळा–काळा, पट–पाट–पाटा, वर–वार–वारा, पर– पार–पारा, सर–सार– सारा, धर–धार–धारा..... अक्षरश: शब्दांचा पाऊस पडला. मुलांना तो चाळा दिवसभरांसाठी देऊन टाकला. शब्द मनाशी घोळवतच पहिल्या दिवशी मुलं घरी गेली.

दुसऱ्या दिवशीची संपूर्ण आणि वेळेवरची उपस्थिती मुलांना कार्यशाळेत काल गंमत वाटली असल्याचं द्योतक मानून आमचाही हुरूप वाढला. आदल्या दिवशी ग्रंथालयातून घरी घेऊन गेलेली पुस्तकं काहींनी वाचली होती, काहींनी अर्धवट वाचली तर काहींनी केवळ चाळलेली होती. काही मुलं कालच्या पुस्तकात काय गंमत होती हेही सांगत होती. आदल्या दिवशी अजिबातच न बोललेल्या मुलांची नोंद आमच्या मनाशी आम्ही केलेली होतीच. त्या मुलांशी आवर्जून संवाद साधला. तीही थोडीशी मोकळी झाली आणि जमेल तसा संवाद साधू लागली.

गप्पांच्या ओघातच आपण का वाचायला हवं? असं मुलांना विचारलं. काही उपप्रश्न विचारून त्यांना बोलतं केलं. माहिती मिळते. शब्दसंग्रह वाढतो, भाषेला वळण मिळतं, विचारांना स्पष्टता येते, विचार प्रगल्भ होतात, कल्पनाशक्ती विकसित होते, अशी विविधांगी उत्तरं मुलांकडूनच आली.

जॉन रस्किनच्या'अनटू धिस लास्ट' या पुस्तकानं गांधीजींच्या जीवनाला कशी कलाटणी मिळाली, वेल्टनचं 'लॉजिक' मॅकेन्झीचं 'एथिक्स' आणि स्टाऊटचं 'सायकॉलॉजी' या पुस्तकांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्यातल्या भावी तत्त्वचिंतकाची बीजं अशी रुजली हे गोष्टी रूपानं सांगितलं. त्यावर एका मुलानं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वाचनाचे किस्से सांगितले तर आणखी एकीनं लोकमान्य टिळकांची लायब्ररी कशी समृद्ध होती हे सांगितलं.

मोठ्या व्यक्तींची नावं बोलण्यात येत होतीच, त्यावरूनच मग एक शब्दखेळ सुरू केला. लेखकांच्या टोपणनावांचा. कधी लेखक वा कवीचं संपूर्ण नाव सांगून टोपणनाव विचारायचो तर कधी टोपणनावं सांगून संपूर्ण नाव. बालकवी, कुसुमाग्रज, केशवसुत अशी काही नावं मुलांना परिचित होती पण काही अगदीच अपरिचित. साने गुरुजी मुलांचे इतके आवडते पण त्यांचं संपूर्ण नाव काही मुलांना सांगता येईना. मग त्या दिवसासाठी तोच चाळा मुलांना देऊन टाकला. दुसऱ्या दिवशी येताना मात्र मुलांकडे जंत्री तयार होती. माधवानुज–काशीनाथ हरी मोडक, दत्त–दत्तात्रेय कोंडो घाटे, गिरीश–शंकर केशव कानेटकर, अज्ञातवासी–दिनकर गंगाधर केळकर अशी साहित्यरसिकांच्या विस्मृतीत गेलेल्या लेखकांची नावंही मुलांनी बरीच पुस्तकं चाळून, बारीक संशोधन करून शोधून काढली.

शब्दखेळानंतर पुस्तकांची निगा कशी राखावी, त्याकरता पुस्तक आणल्यावर, वाचताना, ठेवताना वाहून नेताना काय काळजी घेणं आवश्यक आहे याविषयी मुलांशी संवाद केला. मुख्य म्हणजे तुम्ही काय करता यावर आमचा भर होता. मुलांनी सोपे सोपे उपाय सुचवले. पुस्तक आणल्याबरोबर त्याला कव्हर घालणं, झोपून न वाचणं, उघडं पुस्तक पालथं न घालणं, थुंकी लावून पानं न उलटणं, खुणेकरता पानं न दुमडता बुकमार्कस् वापरणं, कपाटात पुस्तकं उभी न ठेवता शक्यतो आडवी ठेवणं, पुस्तकांवर खाणाखुणा न करणं, न लिहिणं, पुस्तकं कोरड्या जागी ठेवणं आणि महत्त्वाचं म्हणजे दुसऱ्यांची पुस्तकं वेळच्या वेळी परत करणं अशा अनेक गोष्टी या संवादातून समोर आल्या. बुकमार्कस्‌करता तर मुलींकडं इतके पर्याय होते की एकीनं तोंड उघडताच सारेच आपापल्या कल्पना मांडू लागले. इतकंच नव्हे तर दुसऱ्या दिवशी जुन्या आमंत्रणपत्रिका, शुभेच्छापत्रं यांचे सुंदर आकार कापून नि त्यावर चित्रं काढून, चिकटवून, लेस आणि टिकल्या यांची सुंदर सजावट करून आकर्षक असे बुकमार्कस् सगळ्यांनीच करून आणले. केवळ त्यांचंही एक प्रदर्शन होऊ शकलं असतं.

दुसऱ्या दिवसाकरता 'कलावंत तुमच्या भेटीला' या उपक्रमात आम्ही नृत्यांगना मनीषा जोशी यांना निमंत्रित केलं होतं. याचा प्रमुख हेतू लेखक, कवी, कलावंतांशी मुलांचा संवाद व्हावा हा होता. आपण कविता वाचतो तेव्हा आपल्या

आकलनानुसार आपापल्या कल्पनाशक्तीनं ती अनुभवतो. ती चित्ररूपानं आविष्कृत झालेलीही पाहतो. त्याच कवितेचा नृत्याविष्कारही होऊ शकतो याचा प्रत्यय मुलांनी घेतला. कवितेत सूर, ताल आणि नृत्यही दडलेलं असतं, संगीत-वाद्यांची जोड न देताही केवळ लयबद्ध काव्यवाचनाच्या आधारेही आशयघन नृत्य करता येतं हे पाहून थक्क झाल्याचं मुलांनी आवर्जून सांगितलं. त्यानंतर धमाल कोडीवजा उखाण्यांचा खेळ आम्ही खेळलो. 'पाने आहेत पण झाड नाही, पुष्कळ काही सांगते पण शब्द उमटत नाही', 'लाल पिवळा रंग लाकूडफाटा खाऊन जगतो, अन् काय नवल पाणी पिताच मरून जातो', 'दुधाचा सारा एकच वाटोळा प्याला, पण मेजवानी मात्र लग्नाच्या वऱ्हाडाला' अशी गंमतीशीर कोडी सोडवताना मुलं अगदी रंगून गेली. मग कुणाकुणाला आपल्या आई-आजीकडून ऐकलेले असेच उखाणे आठवले. 'पाणी हे साक्षात् जीवन' ही छोटेखानी कथा वाचल्यावर आपल्या हातून 'पाणी वाया जातं' असे दैनंदिन जीवनातले पाच प्रसंग मुलांना सांगायला लावले. मुलांनी आत्मपरीक्षण करून प्रामाणिकपणे उत्तरं दिली. पाणी प्यायल्यावर बरंचसं पाणी मोरीत कसं ओतलं जातं, दात घासताना वा तोंड धुताना आपल्या हातून नळ चालूच कसा राहतो, सायकल फडक्यानं पुसण्याऐवजी पाईपनं पाणी घालून धुतली कशी जाते, बादली भरल्यावरही नळ बंद करण्याकडं दुर्लक्ष कसं होतं हे सांगितलं. मग 'पाणी वाचवण्यासाठी आपण कोणती गोष्ट उद्यापासून करायचीय' असं विचारल्यावर मुलं आधी विचारात पडली. पण सुरुवात अगदी छोट्या वा साध्या गोष्टींनंही करता येते असं सांगितल्यावर आपल्या हातून पाण्याची नासाडी ज्या कारणांनी होत होती ती तरी निश्चित टाळणार अशी मुलांनी स्वयंस्फूर्त शपथच घेतली.

तिसऱ्या दिवशी सुरुवातीलाच कोणतं पुस्तक आपल्या मित्रानंही आवर्जून वाचावं असं तुम्हाला वाटतं आणि का? असा प्रश्न आम्ही केला, तर काय आश्चर्य, मुलं अगदी भरभरून बोलू लागली. अगदी कथानकापासून आपल्याला ते नेमकं का आवडलं इथंपर्यंत. मग आपल्याला आवडलेल्या पुस्तकांविषयी बोलताना काय सांगावं, कसं सांगावं याविषयी थोडीशी चर्चा आम्ही केली. मग आमच्या गप्पांची गाडी वळली आपल्या वैयक्तिक वाचनालयाकडे. वाढदिवसाला वा अन्य काही प्रसंगी भेट वा बक्षीस म्हणून मिळालेली आपल्याकडं कशी नि किती पुस्तकं आहेत हे मुलांनी सांगितलं. आपला ग्रंथसंग्रह लोकमान्य टिळक वा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा समृद्ध होण्याकरता काय करूया? असं विचारल्यावर आणि पूरक उपप्रश्न विचारल्यावर खूप छान, सोपे पर्याय मुलांनी सुचवले. पिग्मी बँकेतल्या बचतीतून पुस्तकं घेण्यापासून ते पुस्तक भिशीपर्यंत अनेक उपाय त्यात होते. मग त्यांची निगा, वर्गवारी, नोंद याविषयी चर्चा झाली. त्यानंतर मराठी भाषेतल्या हरवत चाललेल्या शब्दांचा धांडोळा आम्ही घेतला. अनुशे, आंगी, आवतण, उंडगा, कणगी, कानवले, कुंची, घुळी, चंबू, जित्राब, देवळी असे कितीतरी शब्द आम्ही शोधले आणि नंतर घरी गेल्यावर आपल्या वडीलधाऱ्यांशी बोलून मुलांनी त्यात पायताण, इरलं, टकूरं, वाईच, घंगाळ, कोरड्यास, वळचण, बलुतं, गोणपाट, काकणं, परसाकडं, चाळशी, फडताळ अशा बऱ्याच शब्दांची भर घातली.

म्हणी पूर्ण करण्याच्या खेळातही मुलं अशीच रंगून गेली. 'पाय धू, तर म्हणे तोडे केवढ्याचे', 'कानात बुगडी अन् गावात फुगडी', 'काम नाही कवडीचं अन् रिकामपण नाही घडीचं' अशा काही म्हणी मुलं पहिल्यांदाच ऐकत होती. त्यांच्या अर्थाविषयी आम्ही चर्चा केली केव्हा किती मोठा आशय एका ओळीच्या म्हणीतनं व्यक्त होतो आणि तरीही आपण आपल्या मराठमोळ्या म्हणी विसरूनच चाललोयंत हे पाहून मुलांना अचंबा वाटला. 'कलावंत तुमच्या भेटीला' अंतर्गत तिसऱ्या दिवशी कवी पुरुषोत्तम नगरकर यांना आमंत्रित केलं होतं. त्यांनी आपल्या काही बालकविता तर सादर केल्याच पण त्या सुचल्या कशा, लिहून झाल्या कशा हेही सांगितलं. एखादी ओळ सुचवून मुलांकडून ती ओळ वा चारोळी पूर्ण करून घेतली. त्यामुळं पाहुणे गेल्यावरही मुलं आपण निर्मिलेल्या कविता गुणगुणण्यात मग्न होती. काही मुलं यमक जुळवण्यापाठी लागली. कर-धर-भर, नाव-गाव-पाव-डाव-हाव असं सुरू झालं. मुलांचा असा गोंधळ सुरू असतानाच 'लंपन' ची श्रुतीकथा ऐकवण्यास आम्ही सुरूवात केली. आकाशवाणीनं प्रकाश नारायण संत यांच्या शारदा संगीत, पंखा आणि वनवास या कथासंग्रहांतल्या लंपनच्या कथांचं श्रुतीकथेत रूपांतरण केलं आहे. त्याचाच एक भाग आम्ही मुलांना ऐकवला. लंपनची भूमिका जगणाऱ्या मदन देवधरचा आवाज आणि पार्श्वसंगीत यामुळं कथेनं मुलांच्या मनाची लगेच पकड घेतली. कथा ऐकून झाल्यावर त्यावर सविस्तर चर्चाही झाली. प्रश्न-उपप्रश्न विचारत त्यांच्याकडून लिखित कथेचा हा आविष्कार चांगला की वाईट इथपासून ते श्रुतीकथेत

काय चांगलं होतं नि काय वाईट इथंपर्यंतच्या मुलांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. अभिवाचनाविषयीही थोडक्यात चर्चा झाली. त्यानंतर 'ईल माशाची गोष्ट' ही आजच्या शिक्षणपद्धतीवर प्रकाश टाकणारी छोटी अनुवादित कथा आम्ही वाचली. ती रूपक कथा होती. रूपकाच्या माध्यमातून समाजातल्या अनिष्ट रूढी-परंपरा, अयोग्य चालीरीती व पद्धतींवर कसा नेमका प्रकाश टाकता येतो हेही या निमित्तानं समजून घेतलं. त्या कथेच्या आशयावरही चर्चा झाली. कथेचं मर्म संवादातूनच उलगडत गेलं.

चौथ्या दिवशीची सुरुवातच चर्चेनं केली. मुलं तोवर कार्यशाळेला चांगलीच सरावली होती. त्यामुळं शांतपणे पण उत्साहात ऐकत-बोलत होती. काय वाचावं नि कसं वाचावं? साहित्याचे विविध प्रकार कोणकोणते? आपल्याला कुठला आवडतो? पुस्तक चांगलं/वाईट असतं का? ते कसं ठरवायचं? केव्हा वाचावं? कसं वाचावं? एका वेळी एकच पुस्तक वाचावं की अनेक वाचावीत? अशा कितीतरी प्रश्नांची उत्तरं आम्ही संवादातून शोधली. मग 'कविता कोणाची?' या खेळाला सुरुवात झाली. 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' वा 'अरे संसार संसार जसा तवा चुल्ह्यावर, आधी हाताला चटके तवा मिळते भाकर' अशा लोकप्रिय गीतांच्या ओळी कुणाच्या हे मुलांनी ओळी पूर्ण होण्याच्या आतच सांगितलं. मात्र 'ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे आणि या मातीतुनी चैतन्य गावे, कोणती पुण्ये अशी येती फळाला जोंधळ्याला चांदणे लखडून जावे' किंवा 'हासरा नाचरा जरासा लाजरा, सुंदर साजरा श्रावण आला' यासारख्या ओळींकरता एखाद दुसरा क्ल्यू द्यावा लागला.

'कलावंत तुमच्या भेटीला' या कार्यक्रमात त्या दिवशी चित्रकार हेमंत कपुरे यांना आमंत्रित केलं होतं. कथा, कविता, कादंबरी वा कोणत्याही साहित्याला अनुरूप चित्र कसं आकाराला येतं, मग ते मुखपृष्ठासाठी असेल वा अंतर्गत सजावटीसाठी, या संदर्भात ते प्रात्यक्षिकासह बोलले. ब्रशच्या दोन चार फटकाऱ्यांनिशी त्यांनी साकारलेली व्यंगचित्रं पाहून तर मुलं अवाक्‌च झाली. मग मुलांच्या आग्रहावरून मुलांच्या आवडीच्या कवितेतला निसर्ग त्यांनी कॅनव्हासवर साकारला. त्याचंही मुलांनी गद्यरूप रसाळ वर्णन केलं. जाता जाता पुन्हा थोरामोठ्यांना मिळालेल्या पदव्यांचा शब्दखेळ आम्ही खेळलो. लोकमान्यांपासून आचार्य, महात्मा, लोकनायक, लोकहितवादी, धर्मवीर, तर्कतीर्थ, महर्षी, गुरुदेव अशा अनेक सन्माननीय उपाधी मिळालेल्या व्यक्ती आणि त्यांचं कार्य याविषयी रंजक संवाद झाला.

पाचव्या दिवशी येताना संदर्भ वा चिकटवह्या मुलांनी केलेल्या असल्यास आणण्यास सांगितल्यानं त्यांनी उत्साहानं आपल्या वह्या आणल्या होत्या. वर्तमानपत्रातल्या संस्कार-शिदोरीपासून ते आवडत्या खेळाडूंच्या चित्रमालिकेपर्यंत विविध प्रकार त्यात होते. मग साहित्यिक रवींद्र पिंगेंच्या संदर्भ वह्यांचं उदाहरण देत अशी टिपणं वा संदर्भ कसे उपयुक्त ठरतात, ती कशी ठेवावीत यावर चर्चा झाली. नंतर वाचन वेगाविषयी आम्ही बोललो. आपल्याकडं मुलाला एक एक अक्षर, एक एक शब्द, एक एक वाक्य वाचायला शिकवलं जातं. मात्र एकदा का मुलाला वाचायला येतंय असं लक्षात आल्यावर शिक्षक आणि पालक दोघंही क्रमिक शिक्षणक्रमाकडं वळतात. वाचनशैली मुलांना शिकवलीच जात नाही. खरं तर वाचन ही देखील एक कलाच आहे आणि इतर कलांप्रमाणंच याचाही सराव हवा. साधना हवी. अन्यथा वाचनाचा वेग मंदावतो. परिणामी वाचनात लक्ष न लागणं, वाचताना झोप येणं, वाचलेलं लक्षात न राहणं अशा तक्रारी मुलं करायला लागतात. त्यादृष्टीनंच हा विषय आम्ही या कार्यशाळेत समाविष्ट केला होता. वाचनाची सुयोग्य बैठक, पुरेसा प्रकाश आणि मनाची प्रसन्नता या आवश्यक बाबींबरोबरच ओळीवर बोट, पेन वा पेन्सिल ठेवून न वाचणं, मजकुराबरोबर डोकं वा मान न हलवणं; केवळ डोळे फिरवत राहणं अशा साध्या गोष्टीही समजावून दिल्या. श्रोता वाचक, ओष्ठ वाचक आणि दृष्टी वाचक असे वाचकाचे तीन प्रकार कसे होतात आणि दृष्टी वाचक होण्याकडं आपली वाटचाल टप्प्याटप्प्यानं कशी होऊ शकेल याविषयी विस्तारानं चर्चा केली. एकेक पायरी चढत जाऊ तसा वाचनवेग कसा दुपटीनं वाढत जातो हे स्पष्ट केलं. प्रति मिनिट दोनशे ते अडीचशे शब्दांपासून अत्यंत वेगवान म्हणजे प्रति मिनिट साधारणत: सहाशे ते साडे सहाशे शब्दांपर्यंत मजल मारण्याकरता आपला प्रयत्न असायला हवा आणि त्यासाठी ही वाचनसाधना नियमित करायला हवी, हे मुलांनीही मानलं. मात्र वाचनशैली विकसित करण्यासाठी तसंच वाचनवेग वाढवण्यासाठी शाळांकडून, शिक्षक आणि पालकांकडूनही प्रयत्न व्हायला हवेत असं वाटलं. त्यानंतर एका शब्दात दडलेले अनेक शब्द शोधण्याचा खेळ झाला. अहमदनगर या एका शब्दापासून मद, नगर, अहमद, नर, नग, दहन, गर, दम, अमर, मदन, मगर असे कितीतरी शब्द आम्ही तयार केले. मग तर मुलं सुटलीच. एकेक शब्द घ्यायचा

आणि त्यात दडलेले अर्थपूर्ण शब्द शोधण्याचा त्यांनी सपाटाच लावला. त्यानंतर पुस्तकं आणि त्यांचे लेखक ओळखण्याचा एक शब्दखेळ झाला. या खेळानंतर 'वाचनानंतर काय?' या प्रश्नाकडं आम्ही मुलांचं लक्ष वेधलं. पुलंच्या 'सखाराम गटणे'चा किस्सा सांगितल्यानं मुलं चांगलीच खुलली आणि वाचल्यानंतर टिपणं कशी ठेवू नयेत आणि कशी ठेवायला हवीत याविषयी भरभरून बोलली. महत्त्वाची कात्रणं आणि त्यांचं वर्गीकरण तसंच आधी झालेल्या चर्चेचा संदर्भ घेऊन चिकट वही वा संदर्भ वही याविषयी संवाद झाला. तोवर समारोपाची वेळ जवळ आली. मुलांनी आपापली मनोगतं लिहून व बोलून व्यक्त केली आणि या पाच दिवसीय कार्यशाळेची सांगता झाली.

समारोप समारंभात हिराचंद नेमचंद वाचनालयाचे कार्यवाह श्रीकांत येळेगांवकर यांनी सहभागी मुलांना वाचनालयाच्या बालविभागाचं वार्षिक सदस्यत्व विनाशुल्क बहाल केल्यानं तर मुलांनी एकच जल्लोष केला. तरीही वाचन कार्यशाळा संपल्याची खंत व्यक्त करत जड अंत:करणानंच साऱ्यांनी निरोप घेतला.

दोन हजार सात पाठोपाठ दोन हजार आठ सालीही अशी कार्यशाळा आम्ही घेतली. कार्यशाळेचं स्वरूप जवळजवळ तेच होतं. कलावंत तुमच्या भेटीला या उपक्रमात त्यावर्षी चित्रकला शिक्षक सं. द. कुलकर्णी आणि नकलाकार अंबादास कनकट्टी यांना आम्ही निमंत्रित केलं होतं. सं. द. कुलकर्णी सरांनी आपल्या घराची प्रत्येक भिंत चित्रांनी बोलकी आणि देखणी केलेली आहे. अनेक होतकरू कलाप्रेमी विद्यार्थ्यांना चित्रकलेचं शिक्षण मोफत देणाऱ्या सं.द. सरांनी एक चित्रमालिका कार्यशाळेच्या मुलांसाठी चितारली होती आणि त्यावरून कथा लिहिण्यास प्रोत्साहित केलं होतं. त्यामुळं उत्तम वाचक होण्याचा प्रयत्न करता करता आमच्या मुलांनी कथालेखनाचेही प्राथमिक धडे गिरवले आणि आशयाबरहुकूम चित्र व चित्राबरहुकूम आशय या दोन्ही गोष्टी अनुभवल्या. नकलाकार अंबादास कनकट्टींनी निव्वळ निरीक्षणातून जवळजवळ तीसेक पक्ष्यांचे आवाज आत्मसात केलेले आहेत. निसर्गवाचनाचे धडेच त्यांनी आपल्या प्रात्यक्षिकांमधून आम्हाला दिले. काही पक्ष्यांशी ते कसा संवाद साधतात याचे किस्से ऐकताना मुलांना इसापनीतीतल्या कथाविश्वात डोकावल्याचा भास झाला.

वाचनाबरोबरच मुलांमध्ये काही छोट्या पण महत्त्वपूर्ण गुणांची रुजवणूक करण्यातही आम्ही यशस्वी झालो. रोज सकाळी आठ ते दहा अशी वेळ निश्चित केलेली. अगदी पाच मिनिटंही उशीर झाल्यास त्या मुलाला आधी आलेल्या सर्व मुलांनी सुचवलेली शिक्षा भोगावी लागायची. ती शिक्षा मजेशीर असायची. पण शिक्षा ती शिक्षाच. दुसऱ्याच दिवसापासून मुलं अगदी वेळेवर हजर होऊ लागली. रोज सकाळी आम्ही समन्वयक बरोबर सात पंचेचाळीसला मुलांच्या आधी हॉलवर हजर असायचो आणि ध्वनिमुद्रित बालगीतं सुरू करून द्यायचो. मंगेश पाडगांवकर, शांता शेळके, राजा मंगळवेढेकर यांच्यापासून ते आजच्या संदीप खरेंपर्यंत अनेकांची बालगीतं त्यात समाविष्ट होती. पण अपवाद वगळता मुलांनी ती ऐकलेलीच नव्हती. त्यामुळं काही काही मुलं तर आवर्जून लवकर येऊन या बालगीतांचा आनंद घ्यायची.

हॉलच्या दाराशी मुलं चपला कशाही सोडतात हे पाहिलं आणि अवघ्या पाचच मिनिटांत साऱ्या चपलांचे जोड आम्ही ओळीत लावून घेतले. आम्ही काही तरी करतोय एवढंच मुलांना हॉलमधून दिसलं, पण नेमकं काय हे निरोप घेताना त्यांच्या लक्षात आलं. मग दुसऱ्या दिवसापासून आम्हाला त्यांना तेही सांगावं लागलं नाही. मुलं स्वत:हूनच चपला व्यवस्थित रांगेत सोडून येऊ लागली. एखाद्याचा वेडावाकडा पडलेला जोड दिसलाच तर सरळ ठेवून येऊ लागली. सुरुवातीला अगदी अबोल असलेल्या, चटकन इतरांमध्ये न मिसळणाऱ्या मुलांमधले काही जाणवलेले गुण आम्ही हायलाईट करायला लागल्यावर ती मुलंही खुलली आणि इतरांनाही त्यांचं अस्तित्व जाणवलं. कित्येक अमराठी मुलं वा इंग्रजी माध्यमातून शिकणारी मुलंही या कार्यशाळेत सहभागी झालेली होती. सुरूवातीला मराठी फारसं चांगलं नसल्यानं बोलण्यास दचकणारी मुलं नंतर मात्र एखाद-दुसऱ्या इंग्रजी वा हिंदी शब्दाचा आधार घेऊन मोकळेपणानं संवादात सहभागी होऊ लागली. त्यांच्या व्याकरणाच्या चुकांकडं काणाडोळा करत त्यांना काय सांगायचंय हे समजून घेण्याकडं मुलांचाही कल वाढला. कानमंत्रासारखा खेळ तर मुलांना बेहद्द आवडला. साध्यासुध्या संदेशाची कानोकानी कशी वाताहत होते हे अनुभवल्यानं लक्षपूर्वक ऐकणंही किती महत्त्वाचं हे मुलांच्या लक्षात आलं.

या कार्यशाळेनंतर मुलांच्या लिखित प्रतिक्रिया, त्यांचा पाच दिवसांचा वावर, त्यांच्यात झालेले बदल, आमची निरीक्षणं आणि पालकांशी सुसंवाद यांचं एकत्रित मूल्यमापन केलं तेव्हा मुलांना वाचनाची गोडी लावण्यात आम्ही बहुतांशी यशस्वी

झाल्याचं दिसून आलं.त्यातून काही ठळक जाणवलेले मुद्दे असे आहेत–

मुलं वाचत नाहीत असं म्हणणं फारसं योग्य ठरणार नाही. आजच्या पिढीला वा आजच्या युगाला सुसंगत बाल साहित्यनिर्मिती मराठीत आणखी जोमानं व्हायला हवी असं मात्र वाटतं. ना. धों. ताम्हणकरांचा गोट्या किंवा भा. रा. भागवतांचा फास्टर फेणे यांनी मागच्या पिढ्यांना वेड लावलं होतं. किंबहुना आजही मुलं ही पुस्तकं आवडीनं वाचतात. दिलीप प्रभावळकरांनी बोक्या सातबंडेच्या रूपानं या पिढीला आपला वाटेल असा हिरो दिला. असे बालनायक आणखी असायला हवेत. बालसाहित्यात ग्रामीण मुलांचं विश्वही साकारायला हवं आहे. प्रौढांसाठी उत्तम विज्ञान नवलिका खूप आहेत. पण दहा ते पंधरा वर्षे वयोगटातल्या मुलांचा विचार करून त्यांच्यासाठीही अशी सायन्स फिक्शन्स् यायला हवीत. मंगेश पाडगांकर, विंदा करंदीकर, शांता शेळके, राजा मंगळवेढेकर यांच्या बालगीतांवर मागच्या कित्येक पिढ्या झुलल्या. आजची मुलंही 'ए आई मला पावसात जाऊ दे' किंवा 'या वाऱ्याच्या बसुनी विमानी सहल करूया गगनाची' ही गाणी ऐकताना हरखून जातात. दासू वैद्य, संदीप खरेंसारखे नव्या दमाचे कवीही छान बालगीतं देत आहेत. छोट्या छोट्या शहरांमध्ये, गावांमध्येही अनेकजण अशी साहित्यनिर्मिती करत आहेत. नामवंतां बरोबरच आपापल्या गावातल्या, शहरातल्या साहित्यिकांच्या प्रयत्नांनाही प्रकाशक, शिक्षक आणि आपण पालकांनी प्रतिसाद द्यायला हवा.

टीनएज वा कुमारांसाठीचं साहित्य यावर स्वतंत्र विचार व्हायला हवा, असं वाटतं. प्रकाश नारायण संतांच्या लंपनकथा या कुमारवयातल्या मुलांच्या भावविश्वात डोकावतात. मिलींद बोकीलांच्या 'शाळा'चं उदाहरणही देता येईल. आजच्या अधिकाधिक स्पर्धात्मक आणि धावपळीच्या जगात या वयातल्या मुलांच्या समस्या आणखीनच गुंतागुंतीच्या झाल्या आहेत. त्यांचा सर्वपरीनं धांडोळा घेणारं उपयोजित साहित्य बरंचसं उपलब्ध आहे; बहुश: पालकांसाठी. मात्र ललित साहित्यकृतींमधूनही ते अधिक प्रमाणात प्रतिबिंबित झाल्यास कुमारांना ही पुस्तकं अधिक आपली वाटतील.

चरित्रात्मक पुस्तकांमध्ये साने गुरुजींच्या, बापूजींच्या गोड गोड गोष्टींसारखी रसाळ पुस्तकं खूप कमी आढळतात. बहुतांश पुस्तकांमध्ये अमूक यांचा जन्म अमूक इथं तमूक या साली झाला.... या स्वरूपाचंच लेखन दिसतं. कुमार गटातली मुलं 'एक होता कार्व्हर', 'अग्निपंख', 'इडली ऑर्किड आणि मी', 'एका रानवेड्याची शोधयात्रा' यासारखी पुस्तकं आवडीनं वाचतात. यावरून जगणं सांगणारं साहित्य या वयोगटातल्या मुलांना हवंय हे जाणवंत. विविध क्षेत्रातल्या नामवंतांची अशी रसाळ चरित्रं, आत्मचरित्रं वा अनुभवकथनाची पुस्तकं मुलांना हवी आहेत.

शाळांमध्ये अवांतर वाचनास प्रोत्साहन देणारे उपक्रम अभावानंच होतात, असं जाणवलं. शाळेत ग्रंथालय आहे वा असतं याची बऱ्याच मुलांना कल्पनाही नव्हती. ज्या काही थोड्या मुलांनी शाळेच्या ग्रंथालयाचं वर्णन केलं त्यावरून वयोगटानुसार मुलांच्या रुचीचा विचार करून पुस्तक खरेदी होत असावी असं वाटलं नाही. काही शाळांमध्ये मात्र पुस्तक भिशीसारखा प्रकार वर्गावर्गातून राबवला जात असलेला आढळला. पण त्यातही सातत्याचा अभाव होता. पुस्तक पेटीसारखा कार्यक्रम वा आठवड्यातून किमान एक तास वा ऑफ पिरिएडला लायब्ररीत बसण्यास मुलांना प्रोत्साहन देता येईल. त्या कालावधीत मुलांनी विविध पुस्तकं हाताळली वा चाळली तरी मुलांचं कुतूहल वाढेल आणि ती वाचनप्रवृत्त होतील.

पाठ्यपुस्तकातल्या धड्यांच्या शेवटी तो पाठ लेखकाच्या कोणत्या पुस्तकातून घेतला आहे हे दिलेलं असतं. लेखक परिचयात संबंधित लेखकाच्या इतर पुस्तकांचाही नामोल्लेख असतो. मात्र शिक्षक वा पालक ती पुस्तकं वाचण्यासाठी मुलांना उद्युक्त करताना दिसत नाहीत. मुलांनी मागितली तरी त्यांना ती बहुश: उपलब्ध करून दिली जात नाहीत. मुलांसाठीची विविध पुस्तकं वाचून त्याविषयी वर्गात चर्चा करणारे शिक्षक वा उत्तमोत्तम बालसाहित्य आपल्या पाल्यासाठी आणणारे पालक कमी आहेत, असं आमच्या चर्चेतून निदर्शनास आलं. घरातली सगळी माणसं काही न् काही वाचताहेत हे दृश्य अलीकडं दुर्मिळ होत आहे. आपण टी. व्ही. पाहायचा आणि मुलांनी मात्र वाचावं अशी अपेक्षा करायची हे कितपत सयुक्तिक आहे, याचा विचार आपण पालकांनीही गांभीर्यानं करायला हवा. मुलांना वाचनाची गोडी लावण्याकरता काही सोपे सोपे प्रयोग पालकांनाही आपल्या कल्पनाशक्तीनुसार करता येतील. घरातल्या एखादा शांत कोपरा वा जिन्याखालची निवांत जागा केवळ अवांतर वाचनासाठी थोडीशी कल्पकता लढवून राखता व सजवता येईल. घरातली सगळी मंडळी अर्धा–एक तास तिथं वाचत बसलीयत हे दृश्य किती आकर्षक दिसेल! आपापल्या

परिसरातील उपक्रमशील शिक्षक-पालकांच्या अनुभवांतून आपल्यालाही अनेक कल्पना स्फुरतील.

ग्रंथालयातली पुस्तकं बरीच जीर्ण आणि वाईट अवस्थेत असतात त्यामुळं मुलांना ती हाताळावीशी वाटत नाहीत. बालवयात नावीन्याचं आकर्षण असतं. पुस्तकांचा करकरीत वा गुळगुळीत स्पर्श मुलांना हवासा वाटतो. त्याचा विशिष्ट गंध भुलवतो. मुखपृष्ठाची आकर्षकता त्यांना खेचून घेते. मात्र आपल्याकडं बालसाहित्य आर्कषक स्वरूपात फारसं उपलब्ध होत नाही. त्यात जीर्ण अवस्थेतली पुस्तकं पाहून वाचनाक डं फारसा ओढा नसलेल्या मुलांचा उत्साह पारच ओसरतो. बालसाहित्याच्या निर्मितीमूल्यावर आपल्याकडं अधिक संशोधनाची गरज आहे. लहान मुलांच्या पुस्तकांची लांबी-रुंदी किती असावी, अक्षरांचा आकार आणि फॉण्ट कोणता असावा, दोन ओळींतलं अंतर किती असावं अशा प्राथमिक बाबींकडं अधिक लक्ष पुरवण्याची गरज वाटली. मुलांचं लक्ष वेधून त्यांना पुस्तक हाताळण्यास, चाळण्यास भाग पाडण्याची क्षमता पुस्तकाच्या मुखपृष्ठ, मांडणी आणि सजावटीत हवी. शिवाय त्यातली रेखाचित्रं, रंगीत चित्रं, टायपोग्राफी याकडंही विशेष लक्ष पुरवणं आणि त्यात कलात्मकता व नावीन्य आणणं गरजेचं आहे, हे प्रकर्षानं जाणवलं. अगदी मुलांच्या पुस्तकांचा आकार आयताकृती वा चौकोनीच असावा का? इथपासून विचार व्हायला हरकत नसावी.

'क्रॉसवर्डस्'सारखी अत्यधुनिक दालनं; जिथं शेकडो विषयांवरची हजारो पुस्तकं शेल्फवर सहज हाताळता येतील अशी मांडलेली असतील, अतिशय आल्हाददायक वातावरणात निवांतपणे मुलांना पुस्तकं स्पर्शता येतील, चाळता येतील, हवी तर विकत घ्या, नाही तर तिथंच बसून वाचा, कंटाळा आला की उठून जा, कुणी हटकणार नाही की 'कामाशिवाय अधिक वेळ थांबू नये'च्या पाटीकडं बोट दाखवणार नाही, अशी दालनं छोट्या शहरांमधून आणि पुढं जाऊन गावागावांमधूनही झाल्यास वाचनसंस्कृतीला नक्कीच हातभार लागेल. सोलापुरातल्या हिराचंद नेमचंद वाचनालयात बालसाहित्यविभागाची स्वतंत्र योजना केलेली आहे. मुलं स्वत:च पुस्तकांपर्यंत जाऊन, चाळून, प्रसंगी तिथं बसून वाचून पुस्तकांची निवड करतात. असे काही प्रयोग इतर वाचनालयांमधूनही व्हावेत. वाचनालयं, शाळा आणि मुलांसाठी कार्यरत सामाजिक संस्थांनी आपल्या इतर कार्यक्रमांबरोबर वाचन कार्यशाळेसारखे उपक्रम सातत्यानं राबवल्यास मुलांना वाचनाची गोडी निश्चित लागू शकेल. 'आस्था' ही आमची संस्था याकामी आपल्याला सर्वतोपरी विनामूल्य सहकार्य देईल. कार्यशाळेचा आराखडा निश्चित करून आपापल्या कल्पकतेनुसार उपक्रमशील शिक्षक आणि पालकांनीही अगदी छोट्या स्तरावरूनही असे प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे?

यीटस् या इंग्रज कवीनं म्हटलं होतं की आपल्या पंचविशीपर्यंत आपण जे वाचलं, अभ्यासलं, अनुभवलं त्यावरच पुढचं आयुष्य तोलून धरलेलं असतं. आयुष्याची ही पंचवीस वर्षे समृद्ध होण्यात वाचनाचा सहभाग मोलाचा आहे याची जाणीव आपल्याला आहेच. आपल्या उमलत्या पिढीलाही ती करून देण्याचा प्रयत्न आपण सारेच आपापल्या स्तरावर प्रामाणिकपणे करत राहिलो तर ही पिढीही 'प्रसंगी अखंडित वाचीत जावे'ची अनुभूती निश्चित घेईल.

० ० ०

सुनीता तारापुरे
'दुर्गा', ८७ अ/-४, मड्डी वस्ती, सोलापूर ४१३००२
भ्रमणध्वनी ९९२२१११२३०

*With Best Compliments from -*

**SHAH** SYSTEM & SERVICES

126, Murarji Peth, Rajput Niwas,
Shop No. 4, Opp. Canara Bank,
Saraswati Chowk, Solapur.
Tel. 0217 - 2721920, 9850281920

*आशय दिवाळी अंकाच्या वाचकांना दिवाळी शुभेच्छा !*

**राहुल दिलीपसिंह चंदेले**
चौपाड, सोलापूर

# मी सोलापूरकर..


आनंद कुंभार

**आ**ज मी वयाच्या सत्तरीच्या उंबरठ्यावर उभा आहे. प्रिय आणि अप्रिय घटनांच्या मालिका कधी आठवत राहतात. एक माणूस म्हणून जे संचित माझ्या वाटेला आले त्याच्याकडे तटस्थपणे पाहात असताना, त्याची रंगतदार कथा होऊ शकते हे माझ्या लक्षात आले. कदाचित प्रत्येक माणूस स्वत:च्या जीवनावर अशी कादंबरी लिहू शकेल. आजच्या या कथनात मात्र मी हात थोडा आखडता घेत आहे. सोलापूरकर म्हणून मी काही स्वतंत्र ठसा सोलापूर शहरासाठी दिला आहे की नाही हे खरे तर मी नाही ठरवू शकत. पण तरीही हातून सहजपणे काही कार्य घडले हे नक्की. माझ्या दैनंदिन जीवनात काही वेगळेपण नाही. एक अतिसामान्य मतीचा आणि कुवतीचा माणूस आहे मी. पण कुठल्यातरी आंतरिक प्रेरणेने इतिहासात काही संशोधन करू लागलो आणि त्यास जाणकारांची शाबासकीही लाभली. एरवी सातवी इयत्तेत दोनदा नापास झालेल्या माझ्याकडून संशोधनाच्या क्षेत्रात काही घडावे हे आश्चर्यकारकच नाही का ? माझी अशी श्रद्धा नाही का? की नियतीचा त्यात मोठा सहभाग आहे.

नियतीचा उल्लेख झालाच आहे तर माझी जन्मकथाही मला सांगितली पाहिजे. मनमोहन देसाई किंवा प्रकाश मेहरा अशांच्या चित्रपटातली अर्भकांची अदलाबदल आपण अनेक चित्रपटांतून पाहिली असेल. नेमकी अशीच अदलाबदल माझ्या बाबतीत झाली होती! माझ्या नात्यातल्या एका बाईच्या दक्षतेमुळे मी माझ्या जन्मदात्या आईच्या कुशीत परत आलो. जन्मल्या दिवशीच हा संघर्ष मी केला. माझ्या वतीने नियतीनेच हा संघर्ष केला अशी माझी धारणा आहे. दुसरे म्हणजे पहिल्याच वर्षी विकोपाला गेलेले आजारपण. अनेक औषधे, अंगारे, धुपारे, देवदेवस्की सगळे काही झाले. अखेर इंडी तालुक्यातील तांबा या गावी कल्लूर मल्लप्पा या नामांकित वैद्याकडे मला नेण्यात आले. आणि गंमत म्हणजे एका आठवड्यात मला गुण येत गेला. पुढे भारतीय सैन्यदलात दाखल झाल्यानंतर मी साक्षात् मृत्यू समोर पाहिला. ती देखील एक कसोटीच होती. पण वरील दोन प्रसगांत नियतीने काही ठोस त्यावेळीच ठरविले होते, असे आजही वाटते. मात्र असे वाटण्यास काही खास कारण म्हणाल तर नाही.

१० मे १९६० रोजी वयाच्या विसाव्या वर्षी मी भारतीय सैन्यदलात बिनतारी संदेश वाहक म्हणून रुजू झालो. एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर पाकिस्तान सरहद्दीजवळच्या आनंदपूर येथे माझी रवानगी करण्यात आली. सरहद्दीवर असताना तो थरकाप उडवणारा प्रसंग आला होता. अंधारात पेट्रोलिंग करता करता आमची जीप नकळत पाकिस्तान हद्दीपर्यंत कशी आली, आम्हाला समजलेच नाही. पाहातो तो, समोरच्या पुलावर एक सैनिक गस्त घालतो आहे. माझ्या लगेच लक्षात आले की हा पूल आपल्या हद्दीतला नाही. आम्ही सर्वचजण घाबरून गेलो पण नुसतं घाबरून काय होणार होतं? इंजिन सुरू न करता आम्ही ती जीप अर्धा किलोमीटर मागे खेचत नेली. आजही हा प्रसंग आठवला की अंगावर काटा येतो.

माझ्या हातून जे काम झाले किंवा जे काम घडले त्याचे कौतुक करणारी माणसं माझ्या भोवती आहेत. त्या सर्वांचे प्रेम माझा जीवनाधार नक्कीच आहे. परंतु अशा प्रसंगांतूनही मी हे करण्यासाठी उरलो याचे अप्रूप मला नक्कीच आहे. आनंद कुंभार, शिलालेख तज्ज्ञ, किंवा संग्राहक वगैरे वगैरे माझी जी ओळख आहे तिजकडे पाहिल्यावर मला हे प्रसंग आठवतातच. कुठल्यातरी सुप्त शक्ती हे काम माझ्याकडून करवून घेतात वगैरे मी म्हणणार नाही. परंतु सोलापूर जिल्ह्यातील कोरीव लेखांच्या शोधाकडे मी वळलो नसतो तर पूर्वजांकडून वारशाने मिळालेल्या या अमोल संपत्तीचे काय झाले असते? असहिष्णु सत्ताधीश आणि त्यांचे सेवक अशा सामग्रीचा नाश करण्यास टपलेले असतात. किंबहुना नाश करणे हाच तो धर्म समजतात. खरे तर होता होईल तेवढी सामग्री संरक्षित करणे हे प्रत्येक व्यक्तीचेच कर्तव्य आहे. काही अज्ञानमूलक मंडळी याला 'मेलेली मढी उकरून काढणे' म्हणतात. एक गोष्ट लक्षात घ्या की इतिहासातील कोणतीही व्यक्ती तुम्हाला जाब विचारायला परत येणार नसते. परंतु आपल्या पूर्वजांच्या अधिभौतिक आणि सांस्कृतिक विपुलतेच्या नोंदी आपण पुसायच्या का? आपले आई-वडील, त्यांचे आई-वडील, जात धर्म हा सगळा वारसा म्हणजे आपलाच सांस्कृतिक इतिहास आहे. त्याकडे असे उपहासात्मक कटाक्ष टाकणे वा त्याबाबत उदासीन राहणे



## आनंद कुंभार

**२७ मे १९४१ या दिवशी सोलापुरात जन्म. सोलापुरातच मॅट्रीकपर्यंत शिक्षण झाले. १९६० मध्ये भारतीय सैन्यदलात संदेश वाहक म्हणून रुजू. ५ वर्षांच्या सैन्य दलातील कालावधीत चीनचे युद्ध झाले. सैन्यदलातून निवृत्ती घेतल्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सेवेत रुजू. सोलापूर जिल्ह्यातील शिलालेखांच्या अभ्यासापायी सातत्याने भ्रमंती. हत्तर कुडल जि. सोलापूर येथे आढळलेला शिलालेख हा मराठीतील पहिला शिलालेख असल्याबाबतचे महत्त्वपूर्ण संशोधन. या विषयावर एक इंग्रजी आणि एक मराठी असे दोन ग्रंथ सिद्ध. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे पुरस्कार आणि गौरव. हि. ने. वाचनालयाच्या संचालक मंडळात नियुक्त सदस्य म्हणून कार्यरत. अनेक प्रकारच्या छंदांत आजही रममाण. पुस्तके, ध्वनिफिती, चित्रपटांच्या व्हिडिओ कॅसेटस् यांचा संग्रह.**

आपल्याला परवडणारे नाही. या साध्या विचाराने प्रेरित होऊनच मी संशोधन आणि संग्रहण केले आहे. लौकिकदृष्ट्या जे बाळपण आणि जी विद्यार्थीदशा माझ्या वाट्यास आली त्यापेक्षा अधिक उत्तम काही लाभलं असतं तर बरे झाले असते असे आज जाणवते. पण त्याबद्दल ना खंत आहे ना खेद.

लागोपाठच्या बाळंतपणामुळे खंगत गेलेली आई आणि अखेर त्यातच तिचा झालेला मृत्यू, वडिलांनी केलेले दुसरे लग्न आणि सोलापूर सोडून जाणे या घटनांमुळे त्यावेळी मी मनाने सैरभैर झालो. आजी-आजोबांनी माझा सांभाळ केला. माझे आजोबा कुंभारकलेत तर निष्णात होतेच. त्याशिवाय 'दोड्डुआट्ट' या लोककलेतही रस घेत असत. रावण, बाणासूर इत्यादी भूमिका ते खूप समरसून करीत आणि त्यांची ख्यातीही मोठी होती. विशेष म्हणजे त्यांना चहाच्या कपाचेही व्यसन नव्हते. कदाचित माझ्यावरही तोच प्रभाव असावा- मीही चहा-कॉफी कधीच घेत नाही. योग्य वेळी मी शाळेतही गेलो. डी. एच. खजिनदार एडेड स्कूल ही खाजगीच शाळा होती. मात्र मराठी माध्यमामुळे मला जरा जडच गेले. माझी मातृभाषा कन्नड होती. आजोबांची आर्थिक परिस्थिती काही फारशी चांगली नव्हती. मी मधूनमधून त्यांच्या कामात मदतही करीत असे. पण आजोबांमुळे माझे शिक्षण चालू राहिले आणि कसाबसा मी सातवी पास झालो. काडादी हायस्कूलमध्ये प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्न केले परंतु ते यशस्वी झाले नाहीत. रिकामा दिवस आणि गल्लीतल्या उनाड पोरांबरोबर भटकणे सुरू झाले. याच काळात 'गिन्नी-सिनेमा' चे वेड मला लागले. मनोरंजन आणि संगीताबद्दलची आवड इथूनच सुरू झाली. पुढे त्याबद्दल येईलच!

आणखी एक ऋणनिर्देश मला केला पाहिजे तो म्हणजे विद्यामंदिर नाईट स्कूलचा. डफरीन चौकात आज जो पेट्रोल पंप आहे त्या जागी लोणकरांनी ही शाळा सुरू केली होती. परिस्थितीचे भान आल्यामुळे असेल कदाचित, मी याच काळात काही अर्थार्जनही करू लागलो. रात्रीच्या या शाळेत चांगले शिक्षण मिळे. विषयाबाहेर जाऊनही शिकवणारे शिक्षक होते. मला अजूनही आठवते ती श्री. आर.डी.जोशी सरांनी सांगितलेली बाणभट्टाची 'कादंबरी'! इंग्रजी 'नॉव्हेल' या साहित्य प्रकाराला मराठीत कादंबरी म्हटले गेले ते 'कादंबरी' या बाणभट्टाच्या रचनेमुळेच. पुढे ही कादंबरी मी स्वतंत्रपणे वाचून तिचा आस्वाद घेतला आहे. याच रात्रशाळेत माझ्या सहकारी विद्यार्थ्यांमध्ये भुईकोटकार श्री विलास पाटील आणि श्री सुशीलकुमार शिंदे होते. याच काळात आम्ही तिथेच बाजूला असलेल्या खोसला यांच्या 'कॅफे स्माईल्स' समोर बिनाका गीतमाला ऐकायला जात असू. विसरण्याआधी आणखी एक उल्लेख मला करावयाचा आहे. वसंतराव भागवतांकडे मी याच काळात वृत्तपत्रे घरोघरी टाकण्याचे काम करीत होतो. तिथे मला रमाकांत गोसावी आणि इनामुल्ला शेख हे दोन मित्र भेटले. आणि सिनेमावेड्या या मित्रांबरोबरच, भागवतांमुळे सिनेसाप्ताहिके वाचायला मिळू

लागली. 'छाया', 'तारका' आणि नंतर काही काळानंतर सुरू झालेले इसाक मुजावरांचे 'रसरंग'! बदरी काचवाला यांचे 'फिल्म केसरी', हिंदीतले 'माधुरी' इत्यादी नियतकालिकेही आठवतात. हे दिवस खूप मस्त होते, पण फार काळ टिकले नाहीत. दहावी नंतर शिक्षण थांबवले. अर्थार्जनाची गरजही भासत होतीच. रमाकांत पंढरपूरला गेला आणि इनामुल्ला पोस्टात पॅकर म्हणून मुरुमला. पण एक नक्की की गिन्नी सिनेमा आणि ही नियतकालिके एका वेगळ्याच भविष्याची नांदी होती. केवळ म्हणून त्यांचा उल्लेख.

यानंतरचे पर्व म्हणजे मी सुरुवातीस उल्लेख केलेले सैन्यातील दिवस. माझी ओळख ही शिलालेख संशोधक, इतिहासाचा अभ्यासक, विविध वस्तूंचा आणि पुस्तकांचा, संगीताचा संग्राहक, अशी आहे. या सगळ्या उपद्व्यापासाठी एक शिस्त लागते. सैन्यदलात मी रमलो नाही, आयुष्यभर ओशाळे वाटणारी कृतीही माझ्याकडून तेव्हा घडली. पण सैन्यदलाने मला दिलेली मोठी देणगी म्हणजे आवश्यक ती शिस्त. सैन्यात भरती झाल्यानंतर माझ्या स्वच्छंद स्वभावास एक प्रकारे खीळ बसली आणि माझ्या हातून एक मोठी चूक घडली. ही चूक सुधारण्याची संधी मात्र मिळाली हे माझे भाग्य. त्याबद्दल मी सांगणारच आहे. त्याआधी सैन्याने दिलेल्या शिस्त-संस्कृतीचा परिणाम हा भागही महत्त्वाचा मानलाच पाहिजे. घरातील-पुस्तके नीट लावणे, वर्तमानपत्रेही मूळ घडीनुसार दिनांकवार ठेवणे, पादत्राणे, कितीही असू दे, ओळीत ठेवणे हे मी ठरवून नाही करत. गेली ५० वर्षे त्यात बदल नाही. ही शिस्त मला सैन्यातील दिवसांनीच देऊ केली आहे. हे सगळे आज इतके अंगवळणी पडले आहे की बस्स!

मात्र हे सगळे खरे असले तरी सैन्यातील अंगमेहनत आणि कष्टप्रद दैनंदिनी मला मानवत नव्हती आणि हा विचार बळावत जाऊन नकळत मी पळून जायचे ठरवले. लष्करी प्रशिक्षण इतके श्रमाचे असते याचा विचार मी केलाच नव्हता. अखेर मी सुटकेसाठी स्वत:च योजना आखली. पलायनाची मानसिक तयारी केली आणि एका रविवारच्या दुपारी मी बराक सोडली. अर्थातच् खूप गोंधळ झाला असणार, पण मी सुटकेचा नि:श्वास सोडला. सैनिकी अधिकाऱ्यांनी मला 'भगोडा' घोषित करून टाकले. सर्वात कडी म्हणजे घरी सोलापुरी परतल्यावर निराळीच परिस्थिती निर्माण झाली, त्याची मी कल्पना केली नव्हती. सैन्यातून पळून आलेला अशी संभावना होत होती. आणि मला तसे काही अपेक्षित नव्हते. लोक उघडपणे फारसे बोलत नव्हते, पण त्यांच्या नजरेतून मला ते कळत होते. या सगळ्या प्रकाराने मी फार निराश झालो. पोलिसी चौकशी अजून सुरू नव्हती झाली. पण त्याचे लचांड टळावे म्हणून मी आणि आजीने गाव सोडले. सगळेच पराकोटीचे अस्थिर होऊन गेले.

हे अपराधीपण मलाही खात होतेच. अशा परिस्थितीत मी पुन्हा सैन्यात जायचे अन् जी होईल ती शिक्षा मुकाट्याने भोगायची असा निर्णय घेतला. प्रशिक्षण केंद्रात परत गेलो. या गुन्ह्याला शिक्षा तर होतीच. सेनेतील प्रशासकीय आधिकाऱ्याने माझी खूप निर्भत्सना केली अन् दुसऱ्याच दिवसापासून माझ्या शिक्षेची अंमलबजावणी सुरू झाली.... १५ दिवस पिठ्ठू परेड आणि १५ दिवस कोठडी. शिक्षा संपली अन् मी पुन्हा बराकीत परत आलो. काळाच्या ओघात मी खूप पुढे आलो आहे पण आजही 'ती' शरम माझा पिच्छा सोडत नाही. पुन्हा मी सैन्यदलात काही वर्षे काढली आणि रीतसर बाहेर पडलो त्यालाही आज कित्येक वर्षे झाली. मात्र या चुकीमुळेच आपण खूप शिकलो असे मात्र वाटते.

यानंतरच्या कालखंडात मी बिनतारी संदेशवाहक होतो. या काळातच मी नाशिक-त्र्यंबकेश्वर मार्गावरील 'पांडू पहाडी' नावाने प्रसिद्ध नाशिकची लेणी पाहिली. प्राचीन शिल्पे, शिलालेख यांची माझी कसलीही ओळख त्यावेळी नव्हती. या लेण्यांची निर्मिती सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीची महाराष्ट्रीय सम्राट सातवाहन राजाने केलेली. या लेण्यांचा पांडवांशी काहीही संबंधी नव्हता. हे अर्थात् मला नंतर समजले. पुढे जाऊन या विषयात आपल्या हातून काही घडणार आहे याचीही जाणीव त्यावेळी मला झाली नाही. पण त्यामुळे मला ऐतिहासिक स्थलदर्शनाची ओढ निर्माण झाली. रविवारी 'औटपास' मिळवून मी काळा राम मंदिर, पंचवटी, राम-सीतेच्या वनवासविहाराचा परिसर, पेशवेनिर्मित सरकारवाडा, वणीची सप्तशृंगी, निवृत्तिनाथांची समाधी, रामदास स्वामींचे तपस्या-स्थळ अशा अनेक स्थानांना, वास्तूंना भेटी दिल्या. वाचनाचा नाद असल्यामुळे सार्वजनिक वाचनालयाकडेही फेरी मारली जात असे. नाशिक येथील एका चर्चवर 'ख्रिस्ती देवालय' असे लिहिलेले वाचून गंमत वाटली. या सगळ्यांचाच एक संमिश्र परिणाम माझ्यावर झाला असणार.

आपण पुनश्च सैन्यदलातील कालखंडाकडे वळू.. प्रशिक्षणानंतर सर्वांची निरनिराळ्या पलटणीत नेमणूक होणार हे उघडच होते. माझी नेमणूक जम्मूला झाली. मग सुटीच्या दिवशी

जम्मू परिसरात फिरण्याचा रिवाज सुरू झाला. या संकेताची देखील मला मजा वाटते. जम्मूच्या बाजारपेठेत हिंडताना मला एक पुस्तकाचे दुकान दिसले. वास्तविक पुस्तकांशी मी तसा संबंधित होतो पण त्यांचे वेड वगैरे म्हणावे असे काहीच नव्हते. पण त्यादिवशी पुस्तके चाळताना मला 'भारतीय फिल्मोंकी कहानी' हे पुस्तक नजरेस पडले, अन् त्या पुस्तकाने मला थबकवलेच. त्या पुस्तकाची किंमत साडेचार रुपये असूनही मी ते त्यावेळी घेऊ शकलो नाही. खिन्न मनाने ते पुस्तक पुन्हा जागेवर ठेवले. चार महिन्यानंतर मी ते पुस्तक खरेदी केले, ते आजही माझ्या संग्रही आहे. विशेष म्हणजे दिल्लीच्या एका वारीत या पुस्तकाचे लेखक बच्चन श्रीवास्तव यांनाही मी भेटलो आहे.

मी जम्मू-काश्मीर मध्ये असतानाच चिन्यांनी भारतावर आक्रमण केले. रेडिओवरून बातम्या ऐकल्या. पंडित नेहरूंनी राष्ट्राला उद्देशून केलेले भाषण ऐकले. सर्वत्र एकच हाहाकार उडाला. या धुमश्चक्रीत आमच्या पलटणीला काय आदेश मिळतो याची वाट आम्ही पाहू लागलो. युद्धाला चांगलेच तोंड फुटले होते. घरी गेलेल्या जवानांनाही परत बोलावण्यात आले. मात्र आमच्या बॅटरीला काही सीमेवर जाण्याचे आदेश मिळाले नाहीत. यथावकाश भरपूर वित्तहानी आणि मनुष्यहानी होऊन अखेर युद्धविराम झाला. 'हिंदी-चिनी भाई-भाई' या घोषणेमुळे गाफील राहिल्याची भरपूर किंमत आम्ही मोजली. यानंतरच्या काळात अनपेक्षितपणे सेकंड लेफ्टनंट शंकर खांडेकर यांची ओळख झाली. हा एकमेव सोलापूरचा अधिकारी मला भेटला. त्यांनाही खूप आनंद झाला. या काळात खूप मजाही केली. एका विविध गुणदर्शन कार्यक्रमात सेकंड लेफ्टनंट खांडेकरांनी 'आशिक' चित्रपटातील 'तुम आज मेरे संग हँस लो' हे गाणे सादर केले होते. मेजरसाहेब आजही सोलापुरात निवृत्त जीवन जगत आहेत आणि निवृत्त सैनिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

जालंधर छावणीमध्ये असेपर्यंतच्या काळात एक फायदा असा झाला की, अनेक भाषांमधले चित्रपट पाहण्यात आले. मालीन ब्रँडोचा 'म्युटिनी ऑन द बाऊंटी' हा चित्रपट आजही आठवतो. त्यानंतर मी बराकपूरला (हे कोलकत्याचे एक उपनगरच होते) स्थलांतरित झालो. नजर ठरू नये असे गंगेचे (येथे ती हुगळी म्हणून प्रसिद्ध आहे) विशाल पात्र आणि पलीकडच्या तीरावरील श्रीरामपूर. हे श्रीरामपूर लक्षात राहण्याचे कारण म्हणजे मराठी भाषेतील पहिले मराठी पुस्तक इ. स. १८०५ मध्ये येथे छापून झाले होते. बराकपूरच्या मुक्कामात माझे मुख्य आकर्षण होते कोलकत्ता. युरोपियन शैलीत बांधलेल्या कित्येक इमारती आजही तेथे दिमाखात उभ्या आहेत. व्हिक्टोरिया मेमोरियल मधील आर्ट गॅलरी मी कधीही विसरणार नाही. या अशा अनेक वास्तूंच्या दर्शनाचा नकळत परिणाम माझ्यावर झाला असणार. मात्र बराकपूरच्या वास्तव्यातच मी स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज दिला. त्यानंतरही आमची रवानगी मथुरेस झाली आणि इथेच मला सेवामुक्तीचे प्रमाणपत्र मिळाले. मथुरेस काम विशेष नव्हतेच. मी मथुरेस भगवान श्रीकृष्णाची जन्मभूमी, औरंगजेबनिर्मित मशीद, यमुना नदी, गावातील कृष्णमंदिर, आणि कृष्णाने विश्रांती घेतलेला यमुनेकाठचा विश्रामघाट हे सगळे पाहिले. तेथील प्रख्यात पुराणवस्तू संग्रहालय देखील पाहिले. आग्रा-मथुरा जवळच आहेत. साहजिकच ताजमहलची ओढ मनात होतीच. ताजमहल, लालकिल्ला, फत्तेहपूरसिक्री शिवाय आणखीन एका वास्तूमुळे मी प्रभावित झालो. इतमत उद्दौलाचा मकबरा. पर्यटक इथे फारसे नसतात. इतमत उद्दौला मुमताजचे वडील. तुलनेने फारसे लोकप्रिय नसलेले हे ठिकाण देखील गुणवत्तेत कुठेही कमी नाही. मला अशा ठिकाणांबद्दल आकर्षण नेहमीच वाटत आले आहे. पण त्याकाळी या आकर्षणाची सुप्त-शक्ती माझ्या लक्षात आली नव्हती. आज मी आवर्जून पाहिलेली त्याकाळातील स्थळे, भेट दिलेल्या पुस्तकांची दुकाने, भाषा समजत नसलेले आणि लोकप्रिय चित्रपट, आणि भागीदारीत घेतलेला आठ फोटो निघणारा आगफा कॅमेरा या सर्वांचा कुठेतरी परस्पर संबंध असावा असे वाटते. पण अशा गोष्टींच्या खोलात फारसे शिरायचे नसते.

लष्कराचा शेर संपला आणि मी नागरी जीवनात प्रवेश केला. लष्कराने मला जी शिस्त दिली तिचा मी ऋणी आहे. खरेतर, ज्या एका शिस्तीने आणि चिकाटीने मी आज संशोधक म्हणून उभा आहे, संग्राहक म्हणून मला ओळखले जाते त्याचे एकमेव कारण म्हणजे माझी लष्कराची कारकीर्द. ४ वर्षे ५ महिने आणि १७ दिवस! म्हाताऱ्या आजी-आजोबांनी आनंद व्यक्त केलाच पण त्याचबरोबरच माझ्या लग्नाचाही विचार सुरू केला. यथावकाश तेही झाले आणि मी प्रपंचात पडलो. आणखी एक गोष्ट याच दरम्यान मी केली, ती म्हणजे तत्कालीन एसएससीची परीक्षा दिली आणि १९६६ साली मी ती उत्तीर्णही झालो. या एसएससीचा मला पुढे फायदा झाला. पण त्यावेळी मात्र मला मिळेल ती नोकरी स्वीकारणे भाग होते. लष्करी सेवेचा प्रभाव

थोडातरी होताच, परिणामी मला 'सोलापूर इलेक्ट्रीकल अंडरटेकिंग' (नंतरचे एम.एस.ई.बी.) मध्ये रोजंदारीवर नोकरी मिळाली. रोज दोन रुपये ही माझी मिळकत होती. मात्र नोकरी स्वीकारणे भाग होते. या काळात तिथे माझ्यासारखी अनेक मंडळी होती. त्यातच पुढे माझे स्नेही झालेले मोहन सोहनीही होते. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने ताबा घेतल्यानंतर आम्ही पूर्वीची मंडळी तिथे वर्ग झालो. परिस्थितीत खूप फरक पडला. एसएससी पास असल्याने पुढे मी चौकीदाराचा कारकूनही झालो. यथावकाश सेवानिवृत्त झालो. सैन्यदल आणि ही वर्षे एकत्रितपणे धरता ३८ वर्षे मी कार्यरत होतो. वीज मंडळाच्या नोकरी दरम्यान अनेक चढउतार आले. थोडाफार वाचनाचाही छंद लागला. महागडी पुस्तके विकत घेता यावीत म्हणून मी आकडेही लावले. मात्र सुदैवाने कुठल्याही वाईट सवयी फार टिकल्या नाहीत आणि त्यातील फोलपणा मला लवकरच लक्षात आला. वीज मंडळाच्या नोकरीत बढतीच्या संधी देखील आल्या परंतु मी त्या स्पर्धेत उत्तीर्ण होऊ शकलो नाही. कदाचित नियतीला ते मंजूर नसावे. एक वेगळा मार्ग सापडला होता आणि त्यातली माझी रुची वाढत होती. कोरीव लेखांचा अभ्यास आणि संशोधनाची भुरळ मला पडली होती. बढतीच्या जागांच्या जबाबदाऱ्या, परीक्षा याकडे मी दुर्लक्ष केले ते यामुळेच. आज मला जाणवते की त्या स्पर्धेत मी पडलो असतो तर या संशोधनाचा नाद मला लागला नसता. त्यामुळेच जे मी गमावले त्याची खंत मला कधीच वाटली नाही.

इकडे काही कौटुंबिक घटनाही घडत होत्या. माझ्या आजीचे आणि माझ्या पत्नीचे न जमणे, माझ्या सावत्र आईचे वागणे, स्थावर मालमत्तेचे काही कलह आणि मैंदर्गीहून परत येऊन पुन्हा सोलापुरात येऊन विभक्त घर करणे या घटना त्रासदायक होत्या. खूप मानसिक आणि शारीरिक त्रास झाला. त्याची साद्यंत हकिकत विस्तारभयास्तव इथे सांगत नाही. मात्र एक खरे की आपल्या वैयक्तिक आवडीचा, छंदाचा विचित्र संकटाच्या परिस्थितीत एक उतारा म्हणून खूप लाभ होतो. सुप्रसिद्ध हिराचंद नेमचंद वाचनालयाचा सभासद झालो होतो पण वाचनाला काही दिशा नव्हती, ती दिशा अशाच एका योगायोगामुळे अचानक मिळाली. विदर्भ संशोधन मंडळ नागपूर या संस्थेची वार्षिके मिळाली. त्यातील लेख वाचताना मी एक अद्‌भुत अनुभव घेत होतो. प्राचीन मंदिरे, शिलालेख, ताम्रपट यांच्या त्या अभ्यासपूर्ण लेखातून मला एक नवा मार्ग सापडला. आणि त्याचबरोबर एक गुरूदेखील. ते म्हणजे म.म. वा. वि. मिराशी. त्यांच्या लेखांना तोड नाही. नवीन साधने उजेडात कशी येऊ शकतात, याचा उत्तम वस्तुपाठ असणारे हे लेख मला बेचैन करणारे होते आणि आपल्याला असे काही करता येईल का या विचाराने मनाचा ताबा घेतला. माझा कलही, विशेषत: कोरीव लेखांकडे होता. या विद्येला पुराभिलेख विद्या (Epigraphy) असे म्हणतात. आणि त्यासाठी प्राचीन अथवा मध्ययुगीन लिपीचा अभ्यास हवा. नवीन उपलब्ध साधने आणि तत्कालीन इतिहास याची सांगड घालता आली पाहिजे. त्यामुळे इतिहासात नेमकी कोणती भर पडली हे वाचकाला आणि एकंदरीत सर्वांनाच पटवून देता आले पाहिजे...

आता हे सगळे जरी खरे असले, इच्छाही दुर्दम्य असली तरी या सर्वांशी माझा संबंध काय? माझी शैक्षणिक पात्रता काय? इतिहासाच्या अभ्यासाचे आणि मुख्य म्हणजे प्राचीन लिपी वाचनाचे कूट मी कसा उलगडणार? हे सगळे प्रश्न मनात होतेच. 'आतला आवाज' प्रमाण मानून मी वाचन सुरू ठेवले परंतु मार्गदर्शन कोण करणार, नेमकी सुरुवात कुठे करावी? त्याला लागणारी जुजबी साधने कुठली याबद्दलही मी अनभिज्ञ होतो. वा. वि. मिराशी यांच्या बरोबर मी पत्रव्यवहार मात्र सुरू केला होता आणि त्यातूनच आणखी एक नाव समोर आले ग. ह. तथा तात्यासाहेब खरे.

... दरम्यान या सगळ्या गोष्टींसाठी लागणाऱ्या तांत्रिक बाबींचीही मी ओळख करून घेतली. कोरीव लेखाचा ठसा घ्यायचा म्हणजे त्याची काही साधने असतात. दुकानात गेले आणि आणले असे या बाबतीत घडत नाही. ती माहिती घेऊन कानपूरच्या ब्रशवेअर कंपनीकडे मी माझी मागणी नोंदवली. ठसा घ्यावयाचा कसा हे एक प्रकारचे हस्तलाघव आहे. दरम्यानच्या काळात पुस्तके आणि श्री. ग. ह. खरे यांची पत्रे या आधारे वाटचाल चालू ठेवली. आज मला आश्चर्य वाटते आणि तुम्हाला खरेही वाटणार नाही, पण दर रविवारी मी शिदोरी बांधून सायकलवरून सोलापूर परिसरातील मंदिरे, त्यांचे पडके अवशेष, स्मशानभूमी इत्यादींचा शोध घेत हिंडत राहिलो. माझ्या या भटकंतीत मी ४००-५०० गावे पालथी घातली. घरचे अन्न खाऊन एका पैशाचेही उत्पन्न नसलेला हा अंगदुखीचा उपद्व्याप करायला मला कुणीही सांगितले नव्हते. ती केवळ अंत:प्रेरणा होती. आणि माझा ठाम विश्वास असलेली नियती माझ्या मागे होती.

माझ्या या भटकंतीत मला बरेच शिलालेख दिसले ते सगळे बेवारस, इतस्तत: पडलेले, असेच होते. विहिरीच्या मोटेचे पाणी जिथे पडते तिथे अनेक ठिकाणी ते वापरले होते तर काही ठिकाणी ते भिंतीत चिणलेलेही सापडले. अंधश्रद्धेमुळे काही ठिकाणी दूध, तेल, खसखस यांनी माखलेले आणि त्यामुळे मातीच्या पुटाखाली अदृश्य झाले होते. हे अज्ञान, अंधश्रद्धा, आणि अनास्था मला आजही बेचैन करते. किती ठिकाणी इतिहास-पुरुष आपली कहाणी सांगण्यास उत्सुक असेल आणि मानवी अत्याचाराखाली दबलेला असेल या कल्पनेने खूप वाईट वाटते. माझ्या या शोधयात्रेत मला १५० लेख तरी मिळाले. मात्र हळूहळू गावकऱ्यांना माझे काम समजत होते. काहींनी मदतीचा हातही पुढे केला. माझी ही शोधयात्रा मी सोलापूर जिल्ह्यापुरतीच मर्यादित ठेवली होती. परंतु त्यातही भंडारकवठे येथील भूमिगत गटारीच्या कामावेळी मिळालेला शिलालेख आणि माळकवठ्याचा लेख महत्त्वाचा आहे. माळकवठ्याचा हा लेख मजुरांनी रस्त्याच्या कडेला पुन्हा रोवून टाकला. मात्र पुढे त्यातून आलेली माहिति खूप महत्त्वाची ठरली. या १५० शिलालेखांच्या अनेक आठवणी माझ्या मनात कायमच्या वस्तीला आहेत.

कानपूरहून ठसे घेण्याची सामग्री मी मागवली होतीच आता तिचे प्रात्यक्षिक करावयाचे होते. केवळ सरावानेच जमणारे हे कौशल्य होते. त्यामुळे सुरुवातीचे काही प्रयत्न फसले. ठसे नीट आले नाहीत. इथे पुन्हा ग. ह. खरे मदतीला आले. पूर्व परवानगी मिळवून मी पुण्यात त्यांना भेटलो. ते म्हणाले की, 'तुमची कुठे चूक होते आहे ते कळत नाही, पण वस्तुसंग्रहालयातील एका शिलालेखाचा ठसा मी तुमच्या समक्ष घेतो, तुम्ही निरीक्षण करा.'' तिथे मी खऱ्यांसारखा प्रयत्न केला आणि तो बऱ्यापैकी यशस्वी झाला.परत आलो आणि हिंडत राहिलो. अनेक ठसे घेतले. अशा या भ्रमंतींत माझ्याबरोबर कोणीही नव्हते. मात्र हत्तरसंग कुडलला भेट देताना माझ्यासोबत श्री मोहन सोहनी होते. अर्थातच् दोघेही सायकलवर. भीमा आणि सीना नदीच्या संगमावर हे संगमेश्वराचे मंदिर बांधले गेले आहे. संगमेश्वर मंदिराच्या पूर्वेस, सखल भागात शिल्पकलेने नटलेले चालुक्य शैलीतील आणखी एक मंदिर आहे ते वेणूगोपाल स्वामीस समर्पित आहे. मंदिराच्या मुखमंडपात छतावर श्रीकृष्ण गोपिका लीला शिल्पे कोरलेली आहेत. श्रीकृष्णाच्या जीवनातील घटनांची शिल्पे इतस्तत: विखुरलेली दिसतात. माझी कुडलची शोधयात्रा स्मरणीय झाली ती सापडलेल्या पाच लेखांमुळे त्यापैकी एक लेख मराठी भाषा आणि महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. नागरी लिपीच्या अवलोकनानंतर समजले की, त्याचा सुरुवातीचा भाग संस्कृतमध्ये असून नंतरची अर्धी ओळ शुद्ध मराठीत आहे. त्यात काळाचा उल्लेखही स्पष्टपणे आलेला आहे. 'वाछि तो विजेया होईवा' हा मराठी मजकूर वाचून मी स्तिमित झालो. हा माझा अपूर्व शोध होता. श्रवणबेळगोळ आणि दिवे आगार येथील लेखांबद्दल संशोधक इतिहासकारांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. मात्र त्या तपशीलात मी इथे जात नाही. पुणे विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख श्री. शं. गो. तुळपुळे यानीही महाराष्ट्र पालथा घातला आणि त्यावर खूप खलही झाले. माझ्या संशोधनामुळे या चर्चेस आणखीच उत्तेजना मिळाली. 'मराठी प्राचीन वाङ्मयांचा इतिहास' या ग्रंथात त्यांनी अखेर कुडलच्या शिलालेखाच्या आद्यत्वाविषयी पुनरुच्चार केला आहे. काही संशोधक मंडळीनी हे श्रेय मला मिळू नये म्हणूनही प्रयत्न केला परंतु तो अप्रिय उल्लेख मी येथे मुद्दाम टाळतो. माझ्या या शोधाची चर्चा सगळीकडे झाली हे मात्र खरे.

या कुडल-प्रसंगाचे हे दिवस खूप छान होते. श्रेयाच्या स्पर्धेत मी फारसा नव्हतो. बड्या मंडळींचा दबदबा आणि त्यांच्याकडे उपलब्ध असलेली प्रसिद्धीयंत्रणा माझ्याकडे नव्हती. अर्थात् या इतक्या वर्षानंतर आणखी एक इच्छा मात्र मनात आहे. महाराष्ट्र शासनाने या मराठी आद्य वाक्याचा उपयोग साक्षरता प्रसारासाठी करण्यास काय हरकत आहे? 'योगक्षेमं वहाम्यहम्' हा जसा आयुर्विम्याचा लोगो आहे तसा? 'वाछि तो विजेया होईवा' म्हणजे वाचणारा विजयी होईल. इतर अनेक लोकप्रिय वाक्यांपेक्षा हे वाक्य सरस वाटते. शिवाय त्याचे एक वेगळे महत्त्व आहेच. इसवी सन २०१८ साली, कुडलच्या या लेखाची सहस्राब्दी येत आहे. शासन पातळीवरही ती उत्साहाने साजरी व्हावी असे वाटते. महाराष्ट्रातील साहित्यसंस्थांनी या बाबतीत पुढाकार घेऊन शासनास हे करण्यास भाग पाडावे. नुसती वार्षिक जत्रा भरवून मराठीच्या नावे टिपे गाळण्यापेक्षा 'कुडल' ची स्मृती चिरंतन टिकेल यासाठी प्रयत्न केला गेला पाहिजे. असा ठसे घेण्याची आता मला चांगली सवय झाली होती. मी निरनिराळ्या शिलालेखांचे ठसे घेऊन त्या संबंधी लेख लिहून विविध नियतकालिकांना पाठवू लागलो. नवभारत (वाई), भारतीय इतिहास आणि संस्कृती (मुंबई), युगवाणी (नागपूर), महाराष्ट्र साहित्य पत्रिका (पुणे), पंचधारा (हैद्राबाद), अनुबंध (गुलबर्गा)


इत्यादी प्रतिष्ठित नियतकालिकांतून हे लेख प्रसिद्ध होत गेले.


अनेक शिलालेख अर्थातच कन्नड होते. आता हे ठसे वाचणार कोण असा प्रश्न निर्माण झाला. त्याचा शोध घेताना माझा परिचय श्री शंकरराव मूगी यांच्याशी झाला. ते कन्नड शरण साहित्याच्या सुप्रसिद्ध अभ्यासक जयदेवाताई लिगाडे यांचे जावई होत. अत्यंत सुसंस्कृत, सभ्य आणि विद्वान गृहस्थ. त्यांनी उगीच शोध घेऊ नका आणि सरळ धारवाड विद्यापीठात डॉ. एम. एम कलबुर्गी यांना भेटण्यास सांगितले. मी थेट डॉ. कलबुर्गींना भेटण्यासाठी कन्नड शिलालेखांचे ठसे घेऊन धारवाड येथे गेलो. त्यांनी मला डॉ. श्रीनिवास रित्तींकडे पाठवले. डॉ. रित्ती प्राचीन भारतीय इतिहास आणि पुराभिलेख विभागाचे प्रमुख होते. डॉ. रित्ती एक मोठा विद्वान माणूस होता आणि ते खूप व्यस्तही होते. पण त्यांनी सर्व कन्नड लेख वाचले. याच काळात कर्नाटकातील आणखी एक श्रेष्ठ आणि ज्येष्ठ अभ्यासक पांडुरंगराव देसाई यांची ओळख झाली. त्यांनी माझ्या संशोधनाचे महत्त्व अधोरेखित केले आणि काम चालू ठेवा, अडीअडचणींना आम्ही आहोत असा दिलासाही दिला. डॉ. देसाई रित्तींचे गुरू होते. आता मी योग्य वर्तुळात आहे याची मला जाणीव झाली आणि माझे कामही झपाट्याने होऊ लागले. आता कारणपरत्वे माझ्या धारवाड फेऱ्याही सुरू झाल्या. प्रत्येकवेळी मानसिक समाधान मिळतच गेले. डॉ. रित्तींच्या म्हणण्यानुसार पुस्तक काढणे गरजेचे होते, पण आर्थिक कारणांमुळे ते मला शक्य नव्हते. डॉ. रित्ती म्हणाले, बघू काही तरी मार्ग निघेल आणि खरेच डॉ. रित्तींनी मार्ग काढलाच- स्वत:च त्या पुस्तकाचे प्रकाशन करावयाचे त्यांनी ठरवले. १९८८ साली एपिग्राफिकल सोसायटीचे अधिवेशन आंध्र प्रदेशात अनंतपूर येथे कृष्णदेवराय विद्यापीठाने आयोजित केले होते. या आधिवेशनात पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन झाले. व्यासपीठावरून माझे नाव पुकारण्यात आले आणि टाळ्याच्या गजरात मी व्यासपीठावर गेलो. कसलेही औपचारिक शिक्षण नसताना, कसलीही पदवी किंवा पार्श्वभूमी नसताना हे कसले दान माझ्या पदरी पडते आहे? 'इन्स्क्रीप्शनस फ्रॉम सोलापूर डिस्ट्रिक्ट' असे या पुस्तकाचे शीर्षक होते. डॉ. रित्तींनी खूप परिश्रमाने त्याचे संपादन केले होते. २०२ पृष्ठांच्या या पुस्तकात एक नकाशा आणि १३ प्लेट्स होत्या. डॉ. जी. एस. गायी (सुविख्यात पुराभिलेखतज्ज्ञ) यांची या पुस्तकाला प्रस्तावना होती. संबंधित क्षेत्रामध्ये, या पुस्तकाचे देशात आणि विदेशातही उत्तम स्वागत झाले. टोकियो विद्यापीठात (जपान) आणि हायडेलबर्ग विद्यापीठात (जर्मनी) या पुस्तकाच्या प्रती गेल्या.

कोण कुठले डॉ. रित्ती, कोण कुठला आनंद कुंभार, एकत्र येतात कसे आणि पदरचे २०-२५ हजार खर्च करून डॉ. रित्ती ते पुस्तक काढतात काय... सगळेच आचंबित करणारे! याचे महत्त्व अभ्यासकांना नक्कीच आहे. १९८८ साली शिलालेख आणि अशा विषयावर आधारित माझे 'संशोधन तरंग' हे पुस्तकही प्रकाशित झाले. या पुस्तकासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान लाभले होते. इतके सगळे होऊनही मी माझ्या पद्धतीनेच काम करीत होतो. मी कधीच प्रस्थापित किंवा बनचुका झालो नाही. त्याचे सगळे श्रेय मी माझ्या संपर्कात आलेल्या या सगळ्या विद्वानांना देतो. मुळात कुठले वलय निर्माण होईल असे हे क्षेत्रच नाही, पण तरीही मी माझ्या अल्प कुवतीनुसार जे करू शकलो त्याचा मला आनंद नक्कीच आहे.

माझ्या सारख्या पूर्व इतिहास नसलेल्या माणसाला या विद्येचे आकर्षण का निर्माण झाले आणि जमले कसे हा प्रश्न आज देखील मला पडतो. पण त्याला उत्तर नाही हे मला माहिती आहे.कोरीव लेखाच्या संदर्भात  एक गोष्ट मात्र खरी आहे की अशा लेखातली भाषा, लिपी कुठलीही असो, ती त्या काळातील सामान्य शिक्षितांना कळेल अशीच असते. कालमानानुसार भाषेत किंवा लिपीच्या वळणात फरक पडतो त्यामुळे उकल करण्यास कठीण भासते. मध्ययुगीन मराठी देवनागरी वाचताना तत्कालीन मुळाक्षरांची ओळख, वळणाच्या लकबी याविषयी ज्ञान हवे.काम तसे हे कठीण असले तरी सरावाने जमते हा माझा अनुभव आहे.  मला हे कसे जमले याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न आता मी करीत नाही. आता मात्र या संबंधाने काही पुस्तके, तक्ते उपलब्ध आहेत.

माझे स्वत:चे काम असणारे लेख, ऐतिहासिक माहिती प्रथमच उजेडात येऊनही त्याचा एकत्रित संग्रह नाही याची खंत मला होतीच. प्रस्थापितांच्या जगात हे किती अवघड आहे याचा अनुभवही मी घेतला. प्रकाशकांना यात स्वारस्य असण्याचे काहीच कारण नव्हते कारण त्यातून व्यावहारिक गणित सुटण्याची शक्यता नव्हती. याच सुमारास महाराष्ट्र शासनाच्या साहित्य संस्कृती मंडळाचा सुगावा मला लागला. पण तीही वाट दुस्तरच होती. मोठ्या कष्टाने मी मुद्रणप्रत तयार करून पाठविली.  परंतु ती अयोग्य ठरवली गेली. मला अर्थातच् खूप वाईट वाटलं. अशाच विमनस्क अवस्थेत मला हिराचंद नेमचंद वाचनायलाचे अध्यक्ष श्री. श्रीराम पुजारी भेटले. त्यांनी माझी कर्मकहाणी ऐकून




घेऊन मला दिलासा दिला. पुजारी सरांनी मला पुण्याच्या श्रीविद्या प्रकाशनाच्या कुलकर्ण्यांकडे पाठवले आणि त्यांच्यासाठी एक पत्रही दिले. मी प्रथम अनुदानाचे विभागीय कार्यालय गाठले आणि माझे हस्तलिखित ताब्यात घेतले. 'संशोधन तरंग' असे स्पष्ट शीर्षक असतानाही मंडळाने त्याचे 'ललित वाङ्मय' करून टाकले होते. काय बोलणार? जे काय समजायचे ते समजून मी बाड ताब्यात घेतले आणि श्रीविद्या प्रकाशनाकडे गेलो. तिथेही मला वाटाण्याच्या अक्षताच मिळाल्या– फक्त पद्धत निराळी होती. मग मात्र मी माझे स्नेही आणि दैवत–विज्ञानाची पायवाट रुळवणारे अभ्यासक श्री. रा. चिं. ढेरे यांना भेटून पुन्हा परतीच्या वाटेवर आलो.

एक प्रयत्न पूर्ण अयशस्वी झाला असला तरी अजूनही धडपड सोडण्यासारखी परिस्थिती नव्हती. अशातच प्रख्यात साहित्यिक प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुखांचा मार्ग मला दिसला. त्र्यं. वि. त्यावेळी साहित्य–संस्कृती मंडळाचे सदस्य होते पण मी आधी त्यांना काहीच सांगितले नव्हते. त्र्यं. वि. ही आदरयुक्त भीती वाटावी अशी व्यक्ती होती पण अतिशय प्रज्ञावंत साहित्यिक. कवी वि. म. कुलकर्णी यांनी माझी सरांची ओळख करून दिली. माझे लेख वाचल्याचे त्यांनी सांगितले तेव्हा तर मी उडालोच. अखेर पुन्हा एका भेटीत मी त्यांना साहित्य संस्कृती मंडळाचा अनुभव सांगितला. त्र्यं. विं. नी माझ्यासाठी आवर्जून जे केले त्याचा उल्लेख मला केलाच पाहिजे. त्र्यं विं. नी मला मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष सुरेंद्र बारलिंगे यांच्याकडे पाठवले आणि नंतरच्या एका बैठकीत श्री बारलिंगेंना माझ्या पुस्तकाचे महत्त्वही विशद केले. आता माझा मार्ग सुकर झाला होता. प्रकाशक वगैरे सोपस्कार संपून अखेर पुस्तक प्रकाशित होणार हे स्पष्ट झाले. त्याची प्रस्तावना रा. चिं. ढेरे यांनी लिहिण्याचे मान्य केले होते. परंतु त्यांना वेळ मिळू शकला नाही. अखेर मीच 'मनोगत' लिहिले. 'ज्ञात आणि अज्ञात अशा भारतीय कोरीव लेखांच्या कोरक्यांना समर्पण' अशी अर्पणपत्रिका लिहून दिली. पुस्तक सिद्ध झाले. त्याचे श्रेय मी आजही श्री. त्र्यं. वि. सरदेशमुख सरांनाच देतो.

आज माझी जी काही ओळख आहे –ज्या कार्याशी आणि संस्थांशी मी जोडला गेलो आहे त्यामुळे या खऱ्या अर्थाने थोर मंडळींची ओळख ही माझ्या आयुष्यातील फार मोठी जमेची बाजू आहे. आदरणीय श्रीराम पुजारी ही अशीच एक थोर व्यक्ती. दांडगा जनसंपर्क आणि निर्भीड स्पष्टवक्तेपणा ही त्यांची वैशिष्ट्ये होती. हिराचंद नेमचंद वाचनालय या संस्थेशी मी अनेक वर्षे निगडित आहे ते पुजारी सरांमुळेच. प्रत्यक्ष निवडणुकीत मी एका मताने पराभूत झालो तरीही सरांनी मला स्वीकृत सदस्य म्हणून घेतले तेव्हापासून मी वाचनालयाशी संबंधित आहे. त्यामुळे माझ्या वाचनात आणि वाचनप्रवृत्तीत खूप बदल झाले हे खूप

महत्त्वाचे. त्या सुमारास माझ्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ देखील सरांनी घडवून आणला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले आणि प्रमुख वक्ते होते डॉ. नी. त्र्यं. पुंडे! माझ्यासारख्या 'एकला चलो रे' वृत्तीच्या माणसासाठी तो परम भाग्याचा दिवस होता.

त्र्यं. वि. सरदेशमुखांच्या संदर्भात आणखी एक ऋण मला व्यक्त करावयाचे आहे. माझ्या पुस्तकाची शिफारस साहित्य अकादमीसाठी झाल्याची बातमी मला श्री चंद्रशेखर कपाळे यांनी दिली होती. पहिल्या फेरीत हे पुस्तक पुढे सरकले आहे, प्रयत्न केले तर काम होऊन जाईल अशी स्थिती होती. साहित्य अकादमीने नोंद घ्यावी हा एक फारच मोठा बहुमान ठरणार होता. सरदेशमुख सर अकादमीवर असल्यामुळे त्यांच्याकडे शब्द टाकावा असेही कपाळे यांनी सुचवले. पण हे काम फारच अवघड होते. माझे स्नेही 'जिव्हाळा'चे श्री. अण्णासाहेब राजमाने त्यामानाने खूप धाडसी होते. त्यांनीही सरांकडे शब्द टाकला. सरांनी आठ दिवस विचार करून माझ्यासाठी स्वत:चे 'मत' दिले. पुढे काय झाले हा मुद्दा वेगळा, पण सरांनी विचारपूर्वक दिलेले मत (आणि अर्थातच एक सुप्त उत्तेजन) खूप मोलाचे होते. या सर्व घटनांचे आज फक्त दोन साक्षीदार-एक मी आणि दुसरे अण्णासाहेब राजमाने. ही गोष्ट मी आज प्रथमच जाहीररित्या सांगत आहे अर्थातच श्री सरदेशमुखांच्या मोठेपणाबद्दल व्यक्त केलेला हा आदरभाव आहे.

'संशोधन तरंग' ला पुढे साहित्य पुरस्कार मिळाला. साहित्य संस्कृती मंडळाने स्व. यशवंतराव चव्हाण यांचे नावे अनेक वर्गवारीत पुरस्कार घोषित केले होते. वैचारिक साहित्यासाठी मला मिळालेला पुरस्कार म्हणजे माझ्या श्रमाची पावती होती. महाराष्ट्रातील सर्व मराठी इंग्रजी, हिंदी वृत्तपत्रांतून ही बातमी झळकली होती. साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेसह अनेकांनी सत्कार केले... कौतुक केले. एका नाकारल्या गेलेल्या पुस्तकाचा हा सन्मान पाहून मला फक्त माझी एकट्याची भटकंती आठवत होती.

सर्व संग्रहाचा नाश होतो असे म्हणणे बरोबर होणार नाही. संग्राहक थकू शकतो. वयाप्रमाणे मर्यादा येतात हे खरे. इतरही काही अडचणी असतात. पण हे ओळखून संग्रहाला नवी वाट दाखवायला हवी. काही वेळा संग्राहक हे करीत नाहीत आणि त्यांच्या मागे काही उरत नाही. साहजिकच त्यांच्या पुढच्या पिढीस त्याची मातब्बरी नसते त्यामुळे असे घडते. संग्रह प्रवाही राहण्यासाठी संग्राहकाने याचा विचार आणि तजवीज केली तर नाश होणे टळेल. शेवटी प्राक्तनाचा भागही आहेच. असो.

माझ्याकडे आज दुर्मिळ पुस्तके, नाणी, वैशिष्ट्यपूर्ण कात्रणे आणि ध्वनिफिती, चित्रफिती यांचा मोठा संग्रह आहे. मूलत: माझा अभ्यासाचा विषय आणि संग्रहाचे हे वैविध्य यांत वरवर पाहता विरोधाभास वाटेल पण त्यातले सूत्र समानच आहे. काळाच्या ओघात शेकडो गोष्टी बदलत जातात पण त्यांचा म्हणून एक काळ असतो. त्याच्याशी संवाद असणे ही गोष्ट मला महत्त्वाची वाटते. शिवकालीन नाणी असोत, प्रिंटिंग तंत्राचा सुरुवातीचा काळ सांगणारे पुस्तक असो किंवा शंकास्पद असणारा पण लताबाईंचा म्हणून समजला जाणारा आवाज असो- कुठल्यातरी 'वास्तवा'ची आठवण देत असतात, 'सत्याचे' दर्शन देत असतात. हे खरे आहे की काही छंदांना (अनेक कारणांमुळे) पंचतारांकित महत्त्व आले आहे. उदा. तिकिट संग्राहकाची आंतरराष्ट्रीय संघटना आहे पण कात्रणाच्या संग्रहाला मात्र तशी मान्यता नाही. माझ्या छंदात मला अनेक घटना दिसल्या. त्यामुळे त्या त्या पुस्तकाचे मूल्य प्रचंड वाढले आहे. मूल्य म्हणजे विक्रीची किंमत नव्हे- तर त्या पुस्तकाचे, घटनेचे वजन.

माझ्या या विविध प्रकारच्या संग्रहांमध्ये पुस्तकांचा संग्रह मला खूप महत्त्वाचा वाटतो. कारण त्याचे संग्रह- मूल्य तर आहेच. त्याचे आणखीही वेगळ्या प्रकारचे महत्त्व आहे. नेमकेपणाने एक उदाहरण द्यावयाचे तर एक पुस्तक असे आहे की ज्यावर ते पुस्तक सुप्रसिद्ध साहित्यिक कादंबरीकार ग. त्र्यं. माडखोलकरांनी कम्युनिस्ट नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगेना भेट दिल्याचा उल्लेख आहे. मला केवळ ती दृष्टी असल्यामुळे नव्हे तर या दोन्ही विभूतींबद्दलची माहिती असणे हे महत्त्वाचे. त्या दोघांचा हस्त-स्पर्श झालेले हे पुस्तक माझ्याकडे असावे ही श्रीमंती मला महत्त्वाची वाटते. या संग्रहातून काहींच्या स्वाक्षऱ्या असणारी पुस्तकेही मला महत्त्वाची वाटतात. लोकमान्य टिळकांचे राजकीय गुरू श्री छत्रे, पृथ्वीराजकपूर, सोपानदेव चौधरी, माधव ज्युलियन यांच्या त्या त्या पुस्तकावरील सह्या या काही सांगू पाहतात असे मला नेहमीच वाटते. पुस्तकांचा संग्रह करावा असे मला का वाटले याचेही एक कारण आहे आणि त्यामागे एक घटना आहे...

१८६७ मध्ये पुस्तक नोंदणीचा कायदा झाला आणि त्यानुसार त्याचे तपशील मिळतात, हे ज्या वेळी मला कळले त्यावेळी साहजिकच माझ्यापुढे एक नवे प्रश्नचिन्ह उभे राहिले. मराठीतले पहिले पुस्तक तर १८०५ मध्ये निघाले मग १८०५ ते

१८६७ या काळातल्या पुस्तकांचे काय? त्यांच्या नोंदी झाल्या नाही तर ती पूर्णपणे नामशेष होतील. हा दोलामुद्रित छपाईचा कालखंड हे एक आव्हान होते. सर्वात विशेष म्हणजे याच काळाची ( १८०५ ते १८५०) नोंद घेण्याचा प्रयत्न दाते ग्रंथ सूची मार्फत झाला आणि माझा संग्रह देखील आकाराला येत होता. सगळी पुस्तके आल्याचा दावा तर दातेही करीत नव्हते. आज सांगण्यास हरकत नाही पण, जवळजवळ २०० ते २५० पुस्तके मला मिळाली. महाराष्ट्र राज्य विकास मंडळाच्या सचिवपदी डॉ. सरोजिनी वैद्य यांनी ' दाते ग्रंथ सूची' नव्याने काढली त्यावेळी माझ्या संग्रहातील पुस्तकांची नोंद श्रेयासह केली गेली. मराठी साहित्य विश्वाच्या- संशोधन साहित्यात माझ्या संग्रहामुळे मोलाची भर पडली याचा मला आनंद आहे. ही पुस्तके पुढे मी पुणे विद्यापीठास दिली आणि एका स्वतंत्र कपाटात ती अभ्यासकांसाठी उपलब्ध आहेत.

आजही माझ्या घरी जो संग्रह आहे त्यात बहुमूल्य पुस्तके आहेत. त्यात विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमाला आहेत, विजापूरकर 'ग्रंथमाला' नावाचे नियतकालिक काढत. त्याचे अंक माझ्या संग्रही आहेत. त्यातील अनेक मासिकांत राजवाडेंचे लेख असत. श्रीधर व्यंकटेश केतकरांच्या 'विद्यासेवक'चे अंक तसेच वाईहून निघणाऱ्या 'नवभारत' चे सर्व अंक माझ्या संग्रही आहेत. हे सगळे छंदांचे प्रकार ही वैयक्तिक इच्छा असते. त्यासाठी कुठलीही बाहेरची शक्ती कार्यरत नसते. त्यापायी मी खूप पैसेही खर्च केले आहेत. या निमित्त बरीवाईट माणसेही मला भेटली. पैशाव्यतिरिक्त किंमतही मी त्यासाठी मोजली आहे. काही अनुभव सांगण्यासारखे आहेत. ते शेवटी मी सांगणारच आहे. पण त्याआधी नाण्यांच्या संग्रहाचे विश्व सांगणेही महत्त्वाचे आहे.

छांदिष्ट मंडळी मध्ये देखील एक स्पर्धा असतेच. आणि ही स्पर्धा ज्यावेळी नाण्यांच्या छंदासारखी महागडी असते त्यावेळी त्याचे स्वरूप खूप विक्राळही होऊ शकते. विक्राळ या अर्थाने की, संग्रहमूल्य, त्याचे ऐतिहासिक महत्त्व यापेक्षाही मालकी हक्काची भावना अधिक तीव्र होते. त्यावेळी सगळीच बाब चिंतेची होते. नेमके महत्त्वाचे काय याबद्दल काही जाणवेनासे होते. आता नाणकशास्त्र हा नुसता जमवण्याचा छंद नाही तर इतिहासाची जाणकारी आणि आस्था दोन्ही या क्षेत्रासाठी आवश्यक आहेत. पण नाणकशास्त्रामध्ये आता व्यावसायिकता शिरलेली आहे. फिलॅटिक सोसायटीसारखी नूमॅस्मॅटिक (Numasmatic) सोसायटी देखील कार्यरत आहे.

छंद जपणाऱ्यांमध्ये, संग्रह करणाऱ्यांमध्ये स्पर्धा नसावी अन्यथा वैयक्तिक ईर्षेपोटी अनिष्ट गोष्टी सुरू होतात. सोलापुरात मी, पाटील आणि श्री. किशोर चंडक यांनी नाण्यांच्या संदर्भात एक धोरण ठरवले होते. पाटील हे आदिलशाही नाणी जमा करीत, मी क्षत्रिय राजवंशाची आणि चंडक मुगल परंपरेतील. त्यामुळे तिघांनी एकत्र येऊन एक सामंजस्य स्वीकारले होते - हे घडले पाहिजे. या विरुद्ध एक घटना सांगतो. दोन तिकीट संग्राहकांच्या अयोग्य दृष्टिकोनाची. दोघांजवळ एकाच प्रकारचे तिकीट होते. पण दुसऱ्याजवळ ते आहे हे सहन झाले नाही म्हणून अवाच्या सवा किंमत देऊन ते जाळले. ''आता एकच तिकीट आहे आणि ते माझ्याच जवळ आहे'' ही मालकीहक्काची, स्वामित्वाची भावना उद्धट तर आहेच, शिवाय संग्रहाच्या विस्तारासाठी मारक आहे. अशा काही विषण्ण करणाऱ्या घटना आहेत. एखादा नवीन मिंट सापडला तर त्यामागे नवा राजवंश असण्याची शक्यता असते. सोलापुरात एक मिंट होती आणि औरंगजेबची चांदी-तांब्याची नाणी त्यात पाडली गेली होती हे आपल्याला ठाऊकही नसते. अनेक बडी मंडळी आता या क्षेत्रात आहेत. त्यांच्या परिषदा होतात, हे सगळे चांगलेच आहे. पण व्यावसायिकता खूप आलेली आहे. प्रत्येकवेळी मी सहभाग नोंदवतो असे नाही पण माझ्या संग्रहात आजही नाणी मात्र आहेत.....

चित्रपट आणि चित्रपट संगीत हा सुरुवातीपासून माझा जिव्हाळ्याचा विषय होता आणि आहे. रेडिओ सिलोन ऐकताना वाटायचे की हे गाणे पुन्हा कधी ऐकायला मिळणार? त्यातूनच सिलोनवरील कार्यक्रम टेप करण्यास सुरुवात झाली. विविध संगीतकारांचे वेगळेपण, चाली यांचे एक अद्‌भुत सादरीकरण रेडिओ सिलोनच्या विविध कार्यक्रमांतून व्हायचे. आज ७००-८०० ध्वनिफिती माझ्या संग्रहात आहेत. त्यात इतर कुठेही पुन्हा न आलेली शेकडो गाणी आहेत. चित्रपट व्यवसाय आपल्याकडे प्रामुख्याने मनोरंजनासाठी आहे. पण हल्ली तो पूर्वीसारखा स्वस्त राहिला नाही. एक आणा देऊन चित्रपट पाहणे हा इतिहास सोलापुरातलाच आहे हे खरे वाटत नाही. काही काळ मी ध्वनिमुद्रिकाही साठवल्या, पण पुढे जागा आणि पैसे यामुळे ध्वनिफिती मला जास्त सुलभ वाटत गेल्या... हा संग्रह अभ्यासकांसाठी उपयुक्त होऊ शकेल, पण त्यात मी अनवधानाने एक चूक केली आहे. गाणी ध्वनिमुद्रित करण्याच्या घाईगर्दीत मी उद्‌घोषकाचा आवाज बाजूला ठेवला. परिणामी दुर्मिळ अशा

गाण्यांचा तपशील नाही. तो आता हुडकणे क्रमप्राप्त आहे. अशाच या गोंधळात प्रत्यक्ष लता मंगेशकरांचे एक वादग्रस्त गाणे आहे. म्हणजे खरे ते लताबाईंचे नाही. आता हे गाणे महत्त्वाचे आहे की नाही? कारण ते ध्वनिमुद्रित गीत ऐकण्यासाठी उपलब्ध असणे हीच एक त्याची कसोटी आहे. अजूनही मंगळवारच्या जुन्या बाजारात हिंडण्याची सवय मला आहे. तिथेही मी काहीना काही घेत असतोच. ध्वनिफितीप्रमाणेच काही चित्रपटांच्या व्हिडिओ कॅसेटस्ही माझ्याकडे आहेत.

या क्षेत्रात आज तंत्राने खूपच मोठी आघाडी घेतलेली आहे. त्या वेगाशी जुळवून घेणे अवघड आहे. पण तरीही जुन्या माध्यमातून का होईना चित्रपटसंगीताचा माझा शोध चालू आहेच.

इतक्या प्रकारचे छंद केले आहेत पण त्याच्यातून खऱ्या अर्थाने पुस्तकाच्या छंदाने इतरांवर मात केली हे मात्र खरे. तो नाद श्रेष्ठ ठरला. कदाचित वाचण्याचा छंद, हि. ने वाचनालयाशी असलेले नाते इत्यादींमुळे तो मला जवळचा वाटत असावा. आज माझ्या संग्रहातल्या पुस्तकांपैकी ज्ञानेश्वरीचे हस्तलिखित, काही अभंगांची हस्तलिखिते किंवा टिपू सुलतानचे इंग्रजी भाषेतील चरित्र (१७९९) इत्यादी पुस्तके हाताळताना मला आनंद वाटतो. एक सोलापूरकर म्हणून मी माझ्या मर्यादेत जे करू शकलो ते सगळे हे असे आहे. आज मी सत्तरीच्या उंबरठ्यावर आहे आणि संग्राहकाच्या संदर्भातले सगळे बरे-वाईट अनुभव मी घेतले आहेत. इतिहास संशोधक, शिलालेख तज्ज्ञ, नाणकशास्त्राचा अभ्यासक आणि संग्राहक अशी कुठली बिरुदं मिरवावीत म्हणून मी हे केलेले नाही. माझी जी आंतरिक प्रेरणा होती त्यामुळे आणि नियतीमुळे माझ्याकडून हे घडले. अन्यथा तशी कुठलीही पूर्वपीठिका, पार्श्वभूमी नसताना मी हे कसे करू शकलो असतो?

पां.रा. ढमढेरे (पुणे) आणि पूना बुक डेपो ही दुकाने, सोलापुरातील काही रद्दी दुकानवाले आणि असंख्य मंडळींचे चेहरे मला आठवतात. या सर्वांनी मला केवळ सहकार्य केले नाही तर भरभरून दिले. पूना बुक डेपोच्या दुकानात मी असाच एकदा ग्रंथ चाळत बसलो असताना मालकांची दुपारच्या जेवणाची वेळ झाली. ते म्हणाले, ''तुम्ही आता पुन्हा दुपारी चार नंतर या.'' त्यावेळी मी त्यांना म्हणालो, ''तुमची हरकत नसेल तर मी आतच बसतो - तुम्ही दुकान बंद करून जा - माझा वेळ वाचेल. मी बाहेरगावहून आलो आहे.....'' आज मला त्या घटनेचे हसूही येते आणि आश्चर्यही वाटते. बाहेरून बंद केलेल्या त्या दुकानात मी माझ्या वेडाचा एक अध्यायच लिहीत नव्हतो का? असे दुकानदार आता मिळणार नाहीत. नव्या पिढीला सर्व साधन सुखसोयी उपलब्ध आहेत - त्यांना हे खरेही वाटणार नाही - पण ही आपबीती आहे, कारण तो माझ्या व्यक्तिमत्त्वाचा भाग आहे.

वृत्तपत्राच्या कात्रणापासून कुलुपांपर्यंत आणि काड्याच्या पेट्या, सिगारेट पाकिटाची वेष्टणे, दुर्मिळ छायाचित्रे, खेळणी.... छंद कुठल्याही प्रकारचा असो त्याचे त्याचे एक महत्त्व आहेच असे मी मानतो. असे मुलखावेगळे छंद जोपासण्यातून कालची संस्कृती उलगडत असते..... मात्र त्यासाठी अशा छांदिष्टांची संस्था व्हायला हवी. त्यांनी एकत्र यायला हवे असे मात्र वाटते.

०००

(शब्दांकन : जयंत राळेरासकर)

आनंद कुंभार
फ्लॅट नंबर ३४, न्यू पाच्छा पेठ, अशोक चौक, दिवटे टेक्स्टाईल शेजारी
सोलापूर ४१३ ००६, भ्रमणध्वनी ९४२०८०६४८५

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !
आपल्या सिमेंट कॉंक्रिटचे स्लॅब, छत, गच्ची इ.
गळत आहे काय ?
भिंतीवर ओल येते काय ?
यावर एकच उपाय
फेअरमेट कंपनीचे
वॉटरगार्ड
लावा व निश्चिंत व्हा !
• संपर्क •
मुरली अय्यंगार • भरत अय्यंगार
नैभवा एंटरप्रायजेस
४८९ ब, साखर पेठ पोलीस चौकीसमोर,
सोलापूर फोन : २६२३८५१

# 'चाफा'चे दिवस

**शिरीष देखणे**

२६ एप्रिल १९७६ !

या दिवशी खानोलकर गेले.

ती बातमी दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांमध्ये आली, मी ती वाचली आणि मराठीतला एक फार मोठा साहित्यिक हरपला, याची चुटपूट मनाला लागली.

तोवर खानोलकरांविषयी फारशी माहितीदेखील मला नव्हती. अर्थात् याला कारण माझं तेव्हाचं वय! कॉलेजमध्ये होतो मी तेव्हा ! भालचंद्र नेमाडे, नामदेव ढसाळ, भाऊ पाध्ये, चंद्रकांत खोत, मन्या सुर्वे, दया पवार यांच्या बरोबरीने जयवंत दळवी ('सूर्यास्त' नाटकामुळे जास्त भावलेले, शिवाय 'चक्र' ही वाचली होतीच !) श्री. ना. पेंडसे, व. पु. काळे, पु. ल. देशपांडे, जी.ए. कुलकर्णी, ग्रेस, रत्नाकर मतकरी अशा अनेकांचं साहित्य वाचत होतो. नाटकाची आवड होती. छबिलदास चळवळ तेव्हा ऐन भरात होती. त्या काळात 'अवध्य' आणि 'एक शून्य बाजीराव' या नाटकांमुळे 'खानोलकर' हे नाव ओळखीचं झालं होतं. 'अजब न्याय वर्तुळाचा' हे त्यांचं नाटक विजयाबाईंनी बसवलं होतं आणि त्याच्या जर्मनीतल्या प्रयोगासाठी नाटक मंडळीबरोबर खानोलकरही गेले होते, हेही वाचनात आलं होतं. 'आरती प्रभू' या नावाने ते कविता लिहायचे, हेही माहीत होतं. पण एकूणात काय, तर खानोलकरांची ही तशी जुजबी तोंडओळख होती. पण नंतर अनेक थोरामोठ्यांचे खानोलकरांवरचे श्रद्धांजलीपर लेख वाचले आणि मग हा किती मोठा लेखक होता, हे उमजत गेलं.

मग मात्र खानोलकरांनी मला झपाटलंच ! त्यांच्या कथा, कादंबऱ्या, कविता, नाटकं – सगळं वाचण्याचा सपाटाच लावला. 'रात्र काळी, घागर काळी', 'अगोचर', 'कोंडुरा', 'भागधेय', 'पाषाणपालवी' इत्यादी कादंबऱ्यांमधील पात्रं आणि प्रसंग वाचून थरारून गेलो. या दरम्यानच 'चाफा आणि देवाची आई' या दोन दीर्घकथाही वाचल्या होत्या. त्यातली 'देवाची आई' ही तर विलक्षणच कथा होती.

मे ७८ च्या 'सत्यकथा' मध्ये जया दडकरांचा 'एका लेखकाच्या शोधात' हा लेख वाचनात आला. खानोलकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आयुष्याचा आणि त्यातून साहित्यनिर्मितीच्या प्रेरणांचा घेतलेला वेध खानोलकरांविषयी एक नवी दृष्टी देणारा होता.

१९७६–७७ मध्ये मी सोलापुरातल्या 'नाट्य आराधना' या संस्थेत जाऊ लागलो होतो. डॉ. वामन देगावकर यांच्या नेतृत्वाखाली ही संस्था प्रायोगिक नाटकांची चळवळ सोलापुरात रुजवण्याचा प्रयत्न करत होती. 'मेजर चंद्रकांत', 'शांतता ! कोर्ट चालू आहे !', 'उद्ध्वस्त धर्मशाळा' अशी नाटकं संस्थेतर्फे सादर केली जात होती. तसेच एकांकिकाही बसवल्या जायच्या. 'होळी', 'सुलतान', 'भजन', 'पोर्ट्रेट', 'आकाशात् पतितं तोयं' अशा एकांकिका आम्ही तेव्हा सादर केल्या होत्या. एकांकिका हा प्रकार लोकप्रिय होण्याचा तो काळ ! पुण्यातून 'कुलकर्णी ग्रंथागार'तर्फे 'मनोरा' नावाचं मासिक प्रसिद्ध व्हायचं, त्यात दर महिन्याला एक एकांकिका प्रकाशित व्हायची. 'नाट्य आराधना'त काम करता करता मला एकांकिका लेखनाची उर्मी आली. पहिला प्रयत्न म्हणून व.पुं.च्या 'भांडणारा जोशी' या कथेचं नाट्य रूपांतर केलं. ते संस्थेतील सर्वांनाच आवडल्याने लगेचच तिचे प्रयोग सुरू झाले. मला हुरूप आला. पुढे माझी 'ज्योति र्मा तमसोगमय' ही एकांकिका 'मनोरा'मध्ये आणि पाठोपाठ पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली.

लेखनाची अशी प्रचंड ऊर्मी असतानाच्या काळातच खानोलकरांनी मला झपाटलेलं होतं. त्यांचं साहित्य अधिक लोकांपर्यंत पोहोचवावं आणि या उपेक्षित राहिलेल्या साहित्यिकाला आपल्या परीनं प्रसिद्धी मिळवून द्यावी, अशा काहीशा भाबड्या विचाराने मी एक कार्यक्रम करायचं ठरवलं. खानोलकरांना सोलापूरच्या (कै.) त्र्यं.वि. सरदेशमुख यांच्या 'उत्तररात्र' मधल्या कविता फार आवडायच्या, असा उल्लेख वाचनात आला होता. म्हणून सरदेशमुख सरांनी सुरुवातीला त्यांच्याविषयी काही बोलावं, असं मनात आलं. मग काही कवितांचं आणि एखाद्या कथेचं वाचन करावं, असा विचार चालू असतानाच 'चाफा' कथा आठवली. ती पुन्हा वाचून काढली,



## शिरीष देखणे

**सुरुवातीच्या काळात २५-३० कथा, कविता प्रकाशित. 'स्वप्न', 'खेळ', 'अनुभव', 'पराभव', 'आई म्हणोनि कोणी' आदी १७-१८ एकांकिकांचे लेखन. काहींना राज्यस्तरीय पारितोषिके. बहुतेकांचे विविध स्पर्धांमधून विविध संस्थांकडून प्रयोग. 'चाफा', 'रेशीमगाठी', 'कृष्णपक्ष', 'त्या बकुळीच्या झाडाखाली', 'कोंडुरा' आदी १२-१३ पूर्ण लांबीची नाटके. त्यातही काहींना राज्यस्तरीय लेखन पारितोषिके. सोलापुरातल्या 'नाट्य आराधना' या संस्थेच्या नाटक, एकांकिकांना पार्श्वसंगीत, त्यातही पारितोषिके. बँक ऑफ बडोदा मध्ये कार्यरत.**

तेव्हा त्यातलं नाट्य दिसू लागलं. खुणावू लागलं. मधला निवेदनाचा भाग वगळला/संवाद रूपाने आणला आणि किरकोळ जोडकाम केलं, की एक छानशी एकांकिका तयार होईल, असं वाटून गेलं. कारण बरेचसे संवाद कथेत होतेच.

उत्साहाने दोन-चार दिवसांतच एकांकिका लिहून काढली. कार्यक्रमात तिघा-चौघांनी मिळून तिचं अभिवाचन करावं, असं ठरलं. त्यानुसार तालमीही सुरू झाल्या. खानोलकरांच्या चौथ्या पुण्यतिथीला (२६ एप्रिल, १९८०) हा कार्यक्रम करण्याचं ठरवलं.

त्यावेळी डॉ. देगावकर पुढील शिक्षणासाठी पुण्याला गेले होते. कार्यक्रमाच्या आधी ८-१० दिवस ते सुट्टी घेऊन सोलापूरला आले होते. त्यांना 'चाफा' एकांकिका वाचायला दिली. त्यांना ती खूप आवडली आणि नुसतं अभिवाचन करण्यापेक्षा आपण सरळ तिचा प्रयोगच बसवू, असं ते म्हणाले. मग आम्ही सगळेच उत्साहाने कामाला लागलो.

ठरल्याप्रमाणे २६ एप्रिलला कार्यक्रम झाला. त्र्यं. वि. सरदेशमुख मोजकंच पण छान बोलले. सुलभा पिशवीकरांनी दोन कविता गाऊन सादर केल्या. स्वत: उत्तम कवी असलेल्या हिमांशु कुलकर्णींनी काही कविता वाचून दाखवल्या. नंतर 'चाफा' एकांकिका सादर केली. गुरुराज अवधानी (विष्णू), बीना जवळगेकर (संध्या) आणि वनमाला किणीकर (काशी) यांचा अभिनय उत्तम झाला. सर्वांनाच एकांकिका खूप आवडली.

पुढे काही स्पर्धांमध्ये या एकांकिकेला बरीच बक्षिसं मिळाली. शिवाय संस्थेत येणाऱ्या पाहुण्यांना आवर्जून ती दाखवत होतो. त्यांना ती खूप आवडायची. सर्वजण त्याविषयी भरभरून चर्चा करायचे.

याच काळात डॉ. देगावकर, गुरुराज अवधानींसह अनेकांनी मला या कथेवर दोन अंकी नाटक लिहिण्याबद्दल सुचवलं. ती अतिशय अवघड कामगिरी आहे, हे मला जाणवत होतं, कारण कथेचा जीव तसा लहान होता आणि कथेचा पूर्ण गाभा एकांकिकेत व्यवस्थित आला होता. पण नाटक लिहिण्याचा विषय डोक्यात घोळत होता. कथेत काळाचे काही जर्क्स होते, काही मोकळ्या जागा होत्या. उदा. संध्याचं विष्णूच्या घरी दोन महिने वास्तव्य होतं, एखादं माणूस २-३ महिने घरी राहिलं, तर त्या दरम्यान अनेक छोट्या छोट्या घटना घडत असतात. त्यांचा उल्लेख कथेत नाही. संध्या अणि काशी यांच्यात रोज काही ना काही गप्पा होतच असणार ! शेवटी तो संध्याला भेटायला तिच्या घरी जातो, पण असा निर्णय घेण्यामागची प्रोसेस कथेत येत नाही. विष्णूलाही संध्याबद्दल आकर्षण वाटू लागणं स्वाभाविक आहे, पण तसे प्रसंग कथेत दिसत नाहीत. कथेचा नाटक म्हणून विस्तार करताना या मोकळ्या जागा भरल्या पाहिजेत, असा विचार चालू होता. याखेरीज विष्णूचं स्वत:शीच मोठमोठ्यानं बोलणं हे एका प्रकारे ॲब्नॉर्मल वागणं होतं. त्यामुळे या गोष्टीचा खुलासा नाटकात कुठेतरी यावा, असं वाटलं होतं.

या काळात पुन्हा 'कोंडुरा', 'अगोचर' आणि जया दडकरांच्या लेखाची पारायणं चालू होती. खानोलकरांच्या जीवनातले प्रसंग, कोकणातला निसर्ग, देवदेवस्की, अवलियां बाबतचं ऑब्सेशन हे सारं वाचता वाचता अचानक वाटून गेलं की, विष्णूचा (कथेत न आलेला) भूतकाळ रंगवताना खानोलकरांच्या आणि त्यांच्या साहित्यातील पात्रांच्या आयुष्यातील घटनांचा वापर चपखलपणे करता येईल !

उदाहरणार्थ, विष्णूच्या वडिलांचं परागंदा होणं ! त्या घटनेचा त्याच्या आयुष्यावर खूप खोलवर परिणाम झालेला आहे. रागाच्या भरात तो एकदा संध्याला म्हणतो, ''उद्या हे सगळं सोडून मी कुठेतरी परागंदा झालो, तर तू येणार आहेस का माझ्याबरोबर मला स्वयंपाक करून घालायला ?'' त्यावर संध्या उत्तरते, ''येईन !'' मग त्याला प्रश्न पडतो, ''पण आपण परागंदा का व्हायचं ?'' पुढे एका प्रसंगात तो म्हणतो, ''माझा बाप कुठं परागंदा झाला ? या लंगड्या पायाच्या एका मुलीला जन्म देण्याचा त्याला काय अधिकार होता ?'' म्हणजेच बापाप्रमाणे आपणही परागंदा व्हावं, असं विष्णूला वारंवार वाटतंय !

मग मला प्रश्न पडला, विष्णूच्या वडिलांना तरी परागंदा व्हावंसं का वाटलं असेल ? माणूस एक तर संसाराच्या कटकटींना वैतागून घर सोडतो, नाही तर आध्यात्मिक, पारलौकिक गोष्टींचा ध्यास घेतल्याने सोडतो. खानोलकरांच्या पात्रांचा विचार केला, तर दुसरा पर्याय जास्त सयुक्तिक वाटतो आणि मग 'कोंडुरा' मधल्या पर्शरामतात्याला ऐकू येणारा घंटानाद आठवला, त्याचं अपरात्री मठात जाणं आठवलं, खानोलकरांनी केलेलं बागलांच्या राईचं वर्णन आठवलं आणि वाटून गेलं की, कदाचित विष्णूच्या वडिलांनाही तसेच त्रास होत असतील, तेही रात्री अपरात्री मठात जात असतील, रानोमाळ भटकत असतील, ज्याची परिणती अंतिमत: त्यांच्या परागंदा होण्यात झाली असेल.

याबरोबर इतरही गोष्टी सुचू लागल्या. विष्णूच्या वडिलांनी संसार मांडला होता, बायको आणि तीन मुलं होती. देवळात, मठात जाऊन बसणाऱ्या, घरादाराची शुद्ध नसणाऱ्या आपल्या नवऱ्याच्या पोटात चार घास वेळच्या वेळी पडावेत, असं त्या माउलीला वाटत असणारच. मग त्याला शोधून आणण्यासाठी ती विष्णूलाच पिटाळत असणार. दिवसा हे काम करणं सोपं असलं तरी रात्री अवघड असणार ! मग मला हातात कंदील घेऊन, निर्मनुष्य रस्त्यांवरून, डोंगरताडीतून फिरणारा ८-९ वर्षांचा मुलगा दिसू लागला. दिवसा प्रसन्न वाटणारा निसर्ग आता त्याला भीतीदायक वाटत असणार !

त्याच्या पोटात भीतीचा प्रचंड गोळा उठत असणार ! मग ती भीती पळवण्यासाठी तो मोठमोठ्याने गाणी, स्तोत्रं म्हणत असेल आणि मग मोठ्याने स्वत:शीच बोलण्याची त्याला सवय झाली असेल ! विष्णूच्या मोठ्याने बोलण्याच्या सवयीचं हे तर्कदृष्ट्या सुसंगत स्पष्टीकरण सुचल्यावर मी स्वत:वरच खुश झालो!

जया दडकरांच्या लेखात खानोलकरांच्या घराण्याला निवतीच्या स्वामींनी दिलेल्या शापाचा उल्लेख आला होता. स्वामींनी खानोलकरांच्या (आईकडूनच्या) पणजोबांना शाप दिला होता, ''तुमची, केवळ तुमचीच नव्हे, तर तुमचे जे जे नातलग असतील, त्या सर्वांची कामं अर्धवट राहतील!'' आपल्या आयुष्यात केव्हा काय होईल सांगता येत नाही, ही धाकधूक खानोलकरांच्या मनात सतत असायची ती यामुळेच! या शापाविषयी विचार करताना जाणवलं की विष्णूलाही अशाच प्रकारच्या भीतीने ग्रासलेलं आहे. ''माझं काही खरं नाही, आज इथं तर उद्या तिथं !'' ''हजारदा मनात येतं की, हे सगळं सोडून कुठेतरी निघून जावं!'' ''रस्ता वळला की आपल्याला वळावं लागतं आणि दुसरं वळण येईपर्यंत सरळ चालावं लागतं!'' ''फुलं आपली नव्हेत, चाफा आपला नव्हे अन् म्हातारीही आपली नव्हे. सगळं काही त्या बाप्पानं निर्माण केलंय भँचोद!'' अशा वेगवेगळ्या वाक्यांमधून असं जाणवत राहतं की, भवतालच्या परिस्थितीवर आपला कसलाच ताबा नाही, हे विष्णूला उमगलंय आणि त्यामुळेच त्याला चिडचिड होतेय! आज जे बरं चाललंय, ते उद्या तसंच राहील का, अशीही भीती खोल कुठे तरी त्याच्या मनात असेल. पाहता पाहता खानोलकरांना वाटणारी अनिश्चितता विष्णूवर सुपरइंपोज झाली आणि मग खानोलकरांच्या घराण्याचा शाप विष्णूच्याही घराण्याचा शाप होऊन गेला.

'चाफा' कथेचा नाटक म्हणून विस्तार करताना काही प्रसंग नव्याने घडवणं आवश्यक होतं. संध्या विष्णूच्या घरी राहायला आल्यावर साहजिकच तिचं त्याच्याविषयीचं आकर्षण वाढणारच ! ती त्याला आपलंसं करण्याचे प्रयत्न करणारच, पण काशीच्या उपस्थितीत तिला तितकंसं मोकळं वाटणार नाही, म्हणून घराच्या बाहेरच कुठेतरी त्यांची भेट घडवावी, असं मनात आलं. असं ठिकाण गावापासून लांब, निर्मनुष्य असावं, असा विचार करता करता गवळदेवाचा माळ आठवला. त्या विषयी खानोलकरांनी लिहिलंय, ''गवळदेवाच्या माळावर बसलात, तर तुम्ही तुमच्या मनाचे पडसाद ऐकाल आणि केव्हा केव्हा वाटेल, प्रचंड हाक द्यावी!'' डोकं भिरभिरल्यासारखं झाल्यावर विष्णूची पावलंही अशाच एखाद्या माळाकडे वळत असतील, घराच्या कटकटींपासून आणि संध्यापासूनही लांब जाण्याचा हेतूही

कदाचित त्यामागे असेल. दोघांच्या नात्याचा प्रवास बघता संध्या आपणहून पुढाकार घेत त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करताना दिसते, त्याच सूत्राने पुढे जात विष्णूला शोधायला तिने माळावर (नाटकात त्याचं नाव 'परशुरामाचा माळ' असं केलंय!) जावं, हे स्वाभाविकच ठरलं असतं! पहिल्या अंकाच्या शेवटच्या प्रवेशात विष्णू तिला आपल्या वडिलांविषयी वाटत असणाऱ्या भीतीबद्दल, छळत राहणाऱ्या प्रश्नांबद्दल बोलतो, तेव्हा संध्या त्याला आधार देते. कथेत नसलेला हा भाग चपखलपणे नाटकात मिसळून गेला !

विष्णू घरात नसताना काशी आणि संध्या भरपूर गप्पा मारत असणार हे स्वाभाविकच आहे. त्यामुळे त्या दोघींचाच एक सीन असावा, असं ठरवलं होतं. पहिल्या आणि दुसऱ्या अंकाच्या दरम्यान महिना दीड महिन्याचा काळ गेला आहे. त्यामुळे दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीला या दोघींचा प्रवेश घातल्याने काळाचा जर्क जाणवणार नाही, असं वाटलं. त्या दोघींमधली इंटिमसी छान रंगवता आली, शिवाय घराण्याच्या शापाविषयी विष्णू संध्येला आपणहून काही सांगणार नाही कदाचित्, पण काशी गप्पांच्या ओघात सांगू शकेल, असं वाटल्याने तो भाग या प्रवेशात आणला.

संध्याने लग्नाला नकार दिल्यावर विष्णू उद्ध्वस्त होतो आणि रानोमाळ धावत सुटतो. त्यावेळी तो स्वत:चीच निर्भत्सना करतो. लाचार होऊन संध्येच्या दारात आपण का गेलो, याची खंत वाटून तो स्वत:लाच शिव्या घालतो, दूर कुठेतरी निघून जावंसं वाटतं, पण काशीचा विचार त्याला मागे खेचतो. रस्ता, वळणं यांचं आकर्षण असलेल्या विष्णूला वाटतं की, त्या वाटेवरच्या अखेरच्या वळणावर कदाचित् चाफा पुन्हा बहरला असेल. हे स्वगत लिहीत असताना खानोलकरांनी मृत्यूशय्येवर असताना लिहिलेल्या शेवटच्या चार ओळी आठवल्या.....

अखेरच्या वळणावर यावा
मंद सुगंधी असा फुलोरा
थकले पाऊल सहज उठावे
आणि सरावा प्रवास सारा ।

विष्णूच्या शेवटच्या स्वगताच्या अखेरीस या चार ओळी जोडून दिल्या.

त्या काळात खानोलकरमय झालो असल्यामुळेच हे लिखाण माझ्या हातून घडलं. खानोलकरांची मूळ कथा आणि त्याचा मी माझ्या पद्धतीने (पण त्यांच्याच शैलीत) केलेला विस्तार यांचं ब्लेंडिंग अतिशय सुंदर पद्धतीनं झालं. मुंबईतल्या प्रयोगानंतर ज्येष्ठ नाट्य समीक्षक श्री. कमलाकर नाडकर्णी यांनी परीक्षणात लिहिलं होतं, ''शिरीष देखणे यांनी 'चाफा' कथेतील संदर्भांचा, त्यातील घटितांचा वा वस्तूचा आधार घेऊनच व्यक्तिरेखांच्या मानसिकतेचे कारण धुंडाळले आहे व ते नाट्यपूरक करून घेतले आहे. हा सर्व मेळ इतका उत्तम जमला आहे की, यातले खानोलकर कुठले आणि देखणे कुठले, हे ओळखणे अशक्य झाले आहे. खानोलकरांच्याच काय पण इतर कुठल्या कथेवरचे अन्य लेखकाने केलेले एवढे उत्कृष्ट नाट्यरूपांतर या अगोदर तरी माझ्या पाहण्यात आले नव्हते.'' चाफा नाटकाला अनेक पारितोषिके मिळाली, पण एक लेखक म्हणून मला कमलाकर नाडकर्णींचे वरील शब्द हेच मोठे पारितोषिक वाटते !

१९८९ साली 'चाफा' नाटक आम्ही राज्य नाट्य स्पर्धेत सादर केलं. अतुल कुलकर्णीच्या गुणवत्तेला प्रचंड वाव देणारं हे नाटक प्राथमिक फेरीत तिसरं आलं, तरी अंतिम फेरीत प्रथम क्रमांकाचं मानकरी ठरलं. अतुल कुलकर्णी, रोहिणी उपळाईकर, बीना जवळगेकर या तिन्ही पात्रांना अभिनयाची रौप्यपदकं, दिग्दर्शन व नेपथ्य (डॉ. वामन देगावकर), प्रकाशयोजना (शशिकांत बटाणे), पार्श्वसंगीत (मी स्वत:) अशी अन्य चार प्रथम क्रमांकाची पारितोषिके मिळवून या नाटकाने एक इतिहास घडवला.

नंतरही दिल्लीपासून बेळगाव, गदगपर्यंत या नाटकाचे तब्बल पंचवीस प्रयोग झाले. हाही एका प्रायोगिक नाटकं करणाऱ्या हौशी नाट्य संस्थेसाठी एक विक्रमच म्हणावा लागेल.

खानोलकरांच्या चाफ्याचा सुगंध सर्वदूर पसरला आणि 'चाफा'च्या त्या दिवसांना कवठी चाफ्याचा सुगंध प्राप्त झाला, हा माझ्या आयुष्यातला फार मोठा भाग्ययोग होता, असं मी मानतो.

० ० ०

शिरीष देखणे
चंद्रकिरण अपार्टमेंट्स, १६२/१९ बी, रेल्वे लाईन्स, सोलापूर - १
भ्रमणध्वनी ९८५०९७८५९८

# जीवन त्यांना कळले हो...

**राजशेखर शिंदे**

मी सोलापूरकर. माझ्या जाणिवेत, संवेदनेत, प्रकट-अप्रकट मनात भरून राहिलंय - मी सोलापूरचा. सन २००६ पर्यंत पुण्यामध्ये चौदा वर्षे हेच सांगत राहिलो - मी सोलापूरचा. माझं नाव राजशेखर. मला सरळ सरळ दक्षिणेत नेऊन सोडणारं, माझं रंगरूप दाक्षिणात्य नावावर शिक्कामोर्तब करणारं असं. भरपेट गरमगरम भात खाल्ल्यासारखा दिसणारा मी सोलापूरचा म्हटल्याबरोबर, 'काय राव, मराठी तर छान येते! कर्नाटकातले की केरळ तमिळनाडूतले?' असे प्रश्न उपस्थित व्हायचे पुण्यामध्ये. अनेकदा वेगळेच अनुभव यायचे, आजही येतातच. अनोळखी माणसास मी काही विचारलं की ती अनोळखी व्यक्ती माझ्याशी हिंदी बोलण्याचा प्रयत्न करते. मी वैतागून म्हणत असतो, 'अहो, मला मराठी समजते!' 'अहो खरंच की! पण तुम्ही अत्ताशी उर्दूतल्याप्रमाणे हिंदी बोलताय!' असं लोकांना काहीही ऐकायला यावं असा माझा आवाज. आत खोल खोल उतरलेला आवाज प्रयत्नपूर्वक खेचून काढतोय असंच पुष्कळांना वाटतं. एम.ए.च्या वर्गात शिकत असताना निर्मलकुमार फडकुलेसर अनेकदा म्हणाल्याचं आठवतं की, 'शिंदे, तुमच्याकडे खूप काही आहे. तुमचा व्यासंगही चांगला आहे. पण तुम्ही आवाजामुळे मागे पडाल.' असा मी सोलापूरकर सोलापूरच्या बहुभाषकतेत फिट बसणारा.

पुण्यात कोणत्याच गोष्टीची उणीव नव्हती. अर्धवेळ का होईना पण नोकरी होती. फुटकळ लेखनातून, मुद्रितशोधनातून, पुस्तकाच्या संपादकीय संस्करणातून चांगला पैसा मिळत होता. महाराष्ट्र साहित्य परिषद, फर्ग्युसन महाविद्यालय, शासकीय विभागीय ग्रंथालय आणि माझं एस.पी. कॉलेजचं ग्रंथालय इथून मला हवा असलेला ग्रंथ, पुस्तक उपलब्ध होत असे. इंटरनॅशनल बुक स्टॉल माझ्यासाठी सुरुवातीचं प्रेक्षणीय स्थळ होतं. पुण्यात असूनही पाच वर्षे पूर्णवेळ बेकार होतो. तेव्हा मला याच इंटरनॅशनल बुक स्टॉलनं जगण्याला ऊर्जा दिली. पलीकडच्या पूरब किंवा चालुक्य हॉटेलमधून चहा घेऊन चांगले दीड-दोन तास मी इंटरनॅशनलमध्ये रेंगाळत असे. डावीकडच्या कोपऱ्यात मराठी पुस्तके असत. भिंतीच्या रॅक्सच्या खालच्या बाजूला जुनी-जुनी चांगली पुस्तकं असत. त्या काळात (१९९४-९९ पर्यंत). पंधरा ते पंच्याहत्तर रुपये किंमतीची पुस्तके... मन हरकून जात असे पण त्या बेकारीच्या दिवसात तीस-पस्तीस रुपये किंमतीचं पुस्तक घेणे जमत नसे. महिन्यातून किमान पाच वेळा तरी तिथं जाई. आवडलेलं पुस्तक घेई. मग सायकालॉजी, फिलॉसॉफी, हिस्ट्री... अशा रांगा बघत बघत जवळच्या पैशांचा हिशेब करत करत शेवटी पुस्तक परवडत नाही असं वाटलं की शेवटच्या हिस्ट्री सेक्शनमध्येच हातातलं पुस्तक ठेवून देई आणि मग जडावलेल्या अवस्थेत बाहेर पडे. कित्येकवेळा पुस्तक न घेताच. नाहीतर दहा-दहा रुपयांचीसुद्धा पुस्तकं असत. ती सुद्धा घेणं शक्य होत नसे.

काही दिवसांनी असं लक्षात आलं की, मी मराठीच्या पुस्तकांपासून पुढं सरकलो की इंटरनॅशनलचा पोऱ्या माझ्याकडे येऊन सहज नजर टाकून जायचा. सन दोन हजार दोनपर्यंत त्याचं असं चाललेलं होतं. त्यानंतर माझ्यात धिटाई आली. नोकरी मिळाल्याने पैसेही असत. पुस्तकांच्या किमतीकडे दुर्लक्ष करू लागलो. उपेंद्र दीक्षितांशी बोलूही लागलो. तिथले एक वयस्क कर्मचारी एस.पी. त येत. त्यामुळे परिचयही झाला. मग एके दिवशी तो पोऱ्या म्हणालाही, 'लोकं काय करतात, इकडून पुस्तकं घेऊन तिकडं कोपऱ्यात जाऊन पुस्तक गायब करतात!' माझ्या डोक्यात लख्खकन प्रकाश पडला - हा आपल्याविषयीच बोलतोय; पण मी ते पुस्तक तिकडे हिस्ट्री सेक्शनमध्ये ठेवलेलं असे. 'काय लोकं पुस्तकाची चोरी करतात?' मी त्याच्याकडं पाहून स्मित केलं. सुरुवातीला (१९९४ मध्ये) कितीतरी लेखक तिथं दृष्टीस पडायचे. तुरुतुरु डुलत चालणारे कै. दिलीप चित्रे तिथेच पाहिले, अनिल अवचट मस्त बोलत उभे असलेले पाहिले, एक कुणी बांगला लेखिका तिथे पाहिली. ती म्हणत होती, 'आय लव्ह महाराष्ट्रा बिकॉज आय लव महात्मा फुले!'

मला हे इंटरनॅशनल बुक स्टॉल खूप आवडतं. आजही पहिल्यांदा तिथंच जातो. 'इंटरनॅशनल दीक्षित' असा एक फार सुंदर लेख प्रो.ना.सी. फडक्यांनी लिहिला आहे. तो वाचल्यानंतर इंटरनॅशनलविषयी माझ्या मनात आदरभाव उत्पन्न झाला. तिथला कर्मचारीवर्ग विनम्र आणि तत्पर आहे. लोकांनी वाचावं, त्यांची वाङ्मयभूक कुपोषित राहू नये, त्यांची वाङमयाभिरुची वाढावी म्हणून इंटरनॅशनलने अनेक प्रयोग केले आहेत. पानशेत,

खडकवासला, धरणफुटीनंतर भिजकी पुस्तकं मूळ किंमतीत लोकांनी घेतली ती उगीच का? धरणफुटीच्या पाहणीला येऊन पंडित जवाहरलाल नेहरुजींनी इंटरनॅशनलचीही पाहणी केली आणि पन्नास हजारांचा धनादेश तिथल्या तिथेच दिला! असं एक इंटरनॅशनल बुकस्टॉल सोलापूरला सुरू झाल्यास सोलापूरचा रखरखीतपणा सुसह्य होईल.

पुण्यात बरं चाललं होतं. मित्रासोबत संध्याकाळी फिरायला जात असे. दोन तास अनेक वाङ्मय विषयावर, प्रश्नावर चर्चा होत असे. मित्र (डॉ. गोरक्ष थोरात) नसेल तेव्हा आठवणीची इंद्रधनू महिरप उभी करत असे. पिसारा फुलवून मन नाचत असे. मागे मागे जाई. गुह्य कुहरात रममाण होई. बऱ्याचदा गावातच रमे. माझं गाव चपळगाव. न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकरांचे आजोबा याच चपळगावचे. माझ्या आजोबांचे आजोबा अक्कलकोट दरबारी नोकर. राजाने त्यांना पंच्याहत्तर एकर जमीन इनाम केली. जमीन बरड माळरानाची. तीमध्ये भुईमूग पाऊसपाणी मुबलक असल्यानं भरघोस पिकत. मी जन्मलेल्या साली तर पोते मिळाले नाहीत म्हणून सोवण्यातून ओतून खोली भरली होती म्हणे. त्यामुळे मी पायगुणाचा ठरलो.

आजोबा कोतवाल असल्याने पंचक्रोशीत प्रतिष्ठित होते. अत्यंत सच्छिल मनाचे होते आजोबा. सर्वांशी त्यांचे आत्मिक संबंध होते. अशिक्षित पण ज्ञानी होते. सत्तरीच्या दशकात वृत्तपत्राचे सामूहिक वाचन होत असे. आजोबा, दुकानदार व्हट्टे आजोबा, कैकाड्याची सुभद्रा आजी असे लोक बसत. आमदारांचे जावई अबूतराव पटेल वृत्तवाचन करत. त्यानंतर आणीबाणीवर चर्चा होई. इंदिराजींच्या खंबीर नेतृत्वावर चर्चा होई. ही चर्चा करणारे कोण ते सर्वजण? ठार अशिक्षित. फक्त अबूतराव काय ते चौथी पास. देश, राजकारण, अर्थकारण, बांगलादेश प्रश्न – निर्मिती बाईचं नेतृत्व ही चर्चा पाच-सहा वर्षांचा मी ऐकायचो. अबूतरावकाका तर वृत्तनिवेदन अनंतराव भाव्यांच्या थाटात करत. हे अबूतराव भाबडे आणि नि:स्पृह गृहस्थ. पेपरवाचनाचा कधी कंटाळा करीत नसत. संध्याकाळी पिठाची गिरणी चालवून आपली गुजराण करीत.

संध्याकाळी बैठकीचे ठिकाणी वेगळे विषय असत. तेथे रामायण, महाभारत, लोकदेवदेवता यांच्या कथा-आख्यायिकांची चर्चा रंगे. कुणीही हमरीतुमरीवर येत नसत. गुड्डद रेवम्मा, अक्क महादेवी, लक्ष्मी-शंकर या पौराणिक कथांसह सिंधूर लक्ष्मण, बिरसा मुंडा, ब्रिटिश, दरवडेखोर असे लोकविलक्षण विश्व या चर्चेत मुक्तपणे येत असे. बाकी इतरही वयस्क येऊन बसून हे अभावितपणे मिळणारे ज्ञान घेत. दिङमूढ होऊन ऐकत. त्यातला मीही एक. रस्त्यातून जाणारा मधेच एखादा पाच मिनिटे टेकून जाई. आजोबा शरणार्थीरी, रामराम, नमस्कार घालत येणाऱ्या-जाणाऱ्यांना. एके सायंकाळी बुटकेला काळासा मनुष्य पुढे मागे माणसांच्या फौजफाट्यासह जात होता. आजोबांनी त्याला नमस्कार घातला. तो मान हलवून तसाच पुढे सर्रकन गेलाही. मला खूप राग आला होता. आजोबांना नमस्कार करत नाही म्हणजे ! आजोबांना विचारलं, हे कोण ? 'ते ना ? मोठे आफिसर, डी.डी.आर. ते. तूही होणार ना ?' मी शांतपणे म्हणालो, 'मी आजोबा लोकांना नीट नमस्कार करीन.' आजोबा शांतपणे हसले. डोक्यावर हात फिरवला. किती मऊसूत कृतार्थ स्पर्श होता तो!

आजोबांना शेती आणि गायी अतिशय प्राणप्रिय होत्या. घरामध्ये दोन्ही वेळेला गोमूत्र शिंपडत. चिरुटचिल्टे, जीवजंतू होत नाहीत, घर पाक असतं असं सांगत. आपल्या चार मुलांना नेहमी शेतीत घाम गाळा, दाम मिळेल हे सांगत. 'भाड्याशेंदळीच्यानो, वेळीच कडूगवत काढत चला. नाहीतर ते तुम्हाला गिळेल,' हे जीव तोडून सांगत. कंटाळून मीच त्यांनी सांगितलेला प्रयोग केला. बादलीभर पाण्यात ओंजळभर खड्याचं मीठ टाकून ते पाणी द्रावण झाडूने कडूगवतावर मारत गेलो. त्यानंतर तासभर ऊन पडायला पाहिजे. पडलेलं होतं. संध्याकाळी जाऊन पाहिलं – कडूगवत वाळलेलं होतं! त्या जमिनीत पुढील वर्षात कडूगवत आले नव्हते. हे कसले अगाध ज्ञान होते हे कळले नाही. कृषि तज्ज्ञांना, कृषि शास्त्रज्ञांना हे ठाऊक असावे का?

चवथीमधून मला पाचवीमध्ये ढकलण्यात आले. हो ढकलण्यातच. कारण त्यानंतर पुढच्या वर्गात वाचावयास शिकलो. ग्रामीण विद्या विकास विद्यालय, चपळगाव ही शाळा भव्य आणि विशाल. मुख्याध्यापक परमेश्वर पाटील दूरदृष्टीचे, अत्यंत सौंदर्यासक्त आणि अभिजात अभिरुची असलेले शिक्षक. शाळेच्या व्हरांड्यात पाच मोठे आरसे विद्यार्थ्यांकरिता लावलेले, शाळा सुरू व्हावयाच्या आधी, मधल्या मोठ्या सुट्टीत आणि लगेच शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांच्या कानावर चांगले संगीत, चांगली गाणी पडली पाहिजेत म्हणून शाळेच्या आतील चारही कोपऱ्यांना 'साऊंड बॉक्स' लावलेले होते. सुंदर अभंग अगर भावगीत ऐकत शाळेत जायचो. मंदिराच्या गर्भागारात गेल्यासारखं वाटायचं. शाळेचं वातावरण इतकं पवित्र असायचं. शाळेत प्रवेश घेऊन महिनासुद्धा झाला नव्हता तोच आजोबा 'भाषणात भाग घे, भाषणात भाग घे' म्हणू लागले. भाषण कसे करावे तेही सांगू लागले. 'भाषणाला उठताना खाकरून घसा साफ करावा, भ्यायचं नाही, बोलावयास सावकाश सुरुवात करायची, उगीच हातवारे,



## राजशेखर शिंदे

**ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीशी झगडत डॉ. राजशेखर शिंदे यांनी एम.ए. (मराठी) पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त. २००७ साली 'पु. शि. रेगे यांचे समग्र साहित्य' या विषयावर शिवाजी विद्यापीठाची 'डॉक्टरेट'.**

**पुण्यातील एस.पी. कॉलेज मध्ये सहा वर्षे वरिष्ठ विभागासाठी अर्धवेळ अधिव्याख्याता पदावर काम केल्यानंतर २००६ पासून सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयात सहायक प्राध्यापक. सध्या मराठी विभागप्रमुख पदावर कार्यरत.**

**मराठीतल्या सध्याच्या सर्व आघाडीच्या वाङ्‌मयीन (म.सा. पत्रिका, साधना, दर्शन, साहित्यसूची, शब्दालय इ.) नियतकालिकांमधून ७ शोधनिबंध तर २५ समीक्षा लेख प्रकाशित. काही लेखांचा संपादित समीक्षालेख संग्रहात समावेश.**

आरडाओरडा करायचा नाही ते 'लक्ष्मनराव' बोलतात तसे बेगडी नटवे बोलायचं नाही' वगैरे वगैरे. याला मी कंटाळलो होतो. एकदा आठवीत असताना सहभाग घेतलाही, पहिलाही आलो. ते असो. मग पुढे चार-एक वर्षे ते छान होते. मी दहावीत असताना चारच दिवस अंथरुणाला खिळले. शेजारी पिकदाणी ठेवलेली. याची मला शिसारी आली. एकादशी होती. संध्याकाळ - सांजवातेला आजीला 'दिवा लावा' म्हणाले. आजीने देव्हाऱ्यावर पणती चेतवली. बाहेर आली. आजोबा प्रकाशात निश्चल होते. मुद्रा त्या स्निग्ध प्रकाशात प्रशांत होती. आजीनं टाहो फोडला.

मी शाळकरी होतो तेव्हा शाळा यशोशिखरावर होती. सर्वत्र पी.वाय. पाटील हे नाव होते. बाहेरगावच्या स्टँडवर गाडीच्या प्रतीक्षेत असलो तरीही लोक म्हणायचे, 'चपळगावच्या शाळेचा! मग गाडीची वाट बघायचं नाही? सनसन् सुटायचं!' इतका शाळेचा नावलौकिक. खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलन, विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना उमलविण्याकरिता शक्य ते सर्व शाळा करीत असे. स्नेहसंमेलनात एका विद्यार्थ्याने शाडूचे शेंगदाणे करून प्रदर्शनात ठेवले होते. सोलापूरहून आलेल्या प्रदर्शन परीक्षकाने ते शेंगदाणेच समजून तोंडात टाकले होते! खेळात जिल्हा पातळीपर्यंत सांघिक खेळ जात. व्यक्तिगत खेळात एक-दोन खेळाडू राज्यस्तरापर्यंत पोचलेले होते. शिक्षकवर्ग हा अत्यंत निष्ठावंत होता, कष्टाळू होता. अत्यंत कळकळीने, तळमळीने शिकविणारे शिक्षक होते. इतके चांगले शिक्षक सर्वच्या सर्व एकाच शाळेत असणे याला कसला संयोग म्हणावा?

या शाळेत मी पाचवी आणि सहावीच्या वर्गात गंगेतला गोटाच होतो. सातवीत काय झाले कळले नाही. चक्क वाचावयास शिकलो. 'श्री' नावाचं पुण्याहून प्रकाशित होणारं एक साप्ताहिक तेव्हा फार लोकप्रिय असावं. ते वडील वाचण्याकरिता आणत. साधारण सोळा पानी असावं. आकार वृत्तपत्राच्या अर्ध्या पानाचा. टप्पोऱ्या अक्षरात... मजा यायची. माझं ते पहिलं वाचन. टायटॅनिक जहाजाची हकिकत मी त्यामधूनच वाचलेली. अभ्यंकर खून खटलासुद्धा त्यामधूनच इत्थंभूत वाचलेला. 'जत्रा', 'माणूस', 'चांदोबा' ही नियतकालिके आवडीने वाचली. पुढल्या वर्षी म्हणजे आठवीत 'बळी', 'माकडीचा माळ', 'ठासलेली बंदूक', 'गावगुंड', 'क्रौंचवध' ही पुस्तके वाचली. त्या वयात ते सर्व काही अद्‌भुत होतं. दहावी होईपर्यंत अर्ध्याहून अधिक ना.सी. फडके वाचले. अण्णाभाऊ साठे, खांडेकर, रणजित देसाई हे लेखक पुढील दोन वर्षांत वाचले. वाचन मन:पूत होते, मनस्वी होतं. नुकतंच शरीर नि मन बोलू लागलेलं होतं. त्या स्वप्नवयात ना. सी. फडके आवडणे साहजिक होते. फडक्यांची अनलंकृत भाषा अत्यंत निरोगी होती. इतकं साधं आणि तरीही मोहमयी आहे फडक्यांचं लेखन. आज फडके वाचले जात नाहीत; पण ज्या काळात फडके वाचले जात होते त्या काळातील वाचकांना फडक्यांनी भरभरून दिले आहे. त्या काळातील लोकांची गरज त्यांनी ओळखली होती. 'सरस्वती ही कीर्तनकारांच्या व्यासपीठावर बसलेली नसून प्रमत्तमयुर पिच्छासनावर विराजमान झालेली आहे.' हा फडक्यांचा प्रयोजनविचार सर्वश्रुत आहे. तरुण तरुणींना 'गुलाबी प्रेमा'ची दीक्षा देत आपली 'दौलत', 'अटकेपार झेंडा', उधळणारे 'जादूगार' अशा फडक्यांनी 'अखेरचे बंड' सारखी कादंबरी लिहून आपल्याला साहित्यामधून समाजदर्शन घडविता येते हे सिद्ध केले आहे. फडक्यांनी मराठी शारदेला लडिवाळ आणि मधाळ भाषेचं कोंदण दिलेलं आहे. सहा वर्षांपूर्वी रा. ग. जाधवांनी म्हटलेले आहे की, 'आपापल्या काळांनी आपापले ना. सी. फडके निर्माण केले पाहिजेत' हे लक्षात घ्यायला पाहिजे.

शिवाजी सावंतांची मला लहानपणी ईर्ष्या होती. मला वाटत होतं माझ्या आधी कर्णावर यांनी का लिहाव?


दहावीच्या दिवाळी सुट्टीत भेटला तो गुलशन नंदा. रंगमहाल. पण निर्जीव वाटला. परिणाम जास्त वेळ टिकला नाही.

ते वर्ष दहावीचं होतं. झालो एकदाचा दहावी.

आमच्या ग्रामीण विद्या विकास विद्यालयामध्ये ज्युनिअर कॉलेजला सुरुवात झाली. शाळा प्रख्यात. प्रवेश फार गमतीदार मिळाला. प्रथम प्रयत्न उत्तीर्ण झालेल्यांना वाणिज्य शाखेत आणि अनेक प्रयत्नामधील कलाशाखेत! ही आपली शिक्षणपद्धती!

आमचा अकरावीचा वर्ग ग्रंथालयात भरे. किती अप्रूप वाटलं होतं. पुस्तकांसाठी चौकशी केली. ती पुस्तके आमच्यासाठी नव्हतीच ! त्यावेळी खूप वाचावंसं वाटत होते. कल्पकतेला नित्य नवे पंख फुटत होते. वडील शेतकरीच; पण वाचन चांगलं होतं. ते नवनवीन साप्ताहिकं, मासिकं आणत. नवनवीन विषयांची माहिती मिळवत. हे विषय शाळेत नव्हतेच. संरक्षणशास्त्र, राज्यशास्त्र, मानवशास्त्र, मानववंशशास्त्र हे विषय कळत होते. सामाजिक शास्त्रे आणि मानव्यशास्त्रे मानवी जीवन व्यवहाराची मूलभूत शास्त्रे आहेत हे लक्षात येत होते; पण वर्गात वाणिज्य, चिटणीसाचा व्यवसाय यासारखे माहितीपर विषय अभ्यासाला होते. त्यामुळे ग्रंथालयातील पुस्तके बोलवीत होती. अभ्यासातील रुक्षता वाढू लागली आणि कल्पनेला धुमारे फुटू लागले. वर्ग ग्रंथालयामध्येच भरत असल्याने पुस्तकांचं आकर्षण वाढू लागलं. पुस्तकांसाठी विनंती केली तर ते काम माझ्याकडे, त्यांच्याकडे, तमक्याकडे अशी टोलवाटोलवी होऊ लागली. पुन्हा दोन-तीन महिन्यांच्या खंडानंतर पुस्तके वाचू लागलो.

'Tel me why ?' ही खंडात्म पुस्तके वाचली. इंग्लिश साधं. सहज समजायचं. जगातल्या कोणत्याही प्रश्नाचं उत्तर यामध्ये मिळेल. प्रश्न आणि सचित्र उत्तर अशी रचना आनंद देई. या why नं आत्मविश्वास जागृत केला. थोडीशी धिटाई आली. अकरावीत असताना रत्नाजी आगवणे (I.A.S.) व लक्ष्मणराव ढोबळे यांची स्नेहसंमेलनात एकत्रित व्याख्याने ऐकली. सरकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय सेवा एक चांगले माध्यम आहे आणि U.P.S.C. च्या परीक्षेतून I.A.S. होता येतं हे कळल्यानंतर बारावीसाठी तडक सोलापूर जवळ केलं. ग्रामीण विद्या विकास सोडताना मनात असंख्य आठवणींच्या सरींवर सरी येत राहिल्या. शाळेनं खूप दिलेलं होतं. उत्तमात उत्तम व्याख्याने गणेशोत्सवात व्हायची. उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या लोकांना जवळून पाहता आले होते. कोण कोण होते यात? राजा मंगळवेढेकर, यदुनाथ थत्ते हे मातृहृदयी पुरुष चपळगावासारख्या खेड्यात पाहिले. साने गुरुजींना पाहणे शक्य



रेखाटन - जितेंद्र साळुंके

नव्हते, पण गुरुजी कसे होते याची कल्पना तेव्हा करता आली. वर्गामधल्या सांकल्पनिक ज्ञानव्यूहापुरतेच मर्यादित संस्कार आमच्या विद्यालयाने केले नाहीत, तर त्यासोबत विद्यार्थ्याची संवेदनशीलता जागृत कशी होईल इकडेही तितकेच लक्ष दिले होते.

साहित्याविषयी रुची निर्माण व्हावी, ही धडपड शिक्षकांची होती. 'ऑफ' तासाला दुसरेच शिक्षक एकपेटी घेऊन यायचे. छोट्या छोट्या पुस्तिका वर्गामधील विद्यार्थ्यांना देत आणि त्या तासात (तीस मिनिटांत) वाचवून घेत. या छोट्या पुस्तिकांत मला रस वाटत नसे. मी सविस्तर विश्लेषणात तोपर्यंत रममाण होतो. एकदा नववीत राजमाने सरांनी 'श्रीमानयोगी' वाचून दाखविली होती. 'श्रीमानयोगी' ही सुंदर ऐतिहासिक कादंबरी भावली, पण वाचावयास मिळाली दोन वर्षांनी! म्हणजे अकरावीत असताना. पावसाळ्यात छपराच्या कोपऱ्यात बसून वाचली. मग लगेच बाबासाहेब पुरंदऱ्यांची 'शेलारखिंड' मिळाली. त्यांचेच शिवचरित्र, ना.सं. इनामदार वगैरे... स्मरणात आजही राहिली 'श्रीमानयोगी'... 'शेलारखंड'. वाचन हा संस्कार टिकतो. प्रेरणा उत्पन्न होते. स्वप्नं पाहून पूर्ततेसाठी ऊर्जासुद्धा त्यामुळे निर्माण होते. हे संस्कार शाळा करीत होती. शब्दसंस्कारांसह वाक्संस्कारही शाळेने केले. द. मा. मिरासदारांचे कथाकथन १९८० साली ऐकलं. तेव्हा ऐकलेली 'भाना भूत' कथा आजही जिवंत वाटते. शंकर पाटलांचं 'ढांग चिक चिक' – कथाकथनसुद्धा शाळेतच ऐकलं. काय दिलखेच होती या माणसामध्ये. मुळात शंकर पाटील हे बुद्धिमान कथाकार. 'भुजंग' ही कथा तर अक्षर ठरावी. मग हळूहळू शंकर पाटील वाचू लागलो; पण मध्ये जीएच्या कथाविश्वाने विश्व झपाटून टाकले. बराच जीए वाचला. त्याही वयात जीएंचं विश्व नितळ, पारदर्शी वाटलं. जीए कळल्यामुळे शंकर पाटलांची ग्रामकथासंस्कृती उलगडत गेली.

चपळगावची शाळा सोडताना हे सारं दृष्टीसमोर येऊ लागलं. ती शाळा म्हणजे माझं घर होतं. म्हणून अंत:करणात कालवाकालव होऊ लागली होती. त्या शाळेत वयाची सात वर्षे गेली आहेत. जेवणापुरतंच घर. शाळेच्या भिंतींनी पावसाळ्यात नि हिवाळ्यात ऊब दिली आहे; तिच्या विशाल अंत:करणाने आम्हांला दारिद्र्याची जाणीव होऊ दिली नाही. माझ्यासारख्या शेकडोंची गुपितं, दु:खं, गाऱ्हाणी शाळेच्या उदरात आजही मिळतील. पण शाळेच्या उबेला आम्ही जागलो. आम्हांकडे पाहून शाळेला कौतुक वाटतं. मी तर कोण? चव्वेचाळीस टक्के घेऊन दहावी उत्तीर्ण!


पुढील शिक्षणाकरिता सोलापुरातील दयानंद शिक्षण संस्थेत दाखल झालो. महर्षी दयानंद सरस्वतींनी स्थापन केलेली दयानंद शिक्षणसंस्था. सोलापूरची शाखा १९४० साली सुरू झाली. १९८५ साली संस्थेच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्या वर्षात सोलापूरच्या शाखेचे भरगच्च कार्यक्रम होत होते. दयानंदचे ग्रंथालय फारच समृद्ध आहे हे बी.ए. ला प्रवेश घेतल्यानंतर ध्यानात आले. प्राचीन भारतातील अनेक मौलिक ग्रंथ इथे आहेत. परंतु प्रयत्न करूनही हे ग्रंथ विद्यार्थी म्हणून पाहायलासुद्धा मिळत नव्हते. चपळगावातल्याप्रमाणे पुस्तकं वाचावयास देणारे दुसरे एखादे दिगंबर शिमगे भेटतात का, हे पाहिलं पण प्रयत्न करूनही नाही मिळाले. आपल्या संपूर्ण जीवनकाळात चांगली माणसं मिळत नसतात. असतीलही ती चांगली. पण त्या चांगल्यांचा आपल्या वाट्याला चांगुलपणा आलेला नसतो. मग मी हिराचंद नेमचंद वाचनालय शोधून काढलं. मुक्त प्रवेशात पुष्कळ दैनिकं आणि साप्ताहिकं, नियतकालिकं अगदी तीन तास – सायंकाळी ५ ते ८ पर्यंत वाचावयास मिळत असत. तिथे अधाशीपणानं ही नियतकालिकं वाचत राहिलो. ही नियतकालिकं वाङ्मयीन होती. वाचताना कंटाळा येत नसे. कारण नियतकालिकाचा लेखक कोणी एकटा नसतो. कथा, कविता, विशेष लेख हे अनेकांचे असतात. प्रत्येकाची शैली वेगळी; प्रत्येकाचा संवेदनस्वभाव भिन्न, प्रत्येकाचे प्रयोजन निराळे. त्यामुळे बी. ए. चे शिक्षण घेत असताना काहीतरी वेगळे हाती लागत आहे, ते उपयुक्त आहे ही समज वाढत गेली. बी.ए. भाग-३ मध्ये असताना लक्षात येऊ लागले की, आपण गेली तीन वर्षे जे वाचत आहोत ते फारसे काही चांगले नाही. शाळेत असताना अभिजात स्वरूपाचं वाचलं. त्यानं अभिरुची बनली होती. आता हे असलं. चपळगावात मी जे वाचलेलं होतं ते झपाटून टाकणारं, मन हेलावून टाकणारं, बालमनात अनेक प्रश्न उपस्थित करणारं होतं आणि वयाच्या विशीचा उंबरठा ओलांडल्यानंतर वाचत होतो ते समकालीन होतं. समकालातील थोडेसे मागचे प्रश्न, लेखककालीन प्रश्नांचा, समस्यांचा गुंता असलेलं लेखन होतं. तद्दन टाकाऊ असं मात्र नव्हतं. सत्तरीच्या दशकात सामाजिकतेचं भूत निब्बर झालेलं होतं. पण लेख्यसंवेदना तितकीशी तरल वाटत नव्हती. सामाजिक प्रश्नांकडे व्याजदृष्टी, उथळपणा होता तरीही ताव मारत राहिलो. विशी ओलांडलेली. विषयवासनांची नागीण आपला विखारी फणा काढून वाऱ्यासवे थयथयाट करीत होती. जे वाचत आहे, ते सुंदरच आहे अशी बेधुंद रग होती. तेव्हा 'मेनका' मासिकावर अतोनात प्रेम होतं. नवीन अंक कधी हाती येईल असं वाटायचं. सुरुवातीला अंगात

शिरशिरी येते म्हणून बरं वाटलं. पण चव घेतल्यानंतर बेचव झालं, व्यक्तिवाचा शारीरभाव लवकर विटत असतो. कितीतरी नियतकालिकांमधील लेखन असंच वाटू लागलं.

पण या सर्वांमुळे एक बरं झालं की पॉप्युलर रायटिंग, लोकप्रिय लेखन म्हणून ज्या लेखनाची हेटाळणी होते, ज्या लेखनाचा अधिक्षेप केला जातो ते लेखक, ते लेखन शाळा ते महाविद्यालय या दिवसांत वाचल्याने त्याची म्हणून असणारी गुणवत्ता समजून आली. बाबा कदम, चंद्रकांत काकोडकर, सुहास शिरवळकर, श्रीकांत सिनकर यांची समीक्षकांनी अपेक्षेपेक्षा अतिउपेक्षा केली; पण लहानसान खेड्यात, छोट्याशा ग्रंथालयातील हे अत्यंत लोकप्रिय लेखक आहेत. अशा लोकप्रिय लेखनाची मूस समजली. हे लेखक आपल्या वाचकवर्गाचा अनुनय – वाचनवृत्तीला पोषक असं लेखन करतात असं मात्र अजिबात नाही. कल्पकता हा त्यांचा प्रतिभाधर्म होता. त्यामुळे त्यांचा कल्पनाविलास त्याच लेखनात चांगल्या प्रकारे घडत होता. आपल्या संवेदन स्वभावाशी, आपल्या लेखनपिंडाशी हे लेखक अव्यभिचारी राहिले. भावभावनांच्या चिंध्या चिवडण्यातून त्यांनी नक्षीदार लेखन केलं आहे. तंत्रावर जबरदस्त हुकूमत होती. म्हणूनच भालचंद्र नेमाडे पाच वर्षांपूर्वी म्हणाले आहेत, की सध्याच्या सामाजिक लेखनाचा बाऊ करणाऱ्या कादंबरीकारांपेक्षा बाबा कदम हे चांगलं लेखन करतात. म्हणजे एवढ्या मोठ्या लेखक, समीक्षकाला बाबा कदम वर्ज्य नाहीत. त्यांनी तेही वाचलेलं आहे. अमूक एक लेखन श्रेष्ठ म्हणण्याकरिता त्या प्रकारचं पूर्वकालीन, समकालीन, उत्तरकालीन वाचलेलं असेल तर त्या विधानास काही अर्थपूर्णता येते.

एकीकडे हे 'पॉप्युलर' रायटिंग वाचत असताना दुसरीकडे कान मन तृप्त करणाऱ्या गोष्टीही सोलापुरात होत होत्या. सोलापूर हे बकाल शहर अशी ओरड नेहमीच होते. पण मला असं कधीच वाटलं नाही. तेरा वर्षे पुण्यात काढल्यानंतर असं लक्षात येते की, सोलापूरकरांना वैचारिकतेची प्रचंड भूक आहे, रसिकता आहे. हे पुण्यात पाहावयास मिळत नाही.

सोलापुरातील गणेशोत्सव म्हणजे खरोखरच गणेश ही विद्यादेवता याची साक्ष देणारा होय. गणेशोत्सवामध्ये सोलापुरातील काही मंडळे बौद्धिक व्याख्यानमाला आयोजित करतात. विषय देण्यातील गांभीर्य, महत्त्व आज मला आठवतं. वक्तेसुद्धा अभ्यासू असत. पोटतिडकीने, तळमळीने विषय अनलंकृत, सुस्पष्ट भाषेत मांडत. त्यामुळे व्याख्याने श्रवणीय तर असतच, पण ती अधिक अभ्यसनीय असत. तीर्थक्षेत्रांत गर्दी असावी तशी गर्दी असे व्याख्यानासाठी. जनता सहकारी बँकेची व्याख्यानमाला आजही आठवते. १९८८ सालातील बिंदूमाधव



रेखाटन – जितेंद्र साळुंके

जोशींचे 'हिंदूधर्मसंस्कृती'वरील व्याख्यान, वसंत बापटांचे 'मराठी लावणी आणि महाराष्ट्र' अशी काही व्याख्यानं काल ऐकलेली आहेत, असंच वाटतं. याच श्रेणीतील ओघवत्या, लयबद्ध भाषेतील प्राचार्य शिवाजीराव भोसले यांची डझनभर तरी व्याख्याने सोलापुरात ऐकली आहेत.

काही व्याख्याने ऐकून अस्वस्थ होत असे, इतका व्यासंग त्या वक्त्यांचा असे. आपल्याला त्यांच्या पासंगापुरतं तरी होता येईल का ? याकरिता काय करावं लागेल ? मग बी.ए. चा अभ्यास बाजूला ठेवून संदर्भ अभ्यास, अवांतर वाचन सुरू झालं. भोसल्यांची व्याख्यानं ऐकून त्यांची अनुकरणीय शैली हस्तगतही झाली. विवेकानंदांची समग्र ग्रंथसंपदा वाचली. राजयोग कळला होता, कितपत कुणास ठाऊक? 'कंप्लीट वर्क ऑफ स्वामी विवेकानंद' ही वाचला. फार कमी कळलं. आंध्र भ्रदावती प्रशालेत गावातील एक शिक्षक होते. त्यांनी स्वामी विवेकानंद या विषयावर व्याख्यान ठेवलं. गणेशोत्सवामध्येच व्याख्यान दिलं. आवडलंही सर्वांना. काही दिवसांनी गवळी वस्तीतल्या एका विद्यालयातही याच विषयावर व्याख्यान दिलं! गंमत वाटली. टी. वाय. बी. ए. लाच असताना व्याख्यानं देण्यातील कुतूहल संपलं.

हिराचंद नेमचंद वाचनालयात पर्वणीच असे. विंदा, मंगेश पाडगावकर, वसंत बापट हे सर्व श्रीराम पुजारीसरांचे मित्र. त्यांचं काव्यवाचन अनेकदा तृप्त मनानं ऐकलंय. गद्यकविता वाचावी कशी, कविताचरण तोडावेत कसे हे विंदांच्या काव्यवाचनामुळे कळत गेलं. शब्दसंस्कार असतो. शब्दसंस्कार अमूल्य ठेवा असतो. त्यापासून होणारा आनंद 'ब्रह्मस्वाद'च असतो. विंदाच्या 'विरूपिका'. मराठीमधील शंभर टक्के उत्तम कविता असलेला संग्रह. या संग्रहाच्या वेळीच विंदांना ज्ञानपीठ मिळावयास पाहिजे होते! १९८७ साली वाटलं होतं – आता पुढचं ज्ञानपीठ – 'विरूपिका'स! तो अंदाज चुकला; पण विंदा हे नाव बरोबर निघालं.

श्रीराम पुजारी सरांनी सोलापूरकरांवर केलेले संस्कार अविस्मरणीय आहेत. काव्यशास्त्र विनोदात रमलेला हा नि:स्पृह मुसाफीरच होता. त्यांना कोणाची भीडभाडच नव्हती. कारण त्यांचा व्यक्तिगत स्वार्थच नव्हता. तसे ते फटकळ आणि प्रेमळ. बी.ए. भाग–३ मध्ये दयानंद कॉलेजमध्ये प्रथम आल्यामुळे दोन–तीन बक्षिसे मला मिळाली होती. श्रीराम पुजारी यांचे बंधू प्रभाकर पुजारी हे दयानंद महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख होते. ते माझे गुरू. ते मला म्हणाले की, 'रामभाऊंना भेटा. आपल्या ग्रंथालयात संध्याकाळी सहा वाजता जा.' मध्ये जाऊन मी भीतभीत भेटलो. पुजारी हे अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरूळचे. त्यामुळे आम्हाला जवळीक वाटे. परंतु भीती वाटणं त्यांच्या ऐकीव स्वभावामुळे नैसर्गिक होते. मी भेटून त्यांना म्हणालो, 'सर मी..., दयानंदमध्ये बी.ए.ला प्रथम... त्यातील बक्षिसाची रक्कम तुम्हाला द्यावी म्हणून आलो आहे.' मी अजून पुढे काही बोलणार एवढ्यात पुजारीसर बोलू लागले. 'अरे, पैसे देऊ नकोस. कालच बायकोनं तेलमीठ भरलेलं आहे. आता काय गरज नाही' आणि मोठमोठ्याने हसू लागले. मी म्हणालो, 'सर, तुम्ही सामाजिक कार्य करता, त्याला मदत म्हणून हे पैसे ...' मला तोडत सरांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला. 'मला कळलं रे.' मग माझी संपूर्ण चौकशी केली. मग म्हणाले, 'मला तुझा अभिमान आहे. हे पैसे तुलाच राहू दे. उपयोगाला येतील तुझ्या.' पुजारीसरांचं व्यक्तिमत्त्व असं अरभाट. हिराचंद नेमचंद वाचनालय नावारूपास आलं. वाचनालयाचं, ग्रंथालयाचं जे आजचं स्वरूप आहे ते पुजारीसरांच्या त्यागाचं फलस्वरूप आहे. एखादी संस्था जिवंत करून नावारूपास आणणं, त्याकरिता व्यक्तिगत जीवनात खस्ता खाणे, त्या कार्यालाच वाहून घेणे हे फार कमी लोकांकडून पाहावयास मिळतं. पुजारी हे त्या परंपरेचे अध्वर्यू. काय येत नव्हतं पुजारीसरांना? साहित्य, शास्त्र, संगीत, गायन, वादन, खेळ (क्रिकेट), वक्तृत्व या मानवजातीच्या ललामभूत कलांनी श्रीराम पुजारी मंडित, असे सव्यसाची व्यक्तिमत्त्व होते. डॉ. अरुण टिकेकर हे त्यांचे विद्यार्थी. टिकेकर स्वत: अभिमानानं आपल्या गुरुंविषयी सांगतात. जब्बार पटेल पुजारी सरांच्या घरी वाढलेले आहेत. त्यांची रसना घेऊन मी मोठा झालो, असं ते जेव्हा म्हणतात तेव्हा या व्यक्तिमत्वाचं अफाटपण प्रत्ययास येतं. यांच्या पायथ्याशी काही वेळ मला थांबता आलं, याचं समाधान वाटतं.

हि. ने. वाचनालयात मध्येच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची तीन–चार व्याख्याने ऐकली. आधीची काही आठवत नाहीत. पण रशियाला जाऊन आल्यानंतर त्या अनुभवाधारित त्यांचं व्याख्यान आजही मला आठवतं. तर्कतीर्थांचा व्यासंग म्हणजे नतमस्तक व्हावं. त्यांच्या पायावर माथा टेकल्यानंतर मस्तक शांत व्हावं असं चारित्र्य आणि व्यासंग. पुजारीसर परिचय करून देताना म्हणाले होते की, 'हा सत्तरीतला तरुण धोतराऐवजी आज पँट घालून आलाय!' मी जसं अभिमानानं म्हणतो तर्कतीर्थांना ऐकलंय तितक्याच अभिमानानं म्हणतो, मी स्वर्गीय कुमार गंधर्वजींनाही ऐकलंय. त्या ताना आजही हृदयकोशात जपून ठेवलेल्या आहेत. पुजारीसरांचं पहिलं स्मरण, त्यांच्या विद्यार्थ्यांनी पुण्यात केलं. दुसऱ्या दिवशी सकाळी कुमारजींच्या कन्या कलापिनी कोमकलीचं गायन होतं. पुण्यामधल्या कोथरुड भागात (मी पुण्यात त्यावेळी नोकरीला होतो.) मित्राला घेऊन

गायनाच्या कार्यक्रमाला गेलो संध्याकाळी ! फार अस्वस्थ होतो रात्रभर. एका माणसाचं माणसा-माणसाचं खूप काही देणे असतं. तरीही आपण जगतो वृथा उपकार भावनेवर. कुमारजींसारखा मनुष्य या जगावर अनंत हस्तानं आनंदाची उधळण करीत होता. त्यांनी माझी झोळी भरभरून टाकली होती. रागदारीमधलं काहीच कळत नाही; पण कान संतृप्त आहेत.

पार्क स्टेडियमवरची १९८६ किंवा ८७ सालची घटना माझ्या मनावर आजही कोरलेली आहे. एफ.वाय.बी.ए.मध्ये शिकत असेन. कुठलीशी राज्यस्तरीय स्पर्धा होणार असावी. स्वागत, उद्घाटन समारंभाची संगीत तालीम चाललेली होती. चांगल्या पोशाखातील एक गृहस्थ सनईसारखं वाद्य वाजवणाऱ्या मध्यम चणीच्या, सावळा म्हणता येणार नाही अशा कलाकाराकडे आकृष्ट झाले. त्या वादकाला त्यांनी जवळ बोलावून घेतले. वादकाचा सात-आठ वर्षांचा मुलगाही होता. वाद्य वाजवायला सांगितलं. आम्ही दोन-तीन मित्र तिथे थांबून पाहात होतो. त्या गृहस्थाने वादकाला, पैसे देईन, वाजव म्हटले. पंधरा-वीस मिनिटे वाजवून झाले. तर गृहस्थ प्रसन्न होऊन वादनाचं कौतुक करीत थांबले. बराच वेळ झाल्यानंतर तो वादक गरीब चेहऱ्यानं 'साहेब, .... साहेब' म्हणू लागला. गृहस्थानं इशारा केला. त्यानंतर बराच वेळ गेला. गृहस्थाने त्रासिक चेहरा करून वादकाकडे जळजळीत नजर टाकून तोंड फिरवले. बिचारा वादक बाजूला झाला. मग थोड्या वेळाने आपल्या मुलास त्या गृहस्थाकडे पाठविले. तो लहानसा मुलगा 'बाबांनी पैसे' मागितलेत म्हणू लागला. त्यामुळे त्या गृहस्थाचा नूरच बदलला. 'अरे हे काय भिकाऱ्यासारखं. चल जा तिकडे बघू!' माझ्या अंगावर झर्रकन काटा आला होता. हा प्रसंग १९८७ नंतर २००६ साली मला अचानक आठवला. तो वादक म्हणजे सोलापूरचे सुप्रसिद्ध सुंद्री वादक कै. सिद्राम जाधव.

मन विकल करणारा असाच एक अनुभव एस.पी. कॉलेज (पुणे) मधला आहे. सन २००३ जानेवारीमध्ये दुपारी तीनच्या सुमारास सवयीनुसार ग्रंथालयामधील क्युबिकल्समध्ये वाचत बसलो होतो. साहाय्यक ग्रंथपालांनी बोलविल्याचा निरोप आला. मी तिकडे गेलो. 'रेफरन्स'मध्ये ग. प्र. प्रधानसर शांतपणे लहान मुलांच्या कुतूहलाने पुस्तकं न्याहाळीत होते. चेहऱ्यावर निरागस हास्य होतं. मी अमूक-तमूककडे गेलो. ते म्हणाले, 'प्रधानसर आले आहेत. तुमच्या नावावर त्यांना पुस्तकं देणार का ? कारण दोन-तीन पुस्तकं आम्ही भरून दिली आहेत. परवडत नाही त्यांना पुस्तकं देणं' मी फक्त हसलो. माझ्या नावे त्यांना पुस्तकं दिली. प्रधान रेफरन्समधून बाहेर आले. त्यांच्या पायांना हात लावले. नमस्कार केला. 'अरे, तुम्ही त्या तिथं बसता ना नेहमीच. काय नाव तुमचं? --- हा हा ते तुम्हीच होय. साहित्यसूचीमधले तुमचं लेखन मी वाचीत असतो. छान छान. लिहिते रहा.' प्रधानसर गेलेही. मला पैसे भरावे लागले नाहीत. एस.पी. कॉलेजला फार मोठी परंपरा आहे. तेथे प्रधान सरांसारख्यांची अशी गत... वाईट वाटले.

या एस.पी. कॉलेजमध्ये मी आठ वर्षे अर्धवेळ अधिव्याख्याता होतो. डॉ. शशिकला कांबळे १९९८ साली मराठी विभागप्रमुख झाल्या. मी अर्ज केला. त्यांची भेट घेतली. माझ्यासाठी त्यांनी शब्द टाकला. त्यांच्यामुळेच माझी तिथे वर्णी लागली. मला तशी चांगली माणसेच भेटत गेली. जी वाईट भेटली ती तर कुठे वाईट होती? त्यांचे फक्त माझ्या वाट्याला वाईट अनुभव आले. डॉ. कांबळ्यांच्यामुळे डॉ. नीलिमा गुंडी यांचा परिचय झाला. गुंडीबाईंनी मला 'भाषा आणि जीवन' मधून लिहितं केलं. परीक्षण करवून घेतलं. सलग चार वर्षे भाषाविषयक लेखनसूची करवून घेतली आणि अर्धवेळ आहे म्हणून मानधनसुद्धा छान देत. 'भाषा आणि जीवन' च्या सभांना-बैठकींना निमंत्रित करीत. त्यामुळे पद्मश्री रा. रा. अशोक केळकर सरांचा, श्रीमती मॅक्सीन बर्नसनांचा परिचय झाला. (या जर्मन विदुषी फलटणला फार छान शाळा चालवितात.) केळकर सरांना जवळून पाहता आले. भाषेच्या संदर्भात ते कसे विचार करतात, सहज बोलता बोलता कोणत्याही शब्दाची व्युत्पत्ती कशी सांगतात, पाश्चात्त्य साहित्याचं त्यांचं वाचन, प्रश्न कसे उपस्थित करावेत इत्यादी गोष्टी त्यांच्यामुळे समजत गेल्या.

'भाषा आणि जीवन' हे भाषेसाठी म्हणून कार्यरत असलेलं एकमेव नियतकालिक. पद्मश्री अशोक केळकर, डॉ. द. दी. पुंडे, डॉ. प्र. ना. परांजपे, डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. मृणालिनी शहा, आशा गुंडले आणि मॅक्सीन बर्नसन हे संपादक मंडळ. दोन महिन्यांतून एकदा घरी बसत. ज्यांच्या घरी ही बैठक असे त्यांच्याकडे चहापाणी होई. फार गंभीर चर्चा होत. सर्वजण आपापली मतं मांडत. खंडण-मंडण असंही कधी स्वरूप असे. पण एरवी कोणत्या भाषेत काय चालू आहे, याची सखोल चर्चा होई. मी अशा चार सभांना उपस्थित होतो. पद्मश्री केळकरसरांच्या घरी (प्रभात रोड) दोन वेळा गेलो आहे. गुंडीबाईंचं घर नंतर तर माझं घर वाटत होतं. ही मंडळी अत्यंत नि:स्वार्थपणे पदरमोड करूनही 'भाषा आणि जीवन' चालवीत होती. गुंडीबाई एकदा अंकाचा भला मोठा गठ्ठा घेऊन पोस्टात जात होत्या. मी एस.पी. गेटमधून पाहून म्हणालो, 'द्या ना मॅडम मी घेतो.' त्यावर बाई म्हणाल्या, ''अहो शिंदेसर, तुम्ही 'भाषा आणि जीवन'चे लेखक

आहात.'' बापरे! मी थक्क झालो. हे आपल्याला शिकायला पाहिजे असं मनात चमकून गेलं.

डॉ. द. दि. पुंडे हे ऋजू स्वभावाचं व्यक्तिमत्त्व. त्यांच्याकडेही मी अनेकदा गेलो. त्यांनी अनेकदा स्वत: चहा केला होता. सांडशीत आल्याचा तुकडा धरून अडकित्त्याप्रमाणे तो तुकडा ठेचून चहात टाकत बोलायचे. वाङ्मयेतिहासाच्या संकल्पनेची एक निश्‍चित समज आहे त्यांना. त्यांच्याशी २००२ सालामध्ये चर्चा करताना वाङ्मयेतिहासातील अनेक गोष्टी उलगडत गेल्या. तेव्हा माझे प्रश्‍न शिकविण्याशी निगडित होते. माझा होरा संज्ञा आणि संकल्पनेकडे असतो. त्या कळल्या की बाकी कळणं सहज होते. परंतु उदाहरणं फार होतात आणि मग मुद्दा पसरट होतो. हे वाङ्मयेतिहासातच काय अन्यत्रही वर्ज्यच असावयाला पाहिजे. साहित्याचा इतिहास, साहित्याची समीक्षा, साहित्याचे संशोधन या गोष्टी परस्पर भिन्न आहेत. हे वाङ्मयाच्या प्राध्यापकांनी जाणून घ्यावं म्हणणारे द. दि. पुंडे मंत्रालयातील नोकरी सोडून प्राध्यापक झाले होते.

अशा अनेक गोष्टी पुण्यात मिळाल्या. मी वारानुसार काही ठिकाणांहून फिरत असे. म्हणजे बुधवारी लक्ष्मीरोडच्या शेवटच्या टोकापर्यंत. तिथे एक आजोबा पुस्तके फूटपाथवर लावून बसत. सोमवारी बाजीराव रोडवर एकटे इमारतीच्या दगडी पायऱ्यांवर पुस्तके लावून बसत, डेक्कन जिमखाना रविवार, इंटरनॅशनल बुक स्टॉलसमोर त्यांचाच कर्मचारी बसे. अशा ठिकाणी कितीतरी चांगली पुस्तकं मिळाली, मासिकं मिळाली, कितीतरी विशेषांक मिळाले आहेत. केतकर विशेषांक असाच मिळाला आहे. 'Woman & Riverhood' हेही पुस्तक असंच मिळालं.

२००६ साली पुन्हा सोलापुरात आलो. दयानंद महाविद्यालय एस. पी. कॉलेज इतकेच तोलामोलाचं महाविद्यालय. मी तिथला माजी विद्यार्थी. सोलापुरातही विद्वान आहेत. आनंदाची गोष्ट अशी ते स्वयंमन्य विद्वान नाहीत. गो.मा. पवारसरांकडे गेल्यानंतर दरवेळी काही ना काही नवे मिळते. जे. कृष्णमूर्तींसारखे दिसणारे निशिकांत ठकारसर मितभाषी आहेत. एवढ्या तेवढ्या बोलण्यातही ते काहीतरी सांगून जातात. 'सकाळ' (सोलापूर आवृत्ती) चे माजी निवासी संपादक अरुण खोरे भला आणि दिलदार माणूस. त्यांचा परिचय झाला. मी त्यांना सांगून टाकलं – 'संपादक म्हणून तुमची ओळख वाढवीत नाही!' खोऱ्यांचा महात्मा गांधींचा अभ्यास उत्तम आहे आणि मला गांधीजींचे ओढ. गांधीसंदर्भात काही पाहिजे तर मी खोऱ्यांना फोन करी. खोरे हसत हसत सांगून टाकत. ते सोलापुरात आणखी असायला हवे होते.

साहित्याची समीक्षा करण्याचा माझ्यापरीने मी प्रामाणिक प्रयत्न करीत असतो. मी जी समीक्षा करतो ती सौंदर्यविश्‍लेषक आणि आस्वादक स्वरूपाची. लेखकाची सौंदर्याची आरास मांडणारी शब्दकळा मला आकृष्ट करीत असते. अनेक प्रतिमा आणि प्रतीकांचे अर्थ स्पष्ट होतात. याचे कारण लहानपणी खूप गोष्टी, कथा, कहाण्या गावात ऐकलेल्या आहेत. लोकसमज आणि लोकरूढी जवळून पाहिल्या आहेत.

खूप समीक्षा हातून झाली आहे, असे अजिबात नाही. जे थोडेसे केले ते मन:पूत केले. काही त्रुटी राहतातही. दोनदोन वाक्यांच्या पुष्टीची जोड नंतर द्यावी लागते. एकदा प्र. ना. परांजपेसरांनी माझ्या लेखातील त्रुटी मला सविस्तर कळवून म्हटले की, 'ह्या त्रुटी तुमच्याच असे नव्हे तर मराठी समीक्षेतच ह्या आहेत.' भालचंद्र नेमाडे यांना एक अप्रकाशित लेख धाडला. सध्या ते 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ'च्या तिसऱ्या आवृत्तीच्या घाईत नि 'हिंदू'च्या दुसऱ्या भागात व्यग्र आहेत. तरीही माझा 'फुटकळ' लेख वाचून जमेच्या बाजू सांगितल्या. पंधरा दिवसांपूर्वीच त्यांचं पत्र मिळालेलं आहे. मला विशेष आनंद झाला तो अशासाठी की एवढ्या मोठ्या लेखकाने आपल्या व्यापातून माझ्यासारख्याच्या नेमक्या गफलती लक्षात आणून द्याव्यात आणि दोन पानी पत्र लिहावं! काही कलावंत, लेखक माणूस म्हणून उत्तुंग असतात. तेव्हाच त्यांच्या निर्मितीमध्ये भव्य विशालता अनुभूती येते.

माझ्या प्रवासाला आता कुठे सुरुवात झाली आहे. 'वार्म अप' आता कुठे झाले आहे, आत्ताच कुठे धुक्यात लपलेले शिल्प दिसत आहे. त्या शिल्पाचं आत्मदर्शन घडविण्याकरिता प्रवास करावयाचा आहे.

स्नेही श्री. नितीन वैद्य यांचा आग्रह 'मी सोलापूरकर' सदरामधून मी लिहावं, सन २००२ पासून मला वाटत होते मी 'आशय' मधून एक पान तरी लिहू शकेन का ? पण वैद्यांनी माझा प्रवास लिहिण्याबद्दल सांगितलं. मी त्यात बदल करून कोणाकडून काय टिपत राहिलो तेच धुसरपणे इथे सांगितलंय. वाचन केवळ शालेय जीवनातील सांगितलंय. महाविद्यालयीन जीवनकाळातील व्याख्याने आणि पुण्यातील वास्तव्यकाळातील विद्वानांचा परिचय यामुळे माझ्यावर काय प्रभाव झाला हे न्याहाळण्याचा, अवलोकन करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्वांचं माझ्यावर ऋण आहे. त्याची उतराई शक्य आहे का? होईल काय?

० ० ०

मराठी विभाग प्रमुख
दयानंद महाविद्यालय, सोलापूर. भ्रमण ध्वनी ९२२६५९६३४६

# शुद्धि श्राद्ध

**सौ. मृणालिनी केळकर**



निर्मलेची तेरवी, उदकशांत सारे काही यथासांग आटोपले. तिच्या दशक्रियेसाठी जमलेली सारी नात्यागोत्यातली मंडळी आपआपल्या गावी परत गेली. आवराआवरी होऊन घर पूर्ववत निवांत झालं. 'आता मी आणि माझं हे घर – भलं मोठं घर. या घरात मी एकटा. आता हे घर खायला उठेल – अंगावर आल्यासारखं वाटेल – कसा राहीन मी इथे? एकटा? सोनाली पुन्हा येणार आहे खरी पण चार दिवसांसाठी... पुन्हा ती निघून जाणार होस्टेलला. पुढे एकटं राहायचंय या विचारानंच सदानंद उदास झाला. आता या उदास, विराण अवस्थेतच सारं आयुष्य घालवावं लागणार – दुसरं आहेच काय आपल्या आयुष्यात ? निर्मला गेली आणि आयुष्यातली चवच निघून गेली – आता उरल्या फक्त आठवणी आणि त्यामुळंच येणारी विषण्णतेची छाया – त्यातच सारं झाकोळून जाणार ... एक दिवस सरेल, दुसरा उजाडेल मग तिसरा ....

सदानंदच्या मनातली उदासीनता, एकाकीपणा रोज गडद होत राहिला. 'एकटा जीव सदाशिव' असं म्हणणारे मूर्खच! एकटेपणा कसा खायला उठतो हे ज्याचं त्याला कळतं – असेच विचार करता करता आठ दिवस गेले – आणि एका संध्याकाळी दारावरची बेल वाजली.

'चला सोनाली आली वाटतं, चला, तेवढेच चार दिवस बरं वाटेल' असं बडबडतच सदानंदानं दार उघडलं. दारात एक वयस्क स्त्री उभी होती. साधारण बांध्याची, अंगावर भारी साडी, मोजकेच दागिने – त्याला थोडं बाजूला करत, आत येत म्हणाली, ''अरे सदा, असा गोंधळलास का? मला ओळखलं नाहीस? तसंच असेल. तुझंही बरोबर आहे म्हणा – किती वर्षांनी आपली भेट होत्येय. एवढ्या वर्षांत किती न् काय काय बदललं.''

सदानंद विचारात पडला. पुसटसं काहीतरी आठवतंय... पण, नुकतीच व्हीआरएस घेतली आणि नुकतेच निर्मलेचं अचानक झालेलं निधन. मनावर ताण होताच... कुठे बरं पाहिलंय – काहीच कसं आठवत नाही आणि ह्या मला चक्क सदा म्हणतायत. सदानंद नाही – म्हणजे लहानपणीच्या कुणी शेजारच्या किंवा ताईची मैत्रीण? भांबावलेल्या सदानंदाकडे हसून बघत त्या म्हणाल्या,

''थांब उगीच गोंधळू नकोस – मीच आठवण करून देते.... तुला तुझा मित्र आठवतो का? लहानपणीचा मित्र – वसंत बर्वे. त्या वसंताची आक्का – वसंता मालक्का म्हणायचा मला आणि तू सुद्धा ......''

सदानंदानं डोळे विस्फारत नाकावर घसरलेला चष्मा वर सरकवला आणि डोक्यावर हात नेत म्हणाला, ''आता आठवतंय – हंऽ.''

वसंताची मालाक्का. गोऱ्यापान, कुरळ्या केसाच्या. सदानंदानं आता त्यांच्याकडे नीटपणे पाहिलं. आताही रंग तसाच होता. केस थोडे विरळ झाले होते. मधूनच एखादा रुपेरी केस चमकत होता.

''सॉरी आक्का... खूप वर्षं झालीत ना, म्हणून जरा विस्मरण झालं होतं. बसा ना – मी पाणी आणतो. घरात कुणी नाही, मी एकटाच आहे – आणि चहा की कॉफी, नाही म्हणू नका फक्त चॉईस सांगा.''

''कॉफीच पिईन – तुला माझ्या हातची कॉफी खूप आवडायची. मला आठवतंय् ... पण हे बघ सदा, आज नको मी उद्या येईन सकाळी पुन्हा ... तेव्हा नक्की – कारण आत्ता घाईत आहे.''

मालाक्कांना पाणी देत सदानंदनं विचारलं – ''आता पुण्यात कशा? इथे राहता?''

''– नाही. आजच आले पुण्यात सकाळी – इथे माझी धाकटी बहीण राहते. तिच्या मुलाचं लग्न आहे – ते झालं की मी जाईन.''

''मग नेहमी कुठे असता?''

''आता मी मुलाकडे असते दिल्लीला.''

''दिल्ली? एवढ्या दुरून मला भेटायला आलात?''

''अरे दिल्लीहून नाही आले भेटायला. पुण्यात आले म्हणून आले – घर शोधत. भाच्याला यायचंच होतं या भागात. म्हटलं घर शोधून ठेवावं – आजची लग्नाची गडबड आटपू दे – मी उद्या पुन्हा येईन, अशीच अकरा बारा वाजता. संध्याकाळी मग परत जायचंय. चल येते – म्हणत त्या उठल्याच. उद्या खूप बोलू. जुन्या आठवणी खडकपूरच्या, कलकत्त्याच्या – शिवाय तुला एक वस्तू पण परत द्यायचीय. वसंतानं मला दिलीय. किती दिवस झालेत माझ्याकडेच पडून आहे.''

''माझी कोणती वस्तू होती वसंताकडे आक्का?''

बघ तूच आठवून – तेवढ्यात बाहेरून गाडीचा हॉर्न ऐकू आला – ''चल येते मी, भाचा आलेला दिसतोय,'' म्हणत त्या बाहेर पडल्या देखील.

मालाक्का गेल्या खऱ्या पण त्याच्या डोक्यात एक किडा सोडून गेल्या–अशी कोणती वस्तू असेल? ज्यासाठी मालाक्का आवर्जून भेटायला आल्या, काहीच आठवत नव्हतं. त्या गेल्या तेव्हापासून सदानंदाचं लक्षच उडालं. आज जेवणा–खाण्यातही फारसं लक्ष नव्हतं. लवकरच सगळं आवरून तो समोरच्या व्हरांड्यातल्या छोट्या झोपाळ्यावर जाऊन बसला. झोके घेता घेता त्यानं आठवणींची संदूक उघडली....

वसंत बर्वे आणि सदानंदची ओळख कॉलेजातली. दोघेही खडकपूरच्या आय.आय.टी. शिकायला–दोघेही होस्टेलला. तसं म्हटलं तर वसंताची मोठी बहीण तिथेच होती. पण ती रेल्वे कॉलनीत राहायची. ऑफिसर्स बंगल्यात. बहिणीचे यजमान म्हणजे बडं प्रस्थ. मोठा हुद्दा. त्यांची शान. मनोहर परांजपे आणि त्यांचीच बायको म्हणजे वसंताची मालाक्का – घरातलं वातावरण सगळं वेगळं म्हणून वसंता हॉस्टेललाच राहायचा. सुट्टीच्या दिवशी दोघेही मालाक्काकडे जायचे. जेवणखाण गप्पा टप्पा ... कॉलेज शिक्षण पूर्ण झालं आणि जो तो आपल्या उद्योगाला लागला. सदानंदनी पुण्यात नोकरी घेतली आणि नोकरीची सारी वर्षं तिथंच काढली. आई–वडीलही त्याच्याकडेच राहायचे – त्यांचं मूळचं नगर केव्हाच सुटलं होतं. वसंता कलकत्त्यालाच राहिला. पण का कोण जाणे त्याचा जम बसलाच नाही. त्यानंतर लग्न झालं... अमेरिकेलाही गेला, परत आल्याचं कळलं पण फारसा संपर्क राहिलाच नाही. जो तो आपल्या विश्वात गर्क होता हेच खरं! आज मालाक्का म्हणाल्या त्याप्रमाणे अशी कोणती वस्तू वसंताकडे राहिली आणि जी मला आठवत नाही. होस्टेलमध्ये दोघेही एकमेकांच्या वस्तू वापरायचे – पेन, पुस्तकं वगैरे... परंतु आज पस्तीस चाळीस वर्षानंतर त्या वस्तूचं काय? अशी कोणती वस्तू जी परत नाही केली तर बिघडणार होतं? विचार कर करून सदानंदच्या डोक्याचा भुगा झाला होता.

अचानक एक गोष्ट आठवली.

अमेरिकेला जाण्यापूर्वी एकदा त्यानं बोलावलं होतं का? नाही त्या आधी – मालाक्काच्या यजमानांनी त्याला रेल्वेत नोकरी दिली होती. पोस्टींग राऊरकेल्याला होतं – त्याआधी भेटलो होतो. संध्याकाळी आम्ही व्हिक्टोरिया मेमोरिअलमध्ये गेलो – तिथे लॉनवर बसताच वसंता म्हणाला, ''सदा, तुझा सल्ला घ्यायचाय ... मी एकीच्या प्रेमात पडलोय.''

''कोण रे?''

''बंगाली आहे. आमच्या शेजारीच राहते – तूही ओळखतोस तसा... आता तू ग्रीन सिग्नल दिलास तर लग्नाची मागणी घालीन...''

‘‘काय पण तू .... अरे, लग्न तुला करायचयं की मला?’’

‘‘ते काही बोलू नको. तू सांग आणि मगच...’’

तेवढ्यातच एक सावळीशी भावूक डोळ्याची मुलगी आली. वसंतानं ओळख करून दिली. ‘‘ही देबलिना – देबलिना चक्रवर्ती – आणि हा माझा मित्र सदानंद – सदानंद बापट.’’

‘‘मैं पहचानती हूं इनको –’’

त्यानंतर बराच वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. थोड्या वेळानं उठत साडी झटकत देवी म्हणाली, ‘‘अब मैं निकलती हूं... देर हो जायेगी. मम्मी घुस्सा करेगी –’’ बंगाली उच्चारातलं तिचं हिंदी मजेशीर वाटत होतं. वसंताशी ती बंगालीत बोलली, ‘‘अरे सदा – देवीला तुझा फोन नंबर पत्ता हवाय – पण कागद –’’

मी माझी डायरी आणि पेन पुढे करत म्हटलं होतं ‘‘ह्यातला कागद घ्या फाडून –’’

तिनं डायरीची पानं उलटवून एका कागदावर पत्ता फोन नंबर लिहिला आणि निघून गेली –

ती गेल्यावर लक्षात आलं... अरे.... ती तर डायरीच घेऊन गेली...

‘‘असू दे. मी मागून घेईन उद्या – बरं तुला कशी वाटली सांग ना?’’

‘‘अरे – छान आहे. पण तिचं तुझ्यावर प्रेम असायला हवं ना? तसं काही जाणवलं नाही तिच्या वागण्यातून. शिवाय जातीचा प्रश्न आहेच ना?’’

‘‘तो तेवढा महत्त्वाचा नाही. कारण इथे बऱ्याच मराठी कुटुंबात बंगाली सुना आल्यात. प्रश्न फक्त तिचाच आहे.’’

दुसऱ्या दिवशी निघण्याच्या गडबडीत राहूनच गेलं. नंतर तोही विसरला पुण्याला आल्यावर – काही दिवसांनी वसंताचं पत्र आलं होतं – देवीनं त्याला नकार दिल्याचं. तिला सदानंद आवडला होता. पण वडिलांच्या नकारामुळे तिचं दुसऱ्याशी कुणाशी लग्न झालं होतं आणि ती आता कलकत्त्यातही रहात नव्हती.

सदानंदच्या मनात आलं – ती डायरी तर दिली नसेल, वसंताजवळ... असेल.

त्यानंतर वसंता प्रेमभंगामुळे खचला होता. त्यावेळी तरी त्यानं सदाला दोष दिला नव्हता आणि मग वसंताची भेट झाली ती त्याच्याच लग्नात – वसंता आवर्जून सदानंदाच्या लग्नाला हजर राहिला. जातीनं सगळ्या कामांत लक्ष घातलं. लग्न समारंभात आनंदानं भाग घेतला. त्याला हसताना बघून सदानंदालाही बरं वाटलं – चला, वसंता पुन्हा माणसात आला. सदानंदच्या पत्नीला बघून तो खूपच खुष झाला. त्यानं वारंवार सदाला हे बोलून दाखवलं. फक्त तिचं नाव बदललं तेव्हा जरा नाराजी दर्शवली. लग्नानंतर दोन–चार दिवस खूप गडबडीत गेले. रीतिरिवाज सत्यनारायण एक ना दोन.

चार दिवसानंतर वसंता परत जायला निघाला. निरोप घेताना म्हणाला, ‘‘सदा, लेका तू खरंच नशीबवान आहेस – असं तुझ्यात काय आहे ते मला माहीत नाही. बघ ना त्यावेळी देवी मला भेटायची ती तुझ्यासाठी. हे मला फार उशिरा कळलं. दारुण पराभव झालाय असं वाटलं, पण असूया नाही वाटली. तुझा रागही नाही आला. पण खरं सांगतो – आज मात्र मला



तुझा खरंच हेवा वाटतोय – निर्मलावहिनीसारखी बायको तुला मिळालीय. सुखानं संसार कर.'' – त्यावेळी वसंताचा मोठेपणा खूप भावून गेला होता. स्वत: दु:खी असूनही माझ्या लग्नात सामील झाला होता. मुख्य म्हणजे माणसात आला होता. मीही त्याला हसतमुखाने निरोप दिला आणि म्हटलं, ''वशा, चांगलीशी मुलगी बघून तुही लग्न करून टाक –''

''बघू,'' म्हणत त्यानं निरोप घेतला.

नंतर त्याच्या पत्रांचा ओघ सुरू झाला. पत्रातही निर्मलेविषयीच जास्त मजकूर असायचा. काही ना काही निमित्त काढून तो आमच्याकडे यायचा. त्याच्या आग्रहावरून आम्ही एकदा कोलकत्त्यालाही जाऊन आलो. प्रत्येक वेळी निर्मलेसाठी काही ना काही आणायचा. कोलकत्याची साडी तर असायचीच. एकदा मी त्याला म्हटलं होतं – ''आता लग्न कर – आता नोकरीतही स्थिरावलास आणखी उशीर कशाला?''

एकदा पुण्याला आला असताना जेवणाच्या टेबलवर निर्मलेनंही त्याला म्हटलं होतं, ''भावजी किती दिवस असे एकटे राहणार? आता लग्न करा – कशी हवी मुलगी – हवं तर मी शोधते?''

''खरंच शोधाल? मला अगदी तुमच्यासारखी मुलगी हवी. झेरॉक्स कॉपी – रिप्लीकाच! द्याल शोधून–''

''– असं कसं असेल, वसंता? एकसारखं असं कुणी नसतंच'' मी म्हटलं होतं

''भावोजी, माझ्याहूनही सुंदर मुलगी शोधेन तुमच्यासाठी – मग तर झालं? मग कराल ना लग्न?''

''वहिनी, तुझ्यापेक्षा सुंदर कुणी असूच शकत नाही आणि या जन्मात तरी तुम्ही मला मिळणार नाही – हा सदानंद मात्र नशीबवान. याच्याच मागे सुंदर सुंदर मुली लागतात ––– काय सदाऽ'' डोळे मिचकावत वसंता म्हणाला होता. नंतर जोरानं हसला... गायला लागला ... ''तेव्हा आता माझ्या लग्नाचा विषय सोडून दुसरं काहीही बोला.''

आम्ही खरोखरच, त्याच्या लग्नाचा विषय डोक्यातून काढून टाकला. त्यानंतर मात्र अचानक एक दिवस त्याचं पत्र आलं – ''सदा लग्न करतोय मी. आईसाठी म्हणून – दोघांनीही लग्नाला यायचं, म्हणजे यायचंच.''

त्याप्रमाणं दोघेही लग्नाला गेले होतो, चार दिवस राहून मजेत परतलो होतो. परत आल्यावर निर्मलेनं एक दिवस वसंताच्या बायकोबद्दल सांगितलं, ''अहो, त्यावेळी माझ्या वसंताच्या बायकोशी काही गप्पा झाल्या. मला भयंकर लाज वाटली हो ते ऐकून. ती मुलगी काय विचार करेल माझ्याबद्दल?''

''अशा काय गोष्टी झाल्या, नीट सांग बघू अशी कोड्यात बोलू नकोस.''

''वसंताच्या लग्नानंतर दोन दिवसांनी मी आणि सुधा बोलत होतो.... तेव्हा ती म्हणाली, तुमचं माहेरचं नाव चारुलता आहे ना? मग निर्मला का ठेवलं?''

''आमच्याकडे पद्धत आहे मोठ्या सुनेचं नाव बदलायचं. म्हणून निर्मला ठेवलं आणि ह्यांना निर्मलाच नाव जास्त आवडतं.''

''आणि ह्यांना चारुलता – तुम्हाला एक सांगू – ह्यांना तुम्ही खूप आवडता म्हणून आम्ही एकांतात असलो की मला ते चारुलताच म्हणतात. नेहमी तुमच्याच गोष्टी करतात.''

''काय सांगत्येस निर्मल?''

निर्मलेकडून सारं ऐकल्यावर सदानंदाच्या कपाळाला सूक्ष्म आठ्या पडल्या. गंभीर झाला. नेहमीसारखं हसण्यावारी नेलं नाही. उलट त्यावर म्हणाला, ''निर्मल, आता आपण वसंताशी संबंध तोडले पाहिजेत. हे जे तू सांगत्येस ते बरोबर नाही. माझंच चुकलं इतके दिवस – तो दु:खी आहे – तुझ्यामुळे पूर्वीसारखा खुलून आलेला बघून मी दुर्लक्ष केलं. तुलाही कित्येकदा त्याच्याबरोबर एकटीला बोलू बसू दिलं. चुकलंच माझं. निर्मल, आपण त्याच्यापासून दूर गेलं पाहिजे. नाही तर संसार मोडेल त्यांचा – बिचारी सुधा – काय विचार करेल?''

अंथरुणात पडल्या पडल्या सदानंदाच्या मनात अनेक विचार आले. खरंच प्रत्येक माणूस असाच असतो का? अशाच दोन शक्ती वास करतात का? माणूस बाहेर जसा वागतो तसा मनात असतोच असे नाही. स्वत:च्या एकांतात नेहमी सुप्त इच्छांना मोकळे सोडतो? आणि निर्मलेचं काय? तिच्याही मनात असं काही ... छट् ती नावासारखी निर्मळ आहे. उलट माझ्या सांगण्यामुळेच तर ती वसंताशी एवढी मोकळी बोलत होती... तरीही नकोच – हीच धोक्याची सूचना समजून निर्णय घ्यायला हवा... आणि तोही मलाच ...

त्यानंतर सदानंदनं तसा निर्णय घेतला, अंमलातही आणला. हळूहळू वसंताशी संबंध कमी केले. त्याला प्रत्यक्ष न सांगता – त्याच्या लक्षात आलं असेल नसेल पण लवकरच तो स्मृतीच्या कप्प्यात बंद झाला. पुढे तो अमेरिकेला गेला आणि त्या कप्प्याला टाळं लागलं.

आणि आज या मालाक्कामुळे त्या स्मृती मंजुषेचं कुलूप उघडलं होतं. अशी कोणती वस्तू आहे जी सदानंदाची आहे आणि ती वसंताकडे होती आणि आता मालाक्काकडे आहे आणि ती वस्तू परत देण्यासाठी म्हणून मालाक्का एवढ्या दूरवरून आल्या आवर्जून. समजा ती वस्तू सदानंदकडे परत केली नसती तर काही बिघडलं असतं का? एवढी महत्त्वाची आहे ती वस्तू? डोक्याला कितीही ताण दिला तरी सदानंदला काही म्हणता काही आठवत नव्हतं आणि मालाक्का मात्र त्याला कोड्यात टाकून गेल्या होत्या. त्या येईपर्यंत धीर धरणं आवश्यक होतं. ह्या एवढ्याशा गोष्टीनं सदानंद अगदी अस्वस्थ होऊन गेला. त्याची अस्वस्थता, त्याची घालमेल सोनालीच्या लक्षात आली होती. ''बाबा, काल मी आल्यापासून पाहते आहे – तुम्ही फार अस्वस्थ आहात. कसल्या तरी विचारात हरवल्यासारखे वागत आहात. काल त्या कोण बाई आल्या होत्या? मी आले तेव्हा इथे बसल्या होत्या – असं काय बोलणं झालं त्यांच्याशी? रात्री जेवलाही नाहीत नीट. चला आता आधी खाऊन घ्या – मी उप्पीट केलंय तुमच्या आवडीचं आणि औषधही घ्या. चला – खायला सुरुवात करा – आता आईसारखं नसेल जमलं उप्पीट पण पोट भरेल नक्की.'' मुद्दाम वडिलांच्या मनावरचा ताण हलका करण्यासाठी सोनाली म्हणाली.

स्वत:च्याच तंद्रीत असलेला सदानंद म्हणाला, ''तुझी आई होतीच तशी सुंदर तशीच सुगरण. तुझ्या आईच्याच आठवणी मनात दाटल्यात. सोनू – तुला ठावूक नाही आमचं लग्न झालं तेव्हा किती देखणी दिसायची... मी तिला बघायला गेलो होतो – तेव्हा सर्वप्रथम मनात भरले ते तिचे डोळे... टपोरे, मधाच्या रंगाचे– मधाळ नजर आणि लगेच पसंती कळवली.''

''बाबाऽ किती रोमॅन्टिक दिसता आहात आता बोलताना – जणू काही आता आईच समोर आहे?''

''अगं तिचं मुग्ध सौंदर्य तुम्ही पाहिलं नाही म्हणून असं बोलत्येस – चेष्टा करत्येस बापाची – चल आमलेट दे लवकर.''

''बाबा! आमलेट नाही उप्पीट केलंय. आत्ताच तर सांगितलं आणि रागवता काय? उद्या तर मी जाणार परत. बरं चालू दे तुमची लव्ह स्टोरी –''

''सोनू – आता मात्र ...''

''सॉरी, सॉरी .... बाबा माझं एक निरीक्षण सांगू?''

''सांग.''

''तीस चाळीस वर्षापूर्वी लग्न झालेली जोडपी जरा जास्तच रोमॅन्टिक होतात का हो ... काय असेल कारण. माझ्या मनात आलंय या विषयावर लिहावं – काय कारण असेल?''

''कर तुला काय करायचं ते – मला कळतोय तुझा टोला. पण जाऊ दे, माफ कर दिया. तुझ्या आईसाठी, निर्मलेसाठी – सोनू तू झालीस ना तेव्हा तर तिचं सौंदर्य अंगोपांगी ओसंडत होतं. पण तिचा सारा अवखळपणा मात्र लुप्त झाला. अल्लडपणाही गेला – ती एकदमच बदलली. शांत, गंभीर झाली तुला वाढवताना ....''

'' तिचा सारा अवखळपणा तिनं मला देऊन टाकला वारसा हक्कान'' मिस्किल हसत सोनाली म्हणाली.

''हे मात्र बरोबर बोललीस. तू आहेसच तशी वात्रट'' जोर जोरानं हसत सदानंद म्हणाला.

''चलाऽ हसलात एकदाचे... आता मला काळजी नाही.''

''नाहीतर दिवसभर बाहेर कामात राहिले असते तर घरात तुम्ही एकटे म्हणून काळजी वाटत राहिली असती.''

''आणि तू उद्या गेल्यावर... एकटाच असणार आहे ना? पण आज एकटा नाही – ती कालची मालाक्का येणार आहे ना आताच – अकरा-बारा वाजता येईल.''

''मग ठीक आहे.''

सोनालीनं सगळं आवरलं आणि ती बाहेर पडली. सदानंद टीव्हीवरच्या बातम्या बघत बसला. कान मात्र दाराकडे – केव्हा बेल वाजत्येय – कुक्कुनं अकरा वेळा कुक्कु केलं घड्याळाच्या बाहेर येऊन आणि डोअरबेल वाजली.

सदानंदानं उठून दार उघडलं – मालाक्काच होत्या.

त्यांना आत यायला वाट देत सदानंदनं म्हटलं, 'या आक्का.' त्या आत येताच त्यानं पंख्याचा स्पीड वाढवला.

टेबलावरच्या ग्लासात पाणी ओतून पाणी दिलं. आणि म्हणाला, ''बसा जरा आरामात – आत्ता कॉफी आणतो – सोनालीनं करूनच ठेवलीय –''

''सोनाली?''

''मुलगी माझी. काल तुम्ही बाहेर पडत होतात आणि ती आली – आईच्या दिवसांसाठी आली होती. इथे नसते पीएच.डी. करत्येय – तिकडे जर्मनीला. उद्याच जायचीय.''

सदानंदानं कॉफीत दूध टाकलं, कॉफीचे मग, बिस्किटं, चिवडा असं सगळं डिशमध्ये ठेवलं आणि ट्रेत ठेवून बाहेर आला.

मालाक्का भिंतीवरचे फोटो बघत होत्या –

''वाऽ घर तर छान सजवलंस – कुणाची आवड?''

''हे सगळं निर्मलेनच केलं.''

कॉफीचा घुटका घेत मालाक्का म्हणाल्या, ''वाऽ तू अजून

माझी कॉफी विसरला नाहीस वाटतं?''

''हो, तुम्हीच मला मद्रासी कॉफीची सवय लावली. माझ्याकडेही आहे कॉफी फिल्टर. मालाक्का – तुम्ही काही सांगणार होतात, काही देणार होतात ... नाही म्हणजे सोनाली परत येण्यापूर्वी...''

''अरे हो रे – सगळं सांगते ''– नेहमीच्या सवयीनं डावा खांदा उजव्या हातानं चोळत म्हणाल्या. ''अरे सगळं सांगायला गेलं तर वेळ कमी पडेल एवढं पुराण आहे! पण मी थोडक्यात सांगणार आहे'' – थोडं थांबून त्या म्हणाल्या – ''वसंता जीवनात फार सुखी नव्हता. त्याची बायको तशी बरी होती दिसायला, वागायला – अरे हो तू तर पाहिलं आहेसच तिला. लग्नाला आला होतास की – तुमच्या दोघांचं नेमकं काय बिनसलं मला माहिती नाही – मी सुद्धा संसाराच्या रामरगड्यात, ह्यांच्या बदल्यामुळे अडकलेली – त्यामुळे मला लक्ष द्यायला वेळच नव्हता. पहिल्या पहिल्यांदा त्यांच्यात नुसत्या कुरबुरी होत्या – मुलगी झाली तेव्हा वाटलं आता स्थिरावतील... पण उलटंच झालं. एकदा मी गेले होते समजावायला. पण नाहीच जुळलं.''

सदानंदाची उत्सुकता वाढली – पण मालाक्का कोणती वस्तू देणार, त्या विषयावर केव्हा येतात याची तो वाट पाहू लागला... तरीही त्यानं प्रश्न केला – ''मग आता कसं?''

''– कसं काय – सगळंच संपलं. जेमतेम पाच–सहा वर्षे राह्यली – मग माहेरी निघून गेली – पुढे घटस्फोटही झाला. त्यांच्या धुसफुसीची मला थोडी कल्पना होती. पण माझ्याही सारख्या बदल्या व्हायच्या. त्यामुळं माझा संपर्कच राहिला नाही. एकदा आमच्या कॉमन मित्राकडून कळलं होतं तो अमेरिकेला गेल्याचं... पुढचं माहीत नाही.''

''मालाक्का, तुम्ही काहीतरी देणार होतात... माझं काहीतरी हरवलेलं, राहिलेलं असं तुम्ही म्हणाला होतात काल ... मी खूप आठवायचा प्रयत्न करतोय पण काहीच आठवत नाही. अशी कोणती अमूल्य वस्तू आहे की तुम्ही अगदी काळजीपूर्वक सांभाळली आणि मला द्यायला आलात.''

''हो, त्यासाठीच तर आलेय. तेव्हाच दिली असती, दोन वर्षांपूर्वी वसंतानं दिली तेव्हा. पण पत्ता नव्हता तुझ्या नवीन घराचा. पुण्याला यायचं ठरवलं तेव्हा बहिणीला सांगितलं तुझा पत्ता शोधून ठेवायला. तिनं शोधून ठेवला... आणि आले. काल आले तेव्हा निर्मलेच्या फोटोला हार घातलेला बघून जरा चरकलेच... म्हणून काल तशीच परत गेले...''

बोलता बोलता त्यांनी मनी बॅग उघडली आणि एक जाड पाकीट त्याच्या हातात ठेवलं. ''चला सुटले बाबा वसंताच्या वचनातून... हं ठेव सांभाळून तुझी हरवलेली ठेव...''

उत्सुकता होती तरी पाकीट न उघडता तो म्हणाला, ''मालाक्का, तुम्ही तर काही घेतलंच नाही.'' डीश पुढे केली सदानंदानं.

''नको अरे– लग्नघरी सारखं खाणंच चाललंय...'' थोडं थांबून मोठाऽ श्वास घेत त्या म्हणाल्या. ''आता अगदी मोकळं वाटतंय रे – आता त्याच्या वचनातून मोकळे झाले – वसंतानं मला सगळं सांगितलं होतं... पण आता तुला ते सांगायची गरज वाटत नाही. जेवढं सांगितलं तेवढंही सांगायच कारण म्हणजे आता दोघेही नाहीत – निर्मलाही आणि – ''

''नाहीत म्हणजे?''

''वसंता दोन वर्षांपूर्वीच गेला. शेवटचा अटॅक मॅसिव्ह होता.''

सदानंदाचा चेहरा म्लान झाला. खूप व्यथित स्वरात म्हणाला, ''मालाक्का, ... खरंच सांगतो मला या कशाचीच कल्पना नव्हती. नाही तर...''

''कशी असणार? तुमचे मैत्रीचे बंध उरलेच नव्हते. मला सगळं सांगितलं होतं वसंतानं. खरंच वेडा खुळा होता. शेवटचा ॲटॅक येण्यापूर्वी मला फोन करून बोलावून घेतलं होतं. त्याला बहुधा मृत्यूची चाहूल लागली होती. त्याचवेळी हे पाकीट माझ्या हवाली करत, तुझ्यापर्यंत ते पोचवायचं वचन माझ्याकडून घेतलं होतं. तरीही वारंवार तेच बोलत होता. म्हणाला, 'आक्का, हे सदानंदला दे. मी त्याचा अपराधी आहे. माझ्या मृत्यूनंतर तरी मला मुक्ती मिळायला हवी. खूप वेळ स्वतःच्या हृदयाशी धरून त्यानं हे पाकीट माझ्या हाती ठेवलं.''

''मला कळलं नाही आक्का, 'माझा अपराधी? म्हणजे याचा अर्थ?''

''या पाकिटात जे काही आहे ते त्यानं तुझ्या घरून चोरलं होतं. तुझ्या नकळत. तुझ्या ते लक्षात आलं नसेल. बघतोस का उघडून? मी कधी बघितलं नाही. धीर झाला नाही आणि थोडीफार कल्पना आली होती...''

''नको असू दे, पाहीन सावकाश नंतर...'' थोडंसं भोवळ आल्यासारखं वाटलं, छातीत धडधडलं... स्वतःवर ताबा ठेवत सदानंद म्हणाला, ''आक्का, तुमची भेट झाली नसती तर कळलंच नसतं वसंताबद्दल...''

''हो, मलाही बरं वाटलं... सुटले एकदा वचनातून. आयुष्यभर स्वतःला त्रास करून घेत जगला. आता मृत्यूनंतर

तरी शांती मिळेल. चल, आता मला निघायला हवं. कधीही एकटेपणाचा कंटाळा आला तर ये माझ्याकडे – दिल्लीला. सून चांगली आहे, माणसांची आवड आहे – कंटाळा नाही आल्या गेल्याचा.''

सदानंदानं मालाक्कांना नमस्कार केला – ''तुम्हीही या पुन्हा निवांत सवड काढून...''

''बरं – काळजी घे –'' हात हलवत त्या बाहेर पडल्या.

मालाक्का गेल्या तरी सदानंदानं ते पाकीट उघडलं नव्हतं. आता त्याला मनस्वास्थ्य घालवणारं काहीही नको होतं. सोनाली जाईपर्यंत संयम ठेवायला हवा. अप्रिय काही असलं तर? भीती वाटत होती... म्हणूनच... तो एकटा असताना त्याला ते उघडायचं होतं... बेडरूममध्ये जाऊन उशीखाली ते ठेवून आला... आणि मनातली अस्वस्थता घालवण्यासाठी त्यानं टी.व्ही. ऑन केला – म्युझिक चॅनलवर जुनी गाणी ऐकत बसला. सोनाली आलीच. संध्याकाळच्या आतच. मनातली खळबळ दिसू न देता त्यानं विचारलं – ''काय ग झालं काम? लवकर आलीस?''

''हो झालं! – पण बाबा मला आजच रात्रीची फ्लाईट घ्यावी लागणार आहे. आत्ताच मेसेज आलाय मला – मी उद्याचं तिकीट कॅन्सल करून आजचं घेऊनच आले. बाबा, एक दिवस आधीच जाते म्हणून रागावू नका हंऽऽ.''

''छे ग, रागावेन कशाला. आज काय अन् उद्या काय – बरं किती वाजता निघणार आहेस?''

''दोन तास आधी रिपोर्टिंग म्हणजे साधारण दहा साडे दहाला निघेन.''

'चल मग आपण जेवून घेऊ आणि बसू गप्पा मारत. तू गेलीस की मग जाईन झोपायला सगळं बंद करून.''

''चालेल. त्या आधी मी माझं सामान आवरून घेते.''

पाणी प्यायला ती डायनिंग टेबलशी गेली तेव्हा अन्न तसंच, झाकून ठेवलेलं होतं.

''हे काय तुम्ही जेवला नाहीत दुपारी?''

''नाही ग भूकच नव्हती. आता लवकर जेवू ना. काही बिघडत नाही एक दिवस जेवलं नाही तर या वयात.''

''बाबा, तुम्ही पण.....''

सोनालीला निरोप दिला आणि सदानंद आत आला. आता तो एकटा होता. त्याच्या परीक्षेचा क्षण जवळ आला होता. होय परीक्षाच. कारण पाकिटात काय असेल यावर त्याचं पुढचं वागणं, उत्तर होतं –

त्यानं त्वरेनं सगळ्या खिडक्या, दारं बंद केली. बेडरूममध्ये जाऊन पाकीट आणलं. वरचा कागद फाडून पाकीट मोकळं केलं. पाकिटातल्या वस्तू बाहेर काढल्या... काही फोटो... एक लेडीज रुमाल आणि आणखी एक निळं पाकीट. त्यावर लिहिलेलं, 'माय लव्ह – चारुलता.' पाकीट उघडून आतला फोटो बाहेर काढला. निर्मलेचा फोटो ... ब्लॅक ॲन्ड व्हाईट लग्नापूर्वीचा. लांबसडक केसांची वेणी पुढे घेतलेली, त्यावर गजरा आणि सुंदर रेखीव चेहरा – पूर्णाकृतीचा फोटो – ब्लॅक ॲन्ड व्हाईटमुळे डोळ्यांचा मधाळ रंग कळत नसला तरी मधाळ नजर कळत होती. डोळ्यात स्वप्नं होती, ओठावर लाजरं लाडिक हसू होतं – अरेच्चा! हा तोच फोटो – निर्मलेचं म्हणजे चारुलतेचं स्थळ सांगून आलं तेव्हा तिच्या वडिलांनी पाठवलेला – पण हा फोटो तर अगदी दृष्टीआड असायचा, सहजासहजी सापडणारा नव्हता – मग? वसंतानं चोरला केव्हा की निर्मलेनच दिला? नाही – शक्यच नाही. रुमाल निर्मलेचाच होता. इतर फोटो कलकत्त्यात काढलेले सर्वांचे – निर्मलेचा फोटो त्यानं पुन्हा पुन्हा पाहिला – काही तरी वेगळं जाणवत होतं. पण समजत नव्हतं. त्यानं उठून भिंग आणलं आणि पाहिलं – अंगावरच्या पदराच्या चुण्यातली बारीक अक्षरं दिसली – वसंत–चुणीबरोबर हृदयाशी येत होती – ती अक्षरे पाहताच सदानंद चित्कारला, ''वसंताऽ विश्वासघातक्या ... अरे, तुझी पापी नजर माझ्या निर्मलेवर पडली. तिला मलीन करून गेली... अरे माझी निर्मला किती निष्पाप होती तुला ठाऊक नाही... आणि तू तिची अशी विटंबना केलीस? मालाक्कांनी सांगितलेलं त्याला आठवलं – हे पाकीट तो सतत छातीशी धरायचा. फोटोत का होईना त्यानं कुठे कुठे स्पर्श केला असेल? फोटोची चुंबनंही घेतली असतील... छे छे निर्मला आता नाही म्हणून काय झालं. मृत्यूनंतरही तिला निष्कलंक ठेवलं पाहिजे – ती पवित्र होती. निर्मळ होती. मृत्यूनंतरही तशीच राहायला हवी.

सदानंद उठला. टेबलावरच्या मेणबत्ती स्टॅन्डमधील मेणबत्ती त्यानं पेटवली. नकोच म्हणत पुन्हा विझवली. देवघरात आला – देवापाशी नंदादीप जळत होता. त्यानं तो खाली काढला आणि ज्योतीवर निर्मलेचा फोटो धरला. नंतर बाकीचे फोटो, रुमाल वगैरे ... निर्मलेऽ आज खऱ्या अर्थानं तुझं शुद्धि श्राद्ध झालं. आत्ता खऱ्या अर्थानं मी तुला मुक्त केली......

० ० ०

सौ. मृणालिनी केळकर
३१, न्यू वर्मा लेआऊट, नागपूर

# ‘डांगोरा एका नगरीचा’ : पत्रसंवाद

*‘डांगोरा एका नगरीचा’, ही व्यासंगी कादंबरीकार, समीक्षक त्र्यं. वि. सरदेशमुख यांची महाकादंबरी एप्रिल १९९८ मध्ये प्रसिद्ध झाली. तिला २००३ सालीचा केंद्रीय साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला. त्याआधी १९९९ मध्ये राज्य सरकारचा ह. ना. आपटे पुरस्कार आणि केशवराव कोठावळे पुरस्कार, २००१ साली प्रियदर्शिनी अकादमीचा पुरस्कार तर २००२ साली वसंतराव नाईक ट्रस्टचा पुरस्कार मिळाला.*

*‘डांगोरा...’ हा सरदेशमुखांनी लिहिलेल्या कादंबरी त्रयीचा मधला भाग. पहिला भाग ‘बखर एका राजाची’. ही नावाप्रमाणेच रघुवीरसिंह या मनस्वी राजाची शोकांतिका. शेवटचा ‘उच्छाद’ ही ‘वक्रबुद्धीची माणसे करतात तो अन्याय आणि दुराचार सहन करीत जगावे लागल्यामुळे भणंग झालेल्या देसाईच्या मुलाची, श्रीधरची कथा तर ‘डांगोरा...’ या दोन्ही टोकांमधल्या विशाल, जनसमूहाची कथा. तिन्ही कादंबऱ्यांना स्वतंत्र आस्वादमूल्य आहे, तरी त्यांच्यात एक अंत:सूत्र आहे. सरदेशमुखांनी म्हटलेय, ‘खळांची वक्रता आणि त्यांच्या अधर्मकरणीचे दुरित अनादि आणि अविनाशी आहेत काय? त्यांनी मानवी जीवनाला ग्रासू नये म्हणून सत्पुरुषांनी केलेल्या प्रार्थना आणि धावे आकाशात कुठवर पोहोचत असतील? कुणाच्या अंत:करणात करुणेचा रिघाव होत असेल.’*

*ज्याने त्याने स्वत:लाच कौल लावावा अशी ही निरंतराची व्यथा आहे.*

*या तिन्ही कादंबऱ्यांच्या लेखनकालाची नोंद सरांनी अशी केली आहे.*

*बखर – लेखन : जुलै ७० ते मार्च ७१ (प्रकाशन – नोव्हेंबर १९७२)*

*उच्छाद – लेखन : १९७५–७६ (प्रकाशन – ऑगस्ट १९७८)*

*उत्तरकांड – लेखन जून ८७ – १६ जून १९९५*

*टिपणे – १९८१–८४*

*या उत्तरकांडाची नावं पुढे गिरफ्तार, अंत:पुर, भयारण्य, लाव्हा अशी बदलत शेवटी ‘डांगोरा एका नगरीचा’ हे ‘बखर एका राजाची’ शी मिळतेजुळते नाव सरांनी नक्की केले. त्यांच्या टिपणांना दिलेली शीर्षकंही अन्वर्थक आहेत. १) मध्यान्ह २) अस्तास जाता जाता ३) ग्रहणवेळा. मग तपशीलवार नोंदी. इतक्या की एका पानावर फक्त इंडियन पीनल कोडचे वेगवेगळे नंबर्स, त्यांची कलमं, गुन्हे आणि त्याअंतर्गत होऊ शकणाऱ्या कमाल शिक्षा यांचीच यादी. पुढे कादंबरीत घडणाऱ्या, घडू शकणाऱ्या घटनांची क्रमवार नोंद, त्याचवेळी राज्यात, देशात, जगात घडत असलेल्या समांतर घटनांच्या नोंदी, इंग्रजी तारखांना समांतर मराठी तिथ्या, महिने, शक...*

*त्या ‘डांगोरा... एका नगरीचा’ या कादंबरीसंबंधाने आलेल्या ढीगभर पत्रातल्या निवडक पत्रांचे (पत्रांमधील व्यक्तिगत भाग वगळला आहे) हे संकलन, संदर्भाच्या दृष्टीने सोईचे व्हावे म्हणून केलेले...*

*संपादन, संकलन : नीतीन वैद्य*




**अशोक नायगावकर, मुंबई**
**दि.४ नोव्हेंबर १९९८**

**‘डांगोरा’ येत आहेची चाहूल होती. एका ग्रंथप्रदर्शनात दोन हातांनी प्रच उचलून धरली, ती वजनदार लागली. खूप मोह झाला घेण्याचा पण परतीचा प्रवास असल्याने खेदाने टाळले. कालच्या सोमवारला पुस्तक घराशी आले. प्रथम मुलीला छान वेष्टन घालायला सांगितले. जामखेडला नामदेव पुरस्कारानिमित्त दत्ता हलसगीकरांकडे विषय निघाला होता. मी किमतीबाबत थोडा सूर लावला, तर म्हणाले, ‘अहो, पाचशे पानाचेवर पुस्तक आहे. प्रत्येक ओळीशी थांबायला होते.’**

**बखर वाचून बराच काळ लोटला. मध्यंतरी रामदासाच्या कविमनाचा काहूर वाचला होता. अगदी राजवाड्यांपासून, आळतेकर, पेंडसे, माटे साऱ्यांचे वाचन झाले होते, पण तरी** सनावळ्यांची रास ओलांडून रामदास समजले मात्र तुम्हाला! आपणास अधिक काही कळले याचे भरते आले.

पुस्तक हाती घेतले आणि शंभर सव्वाशे पाने वाचून झाल्यावर कविवर्य शंकर वैद्यांना फोन केला. विसाव्या शतकातल्या एका अनमोल अशा सृजनाच्या सहवासात आलो, असेच गाडीत बसून सोलापुरी उतरावे, एक शाल आणि श्रीफळ घेऊन व्यासाचा प्रतिभेची साक्ष देणाऱ्या थोर प्रतिभावंतास साष्टांग नमस्कार घालावा, असे वाटले. वैद्य सर म्हणाले, ‘हे जे तू आता माझेशी बोलतोस, तसेच पत्र घाल!’

वखवखल्या व्यापाऱ्यांच्या काँक्रीट इमारती, एस्टीडी फीस्टीडी, गच्च वाहने आणि इथूनतिथून, अहोरात्र गजबजलेली खाण्यापिण्याची दुकाने आणि वीज सोडले, तर आपण सर्व साईखेड्यातच आहोत. देवभोळे, कर्मठ, करारी, बदमाष, प्रियाराधक या साऱ्या रसायनाबरोबर सत्ताराजकरण हा मनाचा उत्सव इथूनतिथून सर्वत्र अमाप आहे.

> संवाद आणि घटितांच्या मधल्या विश्लेषणाचे पारायण करत रहावे;
> एक चातुर्मास ‘डांगोरा’ लावावा;
> समाजसत्तेत असलेल्या साऱ्यांना एकेक प्रत वाचायला द्यावी;
> पत्रकारिता तर दूरच, असो, पण जे काही निर्मितीच्या मांडवाखालून मिरवणं चालू आहे त्याच्यासमोर दिवा लावून ही कादंबरी ठेवावी.

मी मागे एकदा सुमती देवस्थळ्यांचे ‘टॉलस्टॉय-एक माणूस’ वाचले, आणि काय योगायोग, मौजेतून पेंडश्यांचे आत्मवृत्त ‘एक लेखक माणूस’ आणले तेव्हा एकदम भिंतीवर डोके आपटल्यासारखे झाले होते.

‘वरमेको गुणीपुत्रो’ सारखे अस्सल काही हाती लागले. फापटपसाऱ्याचे दिवाळीचे दिवे समोर चवड धरून पडलेत. आता लवकर त्या दिवाळी अंकांना हात घालायचे धाडस होईलसे वाटत नाही.

एक विशाल पट, त्यातील वेगवेगळ्या रसायनांची पात्रे आणि मधली बाणासारखी रुतणारी वाक्ये, या साऱ्या निर्मितीला केवढे अपार कष्ट, चिंतन लागले असेल, याने थक्क व्हायला होते. सोलापुरी वस्तीला राहून सारे सोलून काढलेत जगणे. छोट्यामोठ्या कहाण्या, विविध वयातील भावस्थिती याला कवेत घेणारे बरेच काही आवडले, नाही असे नाही, पण काळोखाची

भव्यता काय असते, ते मराठीला या शतकात तुम्ही दाखवलेत.

पाऊस आला म्हणून पावसाची गाणी म्हणायची आणि उन्ह पडलं म्हणून त्याचे विभ्रम आळवायचे, अशा झडीमंडळात वावरणारे आम्ही, तुमचा साक्षेप आणि या निर्मितीमागची विशाल प्रज्ञा, तिच्यासमोर नतमस्तक व्हावे. आपल्या मनाला जे सुन्न करून दीर्घकाळ छाया धरून राहते, तीच आवडी होऊन बसते. सत्तरी ओलांडलेले भास्करबुवा -गजाननराव जोश्यांसारख्या बुजुर्गांनी उत्सवाच्या शेवटी मोजक्या उरलेल्या मंडळीसमोर मुरलेले गाणे आणि विलंबिताचे रंग भरावेत, तसे तुमचे पुस्तक!

मी एक लहान कवी
या शतकाचा कडुसा पडत आलाय,
पण तुम्ही दीपस्तंभासारखे काही दिलेत..
या तुमच्या ईश्वरी प्रतिभेला माझे नमन...

*

**रविप्रकाश कुलकर्णी**

**१६ नोव्हेंबर १९९८**

**'डांगोरा' वाचल्यापासून लिहीन, लिहीन म्हणतो आहे. पण वाचनाने इतकी सुखद अस्वस्थता आली आहे, की यावर लिहीणं कठीण वाटायला लागलं. गेल्या कित्येक वर्षात एवढं अस्वस्थ करणारं लेखन वाचायला मिळालं नव्हतं. एखादं भीषण नाटक संपवावं आणि मग येते ती नि:स्तब्धता तसं काहीसं वाटतं... वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना म्हणतो साहित्य अकादमी पारितोषिक मिळावं, इतकी दर्जेदार ही कादंबरी आहे. तुम्ही दिलेल्या आनंदाबद्दल कृतज्ञ आहे.**

**आणखी काय लिहू!** काही आनंद व्यक्त करता येत नाहीत. शब्दांचं ओझं होईल त्याला, असं वाटतं...

*

**श्रीकांत चित्रे, डोंबिवली**

**८ मे १९९९**

**मंत्रालयातून निवृत्त झालेला मी एक शासकीय कर्मचारी. वाचनाचा छंद विद्यार्थी दशेपासूनच. त्यामुळे सर्व व्याप संभाळून इंग्रजी-मराठी साहित्य वाचतो. तथापि गेली काही वर्षे मराठीत मनाला समाधान देईल, असे साहित्य मिळू शकत नाही, या अनुभवाने** (शिवाय अधुदृष्टी...) वाचन जवळजवळ थांबवले होते. तथापि आपली 'डांगोरा एका नगरीचा' ही कादंबरी हातात घेतली अन् झपाटल्या सारखी ३-४ दिवसांत संपवली.. तरुणपणी मी असे झपाटून वाचायचो. तद्नंतर कित्येक वर्षांनी अशी मनोवेधक, सकस, भाषाशैलीने डौलदार, दिमाखदारपणा प्राप्त झालेली, एखाद्या जुन्या काळच्या वैभवसंपन्न महाराणी सारखी भारदस्त कादंबरी वाचायला मिळाली. वाचनाचा असा अवर्णनीय आनंद दिल्याबद्दल आभारी आहे.

*

**संजय रानडे, घाटकोपर मुंबई**

**९ मे १९९९**

**आपली 'डांगोरा एका नगरीचा' वाचली अन् बेचैन झालो. पाश्चात्त्य संगीत लिनीयर असतं, असं म्हणतात. याउलट आपल्याकडलं वर्तुळाकार असतं. आपण समेवर येण्यासाठी खटपट करतो. ते स्वराला स्वर जोडून कहाणी रचतात. ती मेलडी आणि आपला रिद्म यांचा अतिशय सुरेख संगम तुमच्या कादंबरीत आहे. असंख्य लाटांसारखं जीवन तितक्याच विविधतेत अप्रतिमप्रकारे मांडलंत तुम्ही.**

**डांगोरांत मला सर्वात जास्त आवडला तो शेवट. तो वाचकाला डिवचतो, धक्का देतो. कारण तो शेवट नाहीच मुळी. जीवनात ज्याप्रमाणे सगळंच भव्य, अनंत, न संपणारं असतं तसं तितक्याच भव्य दिव्य पद्धतीने या कथेच्या शेवटी तुम्ही मांडलंत. देसायांचं पुढे काय? फौजदाराचं पुढे काय? राणीचा आत्म सन्मान जागतो का? जजचा मुलगा गेला, आता तो निर्णय बदलेल काय? एकदम शेवटी वाचकच ही पात्रं होऊन बसतो. खरंच मला देसाई, फौजदार होता येईल!** माझ्यात जज आहे कुठेतरी... राणीसुद्धा... याची खूप प्रकर्षाने जाणीव होते न् मन घाबरं होतं. त्याच्याच मनातलं साईखेड वाचकाला दिसायला लागतं. मी साईखेडच आहे, माझ्या आजच्या अवस्थेची कारणंही तीच. शेवटी तुम्ही सगळी जबाबदारी वाचकावर सोपवता, एक आव्हान करता. ग्लास भरलेला आहे का नाही, याचा निर्णय वाचकावरच तुम्ही सोपवता. आयन् रॅण्डच्या 'फाऊंटनहेड' ची आठवण झाली.

काही ठिकाणी कंटाळा आला. खूपच जास्त माहिती देताय असंही वाटलं, मग पानं खाल्ली, पण पुस्तक संपवलं आणि उगाच रुखरुख लागून राहिली, नक्की काही महत्त्वाचं त्या पानात असणार, आता सगळं मी पुन्हा वाचणार आहे. भगवद्‌गीता

वाचल्यावर माणसामाणसातल्या कुरूक्षेत्राची जाणीव होते, तशीच साईखेडबद्दलही होणार. शब्द न् शब्द पाठ होईतो ही कथा वाचावी लागणार.

मला तुमची कादंबरी इंग्रजीत वाचायला आवडेल, मी तशी सुरुवात केलीये. अनुवाद करताना दोन गोष्टी होतात, दोन्ही भाषा सुधारतात.. लेखक कोणत्या प्रक्रियेतून गेला असेल याचा अंदाज येतो.. मला त्यात गंमत वाटते. जमेलच असं नाही, पण शिकायला खूप मिळेल.

(२) (१८ जुलै ९९)

तुमचं पत्र मिळालं. अनुवादावर खूप मेहनत घ्यावी लागेल, हे मला माहीत आहे. मेहनत, वेळ आणि खूप संयम. मी तयार आहे. मला खरंच वाटतं, साईखेडला इंग्रजीत वाचक आहे. इतिहास, राजकारण, आपली समाजव्यवस्था, त्यातली गुंतागुंत, या सगळ्यांतून घडणारा आपला प्रवास यात जे थ्रिल आहे, त्याचा आजच्या पिढीला फारसा अनुभव नाही. इंग्रजीचा वाचक मुळात शहरी. शहरीकरणाबरोबर येणारे सगळे चांगले, वाईट अनुभव त्याला आलेले... त्यातून अनेक प्रश्नांना हा वाचक सामोरा गेला आहे. एका बाजूला त्याची रॅशनॅलिटी जागी झाली आहे न् दुसरीकडे तो इतक्यांदा निरुत्तर झाला आहे की परत ब्लाईण्ड फेथ मध्ये गुपचुप पडून राहावं, असं त्याला वाटतंय. साईखेडातले अनुभव ऑफिस, फॅक्टरी, ग्रामपंचायत, महानगरपालिका सगळीकडे येताहेत. प्रत्येक घरात, माणसात मला साईखेड दिसतंय, म्हणून याचा अनुवाद करावा असं मला वाटलं.

मी वापरलेली भाषा अवजड आहे, ती सुलभ करायला हवी हे खरे.. पण सुरुवात म्हणून मी लिटरल आणि फिगरेटिव्ह अनुवाद करून पाहिला. राम पटवर्धन म्हणतात त्याप्रमाणे अनुवादकाला लेखकाने ज्या विटा वापरून घर बांधलं आहे, त्याच विटा उपयोगात आणून तसंच घर बांधता आलं पाहिजे, एकही वीट कमी जास्त होता कामा नये. तसं झालंच तर त्याची स्पष्ट कारणं असली पाहिजेत.

काही ठिकाणी तुम्ही खूप सुंदर काव्य केलंय. उदा. 'मासळी बाजारात अत्तराचा वास उडून गेला' अशा ठिकाणी ते तसंच ठेवावं, इंग्रजीत अशी उपमा नसेल तर ती आपल्याकडून त्या भाषेला कॉन्ट्रीब्युशन..

*

**म. द. हातकणंगलेकर, सांगली**

**२५ मे १९९९**

**स्नेहादरपूर्वक नमस्कार**

**'डांगोरा एका नगरीचा' ही कादंबरी तुमची महान लेखनकृती** 'magnum opus' आहे. एका दृष्टीने ते तुमचे परावर्तित आत्मचरित्रही आहे. तिच्यात तुमच्या मर्मस्थानी रुतलेली राजाची बखर पूर्णपणे विकसित झालेली आहे. त्यातील पात्रांची सघनता आणि विविधता, सुष्ट दुष्ट प्रेरणांचे जबरदस्त विळखे, गाढ, अव्यक्त आसांकेतिक पण अनैसर्गिक नव्हे, प्रेमभावनेचे गहिरेपण आणि तिची अटळ कुंठित गती, निसर्ग सौंदर्याचे निरनिराळे घटकांतील स्थलसापेक्ष स्वरूप आणि या सर्व मानवी व्यवहाराचे परतत्त्वाशी आणि अदृश्य शक्तीशी असलेले नाते यांचा एक विशाल, विव्हल पट तुम्ही या लेखनात साकार केला आहे. या लेखनाने तुमचे मानसिक cathorsis झालेले असणार. रोमन इतिहासाचे लेखन पूर्ण झाल्यावर उत्तररात्री सौधावर येऊन आकाशाकडे पाहताना गिबन म्हणाला होता, I feel I have emptied myself out.. तसेच तुम्हाला वाटले असणार, by this work, you have thoroughly fulfilled yourself यापेक्षा सृजनाचे अधिक ते पारितोषिक कोणते? जाणत्यानी ते जाणले हा गौरवाचा भाग, तेव्हा अभिनंदन...

*

**कमलाकर नाडकर्णी, दादर मुंबई**

९ जून १९९९

सोलापुरात येऊन प्रत्यक्ष भेटू शकलो नाही, दूरभाष करून भागवावे लागले, याची रुखरुख होतीच, त्याचे उट्टे आल्याबरोबर 'डांगोरा' वाचून फेडले. आपल्या ऋणातून बाहेर पडणं पामराला शक्यच नाही. जमिनीचा एखादा कोपरा विशाल आकाशाचे कर्ज कसे काय फेडणार?

इवलसं साईखेड म्हणता म्हणता या संस्थानचा कोपरा न् कोपरा न्याहाळू दिलात, दिवस– रात्रीच्या वेगवेगळ्या प्रहरांत, अंधारात, पौर्णिमेत, लुकलुकत्या चांदण्यासोबत आणि भकास भयाण माळरानावरच्या पीराच्या कबरीजवळूनही.

एवढंच नव्हे. भूगोल माणसं जिवंत करतात आणि त्यांचा इतिहास होतो. साईखेडची किती माणसं, किती प्रातिनिधिक व्यक्तिरेखा, त्यांच्या भाववृत्ती, त्यांच्यातलं खलत्व, साधुत्व, सभ्यत्व, बेडरपणा, निर्भयता, लाचारी, भाववृत्ती, सारं

कसं अगदी समतोलपणे उभं केलंत! मला तर वाटतं साखरपेंडी काय, हर्णे काय निसर्गाची हिरवी शाल तिथे पसरलेलीच होती. त्या मातीतच बेरकेपण आणि छिद्रान्वेषी वृत्ती. तुमचं साईखेड तर कितीतरी योजनं त्याच्या पुढचं. इतक्या विविध व्यक्तिरेखा तुम्ही मूर्तिमंत केल्या आहेत की त्यांच्या यादीला एखादा कागद पुरणार नाही. त्यामुळे राजे रघुवीरसिंह, देसाई, पंढरी, बॅरिस्टर, राष्ट्र, ज्योतिप्रकाश एवढी नावं घेऊनच थांबतो, इतरांचा रोष पत्करून.

तुमच्या या कादंबरीने, गोंडस, मधुर, तसेच नेमक्या नव्यानव्या शब्दांची खाणच उघडली आहे. वेगवेगळ्या पातळ्यांवरील प्रणयाचे रंग हाही या कादंबरीचा लक्षणीय भाग. तरी कल्पकता असते ती मानवी मनाच्या अंतरंगाचा तळ शोधण्यात. शेक्सपीअर काय किंवा दळवी, आळेकर, तेंडुलकर काय मनावर ठसा उमटवून अमरपण जागवत राहतात, ते त्यांच्या मनाच्या उत्खननामुळेच! तुम्ही याही कसोटीला पुरेपूर उतरला आहात. सत्–असत्चा झगडा पृष्ठपातळीवर न ठेवता तुम्ही अधिक खोलात जाता, तेही कुठल्याही गडद, धवल रंगाचा वारेमाप वापर न करता, हे कौशल्य तांत्रिक कसब वा कारागिरीत जमा होण्यासारखं नाही. अस्सल सृजनता, प्रतिभा हे त्याचं एकमेव निधान.

कादंबरीची भाषा, तुम्ही जागोजाग केलेली भाष्ये, वेगवेगळ्या ग्रंथांतले दिलेले संदर्भ माझ्यासारख्याला वेडावून टाकतात आणि प्रतिभासामार्थ्याचं भयचकित दर्शन घडवतात. मी साहित्याचा वा कादंबरीचा समीक्षक नाही, पण रसिक वाचक मात्र खासच आहे. तुमची कादंबरी, तिच्यातले वेगवेगळे प्रसंग वाचकाला सारखे हिंदकाळत, आंदोळत राहतात. देसाई बोलावणं आल्यासारखे पोलिस चौकीत निघतात, त्या निरोपाच्या कारुण्यात वाचकाला तुम्ही आकंठ बुडवता, देसाईंना दाराशी सोडून पंढरीच्या आत्मकथेत वाचकाला गुंतवून टाकता. तिच्यात बुडतो न् बुडतो तोच घोरपड्यांच्या कारस्थानात शिरायला लावता, मला वाटतं ही ब्रेख्तची 'ॲलिनिएशन' ची थिअरीच असावी. अखेरीस फार अस्वस्थ व्हायला होतं. आस्वादकाला अस्वस्थपण देणं, हे कुठल्याही कलाकृतीचं कर्तव्यच असेल तर तुम्ही ते शंभर हिश्श्यांनी पार पाडलं आहे.

तपशीलात जायचं तर केवळ बाह्यरेखावृत्तीने भागत नाही, तपशीलाचे रंग भरावे लागतात, हे मान्य पण तरी देसाईंच्या अटकेनंतरचा भाग खूप ताण देतो. (अर्थात मी नाटकवाला, ६ अंकांवरून २ अंकांवर आलेला माणूस, तेव्हा माझं एवढं खरं मानायला हरकत नसावी)

विशिष्ट काळात घडणारी ही कथा, त्याच काळातील होण्यासाठी संस्थानबाहेरच्या राजकीय चळवळींचे जे संदर्भ दिले आहेत, कादंबरीकथनातील विरोधाभासासाठी त्याचा जो वापर तुम्ही केलाय तो अभिनंदनीय आहे.

पाऊणशे वर्षांपूर्वीची ही कथा, तितकीच आजची. साईखेडच्या रूपाने आजचा देशच डोळ्यापुढे उभा राहतो. भूतकाळात वर्तमान शोधणे हाच तर कवींचा बाणा. हा डांगोरा त्यामुळे कालच्या एका नगरीचा नसून आजच्या आपल्या संपूर्ण राष्ट्राचा आहे.

माझी लेखणी वा दोन हात 'डांगोरा' सारख्या विशाल पटाची स्तुती करायला कमीच पडणार. मला खार होता आलं यातच आनंद!

ता. क. छायाचित्रांच्या लोककलेत वापरल्या जाण्याऱ्या चित्रांची योजना बेफाटच!

*

**वि. चिं. फडके, ठाणे**

**१८ जून १९९९**

**ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयातून 'डांगोरा' वाचायला मिळाली. सुरुवातीची काही पाने** (राजे रघुवीरसिंहाचे प्रेमप्रकरण, आत्महत्या इ.) जरा कंटाळवाणी वाटली. नंतर मात्र कादंबरी अशी काही झपाटून टाकते की खाली ठेवावीशी वाटत नाही. संपल्यावर एवढ्या लवकर संपली याची चुटपुट लागून राहते. सत्तर वर्षांपूर्वीचे संस्थानातील राजकारण, हेवेदावे, कपटकारस्थाने न्यायालयातील खटला, या सर्वांचे वर्णन प्रत्ययकारी, नाट्यमय म्हणून चित्ताकर्षक उतरले आहे. मराठी साहित्यात लक्षणीय भर घातल्याबद्दल हार्दिक अभिनंदन...

*

**वृंदा लिमये, मुंबई**

**२८ जून १९९९**

**'डांगोरा' वाचली, आवडली. अथपासून इतिपर्यंत तिने लक्ष वेधून घेतले. एक मोठा कालखंड व्यापणारी, विविध व्यक्तिमत्त्वांनी गजबजलेली, असंख्य छोट्यामोठ्या घटना चित्रित करणारी, ही कादंबरी 'मॅग्नम ओपस्' म्हणावे इतक्या**

उंचीवर पोचलेली आहे, असे वाटले. आधीच्या 'बखर एका राजाची' चे सूत्र पुढे नेण्याचे आणि नंतरच्या 'उच्छाद'ची परिणामकारक पार्श्वभूमी करण्याचे सहजगत्या साधलेय.

विल्यम फॉक्नेरच्या योक्नापाट्वफा कौंटी आणि आर. के. नारायण यांच्या मालगुडी प्रमाणे साईखेड संस्थान ही एक लक्षणीय निर्मिती आहे. अनेक तपशीला'तून, खाणाखुणांतून, स्थळविशेषांतून साईखेडचे रंगरूप आकारत येते. मानवी स्वभावाचे तऱ्हेतऱ्हेचे मासलेवाईक नमुने असलेल्या प्रत्ययकारी व्यक्तिरेखा, घडत असलेल्या घटना, तत्कालीन राजकीय, सामाजिक संदर्भ, त्या काळातील कर्तबगार व्यक्तींचे नामोल्लेख यामुळे त्या विशिष्ट कालखंडातल्या साईखेडला स्वत:च्या इतिहास, भूगोलासह एक वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्व प्राप्त होते.

राजे रघुवीरसिंह, माधवराव देसाई, घोरपडे, थोरात, बखले, जाधव, राजस, जिजी, अशा वेगवेगळ्या व्यक्तिरेखांतून, नातेसंबंधातून सत्-असत्, नीती-अनीती, न्याय-अन्याय या माणसांच्या अंत:करण प्रवृत्तींमधल्या सनातन संघर्षाच्या पैलूंचे प्रत्ययकारी दर्शन घडते. देशपरदेशातील प्राचीन अर्वाचीन अनेक साहित्यिक संदर्भामुळे आणि औचित्यपूर्ण अवतरणांमुळे कादंबरीला श्रीमंती लाभली आहे.

या कादंबरीचे वाचन हा मला मन समृद्ध करणारा अनुभव वाटला. तिला केशवराव कोठावळे पारितोषिक लाभलेय, तसे साहित्य अकादमीचे पारितोषिकही मिळावे-मिळेलच, अशी खात्री वाटते.

*

**मिलींद म्हैसकर, अमरावती**
**१५ जुलै १९९९**

**'डांगोरा' नुकताच वाचला. वाचनात कसलीच शिस्त, नियमितपणा नसलेने इतकी महत्त्वाची कृती प्रसिद्धीनंतर तब्बल सव्वा वर्षानंतर वाचली, याचे वैषम्य वाटले. एका श्रेष्ठ साहित्यकृतीबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन...**

**'डांगोरा' चा आवाका प्रचंड आहे आणि निर्माण होणारे चित्र थक्क करणारे आहे. भौगोलिक दृष्ट्या एका छोट्या पटावर वावरणारी अनेक पात्रे, गुंतागुंतीच्या घटना यांचे फार कलात्मक, कसबी चित्रण वाचायला मिळाले. अनेक दिवसांत असा अभिजात साहित्यानुभव मिळाला नव्हता. डांगोरातल्या व्यक्तींचे निरनिराळे पैलू, त्यांचे परस्परसंबंध मला फार गहिरे वाटले. रचनेची** वीण घट्ट. कित्येक धागे तर आठवून आठवून पकडून ठेवावे लागतात. कित्येक पात्रे ही त्या नाटकातील कळसूत्री पात्रे वाटतात, बऱ्याचदा त्यांचे प्रयोजन समजत नाही. तरी या शाही डोलाऱ्यात सत् असत् या चिरंतन संघर्षाच्या बळकट सूत्राची सावली अख्ख्या कादंबरीवर आहे. किंबहुना हा संघर्षच कादंबरीचा स्थायीभाव वाटतो.

पात्रे एका रेखीव तटाच्या दोन बाजूस स्पष्टपणे विभागलेली दिसतात. काळी आणि पांढरी. राजे, माधवराव, सर्जेराव, शंभूराव, सोपानराव, पंढरी, राजस, अरविंद, अच्युत गणेश एका बाजूला तर राणी, फौजदार, दिवाण, बखले, महालिंगप्पा, जस्टीस त्रिविक्रम ही दुसऱ्या बाजूला. अशी काळ्या पांढऱ्याची काटेकोर विभागणी दिसते. gray area अजिबात, नाही. फौजदार, दिवाणांच्या मसलती वाचताना राहून राहून वाटतं यांच्यात कोणताच सत्त्वांश कसा नाही? कसलीच चाड कशी नाही? आपल्या अघोरीपणाविषयी पुसटसादेखील संभ्रम ह्यांच्यात कधीच कसा निर्माण होत नाही? संभ्रमाविना, टोचणीविना जगणं ही प्रवृत्तीच की संवेदनहीनता! प्रवृत्ती म्हणावे तर किती जण असं ठोस, निश्चित जगतात? आणि संवेदनहीनता म्हणावं तर दिवाण, बखले, त्रिविक्रम यांची व्यक्तिमत्त्वे पूर्ण बोथट, बधिर (फौजदारासारखी) नाहीत. त्याचप्रमाणे माधवराव, सोपान, शंभूराव, पंढरी यांच्यात खोट नाही. सन्मार्गाच्या वैधतेविषयी, त्यांच्या मनात कधीच प्रश्नचिन्ह उमटत नाही. सत्त्व कुठेच ढळत नाही. सत्-असत्च्या आपण उभ्या केलेल्या जगडव्याळ संघर्षात एका व्यक्तीत मात्र सत्-असत्, प्रामाणिकपणा-लालसा, सत्त्व-तम, हिंसा-अहिंसा यांचं द्वंद्व पेटलेलं दिसत नाही.

सत्प्रवृत्तांची जी निर्णायक त्रेधा होते, तिचा अर्थ काय लावावा! ती संस्थानापुरती वस्तुस्थिती की वैश्विक अंगाने जनरीतीविषयी भाष्य? कादंबरीचे विश्वरूप पाहता, (आणि मनोगतावरून) केवळ साईखेडापुरता विषय संपतो असे म्हणवत नाही. अतिशय अव्वल असे वैश्विक परिमाण 'universal appeal' 'डांगोरा' ला आहे. मग भाष्य काय? सत्प्रवृत्त, विवेकी माणसे ही सन्मार्गाच्या अंगभूत दोषांमुळे अल्पमतात, दुबळी राहून कुचलली जाणार? की नियतीचा फेरा, पूर्वसुकृतांमुळे ही दशा? असे प्रश्न पोखरत राहतात. नेति-नेति असा सूर कादंबरीत नाही. Indecision is also a decision म्हणतात, त्याप्रमाणे काहीच भाष्य नाही म्हणजे कोणतं भाष्य आहे ही जिज्ञासा राहतेच. फार

पल्लेदार, जटिल अशा चित्रांतून अस्वस्थ करणारे प्रश्न निर्माण करणे, हे डांगोराचं मोठच श्रेय आहे असं वाटतं, पुनश्च अभिनंदन आणि आभार!

*

**लक्ष्मीकांत तांबोळी, देगलूर, नांदेड**

**३ ऑगष्ट १९९९**

**डांगोरा.. वाचली. साईखेड काही केल्या डोक्यातून जात नाही. दमयंतीदेवी, राजस, क्लारा मनात घर करून बसल्या आहेत. राजे रघुवीरसिंह तर केवळ शोकांतिकांचे नायक. खळांचे वाकुडेपण किती असावे? निर्मळ, सालस, सरळ, उदार असणे किती क्लेशदायी असते याची जाणीव काळीज आरपार कापीत गेली. केवढा मोठा आवाका घेऊन तुम्ही कादंबरी उभी केलीत!** तुमच्या लेखणीची ताकत राजस, तामस व सात्त्विकाची झुंज पकडण्यात दिसून येते. मी पामर अभिनंदन करायलाही संकोचून गेलो आहे. या शतकातील महान कलाकृती म्हणून डांगोरा.. कायम राहील.

२४ डिसेंबर १९९९

**मालतीबाई किर्लोस्कर, सांगली**

इतकी अप्रतिम कादंबरी फार फार वर्षांनी वाचली. निसर्गचित्रणापासून मानवी मनाच्या अनंत नमुन्यांचे जे विलक्षण सूक्ष्म असे विचक्षण विश्लेषण आपण केलेत, त्यासाठी पुन:पुन: आपल्या लेखणीला सलाम. कला-विद्या प्रेमी राजपुत्र, त्याचा दुर्दैवी, दु:खद आत्मघात, कटकारस्थानी, पाताळयंत्री चौकडीला बळी पडणारी अडाणी व मूर्ख पत्नी, माधवराव देसाईसारखा अविस्मरणीय थोर माणूस, त्या सज्जनावर नियतीपेक्षा दुष्टांनी घातलेले घाव- घेतलेले चावे पाहता- वाचताना मन प्रक्षुब्ध झाले. त्यांचे न्यायासनासमोरचे भाषण शेक्सपिअरच्या पात्रांनी करावे इतके सुंदर वठले आहे. कुणाचा, कसलाही ठसा नसलेली आपली स्वभावत:च देखणी, परिच्छेदागणिक मानवी जीवनाचे दर्शन घडवणारी सुभाषिते वाचताना ज्ञानात मोठीच भर पडली. आपल्या बहुविध वाचन व्यासंगाचा पुन्हा एकवार प्रत्यय आला. भेटणाऱ्या प्रत्येकाला मी ती वाचण्याचा आग्रह केला...

*

**डॉ. भालचंद्र कुलकर्णी, मुंबई**

**६ मार्च २०००**

**डांगोरा.... एक उच्च प्रतीची कलाकृती आहे. विशिष्ट** परिस्थितीत सापडलेल्या व्यक्तीच्या मानसिक आंदोलनाचे सूक्ष्म तरंग, सुसंगत जिवंत चित्र रेखाटताना कादंबरीची लय वाढते, वाचून संपल्यावर झपाटलेल्या अस्वस्थतेत गुंतवून ठेवते. क्षणोक्षणी भेटणाऱ्या अनेकरंगी व्यक्तींच्या मानसिक कप्प्यांचा एकेक स्तर उकलत जाताना कादंबरी वाचकाला अस्वस्थ करते, हे मी पानोपानी अनुभवले आहे. प्रिय-अप्रिय भावनांचे, दुष्ट-सज्जन, सत्-असत् यातील प्रवृत्ती-निवृत्तीचे सुंदर चित्रण संपूर्ण कादंबरीमध्ये विखुरले आहे. शेक्सपिअरच्या नाटकाच्या तोडीची 'डांगोरा' मला वाटते. एक अजरामर चिरंतन लिखाण या निमित्ताने आपल्या हातून झालेय. यामागे आपली तपश्चर्या आणि निश्चयाचे बळ आहे. कादंबरी इतकी आवडली की कधीही उघडून वाचताना पात्रे प्रत्यक्ष भेटू लागल्याचा आनंद मिळतो.

*

**द. शं.विठ्ठलकर, मुंबई**

**दि. ४ ऑक्टो. २००४**

**अनाहूत पत्राबद्दल क्षमस्व !**


आपल्या 'बखर एका राजाची', 'डांगोराहएका नगरीचा' या कादंबऱ्या वाचल्या. 'उच्छाद' अद्याप वाचायचीच आहे, तरी आताच हे लिहिल्याशिवाय राहवेना. आपली कादंबरी Monumental आहे. तिचा आवाका महाभारतासारखा आहे. भाषा समृद्ध, अर्थगर्भ, प्रसंगानुरूप तरल, काव्यात्म, Penetrative आणि उत्स्फूर्त आहे. विशेषत: प्रत्येक पानावर विखुरलेली मानवी मन आणि परिस्थिती याविषयींची सुभषितवजा वाक्यं मनाचा ठाव घेतात, पुन्हा पुन्हा वाचली जातात आणि दाद घेतात. साऱ्या व्यक्ती अवतीभवती वावरत असल्याचा भास होतो. 'डांगोरा' मधील पान ४७१ वर आलेला, 'शिवाय कोणी कितीही-- तसा निवारणाराही असत नाही,' हा परिच्छेद cynical आहे, तरी अत्युच्च पातळीवर घेऊन जातो, तोच विचार माझ्या मनात घोळतो आहे....

*

**विश्वनाथ खैरे, पुणे**

**१३ फेब्रूवारी २००१**

साहित्यप्रकारांच्या चालू परिभाषेत ही गद्य कादंबरी आहे. तिची अभिव्यक्ती मात्र पद्य नसलेल्या काव्याची आहे. तिचं तंत्र पंचतंत्राचं आहे; एका आख्यानातून दुसरे निघत जाते.



म्हणून कथा सलग नाही. जिन्याच्या एका रमण्याला पोचावे. तिथून अनेक दादरे असावेत, एकेकावरून वर जावे, पुन्हा खाली यावे असे चारदोनदा झाल्यावर मग एकावरून मात्र वरच्या मजल्यावर पोचता यावे अशी कथानकाची रचना आहे.

कारण, ही खऱ्या अर्थानं सामाजिक कादंबरी आहे. नायक नायिका आणि त्यांच्या संबंधातली चारदोन माणसं यांचीच कथा असते तेव्हा सलग कथानक शक्य असतं. समाजाची कथा असते तेव्हा अनेक व्यक्तींची चरित्रं तिच्यात गुंफलेली असतात. एका व्यक्तीचं चरित्र दुसऱ्या व्यक्तीच्या चरित्राच्या मधेच कुठंतरी डोकावतं. वाचकाला हे दुसरं चरित्र आधीपासूनच माहीत झाल्यावाचून दोघांच्या मिळणीचा सारा परिणाम ध्यानात येत नाही.

हे होत असताना पहिल्या चरित्रातला काही पूर्वीचा भागही यावाच लागतो. सिनेमात याला फ्लॅशबॅक म्हणतात. मर्यादित पात्रसंख्येच्या कथेत ही पूर्वचमक फार वेळा येत नाही. 'डांगोरा' मधे मात्र प्रत्येक आख्यानात तिचा आढळ होतो.

कादंबरीतलं निवेदन लेखकाचं म्हणजे त्रयस्थाचं आहे. पात्रांची आत्मकथनंसुद्धा लेखकानीच केलेली आहेत. गद्याला काव्यस्वरूप देणारा लेखनविशेष म्हणजे दोनतीन ओळींच्या छेदकांची रेलचेल. यातल्या अनेक छोटक्या छेदकांमध्ये घनगंभीर जीवनभाष्ये गोवली आहेत. काव्यत्वाचा परिपोष करणारा हा एक घटक आहे. नुसत्या त्रयस्थ नव्हे तर तटस्थ भूमिकेतून लिहिले असते तर हे सुभाषितांसारखे छेदक आले नसते. 'डांगोरा' मधे ते वाचकाला टोकत असतात, मानवी जीवनासंबंधी विचार करायला जागतं ठेवतात आणि पात्रांच्या चरित्रांकडं विशिष्ट दिशेनं बघायला लावतात.

कलाकारीच्या तंत्रात हे कितपत बसतं ते सांगता येत नाही. रवींद्रनाथांच्या कथांमध्ये अशी भाष्ये आली आहेत. तिथेही ती इतक्या विपुलपणे आणि छेदकांच्या रूपात आलेली नाहीत. 'डांगोरा'त ती म्हणीवजा व्यवहारचातुर्याची नाहीत, खोल विचारपूर्ण आहेत. त्यामुळे दिखाऊ शेरेबाजीची वाटत नाहीत त्याचमुळे रसहानीचा अनुभव येत नाही. तरी सलग निवेदन रसाळ असल्यावर वाचक पात्राशी काही काळ एकरूप होत जातो, तसे डांगोरा तल्या पात्रांबाबत होत नाही. वाचकाला सजग करणे–ठेवणे हीच लेखनामागची प्रेरणा असेल तर तिला यश मिळाले आहे.

म्हणून वाचकही त्या पात्रांकडे त्रयस्थपणे बघू शकतो. मग असे ध्यानात येते की दुष्ट आणि सुष्ट अशा प्रवृत्ती काही प्रमाणात त्या त्या पात्रांमध्ये एकारून आल्या आहेत. फौजदार आणि त्याची साथीदार मंडळी यांच्या जमेच्या बाजूला चांगली कृत्ये किंवा मानवी जिव्हाळ्याचे प्रसंग नाहीसमानच आढळतात. देसाई, शंभुराव, 'राष्ट्र' यांच्या कृती आणि वृत्ती कमीजास्त पण चांगल्याच बाजूला झुकणाऱ्या आहेत. एकेका व्यक्तीतल्या काळ्या, करड्या आणि पांढऱ्या वृत्ती मिसळून आपल्या समोर येतातच असे नाही. सामाजिकता अधिक प्रभावी झाल्यामुळे व्यक्तिता ठळकपणे पुढे येत नाही.

सायखेड्यातल्या या कहाणीची सुरुवात राजाच्या संसारातल्या पारंपरिक कौटुंबिक कटकटीतून होते. नंतर पुंड सत्ता आणि हतबल सज्जन यांची काहीशी एकारलेली लढाई त्या लहानशा गावात चाललेली आहे. सज्जन एकेका टप्प्यावर लढाईतून स्वत:ला दूर नेतात किंवा होतात. रघुवीरसिंह जीवनाचा अंत करून घेतात. 'राष्ट्र' परागंदा होतात, अगदी शेवटी अरविंद आणि राजस रात्रीअपरात्री निघून जातात. लढाईत जय-पराजय कुणाचा झालेला दाखवला नाही. तसा तो होत नसतो हेच तात्पर्य आहे असे वाटत राहते. देसाईच्या अंतिम निवेदनात त्याचा उद्‌गार आहे. परंपरागत श्रद्धांवरून ठरवलेल्या सुखाच्या आणि मोठेपणाच्या मागे लागलेल्या माणसांच्या व्यवहारांच्या विरोधात दैवी न्यायावरची पारंपरिक श्रद्धा पुरी पडत नाही याची विषण्ण कबुली त्या निवेदनात आहे.

*

**डॉ. सुधीर रसाळ, औरंगाबाद**

**३ मे २००४**

**'डांगोरा एका नगरीचा' कालच वाचून संपवली. कादंबरी प्रसिद्ध होऊन सहा वर्षे होऊन गेल्यावर तिच्यासंबंधी प्रतिक्रिया देण्यात स्वारस्य उरत नाही हे खरे, परंतु मला माझी प्रतिक्रिया नोंदवावीशी वाटली, म्हणून हे पत्र लिहीत आहे.**

**हरिभाऊनंतर ऐसपैस कादंबरी लिहिण्याची परंपरा जवळपास खंडित झाली. संकुचित अवकाश घेऊन त्यात कोरीवकाम करणारी कादंबरी प्रतिष्ठित झाली. पु. शि. रेगे, व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्या या जातीच्या. तुम्ही मात्र व्यापक फलक घेऊन 'डांगोरा...' साकार केलीत. एक घवघवीत** कलाकृती मराठी रसिकाला दिली.

मराठीत वातावरणप्रधान कादंबऱ्या दुर्मिळच. शंकर पाटलांची 'टारफुला' हा सन्माननीय अपवाद. 'टारफुला'चे स्वागत चांगले झाले नाही, सनसनाटीपणाचा आरोप तिच्यावर झाला. मला मात्र ती लक्षणीय कादंबरी वाटत आली आहे. तिच्याशी 'डांगोरा' ची तुलना करू इच्छित नाही. पण संपूर्ण गावाला केन्द्रस्थानी ठेवून त्या गावाच्या समग्र वातावरणाचे चित्र 'डांगोरा..' प्रमाणेच 'टारफुला' तही रेखाटले गेले आहे, म्हणून तिची आठवण.

डांगोरा एका अवनतरूप, भ्रष्ट समाजाचे चित्र रेखाटते. ते फक्त साईखेडाचे नाही, आजच्या भारतीय समाजाचेही आहे. साईखेडाच्या चित्रणातून तुम्ही आजच्या भारतीय समाजाच्या अवनतीचे, भ्रष्टतेचे आणि मूल्यविहीनतेचे जे दर्शन घडवले आहे, ते बिनतोड आहे. डांगोरा ही कादंबरी वर्तमान भारताचे प्रतीक बनली आहे, किंबहुना ती कुठल्याही काळातली भ्रष्ट, अवनतरूप, मूल्यविहीन मानवी जीवनाचे प्रतीक बनली आहे, माझ्या दृष्टीने हे फार मोठे यश आहे.

तुम्हाला आपला समाज, त्याच्या तळापासून कळला आहे. त्याच्या रचनेचे किती बारकावे तुम्ही टिपले आहेत. जातीजातीचे, धर्माधर्माचे संबंध व्यक्ती आणि जात धर्म समुदाय यांचे परस्परसंबंध, स्त्री-पुरुष यांचे अनेक पातळ्यांवरील संबंध, व्यक्ती, समाजाच्या धार्मिक, आध्यात्मिक श्रद्धा, हिंदूंच्या एकूण धार्मिक, सामाजिक परंपरा, रूढी, भारतीय विशेषत: हिंदू समाजाची मूल्ये, त्याचे श्रेयस आणि प्रेयस या सर्वांची सूक्ष्म आणि समृद्ध जाण तुमच्याकडे आहे. आपल्या समाजाचे एकूण मानसच तुम्ही नेमकेपणाने पकडले आहे. आपला समाज बाहेरून आणि आतून जाणणारा लेखक मराठीत तरी दुर्मिळ, ही जाण फक्त व्यंकटेश माडगूळकरांजवळ होती. अशा समृद्ध सामग्रीतून एक अर्थपूर्ण कलाकृती तुम्ही घडवली आहे.

या पत्रातून एक असमाधानही कळवतो. तुम्ही स्वीकारलेल्या कथनपद्धतीमुळे या कादंबरीच्या आकलनास मर्यादा पडतात, असे वाटते. आपल्या कथनात कादंबरीतील पात्रांच्या कृती-उक्तींचे मूल्यमापन आपण करीत राहता. उदा. दमयंती, कुणाच्या तरी मनोबळाची गुलाम होऊन केवळ देहस्वी, रघुवीरसिंह प्रेमशील तरी मनस्वी (पृ. ५ ). घटना, व्यक्तिव्यक्तिंचे संबंध या सर्वांवर मूल्यात्मक भाष्य केले जाते. पृ. १३६-३७ वरील एक कथन यादृष्टीने पाहता येईल.

'अनाचाराला प्रायश्चित्ताची पहाट नाहीच दिसली तर काळोखाला काय उणं? प्रायश्चित्तापर्यंत यायला विवेक जागा असावा लागतो. सर्वांविषयीची प्रेमज्योत जळत रहावी लागते' (१३६) या प्रकारचे कथन वाचकांचा परिप्रेक्ष्य निश्चित करते. कादंबरी वाचकाने कशी स्वीकारावी, हे ठरवून टाकते. त्यामुळे कलाकृतीला आवश्यक असलेली संदिग्धता नष्ट होते. कलाकृतीत अनेकार्थ प्रसवण्याची क्षमता उरत नाही. अशी कथनपद्धती आपण स्वीकारली नसती तर बरे झाले असते.

काही ठिकाणी कादंबरीची वीण सैल झाल्यासारखे वाटते. पूर्वार्धात ती दौलतरावांवर केन्द्रित होते. उत्तरार्धात दौलतराव एकदम नगण्य होऊन जातात, त्यामुळे दौलतरावाना जेलमधून सोडवण्याचा आटापिटा राणीने का करावा! आर. के. कोटणीसांचे आगमन वाचकांना सुटकेचा प्रकाश दाखवू लागते, मात्र, त्याच्या आगमनामागील उद्दिष्ट अचानक गुंडाळून टाकले जाते, त्यामुळे आर. के. कोटणीस हे पात्र, त्याच्या हालचाली उपऱ्या, अनावश्यक बनून जातात. त्रिविक्रम धुळेकरांना ख्रिश्चन बनवणे आणि ख्रिश्चन असूनही अरविंदाचे हिंदूपण सांभाळणे असेच अनावश्यक बनून जाते. राजस आणि अरविंद यांना प्रेमात पाडणे, त्याचा विकास फार घाईघाईने उरकला आहे. जातीपाती, त्यातील ताणतणाव, त्यांच्यातील विवाहसंबंधांची निषिद्धता याची सूक्ष्म जाण असणाऱ्या लेखकाने मराठा सरदार कन्या (शिवाय विवाहित) राजसचे, ज्याला जातपात उरलेली नाही, अशा परधर्मीय अरविंदबरोबरचे प्रेम इतक्या सुरळितपणे फुललेले कसे दाखवले असा प्रश्न पडतो. दोघांतील प्रेमाचे चित्रण रोमँटिक होते.

अशा काही असमाधानकारक गोष्टी मला जाणवलेल्या असल्या तरी कादंबरी छान जमलेली आहे. त्याबद्दल मी आपले हार्दिक अभिनंदन करतो....

*

**प्रभाकर पुजारी, पुणे**

**१० जानेवारी २००५**

**...रोमला सगळे रस्ते मिळतात असे पाश्चात्त्य मानतात. जगातील मोठे रस्ते आणि दगडधोंड्यांचे, खाचखळग्यांचे, काट्या कुट्यांचे, डोंगरदऱ्यातले, अरण्यचिखलातले अनेक रस्ते साईखेडला जाऊन मिळतात, असे जाणवले, थॉमस हार्डीच्या पाच खेड्यांत विश्व सामावले असे समीक्षक मानतात, आपल्या** कादंबरीतील एकाच खेड्यात ते सामावले असे वाटले.

राष्ट्रधर्माचा शोध घेण्यासाठी संपूर्ण महाभारत वाचून काढले, हस्तिनापूरचा फलक अवाढव्य, साईखेडचे दर्शन सूक्ष्म! महाभारतातील चिरंतन सिद्धांतांची टिपणे काढली, आपल्या कादंबरीतील अनेक वाक्ये (मी भीष्म नसतानाही) मना बुद्धीत खोलवर रुतून बसली.

...कादंबरीतील शब्दांचे-प्रतिमांचे-वाक्यांचे दुर्ग पुष्कळांना दुर्लंघ्य वाटणारे आहेत. पण व्यक्तिजीवनाच्या आणि घटनांच्या हिमनद्या वेगाने ओढून नेणाऱ्या आहेत. लहानपणी नाथमाधवांच्या 'वीरधवल' मध्ये जी ओढ अनुभवली ती 'डांगोरा..'मध्ये साक्षात्कारी रूपात जाणवली. विश्वचक्र, इतिहासचक्र, दैवचक्र, गुणावगुणचत्र, उदात्तक्षुद्रचक्र, ऋतानृतचक्र अशी अनेक चक्रे 'डांगोरा' मध्ये आहेत.

काही उद्भवलेले प्रश्न :

१. लेखक लेखनात येणे अपरिहार्य आहे का? टॉलस्टॉयचा Uprightness हाच केवळ निकष आहे काय?

२. ऋषींनी आपल्या आंतरिक वृत्ती-शक्तींना देवतारूप बनवले, हे श्रीअरविंदांचे मन किती ग्राह्य -अग्राह्य वाटते?

३. साहित्य हे साहित्यिकापेक्षा मोठे होऊ शकत नाही, हे शॉचे उद्गार आपल्याला कसे वाटतात?

४. कलात्मक अलिप्तता खरी की केवळ एक आदर्श? काही वर्षांनंतर आपलेच साहित्य आपल्याला कसे, किती भावते? आजदेखील अनुकूल-प्रतिकूल अभिप्रायांनी मनाचा शास्त्रकाटा विचलित होतो काय?


५. कुटुंबाच्या भविष्यचिंतेने देसाई विचलित होत नाहीत, पण मुलासाठी न्यायाधीश कसा भ्रष्ट होतो?

६. महाडिक, आणि पंढरी यांच्या तपशीलवार पूर्वकहाणीमुळे कादंबरीचा वेगवान प्रवाह विनाकारण अडवला जातो असे आपल्याला वाटले का?

७. स्त्रीचे पहिले प्रेमच केवळ खरे उत्कट असते, असे मानतात, राजसच्या दर्शनासाठी काही सोय पाहिली आहे का?

० ० ०

*With Best Compliments From*



**Late Prin. K. P. Mangalwedhekar**

*The Great Teacher is no more with us, but spirit lives foreever.*

## Mangalwedhekar Institute of Management (MIM)

***Affiliated to Solapur University***

**Chairman : Dr. P. K. Joshi**

Local Managing Committee

**Director (I/C) : Promod D. Vaidya**

**Career Basket**
Professional & Career orinted autonomous courses at MIM

---

**Diploma Courses**
Finance Management & Marketing Management
Human Resource Management
Export Management & Materials Management

---

**Certificate Courses**
Capital market & Insurance Management
Derivatives & Options & Future & Corporate Governance
Brand Management & Fundamental & Technical Analysis
Analysis & Finance Statement & Introduction to US GAAP
Event Management & Diploma in Stock Market Operations
Business Communication & Personality Development

***S. P. Mandali's***

**Mangalwedhekar Institute of Management (MIM)**

H. D. High School Campus, Solapur.



# रॅको क्राय

**मैत्रेयरक्षित**

'कशाला भर उन्हाळ्यात लग्नकार्य ठेवतात हे लोक?', ऐन संध्याकाळी देखील भयंकर गरम होत होतं. वारा पूर्ण पडला असल्यानं उघड्या हिरवळीवरचं रिसेप्शन असूनदेखील वाहणाऱ्या घामाच्या धारा पुसताना सतराव्यांदा त्याच्या मनात आलं!

पण गेलं पाहिजे, नाहीतरं सरांना काय वाटेल? या विचारानं त्यानं स्वत:ला ढकलत तिथवर आणलं होतं खरं, पण तिथली खचाखच गर्दी, स्टेजवर वधूवरांना शुभेच्छा देण्यासाठी देखील लागलेली भलीमोठी रंग, सतत उडणारे फ्लॅशेस, व्हिडिओ शूटिंगचे भयंकर अंगावर येणारे प्रखर लाईट्स, हिरवळीवर चहूबाजूला माणसंच माणसं... जेवणाच्या काऊंटरवरची झुंबड, रिकाम्या प्लेट्स नि भरून वाहणारी बास्केट्स...

हे राम! कशाला तडमडलो इथं आपण! असा तोच तो निरर्थक विचार अठराव्यांदा आलाच त्याच्या मनात... पण त्याचा आता काही उपयोग नव्हता! पुन्हा एक हताश उसासा टाकण्यापलीकडं काहीही करणं त्याला या क्षणी अशक्य होतं. आता या चक्रव्यूव्हात आलोच आहोत तर या 'समरप्रसंगाला' समोरं जाणं भागच होतं...

एन्ट्रीलाच मालिनीदेवींशी त्याचा मुकाबला झाला! आता या बाईनी आपल्याला पाहिलं म्हटल्यावर पुढे सर्वांना तोंड दिल्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. मनातल्या मनात त्याचा नेहमीप्रमाणे स्वत:शीच संवाद सुरू होता.

ही बया म्हणजे जगातल्या सर्व ब्रॉडकास्टिंग चॅनल्सचा अर्क होती. ही इथं भेटणार, अशी अटकळ होतीच म्हणा. पण अशी अगदी नमनालाच भेटेल असं मात्र वाटलं नव्हतं. अरे हे काय पण? ती तर लवकर परत निघाली होती...

''का मॅडम निघालात लगेच?''

''हां..आता इथून दुसरीकडं लग्नाला जायचंय ना... तिथं जेवायलाच लागेल. नात्यातलं आहे ना कार्य!'' असं म्हणत

प्रत्येक शब्दावर विशिष्ट जोर देत तिच्या टिपिकल अमराठी हेल असलेल्या उच्चरवात तिनं सांगून टाकलं.

किती घाईत आहे असं म्हणत असली तरीही जाता जाता चार (चांभार) चौकशा करायच्या मात्र तिनं ठेवल्या नाहीतच!

तेव्हढाच मसाला पुढच्या ब्रॉडकास्टिंगसाठी... त्याच्या मनात आलं. अर्थात तरीही त्याने प्रामाणिकपणे सगळ्या प्रश्नांची उत्तरं दिलीच. शिवाय विनाकारण सविस्तरही दिली! त्याची सुपिरिअर होती ना ही बाई... एकेकाळी.

'इतकी वर्षं गेली मधे तरी सवय सुटत नाही आपली नम्र इत्यादी वागण्याची'... असा स्वत:लाच बोल लावून घेतला त्यानं. अशी सारखी स्वत:ला धारेवर धरायची सवय होती त्याला!

बाईंचा विस्तार होता तसाच आहे. त्याच्या डोळ्यांनी नोंद केली. उलट किंचित वाढलाच असावा. म्हणजे मध्यंतरी तिच्याबद्दल जे सगळं आपण ऐकलं वाचलं होतं त्या सर्व घटनांचा या व्यक्तिमत्त्वावर यत्किंचितही परिणाम झालेली दिसत नाहीय तर! होती तशीच मस्त टुणटुणीत दिसत होती. खरं तर तिचा स्वभाव पूर्ण माहीत असल्यामुळं याचं आपल्याला नवल वाटायला नको होतं म्हणा! एखाद्या बुलडोझरला कधी कशाची चिंता वाटते का? ज्याच्यावर फेरा पडेल बुलडोझरचा त्यानं करावी चिंता फार तर! असा कुत्सित विचारही तरळून गेला त्याच्या मनात. आपल्यासारखं हे असलं हळुवार, प्रत्येकाची चिंता करत बसणारं मन असणाऱ्यानं बुलडोझरच्या नादी न लागावं हेच उत्तम.असा सुप्त विचार करून तो तिथून निघालाच पुढे.

मॅडम मालिनीदेवी तोपर्यंत दुसऱ्या कुणाशी तरी उच्चरवानं बोलण्यात मग्न झाल्या होत्या. त्यांचा उडत निरोप घेऊन तो प्रवेशद्वारातून आत वळला.

आपण इतक्या दिवसांनी कसे काय दिसलो? कुठे होतो मध्यंतरी? याबाबत मॅडमच्या मनात तर्कवितर्क सुरु झाले असणार याची त्याला खात्री होतीच!

''जाऊदे, रवंथ करायला तेव्हढाच विषय मिळाला तिला.''

असा विचार करतोय तोच त्याची नजर स्टेजवरच्या गराड्याकडं गेली... आणि सगळ्यात आधी नजरेला पडला तो राहुलच! सगळा प्रकाशझोत सराईतपणे अंगावर घेत तो नेहमीच्याच (म्हणजेच कमावलेल्या) हसतमुखानं पोझेस देत होता. त्याच्या भोवतालच्या घोळक्यात इतर ऑफिसवाल्या लोकांव्यतिरिक्त डावीकडे अर्थात दिव्याही होतीच. कितीही मिरवत असली तरी राहुलच्या तुलनेत तिचं डावेपण अधिकच उठून दिसत होतं! जेव्हा जेव्हा ही दोघं एकत्र दिसतात तेव्हा ते कसे विजोड आहेत हे झटकन नजरेला पडतंच समोरच्याच्या. अर्थात इतका विजोड जोडा (!) असूनही त्यांचे स्वभाव मात्र एकमेकांना अति पूरक आहेत हे एक विशेष! लोकांना कसं 'हॅन्डल' करायचं आणि नेमका आपला स्वार्थ कसा साधायचा हे यांच्याकडून शिकावं! नेहमी चेहऱ्यावर कमावलेलं हसू आणि वागण्यात मित्रत्वाची सलगी. त्यामुळे प्रथमदर्शनी तरी, ''व्वा! काय छान लोक भेटलेत आपल्याला'', असंच मत व्हावं नवख्याचं. पण खरं इंगित मात्र पुढे कधीतरी उलगडायचं.

इतकं असूनही सलग दहा मिनिटांपेक्षा जास्त कोणीही एकट्या दिव्याशी बोलू शकायचा नाही हेदेखील तितकंच खरं! सतत चेहऱ्यावर तेच ते पेटंट हसू चिकटवून कोणाशीही बोलताना उगाचच दात काढायची तिला सवय होती. हे हसू बेगडी आहे हे समोरची व्यक्ती संवेदनशील असेल तर आपोआपच आतून जाणवायचं. कदाचित त्या बेगडी हसण्यामागं दडलेली साऱ्या जगाबद्दलची तुच्छता तिच्या वागण्यातून डोकावून जात असेल!

चुकून गळाला लागलेला 'एक प्रेझेंटेबल, वेल कनेक्टेड म्हणूनच वेल नोन नवरा' एवढ्याच (एकमेव पण भरभक्कम) भांडवलावर तिनं अख्ख्या दुनियेला कायमचं चिल्लर मध्ये काढून टाकलं होतं! 'गरज सरो अन वैद्य मरो' हे तिच्या जीवनाचं ऑल टाईम हिट सूत्र असावं. बरं मेलेल्या वैद्याला त्याच गरजेसाठी पुन्हा जिवंत करून त्याच्याकडून स्वत:चं काम करून घेऊन पुन्हा लगेचच त्याला तिलांजली द्यायलाही ती मागं-पुढं पाहात नसे हे तिचे आणखीच एक उपवैशिष्ट्य होतं!

तरीही काहींच्या नशिबी जसे सदैव 'चांगले वैद्य' आसपास असतातच, अशा खास नशीबवाल्यांपैकीच ती असावी. कोणाकडून काही मदत घेतल्यावर माणूस किमान काही सद्भावना दाखवतो, मदत करणाऱ्याशी आपुलकीने वागतो बोलतो. पण हे सर्वसामान्य शिष्टाचार तिच्या खिजगणतीतही नसत. त्याला स्वत:ला, या तिच्या अप्पलपोट्या वृत्तीचा फटका कित्येकदा बसला होताच. पण कसं कोण जाणे, कोणाशीच तोडून वागणं त्याला जमत नसे.

पूर्वी, म्हणजे हा राहुलनामक इसम तिच्या गळाला लागायच्या आधी, दिव्या इतकी उद्दामपणे वागत नसे म्हणा. कारण फार पूर्वीपासून याची तिच्याशी ओळख होती. पण 'मिसेस

राहुल' झाल्यापासून मात्र तिच्या पायांनी कधीही जमिनीला पुसटसा स्पर्श देखील केला नाही! कधीच तिच्या आयुष्यातल्या कोणत्या आनंदाच्या, सेलिब्रेशनच्या प्रसंगी तिला याची आठवण यायची नाही. मात्र काही गरज लागली तर बिनदिक्कत कधीही फोन करायची बया. पण गरज लागली तरच! आताही गावात येऊन सुद्धा तिनं काही कॉन्टॅक्ट केला नव्हताच. तशी याची अपेक्षाही नव्हती अर्थात. सहज कधी स्वत:हून चार शब्द बोलायसाठी फोन करेल असं घडणार नाही.

असो... असतो एकेकाचा स्वभाव, असाच विचार करून नेहमीप्रमाणेच आताही त्याने मनातल्या मनात ते 'दिव्य प्रकरण' मिटवून टाकले...

इतक्या वर्षांनी राहुलला पाहून मात्र त्याच्या छातीतून एक बारीक कळ निसटलीच. तो इथं असणार याची पूर्ण खात्री असूनही त्याला फेस करायची त्याच्या मनाची नेमकी तयारी झालेली नसावी.

आता राहुलला सामोरं जावं की टाळावं? या विचाराने उकाड्याच्या घामापेक्षा एक निराळाच बारीक घाम फुटला त्याला. त्या जॉइन्ट व्हेन्चर फेल्युअर प्रकरणानंतर आत्ताच तो राहुलला प्रत्यक्ष पाहात होता. तसा टीव्ही, पेपरातून नेहमीच राहुल त्याला दिसायचा. पण ते वेगळं आणि हे प्रत्यक्षात पाहाणं वेगळं.

काय मूर्खासारखे नर्व्हस होतो आहोत आपण? त्याने पुन्हा एकवार स्वत:लाच बोल लावला. त्यात काय घाबराचंय? हवं तर त्यानं घाबरावं... आपण काय वाईट केलंय? उलट आपणच किती नुकसान सोसलं. त्या सगळ्या प्रकरणात ऑलमोस्ट जीवच जायचा आपला... कसेबसे वाचलो. पण त्याची राहुलला काहीच जाणीव नव्हती. आणि इकडे आपणच अस्वस्थ!

याचा स्वभावच मुळात हळवा होता. ''पुरुषासारखा पुरुष असून रडतोस काय पोरींसारखा?'' हे वाक्य तर लहानपणी दर दिवसागणिक त्याला ऐकावं लागायचंच! अत्यंत संवेदनशील, तरल आणि सतत दुसऱ्याची चिंता वाहणारा त्याचा स्वभाव एखाद्या मुलीच्याच कुडीला अधिक शोभला असता म्हणा! म्हणूनच त्याचे कित्येक मित्र त्याला सुकुमार न म्हणता सुकुमारीच म्हणायचे!

''ए, सुकु, आयला कधी उगवलास?'' पंक्यानं पाठीत जोरदार धपाटा घातल्यावर विचारांच्या तंद्रीत हरवलेला तो एकदम भानावर आला. ''अरे, असतोस कुठे हल्ली? दिसत नाहीस कधीच. बरा आहेस ना? आयला काय दुसऱ्या ग्रहावर वगैरे राहायला गेलास काय? तुमचं बरंय बुवा, तुम्ही काय म्हणतात ते जिनियस, कवी, कलाकार वगैरे! दुसरीकडं प्रतिसृष्टी थाटून इकडून कल्टी माराल साले आणि आम्ही बसू इथचं गर्दीत हाश-हुश्श करत घाम पुसत!'' पंक्याने एका दमात त्याला रिंगणात घेतला.

बरं झालं हा भेटला, तेव्हढाच डोक्याला जरा वेगळा विचार, सुकुच्या मनात आलं. ''अरे. पंक्या बरं झालं भेटलास. हा, काय आत्ताच आलो. वाणी सरांनी इतक्या प्रेमाने बोलावलंय म्हटल्यावर टाळता आलं नाही यार. किती गर्दी आहे रे पण! माझा तर श्वासच घुसमटायला लागलाय. गरमही किती होतंय.''

''अरे, गर्दी असणारच ना! वाणी सरांसारख्या काय म्हणतात त्यांना ते, 'विद्वान, सत्शील आणि अजातशत्रू', माणसाच्या पोरीचं लग्न म्हणजे तमाम जनता यायचीच. शिवाय त्यांची गावाकडची माणसं आणि पोरगी आणि आता जावई पण, हे असे टीव्हीलाईनमधले म्हटल्यावर तर मग काय विचारता! बघतोयस ना? सरांच्या साहित्यिक आणि सामाजिक सर्कल मधले सगळे अवतरले आहेत इथं. हे सगळे एरवी या चमक-धमक रिसेप्शनला कशाला तडमडले असते?''

''हो ना, जरा कडबोळंच झालंय नाही का रे?'' सर इतके निगर्वी आणि सरळ साधे आहेत पण त्यांची पोरगी मात्र या बेगडी दुनियेत कशी काय शिरली कुणास ठाऊक? त्या चमचमणाऱ्या गर्दीत पाहुण्यांचे आगत-स्वागत करत स्टेजवरून खाली आणि खालून स्टेजवर जा-ये करणारे, मुद्दाम समारंभासाठी घातलेल्या डार्क चकचकीत पेहरावातले वाणी सर त्या सर्व चमचमत्या वातावरणात अंमळ उपरेच वाटत होते!

त्या गर्दीत समाजातल्या विविध वर्तुळांचं एक अनोखं मिश्रण झालेलं होतं. निरनिराळी वर्तुळं एकमेकाना अनाहुतपणे छेदत होती! कोण नव्हतं तिथं? साहित्यिक, नाटकवाले तर होतेच, त्याचबरोबर सरांचा मित्रपरिवार, त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या प्राध्यापकांपासून शिपायापर्यंत झाडून सगळे. शिवाय टीव्ही-सिने जगतातले प्रस्थापित, थोडेसे यशस्वी, नव्यानंच आलेले, धडपड करणारे असे यच्चयावत सगळे चेहरे तिथं दिसत होते. त्यांच्या त्या घोळक्यांमधून अनेक रंगीबेरंगी संवाद ऐकू येत होते. उदाहरणार्थ, ''ए, किती दिवस चाललीय गं ती सिरियल? आता बस म्हणावं!'' त्यावर, ''अगं हो सात वर्षांपासून सुरू आहे, पण मी मात्र अलीकडेच आलीय ना त्यात! तुम्हाला कंटाळा आला

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

प्रत्येक पुस्तकाचं स्वत:चं असं गुरुत्वाकर्षण असतं. वाचकानं त्याच्या गुरुत्वाकर्षण कक्षेत प्रवेश केल्यावर ते पुस्तक त्याला स्वत:कडे ओढायला सुरुवात करतं. एखाद्या पुस्तकाचं गुरुत्वाकर्षण जेवढं अधिक तेवढं ते पुस्तक लवकर आणि आनंदात वाचून होतं. ज्या पुस्तकाचं गुरुत्वाकर्षण कमी ते वाचायला महिनोन् महिने लागतात. हे गुरुत्वाकर्षण अर्थातच पुस्तकाच्या पृष्ठसंख्येवर अवलंबून नसतं. ते पुस्तकाच्या आशयात खोलवर कुठे तरी दडलेलं असतं. पण एकदा त्याच्या तावडीत सापडलं की, त्यातून सुटका नसते.

(निखिलेश चित्रे)

# समीर वसंत कोपार्डे

डायरेक्टर

**नॉरमेक्स व्होल्वज्, प्रा. लि.**

J - 511, M.I.D.C. Bhosari,
Pune - 411 026 (India)
Tel / Fax - 91 - 20 - 27472398
24473022
E - mail - normex@pn.2, vsnl.net.in
NET - www.normexves.com

पार्टनर

**फ्लेक्स – सी कपलिंग्ज्**

137 / 4/1, Vadagoan Dhayari
Naded Phata, Sinhagad Road,
Pune - 411 041 (India)
Telefax - 90-20-24390247,
24392174
E - Mail : svkoparde@vsnl.com
Web - flexccouplings.com

असेल तर चॅनल बदला. पण सिरियल बंद करायच्या मागे कशाला लागता? आय ऍम अर्निंग डिसेंटली ऍन्ड इट हेल्पस मी टू हॅंग आऊट देअर इन द इंडस्ट्री!'' अशा संवादां बरोबरच, ''अलीकडचं ते तुमचं आदिवासींच्या पिळवणुकीवरचं नाटक फारच प्रभावी वाटलं हो!'' ''हां, केलाय थोडा प्रयत्न..''

''अरे वा, नुसता प्रयत्न काय म्हणताय? छानच आलाय इम्पॅक्ट... मग आता इतक्यात कुठला दौरा?'' असेही संवाद कानावर पडत होते.

गर्दीमुळे आसपास इतकी छोटी छोटी वर्तुळं तयार झाली होती की त्यांच्यातून सटकण्यासाठी तरी निदान आता स्टेजवरच जावं असं त्याला वाटलं. ''पंक्या चल, त्यांना विश करून येऊ,'' असं म्हणून तो पंक्याशी बोलतोय तर तेवढ्यात तो आणखीन कुठे तिसरीकडेच कोणाबरोबर तरी खिदळत होता!

आपणच जावं वाट काढत, म्हणून तो निघाला सरांच्या दिशेने. तितक्यात अंद्याने हाक मारली. त्याला 'आलोच' म्हणून तसाच पुढे निघाला. पाहिलं तर, फोटोसेशन उरकून राहुल-दिव्या आणि कंपनी स्टेजवरून खाली उतरत होती. मग आधी तिला हाय करावं म्हणून तो तिकडे गेला आणि दिव्याला मागून हाक मारली. त्यावर दिव्याने वळून त्याच्याकडे पाहात माफक हासत, ''अरे, तू इथं कसा काय? कोण कोण आलंय अजून? की एकटाच आलास? काय चाललंय?'' अशा तत्सम प्रश्नांचा चेंडू जितक्या नाइलाजाने त्याच्या कोर्टात ढकलता येईल तितक्या बळंच त्याच्याकडे ढकलत म्हटलं.

म्हणजे आज कोणत्याही स्वरूपात वैद्याच्या भूमिकेसाठी आपली निवड झालेली नाहीय तर, अशी मनाने सुपरसुप्त नोंद घेत सुकु तिला म्हणला, ''अगं, तूच कुठे आहेस सांग? मागच्या वेळेस गाडी चुकली म्हणून माझ्या घरी मुक्कामाला आली होतीस त्यानंतर आत्ताच दिसते आहेस! फोन पण नाही केलास त्यानंतर कधी.''

''अरे का...य सांगू, माझा फोन डाटा सगळा करप्ट झाला होता. आत्ता एक एक करून जमवतेय बघ पुन्हा नंबर्स... ('हे वाक्य यांच्यात कॉमन दिसतेयं! राहुल पण लोकांना टाळायला नेमके हेच शब्द वापरायचा'...याचा मनसंवाद!) आणि इतकी कामात असते ना मी, कुठे वेळ होतो मला. राहूलचं इतकं टाईट शेड्युल, माझं काम, पुन्हा घरं, मुली. वेळच होत नाही अगदी. तू ये ना, कधी तिकडे आलास तर. आता घरही बदललंय आम्ही.''

''हो का? कधी?'' त्याने आश्चर्याने विचारले. ''झाले सहा-सात महिने'' -इति दिव्या. (घ्या, म्हणजे नवीन घरात जाऊनही आपल्याला कळवायची तसदीही घेतली नाही बाईनं आणि म्हणे ये ना घरी! - याचा मनसंवाद!)

''आणि काय रे, इथे कसा काय तू?'' दिव्याची याच्याकडे पाहात संशयी पृच्छा... ''अगं, सरांमुळेच की. त्यांनी फार अगत्यानं बोलावलं होतं.'' हे ऐकून तर तिच्या डोळ्यात असुयेची एक लहर उमटून गेलेली स्पष्टपणे दिसलीच त्याला.

कारण आत्ता याठिकाणी ती स्वत: मात्र फक्त मिसेस राहुल म्हणून वधूच्या म्हणजे, वैजूच्या लिस्टमधून आली होती ना! त्यामुळे सुकुची डायरेक्ट सरांबरोबर इतकी जवळीक असावी हे काही तिला सोसलं नाही. परत तिनं विचारलंच, ''सरांबरोबर काही प्रोजेक्ट वगैरे करतोस की काय हल्ली?''

''नाही, तसं काही खास नाही.'' या त्याच्या उत्तराने तर ती आणखीनच कोड्यात पडली असावी. ती दोघं बोलत होती तर राहुल तिथूनच पास झाला. सुकुला पाहूनही न पाहिल्यासारखं करून काहीतरी काम असल्यासारखं समोरून निघून गेला. त्यामुळे सुकुला आणखीनच नर्व्हस व्हायला झालं. 'मी जरा वरती भेटून येतो,' असं म्हणून तो तिथून निघाला.

पुढे जाऊन त्यानं सरांना विश केलं. छान तयार करून आणलेल्या टपोऱ्या फुलांच्या गुच्छ दिला. फुलं देताना त्यावर शिंपडलेल्या पाण्याचे काही थेंब त्याच्या हातावर पडले आणि त्याला इतका थंडावा वाटला. त्या भयंकर उष्ण संध्याकाळी तेव्हढाच काय तो दिलासा! इथं आल्यापासूनच आतून तो इतका अस्वस्थ झाला होता की स्वत:च्या छातीचे ठोके त्याला ऐकू येत होते. कितीही प्रयत्न केला तरी राहुल आणि त्याच्यातलं ते फिसकटेलेलं डिल सारखं डोळ्यासमोर उभं राहात होतं. काय दोष होता आपला? कशासाठी वागला तो तसं आपल्याशी? असं सारखं त्याच्या मनात येत होतं.

मात्र वाणी सरांच्या अगत्यशील आतिथ्यामुळे त्याला निघूनही जाता येत नव्हतं. स्टेजवरच्या गर्दीकडं त्यानं हताशपणाने पाहिलं. सर म्हणाले, ''मी तुला युक्ती सांगतो. तू आधी जेवून घे मग तिथं जाऊ आपण.''

''सर पण, विश करायच्या आधीच कसं जेवणार?''

''अरे, काही हरकत नाही. तू जेवून घे पाहू आधी'' असं म्हणत सरांनी त्याला जेवणाच्या काऊंटरकडं रवाना केलं. स्टेजवर जाण्यासाठी लागलेली रांग वाढतच होती. त्यात अनेक

बुजुर्ग, वयस्कर, मान्यवर चेहरे होते. सगळे बिचारे आपले रांगेत थांबलेले. त्याला कससंच झालं. बहुतांश सारे सरांच्या प्रेमापोटीच आले होते त्यामुळेच नाइलाजाने का होईना पण रांगेत थांबले होते.

सरांचं समाजमानसातलं स्थानच होतं तसं. त्यामुळंच समाजाच्या सर्व थरांतली आणि जातीधर्मांची मंडळी त्यात दिसत होती. पण त्या सगळ्यांना असं रांगेत थांबायला लागतंय यानं तोच अस्वस्थ झाला. हे नेहमीचे टिपिकल रिसेप्शन टाळून काही चांगला, विधायक पायंडा पाडता आला नसता का सरांना? असं त्याला वाटत होतं. पण पोरीपुढं ते हतबल झाले असावेत. इतक्या लांबूनही तिच्या चेहऱ्यावरच्या मेकअपचे थर चमकत होते! ती सरांची पोरगी नसून अखंड चमचमणारी शोकेसमधली एखादी निर्विकार बाहुलीच असावी असं त्याला वाटलं.

सरांच्या साधी राहणी–उच्च विचारसरणीचा काही प्रभाव तिच्यावर पडला नसेल का? आश्चर्यच आहे. समाजाला नवी दिशा देणं, सामाजिक सुधारणा होण्यासाठी प्रयत्न करणं यात अग्रणी असलेल्या सरांना स्वत:च्या कुटुंबीयांच्या विचारसरणीत मात्र फार बदल घडवून आणायला जमलं नसावं. त्यांच्या विचारांचं बीज दुसरीकडंच कुठंतरी रुजेल कदाचित. पण काहीतरी सुवर्णमध्य साधायला हवा होता असं त्याला त्या रांगेकडं पाहून राहून राहून सारखं वाटत होतं. वधु–वरांनीच सर्व पाहुण्यांचे त्यांच्या जवळ जाऊन आशीर्वाद घेतले असते तर किती उचित झालं असतं.

पण पठडी अशी सहजी थोडीच मोडते? शिवाय 'मेजॉरिटीमध्ये प्रॅक्टिकॅलिटीचाच' विचार जास्त प्रभावी ठरतो नाही का? हल्लीचा ट्रेंडच आहे ना तो? इथं आलेल्यांपैकी सगळ्यांनाच हे असं रांगेत तिष्ठत राहणं आवडत नसेलही. पण कोणीही त्याचा फार विचार करणार नाही की स्वत:च्या जीवनात त्या अनुषंगाने काही बदल घडवणार नाही. उद्या वैयक्तिक आयुष्यातल्या प्रसंगामध्ये जिथे सामाजिक संदर्भ येतील तिथेही काही चांगले बदल मुद्दामहून करण्याच्या भानगडीत फारसे कुणी पडणार नाहीत. समाजात ज्याची चलती आहे...किंबहुना जी करंट फॅशन आहे तीच डोळे झाकून सरसकट स्वीकारली जाईल. हे असंच असतं, असणार हे त्यांनी गृहीत धरलेलं आहे. मुकाट्याने स्वीकारलं आहे कारण मेजॉरिटीची त्याला मान्यता आहे. इथून निघून गेल्यावर बहुतांश लोक हे सगळं विसरून जातील आणि पुन्हा पुढच्या समारंभात तितक्याच यांत्रिक उत्साहाने सामील होतील.

फार खोलात जाऊन विचार करून स्वत:ला शिणवून घ्यायचा नसता उद्योग आपल्यासारखे येडे सोडून कोण करतील म्हणा? असलेच काय काय विचार त्याच्या मनात येत राहिले. ''समाजातल्या अनाठायी गोष्टी, अनिष्ट रुढी बदलायच्या असतील तर त्यांची सुरुवात आपल्यापासूनच करायला हवी.'' ही त्याच्या वडिलांची शिकवण त्यानं मनापासून आत्मसात केली होती. सगळ्याच बाबतीत तो अत्यंत सिन्सीअर होता. लहानपणी शाळेत फळ्यावर लिहिलेले सुविचार हे दैनंदिन जीवनात अंगीकारण्यासाठी असतात ही गुरुजींची शिकवणही तो तंतोतंत पाळत आला होता. पण त्यानुसार तो सर्वांशी वागायला जायचा आणि तिथंच गोते खायचा! एरवी त्याची बुद्धी विलक्षण तेज आणि कल्पनाशक्ती अत्यंत तरल होती. मात्र सग ळ्या गोष्टींचा मनाने विचार करायचा, डोक्याने नाही. त्यामुळेच आजुबाजूला सदैव दिसणारी कृती–उक्ती मधली विसंगती त्याला अस्वस्थ करून सोडायची. त्यातूनच मग त्याला आपला या कशावरच काही कंट्रोल नाही हे असह्य व्हायचं. हे सारं दुष्टचक्र सहन न होऊन तो मग शक्यतो एकगठ्ठा माणसं भेटतील असे प्रसंगच टाळायचा. पोशाखी समारंभ, पाट्‌र्या, सोशल गॅदरिंग्जना हुलकावणी द्यायचा. पण त्यामुळेच अशा प्रसंगाना तोंड द्यायची त्याची तयारी व्हायचीच नाही. आणि हे असे प्रसंग मग त्याच्या अगदी अंगावर यायचे.

पायाखाली आलेल्या प्लॅस्टिकच्या ग्लासने सुकुची तंद्री भंगली. कुणीतरी वापरून टाकून दिलेला तो ग्लास हातात घेऊन त्याने डस्टबीन शोधली तर ती उपरंडून वाहात होती. ती तिथल्याच एका वेटरला त्याने खुणेनंच दाखवली. त्या माणसानेही होहो करत याची समजूत घातल्यासारखं केलं.

किती हा प्लॅस्टिकचा कचरा. सुकुला खंतावायला अजून एक विषय झाला! कशाला हे असले बेसुमार उधळपट्टी करणारे समारंभ करतात लोक. कशाला तडमडलो इथं आपण... अरे हो, पण वाणी सरांमुळे... हे सगळं स्वत:च स्वत:ला स्पष्टीकरण आठवून पुन्हा एकवार तो हताशपणे गप्प बसला. म्हणजे मनातल्या मनात मनातल्या विचारांना गप्प बसवण्याचा त्याने प्रयत्न केला! तरी पुन्हा आलेच त्याच्या मनात, 'त्याच त्या विचारचक्रात अडकतो आहोत आपण. यही होता है तो यही होता क्यूं है...! ' विचार करणाराही तोच आणि प्रश्न विचारणाराही तोच .

''क्यों यार, सुकुमारजी दिखाई नही देते आप'', सईदमियां शायराना अंदाजमध्ये विचारत होते. त्यांच्याशी बोलत तो जेवणाच्या काउंटरकडे गेला. तिथंही भयंकर गर्दी होतीच. मग प्लेट घेऊन ज्या टेबलवर त्यातल्या त्यात जरा उसंत दिसत होती तिथे जाऊन त्याने जनरल काही तरी उगाच वाढून घेतलं. पलीकडच्या काउंटरवर झुंबड उडाली होती... काय म्हणून विचारलं तर ''तवातडका पनीर शॅलोफ्राय'' पंजाबी थीम आहे यार.इट रॉक्स..''असं एकानं सांगितलं!

लोकपरंपरा, समाज आणि संस्कृती, धर्म आणि समाजमन, तत्त्वज्ञान आणि मीमांसा या क्षेत्रातल्या एका ज्येष्ठ साहित्यिक विचारवंताच्या घरच्या लग्नकार्यात ''पनीर पसंदा अन तवातडक्याचीच '' थीम होती तर!

प्लेटमधे बळंच काही तरी घेऊन तो मागे फिरला तर पुन्हा दिव्या समोर आली. 'तुम्ही जेवताय ना' असं तिला विचारलं. तर मान वेळावून म्हणाली, ''हां अजून थोड्या वेळाने. घरचेच आहोत ना आम्ही..''(!) इति दिव्या... ''हो, ना बरोबरच आहे''(!) असं म्हणून सुकु इतर कुणाशी तरी बोलत प्लेट सावरत होता तर तितक्याच समोरून येणाऱ्या राहुलची आणि त्याची एकदम नजरानजर झाली. तेव्हा मात्र मग राहुल त्याच्या दिशेने आला. संभावितपणे ''काय म्हणतोस'' इत्यादी विचारलं. याला काय उत्तर द्यायचं वगैरे डोक्यातच येत नव्हतं.

हाच का तो आपला एकेकाळचा जिवलग (म्हणजे आपल्याला वाटलेला) मित्र? किती स्वप्नं पाहिली होती दोघांनी मिळून. तास न् तास बोलत बसायचो... वेळ संपून जायचा पण आपल्या गप्पा काही सरायच्या नाहीत. आपल्या कल्पना शक्तीमुळे भारावून जाऊन राहुलनेच एक प्रपोजल आणलं होतं. कलानिर्मिती हे माध्यम धरून स्वत:ची अशी जॉइन्ट व्हेंचर सुरू करण्याचं. लेखन, चित्रकारी, छायाचित्रण यांच्या मिलाफातून हा सुंदर कायकाय करत असायचाच ना. त्या सगळ्यात बॉर्न सेल्समनच असलेल्या राहुलला पैसा दिसायला लागला होता. त्यातूनच बडेबडे प्लॅन्स आखले होते राहुलनं. मोठमोठी स्वप्ने पाहायला उद्युक्त केलं होतं सुकुमारला. रोजच्या रहाट गाडग्यासारख्या जगण्याला सुकुही कंटाळला होता पण स्थिर नोकरी ही त्याची आर्थिक गरज होती. त्यामुळे तो भावुक असला तरी स्वत:साठी मात्र फारशी स्वप्नं बघायचा नाही. ते आपल्याला झेपणार नाही याची त्याला मनोमन जाणीव होती. राहुलने मात्र त्याला पार झपाटून टाकलं आणि जॉईट व्हेन्चरचं स्वप्न (की मृगजळ )त्याला दाखवलं. त्याच त्या वर्तुळात फिरणाऱ्या पण जोखड टाकून देण्याची हिंमत नसलेल्या सुकुलाही तेव्हा हा बदल हवासा झाला. हीच संधी असेल नवजीवनाची असं वाटलं त्यावेळी त्याला... आणि त्यानंही अत्यंत मनापासून त्यात उडी घेतली.

पण... पुढे लवकरच त्याच्या लक्षात आलं की याच्या कलेच्या जिवावर राहुल नुसताच उड्या मारतोय आणि त्याच्या हातात काहीच भांडवल वगैरे नाहीय! नुसता बोलाचाच भात होता सगळा! इकडे सुकु तर नोकरी वगैरे सोडून पूर्ण तयारीनीशी उतरला होता खरा पण त्याला धंद्याची काहीच माहिती नव्हती. कलाप्रांतात आपण फक्त विहार करायचा अशी त्याची रम्य स्वप्नं होती. तो सगळा त्याचा येडेपणाच झाला होता. स्वत:च्याच व्हलनरेबिलिटीचे अतोनात दुष्परिणाम भोगावे लागले त्याला. सुकुसारख्या स्वप्नाळू, तत्त्वनिष्ठ, प्रामाणिक इत्यादी म्हणजेच या आजच्या युगात येडचाप... असलेल्या व्यक्तीचा इतका कच्चा डिफेन्स असताना राहुल नाही तर आणखीन कुणी हेच करून गेला असता कदाचित! जीवलग मित्र म्हणवून घेणाऱ्याने हे केलं म्हणून वास्तविक सुकु खूप म्हणजे खूपच घायाळ झाला. उन्मळून पडला. हां.. फक्त नष्टच झाला नाही इतकंच.

उभा केलेला जॉइन्ट व्हेंचरचा डोलारा जसाजसा डोईजड व्हायला लागला तसंतसे राहुलने त्यांच्या मैत्रीतूनही अंग काढून घ्यायला सुरुवात केली. त्याचं दुसरीकडेच कुठेतरी सेटिंग झालं होतं तोवर. नाही तरी सहज जाता जाताच त्याने ही गेम खेळून पाहिली होती. पण त्याच्या अपेक्षेपेक्षा सुकु पारच सरळ सोट निघाला. ह्या असल्या सरळमार्गी आणि नेभळट माणसाबरोबर अडकून राहून कसला बिझनेस चालणार कप्पाळ! म्हणून त्याने सुकुला चक्क सोडून दिलं होतं. स्वत: राहुल फार काही सिरीअस नव्हताच या प्रकरणात. सुकुचाच तसा गैरसमज झाला होता! त्यामुळेच एकेकाळी राहुलला विलक्षण वाटणारी सिन्सीअरिटी आता जाचक बंधन वाटायला लागली. भेटणं तर दूरच तो तर सुकुचे कॉल्सही टाळू लागला. अमुक तमुक इन्क्वायरी आली आहे असं सांगून सुकुकडून तयार करून घेतलेली प्रॉडक्टस् परस्पर कोणालाही विकू लागला किंवा स्वत:च इंप्रेशन

मारण्यासाठी भेटीदाखल देऊ लागला.

अशा सगळ्या गंडवागंडवीची सुकुला सुतराम कल्पनाच नव्हती. 'मित्र म्हणजे जिवाला जीव देणारा.' मित्रत्वाचा केवळ हाच अर्थ तोपर्यंत त्याला ज्ञात होता ना! स्वत:वरचा आर्थिक ताण वाढायला लागल्यावर आणि राहुलची टोलवाटोलवी सुरू झाल्यावर मग कुठे गोष्टी थोड्याथोड्या त्याच्या लक्षात यायला लागल्या. तोपर्यंत बराच उशीर झाला होता.

तिकडे मात्र राहुलने कुठेकुठे लग्गा लावून एक अत्यंत मोठी संधी पदरात पाडून घेतली होती. एका मोठ्या ॲडफर्मच्या चिफ पब्लिसिस्टची पोझिशन त्याने मिळवली होती. ही बातमीही त्याने सुकुला सावकाशीनं सांगितली. सुकुला असं वाऱ्यावर सोडून द्यायला त्याला काहीही वाटलं नाही. जॉईन्ट व्हेंचर मधे सुरुवातीची सगळी मांडामांड सुकुच्याच पुंजीवर झाली होती. बरं, 'मित्र' या सदरातलं हे प्रकरण असल्याने अर्थातच काहीही कागदपत्रं केलेली नव्हती. शिवाय पुन्हा तोंड वर करून. 'तू फारच स्वप्नाळू आहेस यार सुकु.. या दुनियेत असं चालत नाही. स्वत:चं मन मारावं लागतं. नुसती कला वगैरे कोण विचारतो? स्वत:ला विकायला जमलं पाहिजे यार.' हे तत्त्वज्ञान राहुलने त्यालाच ऐकवलं होतं.

आता पुढे काय करायचं याचा विचार सुकुला स्वत:चा स्वत:लाच करायचा होता. बिझनेस वगैर करणं सुकुच्या स्वभावातच नव्हतं. राहुल तर केव्हाच नवीन ठिकाणी रुजू झाला होता. आता तर त्याला सुकुसारख्यांशी म्हणजे राहुलच्या भाषेत, 'साल्या पुचाट लोकांशी' बोलायलाही मुळीच फुरसत नव्हती. मीडियाला मॅनेज करण्याचा किती तरी अधिक महत्त्वाचा रोल त्याला रोजच्यारोज पार पाडायचा नव्हता का...?

कोणतंही विशेष कसब अंगी नसतानाही आपण कसे सर्वगुणसंपन्न आहोत हे दाखवणाऱ्याचीच या युगात सर्वत्र चलती.. आणि अशांनाच डोक्यावर घेण्याची इतरांची तयारी होती. कारण त्यामुळे त्यांना रोज नवा नायक किंवा खलनायक मिळतो ना! त्यामुळेच कंटाळा आला की दुसरी व्यक्ती दुसरा चेहरा. याच लाटेत राहुलसारख्या लोकांना विलक्षण महत्त्व आलं होतं. असे तात्पुरते चेहरे तयार करण्याची जणू त्यांनी फॅक्टरीच उघडली होती. मीडिया मॅनेजमेंट हीच एक नवी इंडस्ट्री होऊन बसली होती.

बिनभांडवली पण चिक्कार प्रसिद्धी आणि त्यायोगे मिळणारा पैसा मिळवून देण्याच्या शक्यता निर्माण करणारी... 'प्रसिद्धीचे हवाला रॅकेटच' जणू! राहुल त्यात चांगलाच रुळला, स्थिरावला, पसरत गेला अस्ताव्यस्त. आता भूतकाळ तर राहुलच्या दृष्टीने सर्वस्वी कुचकामी होता. व्हॅल्युलेस...

त्यामुळेच सुकुसारखी माणसं आता खरोखरच राहुलच्या खिजगणतीतही नव्हती. पूर्वी म्हणजे या सगळ्या गुळगुळीत दुनियेत फार आत शिरण्यापूर्वी राहुलला सुकुसारखे कानेकोपरे आधाराला बरे वाटले असतीलही... म्हणजे तेव्हा वाटले होतेच म्हणा. दोन्ही दृष्टीने...इमोशनली पण आणि प्रोफेशनली पण. म्हणजे असं की पूर्वी त्यानं लिहिलेल्या लेखांचा एक संग्रह काढायचं त्याच्या कित्येक दिवस मनात होतं पण साली पैशाची जुळवाजुळव, प्रकाशकांशी दोन हात करणं, हवं तसं मुखपृष्ठ करवून घेणं इत्यादी साठी त्याची किती ससेहोलपट व्हायची. त्या स्ट्रगलच्या दिवसांमध्ये हे सुकुसारखे भावुक लोकच त्याच्या विसाव्याचं ठिकाण होते. सुकुने कसं दिवसरात्र मेहनत करून त्याच्या पुस्तकाचं एकूण एक म्हणजे ड्राफ्ट चेकिंगपासून, रेफरन्सेस, काढून देण्यापर्यंत आणि नंतर मुखपृष्ठ करण्यापासून फायनल प्रुफ करेक्शनपर्यंत सगळं काम केलं होतं! तेही प्रेमाने. एक रुपयासुद्धा न घेता! उलट पुन्हा त्याचं पहिलं पुस्तक म्हणून स्वत:च त्याला छान भेट वगैरे दिली होती. पण असल्या इमोशनल गोष्टी राहुलला खुळचटपणाच वाटायच्या. त्याला वाटलं म्हणून त्यानं केलं.... इतपतच लावून घेतलं राहुलने. शिवाय प्रकाशनसमारंभ प्रकाशकाच्या सोयीने दुसरीकडेच होता तर सुकुला आग्रह करून बरोबर घेऊन जाणंही नाहीच झालं त्याच्याच्याने. तिकडचा सगळा माहोलच वेगळा असणार होता ना. तिथे सुकुची त्याला अडचणच झाली असती. त्यामुळे सुज्ञपणे त्याने सुकुला ॲडव्हान्समधेच पद्धतशीरपणे कटवलं होतं. सुकुलाही तेव्हा राहुलचंच बरोबर वाटलं होतं. कुठं जाणार आपण तरी इतक्या लांब? असा बाळबोध विचार करून त्याने आधीच राहुलच्या पुस्तकाचं सेलिब्रेशन नव्हतं का केलं! काय पण त्या एका पुस्तकासाठी तेव्हा मगजमारी करावी लागली होती.

आणि त्याउलट झालं राहुलचं. अलिकडंच बाजारात आलेल्या नव्या कोऱ्या पुस्तकाच्या वेळी. सगळं कसं छान

सुरळीत पार पडलं होतं. 'पर्सन्स पर्सनॅलिटिज' हे त्यानं केलेलं आत्ताचं पुस्तक कसं मस्त भपकेबाज होतं... मीडियातली त्याची अख्खी फौज तैनातीला होती. मग काय उणीव राहणार म्हणा. यावेळी सुकुची राहुलला साधी आठवणही नव्हती झाली. ही फॅक्ट होती. इनफॅक्ट त्याला स्वत:च्या पहिल्या पुस्तकाच्या एकूणच दळभद्री प्रेझेंटेशनची मनातल्या मनात लाजच वाटायची. काय ती साली आपली घाटी पद्धत. आत्ताच्या पुस्तकाचा कसला ग्रँड झाला होता पब्लिकेशन सेरेमनी. इंडस्ट्रीतल्याच अनेक 'हूज हू' त्याच्या पुस्तकातल्या पर्सनॅलिटिज असल्यामुळे समारंभाला पण सगळे कसे आवर्जून उपस्थित होते. लोकल पेपरांनी नंतर किती कव्हर केलं होतं माहीत नाही पण त्याच्या सर्कलमधल्या चॅनेल्सनी लाईव्ह कव्हर केला होता सगळा सेरेमनी. साली अशी पाहिजे प्रॉडक्शन व्हॅल्यू ! सगळं कसं मस्त ग्लॉसी केलं होतं पुस्तक... अथपासून इतिपर्यंत. ''वन मोअर ग्लिटरिंग ॲडिशन टू दि गॅलेक्सी ऑफ द स्टारवर्ल्ड''... आता रिजनल लँग्वेजमध्ये पण अशी पुस्तकं यायला लागली आहेत. हां... इटस् अ गुड थिंग... व्हाय ओन्ली मदरटंग्ज शुड रिमेन डिप्राईव्हड ऑफ द ग्लोरी ?'' असं काय काय किती छान बोलली होती शोभा पण तेव्हा... नव्या पुस्तकाचं सुकुला माहीत तरी होतं की नाही कुणास ठाऊक? राहुल सुकुचा मित्र होता तो काळ आता खूप मागे पडला होता.

मध्ये वर्षं अनेक गेली म्हणण्यापेक्षा आता काळाचं अंतर पडलं होतं त्यांच्या जगण्यामध्ये. राहुलचं जग सुकुपेक्षा निराळं होऊन गेलं होतं पूर्णपणे. पण आज राहुलला असा एकदम समोर बघून सुकुलाच एखाद्या वावटळीत सापडावं तसं झालं होतं. त्यावेळी तर तुटूनच गेला होता सुकु त्या सगळ्या प्रवाहापासून. राहुलच्या वागण्यामुळे बसलेल्या प्रचंड मानसिक धक्क्यातून कसाबसा सावरला सुकु. थोरल्या भावानं बरच जपलं त्याला. पुन्हा मार्गाला लावलं.

खूप धडे शिकला तो या अनुभवातून. पण अर्थात मूळचा हळवा, संवेदनक्षम स्वभाव तसाच होता त्याचा. तो कसा बदलणार ?

आत्ता इतक्या वर्षांनी आज अचानक ते सामोरे आले होते. राहुलला असे समोर पाहून सुकुला त्याच्या आणि राहुलमधल्या सगळ्या गोष्टी लख्ख आठवायला लागल्या होत्या. पण राहुल मात्र ढिम्म होता. नजरही चुकवत होता सुकुची.

असाच काही क्षणांचाच अवधी गेला असेल मध्ये पण केवढा प्रवास करून आलं सुकुचं मन. त्यांच्यातल्या अवघड शांततेचा भंग झाला तो अनिकेतच्या येण्यानं. अनिकेतच्या नव्या हिट शोजबद्दल बोलण्याच्या निमित्ताने राहुल सटकला सुकुसमोरून. पलीकडेच थांबून लगेच अनिकेतबरोबर 'उद्याच भेटू' वगैरे सेटिंग करायच्या मागे लागला. सध्याचं चलनी नाणं होता ना अनिकेत! हाऊसफुल जायचे सगळे शोज. मग अशी संधी राहुल कशी दवडणार ?

हातात रिकामी प्लेट घेऊन सुकु तसाच शून्यात पाहात होता. ''मघापासून कुठे होतास रे ?'' असं म्हणत पंक्यानेच पुन्हा मागून येऊन त्याला हलवलं आणि चल आईस्क्रिम खाऊ म्हणून त्याला ओढत घेऊन गेला. त्या काऊंटरवरही भली मोठी रांग होती. अरे किती गर्दी आहे इथं असं म्हणायचा प्रयत्न केला खरा. पण त्यावर पंक्याने दुर्लक्ष करत म्हटलं, ''अरे ते असो यार. ते 'शॅलोफ्राय' टेस्ट केलेस की नाही? माहीत आहे ना? ही हल्लीची हिट डिश आहे. शॅलोफ्राय म्हटलं की, पब्लिक खूष असतं एकदम! आपण तर यार सॉलिड चापले. मजा आला.''

सुकुने हताशपणे पंक्याकडे एक नजर टाकली. पंक्याच काय आजूबाजूचे अनेकजण शॅलोफ्रायवरच संतुष्ट होते तर. इतर कशाचीही फिकीर करायची त्यांना गरज वाटत नव्हती.

हिरवळीवरच्या गर्दीला उधाण आलं होतं. स्टेजवरची रांग वाढतच होती. वधुवरांबरोबर पाहुण्यांचे फोटेसेशन अधिकच जोमाने सुरू होते. आईस्क्रिम काऊंटरवरच्या वेटरला घाम पुसायलाही उसंत नव्हती. कार्टन रिकामं झालं म्हणून ते फेकून नवीन घेण्यासाठी वेटर वळला तेव्हा त्याची सुकुशी नजरानजर झाली. सुकु स्निग्धपणे हसला. वेटरनेही हसून प्रतिसाद देत क्षणभर थांबून श्वास घेत बाहीने कपाळावरचा घाम टिपला.

० ० ०

मैत्रेय रक्षित
सुहास गुर्जर ५०५, अभिनंदन क्लासिक गांधीभवन जवळ, कोथरूड,
पुणे ४११०३८

HAPPY DIWALI



Rajshekhar Ganechari

9423068300

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**SOCIETY OF INDIAN RECORD COLLECTORS (SIRC)**

(ESTABLISHED : 1990)




**Preservation Promotion and Research of Indian Musical Heritage**









801, Bhaskar, TIFR Hsg. Comlex, Navynagar, Colaba, Mumbai- 400 005
Tel. 0091 - 22-2189726 / (022) 22804986, email - sschand@tifr.res.in



# काही समकालीन कवी : जाणिवा आणि आविष्कार

**राजशेखर शिंदे**

काव्य हे भावगम्य असते. भावनाशील, संवेदनशील, रसिकाला समजते, असे काही सूत्र नसते. काव्य कोणासही समजू शकते, भावू शकते. तो रसिक असावा, काव्यामध्ये रस घेणारा असावा, एवढीच प्राथमिक अट असते. रस घेतल्याने स्वारस्य उत्पन्न होते. अनेक संकल्पनाव्यूहाशी झिंजाडून कवितेच्या चिन्ह संकेतांद्वारे अस्थिर अर्थजाणीवकक्षा, विस्तारत जाणाऱ्या अर्थकक्षा समजून घेता येतात. अस्थिर अर्थजाणीवकक्षा म्हणजे कवीला अभिप्रेत असलेला अगर नसलेला अर्थ किंवा रसिकांच्या संवेदनेमधून निष्पन्न होणारा गर्भितार्थ होय. देश–काल–परिस्थिती – संस्कृती–वाचकाची अभिरुची व ज्ञान यावर कवितेच्या अर्थाची भिस्त असते. भाषांतर/लिप्यंतर केल्यानंतर लिप्यंतरित भाषासंस्कृतीमधील काही गोष्टींची भर पडत असते. थोडक्यात काव्य हे वाचकपर जाणिवेच्या पातळीवरील वाङ्मय आहे. परंतु कवींनी व्यक्त केलेल्या जाणिवा प्रत्येक रसिक वाचकाला समजतील, त्या जाणिवांचे आकलन होईलच असे नाही.

कवितेचा मोह कोणत्याही काळात संपलेला नाही. कवितेची वाटचाल वेगवेगळ्या रचनाप्रकारांमधून झाली आहे. महाकाव्य, खंडकाव्य, दीर्घकाव्य, वृत्तालंकार, मुक्तालंकार, मुक्तछंद, छंदमुक्त, स्फुटकाव्य, भावकाव्य आणि आजची बव्हंशी वाट चुकून भरकटत असलेला चारोळी अशा विविध प्रकारात काव्याचे 'शारीरस्थित्यंतर' झाले आहे. पण त्यामधून व्यक्त झाली ती भावनाच. म्हणून 'काव्य म्हणजे वृत्त नव्हे, वृत्ती असते,' असेच म्हणावे लागते.

भावशीलता हेच काव्याचे मुख्य लक्षण आहे. कुठलाही विचार काव्यामधून प्रकट होत असला तरी त्यावर भावना मात करते. शुद्ध विचार कवितेमधून प्रकट होत नाही. भावनेच्या संस्कारामधूनच विचार अभिव्यक्त होतो. गणित आणि पदार्थविज्ञान यातील प्रमेये काव्यातून कशी प्रकट होतील? मानवी अनुभव, भावना हे काव्याचे विषय. ते संपन्न, समृद्ध, आशयघन, अर्थघन, अर्थवाही असावे. अनेक विषयांचे, व्यासंगाचे, कलासक्तीचे मूलगामी चिंतन व जीवनाचा गंभीर विचार केला असेल तरच उत्तम काव्य निर्माण होईल. त्याचे अक्षरत्व ही निराळी गोष्ट. किमान रचनादृष्ट्या, काव्यलक्षणांदृष्ट्या उत्तम तरी असावे.

समकालीनांत व्यासंगाचा, चिंतनाचा अभाव आहे.

आपल्या स्वत:च्या शैलीसंबंधीसुद्धा कवी बेफिकीर दिसतात. शैली, आशय आणि संवेदनस्वभावधर्म यामधून घडते. व्युत्पन्नतेचा ध्यास लागतोच. अन्यथा भावनांची चिंध्याचिवड कवी करतो आहे, हे दिसून येते, अशा कविता किती काळ स्मरणात राहतील! परंतु काही कवी-कवयित्री आपापल्या मगदुराप्रमाणे यथोचित प्रयत्न करीत आहेत. असे असंख्य कवी आहेत. त्यांमधील एका कवयित्रीची, दोन कवींची प्रातिनिधिक निवड 'आशय' सारख्या दिवाळी 'अंकाने' केली आहे.

## १. ' इज इट इन युवर डीएनए'

'इज इट इन युवर डीएनए' अशा लांबलचक शीर्षकाचा अभिधानंतर आणि पोएट्रीवाला प्रकाशनसंस्था प्रकाशित कवितांचा संग्रह आहे. कवयित्री मीनाक्षी पाटील यांचा वरील संग्रह वेगवेगळ्या गोष्टींबाबत विचार करावयास लावणारा आहे. प्रशासकीय सेवेच्या यंत्रणेत उच्चपदस्थ असलेल्या या कवयित्रीने आपली संवेदना बधिर होऊ दिलेली नाही. काव्याची कोमलता त्यांनी टिकवलेली आहे. आपल्या पस्तीसएक कवितांचा सुंदर असा गुच्छ रसिक वाचकांच्या हाती सुपूर्द केला आहे. 'इज इट इन युवर डीएनए' ही बहुचर्चित कविताही या संग्रहात समाविष्ट आहे. एकवीस पृष्ठांची ही दीर्घकविता 'अभिधानंतर'कडून दिला जाणारा पुरस्कार प्राप्त कविता आहे. 'भ्रमिष्टांचा जाहीरनामा' या प्रदीर्घ कवितेला पंचवीस हजार रुपये रकमेचा पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर पुरस्काराच्या स्वरूपात बदल झाला. एकाच कवितेला पुरस्कार देण्याऐवजी अनेक कवितांचा विचार झाला. दुसऱ्या पुरस्कारात 'इज इट इन .....'ला रु. दहा हजारांचा पुरस्कार प्राप्त झाला. ही कविता अत्यंत जाणीवपूर्वक अभ्यसनीय आहे. कवयित्रीच्या जाणिवेच्या अनेक शक्यता तीमध्ये एकवटलेल्या आहेत. कवयित्रीच्या नितळ आणि निरागस पिंड धर्माचे दर्शन तर होतेच शिवाय शैलीच्या अनुषंगाने कविता आवर्जून पाहावी अशी आहे.

संग्रहामधील सर्वच कविता सुंदर आहेत. म्हणूनच संग्रहाला मूल्य आहे. कवितांमध्ये एकसुरीपणाचा लवलेशसुद्धा नाही, ही या संग्रहाची जमेची बाजू. कवितांचा रसरंग, गंध निराळा आहे. एखादीच कविता रोमँटिक आहे (दृष्टिभेट), एखादीच स्त्रीपणाचा खास अनुभव आविष्कृत करणारी आहे, एखादीच स्त्रीची दुर्दम्य सोशिकता प्रकट करणारी, एखादी निरीक्षण मांडणारी, एखादी आत्मपर, एखादी मराठी काव्याचा पट-इतिहास स्पष्ट करणारी, एखादी काव्याची निर्मिती प्रक्रिया सांगणारी, दोन स्त्री मनाचा विकास अधोरेखित करणाऱ्या (मुलीने सांगितलेली नवी गोष्ट, मनाचे काही कप्पे बंद करता आले असते तर), दोन महानगरी संवेदना प्रकट करणाऱ्या (कष्टाचा खारा वारा, देवालय) इत्यादी असे 'इज इट इन .....' चे रूप-स्वरूप डोळ्यात भरणारे आहे. आत्मसंदर्भ असलेल्या तरीही संवेदना व भावातील वैविध्य आविष्कृत करणाऱ्या कविता आहेत. स्वसंदर्भाची कविता म्हणून या कविता व्यक्तिवादी वाटत नाहीत. व्यक्तिपातळीवर न राहता सार्वत्रिक अनुभवस्वरूप वाटावी, अशी काव्यशैली आहे. स्वसंदर्भ असूनही आविष्कारात तो संदर्भ निखळावा, ती आत्मनिमग्नता नाहीशी व्हावी हे कवयित्रीच्या व्यापक संवेदनस्वभावाचे निदर्शक आहे. अनुभवांकडे तटस्थपणे आणि त्रयस्थपणे पाहणे हाच कवयित्रीचा मन:पिंड वाटतो.

मीनाक्षी पाटील यांनी अनेक विषयांना, अनुभवांना काव्यविषय केले आहे. 'जगण्याचे काव्यामधून ऊर्ध्वपातन व्हावे' याप्रमाणे ही रचना आहे. प्रेमासारख्या रसिकप्रिय विषयावर 'दृष्टिभेट' ही एकमेव कविता आहे. तीमधून कवयित्रीची उन्नत अभिरुची व्यक्त झाली. त्यांचा गंभीर पिंडधर्म बहुतांशी कवितांमधून ध्वनित होतो. त्यासोबत मिश्किलपणाचाही प्रत्यय येतो. मुलींना पाहून जमणाऱ्या मुलांच्या लोंढ्याला त्या पहिल्या पावसातील भूछत्र्या म्हणतात! -

*'एक जोरदार सर*
*येऊन गेल्यावर,*
*अनेक छत्र्यांच्या गर्दीतून हलकेच एका छत्रीतून,*
*एक फुलपाखरू भिरभिरलं,'*

कॉलेजमध्ये शिकणाऱ्या खट्याळ युवतीचा स्वभाव दाखवताना

*'भिंतीवर चिपकलेली पाल पाहता पाहता*
*तिला आमच्या सूचना*
*उजवीकडून हळू चाल मग डावीकडे वळ'*

असे मिश्किल, खट्याळ, खेळकर स्वभावदर्शन घडविले आहे. समकालीन कवितेत हे अपवादानेच घडले आहे. पाटीलबाईंच्या शैलीमध्ये वैचित्र्य आहे. त्यांच्या कवितेमध्ये लोककथनाची निवेदनशैली डोकावते :

*'तर ऐकुया एक कहाणी...*
*आटपाट नगरात राहायच्या*
*कॉलेजमधल्या दोन बाई'* (पृ. ६५)

ही लय लोककथनाची, निवेदनाची आहे. त्यामध्ये एक

गोडवा आहे आणि ही लय वाचकाला त्यात स्वाभाविकपणे ओढून घेते. मध्येच स्त्रीच्या मोकळ्या-ढाकळ्या स्वभावाची, तिच्या त्रयस्थ होण्याच्या वृत्तीची आठवणही होते :

*'जाऊ दे बाई*
*बायकाचं बायका बघतील*
*पुरुष पुरुषांचं बघतील,*
*'नाही तर व्हाईसव्हर्सा*
*एकमेकांचं बघतील' (पृष्ठ ६८-६९)*

हा नितळपणाही दिसून येतो

स्त्रीच्या मानसिकतेचे अवस्थांतरण तीन पिढ्यांमधून कसे होत गेले, तिच्या वृत्तीचा विकास कसा होत गेला, हे फार छान, अल्पाक्षरी स्पष्ट केले आहे. आईची आई कवयित्री होते. रुग्णाईत आईची सेवा करायची, तिची काळजी घ्यायची; पण आई मात्र आपल्या लेकात गुरफटलेली. लेकीला द्रोह करण्याचे धारिष्ट नाही. हे धारिष्ट तिच्या लेकीत निर्माण होते :

*'ममा, सांग नवी गोष्ट*
*एक होती राणी, तिला होते दोन राजे*
*एक होता आवडता*
*एक होता नावडता,'*

तरीही स्त्रीला 'इज इट इन युवर डीएनए' असा निर्भर्त्सनाजनक प्रश्न विचारला जातो. तिच्यामध्ये प्रचंड ऊर्जा, ऊर्मी, क्षमता असूनही एखादे रोपटे उपटून दुसऱ्या ठिकाणी रोपावे, ते त्या ठिकाणच्या  हवा, पाणी, जमीन यांशी दोन हात करते, फुलते, फळते. पुन्हा पाप-पुण्य, नीती-अनीती यांचा आत्मक्लेश, आत्मसंघर्ष आहेच. स्त्रीशरीर मन सदैव युद्ध प्रसंगाला सामोरे जात असते. तरीही कुत्सितपणे 'इज इट इन...' अशी निर्भर्त्सना केली जाते. हे ध्यानात घेऊन तिने केलेले प्रचंड दिव्य लक्षात घेऊन मीनाक्षी पाटील यांनी पुरुषवृत्तीलाच स्पष्ट खडा सवाल केला : 'इज इट इन युवर डीएनए ?'

## २. मीच माझा मोर

'मीच माझा मोर' हा मौज प्रकाशनगृह वितरक असलेला हा कवितासंग्रह आहे. कवी प्रशांत असनारे हे व्यवसायाने अभियंता. पण कविता सुंदर करतात. 'मीच माझा मोर' हा संग्रह वाचताना पानापानांवर त्यांचा चित्तचोर मनमोर थुईथुई नाचत दृष्टिगोचर झाल्याचे दिसून येते. असनाऱ्यांचा संवेदनस्वभाव समाजशील मनोवृत्तीचा आहे. समकालीन सामाजिक घटितांमुळे ते घायाळ होतात. समकालीन समाजाच्या रूपाचे तीव्र पडसाद त्यांच्या कविमनावर उमटतात. हे पडसाद द्रोहात्म, गालिप्रदान, विरूपतेचे, कुरूपतेचे, विद्रुपतेचे दर्शन घडविणारे नसते. यामधील हिंसा ते नाकारतात आणि सकारात्मक जीवनदृष्टी घेऊन मोर नाचवतात. 'मीच माझा मोर' हा संग्रह वाचताना मराठीमधील वैशिष्ट्यपूर्ण लेखक पुरुषोत्तम शिवराम रेगे यांची आठवण होणे अपरिहार्य होते. रेगे 'सावित्री' कादंबरीमध्ये

*'मोर हवा तर आपणच मोर व्हावा,*
*जे जे हवे ते ते आपणच व्हावे.'*

असे म्हणतात. असनारे सुद्धा आपल्या कवितेमधून हेच सांगत आहेत. फरक इतकाच की रेगे  गद्यातून - 'सावित्री', 'रेणू', 'अवलोकिता', 'मातृका' व काही गोष्टींमधून मोराची विविध रूपे दाखवितात ; कवितेमधून एकदाही नाही. पण प्रशांत असनाऱ्यांची चांगली कविता मोराशिवाय होत नाही. त्यांच्या कवितेत प्रसन्नपणाचे, सर्जकतेचे प्रतीक होऊन मोर येतो.

कवी असनारे प्रसन्नपणाने, सकारात्मकतेने श्रेयस आणि प्रेयस याचा शोध घेतात. सर्वत्र हिंसा, खून, जाळपोळ, बॉम्बस्फोट, गोळीबार, घातपात, अफरातफर, विश्वासघात, बेबनाव, बेकी माजलेली व समाजमनाची बंडाळी होत असलेली दिसत आहे. 'छोटीशी आशा' कवितेत हे सर्व घडताना दिसते. धार लावलेला चाकू, लोड केलेले पिस्तूल, नवीन वस्तरा ही सारी हत्यारे तयार ठेवली जात आहेत. या भीषणतेमध्ये विषण्ण मनानं कोणी माऊथऑर्गन वाजवीत आहे.

*'..... आणि हे काय?*
*एवढी जय्यत तयारी सुरू असताना*
*हा कोण मूर्ख*
*माऊथऑर्गन वाजवतोय*
*असू दे ! असू दे !!*
*तोही खिशात असू दे*
*कुणी सांगावं -*
*कदाचित तोच उपयोगी पडेल'*

हे भयंकर सत्य समोर असताना त्याही विकल अवस्थेत कदाचित जीवनाच्या सुजलाम्, सुफलाम्‌तेचे संगीत झंकारणाऱ्या, सर्व विनाशाला वाचवणाऱ्या अशा छोट्याशाच गोष्टींची गरज आहे. माणसा माणसांमधील आटत चाललेले प्रेम, पुन्हा स्वरांमधून पाझरेल अशी आशावादी दृष्टी कवी प्रकट करतो.

जगाचा विकास झाला असला तरी सामाजिक स्तरीकरण, वर्णभावना, जातवास्तव इ. गोष्टी विकासाला खीळ

घालत आहेत. शोषक आणि शोषित हा संघर्ष जुनाच आहे. 'धोका आहेच' ही त्यांची प्रातिनिधिक कविता आहे. महालाला समोरच्या झोपडपट्टीचा नेहमीच धोका असतो अशी भीती महालवाल्यांना वाटते. मुलांचा बाप चोरी करेल याची किंवा मुलगा रात्ररात्र अभ्यास करेल याचीही. तो शिकेल, मोठा होईल याची भीती नाही, नेता होईल शोषकांशी संघर्ष करेल याची खास भीती. येन केन... जगण्याची तीव्र इच्छा सर्वांत दिसते. पण तीर्थाटनानंतरही जगण्याची नवोढी जाणवावी याचे कवीला आश्चर्य वाटते. 'तीर्थयात्रा' कवितेमध्ये अल्पाक्षरांमध्ये मोठा आशय व्यक्त झाला आहे.

*'अरेच्चा!*
*पण हे काय*
*तुम्ही नेलेल्या बॅगेमध्ये तर*
*पिवळेधम्म नाग*
*अजूनही तस्से आहेत –*
*जिवंत'*

तीर्थाटन करून माणसांची वासना संपत नाही तसे माणुसकीविषयी गहिवर दाखवून स्वत: आईवडिलांना वृद्धाश्रमात ठेवणारा कवी 'अनुवाद' कवितेमध्ये भेटतो. माणसे वरचेवर संवेदनशून्य होत आहेत हा या कवीच्या अनेक कवितांचा विषय झाला आहे. त्याचवेळी स्त्रियांमधील मार्दव, त्याग, सोशिकता कवी स्पष्ट करतो. 'वात' कवितेमधून स्त्रियांविषयी कणव, सहानुभूती प्रकट झाली आहे.

*'आई रात्रभर*
*दिव्याची वात कमी जास्त करत राहिली :*
*आयुष्यभर दोघांमध्येच*
*वातीसारखी जळत राहिली'*

असे नवरा आणि मुलांमध्ये जळून जाणारे स्त्रीजीवन आहे.

'मीच माझा मोर' या संग्रहामध्ये एकूण बाहत्तर कविता आहेत. कविता सुरस, लयकारी, सरळ निवेदनाच्या प्रासादिक अशा आहेत. चमकदार काव्यविधान करण्याची, सुभाषितवजा गद्यनिर्मितीची ओढ, कथात्म आशयाची निवेदनशैली आणि बहुतांशी कवितांमधून डोकावणारी कथा, समाजमनावरचा ओरखडा नाहीसा करण्याचे सकारात्मक आशावादी प्रयोजन या विशेषांमुळे हा संग्रह रसिकांना आपल्याकडे आकृष्ट करून घेईल. घर-घर, आजोबा: काही नोंदी, पायरी, रंग पावसाचा, सवड, मारिया, मी एक घोडा, महात्म्याचे मौन, झाड, मोर, कावळे, स्वप्न या कथात्म कविता वाटतात. या प्रत्येक कविता म्हणजे कथाबीजक आहेत. तसेच कवितेमधील येणारा मोर, माउथऑर्गन, चर्च, महात्मा, आई, विधवा, गतप्रेयसी, पाऊस, बंदूक, घायाळ कविमन इत्यादी गोष्टी खोल अंत:करणात जाऊन बसतात.

## ३ 'प्रस्तराचे स्वप्नभोग'

'प्रस्तराचे स्वप्नभोग हा प्रमोदकुमार अणेराव यांचा नुकताच प्रकाशित झालेला (जून २०१०), पंच्याऐंशी कवितांचा ताजा संग्रह आहे. बिकट आर्थिक परिस्थितीशी झुंज देत, समवयीनांकडून संभावना स्वीकारत, अवघ्या पस्तिशीमध्ये हृदयविकाराशी लढा देत प्रमोदकुमार वेगवेगळ्या प्रदेशांच्या कोपऱ्यांत जाऊन सामाजिक कार्य करतो. अशा धावपळीत तो अक्षरांची पालवी फुलवतो. त्याच्या निरस, रुक्ष जीवनात ती पालवी कुस्करली जात नाही. उलट दगडकपारांत, प्रस्तरखंडातून दुर्दम्य इच्छाशक्तीने दोनच पानांच्या देठाला फूल उमललेले दिसावे

अशा प्रमोदकुमारच्या कविता आहेत. पंच्याऐंशीच्या पंचाऐंशी कविता त्याच्या एवढ्या जीवनातील रस, रंग आणि गंध घेऊन आविष्कृत झाल्या आहेत. कवितेच्या साहाय्याने आपल्या मनावर तो फुंकर घालतो आहे. पण त्याची कविता अभावानेच व्यक्तिवादी वाटते. खरे तर तो करीत असलेल्या सामाजिक कार्याला पूरक रसना त्याची कविता त्याला पुरवते आणि त्यांद्वारा तो थरथरल्या अंत:करणाने भिंगुळवाणा विचारभाव प्रकट करीत आहे. हा त्याच्या कवितेचा मोठा विशेष. मनोगतात तो म्हणतोही 'एकटेपणाच्या, अनाथपणाच्या निबिड अरण्यातून केलेल्या ह्या प्रवासात माझ्यात 'स्व' ची तीव्रतम जाणीव कधी निर्माण झाली हे कळलेच नाही. या 'स्व' च्या तीव्रतम जाविणेतूनच आत्मशोधाची सुरुवात झाली. सुरुवातीच्या कित्येक कविता ह्या आत्मशोधाच्या , आत्मप्रतीतीच्या कविता आहेत.' आपल्या अस्तित्वाचा शोध तो प्रामाणिकपणे घेतो -(प्रस्तरवेध)

*'मी प्रस्तरवेधी वेडा*
*मागतो उन्हाची भीक*
*संध्येच्या कळससुरांतिल*
*प्राशतो चिंबली हाक'*

आपल्यामधील काठीण्य-प्रस्तर (दगड) नाहीसे व्हावे, फुटावे म्हणून, उन्हाची भीक मागणारा हा अपवादात्मक कवी; कार्यकर्ता आहे. या संग्रहाच्या आधारे निश्चित विधान करता

येते, की प्रमोदकुमारला सूर गवसत आहे: (कविता मी)

*मेणचटल्या भिंती*
*सर्जनात गिचमिड चित्राने*
*धृपद ना अंतरा बेढंगी गाणे....*

सकसतेची, चांगलेपणाची समज 'कविता मी' मधून प्रकट होते.

समाजातील विविध विचारधारा आणि प्रत्यक्ष आचार यांमध्ये कविमनास विसंगती दिसते. मुळात स्वदु:खाने पिचलेले मन हताश न होता पुढे सरकते. याच द्विधा मानसिकतेमधून प्रमोदकुमाराची स्वच्छंदवादी प्रवृत्ती निष्पन्न झाली आहे. यासंबंधात प्रस्तावनेमध्ये रा. ग. जाधव यांनी त्याचे कौतुक केले आहे. 'रोमँटिक प्रवृत्तीपासून आजकालची युवा कविता पूर्णपणे अलिप्त आहे, असे म्हणता येणार नाही, हे प्रमोदकुमारांच्या या संग्रहातील कविता वाचताना जाणवते. बंडखोरी, विद्रोह, संसृतिटीका यासारख्या वृत्तिप्रवृत्ती या रोमँटिसिझम-स्वच्छंदवाद तत्त्वप्रणालीच्या घटक आहेत; मात्र कल्पनारम्य आत्मरंजनात व आत्मपूजनात विद्यमान रोमँटिक कविता गुंतून पडत नाही. तिच्या कल्पित आविष्कारातही कोणत्यातरी अर्थपूर्ण जाणिवेची, वेदनेची उत्कट बैठक असते.' हाच प्रमोदकुमार अणेरावांचा पिंडधर्म आहे. त्यांच्या कवितेत केवळ कल्पनाविलास नाही. त्यांच्या कवितेवर दु:खाची, काहीशी निराशेची झाक, सामाजिक मानसिकतेची जाणीव, प्रतिमांची श्रावणझड, सुंदर शब्दकळा इत्यादी वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यामुळे कविता स्मरणात राहतील. पुढील प्रवासात ग्रेसांचा, महानोरांचा, आरतीप्रभूंचा प्रभाव उतरेल.

विस्तारभयास्तव इच्छा असूनही विस्तारपर्वूक लिहिता आले नाही, वरील तिन्ही संग्रहांचा केवळ परिचय दिला आहे.

० ० ०

## नोंद

'आशय'मधील कथा, कविता वा इतर मजकूर संग्रहातून समाविष्ट होणे नवे नाही. तरी त्यात या दोन विशेष नोंदी.

'समीक्षा अप हरण' हा डॉ. आनंद पाटील यांचा नवा तुलनात्मक समीक्षालेखांचा संग्रह. जागतिक वाङ्मय विश्वातील महत्त्वाच्या पुस्तकांवर, घटनांवर लिहिताना माय-मराठीतील समांतर पुस्तकांची, घटितांची नोंद घेत त्यावर तुलनात्मक भाष्य करणारे हे लेखन मराठीत महत्त्वाचे आहे. त्यांच्या अशाच एका इंग्रजी लेखाचा (बुकर विजेत्या 'इनहेरिटन्स ऑफ लॉस' आणि साहित्य अकादमी विजेत्या 'डांगोरा एका नगरीचा' यांची सांस्कृतिक तुलना करणाऱ्या) मराठी अनुवाद (सीमा चाफळकर) आम्ही गतवर्षी आवर्जून 'आशय' मध्ये प्रसिद्ध केला होता. सदर लेखाचा वरील पुस्तकात समावेश असून, अशा लेखाचा मुद्दाम अनुवाद करून घेऊन प्रसिद्धी दिल्याची डॉ. पाटील यांनी पुस्तकाच्या कव्हरवर खास नोंद केली आहे.

ज्येष्ठ प्रयोगशील चित्रकार सुधीर पटवर्धन यांची दीर्घ मुलाखत 'आशय'साठी मागील वर्षी निशिकांत ठकार (सोबत चित्रकार शिरीष घाटे) यांनी घेतली होती. जयंत राळेरासकर यांनी तिचे शब्दांकन केले होते. या मुलाखतीचा हिन्दी अनुवाद (स्वत: ठकार यांनी केलेला) केन्द्रीय ललिता कला अकादमी, नवी दिल्ली यांनी त्यांच्या 'कलाभारती' या द्विखंडात्मक ग्रंथात (संपादक पियूष दईया) समाविष्ट केला आहे.

## साभार पोच

१. 'एकान्ताची सळसळ' ... कवितासंग्रह - राजा होळकुंदे, मराठवाडा साहित्य परिषद प्रकाशन, सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद.
२. 'समीक्षा अप हरण'... तुलनात्मक समीक्षा, डॉ. आनंद पाटील, रजत प्रकाशन, ११८ मैथिली टॉवर्स, वीर सावरकर चौक, औरंगाबाद
३. 'मुद्रा - साठोत्तरी कथेची' ... कथाआस्वाद, सुनील साळुंके, अक्षरलेणं प्रकाशन, ६, तारका, उर्जानगर, जुनी मिल कंपाऊंड, सोलापूर-४१३ ००१.
४. 'स्वप्नबीज'... कथासंग्रह, शरदकुमार एकबोटे, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर
५. 'पाऊस चांदण्याचा'.....बालकवितासंग्रह, पुरुषोत्तम नगरकर, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.

पान २३ वरुन....

श्रीगमांची पुण्यात भेट झाली.'' ('निवडक माणूस'पृ.५२) अरुण साधूंनी तर असं म्हटलं आहे की, ''...माणूस'ला प्रचारकी पत्रिकेचे अवरूप येऊ न देता खुल्या व्यासपीठाचे व सकारात्मकचर्चापीठाचे स्वरूप दिले. तेच त्यांच्या मनाचेही व्यासपीठ होते. पुष्कळ तरुणांना या व्यासपीठाने विचार करण्याची संधी दिली. कथा-कांदबऱ्यांच्या पलीकडे जाऊन थोडे वैचारिक वाचन करण्याची सवय मराठी वाचकांना लावली. मराठीमध्ये 'माणूस' च्या चळवळीमुळे ललितेतर पुस्तकांचे लेखन, प्रकाशन, खप व वाचन थोड्याफार प्रमाणात तरी वाढले, असे म्हणता येईल.''

मराठी ग्रंथ आणि वाचनसंस्कृतीला 'माणूस' चे आणखी योगदान असे की, 'माणूस' ने मराठीत रिपोर्ताज ही पद्धत आणली. श्री. ग. माजगावकरांचे हे मोठे योगदान आहे. अनिल अवचट, दि. बा. मोकाशी (अठरा लक्ष पावलं) आणि इतर अनेक लेखकांनी ही शैली पुढे नेली. पुस्तकांसाठी रूढ केली. या पार्श्वभूमीचा सरळसरळ फायदा ग्रंथाली वाचक चळवळीला झाला. ग्रंथालीसारखी चळवळ पुढे जोमाने वाढली त्याचे श्रेय 'माणूस' च्या कार्याला आहे. 'इन्सिडेंट ऑन हिल १९२' (डिसें.१९७२) द्वारा स्वत: दिनकर गांगल 'माणूस' मधून व्यक्त होतच होते.

'माणूस' ला जशी सामाजिक-सांस्कृतिक चळवळीची फार मोठी पार्श्वभूमी होती, तशीच चळवळीचा भाग म्हणून काही नियतकालिकं (अनियतकालिके सोडून) निघत होती. त्यांची दखल ग्रंथव्यवहाराने फारशी घेतली नाही. 'मागोवा'हे त्याचे उत्तम उदाहरण असले तरीही, ग्रामीण चळवळीला वाहून घेतलेल्या 'गायरान', 'रानमळा' यासारख्या नियतकालिकांची दखलही शहरी संस्कृतीत वाढलेल्या मराठी ग्रंथव्यवहाराने घेतली नाही. आनंद यादव यांनी असं म्हटलं आहे की, 'साहित्यशिवार' 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य', 'अक्षर वैदर्भी' यासारखी नियतकालिकेही ग्रामीण साहित्याला व तद्‌विषयक नव्या विचारांना आवर्जून स्थान देतात. 'बळीराजा' या मासिकानेही काही काळ ग्रामीण साहित्याला भरपूर प्रसिद्धी दिली होती. 'विचार भारती' या पुण्याच्या भारती विद्यापीठाच्या नियत-कालिकाने काही काळ ग्रामीण साहित्य चळवळीचे मुखपत्र म्हणून भूमिका पार पडली होती. या मासिकाने पूर्वी वेळोवेळी ग्रामीण कथा स्पर्धा आयोजित केल्या होत्या. पुण्याच्या 'दैनिक तरुण भारत' नेही अनेक दिवस डॉ. द. ता. भोसले यांची 'पार आणि शिवार', 'चावडीवरचा दिवा' यासारखी ग्रामीण सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडविणारी व त्या संस्कृतीतील बदल दर्शवणारी सदरे चालवून ग्रामीण विभागातील वाचक वर्गाला आत्मशोध घेण्यास मदतच केलेली आहे. हा सर्व पसारा वाङ्‌मयेतिहासाने धुंडाळायला हवा. नोंदवायला हवा.

शासनातर्फे निघणारी 'लोकराज्य', 'शिक्षणसंक्रमण' सारखी नियतकालिके किंवा 'उद्यम', 'संपदा' सारखी नोकरी-व्यवसायासाठी उपयुक्त ठरणारी मासिके, यांनीही वाचकांच्या गरजा पुरवण्याचं, शासनाची धोरणे, प्रकल्प यांची माहिती पुरवण्याचं मोठं कार्य केलं आहे, याची नोंद घ्यायला हवी. १९६० नंतर नवराज्यात अग्रेसर असणाऱ्या साहित्य संस्कृती मंडळाने अनेक मराठी नियतकालिकांना अनुदाने देऊन, (ग्रंथांलाही) त्यांना जगवण्याचे कार्य केले आहे. ही अनुदाने अल्प असली तरी त्यांच्या अस्तित्वाच्या लढाईत त्यांना बळ देणारी ठरली आहेत, याचाही उल्लेख आवश्यक ठरतो.

नियतकालिकांच्या विस्तृत पसाऱ्यात अलीकडेच प्रसिद्ध होऊ लागलेल्या 'क्रिटिकल एनक्वायरी' या त्रैमासिकाचीही नोंद करायला हवी. 'मानव्यशाखा आणि सामाजिक शास्त्रे' या विषयातील संशोधनाला वाहिलेले हे त्रैमासिक दोन भाषांत, इंग्रजी-मराठी, एकत्रित प्रकाशित होते. त्याच्या सल्लागार मंडळावर फार थोर माणसे आहेत. एक नवा प्रयोग म्हणून या त्रैमासिकाची दखल घ्यायला हवी. 'दर्पण' कार जांभेकरांनी सुरू केलेली द्विभाषिक साहित्य प्रकाशित करण्याची परंपरा, या त्रैमासिकाने जाणीवपूर्वक हाती घेऊन, नव समीक्षा व आंतरज्ञान शाखेचा अभ्यास याद्वारे वाचकांना दिलाय.

'माणूस' जसा १९६१ साली जन्माला येऊन, महाराष्ट्राच्या निर्मितीच्या नव स्वप्नात सहभागी झाला, तसाच १९६४ साली ग्रंथप्रसाराला वाहिलेले व पुढे वाङ्‌मयीन स्वरूप प्राप्त झालेले 'ललित' हे मासिकही महत्त्वाचे ठरले. महाराष्ट्राच्या मराठी ग्रंथव्यवहाराचा प्रसार 'महाराष्ट्र टाईम्स' प्रमाणेच, पण आपल्या मर्यादेत 'ललित'नेही केला आहे. तो आजही तितक्याच गंभीरपणे सुरू आहे. 'लक्षवेधी' सारखी योजना, वाचक शिफारस शोध, दशकातील साहित्यिक, स्वागत, गंभीर आणि गंमतीदार, लेखकाचे घर, साहित्य संमेलनानिमित्ताने निघालेले विशेषांक अशा अनेक सदरांमधून, स्फुट लेखांमधून 'ललित'ने मराठी ग्रंथव्यवहाराचा, वाचन संस्कृतीचा शोध घेतला

आहे. 'ललित' हे मासिक अनेक प्रकाशकांचे जाहिरात करण्याचे, ग्रंथखरेदी व्हावी यासाठी ग्राहकांना माहिती व्हावी यासाठीचे हक्काचे, अल्पदरातले व्यासपीठ बनले. 'ललित' मध्ये येणारे सूची वाङ्मय (उदा. बाजारात आलेली पुस्तके किंवा 'साभारपोच' सदरातली पुस्तके) मर्यादित अर्थाने ग्रंथालयांना ग्रंथसंग्राहकांना उपयुक्त ठरते.

'ललित'च्या पावलावर पाऊल टाकून पुढे ग्रंथाली वाचक चळवळीची 'रुची', 'साहित्यसूची' अशी नियतकालिके निघाली व त्यांनीही आपापला वाचक वर्ग तयार केला. 'ललित','रुची' आणि 'साहित्य सहकार', त्याचेच नंतर दुसरे रूप म्हणून परिचित असणारे 'वाचनालय', अभिनव प्रकाशनाचे भट, यांनी काढलेले 'संग्रहालय,' मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने काढलेले 'इये मराठीचिये नगरी', पॉप्युलरचे 'पुस्तक पंढरी', मराठवाडा जिल्हा ग्रंथालय संघाचे 'ग्रंथपरिवार' अशा अनेक नियतकालिकांनी प्रामुख्याने ग्रंथप्रसार, सूची सेवा, ग्रंथालयशास्त्र विषयक लेखन, कार्य-कर्तृत्वाची ओळख अशा विविध प्रकारचे कार्य केले आहे. त्यांची घ्यावी तशी नोंद मात्र घेतली गेली नाही.

'ललित' च्या कार्याचा ठसा इतका उमटला की, अनेक प्रकाशकांना आपल्या प्रकाशनांच्या प्रसारकार्यासाठी आपले स्वत:चे मुखपत्र असायला हवे अशी गरज भासायला लागली. त्यातून (पूर्वी केवळ 'किर्लोस्कर' ही एकमेव गृहपत्रिका होती) पॉप्युलर प्रकाशनाचे 'प्रियरसिक', मेहता प्रकाशनाचे 'ग्रंथजगत', राजहंस प्रकाशनाचे 'ग्रंथवेध', मनोविकास प्रकाशनाचे 'इत्यादी', लोकवाङ्मय गृहाचे 'वाङ्मयवृत्त', 'लोकवाङ्मय' अशी गृहपत्रे आज चालू आहेत

१९६० ते २०१० या पन्नास वर्षांमध्ये अनेक उत्तम नियतकालिके निर्माण झाली व बंदही पडली. उदा. नवी क्षितिजे त्रैमासिक, स्त्री किर्लोस्कर-मनोहर, सोबत, दिनांक, ऋचा, कवितारती, कविताश्री, समकालीन संस्कृती, भरतशास्त्र, टवाळकी अशी कितीतरी अनेक आहेत. किंवा व्यावसायिक तत्त्वांवर चालवली जाणारी लोकप्रभा, सकाळ, मार्मिक, ही साप्ताहिकेही आपले योगदान देत आहेत. अर्थसंवाद, मराठी विज्ञान पत्रिका, आजचा सुधारक, तत्त्वज्ञान, परामर्श, बाप र खुमा देविवरू, श्रीवामनराज, अशी काही विशिष्ट विषयांना वाहिलेली मासिके/त्रैमासिकेही आपले कार्य नेटाने पुढे नेत आहेत.

परीक्षणांच्या माध्यमांतून गंभीरपणे ग्रंथव्यवहारात आपला वाटा उचलणे, नवनव्या विषयांच्याद्वारे ज्ञान सामान्य वाचकांपर्यंत नेणे, त्यासाठी नव्या मराठी संकल्पना, पारिभाषिक शब्द तयार करणे, जगभरातील भाषांमधील साहित्य भाषांतर रूपात मराठीत आणणे, ('केल्याने भाषांतर'या नियतकालिकाची चळवळ तर स्वतंत्रपणे दखल घ्यावी अशी आहे), लेखक घडवणे, त्यांच्या साहित्यावर योग्य संस्कार करणे, इत्यादी अनेक प्रकारांच्या माध्यमातून नियतकालिके ग्रंथपूर्व काळात मोठेच कार्य करून राहिली आहेत. या अशा माध्यमातून साहित्य प्रकाशित झाल्याने लेखकांना, साहित्यिकांना, वाचकांच्या प्रतिसादातून वाचकांचा अंदाज येतो. ग्रंथरूप घेताना त्यात त्यामुळेच संस्कार करता येतात आणि यामुळेच त्यांच्या ग्रंथांना जो प्रतिसाद मिळतो तो अपेक्षित असतो. फारच अपवादानेच ग्रंथाचे ठोकताळे चुकतात. म्हणून नियतकालिकांना ग्रंथरूपापूर्वीची अवस्था म्हणून खूप महत्त्व असते. द्यावे लागते.

मुद्रित रूपात तयार होणाऱ्या मासिकांबरोबरच आज मराठीत फारशी नसली तरी, इंग्रजीत व इतर भाषांमध्ये इलेक्ट्रॉनिक रूपात (E-journal) नियतकालिके कमालीची लोकप्रिय आहेत.

लोकप्रिय वाचन साहित्य देणारी नियतकालिके, विशेषत: स्त्रियांच्या भावविश्वाला रुचतील असे कथात्मक, वाङ्मय देणारी मासिके एकेकाळी आघाडीवर होती. मेनका, रंभा, मोहिनी, मानिनी इत्यादी मासिकांनी एकेकाळी खूप प्रमाणात, म्हणजे घरात गृहिणींचे प्रमाण अधिक होते तेव्हा अधिक प्रमाणात, लोकप्रियता मिळवली होती. दूरदर्शनचे आगमन झाल्यावर मात्र ही लोकप्रियता घटली व हाच आणि इतरही स्त्रियांचा वर्ग मालिकांच्या माध्यमाकडे वळला.

नियतकालिकांनी प्रामुख्याने कथा, कविता, कादंबरी, एकांकिका, समीक्षा, वैचारिक लेख, मुलाखती, व्यक्तिचित्रे, ललित लेख क्वचित नाटक, इत्यादी विविध साहित्याच्या प्रकारातील वाङमयाला प्रसिद्धी दिली. लेखकांच्या साहित्य गुणांचा शोध घेतला. त्यांना लिहिते केले. कथा-कादंबरी-कविता या तीन साहित्य प्रकारांत प्रामुख्याने प्रयोग केले. त्यावर झालेल्या वाद विवादांचा मारा झेलला. विद्याधर पुंडलिक यांच्या 'सती' या दीर्घकथेवर, किंवा विलास सारंग यांच्या 'गर्भवती' या कथेवर झालेले वाद व इतरही नाटक, कथा-कवितांवर (उदा.विवेक मोहन राजापुरेच्या कविता किंवा वाङ्मयचौर्याचे आरोप, इंग्रजीतून घेतलेल्या कल्पनांचा आरोप उदा. अशी पाखरे येती, सत्तांतर, कोसला इत्यादी) झालेले वाद याची साक्ष आहेत.



कै. खं. म. खंडागळे यांच्या
१०२ व्या जन्मदिवसानिमित्त
रसिक साहित्यिक सोलापूरकरांना
दिवाळीच्या शुभेच्छा.
अरविंद खंडागळे
मु. पा. गुनवडी, बारामती ४१३१०२
मो. ९८२२३९५४२९

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !



**श्री. दत्तात्रय श्रीराम**
**(मकरंद) कवठेकर**
**सौ. वृषाली कवठेकर**
३१ बी, प्रथमेशनगर, आनंद नगर, वडगाव बु
सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१
भ्रमणध्वनी : ९८२२७५७३३२

*दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !*



**श्री. प्रभाकर जोशी**
अलीबाग
भ्रमणध्वनी : ९७६४०७१२२५

***With Best Compliments from***
**Dilip Dudhankar**
B.E. (Civil), M.I.E. F.I.V.
**Chartered Engineer Govt. Redg. Valuer**
(Lic. No. CAT I / 182 of 1988)
**Himanshu Dudhankar** B.E. (Civil)
(Cell : 9890456778)

***Panel Valuer for -***
* Life Insurance Corp. of India
* LIC Housing finance Ltd.
* Bank of India * Bank of Maharashtra
* Union Bank of India * Ing Vyaya Bank Ltd.
* Solapur Janata Sahakari Bank Ltd.
* The Ratnakar Bank Ltd. * Axis Bank Ltd.
* Samarth Sahakari Bank Ltd.
* Shree Mahaveer Urban Co-op. Bank Ltd.
* Manorama Urban Co-op. Bank Ltd.

**Office & Resi.** : Block No. 7-B, Vijay Co-op. Housing Society, Opp. I.T.I. Bus Stop, Bijapur Road, Solapur - 413 004.
Ph. : 0217 - 2341793 Cell : 9422069427

या नियतकालिकांचे आणखी एक रूप म्हणजे शालेय/ महाविद्यालयीन पातळीवर प्रकाशित होणारी भिंतीपत्रे, हस्तलिखिते आणि वार्षिके. काही एक आवड असणारे विद्यार्थी एकत्र येऊन आजही हस्तलिखिते आणि भिंतीपत्रके चालवत असतात. वाङ्मयाचे प्राध्यापक त्यांना मार्गदर्शन करीत असतात. रुईया, सिद्धार्थ, रूपारेल, मिलिंद महाविद्यालय ही व अशी अनेक महाविद्यालये एकेकाळी साहित्यनिर्मितीची, विद्यार्थी वाङ्मयदृष्ट्या घडवण्याची केंद्रे होती. पुढे अनेक मोठे झालेले कवी-कथाकार या व अशा महाविद्यालयांच्या भिंतीपत्रकातून वा हस्तलिखितातून सापडतात. आरती प्रभू यांचा शोध जया दडकर यांनी सिद्धार्थ मधूनही घेतला आहे. तर दिलीप चित्रे यांचा शोध रुईयामधून आणि भारत सासणे यांचा शोध त्यांच्या शाळेच्या हस्तलिखित मासिकातून प्रदीप कर्णिक यांनी घेतला आहे.

महाराष्ट्रातील असंख्य महाविद्यालयांच्या वार्षिकांतून अनेकानेक साहित्यिकांची पहिली निर्मिती विखरून पडली आहे. ती कोणीतरी गोळा करायला हवी. या वार्षिकांकांच्या बरोबरच काही महाविद्यालयांनी, प्राचार्यांनी , प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी नवनवे प्रयोगही केलेत. 'अस्मितादर्श' हे त्याचे अप्रतिम उदाहरण म्हणायला हवे. रा. रं. बोराडे वैजापूर येथील विनायकराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य असताना तेथील 'गंधखुणा' या नियतकालिकात केलेले प्रयोग किंवा भास्कर चंदनशिव यांचे 'अंजली', 'संवाद', 'अंकुर' या वार्षिकांतून केलेले प्रयोग किंवा ठाण्याच्या विद्याप्रसारक मंडळाचा 'दिशा' चा प्रयोग याची साक्ष देतात. प्रारंभीचा उद्गार म्हणून या सर्व वार्षिकांना ग्रंथव्यवहारात महत्त्व आहे. नियतकालिके (पाक्षिके/साप्ताहिकांसह) यांचे योगदान पाहिल्यावर आता आपण वर्तमानपत्रांकडे वळू या नियतकालिके आणि वर्तमानपत्रे हा विषय इतका मोठा आहे की, त्यांनी ग्रंथव्यवहाराला दिलेल्या योगदानावर स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. (रा. के. लेले किंवा सातोस्कर, दाते यांनी जे इतिहास लिहिले, त्यात थोडा भाग सापडतो.)

वर्तमानपत्रांचे योगदान तर खूपच मोठे आहे, परंतु तात्कालिकपणाचा शाप लाभलेल्या या माध्यमाचा प्रभाव खूप असला तरी, ही साधने टिकत नसल्याने, त्यांचा म्हणावा तसा विचार इतिहासकारांखेरीज कोणी करीत नाहीत. राजकीय क्षेत्राला जास्त प्राधान्य असल्याने, वर्तमानपत्राकडे सुद्धा 'राजकीय वार्तापत्र' म्हणूनच पाहण्याचा कल आहे. त्यामुळेही वर्तमानपत्रांनी ग्रंथव्यवहारालाही, 'जाता जाता लक्ष देण्याजोगा विषय', म्हणूनच पाहिले होते. हा दृष्टिकोन बदलण्याचे क्रांतिकारी कार्य १९६२ साली 'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकाने केले.

प्रारंभी द्वा. भ. कर्णिकांच्या संपादकत्वाखाली महाराष्ट्रातील अत्यंत चांगले पत्रकार नव्या हुरूपाने एकत्र आले होते. शंकर सारडांसारख्या जाणकार ग्रंथप्रेमीकडे पुस्तक परीक्षणांची, पुरवणीची जबाबदारी होती. त्यांनी 'सवलत योजने'ची पहिलीच मोठी योजना आखली व यशस्वी करून दाखवली. पुढे अशा योजना म.टा., केसरी, लोकसत्ता या दैनिकांनीही राबवल्या. गोविंद तळवलकर, अरुण टिकेकर, दिनकर गांगल, माधव गडकरी, दि. वि. गोखले, प्रकाश बाळ, अशोक जैन अशी ग्रंथप्रेमी मंडळी म.टा. कडे होती. त्यांचा मित्रपरिवारही तसाच ग्रंथप्रेमींचा असल्याने, श्री. बा. जोशी, नाना जोशी, विश्वास पाटील, दुर्गाबाई भागवत, अशोक शहाणे, सुनील कर्णिक , अविनाश सहस्रबुद्धे, अनंत भावे, पुष्पा भावे, कुमार केतकर इत्यादी अनेकांचे सहकार्य महाराष्ट्र टाइम्सला लाभले. द्वा. भ. कर्णिकांच्या नंतर म.टा.ची धुरा गोविंद तळवलकरांकडे आल्याने तर मटाला ग्रंथवाचन संस्कृतीचेच स्वरूप प्राप्त झाले. 'वाचनानंदाची पर्वणी'ची 'मैफल' दर रविवारी वाचकांना प्राप्त होत गेली. 'वाचता वाचता' वाचकांना 'ग्रंथांच्या सहवासात' राहता येत होते. वाचकांनाही मटाचा हा अवतार अतिशय आवडला.

गोविंदरावांचे अग्रलेख, पुरवणीमधले लेख, आयफेल टॉवर, धावते जग यासारखी सदरं, वर्षाखेरचा पुस्तकांचा आढावा, आवडलेले ग्रंथ, ग्रंथपरीक्षण, दुर्मिळ अक्षर धन, जावे ग्रंथांच्या गावा, ग्रंथसंबंध ही सदरे, खुशवंतसिंग, सोली सोराबजी, शामलाल अशा अनेक ग्रंथप्रेमींचे स्वत:चे अनुभव, 'काय वाचताय' सारखी छोटीशी चौकट, श्रीबा जोशींची पत्रे, माध्यम सारखे सदर, समाजस्पंदने व इतर सदरे, किती सांगावे. या जोडीलाच वाचनसंस्कृती, ग्रंथव्यवहारावरचे भाष्य असणारे लेख.

लेनिन ग्राड मध्ये पुस्तकांचा काळा बाजार, (वाचस्पती) पुस्तकांनो क्षमा करा (शाम फडके), प्रकाशकांचा राजा : पेंग्विन (वाचस्वती), बंगालीतील मिनी पुस्तके (बाली बेलसरे) , कोश कार्याला कठीण दिवस (गोविंद तळवलकर) ग्रंथालय: स्वीडनचे भाग्यलेणे (वंसत गोखले) , पीटर मेयर पेंग्विनचा राजा (वाचस्पती), परदेशात मराठी पुस्तक- पंढरीची गुढी (रवींद्र पिंगे) असे कितीतरी लेख होते की, ज्यांनी मटाची पाने व्यापली होती. त्यांनी ते स्वीकारले. महाराष्ट्रातील

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !




**श्रीधर कवठेकर**

८८, उत्कर्ष, श्रेयनगर, औरंगाबाद

**सौ. वनमाला निलंगेकर**

'अनुग्रह', नवा उस्मानपुरा,
एकनाथ मंदिराजवळ, औरंगाबाद

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !



**अनिल जोशी**
**आशा जोशी**

लेबर कन्सल्टंट

१४ बी, मिनल अपार्टमेंट, नळ स्टॉप,
कर्वे रोड, पुणे

*दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !*



**सुधा इडली गृह**

(वातानुकुलित दालन)

**सिद्धेश्वर किणगी** – मो. ९४२०२१३३३३

*इडली, वडा व सर्व प्रकारचे*
*ऑर्डर स्वीकारले जातील.*

२२८, प. मंगळवार पेठ, सोलापूर–४१३ ००२
फोन : २३२२०९२

*दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !*



**कृष्णा ग्लास सेंटर**

सर्व प्रकारच्या काचा व ॲल्युमिनियम सेक्शन्ससाठी

• प्रो.प्रा. **निशीत** मेहता
मो. ९४२२०६५९९५
११, जैन बोर्डिंग शॉपिंग सेंटर,
बाळी वेस, सोलापूर

वाचन प्रेमी मंडळींना मटाचे हे रूप आवडले होते. त्यांनी ते स्वीकारले. पत्राने, भेटीत, दूरध्वनीवरून हा प्रतिसाद लाभत गेला. 'बहुतांची अंतरे' या सदराची जागा कमी पडू लागली इतका हा प्रतिसाद सर्व थरांतून लाभत होता. मटाकडे आपसूक ग्रंथव्यवहार, वाचनसंस्कृती, सांस्कृतिक-सामाजिक नेतृत्व आले आणि ते योग्यच होते. मधल्या काळात मटाचे स्वरूप, भाषा, साहित्य फार फार बदलून गेले आणि हे नेतृत्त्व 'लोकसत्ता'दैनिकाकडे गेले. ते योग्यच होते.

ु माधव गडकरी, अरुण टिकेकर आणि कुमार केतकर यासारख्या संपादकांना लोकसत्तेत आणण्यामागे हा विचार नक्कीच असला पाहिजे. त्यांनीही लोकसत्तेला मटाच्या मार्गाने नेले. राजकीय, वैचारिकदृष्ट्या हे कोणी मान्य करणार नाही, पण ग्रंथसंस्कृती, वाचनसंस्कृतीच्या दृष्टीने हे मत मान्य व्हायला हरकत नाही.

जिल्हा वार्तापत्रे, स्थानिक वृत्तपत्रे यांची सुद्धा अशा स्वरूपाच्या मजकुराची गरज किती मोठी होती हे 'युनिक फिचर्स' सारख्या साखळी मजकूर पुरवणाऱ्या नव्या योजनेत सापडते. 'युनिक फिचर्स' वर असणारा प्रभाव मटासारख्या वाचनसंस्कृतीत वाढलेल्या अंकाचा होता हे त्यांनी दिलेल्या पुरवण्यांवरून दिसून येते. इतकेच नव्हे तर 'इव्हिनिंगर पॅटर्न' मराठीत नव्याने आणणाऱ्या महानगरवर आणि त्यांचे संपादक असणाऱ्या निखिल वागळें वर मटाचाच प्रभाव होता. मटाचे हे योगदान खरंतर पुस्तकरूपाने लिहिले जायला हवे आहे.

छपाईचे तंत्र बदलत गेले आणि साप्ताहिकांनाही वर्तमानपत्रांनी गिळंकृत केले. वर्तमानपत्रे विविध विषयांवरच्या पुरवण्या देऊ लागली. त्या रंगीत, गुळगुळीत, चकचकीत कागदावर छापल्या जातात. त्यामुळे महाराष्ट्रात १९८५ नंतर हळूहळू साप्ताहिके, मासिके नामशेष होऊ लागली. आज वर्तमानपत्रांना, दूरदर्शन, इतर वाहिन्या, इंटरनेट यांचे आव्हान असले तरी, मुद्रित स्वरूप सकाळी-सकाळी दारात पडण्याच्या सवयीत अडकलेला वाचक सहजासहजी वर्तमानपत्रांची संगत सोडायला तयार नाही, हे भारतातले, विशेषत: महाराष्ट्रातले चित्र आहे.

ग्रंथवाचनाची सवय कमी झालेल्या आजच्या काळात वर्तमानपत्रांचे वाचन मात्र सुटले नसल्याचे चित्र दिसत आहे. काळानुरूप नवनवी वर्तमानपत्रे आली आणि त्यांनी आपापला वाचकवर्ग तयार केला. मग तो अगदी शब्दकोडी चवीने सोडवणाऱ्यांपासून, अग्रलेखापर्यंतचा कोणताही असो, त्याच्या संख्येत घट नाही. वाढच होते आहे.

एखाद्या विषयाचे विश्लेषण, संकलन, पुनर्मांडणी, आढावा, ऐतिहासिक पुरावे, मागील जुने संदर्भ, अशा आशयाने नटलेल्या नियतकालिकांच्या लेखांची जी गरज पूर्वी वर्तमानपत्रांच्या काळात नियतकालिकांच्या लेखक/संपादकांनी निर्माण केली होती, ती आज कुठेतरी हरवलेली दिसते. आजची वर्तमानपत्रे ही गरज पूर्ण करू शकत नाहीत हे वास्तव आहे.

वर्तमानपत्रे, नियतकालिके यांनी वाचकांनी ग्रंथपूर्व अभिरुची जोपासण्याचे अत्यंत मोला, महत्त्वाचे असे आशयसंपन्न कार्य केले आहे, यात शंका नाही.

## मराठी ग्रंथांचा आढावा

मराठी ग्रंथांचा आढावा घेणे अत्यंत मोठे कार्य ठरेल.

साठनंतर मराठीत प्रकाशित झालेली अनेक पुस्तके आपापल्या परीने वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहेत. प्रत्येकाची किंवा प्रत्येक प्रकाशकाची दखल घेणं शक्य नाही. काहींचाच उल्लेख करणे शक्य आहे, परंतु हे लक्षात ठेवायला हवे की, साठपूर्वी असणारे प्रकाशकही महाराष्ट्र राज्य निर्मिती नंतर आपले प्रकाशन कार्य करीतच होते. साठनंतर त्यांच्यात नव्या विचारांचे, नव्या उमेदीचे, नव योजना कल्पनांची स्वप्ने घेऊन येणारे प्रकाशक मिळाले व प्रकाशकांची संख्या वाढली. संगणकाचे आगमन झाल्यावर, मुद्रणालयात तंत्रज्ञानाचा विकास होऊन मुद्रणादी कार्ये सुलभ झाल्यावर, प्रकाशकांची संख्या वाढली. या तंत्रज्ञानाच्या सुलभी करणाने लेखकच प्रकाशक झाले किंवा एखाद दुसऱ्या पुस्तकाची व्यक्तिगत निर्मितीही भरपूर संख्येने दिसू लागली. विशेषत: साहित्य संस्कृती मंडळाने आपल्या नव- लेखक अनुदान योजनेला जेव्हा प्रारंभ केला, तेव्हाच्या काळात आणि त्याचा अनुभव जमेस धरून नंतरही, लेखक स्वत:च प्रकाशन कार्यात उतरलेला दिसून येतो. त्याचबरोबर 'ऑपरेशन ब्लॅक बोर्ड' सारख्या केंद्र सरकारच्या ग्रंथखरेदी योजनेमुळेही, एकेका प्रकाशकांच्या अन्य विविध नावांनी विविध प्रकाशन संख्या निघाल्या किं वा छोट्या छोट्या व्यक्तीही काहीही अनुभव नसतानाही प्रकाशनाच्या क्षेत्रात उतरल्या.

व्हीनस, जोशी-लोखंडे, पॉप्युलर, मौज, मॅजेस्टिक, त्रिदल, परचुरे, कॉन्टिनेन्टल, ढवळे, देशमुख, इत्यादी पुण्या-मुंबईकडील प्रकाशक मंडळी ग्रंथनिर्मितीत अग्रेसर होती. नवेकवी-नवी कविता (पॉप्युलर) स्वस्त पुस्तक योजना (रा. ज.

*दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !*

● दुध ● लोणी ● श्रीखंड
● पनिर स्कूल मटेरियल

**किर्ती** प्रोव्हीजन ॲन्ड जनरल स्टोअर्स

*फोनवर विनामूल्य घरपोच सेवा*

**स्वच्छ किराणा व स्टेशनरी माल घरपोच मिळेल. तसेच झेरॉक्स पेपर आणि साडीला फॉल व पिको करून मिळेल.**

गंगाधर शॉपिंग सेंटर, किनारा हॉटेल समोर,
सोलापूर. फोन : २६०५६९८

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !






**उर्वशी चुडीदार**

नाविन्यपूर्ण डिझाईनमध्ये ड्रेस तयार करून मिळतील.

७९, शुक्रवार पेठ, आयुर्वेदिक हॉस्पिटलमागे,
माणिक चौक, सोलापूर -२ फोन : २७२५७१७

*दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !*



# डॉ. दिलीप बुरटे

एम्.डी. (मनोविकार)
**डी.पी.एम्.आय.पी.एस्.**



लालबहादूर शास्त्री शॉपिंग सेंटर, नवी पेठ,
बँक ऑफ महाराष्ट्र समोर, सोलापूर - ४१३ ००७
फोन : ०२१७ - २७२९८५६
निवास : २३१०१९८

देशमुख), अत्रे यांच्या पुस्तकांसाठी प्रसिद्ध असणारे परचुरे, स्वस्त निवडक काव्यसंग्रह देणारे कॉन्टिनेन्टल, प्रदक्षिणासारख्या किंवा प्राचीन-अर्वाचीन इतिहासाचे संदर्भ ग्रंथ देणारे व्हीनस, लहान मुलांचे भावविश्व उजळून टाकणारे ज्योत्स्ना प्रकाशन, उत्तमोत्तम इंग्रजी पुस्तकांच्या वाचकप्रिय ठरलेल्या लेखमालांची पुस्तके देणारे राजहंस, कामगार रंगभूमीवरचे आणि नाटकांच्या संहिता देणारे त्रिदल, धार्मिक साहित्य स्वस्त, ठसठशीत टाईप्समध्ये आणि तरीही कामत वगैरे सारख्या अत्यंत अभ्यासू संपादकांच्या प्रस्तावना-संपादनासह मोठेमोठे ग्रंथ देणारे ढवळे, कलात्मक साहित्य अत्यंत साक्षेपी पद्धतीने व गंभीरतेने सादर करणारे मौज, उत्तमोत्तम कथा-कादंबऱ्या देणारे मॅजेस्टिक, अशा कितीतरी प्रकाशकांनी स्वत:चे स्थान व स्वत:च्या संस्थेची ओळख आपल्या ग्रंथांच्या द्वारे समाजात निर्माण केली होती. मुंबई-पुण्याबाहेरही प्रकाशनाचे कार्य काही ठिकाणी सुरू होते. नागपूर (सुविचार प्रकाशन, रामकृष्ण आश्रम) सोलापूर (सुरस ग्रंथमाला) कोल्हापूर (महाराष्ट्र ग्रंथ भांडार, चंद्रकांत शेट्ये प्रकाशन मंदिर) इत्यादी महाराष्ट्रातल्या काही शहरांमध्ये प्रकाशन संस्था निर्माण झाल्या होत्या व त्या त्या भागातील साहित्यिक त्यांच्या मार्फत आपली पुस्तके प्रकाशित करीत होते.

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर भाषा संचालनालयातर्फे विशेषत: शब्दकोश, पारिभाषिक शब्दसंग्रह निर्माण झाले. साहित्य संस्कृती मंडळातर्फे अनुवादित साहित्य, संदर्भग्रंथ आणि मराठी विश्वकोशासारखा मोठा प्रकल्प प्रकाशनासाठी निर्माण करण्यास स्वीकारला गेला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या 'मराठी संशोधन मंडळातर्फे तयार करण्यात आलेल्या मराठी वाङमय कोशाचा प्रकल्पही अनुदानासाठी मान्य करण्यात आला. संग्रहालयाच्याच दाते सूची मंडळाचा 'मराठी नियतकालिक सूची' प्रकल्पही अनुदानासाठी संमत झाला. ही सर्व कार्ये इतकी मोठी आणि महत्त्वाची होती की, त्यांच्या या नवीन योजनेचा परिणाम, प्रकाशन व्यवसायाला नवी दृष्टी देणारा ठरला.

'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'च्या परंपरेतून आलेल्या मंडळींचे व्यक्तीगत पातळीवर किंवा चार-आठ जणांच्या सहकार्याच्या पातळीवर कोशाचे कार्य सुरू होते. उदा. भारतीय संस्कृती कोश (१९६२-१९७४), अभिनव मराठी ज्ञानकोश (१९६३-७१), देवीकोश (१९६७-१९७२), शास्त्रज्ञ चरित्रकोश (१९६८), गणेशकोश (१९६८) इत्यादी. परंतु शासनाचे सहकार्य, संस्थांचे पाठबळ, व्यवस्थापकीय शिस्त व गरज, अनेकानेक लेखकांचे लेखन सहकार्य, संपादकीय कार्यप्रणाली, छोट्या छोट्या कार्यासाठी हवे असणारे मनुष्यबळ, ग्रंथालयांचे-संदर्भग्रंथांचे पाठबळ, इत्यादी अनेक उपघटकांची आवश्यकता पटायला लागली व ती व्यवस्था केल्यावर कार्याला येणारी गती विशेष नजरेत भरायला लागली. पुढे काही प्रकाशकांनीही अशा कोश वाङ्मय वा शब्दकोशांच्या कार्याला हात घातला. किंवा पुनर्मुद्रणेही केली.

साठपूर्वी आणि नंतर प्रामुख्याने विविध संस्था महाराष्ट्रात उभ्या राहिल्या. त्यांनी ग्रंथनिर्मितीचे विशेष कार्य केले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य ग्रंथसंग्रहालय, मराठी संशोधन मंडळ, इतिहास संशोधन मंडळ, विदर्भ मराठवाडा साहित्य संघ, राजवाडे संशोधन मंडळ, भारत इतिहास संशोधन मंडळ, विदर्भ संशोधन मंडळ, मराठवाडा संशोधन मंडळ, एकनाथ संशोधन मंडळ, का. स. वाणी संस्था, डेक्कन कॉलेज, भांडारकर संशोधन मंडळ अशा अनेक संस्थांनी ८०-८५ अगदी ९० पर्यंत उत्तमोत्तम मराठी, इंग्रजीही ग्रंथांची निर्मिती केली आहे. त्यात प्रियोळकरांच्या पाठभेदचिकित्सेपासून जोग-मालशे यांनी संपादित केलेल्या साहित्याच्या इतिहासा पर्यंतच्या विविध संशोधनपर, ऐतिहासिक ग्रंथांचा समोवश आहे. अलीकडे काही अपवाद वगळता अनेकांचे कार्य थंडावले असले तरी या कार्याची कोणीतरी खोलात जाऊन दखल घ्यायला हवी, इतके हे कार्य अपूर्व आहे.

पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळामुळे एकाच ठिकाणी एकाच संस्थेमार्फत प्रंचड संख्येत ग्रंथांची निर्मिती झाली, तशीच निर्मिती महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठा तर्फे झाली आहे. इतर विद्यापीठांनी आपली निर्मिती कमी केली व बाजारात उपलब्ध असलेल्या (किंवा संपलेल्या) पुस्तकांचा समावेश अभ्यासक्रमात करून आपले श्रम कमी केले, मात्र य. च. म. मुक्त विद्यापीठाने (किंवा इंदिरागांधी मुक्त विद्यापीठ वा इतरही) अभ्यासक्रमाबरोबर वाचनी अध्ययन साहित्यही निर्माण केले. किंबहुना असे साहित्य निर्माण झाल्याशिवाय अभ्यासक्रम सुरूच केला नाही. (एम. फिल. मध्ये या तत्त्वाला मुरुड घातली). १९९०ते २००९ या वीसेक वर्षांत २०६३ पुस्तके लिहून घेऊन, त्यांच्या ४२ लाख ७५ हजार १०० प्रती छापल्या तर, ६९८३ पुस्तकांच्या पुनर्मुद्रणांसाठी ३ कोटी १ लाख२६ हजार ७२६ प्रती छापल्या. महाराष्ट्रात इतकी मोठी छपाई, निर्मिती व वितरण पाठ्यपुस्तक मंडळानंतर य.च.म.मुक्त विद्यापीठाचेच असू

**'आशय' परिवार आणि वाचकांना दिवाळी शुभेच्छा !**

# सुषमा करंदीकर

फ्लॅट क्र. ११, राम शाम अपार्टमेंटस्,
१७३०, सदाशिव पेठ,
पुणे – ४११ ०३०
फोन क्र. (०२०) २४४९२९०७
मोबाईल : ९३२६२७५७१४



दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

***पचनसंस्थेच्या विविध तक्रारी * वारंवार होणारी ॲसिडिटी, अपचन, पोटातील अल्सर * दमा, * त्वचाविकार, पाठदुखी, अंगदुखी, सांधेदुखी, मलबद्धता * स्त्रियांचे विविध आजार, सौंदर्य समस्या यांसाठी विशेष पंचकर्म उपचार.**

# श्रद्धा आयुर्वेद सेंटर

**डॉ. सौ. किरण पाठक** (एम.डी.आयुर्वेद मेडिसीन)
**सुब्रह्मण्यम् कॉम्प्लेक्स, वैनगंगा–कृष्णा ग्रामीण बँकेच्यावर, मुरारजी पेठ, सोलापूर.**
**फोन : ०२१७– २७४०६३१ मो. ९३७२१४४४३४**

✻ सुविधा ✻

✻ संपूर्ण आयुर्वेद पद्धतीने तपासणी ✻ सर्व प्रकारच्या पंचकर्मांची सोय
✻ अद्ययावत पंचकर्म केंद्र ✻ इमर्जन्सी बॅक अप
✻ केरळीय उपचारांची सोय

शकेल. या विद्यापीठाने आपल्या पुस्तकांचा दर्जा, छपाई, भाषाशैली, संपादन इत्यादी विविध बाबतीत स्वत:चा एक खास ठसा निर्माण केला आहे. ही पुस्तके इतर विद्यापीठांचे विद्यार्थीही वापरतात हे या ग्रंथांचे यश म्हणता येईल.

१९६७ च्या ग्रंथालय कायद्यामुळे महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे निर्माण होऊ लागले. आधीच जोमात असणारी ग्रंथालय चळवळ, ग्रंथालय संघ कार्यप्रेरित झाले. ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयाची ग्रंथनिर्मितीची वि. ल. भावे यांनी घालून दिलेली दिशा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने पुढे नेली आणि ६७ नंतर नाशिकच्या सार्वजनिक ग्रंथालयासारख्या संग्रहालयांनी इतरत्रही अंमलात आणली. संघाने चळवळीची म्हणून आणि शिक्षणक्रमाचा भाग म्हणून अनेक प्रकाशने काढली. त्यातून ग्रंथालयशास्त्राचे विद्यार्थी निर्माण झाले.

शासकीय, विद्यापीठीय, साहित्यिक संस्था, मंडळे अशा संस्थांचे कार्य उत्तम होत होते तरीही प्रसिद्धी नसल्यामुळे त्यांचे ग्रंथ पडून असत किंवा त्याची माहिती लोकांना होत नसे. इतर प्रकाशकही प्रसिद्धी तंत्रापासून तसे दूर होते. ज्या प्रकाशकांची किंवा साहित्य-संशोधन संस्थांची नियतकालिके होती, त्यांच्या ग्रंथांचा बोलबाला काही प्रमाणात होत असे. तरीही त्याला एक प्रकारचा संथपणा होता. १९७५ साली ग्रंथाली वाचक चळवळ निर्माण झाली आणि एखादा ग्रंथ, योजना, कार्यक्रम कसा गाजवता येतो याचा प्रत्यय अनेकांना आला. श्री. रा. ग. जाधव यांनी तर असं म्हटलं आहे की, '१९८० नंतर पुस्तक व पुस्तक कर्ते गाजवणारी यंत्रणा आली.' रा. ग. जाधवांचे हे निरीक्षण खरोखरच अचूक आहे. १९८० नंतर विविध पुरस्कार, पारितोषिकेही उदंड झाली. रा. ग. जाधव या पर्वाला 'साहित्य पुरस्कार पर्व' असे म्हणतात ते योग्य आहे. मराठी ग्रंथनिर्मिती कशी गाजवता येईल याच्या सूक्ष्म योजनांचा अभ्यास केला तर एक वेगळाच प्रकाश पडेल. दहापंधरा वर्षे ही 'गाजवेगिरी' जोशात होती.

१९९० नंतर मात्र तंत्रज्ञान बदलले, जागतिक परिस्थिती (ग्लोबलायझेशन) बदलली, नवज्ञान (जैव तंत्रज्ञान इत्यादी) उदयाला आले, पर्यावरणविषयक भान निर्माण झाले, वाचकवर्ग बदलला, तंत्रज्ञानाची साथसंगत करणारा वर्ग निर्माण झाला, खेडोपाडी गेलेल्या दूरसंचार क्रांतीने खेडी व तिथला समाज बदलून गेला, इंटरनेटमुळे माहितीचा स्फोट घरातच होऊ लागला. दूरदर्शन-नवनवे चॅनल्स निर्माण झाल्याने स्पर्धा आली, वेग आला, गती आली. मराठी ग्रंथनिर्मितीवर या सर्वांचा परिणाम झाला.

वैज्ञानिक, औद्योगिक, कृषि, वैद्यकीय-तंत्रज्ञान, पर्यावरण विषयक विषय पुढे आले. छायाचित्रे, चित्रकला, व्यंगचित्रकला, खंडात्मक ग्रंथांच्या योजना, जुन्या ग्रंथांची नवी संपादने, इतिहासाचे पुनर्संपादन, विविध प्रकारच्या डायऱ्या, दिनदर्शिका, व्यक्ती-संस्थांची फोटोचरित्रमाला, अवकाश संशोधनाचा चित्र खजिना, लेखकांचा शोध, त्यांच्या पात्रांचा शोध, दीर्घ मुलाखती, अक्षर रेखाटने, निवडक दिवाळी अंकातील लेख, कोशवाङ्मय, छोट्या छोट्या पुस्तिकांच्या मालिका, नव्या कवींच्या कविता, साठोत्तरी साहित्याचे आढावे, चर्चासत्रांची पुस्तके, सदरांचे लेखसंग्रह, चरित्र ग्रंथमाला, पत्रवाङ्मय चित्रेकाढा-विमाने उडवा सारखी कार्यप्रवण पुस्तके, नकाशे, विज्ञानातील प्रयोग, गणिताच्या गमती, वैदिक गणित, आठवणी, चरित्रे, आत्मचरित्रे असे कितीतरी विषय आले व त्यातून विविध, रंगीत, कलात्मक, मोठ्या-छोट्या, रॉयल-डबल क्राऊन इत्यादी अनेक आकारात पुस्तके आली. या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्रांतीने दुसरा मोठा बदल घडून आला. तो म्हणजे ग्रंथेतर साहित्याची निर्मिती जगभर झाली. त्याचा परिणाम मराठी ग्रंथ या प्रकारावर झाला. त्याचे स्वरूप बदलून गेले.

## ग्रंथ:प्रचार, प्रसार आणि विक्री

ग्रंथनिर्मिती देखणी करणे, विविधांगी विषयांच्या तज्ज्ञांचा, अभ्यासक-व्यासंगी मंडळीचा त्यासाठी चपखल उपयोग करून घेणे, चित्रे-मुखपृष्ठे, रंगीत छपाई इत्यादींचा वापर करणे, यामुळे मराठी ग्रंथव्यवहार भारतीय भाषांमध्ये उठून दिसतो. तंत्रज्ञानाचा वापर (उदा. सीडीज सह ग्रंथ देणे, ई-सर्व्हिसेस इत्यादी) कमी असला तरी तो पुढे वाढेल; परंतु ही जी सर्व निर्मिती केली जाते, त्या ग्राहकापर्यंत हे ग्रंथराज जातात का? पोहचतात का? जातात ते कसे? त्याचे मार्ग कोणते? इंग्रजी जगतात ज्याला 'मार्केटिंग' म्हणतात ते मार्केटिंग, म्हणजेच ग्रंथाचा प्रचार आणि प्रसार, कसा केला जातो? त्याचे स्वरूप मराठी ग्रंथव्यवहारात कसे आहे? इंग्रजीत ज्याला 'एन्ड युजर्स' म्हणतात, ते मराठीत कोण कोण आहेत? याचा विचार करू या.

कोणत्याही वस्तूची विक्री व्यवस्था उत्तम असेल, तिचे व्यवस्थापन उत्तम असेल, बाजारात एक विशिष्ट प्रकाराची साखळी असेल, त्याच्या जोडीने जाहिरातीच्या तंत्राचे सहकार्य मिळत असेल, तर ती वस्तू बाजारात विकली जाते, ग्राहकापर्यंत

*With Best Compliments from*

# AJIT DESAI

**Ashwini Managment Consultancy & Ailled Services**

***Management Consultant HR & Labour Laws***

G-1, Ganagari Housing Society, Adjacent to Pratidnya Mangal Karyalay,
Karvenagar. Pune - 411052
Telefax : (020) 5447657, Ph:(R)5448043 cell : 9823046578
E-mail : ajitdesai@vsnal.net

परिवर्तन

**परिवर्तन अकादमी : एक चळवळ**

सार्वत्रिक पडझड उघड्या डोळ्याने पाहवत नाही व संघटित होवून लढण्यासारखी स्थिती नाही. मात्र ह्या घुसमटीतून बाहेर येवून नव्याने संवाद व कृती करण्याची सर्वांची इच्छा आहे. अशा तमाम समविचारी सुजाणांसाठी 'परिवर्तन'ची निर्मितीत झाली आहे.

**महिला व बाल अभ्यास केंद्र**

**संग्रहण व दस्तावेजीकरण केंद्र**

**प्रोग्रेसिव बुक सेंटर**

**परिवर्तन अकादमी प्रकाशन**

संपर्क : शॉप क्र. १०, युनायटेड रेसिडन्सी,
१५९ रेल्वे लाईन्स, सोलापूर-१
Ph. : 0217 - 2312712
Email : pariwartanakadeing.gmail.com

*With Best Compliment From :-*

**श्रीमती मधुमालती पोतदार**
**आणि कुटुंबीय**

पुणे

व्यवस्थित जाते. मराठी ग्रंथ व्यवहारात दुर्दैवाने अशी पद्धत फारशी आढळत नाही. पुस्तक निर्माण करण्यात, अत्यंत देखण्या स्वरूपात प्रकाशित करण्यात अतोनात कष्ट घेणाऱ्या मराठी प्रकाशाकांना जात्याच 'विक्री' ही 'कटकट' वाटत असावी की काय, अशी शंका यावी अशी परिस्थिती पूर्वी होती. घाऊक व्यापारी, किरकोळ विक्रेते, फिरते विक्रेते अशी साखळी आजपर्यंत मराठीत निर्माण झालेली नाही. ग्रंथविक्री करणारे दुकानदार यांच्यावरच सारी मदार होती. त्यांच्याकडे चालून ग्राहक आलं तर ते पुस्तकाची विक्री करणार, स्वत: उठून जाणार नाहीत. या वृत्ती-प्रवृत्तीचा परिणाम मराठी ग्रंथविक्रीवर प्रथम पासून भरपूर होता व तो आजही समूळ संपला आहे असं दिसत नाही.

द्यावे लागणारे कमिशन किमान ४०टक्के ते पुढे कितीही असू शकते. प्रकाशकांनी विक्री करू नये ही इंग्रजी ग्रंथ व्यवहारातली सचोटी, मराठी (आणि भारतीयही) ग्रंथव्यवहारात नाही.

ग्रंथ ही सुद्धा एक विक्री योग्य वस्तू आहे. याचं भान नसल्याने त्याचा प्रचार-प्रसार करण्यावरही अत्यंत संकुचित दृष्टिकोनाचा प्रभाव होता, मात्र साठनंतर चित्र हळूहळू बदलत गेले आणि प्रकाशकांना प्रथम भान यायला लागले की, ग्रंथ निर्माण करण्याबरोबरच ते विकले कसे जातील, हे सुद्धा पाहायला हवे. पूर्वी ग्रंथ प्रकाशन हा जोडधंदा होता. मुद्रणाचा व्यवसाय, पाठ्यपुस्तकांची निर्मिती हे प्रमुख व्यवसाय होते, त्यामुळे ग्रंथ विक्रीवर फारसे लक्ष केंद्रित करण्याची गरज भासली नव्हती. पाठ्यपुस्तकांचा व्यवसाय हातचा गेल्यानंतर आणि अभ्यंकर आयोगाचा फटका बसल्यानंतर विक्रीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यकच झाले व याची चाणाक्ष जाण रा. ज. देशमुख यांनी हेरली.

## ग्रंथ सवलत योजना

प्रकाशक रा. ज. देशमुखांना जसे हे श्रेय जाते त्यापेक्षाही जास्त ते श्री. शंकर सारडा यांच्याकडे व 'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकाकडे जाते. १९६२ साली मटा सुरू झाला. त्यात साहित्याची पुरवणी शंकर सारडा पाहात असत. ही पुरवणी फारच लोकप्रिय झाली होती हे मागे आलेच आहे. सारडा यांनी १९६३ साल उजाडताच आधीच्या वर्षात प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथांची यादी प्रकाशित (चार अंकात) केली व पुढे सवलतीची योजना प्रकाशकांसमोर मांडली. अर्थातच प्रकाशक विरोध करू लागले. पण रा. ज. देशमुखांनी त्याला पाठिंबा तर दिलाच, पण त्याची सारी विक्री व्यवस्था स्वत:च्या शिरावर घेऊन तीन लाखाची पुस्तके सवलतीत विकून दाखवली. यातून एक प्रकारचा आत्मविश्वास तर प्रकाशकांना आलाच, पण वेगळी वाटही सापडली. नीट जाहिरात झाली, आकर्षक सवलत दिली, वितरण व्यवस्था चोख असली, प्रकाशकांचे देणे-घेणे सचोटीने केले तर ग्रंथ विक्री ही समस्या ठरू शकत नाही.

पुढे ६६ ते ६८ या काळात 'केसरी' वृत्तपत्रानेही 'आपले ग्रंथालय योजना' तयार केली होती. मात्र ती यशस्वी झाली नाही. रा. ज. देशमुखांनी मात्र स्वत:च्या हिंमतीवर पुढे त्यांच्याच प्रकाशनाच्या स्वस्त आवृत्त्यांची योजना तयार करून यशस्वी करून दाखवली. १९८६ साली रविवारच्या मटा पुरवणीत निवडक ग्रंथांची यादी प्रकाशित झाली होती. त्यांची पुस्तिका ग्रंथाली तर्फे दीपक घारे यांनी तयार केली होती. 'महाराष्ट्र टाइम्स' च्याच १९९२ मध्ये होणाऱ्या तिसाव्या वर्धापन दिनानिमित्त १९८१-९१ या दशकातील १०१ पुस्तके निवडून, ती पुस्तके २५ टक्के दरात उपलब्ध होतील, अशी योजना जाहीर झाली होती. त्याची पुस्तिका शंकर सारडा यांनीच तयार केली होती व बृहन्मुंबई मराठी प्रकाशक आणि ग्रंथविक्रेते संघ, मुंबई यांनी ती प्रकाशित केली होती. 'ललित'मासिकातील 'लक्षवेधी' पुस्तक योजनेतील ग्रंथांचा परिचय करून देणारी पुस्तिकाही शंकर सारडा यांनी तयार केली होती व मॅजेस्टिक प्रकाशनातर्फे १९९७ साली प्रकाशित करण्यात आली होती. लोकसत्ता दैनिकानेही टिकेकर-केतकर, गडकरी कालखंडात अशा योजना राबवल्या आहेतच पण त्यांच्या तर्फे शुभदा चौकर यांनी शालेय पातळीवर उपयुक्त ठरतील अशा वाचनयोग्य ग्रंथांची एक यादी तयार करून प्रकाशित केली. त्यांचे हे कार्यही महत्त्वाचे ठरले आहे.

'सवलत योजना' ही किती फायदेशीर ठरते याची नोंद सर्वच प्रकाशकांनी घेतली होती असे दिसत नसले तरी पुढच्या काळात राजहंस प्रकाशनाच्या दिलीप माजगावकरांनी १९९५ नंतर या सवलत योजनेला आणखी वेगळा आकार आपल्या प्रकाशनांसाठी दिला. त्याचे स्वरूप होते 'प्रकाशनपूर्व सवलत'. ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वीच त्याची नोंदणी करण्यासाठी जाहिरात करणे, विक्रेते दारोदार पाठवणे, दुकानांतून तशी नोंदणीची सोय करणे, संस्थात्मक पातळीवर जाहिराती पोस्टाने पाठवणे, त्यांची परीक्षणे सर्वत्र येतील असे पाहाणे इत्यादी मार्गाने ही 'प्रकाशनपूर्व सवलत योजना' राजहंसने धडाक्याने अंमलात आणली. पुढे त्याचाच कित्ता मग अनेकांनी गिरवला.

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

## S. V. JAMBHALE

**Building Contractor**

Post Akolekati, Tal. North Solapur,
Dis. Solapur.
Mobile : 9422460247, 9423591347

**Available on Hire**

*Concrete Mixture, Vibrator, Span, props, Centering plates*

// Shri Jyotirling //

## Jyotirling Enterprises

**Santosh V. Jambhale**

Mobile : 9422460247, 9881794547
Plot No. 61/8, Ramrajya Nagar, At Post Kondi,
Tal. North Solapur, Dist. Solapur.

**We Undertake Jobs**

*Bar Fixing, Bolt Fixing, Available on Electric Concrete Breaker, Tractor Compressor Breaker, Control blasting.*

*दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !*

**G. Ganesh : 9822111813**
**G. Shrinias : 9372057357**

*WHOLESALE & RETAIL*
*RADIUMS, VINYLS, GARWARE FILMS.*
*POLY CARBONATE SHEET, FLEX,*
*ACRYLIC SHEET*

# SAGAR


## RADIUM & GLOWSIGNS

267/58, Raviwar Peth, Solapur-5
(S) (0217) 3298761, (H) (0217) 3296456

**WE MAKE**

GLOW SIGN, FLEX SIGN, DIGITAL SIGN,
RADIUM SIGN BOARD, NUMBER PLATES,
& ALL TYPE OF BOARDS.

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !



# अमोल व सीमा चाफळकर

**'सृजन'**

अरविंदधाम जवळ, मुरारजी पेठ, सोलापूर-१
फोन : ०२१७ - २३२५०९२

*दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !*

**G. Ganesh : 9822111813**
**G. Shrinias : 9372057357**



# Shrihari

## FABRICATION

267/58, Raviwar Peth, Solapur-5
(S.) (0217) 3298761, (H.) (0217) 3296456

***We undertake job works***
Compund Gate, Grill, Doors,
Canel Gate & All types of
Steel Fabrication

ग्रंथांवर सवलत दिल्यास जसा त्यास ग्राहक मिळतो, तशीच ग्रंथ पाहण्याची, चाळण्याची सवलत ग्राहकाला दिली तरीही ग्राहकांच्या संस्थेत वाढ होते हे ग्रंथप्रदर्शनाची प्रथा सुरू करणाऱ्या 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने दाखवून दिले.

१९६६ साली मुंबईत पहिली राष्ट्रीय ग्रंथ जत्रा 'एनबीटी' तर्फे भरवली आणि नंतर पुढे दर वर्षी हा उपक्रम एनबीटी तर्फे सुरूच झाला. सध्या तर एनबीटीची 'मोबाईल व्हॅन' म्हणजेच फिरते ग्रंथालय ठिकठिकाणी जात असते. त्यातून होणारी विक्री व प्रदर्शन हे दोन्ही घटक साध्य होतात असे दिसून येत आहे.

'राष्ट्रीय ग्रंथ प्रदर्शन' भरण्यापूर्वी अशी छोटी-मोठी प्रदर्शने भरली होती. उदा. सदतिसाव्या साहित्य संमेलनातील अ.ह. लिमये यांनी दिल्लीत भरवलेले प्रदर्शन, किंवा सदानंद भटकळांचे 'फ्रँकफूर्ट बुक फेअर' मधले भारतीय ग्रंथांचे दालन, अथवा मोटार करून शंकरराव कुलकर्णी यांनी गावोगाव नेलेली पुस्तके किंवा श्री. व्यं. केतकर यांच्या आजोबांचे उदाहरण वा डॉ. अरुण टिकेकरांच्या वडिलांचे 'दूतकार टिकेकरांचे' उदाहरण सर्वांनी ज्ञात आहे; पण हे काहीसे अपवाद म्हणावे लागतील. राष्ट्रीय ग्रंथ प्रदर्शनाने एक दृष्टी, विचार प्रकाशकांना दिला आणि त्याचा वापर सुरू झाला.

या दृष्टीचा, विचाराचा, प्रकार पद्धतीचा अचूक उपयोग जर कोणी करून घेतला असेल तर तो म्हणजे 'बॉम्बे बुक डेपो'च्या पां. ना. कुमठा यांनी. त्यांचे प्रयोग व उपक्रम त्यांच्याच 'डेपो'त सुरू झाले. चातुर्मासाचा सुरेख उपयोग ते धार्मिक ग्रंथांच्या प्रदर्शनासाठी करून घेत असत. मे महिन्यात मुलांची पुस्तके ते त्याच ठिकाणी ठेवत असत. त्यांच्या उत्साहाचा फायदा करून घेण्यासाठी मौज-पॉप्युलर-परचुरे सारख्या काही प्रकाशकांनी एकत्र येऊन प्रदर्शने गावोगाव भरवली. त्याचे नेतृत्व मात्र कुमठाशेठ करीत होते. त्यांच्या या उपक्रमाला कोल्हापूरच्या रसिक व वाचनप्रिय व ग्रंथप्रेमी अरुण गाडगीळांचाही हातभार लागला होता. कुमठा यांनी तर विविध कल्पना प्रदर्शनानिमित्त राबवल्या. उदा. 'लेखक तुमच्या भेटीला' या योजनेतून ग्राहकाला लेखकाला पाहता येत असे. शिवाय ग्रंथावर त्या लेखकाची स्वाक्षरीही मिळत असे. आज हाच ऐतिहासिक कार्य करणारा बुक डेपोच अस्तित्वात नाही याचे कोणालाही दु:ख होईल.

ग्रंथप्रदर्शनाबरोबर साहित्यिक कार्यक्रमांची जोड घालून ते दोन्ही उपक्रम यशस्वी करून दाखवण्याचे कार्य, मॅजेस्टिक प्रकाशनाच्या केशवराव कोठावळ्यांनी व पुढे अशोक कोठावळे, तुकाराम कोठावळे यांनी करून दाखवले. १९५२ सालापासून प्रकाशक म्हणून, १९४२ सालापासून विक्रेते म्हणून परिचित असणाऱ्या केशवराव कोठावळे यांनी १९६९ साली पुण्यात २५०० फुटाची भव्य इमारत बांधली आणि त्या इमारतीच्या गच्चीत साधारण ७०-७२ पासून 'गच्चीवरल्या गप्पां'ना प्रारंभ झाला. १मे ते १५ मे या ठरलेल्या तारखांना केवळ साहित्यावरच्या कार्यक्रमांनी पुणे गाजू लागले. गच्चीवर गप्पा व खाली हॉलमध्ये ग्रंथप्रदर्शन व विक्री असा कार्यक्रम १९८३ पर्यंत पुण्यात होत होता. त्यात अनेक साहित्यिकांनी हजेरी लावली आहे. या कार्यक्रमाचा बोलबाला फार होता. २३ मे १९८३ रोजी केशवराव कोठावळ्यांचे अचानक निधन झाले. त्यामुळे पुढे नंतर अशोक कोठावळे यांनी मुंबईच्या विलपार्ले येथील लोकमान्य सेवा संघाच्या सहकार्याने पार्ल्यात मॅजेस्टिक गप्पांना प्रारंभ केला. विजय तेंडुलकरांच्या हस्ते याचे उद्‌घाटन तर झाले पण, त्यांची मुलाखतही झाली. पुण्याच्या कार्यक्रमाची जबाबदारी प्रा. वीणा देव पहात असत तर, मुंबईत अशोक कोठावळे यांना मधु मंगेश कर्णिक, भेंडे, दळवी, वि. शं. चौघुले यांच्या बरोबरीने काही पत्रकार मदत करीत होते व आहेत. पुण्यातले कार्यक्रम १९९२ पर्यंत चालू होते पण नंतर पुढे तो उपक्रम बंद पडला. मुंबईच्या कार्यक्रमाने २००८ साली रौप्य महोत्सव साजरा केला व त्याची एक 'मॅजेस्टिक गप्पा पंचविशी' ही पुस्तिकाही प्रकाशित केली. मुंबई व पुणे या दोन्ही ठिकाणी ग्रंथप्रदर्शन, विक्री व व्यक्तिगत खरेदीवर सवलत हे तीनही भाग कायम राहिले. जानेवारीत होणाऱ्या मुंबईच्या कार्यक्रमांनी सांस्कृतिक-वाङ्मयीन क्षेत्रात आपला स्वत:चा एक ठसा उमटवला आहे.

याच धर्तीवर मुंबईत बोरिवली या उपनगरात 'शब्द' या प्रकाशन संस्थेनेही असाच उपक्रम सुरू केला आहे व 'शब्द द बुक गॅलरी'ला उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

ढवळे ग्रंथ जत्रा, अक्षरधारा, ग्रंथायन अशा काही फिरत्या ग्रंथप्रदर्शनांनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी प्रदर्शने भरवली आणि पुस्तके वाचकांच्या पर्यंत नेली तरीही, एक चळवळ म्हणून ग्रंथाली वाचक चळवळीने केलेले कार्य सर्वांच्या स्मरणात राहिले आहे. १९७५ साली स्थापन झालेल्या या चळवळीने १९८० सालात फोर्ड फौंडेशनच्या अनुदानावर महाराष्ट्रभर दौरे केले. यांच्या दौऱ्यांचे वैशिष्टच असे होते की, एकाच वेळी महाराष्ट्रातील अनेक भागांत, विविध कार्यकर्त्यांचे गट, पुस्तकांची प्रदर्शने घेऊन गेले आणि अनेक लहान-मोठ्या

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !




● स्टेशनरी ● कटलरी ● गिफ्ट आर्टिकल
● सौंदर्य प्रसाधने ● शालोपयोगी वस्तु
● आर्टिकल्स व इतर फॅन्सी आइयम्स्
योग्य भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण

रवि
जनरल स्टोअर्स
११२, दक्षिण सदर बझार (सात रस्ता) सोलापूर

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

सचिन वैद्य
मो. ९४२०२६२९५६



परिमल कन्स्ट्रक्शन्स
परिमल कॉस्मॅटिक्स अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
दु. क्र. ७, नीलकंठ आर्केड, होटगी रस्ता,
सोलापूर-३

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

वातानुकूलित

● संपूर्ण शाकाहारी
● एक कौटुंबिक रेस्टॉरंट

१२५, मुरारजी पेठ, सोलापूर - ४१३ ००१
फोन : ०२१७ - २६२९४९१, ९२, ९३

*With Best Compliments from*



**Vinay Narkar**
9890615767

**Shrutali Narkar**
9370660252

साहित्यिकांना, वाचनप्रेमींना कार्यक्रमांच्या माध्यमातून एकत्र आणले. ग्रंथजत्रा, ग्रंथ उठाव, ग्रंथहंडी अशा विविध शीर्षकाने सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि सामाजिक कार्यक्रमांनी ही ग्रंथ प्रदर्शने महाराष्ट्रभर गाजली. वृत्तपत्रांनी, प्रसार माध्यमांनी या कार्यक्रमांना प्रसिद्धी दिली. ज्या भागात ग्रंथ गेले नव्हते त्या भागातील संस्था, कार्यकर्त्यांना सामील करणारे ग्रंथालीचे हे कार्य नक्कीच ऐतिहासिक आहे. ग्रंथविक्री सुद्धा उत्तम झाली, परंतु 'अनुदानामुळे हे असे भव्य कार्य शक्य झाल्याची 'टीकाही ग्रंथालीला सहन करावी लागली.

मॅजेस्टिकचे शिवाजी मंदिर, दादर येथील कायम स्वरूपाचे प्रदर्शन, आयडियलचे ग्रंथ त्रिवेणी, छबीलदास शाळेतील कायम स्वरूपाचे प्रदर्शन, धुरु हॉलमध्ये भरवली जाणारी प्रदर्शने, साहित्य अकादमीची त्यांच्या तळघरात भरवली जाणारी प्रदर्शने, अखिल भारतीय साहित्य संमेलनांतून दरवर्षी होणारी ग्रंथप्रदर्शने, छोट्या-मोठ्या साहित्य संमेलनातून होणारी प्रदर्शने, जागतिक मराठी परिषदेतर्फे झालेली देशाबाहेरची प्रदर्शने, भारतातील आणि भारताबाहेर असणारी बृहन्महाराष्ट्र मंडळे व त्यांच्या कार्यक्रमांतून होणारी प्रदर्शने, साहित्य संमेलनाच्या परदेशी संमेलनातील प्रदर्शने, राष्ट्रीय प्रदर्शने, ग्रंथालयांमधील विविध कार्यक्रमांच्या अनुषंगाने भरवली जाणारी प्रदर्शने, प्रकाशन समारंभाच्या ठिकाणी भरवली जाणारी प्रदर्शने, चर्चासत्रे, मुलाखती, प्रकाशक परिषदा, मुद्रण परिषदा, ग्रंथाली वाचकदिन इत्यादी कार्यक्रमांच्या ठिकाणी केली जाणारी ग्रंथविक्रीची सोय व प्रदर्शने, अशा विविध प्रकारच्या ग्रंथप्रदर्शन व विक्री प्रकाराला आता चांगलाच बहर आला असला तरी यातील दोन-तीन प्रदर्शनांचा आवर्जून उल्लेख करायलाच हवा. कारण तो वेगळा प्रकार आहे. ते वेगळे सांस्कृतिक विश्व आहे.

६ डिसेंबर रोजी मुंबईत आणि १४ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे होणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्याची भव्य विक्री हा मराठी ग्रंथ व्यवहारातला अपूर्व योग आहे. दुसरे असे की, ९०-९५ पूर्वी लोकवाङ्मय गृहातर्फे विविध ठिकाणी, रशियन वाङमयाची मराठी अनुवादांची प्रदर्शने होत असत. किंमती अत्यंत अल्प असणारी ही पुस्तके वाचकप्रिय होती. त्याला मिळणारा प्रतिसाद अफाट होता. याची फारशी दखल मराठी ग्रंथव्यवहार घेताना दिसत नाही. आषाढी-कार्तिकी वारीच्या काळात ठिकठिकाणी व पंढरपूर, आळंदी, पैठण, देहू इत्यादी ठिकाणी होणारी विक्री उल्लेखनीय असते. याचीही दखल घेतली जात नाही. प्रवचन-कीर्तन अशा सांप्रदायिक मंडळांच्या कार्यक्रमांमध्ये होणारी विक्री हा सुद्धा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. माटुंगा किंग सर्कल,दादर स्टेशन, फोर्ट, पुणे मंडई, इत्यादि अनेक ठिकाणी ग्रंथप्रेमींना खजिना सापडला आहे. स. गं. मालशे, प्रियोळकर, काळसेकर, टिकेकर, ढेरे, ढमढेरे, पुराणिक, विश्वास पाटील, दुर्गाबाई अशा असंख्य प्रेमींनी आपल्या ग्रंथव्यसनाच्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. मुंबईच्या सुंदराबाई हॉल मध्ये भरणाऱ्या प्रदर्शनांनी आणि शानभागांच्या प्रेमापोटी आणि ग्रंथप्रेमींवर असणाऱ्या त्यांच्या लोभामुळे स्टॅण्डबुक डेपोने, क्रॉसवर्ड सारख्या साखळीने, मराठी माणसांना आकर्षित केले आहे.

प्रकाशकांचे कॅटलॉग, रॅपर्स, पोस्टर्स, कॅलेंडर्स, डायऱ्या आणि विशेष म्हणजे स्वत:ची मुखपत्रे यांचा वापर काही प्रकाशकांनी करून घेतला आहे. पैकी नारायण सुर्वे, सतीश काळसेकर यांच्या कवितांचा पोस्टर्स म्हणून ग्रंथाली लोकवाङ्मय प्रकाशन गृहाने केलेला वापर आणि कवी वसंत बापट यांनी अनुवाद केलेला अब्राहम लिंकन यांच्या कवितेचा 'साधना' प्रेसने केलेला वापर (तोही ग्रंथ विक्रीसाठी नाहीच) विशेष म्हणायला हवा. स्त्री चळवळीची पोस्टर्स किंवा ग्रंथालीची पोस्टर्स ही पोस्टर्सची स्वतंत्र निर्मिती म्हणूनच त्याकडे पाहावे लागेल. ग्रंथ विक्रीचे ते माध्यम होऊ शकले नाही. डायऱ्या, कॅलेंडर्स, रॅपर्स, जवळजवळ कोणीच काढत नाहीत.

मराठी प्रकाशकांचे कॅटलॉग म्हणजे एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे. आतापर्यंत प्रकाशित केलेली पुस्तके, त्यांच्या विविध आवृत्त्या, पुनर्मुद्रणे, लेखकांमध्ये, पानांमध्ये, चित्रांमध्ये मुखपृष्ठांमध्ये झालेले बदल कॅटलॉगमध्ये सापडू शकत नाहीत. विषयांची सदोष विभागणी, अनाकर्षक मांडणी, पुस्तकाचे न समजणारे स्वरूप, खरेदीबाबत जिज्ञासा उत्पन्न न करणारा मजकूर, अशा असंख्य दोषांनी प्रकाशकांचे कॅटलॉग वर्षानुवर्षे छापले जात आहेत. हे कॅटलॉग वाङ्मयेतिहासाची साधने आहेत याचे त्यांना भानच नाही.

'मुखपत्रे' मात्र दखल घ्यावीत इतकी महत्त्वपूर्ण आहेत. ललित, संग्रहालय, साहित्यसहकार, रुची, साहित्यसूची यांचे उल्लेख मागे आलेच आहेत. 'जाहिरातीवर होणारा खर्च लक्षात घेता, त्याच पैशात किंवा त्या व त्यापेक्षा थोड्या अधिक खर्चात मुखपत्र काढले तर त्याचा उपयोग अधिक होऊ शकतो,' अशा विचाराने मुखपत्राकडे वळलेले प्रकाशक अनेक सापडतील.




दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

ISO 9001-2000 COMPANY Approved by MNRE.



अधिकृत आणि विश्वसनीय सेवा

सुपर प्लंबिंग सर्व्हिसेस, सोलापूर

मु. पो. कवठे (उत्तर सोलापूर)

भ्रमणध्वनी : ९८२२७१४१४८, ९४२३३३२३९४,
९८२२७४९२७०

Saves up to 70% OF MONTHLY ELECTRICITY BILL | PUF INSULATION | SS INNER CONTAINER | ISO 9001 : 2000 CERTIFIED COMPANIES | RUST PROOF OUTER BODY | HIGH RATED PRESSURE

शिवाय जाहिरातीत अल्प असणारी जागा, त्यात न देता येणारे अनेक तपशील मुखपत्रात देता येतात हे लक्षात घेऊन काही प्रमुख प्रकाशकांनी मुखपत्रांना रीतसर व योग्य अशी व्यापक बैठक प्राप्त करून दिली.

पुस्तक पंढरी, मुद्रणप्रकाश, ललित, साहित्यसूची, रुची यांचा ग्रंथप्रसाराच्या हेतू डोळ्यासमोर ठेवूनही लोकप्रिय, वाचकप्रिय झालेला साचा, ढाचा, रचना, तंत्र या मुखपत्रांसमोर होता व त्यातून प्रकाशकांनी आपापली वाट शोधली. प्रिय रसिक (पॉप्युलर), शब्दालय (शब्दालय प्रकाशन), मराठी ग्रंथजगत (मेहता), ग्रंथवेध (राजहंस), इत्यादी (मनोविकास), लोकवृत्त, वाङ्मयवृत्त (लोकवाङ्मय) अशी काही मुखपत्रे आज सातत्याने निघत आहेत. शंकर सारडा, अनिल बळेल, साधना कामत, सतीश काळसेकर, अस्मिता मोहिते, अशी साहित्य क्षेत्रातली मंडळी या मुखपत्रांशी निगडित आहेत, तर विविध ग्रंथप्रेमी, वाचनप्रेमी मंडळी त्यातून लेखनही करीत आहेत.

प्रामुख्याने स्वत:च्या पुस्तकांच्या मुखपृष्ठासह केलेल्या आकर्षक जाहिराती, याद्या, आगामी प्रकाशनांचे सूचना वजा लेख, वर्तमानपत्रांतून पुस्तकांवर आलेल्या परीक्षणांची पुनर्मुद्रणे, लेखकांच्या आठवणी, मुलाखती, कार्यक्रम, वृत्तांत असलाच मजकूर येत असला तरी काहींची दखल घ्यावी अशा बाबी त्यात आहेत.

१९९२-१९९६ या पाच-सहा वर्षांत 'चाळिशीतून' हे रामदास भटकळांचे सदर, किंवा सदानंद भटकळ यांचे 'सदानंद यात्रा' हे सदर अथवा कुमठाशेठ यांचे सदर ही वाङ्मयेतिहासाला उपयुक्त माहिती पुरवणारी सदरे होती/ आहेत. 'वाङ्मयवृत्त' मधून लिहिणारे शशिकांत सावंत यांचे लेखन मुखपत्राला पार छेदून जाणारे अस्सल लेखन म्हणता येईल. साधना कामत यांची प्रभावी असणारी संपादकीय टिपणे, ग्रंथजगतमधल्या बातम्यांचं संकलन, यांना वाचनीयता तर आहेच, पण ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून मूल्यही आहे. या अंकांचे जतन मात्र व्हायला हवे. बहुतेक ठिकाणी 'फुकट येणारा कचरा' अशीच भावना यामागे असते, ती बदलायला हवी.

ग्रंथप्रसारात 'डायरी' म्हणून 'प्रकाशन डायरी' आता प्रकाशन वार्षिक याची नोंद घ्यायला हवी. १९६९ साली गजानन क्षीरसागर यांनी हा अभिनव उपक्रम सुरू केला आणि त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला. असा प्रयोग नाट्य, सिने डायरी काढणारे सत्यवान टेटांभे यांनी केला पण त्याला प्रकाशन डायरीसारखी उपयुक्तता आली नाही आणि ग्रंथप्रसाराच्या दृष्टीने या डायरीचा फारसा उपयोग होऊ शकला नाही.

मुखपत्रांबरोबरच बहुतेक प्रकाशकांनी आपल्या प्रकाशनाची विक्री व्हावी यासाठी 'वाचक बुक क्लब'ची योजना आखली आहे. त्या माध्यमातून वाचकाला खरेदीवर सवलत देणे व घरपोच पुस्तके पाठवणे ही उद्दिष्टे त्यांनी ठेवली. ग्रंथाली वाचक चळवळीने अशी प्रारंभी सभासद योजना सुरू केली. सभासदांना निम्म्या किंमतीत ग्रंथ देणारी ग्रंथाली पुढे त्याच कारणावरून टीकेची लक्ष्य झाली. आता तर सभासद ओळखपत्राचीही गरज ग्रंथालीची पुस्तके खरेदी करताना लागत नाही.

ु ग्रंथाली चळवळीच्या निर्मितीवेळी दोन-पाच वर्षं आधी महाराष्ट्रात पुस्तकांच्या किंमती वरून भरपूर चर्चा रंगात आली होती. त्यातून ग्रंथनिर्मितीच्या अर्थकारणावर बरीच टीकटिप्पणी तज्ज्ञांनी केली होती. ग्रंथालीची निर्मितीच मुळी किंमतीवरचा उपाय, विक्रेत्यांना शह या कारणांसाठी झाली होती. पुढे सर्वच बाबींना मूठमाती मिळून ही चळवळही व्यावसायिक अंगाने गेली. सावंतवाडीची आरती प्रभूंच्या नावाने सुरू झालेली चळवळ किंवा औरंगबादची जनशक्ती वाचक चळवळ यांच्याकडून बऱ्याच अपेक्षा आहेत. पैकी सहकार तत्त्वावर निर्माण होणारे ग्रंथ ही आशेची बाब आहे.

ु व्यक्तिगत ग्रंथ खरेदीची सवय मराठी वाचकाला नाही अशी ओरड कायम केली जात असली तरी, धार्मिक, पाकशास्त्र, लोकप्रिय चरित्रे-आत्मचरित्रे, गाजलेली व गाजवलेली पुस्तके, वादविवादात सापडलेली पुस्तके अशा पुस्तकांना नेहमीच मागणी असते. संस्थात्मक ग्राहकही, त्यांच्या वाचकांच्या मागणीमुळं, अशा पुस्तकांच्या जादा प्रती विकत घेत असतो. ग्रंथप्रदर्शने भरवणाऱ्या मंडळींनी, विशेषत: ग्रंथाली वाचक चळवळ, मॅजेस्टिक गप्पा, अक्षरधारा, अशा मंडळींनी व्यक्तिगत खरेदीला प्रतिसाद मिळतो, असे म्हटले आहे. मराठी ग्रंथव्यवहारातील तज्ज्ञांनीही याबाबत वेळोवेळी आपले विचार मांडले आहेत. पुस्तकांचा खप अनेक पटींनी वाढू शकेल (वसंत पळशीकर, सत्यकथा डिसें.७६), निर्मिती, खरेदी, विक्री : तीन पेच (रमेश पानसे, सत्यकथा डिसें. ७६), इथे पुस्तकांवर वाचक अधाशासारखे तुटून पडतात. (शंकर सारडा, मटा २७ डिसें. १९८७), गेले वर्ष पुस्तकांना कसे गेले? (रवींद्र पिंगे, मटा ८जाने १९८४), मराठी पुस्तकांना उज्ज्वल भविष्य आहे! (सुनील

## *आशय दिवाळी अंकास शुभेच्छा !*

| | |
|---|---|
| **सौ. व श्री केदार कहाते**<br>३२०/२० 'इंद्रायणी', समर्थ नगर, सिव्हील हॉस्पिटल मागे, सोलापूर -४१३००३, मो. ९८२२४३६८६०<br>निवास- ०२१७ २३११४१६<br>e-mail : Kedarkahate@gmail.com. | *डॉ. वासुदेव रायते यांची संग्रह ठेवावी अशी आरोग्य मार्गदर्शक पुस्तके मधुमेहींची जीवनरेखा आणि वासुदेवाची आरोग्यवाणी*<br>**लेखक : डॉ. वासुदेव रायते**<br>उपलब्ध : **आनंदश्री, प्रतिष्ठान,** ३०, जवान नगर, विजापूर रोड, सोलापूर - ४१३००४ फो. ०२१७- २३४१५६७ |
| **सौ. सुलभा पिशवीकर**<br>नाथ प्राईड, सदर बझार,<br>सोलापूर | **श्री. भगवान रामपुरे**<br>१ मजरेवाडी, गांगजी कार्यालयाच्या शेजारी, होटगी रस्ता, सोलापर - ४१३२५१,<br>मो. ९८२२७८०३४४, ९८६०९९६४७३<br>e-mail:rampurearts@indiatimes.com |
| **श्री. अविनाश जोशी**<br>समर्थ नगर, सिव्हील हॉस्पीटलमागे, सोलापूर.<br>भ्रमणध्वनी : ९४२२०२६२८९ | **डॉ. शाम तोष्णीवाल**<br>नवनीत हॉस्पिटल, रात रस्ता, सोलापूर<br>'नेत्रदान करा' |
| **श्री. सी. डी. माने**<br>जय त्रिमूर्ती को ऑप हौ. सोसायटी, बिल्डींग न.४ अे, फ्लॅट क्र. ४०३, पुणे हायवे कळवा, (जि.पुणे)<br>भ्रमणध्वनी:९८६९५४००० | **सौ.अमिता बीडकर**<br>अे-२२, 'त्रिगुण' इंदिरा नगर, विजापूर रस्ता, सोलापूर-४१३००४, दूरध्वनी: ०२१७-२३०३२३३ |
| **डॉ. बाहुबली दोशी**<br>भवानी पेठ, सोलापूर दूरध्वनी : २३२६९५१ | **डॉ. गिरीश कुमठेकर**<br>प्रमोद सह. गृहनिर्माण सोसायटी, विजापूर रोड.<br>सोलापूर : ४१३००४, |
| **शिरीष देखणे**<br>६, चंद्रकिरण अपार्टमेंट, १६२/१८ बी, रेल्वे लाईन्स, सोलापूर, दूरध्वनी: २३१७८७४ | **गिरीश पंचवाडकर**<br>संगीत निर्मिती विहार, विजापूर रोड सोलापूर-४१३००४<br>दूरध्वनी -५६१८६७१ |
| **गजानन मेहेंदळे**<br>सोलापूर सुपर सर्व्हिसेसच्या मागे, डफरीन चौक, सोलापूर मो. ९८२२६४४८०१ | **श्रीनिवास दिंडोरकर**<br>२०३,दक्षिण कसबा,<br>सोलापूर - ४१३००७ |
| **सौ. अश्विनी उपळेकर/ अशोक उपळेकर**<br>७५/२, रेल्वे लाईन, देशकवाडी सोलापूर-४१३००१,<br>दूरध्वनी - २७२३२४४ | **सौ. मंजू कामतकर / डॉ. श्रीकांत कामतकर**<br>गौरीशंकर गृह संकुल, ३४ रेल्वे लाईन, सोलापूर-१<br>दूरध्वनी-२७२०२७३, भ्रमणध्वनी-९८२२२१५११८ |

कर्णिक, मटा ३१ जुलै १९८३), पुस्तकांचा दुष्काळ (ह. अ. भावे, ललित एप्रिल ७६), इत्यादी अनेक उदाहरणे देता येणे शक्य आहे. मराठी ग्रंथांना प्रचंड जरी नसला, बंगाली, हिंदी इंग्रजी भाषेत जसा आहे तसा जरी नसला, तरी वाचक ग्राहक म्हणून लाभतो, मात्र त्याच्यापर्यंत जायला हवे, त्याची जिज्ञासा जागृत करायला हवी. पुस्तक खरेदी करावे, संग्रही ठेवावे असे वाटावे, अशी माहिती त्याच्यापर्यंत न्यायला मात्र हवी, असेच या सर्व तज्ज्ञांच्या विचारांचे सार मांडता येईल. हे सार सत्यच आहे, याबद्दल शंका नाही.

नवनवा ग्राहक शोधायला हवा. त्याच्यापर्यंत जायला हवे. राजहंस प्रकाशनाने अशा नव्या वाटा शोधून काढल्या. घरोघरी त्यांचे विक्रेते जात असतात. त्या विक्रेत्यांचे प्रशिक्षणही त्यांनी आयोजित केले होते. ह. अ. भावे यांनी पुनर्मुद्रणाची वाट चोखाळून नव्याने आलेल्या संस्था व नवा शिक्षितवर्ग शोधला. सामाजिक कार्यकर्ते, दलित वर्गाचे लेख ग्रंथालीने स्वीकारले, बहुजन वर्गातील लेखकांचे साहित्य डिम्पलने मिळवले. अनुवादित ग्रंथांची कास मेहताने पकडली, संदर्भ ग्रंथांचे दालन प्रतिमा प्रकाशन, पद्मगंधाने स्वीकारले. नवीन प्रयोग, नवे लेखक मौज, पॉप्युलरचे वैशिष्ट्य राहिले, आंबेडकरी साहित्याचे दालन सुगावा, संकेत यांनी आपलेसे केले, साठोत्तरीतील उत्तम लेखक साकेत, शब्दालय, शब्द नवचैतन्य यांनी उचलून धरले, दर्जेदार तरीही लोकप्रिय लेखकांच्या साहित्यावर मॅजेस्टिकने लक्ष केंद्रित केले. अशा विविध प्रकाशकांनी आपापला ग्राहक शोधला. तो तो ग्राहक त्या त्या प्रकाशन संस्थेखाली, संस्थेसाठी एकत्रही आलेला, झालेला दिसतो. ग्राहकानुसार त्या त्या प्रकाशकांची ग्रंथनिर्मिती झालेली दिसून येते.

काही वाचक ग्रंथविक्रेते, सदरलेखक, ग्रंथपाल, मात्र वेगळेच कार्य करताना दिसतात. ग्रंथप्रसारक, ग्रंथवार्ताहर, ग्रंथप्रेमी अशा विविध नावांनी ते प्रसिद्ध पावलेले आहेत. सर्वांची दखल घेणे शक्य नसले तरीही काहींची दखल घ्यायलाच हवी.

पुस्तकवेडे विठ्ठलराव दीक्षित, ग्राहकांचे मानसशास्त्र जपणारे राका बुक एजन्सीचे रा. ब. देशपांडे, दलितांच्या ग्रंथालयासाठी कार्य करणारे विजय सोनावणे, ग्रामीण वाचनालयांमध्ये परिचित असणारे नारायण जमदाडे, संदर्भ सेवा देणारे मनोहर पारायणे, लतिका जोशी, शशिकांत भगत, ग्रंथप्रेमी दूत मामा (चिं. रा. टिकेकर), रस्त्यावर पुस्तकं विकणारे कोल्हापुरातले लाड पितापुत्र आणि त्यांनी बनवलेलं तिथलं ते साहित्यिक ठिकाण, खाजगीरित्या ग्रंथप्रसार करणाऱ्या पद्मजा फाटक, 'ग्रंथांचे भक्त' म्हणून प्रसिद्ध असणारे डेक्कन बुक स्टॉलचे मा. ह. दातार, पुण्याच्या जिल्हा परिषदेत काम करता करता स्वत:चा उत्तम संग्रह जमा करणारे रा. पं. वडके, शिक्षकाने वर्षातून एकतरी पुस्तक विकत घेऊन वाचावे अशी तळमळ ठेवून,त्यांच्यासाठी योजना राबवणारे द्वारकानाथ शहासने, ग्रंथखरेदी करणारे अनेक ग्रंथपाल उदा.श्री. बा. जोशी, बी. एस. केशवन, शंकर गणेश दाते, शां. ग. महाजन, वा. प्र. कोल्हटकर, वा. ल. मंजुळ, अविनाथ सहस्रबुद्धे, अनंत जोशी, श. रा. गणपुले, पुस्तकांविषयी सातत्याने लिहिणारे रवी प्रकाश कुलकर्णी, वामन देशपांडे, अशोक बेंडसळे, 'परिक्रमा' सारखे सत्यकथेतून कष्टदायी सदर चालवणारे राम पटवर्धन, पुस्तकांची रोचक व रोमहर्षक माहिती पुरवणारे बाल सामंत, आकाशवाणीवर एक तपाहून अधिककाळ 'ग्रंथवार्ता' देणारे रवींद्र पिंगे, जागतिक 'पुस्तकांच्या जगा'चा प्रवास करून आणणारे, वेगवेगळ्या ग्रंथांबद्दलच्या घटनांची तत्काळ दखल घेणारे शंकर सारडा, इंग्रजी ग्रंथांचा उत्तम परिचय करून देणारे सदा डुंबरे, जाहीरपणे ग्रंथांचे श्रवण करण्याची गोडी आकाशवाणीच्या माध्यमातून लावणारे महेश केळुसकर, सातत्याने मराठी-इंग्रजीत पुस्तकांची दखल घेणारे अविनाश कोल्हे, चौफेरमधून पुस्तकांची धडाकेबाज नोंद घेणारे माधव गडकरी, ली आयाकोका आणि इतरही वेगळ्याच माणसांच्या आयुष्याची कहाणी पुस्तकांतून वाचल्यावर ती कुतूहलपूर्ण मांडणाऱ्या लताराजे, मटाच्या पठडीत तयार झालेले श्रीराम शिधये, सारंग दर्शने, अशी कितीतरी नावे समोर येतात. या सर्वांनी ग्रंथप्रसाराचे कार्य आपल्या परीने चोख केले व त्यामुळे ग्रंथ वाचकांपर्यंत जाण्यासाठी मोठे काम झाले आहे. यामध्ये अनेकांची नावं राहिली आहेत याची जाणीव आहे, पण त्याला इलाज नाही. ही सर्व मंडळी ग्रंथावर, वाचनावर, ग्रंथसंस्कृतीवर, वाचनप्रेमीवर प्रेम करणारी होती/आहेत.

काही लेखकांनीही ग्रंथप्रसाराचे कार्य आपल्या लेखणी/वाणीद्वारा केले आहे. ललितमधील अनेक सदरे याची साक्ष देतील. ठणठणपाळ, अलाणेफलाणे, गोमागणेश किंवा मटामधले कानोकानी, लोकसत्तेतील दोनफूल एक हाफ, या सदरांनी खुसखुशीतपणे अनेक घटना टिपल्या आहेत. काही लेखकांनीही मराठी ग्रंथव्यवहाराच्या दृष्टीने लेखन केलेले दिसते.

ु १९६४ पासून 'साहित्य स्नेही मंडळ' स्थापन करून ग्रंथखरेदी, वाचन व चर्चा या माध्यमातून दीर्घकाळ आपले कार्य

## आशय दिवाळी अंकास शुभेच्छा !

| | |
|---|---|
| **गोफणे परिवार**<br>चंद्रकांत बाबुराव गोफणे<br>बी-१३, शुभलाभ रेसिडेन्सी, ७१५ बी, गुरुवार पेठ,<br>पुणे-४११ ०४२. भ्रमणध्वनी : ९८६०९७५२५५ | **विजय घमंडे /आशा घमंडे**<br>पुणे<br>भ्रमणध्वनी - ९८२२३७३२८६ |
| **डॉ. दत्तप्रसन्न काटीकर**<br>१११, सात रस्ता, 'विनित',<br>सोलापूर | **डॉ. माधव गुंडेटी**<br>३४/अे/८अ, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर<br>भ्रमणध्वनी - ९८५००७५६९९ |
| **श्री. नरेश अनंत कुलकर्णी**<br>'मिनाक्षी', दमाणी नगर, जाम मिलजवळ, सोलापूर<br>भ्रमणध्वनी - ९३२६१६२५०६ | **सौ. कविता के. कुलकर्णी/श्री कमलाकर कुलकर्णी**<br>६, स्नेहल पार्क, जुळे सोलापूर.<br>दुरध्वनी -२३०५६५९ भ्रमणध्वनी - ९८२२१८२७ |
| **मिलिंद मनोहर गोखले**<br>'मनिषा', ३४१, दक्षिण कसबा, बेरकी म्हसोबा गल्ली,<br>सोलापूर दुरध्वनी २७२५६५० भ्रमणध्वनी ९४२२३७०८९८ | **सौ. विद्या वाळिंबे / श्री सुरेंद्र वाळिंबे**<br>विद्याविहार अपार्टमेंट, रेल्वे लाईन, सोलापूर<br>दूरध्वनी - २३१३१०९ |
| **सौ. मीना कुलकर्णी / श्री उमेश कुलकर्णी**<br>स.नं. ११९/२ पर्वती, फ्लॅट नं. १७, बिल्डींग नं. बी-७<br>सरीता वैभव, सिंहगड रोड, पुणे-४११०३०<br>दूरध्वनी क्र. २४२५१२२४ | **श्री. उमेश अनंत पागे**<br>प्लॉट नं.४, मंगल हाऊसिंग सोसायटी,<br>गुलमोहोर रोड, सावेडी, अहमदनगर -४१४००३<br>दूरध्वनी क्र. २४२८७९७ |
| **श्री. अरविंद तुकाराम कामथे**<br>स.नं.४३/२ ए, संजय गांधी सहकारी गृहरचना<br>सोमनाथ नगर, वडगांव शेरी, पुणे-४११०१४<br>भ्रमणध्वनी क्र. ९८२२०४४३०९ | **श्री. शरद कवठेकर**<br>पी ३०४, रिलायन्स टाऊनशिप, दिपलोड<br>सुरत (गुजरात राज्य) |
| **श्री. सुधीर इंगळे**<br>१६, सूरशब्द गिरीराज अपार्टमेंट्स, दमाणीनगर,<br>भ्रमणध्वनी - ९८८१४०८०२० | **श्री. अशोक पाटील**<br>२०१, सिव्हील लाईन्स, सर्वोदय हौसिंग सोसायटी, सोलापूर<br>भ्रमणध्वनी - ९८५००४०००१ |
| **ॲड. धनंजय माने**<br>२११, नवी पेठ, माने सदर, सोलापूर- ४१३००७<br>दूरध्वनी ०२१७ २७२६८०२/ २६२२४९५ | **डॉ. शांता किर्लोस्कर**<br>५६०/७ द. सदर बाजार, सोलापूर<br>भ्रमणध्वनी - ०२१७ - २३१२५५९ |

चालवणाऱ्या, श्री. ल. टिळक यांची खरे तर वेगळी दखल घ्यायला हवी. जवळजवळ ४०० ते ५०० जणांना त्यांनी ग्रंथवाचन व संग्रहाची गोडी लावली. तसेच महाराष्ट्रातील हजारो वाचकांना, साहित्य संस्थांना, ग्रंथालये, ग्रंथपाल, विक्रेते, ग्रंथप्रेमी यांना नव्या जुन्या ग्रंथांची माहिती गेली ५० वर्षे पत्राद्वारे कळवणारे श्री. शरद जोशी यांचीही स्वतंत्र दखल घ्यायला हवी. वेगवेगळ्या शासकीय, निमशासकीय कचेऱ्या, बँका, पोस्ट अशा ठिकाणी दिवाळी अंकांचा ग्रुप किंवा पुस्तक भिशी फंड, किंवा चक्रीवादन सभासदत्व, अशा प्रकारचे छोटे छोटे गट कार्य करताना दिसतात. त्यांच्यावर श्री. ल. टिळक यांच्या सारख्या माणसांच्या कार्याचा प्रभाव आहे हे नाकारता येणार नाही. अशा प्रकारे ग्रंथप्रचाराचे, वाचनाचे, वाचन संस्काराचे कार्य किती महत्त्वपूर्ण ठरते हे नव्याने सांगायची गरज नाही.

मुलांवर वाचनाचे संस्कार करणारे दोन घटक प्रमुख आहेत. एक पालक व दुसरे शिक्षक-ग्रंथपाल. यापैकी शालेय ग्रंथालयाची स्थिती दयनीय आहे. काही शाळांच्या ग्रंथालयांचा मात्र अपवाद करावा लागेल. उदा. बालमोहन, छबिलदास, पार्ले टिळक, नूतन मराठी इत्यादी. या शाळांतील सहस्रबुद्धे, दादा रेगे, नारळकर, किंवा अशोक चिटणीस अशा मुख्याध्यापक वा ग्रंथपालांमुळेच त्या शाळांत ग्रंथालये समृद्ध झाली व त्यांनी केलेल्या कात्रणांच्या प्रयोगांपासून, विविध स्पर्धांमुळे वाचनसंस्कार दृढ होत गेले. याचमुळे मुंबईत ग्रंथालीने भरवलेली विद्यार्थ्यांची वाचन परिषद गाजली. घरामध्ये जे संस्कार व्हायला हवेत, तेही आपल्याकडे होताना दिसत नाहीत. पालकमंडळी ही जबाबदारी शिक्षकांवर-शाळेवर ढकलून मोकळे होताना दिसतात. आपल्याकडे वाचन विद्यालय किंवा वाचन प्रशिक्षणाचा कोर्स असे प्रकार दिसत नाहीत. पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी तर्फे मात्र वाचनसंस्काराचे वर्ग चालतात हे विसरून चालणार नाही. काही ठिकाणी वाचनविषयक कार्यशाळा, चर्चासत्रे आयोजित केली गेली आहेत. वाचनसवयी, छंद, वाचनवेग, वाचनाचे मानसशास्त्र, समज, विचारशक्ती, स्मरणशक्ती, यात करावयाची वाढ इत्यादी अंगाने अनेक तज्ज्ञांनी पुस्तके लिहिली आहेत व त्यांची व्याख्याने, सदरे (वाचा आणि वाचा, लोकसत्ता) लोकप्रियही ठरली होती. प्रा. पावसरे यांनी सेवानिवृत्ती नंतर घरडा केमिकल्सच्या सहकार्याने, कोकण किनारपट्टीत, पेटीत ग्रंथालयांची चळवळ यशस्वी तर केलीच, पण ग्रंथपाल नसणाऱ्या शाळांमध्ये ज्या शिक्षकांवर ग्रंथालयाची जबाबदारी येऊन पडते, अशा शिक्षकांना ग्रंथालयशास्त्राचे जुजबी शास्त्र शिकवण्याची यंत्रणा उभी केली होती. त्यांचे कार्य महत्त्वाचे होते व त्याला फारशी प्रसिद्धीही मिळाली नाही.

केव्हाही ग्रंथव्यवहाराचा विचार करताना ग्रंथालयांच्या योगदानाकडे दुर्लक्षच केले जाते. १९६७ चा सार्वजनिक ग्रंथालय कायदा महाराष्ट्रात अस्तित्वात आल्यानंतर विविध भागांमध्ये सार्वजनिक ग्रंथालये निघाली आणि कायद्यानुसार त्यांना किमान दहा सांस्कृतिक-वाङ्मयीन कार्यक्रम करणे आवश्यक झाले. परंतु त्यापूर्वीही आपल्याकडे ग्रंथालयांचा समृद्ध वारसा निर्माण झालेला होता. त्यामुळे सर्व ग्रंथालये अशा कार्यक्रमात अग्रेसर होती व आहेत. अनेक सार्वजनिक ग्रंथालयांतून वाचकांच्या विविध स्पर्धा, पुस्तक चर्चा मंच, वाचक मेळावे, सहली, लेखक तुमच्या भेटीला, लेखक-वाचक संवाद, अशा स्वरूपाचे कार्यक्रम होत असतात व त्यातून वाचकांमध्ये विचारांची - संवादाची देवाण-घेवाण होते.

ग्रंथालयांचे नोटीसबोर्ड हे ग्रंथप्रसाराचे मोठे साधन आहे. त्यावर पुस्तकांची परीक्षणे, बातम्या, लेख जसे लावले जातात तसेच त्यावर ग्रंथांची मुखपृष्ठेही लावली जातात. नित्यनियमाने होणारी पुस्तकप्रदर्शने ही ग्रंथप्रसाराची मोठी दालनेच आहेत. व्याख्यानमाला, जयंती, पुण्यतिथी, वार्षिकोत्सव इत्यादी निमित्तांनी होणारे कार्यक्रम त्यात भरच घालतात. ग्रंथालयांच्या योगदानावर खूप लिहिता येण्यासारखे आहे.

ु वाङ्मयीन, सांस्कृतिक, सामाजिक, कार्यक्रमांच्या द्वारा ग्रंथांना, ग्रंथघटनेला नेहमीच महत्त्व मिळाले आहे. याचा विचार मागे आलाच आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर शासनातर्फे ग्रंथपारितोषिके सुरू झाली. पुढे त्यात काही वाङ्मयीन, सामाजिक, सांस्कृतिक संस्था, ग्रंथालये सामील झाली. साधारण १९८० पर्यंत हे प्रमाण अल्प होते, पुढे व्यक्ती, खाजगी संस्था, प्रतिष्ठाने त्यात सहभागी झाल्या आणि त्याचे स्वरूपच पालटून गेले. आज अशा पारितोषिकांची संस्था अफाट झाली आहे. सर्वांची एकत्रित सूचीही उपलब्ध नसेल. ज्ञानपीठ, साहित्य अकादमी, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ इत्यादी संस्थांच्या बरोबरीने महाराष्ट्र फौंडेशन, भैरूरतन दमाणी, सांगाती अकादमी, कोकण मराठी साहित्य संमेलन, इचलकंरजी एज्युकेशनल ट्रस्ट, बेंजामिन पुरस्कार, जनसारस्वत ग्रंथ पुरस्कार, तुका म्हणे प्रतिष्ठान, पद्मगंधा प्रतिष्ठान, कै. पु. य. देशपांडे स्मृती पुरस्कार, कै. यशवंतराव

## आशय दिवाळी अंकास शुभेच्छा !

| | |
|---|---|
| **ॲड. तेजस देशमुख**<br>हायकोर्ट प्लीडर, मोबा. ९८२०४६९५७५<br>**ॲड. वासंती देशमुख** | **अंजली नानल**<br>१६२/२०अ, साकेत रेल्वे लाइन्स सोलापूर<br>दूरध्वनी - ०२१७ २३१९१०० |
| **ॲड. जे. जे. कुलकर्णी**<br>सावली बिल्डींग, हुतात्मा बागेसमोर<br>सोलापूर, मोबा. ९४२२६४८३४४ | **डॉ. मंजिरी चितळे**<br>द्वारा चितळे क्लिनिक, सात रस्ता<br>सोलापूर |
| **अनिरुद्ध जोशी**<br>४,अ प्रमोद सोसायटी विजापूर रोड, सोलापूर<br>भ्रमणध्वनी - ९८२२१४८८५८ | **प्रमिला राऊत**<br>२६, सिव्हिल लाइन्स, 'एकवीरा',<br>लिटल फ्लॉवर जवळ, सोलापूर. |
| **श्री रेवणकर**<br>गणेश कॉम्प्लेक्स आजोबा गणपती समोर<br>माणिक चौक सोलापूर भ्रमणध्वनी ९३७०४२४०८४ | **डॉ. उमाकांत वरेरकर**<br>२७६/१०, होटगी रोड, किनारा जवळ , सोलापूर ३<br>दूरध्वनी -०२१७ २६००६४१(नि.)/२७२३४१२(हॉ.) |
| **मंदाकिनी फडकुले**<br>४/१० विद्यानगर,सिव्हिल हॉस्पिटलमागे<br>सोलापूर फोन- ०२१७ २३१७२७९ | **सुरेश राठी / पुष्पा राठी**<br>११, भगवती हाऊ. सोसायटी,सम्राट चौक<br>सोलापूर |
| **मोहिनी पिटके**<br>एस. १, लोटस अपार्टमेंट्स<br>रेल्वे लाइन्स, सोलापूर<br>दूरध्वनी क्र. ०२१७ २३१३०१३ | **कविता डागा/ शरद डागा**<br>६०२, हरीपद्म सोसायटी,महेश कॉलनीसमोर<br>सम्राट चौक सोलापूर<br>email kavitadaga88@yahoo.co.in |
| **महेन्द्र झांबरे**<br>१६२/११ रेल्वे लाइन्स, दंडवते मठासमोर<br>सोलापूर | **सुरेखा शहा**<br>'चंद्ररेखा', प्रभाकर महाराज मार्ग, सम्राट चौक सोलापूर,<br>भ्रमणध्वनी ९४०४३०१३७३, ०२१७ २३२६३७७ |
| **शशिकांत लावणीस**<br>'जानकी', ५८५, अ द.कसबा, टोळाचा बोळ,<br>सोलापूर भ्रमणध्वनी ९४२१०२६२७९ | **डॉ. चंद्रशेखर किणीकर**<br>श्री चौडेश्वरी नेत्र रुग्णालय, ४९९, साखर पेठ सोलापूर<br>फोन०२१७-२६२६१५९/२३२७५४८/२३७६१७(नि) |

दाते स्मृती संस्था, शब्दपंढरी पुरस्कार, जीवन विकास ग्रंथालय, सोमाणी पुरस्कार, गुगळे उत्कृष्ट ग्रामीण पुरस्कार, सेलू पुरस्कार, मराठा सेवा पुरस्कार, स्नेहवर्धन, ह. श्री. शेणोलीकर पुरस्कार, महाबँक पुरस्कार, कुसुमानील स्मृती, प्रसादबन ग्रंथगौरव इत्यादी अमाप २००-२५० पुरस्कार असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पुरस्कारांचा एक फायदा असा की त्यामुळे पुरस्कार प्राप्त ग्रंथ, लेखक, प्रकाशन संस्था समाजासमोर येते आणि समाजात त्या ग्रंथांचा, लेखकांचा, प्रकाशन संस्थांचा प्रचार-प्रसार होतो व त्यामुळेच ग्रंथव्यवहाराच्या चलनवलनाला साहाय्य होते पण तोटा असा की, त्यातील राजकारण, प्रसिद्धीची हाव, फुकट ग्रंथ जमा करण्याची चलाखी, ग्रंथविक्रीला साहाय्यभूत होईल असे प्रसिद्धी तंत्र वाचकांना, समाजाला लक्षात आल्या शिवाय राहात नाही. छुटपुट पुरस्कारांमुळे हसे होत असले तरी सर्वच पुरस्कार तसे नाहीत. ज्यांची दखल घ्यावी (आणि ती घेतलीही जाते) असे काही पुरस्कार नक्कीच आहेत. वि. पु. भागवत, केशवराव कोठावळे यांच्या नावाने दिलेले पुरस्कार प्रकाशनविश्वात मान्यता पावले आहेत. गंगाधर गाडगीळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,चतुरंगचे जीवन गौरव, अनुष्टुभच्या म.सु. पाटील यांच्या तर्फे मिळणारे पुरस्कार, ग्रंथालयांना, व्यक्तींना, लेखकांना, कार्यकर्त्यांना उत्साह वाटावा असे आहेत.

पुरस्काराप्रमाणेच १९८० मध्ये आलेला एक प्रकार म्हणजे संशोधन शिष्यवृत्ती. साहित्य अकादमी, फाय फौंडेशन, नेहरू शिष्यवृत्ती तर्फे लेखकाना, पत्रकारांना, विविध भागांत जाऊन अभ्यास करण्याची संधी जशी मिळते तसेच मनोहर कदम संशोधन वृत्ती, साने गुरुजी अनुवाद सुविद्या केन्द्राची शिष्यवृत्ती, फुल ब्राईट फेलोशिप, विविध विद्यापीठांच्या शिष्यवृत्त्या, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पीएच.डी., एम.फिल., किंवा पोस्ट पीएच.डी. संशोधनासाठी शिष्यवृत्त्या मिळतात किंवा छोटा(मायनर) मोठा (मेजर) संशोधन प्रकल्पही स्वतंत्रपणे विद्यापीठ किंवा युजीसीला सादर करता येतो.

या संशोधन शिष्यवृत्त्यांमुळे विविध प्रकारचे संशोधनावर आधारलेले ग्रंथ वा ग्रंथेतर साहित्य मराठी ग्रंथ व्यवहाराला मिळालेले आहे. विजय तेंडुलकरांचे हिंसेच्या संदर्भात झालेले भ्रमण आणि त्यातून निर्माण झालेला 'चेहरे' हा कार्यक्रम सर्वांच्या स्मरणात असेलच. अनिल अवचट, दया पवार, लक्ष्मण माने यांची उदाहरणे फाय फौंडेशनमुळे ज्ञात आहेत. शरणकुमार लिंबाळे यांना साहित्य अकादमीने दिलेल्या शिष्यवृत्तीत निर्माण झालेले त्यांचे ग्रंथ उल्लेखनीय आहेत. अशा संशोधन वृत्तीमुळे मराठी ग्रंथ व्यवहार समृद्ध झाला आहे.

## समस्या

मराठी ग्रंथ व्यवहाराला गेल्या २०० वर्षांत अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. पैकी १९६० नंतरचा विचार केला तर, पानशेत धरण फुटणे, कोयनेचा भूकंप, लातूर, भुज येथील भूकंप, ७२ चा दुष्काळ, २६ जुलैचा मुंबईचा पूर, कोकणातला पूर यांचा परिणाम प्रकाशक, विक्रेते, खाजगी संग्राहक, ग्रंथालये यांना सोसावा लागला. कित्येक ग्रंथांचे नुकसान झाले. ग्रंथालये बळी पडली. दुर्मिळ ग्रंथ नामशेष झाले. संस्थांचा, महाविद्यालयांचा संग्रह बेचिराख झाला.

नैसर्गिक आपत्तीबरोबर मानवनिर्मित आपत्ती, भांडारकर वर झालेल्या दुर्दैवी घटनेने, ग्रंथ व्यवहाराने सोसली आहेच. ग्रंथ बंदी, जाळपोळ, होळी यासारख्या समस्याही आहेतच. युद्धाचे सावट नसले तरी तेही येऊ शकते. लेखकावर बंदी जरी नसली तरीही तीसुद्धा अप्रत्यक्षरित्या आहेच.आणीबाणीत ती उघड होती इतकेच. आम्ही म्हणू ते व तेच तुम्ही लिहिले पाहिजे, सत्य समजले तरी ते सांगितलेच पाहिजे का, असा एक गुप्त संकेतच अलीकडे पसरवण्यात झुंडशाही यशस्वी झाली आहे. या समस्या कशा सोडवायच्या, त्याचे आव्हान ग्रंथव्यवहारासमोर आहेच, पण इतरही आव्हाने आहेत.

## आव्हाने

मराठी वाचनाची आवड शहरी भागात कमी होत आहे, दूरदर्शन, संगणक, नवे तंत्रज्ञान, नव्या संप्रेषण पद्धती यांनी ग्रंथ या प्रकारावर आक्रमण केले आहे. वृत्तपत्रांनी साप्ताहिके- नियत कालिकांचा घास घेतला आहे, वृत्तपत्रांचा दूरदर्शन, वाहिन्या व इंटरनेटने घास खाल्ला आहे. व्हायरस, खोटी माहिती, कचरा, अवाढव्य पसारा यांनी इंटरनेट व्यापून गेले आहे. नव्या तंत्रज्ञानाने सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक प्रश्न निर्माण केले आहेत. भाषा नावाच्या प्रकाराची मोडतोड होऊन नवीनच एसएमएस भाषा संस्कृती जन्माला आली आहे. दूरदर्शन मालिका, इंटरनेट, सीडी, संगीताचा खजिना, चित्रपटांचा साठा, मोबाईल, वेगवान गती, सबसे तेजची बातमी संस्कृती, कानातल्या हेडफोन्समुळे निर्माण झालेला बहिरेपणा यामुळे एकाच घरात असूनही नातेसंबंध संपून गेलेत. गप्पा संस्कृती थांबली आहे. डायनिंग टेबलावरचे हसत खेळत कोंडाळे फुटून निघून, जो तो स्वतंत्र होऊन मालिकांच्या

## आशय दिवाळी अंकास शुभेच्छा !

| | |
|---|---|
| **डॉ. हरीश रायचूर**<br>अे १ विजय सोसायटी, विजापूर रोड, सोलापूर ४<br>फोन. ०२१७ २३४१५५८ | **जगदेवी स्वामी**<br>३५८, मंगळवार पेठ, सराफ बझार सोलापूर<br>भ्रमणध्वनी - ९९६०३८८३०४ |
| **डॉ. गीता जोशी/ डॉ. नरेन्द्र जोशी**<br>१५७/२८, आशीर्वाद,शांतीसागर मंगल कार्यालया समोर<br>रेल्वे लाइन्स, सोलापूर | **डॉ. विवेक कुलकर्णी**<br>दंत रोग तज्ञ, २०, गुरूवार पेठ,समाचार चौक<br>सोलापूर फोन ०२१७ २६२०७७० |
| **दिनेश कारंजे**<br>३८०, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर<br>दूरध्वनी ०२१७ २३२२९८४ | **डॉ. अरविंद देखणे**<br>किनारा हॉटेल जवळ काडादी नगर २<br>होटगी रोड, सोलापूर. |
| **डॉ. जयंत शेळगीकर**<br>श्री वल्लव्वा अपार्टमेंटस्<br>११७९, उत्तर कसबा सोलापूर | **प्रा. विलास बेत**<br>अवंती नगरी, जुना पुणे नाका सोलापूर<br>भ्रमणध्वनी -९२२२६०६३२२ |
| **प्रकाश बुरटे / अरुणा बुरटे**<br>५,अंत्रोळीकर नगर क्र. ३ होटगी रोड सोलापूर<br>email burte.burte@gmail.com | **श्रीनिवास मोहोळकर**<br>१८ बी, रेल्वे हाउ. सोसायटी भारती विद्यापीठासमोर<br>सोलापूर भ्रमणध्वनी ९४२२६४४२४५ |
| **प्रसन्न नाझरे**<br>जनरल इन्शु.सर्व्हेअर व व्हॅल्यअर, १०५/ १७१<br>'अस्मिता' उमानगरी, मुरारजी पेठ सोलापूर<br>९८२२०३७५८८, ०२१७-२३२४२५७ | **अॅड. रघुनाथ दामले**<br>फ्लॅट नं. २-३, राधाकृष्ण अपा. ८५३/८५४<br>उत्तर कसबा सोलापूर दूरध्वनी ०२१७ २७२५५९१ |
| **अश्विनी वळसंगकर**<br>गुरू माऊली, ५६०/१ द.सदर बझार<br>सात रस्ता, सोलापूर | **अण्णासाहेब राजमाने**<br>आशियाना, वसंत विहार, जुना पुणे नाका<br>सोलापूर. भ्रमणध्वनी ९४२२४५७३२४ |
| **डॉ. मिलींद जोशी/ वैशाली जोशी**<br>सुश्रुत क्लिनिक, १४१/२ रेल्वे लाइन्स सोलापूर<br>भ्रमणध्वनी ९८२३११२३७४ | **जयश्री पेंडसे**<br>गुरूराज हाउसिंग सोसायटी,फ्लॅट क्र. सी -२<br>पुणे - सातारा रोड पुणे |

समवेत घास ढकलतो आहे. तुकडे मोडतो आहे. ही तुकडे (मोड) संस्कृती जिव्हाळ्याचा, आपलेपणाचा घास घेत आहे. घरातील वाचन, जाहीर वाचन, विनोदाला दिलेला प्रतिसाद गोठून गेला आहे. मॉल संस्कृतीत सुट्टीचा दिवस जातो. जो पूर्वी पेपर, ग्रंथ वाचनात संपत असे. दूरदूरवर राहण्याची ठिकाणे असल्याने शहरी लोकांना घरी जायची घाई असते. पोहोचायलाही वेळ लागतो. परिणामी ग्रंथालयातल्या, वाङ्मयीन सांस्कृतिक संस्थांतल्या उत्तमोत्तम कार्यक्रमांना उपस्थितीच नसते. श्रोते धरून आणावे लागतात. मराठी ग्रंथव्यवहाराला शहरी भागातून या सर्व अडचणीतून मार्ग काढायचा आहे.

ग्रामीण भागात मात्र एक असोशी आहे, कार्यक्रम व्हावेत यासाठी धडपड आहे, लेखकावर- ग्रंथांवर भक्ती आहे. मराठी भाषा, वाचन, प्रदर्शने, कार्यक्रम, संमेलने अजिबात मेलेली नाहीत. मरू घातलेली नाहीत. उत्साह आहे, स्वागत आहे, कल्पकता आहे, योजकता आहे. मराठी ग्रंथव्यवहाराने मात्र तिथे जायला हवे. आपले शहरी रूप सोडायला हवे.

सर्व ग्रंथ, ग्रामीण भागापर्यंत आणि महाराष्ट्राच्या कोपऱ्यापर्यंत जाणारी वितरण यंत्रणा, इंटरनेट, बुकशॉप, डॉट कॉमच्या काळात मराठी ग्रंथव्यवहारासाठी उभी करता येऊ नये ही लाजिरवाणी गोष्ट नाही का ? मराठीतील सर्वच्या सर्व ग्रंथ, लेख, वस्तू, चित्रे, रेखाटने, लेखकांची हस्तलिखिते, फोटो, पत्रव्यवहार यांचा साठा एकाच ठिकाणी, प्रदर्शन रूपात का करता येऊ नये? फिरते संग्रहालयही का येऊ नये ?

मराठीत प्रकाशित होणाऱ्या यच्चयावत सर्व ग्रंथांची एकत्रित नोंद कोठेही होत नाही. ते सारे साहित्य एकत्रित, एकाच ठिकाणी मिळण्याची सोय का असू नये? सूची मंडळ, वाङ्मेतिहास मंडळ, संशोधन साधने मंडळ, कोश मंडळ, अशी अनेकानेक मंडळे निघायला हवीत. एक दोन मंडळांवर या कार्याचा जो भार पडतोय तो विभागला गेला पाहिजे. मौखिक साहित्य, स्थानीय इतिहास, लोक साहित्य, लोक कला संस्कृती, वैज्ञानिक प्रयोग, संत साहित्य, प्रवचने, कीर्तने, जतन करायला नकोत का?

जुन्या ग्रंथांच्या नव्या आवृत्त्या निघायला हव्यात. अनेकांचे साहित्य भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये जायला हवे. वाङ्मयाचे इतिहास, कोश, ऐतिहासिक- सामाजिक- सांस्कृतिक-वैज्ञानिक इतिहास सुधारून नवीन माहितीची भर घालून अद्ययावत करायला नकोत का? प्रत्येक प्रकाशकाचा, मुद्रकाचा इतिहास लिहायला हवा. व्यासपीठावरील साहित्य, अनुवादित साहित्य, प्रत्येक नियतकालिक, साप्ताहिक, वर्तमानपत्र यांचे इतिहास, सूची तयार करायला हवेत. किमान या सर्वांचे जतन करायला हवे. आधुनिक तंत्राचा वापर करून (डिझिटायझशेन) हे सर्व साहित्य जतन करायला हवे.

महाराष्ट्राचे, भारताचे ग्रंथ धोरण, ग्रंथालयांचे धोरण ठरायला हवे. ग्रंथेतर साहित्याचे व्यवस्थापन, सर्व ग्रंथालयांचे संगणकीकरण, त्यांचे एकमेकांशी जोडण्यात येणारे जाळे, मराठीचे सर्वमान्य असे व्याकरण, वर्णानुक्रमाची रचना, युनीकोड, ग्रंथांवरचा वर्गीकरण क्रमांक, कॅटलॉग कार्डांची माहिती तयार करून देणारी यंत्रणा, ग्रंथ सूचीय व्यवस्था, अशा अनेकानेक गोष्टी करायला हव्यात. ही यादी अधिक लांब होऊ शकते.

महाराष्ट्राला पन्नास वर्षे होत असताना, आता एक गोष्ट व्हायला हवी. शासकीय, निमशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, खासगी अशी सर्व ग्रंथालये, महाविद्यालयीन, विद्यापीठीय ग्रंथालये, साहित्यिक संस्था, संशोधन मंडळे, कोश मंडळे, ग्रंथ निर्मिती करणाऱ्या संस्था, नियतकालिके, वर्तमानपत्रे इत्यादी सर्वांना काही तत्त्वांसाठी समान सूत्रावर आणण्यासाठी, एक मोठे महामंडळ हवे. या सर्व संस्था या महामंडळाच्या अधिपत्याखाली असाव्यात. ग्रंथसंस्कृती, वाचनसंस्कृती, ग्रंथांचे जतन, संरक्षण, इतिहासलेखन, साधननिर्मिती आणि नवनिर्मितीला धोरणानुसार दिशा देण्याचे कार्य महामंडळाने करायला हवे. यातून पुढील ५० वर्षांची योजनाबद्ध आखणी करता येऊ शकेल. करण्याची गरज आहे. नाही तर काळाच्या ओघात हळूहळू ही संस्कृती वाहून जाईल.

पन्नास वर्षांची वाटचाल संपन्न असली तरी अजून खूप काही करायचे आहे. ते एकत्र येऊनच केले तरच खऱ्या अर्थाने सर्व संपन्न होईल.

०००

प्रदीप कर्णिक,

३०१, टॉवर क्रमांक १, फ्लॉवर व्हॅली, नारळी पाडा, ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे

ठाणे (प.) भ्र. ध्व. ९८२१२९९७३६

(महाराष्ट्र राज्य निर्मितीला ५० वर्षे झाल्याच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे वतीने सांस्कृतिक महाराष्ट्र १९६०- २०१० असा एक ग्रंथ प्रकाशित होतो आहे. त्यातील लेख संपादित स्वरूपात मंडळाच्या सौजन्याने प्रकाशित करीत आहोत.)

# आशय–सूची

**अंक क्र. १ : २० मार्च १९९६ (गुढी पाडवा) ते अंक क्र. २० : दिवाळी २००९**

पुरुषोत्तम नगरकर

'आशय'चा पहिला अंक २० मार्च १९९६ (गुढी पाडवा) रोजी प्रकाशित झाला. पुढे दर दिवाळीस एक असे १४ अंक (दिवाळी २००९ पर्यंत) व दरम्यान सहा इतर अंक प्रकाशित झाले. दुसरा अंक ऑगस्ट १९९६ (गुरुपौर्णिमा) मध्ये आला. मे'९७ ला वि. स. खांडेकर विशेषांक, जुलै ९७ ला एकांकिका विशेषांक, मार्च ९८ ला जीए विशेषांक तर जानेवारी २००६ ला (७९ वे) अ.भा. साहित्य संमेलन (जे सोलापुरात भरले होते) विशेषांक असे दिवाळी अंकांव्यतिरिक्तचे अंक होते.

पहिल्या अंकाचे मुखपृष्ठ हेमकिरण पत्की यांनी रेखाटले होते तर दिवाळी अंक १९९८ चे मुखपृष्ठावर व्यंकटेश माडगूळकर यांनी काढलेले रेखाटन घेण्यात आले होते. या दोन अंकांव्यतिरिक्त इतर सर्व १८ अंकांचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ, अंकातील कथा–कवितांची रेखाटने, सजावट, मांडणी शिरीष घाटे यांची होती.

## कथा


अनंत लाभसेटवार – गर्भपात / दिवाळी ०५
अनामिका – ब्रेस्ट कॅन्सर / दिवाळी ०९
अशोक कोळी – पेरणी / दि. ०८, वावर /दि. ०९
अश्विनी काळे–बर्वे – अवकाश / दि. ०७
के. के. देशपांडे – क्रांतिकारक चाल / दि. ९६
गीता जोशी – तिरुगणेशा / दि. ०६, बोन्साय / दि. ०७, भिंगरी / दि. ०९
चंद्रभूषण कुलश्रेष्ठ – पालीचं दुःख – दि. ९६
छाया महाजन – हिकमत / दि. ९९, फुलोरा / दि. २०००, हतबल / दि. ०१, दृष्टिकोन / दि. ०४
जी. के. ऐनापुरे – भोवरा : आत आतला घुम्म– दि. ९९, लेग बिफोर सिंड्रोम / दि. २०००
नीता गद्रे – स्नेहांकित / दि. ९९
नीरजा – एकाकी सूर्य वितळताना –/ दि. ०४
मधु सावंत – पाणबळी / दि. ०४
मधुकर धर्मापुरीकर – ढगाळलेले / दि. ९८
माधुरी शानभाग – नीरसी मोहमाया / दि. ०४, कोण पुढे पळे तो / दि. ०५
मृणालिनी कामत – खोपा / मे ९७
मेघनाद कुलकर्णी – चिअर्स टू लिझरेल / दि. ९९
मोनिका गजेंद्रगडकर – आभास / दि. ०१
रघुनाथ क्षीरसागर – सहनाववतु / दि. ९७
रंगनाथ तिवारी – सहेला रे / दि. ०३
रत्नाकर मतकरी – चरित्र / दि. ०८
रोहिणी भट – साहनी – तयारी / दि. ०४
विद्याधर म्हैसकर – डिस्कव्हरी / दि. ०७, आई / दि. ०९
शशिकांत जोशी – मुखवटे / जुलै ९६, गजरा / दि. ९६, अखेरची कथा / दि. ९७
सचिन कुंडलकर – पाऊस / दि. ०७
संजय जोशी – शेवटची गोळी / दि. ०८
संतोष वरधावे – कोकिळा / दि. ०६, पतंग / दि. ०७, रिजॉईन्डर / दि. ०८
सुजाता महाजन – ओळख / दि. ०६
सुनील साळुंके – लेखकाची गोष्ट / जुलै ९६, घनदाट / दि. ९७, कार्यकर्ता / दि. ९८, चेअरमन साहेबांचा किस्सा / दि. ९९ नागरिक / दि. २०००, आत्मपर / दि. ०५, चेकॉव्हच्या कारकुनाची शंभर वर्षे / दि. ०७
स्नेहा अवसरीकर – नॉर्मल / दि. ०७, नाव आहे चाललेली / दि. ०९


## लघुतम कथा


मधुकर धर्मापुरीकर – पाच कथा (टार्गेट, जमणं न जमणं, परिवर्तन, बिछुवा, मुक्ती) / दि. ०८
विद्याधर म्हैसकर – चार कथा (निर्णय, कडूलिंब, अर्थबोध, स्कॉड्रन लीडरची आई) / दि. ०६
– पाच कथा (सुटका, रंगा, आजी, विसाव्याचा आंबा, हातगाडा) / दि. ०८

## अनुवादित कथा

अर्चना मिरजकर – पारध्याला कळले नाही (सुचित्रा भट्टाचार्य) / दि. ०४

धनश्री हळबे – जे कुठलीही स्त्री सांगू शकत नाही (अशीता) मल्याळी / दि. ०४

धन्यकुमार जैनी – रंग (डॉ. अनुपमा निरंजन – कन्नड) / दि. ९६, रानरेडा आणि मनुष्य (डॉ. शांतीनाथ देसाई – कन्नड) / दि. ९७

नंदिनी आत्मसिद्ध – ईदी (वजिदा तबस्सुम / उर्दू) / दि. ०४

निशिकांत ठकार – धूर (गुलजार – हिंदी) / दि. ९७, नदीचा तिसरा किनारा (ज्युआन गेसा) / दि. ९८, प्रचंड भिंत (फ्रान्झ काफ्का) / दि. २०००, पक्षी आणि पांढऱ्या मुंग्या (गजानन मुक्तिबोध – हिंदी) / दि. ०५

प्रमोद सलगरकर – त्या तिथे पलीकडे (ई.एम. फॉस्टर/ इंग्लीश) / दि. ९७, सुगंध निर्माल्याचा (डी एच लॉरेन्स – इंग्लीश) / दि. ९८, क्षण एक पुरे (अँटान चेकॉव्ह)/ दि. ९९

मृणालिनी केळकर – चिरंतन पृथ्वी (आशापूर्णा देवी – बंगाली) / दि. ९७, प्रत्युत्तर (आशापूर्णादेवी) / दि. ०९

राजश्री बिराजदार – तो (अमृता प्रीतम – पंजाबी) / दि. ०६

वनिता सावंत – बदललेली जबानी (लता शर्मा – हिंदी) / दि. ०५, मिटकी (लता शर्मा) / दि. ०६, जिन दिन देखे वे कुसुम (लता शर्मा) / दि. ०७, प्रेत– पत्रकारिता (विजय विद्रोही) / दि. ०८ हिम समाधी (विजयदान देथा)/ दि. ०९

विजय पाडळकर – वडील अंधारात बसून राहतात (जेर्मे विल्डमन – इंग्लीश) / दि. ९६, न्याहारी (जॉन स्टाईनबेक) / दि. ९८, पुलावरील म्हातारा (अर्नेस्ट हेमिंग्वे) / दि. ९८,

(कै.) वि. म. सरदेशमुख – छुप्या वेड्याची दैनंदिनी (मोपॉसा) / दि. ०९

संतोष वरधावे – जादू (जोगिंदर पॉल) / दि. ०८, शाळा तपासनीस (एम अतर ताहिर) / दि. ०९

सुषमा करोगल – वैरी (बिपीन पटेल – गुजराथी) / मे ९७ दाह (हिमांशी शेलत – गुजराथी)/दि. ०४

## कविता

अनिल जवंजाळ – अंतर / दि. ०७ कॉक्रीटचे घर / दि. ०८, काळीज प्रत्येकालाच असावं/ दि.०९

अनिल दाभाडे – आवरण / दि.९९, चित्र/दि.२०००, श्यामची आई/दि.०१, प्रश्नजन्म/ दि.०२, काय घेऊन जायाचं/दि.०३, ओवी पावसाची सर,/दि.०४, प्रियावीण श्रावण/दि.०५.

अनुराधा नेरुरकर – परतशील तेव्हा ये/दि.०४, ...नकोस येऊ म्हटले/दि.०५, काहूर / दि.०६, मौनात बोलते रात/दि.०८, चढे चैत्राचा प्रहर/ दि.०९.

अनुराधा पोतदार – आईपण/दि.९९

अनुराधा वसंत खोत – वंचना/दि. ०५

अमीज नवाज राही – दैनंदिन गरजांचा धर्महीन बिंदू/दि.०८

अमोल बागूल – परत करा/ दि. ०५

अरुण इंगळे – कोल्हेकुई/ दि. ९६

अरुण काळे – चार कविता/ दि.०५

अरुण शिखरे – याल केव्हा/दि.९६

अरुण सांगोळे – कलदार/दि.०३, अढळ/दि.०४, आजकाल/दि.०५, भाग्य/दि.०६, अंबर/दि.०७, स्वीकार/दि.०८, वेड/दि.०९

अरुणा ढेरे – उदासी/ दि.९७, या घनदाट पावसात/ दि.९८, दोन कविता/दिवाळी २०००.

अर्जुन देशमुख – पांघरावे वारे ओले/ दि.०४, बापाची पुण्याई/ दि.०५, तुझ्या पाऊसभेटीने/ दि.०६, वृषभ/दि.०७, धूळभंडारा/ दि.०९

अलोन – संभ्रम, कोसळ/दि.९७, जीवओढ/ दि.९८

अशोक कोतवाल – मळवट/दि. ९७, पौरुषाची लाही/ दि.९८, घुंगूरवेळ/दि.०५ आंधळा आणि गुराखी/दि.०६, मजल्यांनी हसणारं शहर/दि.०८, एक विचार निसटलेला /दि.०९.

अशोक कोळी – आत्मवृत्त कपाशीचं/दि.०९

अशोक नी. सोनावणे– गारूड/दि.०१ आकलन/दि.०२, पिढी/दि.०४, कोण होते/ दि. ०५, बातमी/दि.०६, गर्दी/दि.०७, शोध/दि.०८

अंजली कुलकर्णी– वेडे झाड/दि.९७, मेल्यासारखा/ दि.९८, मी पेरलेत/दि.९९, चित्र/दि.२०००, दिवसरात्रींच्या/ दि.०१, गुंफण/दि.०५, संभ्रमाच्या पाण्यात/दि.०६, कुरघोडी/दि.०९.

अंजुम मोमीन– चंद्र: काही हायकू/दि.९६, दार/ दि.९७, आयुष्याच्या भल्या मोठ्या पाईपात/दि. ९८.

आश्लेषा महाजन – किती तहान लागली /दि.०८, येशील का /दि. ०९

आसावरी काकडे – .. /दि.९७, कविता/दि.९८, एक स्त्री/दि.९९, घाबरू नकोस/ दि.०२, सांगता/दि.०३, ओझे/ दि.०४, की तडजोड/दि.०८, निर्गुण आठवण/दि.०९

इंद्रजित भालेराव – कविता/दि.९७, आई तुझ्यामुळे/दि.०८

इंदिरा संत – शब्दकळा/दि.९८.

उषा मेहता – जीव जाणे थांबेना/दि.९९, समांतर/दि.०५

ऋत्विक डहाके – काळ थांबवण्यासाठी आखलेला कार्यक्रम/दि.०२.

कल्याण इनामदार – कविता/दि.९७, कोलाहल/दि.९८, ओली कविता/दि. ०४, पोथी/ दि.०५, जागरण/दि.०६, पत्र/दि.०७.

कविता महाजन – पुनर्विचार/दि.९९, सगळं लिहिता येत नाही/दि.०६

केशव स. देशमुख – लबाडीची लागवड/दि.०४, वटवाघूळ/ दि.०५, हे असे हमेशा घडते/दि.०६ दरारा/दि.०८,

कैलास रा. दौंड – खडकाळ/दि.०४, पीकविम्याचा अभंग/दि.०५, माहूवारी/ दि.०८, बेगडी दु:खाचे अस्तर/दि.०९

गजमल माळी – उद्ध्वस्त प्राचीन राजधानी/दि.९७

गणेश भाकरे – साज/दि.०५, शब्द ओलेचिंब होती/ दि.०६, पेच/दि,०८, सार सांगतो कविते/दि.०९

गंगाधर महाम्बरे – सांगायला नको ते/दि.०१

गिरीश पंचवाडकर – पाऊस/दि.९६.

गोविंद काळे – एवढाच पावसाळा/दि.९८

गोविंद कुलकर्णी – कविता म्हणजे/दि.९७, रंग/दि.९८, .../दि.९९, जागा, चिंता/दि.२०००, शिक्का/दि.०१, अवचित येता/दि.०२, जाणीव/दि.०३, अवमूल्यन/दि.०४, विपरीत/दि.०५, आपलं मन/दि.०६, विराम/दि. ०७ कविकुळ, मी/दि.०८, शोधयात्रा/ दि.०९

गोविंद केळकर – अवचित येता/दि.०२, चंद्रबिंब/ दि.०३, नवे आकाश/दि.०४, नको दावू आता/ दि.०५, गुलजार त्या क्षणांना/ दि.०६, भलत्यावेळी/दि.०७.

चंद्रकांत गोफणे – सोंग देवाचं /दि.०५.

चित्रसेन शबाब – स्वप्नात शिरतात/दि.०५

जोगिंदर कौर महाजन – शांत नयनी/दि.९७.

तुकाराम खिल्लारे – ढग/दि.२०००, आपण /दि.०१

त्र्यं. वि. सरदेशमुख – पाण्यावरली अक्षरे/दि.०५, बाळ सीताराम/दि.०९

दत्ता पतकी – कोवळ्या रात्री गुलाबी/दि.९६.

दत्ता हलसगीकर – गाठोडी/दि.९६, संवाद मनाशी/ दि.९७, असेच घडत गेले/दि.९८, सोहळा/ दि.२०००, जुन घर/दि.०१, मूळ भाबडे गाव/दि.०२, मी आणि ते/ दि.०३, मन:पूत/दि.०४, सारे लिहून/ दि.०५, आस/दि.०६, टिळा मातीचा/

दि.०७, घर सावलीचे/दि.०८, रंगात रंगलो मी/दि.०९.
दादासाहेब कोते – धावा/दि.९८, रानसय/दि. २००२
दासू वैद्य – प्रेमकहाणी/दि.९७, प्रश्नावली/दि.९८, रोगनिदान/दि.९९, दृष्टान्त आणि द्राष्टान्तिक/दि.२०००, माझ्या मित्राने आत्महत्या केली/ दि.०२, स्नॅप/दि.०३, मार्गदर्शक तत्त्वांचे थांबे/दि.०४
दिलीप देशपांडे – रानातल्या कविता /दि.०६
दिलीप पां. कुलकर्णी – दिवे/दि.९७.
देवेंद्र औटी – मृत्युसोहळा/दि.०६, शब्द/दि.०९.
नंदकुमार जगधने – पावसाच्या कविता/दि.९७.
नंदिनी आत्मसिद्ध – पाऊस/दि.९८, नेहमीचेच/दि.९९, गोष्ट/दि.०३.
नारायण कुलकर्णी – फुले/दि.९६, जटायू/दि.९७, झांज/ दि.०५, पणती/दि.०७, ओवी/दि.०८, पक्षीप्रेम/दि.०९.
नारायण कुलकर्णी कवठेकर – दोन कविता हतबल शीर्षकाच्या/ दि.९७, चर्चासत्र/दि.९८.
निर्मला मठपती – अजूनही../दि.०६.
नीतीन भट – मजेत मी/दि.०९.
नीरजा – तडकलेल्या घागरी/दि.९९
नीलकंठ महाजन – धुडगूस/दि.९७, शब्दांचे डाग/दि.९८.
पद्मिनी बिनीवाले – चाहूल/दि.९९
पंढरीश चेके – अढाऊ हिंसेच्या विरोधात/दि.०८.
पुरुषोत्तम नगरकर – पाऊस: ३ कविता/ जुलै ९६, जोडीनं जत्रेत फिरू/दि.९६, मनातल्या मनात/ दि.९७, आस्तिक्य/दि.२०००, चंद्र कलताना/दि.०१, मी नाही तर/ दि.०२, चित्र तुझे/ दि. ०३, शोकेसमधील बाहुली/दि.०४, किती आलो दूर/दि.०५, सरस्वतीवंदना/जाने.०६, कथा एका उत्सवाची /दि.०६
प्रतिभा टेपाळे–महाजन – त्या गावात/दि.९८, पुरुषांचे अभयारण्य/दि.९९
प्रतिमा कुलकर्णी– लोकशाही? / दि.०६, जन्म/दि.०८
प्रफुल्ल शिलेदार– माणूस नावाच्या नव्याच बापानं/ त्यांच्या विश्वाचं काळेभोर आभाळ/भुईमाय/ दि.०१ नुस्ता आशय/दि.०२
प्रमोद वाळके– माझे मन/दि.०८.
प्रमोदकुमार अणेराव – मन/दि.०४, एक कविता/ दि.०५, गुंता/दि.०६, कविता/दि.०७, आकाश/दि.०८, विचाराची बकवास कविता/दि.०९
प्रवीण बांदेकर – उदाहरणार्थ, नवं जगणं नवी कविता(!) /दि.०६, नदीची कविता: काही तुकडे/ दि.०७, कवी असल्याचा भ्रम/दि.०८, उदा. ग्रामीण कविता आज दिनांक... /दि.०९
प्रशांत असनारे – गुदमरलेले/दि.०२, विधवा आणि झेंडा/दि.०३, तिचा थकवा/दि.०४, सतार/दि.०५, फुलं/दि.०६, विधवा/ दि.०७, पाच रुपय्या बारा आणा/ दि.०८, मारिया/दि.०९
प्रसाद कुलकर्णी – टगे/दि.०५
प्रियदर्शन पोतदार – रात्र/दि.९७, मोर/दि.०१, प्रवास/ दि.०४, वजा/दि.०६.
फ. मुं. शिंदे – नीती/दि.९८
बदीऊज्जमा बिराजदार – अक्षरांना/दि.०७
बाळ राणे – चैतन्यदूत/दि.९७, पहिली कविता लिहिण्यापूर्वी/दि.९८, मारेकरी शब्द /दि.०२, दुर्दम्य /दि.०४ झाकोळ/दि.०५, तुझ्याविना/ दि.०६, प्रकाशमय आयुष्य/दि.०७, दुःख माझी माय/दि. ०८, उत्सव /दि.०९
भरतकुमार मोरे – निरोपाची श्रावणझड/दि.९६
भालचंद्र जोशी – जीवन/दि.०५, पाऊस/दि.९६
भास्कर गडहिरे – खेळ/दि.९७
महावीर जोंधळे – शालन/दि.९६
मा. गो. काटकर – अर्घ्यदान/दि.९६, थांग/दि.९८, साद/दि.९९

माधव पवार – कविता/दि.०७, सुगी/दि.०८
मीनाक्षी पाटील – हरवणं/दि.०७, ‘स्व’रूप/दि.०८
मीरा रामनवमीवाले – रातराणी/दि.०८
मुकुंदराज पं. कुलकर्णी – कारण/दि.०४, ढग/दि.०६, फक्त इतकेच/दि.०७, मौल्यवान/दि.०८, प्रवास/दि.०९
मुबारक शेख – मध्यस्थी/दि.९६, वासनेची नाळ/दि.०३, रिटायरमेंट/दि.०४, इत:पर/दि.०५, कवी/दि.०७, पूर्णविराम/दि.०८, टॉक टाईम/दि.०९
यशवंत पुलाटे – मातीचा अभंग/दि. ९८
यशवंत मनोहर– सूर्यासाठी क्षितिज झालो मी/दि.०२, प्रश्न/दि.०५, कोण आहेस तू माझा/दि.०८, आपले युग/दि.०९
रजनी परुळेकर – हे मना/दि. ९७, जमीन/दि.९८, वसंतोत्सव/दि.९९, ते जगत नाहीत/दि.०३, भूला/दि.०४
रजनीश जोशी – ऋतुचक्र/दि.०५
राजन साटम – अभंग/दि.९७, इतक्या सहज/दि.९८
राजेंद्र दास – तोरणे आणि भाकरी/दि.०९
राजेंद्र भोसले – गुरुजी/दि.०५
राही डहाके – चित्र/दि.२०००, सीमारेषांवर जगताना/दि.०२
रेणू पाचपोर – एकांत/दि.९७
रेणुकादास मुळे – रणशिंग/दि.०९
रेषा आकोटकर – मायकॉव्हस्की आणि आडोशाला टेकलेली विराणी/दि.९७
रोहिणी राळेरासकर – भेट/दि.९८, तुझी नजर/दि.०४
ललिता गादगे – प्रस्तर/दि.९९
लक्ष्मीकांत तांबोळी – दु:ख/दि.९७, बरा आपुला/दि.९८
लक्ष्मीनारायण बोल्ली – देव/दि.९६
लीला धनपलवार – विसंवाद/दि.९९, जन्मठेव/दि.०४
वसंत आबाजी डहाके – बारा हातांची/दि.९७, धरासू ते बडगोट/दि.९८
वसंत वाहोकार – खिडकीमधुनी या मैदानात/दि.०६, दूर आडच्या रानात/दि.०८, शहाण्या मुलासारखे/दि.०९

वसुधा दुनाखे – आशीर्वाद/दि.०५
वंदना कुलकर्णी – काटे/दि.९६
वासंती इनामदार जोशी – गाणे नव्या दिशांचे/दि.०४, मोताद/दि.०६, हरघडीचा भाषा/दि.०८, परतीचा प्रवास/दि.०९ विजय गायकवाड – तू नसताना/दि.०६
विजय दळवी – सम–आगम/दि.०७
विजय देशपांडे – व्यथा एका पुतळ्याची/दि.९८
विजया राजेपांढरे – साद/दि.०५
विनय अपसिंगकर – ताटातूट/दि.०७, जाते ओल उडून/दि.०८
विलास मोरे – गुपित/दि.०५
विश्राम प्रामाणिक – ओंकार/दि.०८, एखादा क्षण/दि.०९
विश्वास वसेकर – हवेली/दि.०५, वठणावळ/दि.०८, तारांबळ/दि.०९
वृषाली किन्हाळकर – कविता/दि.९९
वृंदा लिमये – कविता/दि.९८, चंद्राक्का/दि.९९, कविता/दि.२०००, अस्वस्थ/दि.०१, वेदनांच्या वणव्यात /दि.०२, पडझड/दि.०४, तीन कणिका/दि.०५
शकुंतला पाटील – तिला काय हवे?/दि.९६
शशिकांत जोशी – जसं समजत चाललंय मला/दि.०७
शशिकांत शिंदे – झाड/दि.९८, देहधुनी/दि.२०००, गाथा सप्तमी/दि.०१, कुणब्याच्या शेतापाशी/दि.०२, बोन्साय/दि.०३, म्हातारीशिवाय/दि.०४ पत्र लिहिण्यापूर्वी /दि.०५, गजानन डॉट कॉम/दि.०६, कसे एकएकी../दि.०९
शशी इनामदार – शपथ/दि.०३
शंकर रामाणी – शिशिरबहर/दि. ९८,प्रलय/दि.९९ तृप्तीत चिंब न्हालो/दि.२०००, उजेडाचे हसू/दि.०२
शंतनू चिंधडे – साद/दि.०७, धुमारे/दि.०९
शांताराम हिवराळे – रंग बिलोरी स्वप्नांचा/दि.०६, तरंग/दि.०८

शिरीष पै – असे वाटता घाटता/दि.९९
शुभदा मुळ्ये – तुझं माझं आकाश/दि.९९
शोभा बडवे – वेळ/दि.०८
शैला लोहिया – काळ येथे रूंधला/दि.९९
श्रद्धा बेलसरे – तीन कविता/दि.९९
श्रीकांत कोरान्ने – प्रकाशापलीकडे/दि.०६
श्रीकांत नरुले – प्रीत जुळे ही फुलता फुलता/दि.०५, जागेपणीचे स्वप्न/दि.०८
श्रीकांत मोरे – मानवी क्षितिज/दि.९६
श्रीकृष्ण बेडेकर – पाहुणा/दि.९७, तीन कविता/दि.९८
श्रीकृष्ण राऊत – अभंग/दि.९८, तुझ्या विमानात../दि.९९
श्रीधर तावडे – फेडायचेच जर होते ऋण/दि.०६
श्रीनिवास सूर्यवंशी – पैल/दि.९६, संदर्भ/दि.९७, कविता/दि.९८, कळ/दि.२०००.
श्रीपाद जोशी – जगेन म्हणता म्हणता/दि.०६
श्रीराम पचिंद्रे – संदर्भ/दि.९७
सदानंद देशमुख – जाणीव/दि.०९
सय्यद अल्लाउद्दीन – ऊसतोडीचा कविता/दि.२०००, देणी/दि.०३
संजय इंगळे–तिगावकर – सध्या/दि.९७
संजय बोरुडे – मी, तो आणि कविता/दि.०२, आरण्यक/दि.०३, बघता बघता/दि.०४, दरवळ/दि.०५, कळप/दि.०६, कुंदा/दि.०७, एकदा../दि.०८, माझी कविता/दि.०९
संजीवनी बोकील – थोडे जगून पाहते/दि.९९
सायमन मार्टिन – तू पुन्हा सापडशील मला/दि.९८
सिसिलिया कार्व्हालो – मृत्यू/दि.९७ , तू /दि.९८, जागरण/दि.०५, भिंत/दि.०६
सुजाता लोहोकरे – जाग/दि.९७, माझिया गीतास हळव्या/दि.९९, आहेस का?/दि.२०००, गाणे असण्यानसण्याचे/दि.०१, त्या कातर संध्याकाळी/दि.०७
सुधाकर कुलकर्णी – सहवास तो क्षणांचा/दि.०५
सुनीत मंगळवेढेकर – म्हातारं मन/दि. ०३
सुनीता नामजोशी – नाती /दि.०४
सुनील शिनखेडे – वर्तमान वास्ताची तालकचेरी /दि.०७, गुन्हा/दि.०८, हिरवे हिरवे तुला घे/दि.०९,
सुनील साळुंके – १.प्रिय बेकेट.. २.निष्ठेनं../दि.०६
सुनेत्रा ओक – दुसरा बहर/दि.९९
सुनेत्रा देसाई – काही कणिका/दि.९६
सुभाष वसेकर – उंच माणसं/दि.०८
सुरेखा जवळगेकर – कविता: तुझा–माझ्या/दि.९६, शोध/दि.९७
सुरेखा शहा – मी असेन किंवा नसेन/दि.९६
सुरेश पाचकवडे – विहीर/दि.०१, कविता/दि.०२, शब्द/दि.०३, सांत्वन/दि.०४, विचारणा/दि.०५, वसाहत/दि.०६, शिदोरी/दि.०८, मोर्चा/दि.०९
सुलभा हेर्लेकर – उत्तर/दि.९७, तू मला विचारतोस/दि.९८, मला मीच/दि.९९
सुषमा – ...../दि.९७
सुहासिनी इर्लेकर – आज/दि.९८, कुणास ठाऊक/दि.९९
सोनल आहेरकर – जखमा/दि.९९, प्रत्येकाला असंच जगवलंय/दि.२०००
सौमित्र – आपण कुणीच नसतो/दि.०५
हिमांशू स्मार्त – भूमिगत/दि.०२
हेमकिरण पत्की – कविता/मार्च ९६, एका आनंदी चेहऱ्याची/दि.९७, फुलपाखरू/दि.९८, अंतर/दि.२०००, मातीचा दिवा/दि.०१, गीत/दि.०४, अवकाश/दि.०५, सूर्य/दि.०६, आत्मचित्र/दि.०७, झाडं/दि.०८, किती दूर आलोयत आपण/दि.०९
हेमंत गोविंद जोगळेकर – काय जोराचा वारा सुटलाय/दि.०२
हेमंत डांगे – अबोली/दि.९८, क, काँक्रिट/दि.०६, वागणे/दि.०७, त्रयस्थ/दि.०८, धक्का/दि.०९
हेमंत मुसरीफ – दु:खाच्या कविता/दि.९६

**दीर्घ कविता**

श्रीधर तिळवे – संदर्भ : मुंबई बॉम्बस्फोट/दि.०६

संजय जोशी – भिंती/दि.०९

## कविता (विशेष विभाग/दि.९६)

हेमकिरण पत्की यांचे 'अक्षराई'या टिपणासह :

अरुणा ढेरे – खेळ, घाव

आसावरी काकडे – मी शोधतेय, हे स्वप्न नाही.

नीरजा – कविता भक्तीच्या

सुहासिनी इर्लेकर – करायचीय खरेदी ही विक्री वस्तू (तस्लीमा नसरीन)

## कविता (संकलित)

कै. केशव माधव आराध्ये यांच्या कविता

१. शब्दार्थ २. तुम्ही ३. मारावा /दि.०१

कै. त्र्यं. वि. सरदेशमुख यांची कविता : चंद्रवेळा, पाऊसकाळ, दोघे, नदीकाठी/दि.०७

## अनुवादित कविता

त्र्यं.वि. सरदेशमुख – निरोप (walter de la Mare)/ दि.०६

दासू वैद्य – भूक (सर्वेश्वर दयाल सक्सेना)/दि.०१

नरेंद्र जोशी – गूढस्थ अन् निर्मोही (रवींद्रनाथ टागोर)/ दि.९७

निशिकांत ठकार – जमुनाप्रसाद चौबे (डॉ. विजयबहादुर सिंह)/दि.९६ पोर्टेट गालिबचे (गुलजार)/दि.९७

मा. गो. काटकर – स्ट्रे बर्डस (रवींद्रनाथ टागोर)/दि.९७

सुलभा ठकार – एकाकिनी (वांगवेई)/दि.०९

## अनुवादित कविता – (विशेष विभाग)

अंजूम मोमीन – गुलजारच्या कविता : डायरी, शेकोटी, झड, आणखी एक दिवस, पेच/दि.९७

पाच कविता (एकान्त श्रीवास्तव)/ दि.९८, सात कविता (नीलेश रघुवंशी)/ दि.९९

चंद्रकांत पाटील – देशांतरीच्या कविता : १५ विदेशी कवयित्रींच्या ३० कविता/दि.९९

मधुकर ब्रह्मनाळकर – पाच कविता (रॉबर्ट फ्रॉस्ट)/दि.९७

हेमकिरण पत्की – सहा कविता (मीर अफजल दौलताबादकर)/दि.०९

## कविता (संगीत विशेषांक/दिवाळी ०३)

निशिकांत ठकार – कुमार गंधर्व : काही गद्य कविता (अशोक वाजपेयी)

प्रफुल्ल शिलेदार – डोळ्यांत प्राण आणून पाहात असतो बाप, कुणीच कुठला आवाज, जलसा (स्वतंत्र)

डॉ. प्रभा अत्रे – सूर, राधा आणि मीरा, ठुमरी (स्वतंत्र)

बलवंत जेऊरकर – संगतकार, राग शुद्ध कल्याण, राग मारवा (मंगलेश डबराल)

राग बागेश्री: आलाप, मित्र खमाज धून, रागमाला (स्वतंत्र)

वृंदा लिमये – हायकू सुरावली (स्वतंत्र)

## लेख

गौरीशंकर गंगा – उद्याच्या शतकातील साहित्य आणि सृजनशीलता /दि.९८

चंद्रकांत पाटील – व्यंकटेश माडगूळकरांची कथा /दि.९८

जयंत राळेरासकर – काय कुठेच्या घनअंधारी /दि.९८

त्र्यं. वि. सरदेशमुख – पु. शि. रेगे आणि खरा आत्माविष्कार/ दि.९६, सांगाती सखा:खलील जिब्रान/ दि.९७, बखर, डांगोरा, उच्छाद: एक भूमिका/दि.९८, नवी नवी युगे, जुनी जुनी कविता /दि.०५

प्रमोद सलगकर – पुलं ते पुलं /मार्च ९६, शोध सर्जनशीलतेचा /दि.९६, इनहेरीटर्स: एक आस्वाद/मे.९७ डार्कनेस ॲट नून/

दि.२०००, साहित्य-संस्कृती आणि लेप्रसी/दि.०१.
रवींद्र पिंगे – साने गुरुजी : एक लांबच लांब पसरलेली सावली/दि.९८
रंगनाथ तिवारी – तेरे कूचेसे हम निकले /दि.९८
विजय पाडळकर – डॉन क्विझोट आणि मादाम बोव्हारी/मार्च ९६, अनर्थशून्य वर्तुळ/दि.९७, चेकॉव्हचा साखालिन प्रवास/दि.२०००
शिरीष घाटे – शोध अमूर्ताचा /दि.९७
सीमंतीनी चाफळकर –सौंदर्यबोध /दि.९६
सुनील साळुंके – प्रस्थापित समाजव्यवस्थेचा बळी / मार्च९६

## लेख : विशेष विभाग

आधुनिक भारतातले तीन विचारवंत /दि.९६
प्रमोद सलगरकर – दृष्टी (संपादकीय टिपण)
राहुल आपटे – ओशो: अभिनव जीवनदृष्टीचे उद्‌गाते
विदुला जवळगेकर – श्रीअरविंदांचे तत्त्वज्ञान
हेमकिरण पत्की – जे कृष्णमूर्ती: विचारांचे स्वरूप आणि आशय
जीए /दि.९८
गौरीशंकर गंगा – जीए: एक चिंतन
म.द. हातकणंगलेकर – जीएंच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रश्न : काही विचार
माधव कृष्ण – जीए कथाविश्वातील लोकमानसाचा आविष्कार
विजय पाडळकर – अश्रद्धाची तीर्थयात्रा, मृगजळाची तळी
सुषमा करोगल – जीएंच्या कथातील स्त्रीप्रतिमा
शतकातील कलाविचार /दि.९९
कमलाकार नाडकर्णी – दूरदर्शन : एक माध्यम
निशिकांत ठकार – विसाव्या शतकातील चित्रपटकला (आधारित)
बाबूराव सडवेलकर – समकालीन भारतीय कलेतील भारतीयत्वाचा शोध (संक्षिप्त अनुवाद)
भास्कर चंदावरकर – विसाव्या शतकाच्या संधिकाळात संगीताचा विचार (शब्दांकन : जयंत राळेरासकर)
वसंत आबाजी डहाके – विसाव्या शतकातील मराठी नाटक आणि रंगभूमी
विंदा /दि.२०००
गीता जोशी – विरूपिका : एक वेगळी मूस
चंद्रकांत पाटील – विंदा करंदीकरांची बालकविता
प्रफुल्ल चित्रे – तालचित्रे : एक उकल
रवींद्र किंबहुने – गो. वि. करंदीकरांची भाषांतरे
त्र्यं. वि. सरदेशमुख / दि. ०१
नरेंद्र कुंटे – संतसहवासातले सरदेशमुख
रंगनाथ तिवारी – कविता चंद्रकेतूची
शरद नावरे – सरदेशमुखांची समीक्षा
शिरीष घाटे – त्र्यं. वि. सरदेशमुखांची कादंबरी – त्रयी
श्रीधर नांदेडकर – 'त्र्यंविं' ची कविता
चित्रकला नि साहित्य – दि. ०२(रेखाटनांसह लेख)
अनिल दाभाडे – शब्दांतून रेखाटताना आणि रेषांतून लिहिताना
प्रकाश कामतीकर – अभिव्यक्तीची गरज
भ. मा. परसावळे – रेषा : एक टिपण
रवी परांजपे – व्हिसलरचं फुलपाखरू
वसंत आबाजी डहाके – रेखाटनांविषयी
वासंती मुझुमदार – चित्रकार लेखक
विद्याधर म्हैसकर – रेखाटन करावंसं वाटतं
सीमंतीनी चाफळकर (अनुवाद / रवींद्रनाथ टागोर) – माझी चित्रे
सुरेश चांदवणकर – एक शतकभराचे न बदललेले रेखाचित्र
हेमकिरण पत्की – धुक्यातल्या प्रकाशरेषा
संगीत / दि. ०३
अश्विनी वळसंगकर – सुरेशबाबू माने
अंजली वळसंगकर (अनुवाद : अशोक वळसंगकर) – संगीतचौर्य : अत्यंत संवेदनशील असा मुद्दा
निशिकांत ठकार – अल्बेर कामू यांचा संगीतावरील निबंध
डॉ. प्रभा अत्रे – शिक्षणात संगीताचे स्थान आणि मैफलीचे सौंदर्य
मधु जामकर – नाट्यसंगीत : काही विचार
वासंती मुझुमदार – विराट ग्यानी
डॉ. विकास काशाळकर – संगीतातील सर्जनशीलता
विजय पाडळकर – हिंदी सिनेसंगीताचे सुवर्णयुग

विभावरी बांधवकर – ठुमरी
विलास गीते – रवींद्र संगीत, श्यामा संगीत
शिल्पा कुलकर्णी – भारतीय संस्कृतीतील प्राचीन नृत्यशैली
शोभा अभ्यंकर – भावगीत व चित्रपटगीत यांची समांतर वाटचाल
श्रीकृष्ण हळदणकर – रागदारी संगीत : पारंपरिक आणि आधुनिक
साधना शिलेदार – तिहाई
सुधीर पेशवे – रामभाऊ कव्वाल ऑफ उस्मानाबाद
सुरेश चांदवणकर – फिरत्या तबकडीची शंभरी
सुलभा ठकार – संगीताचे सौंदर्य
सुलभा पिशवीकर – संगीतातला रियाज
हेमकिरण पत्की – अनाहताचा आलोक

स्त्रीकथा / दि. ०४

अरुणा ढेरे : ‘तिने’ सांगितलेल्या कालच्या गोष्टी
ऋचा संजय – स्त्रीस्वातंत्र्याचा नैसर्गिक आविष्कार

जागतिकीकरणाचे सांस्कृतिक संदर्भ / दि. ०५

अनंत लाभसेटवार – ग्लोबल व्हिलेज आणि गांधीजी
अवधूत परळकर – आपल्याला काय त्याचे
उदय निरगुडकर – आहे काय हे जागतिकीकरण
जयंत नारळीकर – जागतिकिकरण : काही विचार
नंदिनी आत्मसिद्ध – हे विश्वाचे अंगण
रवी परांजपे – पेरणी, प्रगल्भ सांस्कृतिक जागृतीची
शरद नावरे – जागतिकीकरणाचे जग : एकमित साकल्याचा प्रदेश
साधना शिलेदार – जागतिकीकरण आणि भारतीय संगीत
सुरेश चांदवणकर – थोर मध्यमवर्गापुढचा आरसा
हेरंब कुलर्णी – गावात घुसलेलं जागतिकीकरण

‘पुन्हा कविता’ / दि ०६

अवधूत परळकर – उत्तरोत्तर कविता
प्रवीण बांदेकर – आमची पिढी, कविता आणि नवता वगैरे
निशिकांत ठकार – बाजार आणि जिहाद यांच्यापलीकडचे स्वप्न
रणधीर शिंदे – मराठी कविता : परंपरा आणि नवता
श्रीधर तळवे – संहितानिर्मिती

नव्या पर्यावरणातील नाटक / दि. ०७

अवधूत परळकर – मराठी रंगभूमीचे प्रायोगिक अंग
त्र्यं. वि. सरदेशमुख – जागतिक नाटक आणि नाटककार (संकलन व संपादन नीतीन वैद्य यांचे)
माधव वझे – दशकभरातील प्रायोगिक नाटक
मोहित टाकळकर – समांतर वाटेवर
रजनीश जोशी – नाटक : एक सृजनप्रक्रिया
शिरीष देखणे – सोलापुरातील प्रायोगिक नाटके
सतीश मनवर – जागतिकीकरण आणि नवे नाटक


## ललित लेख


अवधूत परळकर – लिंबूटिंबू मुलाखतकार / दि. ०८, सुरस आणि चमत्कारिक / दि. ०९
आशा दामले – लक्षद्वीपचे तांडव / दि ९९
गीता जोशी – मधली वाट / दि ९८
चंद्रकांत पाटील – २००५ : पिओरियातल्या दैनंदिनीतून / दि ०६
छाया चितमपल्ली – शाही बुलबुल नि कबिला / दि ०४
जयंत राळेरासकर – नंदा, देवदत्त, मी इ. / मे ९७, ‘झपूर्झा’चे उघडे दार / दि ०१
त्र्यं. वि. सरदेशमुख – जीएंच्या पत्रभेटी / दि २०००, शाळेचे दिवस / दि ०१, प्रेम : दोन टिपणे / दि ०८
पी एम् हर्षे – माझं सोलापूर / दि ०९
प्रमोद सलगरकर – काळी वेदना / दि ०५
माधुरी शानभाग – समर्पित वृत्ती, होलीस्टीक दृष्टिकोन आणि काम / दि ०६
मेघना पेठे – शमासे कहना है ... महफिलसे नही कहना...! / दि ०८
रेणू पाचपोर – रिक्ततेची धाव / दि ९८
विजय पाडळकर – दूरदेशी ज्यांनी... / दि ०१, खुशबू / दि ०६
विद्याधर म्हैसकर – भूमीवरचे पाय / दि २०००, गुलबी / दि ०५
शिरीष देखणे – ॲन फ्रँकला / मे ९७

सविता दामले – प्रकाशाची दिशा / दि २०००
हेमकिरण पत्की – सोन्याचा पाऊस / जुलै ९६

## शब्दचित्र

चंद्रकांत पाटील – पंचाहत्तरीच्या उंबरठ्यावरचा तरुण / दि ०८
दत्ता हलसगीकर – स्वातंत्र्यशाहीर कुंजविहारी / जाने ०६
निशिकांत ठकार – स्फटिकगृहीचे दीप / जाने ०६
विजय पाडळकर – गोजीचा एक दिवस / दि ०९
सुनील देशपांडे – कैफियत / दि ०९
सुहास पुजारी – वनमहर्षींच्या सान्निध्यातले मंतरलेले दिवस / जाने ०६

### शब्दचित्र सारानुवाद

निशिकांत ठकार – निको पिरोस्मानीची कहाणी / दि ०२

### कलास्वाद

वसंत आबाजी डहाके – काही चित्रकृतींचे वाचन / दि ०८
वसंत सरवटे – हसण्याचा आकार / दि ०९

### अनुवादित लेख

शरद नावरे – रंगभूमीसाठी लघु – सिद्धान्त कौमुदी (बर्टोल्ट ब्रेश्त) / दि ९८
सीमंतीनी चाफळकर – 'द इनहेरिटन्स ऑफ लॉस' आणि 'डांगोरा एका नगरीचा' : दोन कादंबऱ्यांतील सांस्कृतिक यात्राकरण / दि ०९

## नाट्य

### एकांकिका

जयंत राळेरासकर – खेळ / जुलै ९७
प्रसाद वनारसे – हॅलो..... / दि ९८
मोहन डोणगावकर – कळसूत्र / मार्च ९८
शशिकांत लावणीस – कोंडमारा / जुलै ९७, जेव्हा आभाळाचं कवाड फुटतं / मार्च ९८
शिरीष देखणे – पराभव / दि ९६, एका जन्मातल्या गाठी / जुलै ९७, बळी / मार्च ९८
संदेश कुलकर्णी – आई, मुलगी आणि कविता / जुलै ९७

### अनुवादित एकांकिका

निशिकांत ठकार – रात्र (हॅराल्ड पिंटर) / जुलै ९७

### अनुवादित नाटक

निशिकांत ठकार – साज फुलांचा केला शृंगार (गिरीश कर्नाड) / दि ०७
शरद नावरे – सापेक्षता सांगणारा माणूस (ग्रॅबियल इमॅन्युएल) / दि ०६
सागर देशमुख – मात्र रात्र (ब्रॅडली हेवर्ड) / दि ०७

## संवाद

अश्विनी वळसंगकर – श्रीराम पुजारी : कृतज्ञ मी, कृतार्थ मी / दि ०३
जयंत राळेरासकर – पं. प्रभुदेव सरदार : धवल लौकिका / दि ०३
निशिकांत ठकार – त्र्यं. वि. सरदेशमुख : एक सुदीर्घ साक्षात्कार / दि ०९
सुधीर पटवर्धन : समकालीन प्रवास / दि ०९
रजनीश जोशी – दासू वैद्य : परंपरा आणि नवता यांचा सांधेजोड करणारी कविता / दि ०८
वनिता सावंत – मृदुला गर्ग : स्त्री असणं माझ्या लेखनाच्या आड येत नाही/दि.०८
शिरीष घाटे– चंद्रमोहन कुलकर्णी: चित्रकलेच्या विविध माध्यमांतून व्यक्त व्हायला आवडतं/ दि ०८ अच्युत पालव : अक्षर पालवी / दि ०९
संजय जोशी – अमोल पालेकर : स्टार होण्यापूर्वीचा आणि पलीकडचा स्टार / दि ०८
सुनील कर्णिक – नितीन रिंढे : इतकी पुस्तकं तुम्हाला कशासाठी लागतात ? / दि ०९
स्नेहा अवसरीकर – आशा बगे : लेखन म्हणजे नितांत एकटेपण जपणं / दि ०८

**बातचीत**

मारुती चितमपल्ली यांच्याशी : सुनील जोशी / मे ९७
विंदा करंदीकरांशी : गीता जोशी / दि २०००
श्री. ना. पेंडसे यांच्याशी : अरुण नाईक / दि ९६

**चर्चा**

स्नेहा अवसरीकर – (संकलन) साहित्य संमेलनाच्या स्वरूपाबाबत काही मतमतान्तरे / जाने ०६
सहभाग : अवधूत परळकर, इंद्रजित भालेराव, कविता महाजन, दासू वैद्य, महेश केळुस्कर, मुकुंद टाकसाळे, सुबोध जावडेकर

**परिसंवाद**

ही धावपळ कशासाठी / दि ९६
सहभाग : अमोल चाफळकर, आनंद देशपांडे, दत्ता हलसगीकर, पोरे ब्रदर्स, प्रमोद धामणगावकर, मंजिरी धामणगावकर, रवींद्र मोकाशी, विनिता जोशी

**आत्मकथन**

अमोल चाफळकर – मी / दि ०९
दीपक देशपांडे – वाजता वाजता वाजे / दि ०९
बी एस कुलकर्णी – माळढोक आणि मी / दि ०८
रवींद्र मोकाशी – मागे वळुनी पाहता / दि ०९

**प्रकट चिंतन**

विजय तेंडुलकर – आम्ही आम्हाला फसवलं / दि ०५

**पत्रसंवाद**

अनिल कुसूरकर, जी ए कुलकर्णी, प्रमोद सलगरकर /मार्च ९८
भाऊ समर्थ / दि ०२

**टिपणे**

अरविंद खंडागळे – मानवंदना / दि ०६
जयंत राळेरासकर – ग्रामोफोन तबकडीवरील साहित्य विश्व, झाले विपुल लेखन परि / जाने ०६
त्र्यं. वि. सरदेशमुख – ‘अंबिकातनय’ दत्तांची कविता : काही टिपणे / जाने ०६
दत्ता गायकवाड – दलित आणि अस्मितादर्श साहित्य संमेलने / जाने ०६
नीतीन वैद्य (संकलन) – डॉ. द्वारकानाथ कोटणीस : काही टिपणे (त्र्यं. वि. सरदेशमुख) / दि ०६
डॉ. फक्रुद्दीन बेन्नूर – मुस्लीम मराठी साहित्य परिषद आणि संमेलने / जाने ०६
रंगनाथ तिवारी – सोलापूरच्या साहित्यविश्वाचा ‘आविष्कार’ / जाने ०६
सुनील साळुंके – एकांकिकेविषयी / जुलै ९७

**संपादकीय निवेदन**

नीतीन वैद्य – भूमिका (जीएकांक) / मार्च ९८, जागतिकीकरणाचे सांस्कृतिक संदर्भ / दि ०५
पुन्हा एकदा कविता : प्रश्न आणि प्रश्न / दि ०६,
नव्या पर्यावरणातील नाटक / दि ०७
संवाद : सृजनाचा प्रवास / दि. ०८,
कला लोकाभिमुखतेच्या दिशेने / दि ०९
तीन सोलापूरकर : भूमिका / दि ०९

**आलेख**

नीतीन वैद्य – साहित्य संमेलनाच्या नकाशावर सोलापूर / जाने ०६

**स्फुट टिपणे**

नीतीन वैद्य – अक्षरधारा : काही निरीक्षणे / मे ९७
शिरीष घाटे – मृखपृष्ठाविषयी / दि ९९

**संकलन**

नीतीन वैद्य – जीए : लेखनसूची / मार्च ९८, त्र्यं. वि. : जीवनपट, साहित्य सूची इ.

/ दि ०१

**स्मरण**

निशिकांत ठकार – दोन अर्थवाही कवींची मरणे / दि ०८

नीतीन वैद्य – स्मरणातले तेंडुलकर / दि ०८

सचिन कुंडलकर – मोनोलॉग / दि ०८

## संकीर्ण

**भाषण**

विजय पाडळकर – लातूर जिल्हा साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण / जुलै ९६

श्रीपु भागवत – कोकणभूषण पुरस्कार समारंभातले भाषण / दि ०७

**आगामी कादंबरीतील प्रकरण**

विजय पाडळकर – फुटलेला आरसा / दि ९९

**पुनर्मुद्रण**

अरुणा ढेरे – जाणाऱ्या माणसाला (कविता) / जाने ०६

अवधूत परळकर – तिसरे तेंडुलकर (मुलाखत) / दि ०८

ऋत्विक घटक – संगीत : चित्रपटकलेचा अखेरचा शब्द / दि ०३

कुंजविहारी – सोलापूरवर्णन (कविता) / जाने ०६
त्र्यं. वि. सरदेशमुख (इ. ६ वी) – मीलन (गद्यकाव्य) / दि ०१

दासू वैद्य – जी. ए. कुलकर्णी (कविता) / मार्च ९८

बा. सी. मर्ढेकर – कविता (कविता) / मार्च ९६

भास्कर चंदावरकर – विसाव्या शतकाच्या संधिकाळात संगीताचा विचार (लेख) / दि ०३

लक्ष्मीकांत तांबोळी – जीए (कविता) / मार्च ९८

वि. स. खांडेकर – १/८ = १ (लघुनिबंध) / मे ९७

व्यंकटेश माडगूळकर – शाळा (कथा) / दि ९८

व्यं. गो. अंदूरकर – साहित्य संमेलनाचे स्वागतगीत / जाने ०६

शंकर, रामाणी – जी.ए. कुलकर्णी : एक अस्त (कविता) –/ मार्च ९८

श्री. त्र्यं. गोडबोले – सोलापूरचे लावणीकार रामजोशी (स्फुट लेख) / जाने ०६

सत्यजित रॉय – निखळ चित्रपटाला संगीत अनावश्यक (अनुवादित स्फुट लेख) / दि ०३

स्वामी माधवानंद – ही वाट दूर जाते (लेखांश) / दि ०५

**पुनर्मुद्रण : श्रद्धांजली**

चंद्रभूषण कुलश्रेष्ठ – १. नको वाटतात, २. अक्षय आनंदघोष (कविता) / दि ०१

श्रीनिवास सूर्यवंशी – १. पाठमोरी, २. माझे भाकरीचे गाणे ३. प्रकाश (कविता) / दि ०१

**इतर**

मलपृष्ठावरील मजकूर (अंकानुक्रमे)

त्र्यं. वि. सरदेशमुख – ऋण मर्ढेकरांचे (टिपण)/२०मार्च९६

गुलजार – कंटाळा (कविता) / जुलै ९६

हेमकिरण पत्की – प्रार्थना (कविता) / दिवाळी ९६

वि. स. खांडेकर – रुपककथा / मे ९७

त्र्यं. वि. सरदेशमुख – नाटक ही सोंगाची सृष्टी (लेखांश)/ जुलै ९७

विजय पाडळकर (गुलजार) – (अनुवादित कविता)/दि.९७

सुनील साळुंके – प्रिय जीए... (कविता) / मार्च ९८

त्र्यं. वि. सरदेशमुख – 'डांगोरा'च्या मनोगतातून (लेखांश) / दिवाळी ९८

...... – (कवितांश) / दिवाळी ९९

हेरंब कुलकर्णी – (कविता) / दि ०५

प्रवीण बांदेकर – (कविता) / दि ०६

चंद्रकांत देवताले – (कविता) / दि ०७

**व्यंगचित्रे**

पोरे ब्रदर्स / दिवाळी ९६

**कविताचित्रे**

अमोल चाफळकर (गुलजार) / दि ९७

**रेखाचित्रे**

व्यंकटेश माडगूळकर / दि ९८

भ.मा. परसावळे / दि ०८

**अक्षरचित्रे**

प्रदीप नेरुरकर / दि ०५

*******

### अंकात सहभागी कवींचे पत्ते

| | | |
|---|---|---|
| यशवंत मनोहर | – | लुबिनी, लोकसेवानगर, नागपूर ४४००२२ |
| गोविंद कुलकर्णी | – | 'चाफा', एन.डी. ४, सिडको, नांदेड ४३१६०३ |
| केशव सखाराम देशमुख | – | संचालक, भाषा संकुल, स्वाराति म. विद्यापीठ नांदेड ४१३६०६ |
| हेमकिरण पत्की | – | अ-४, गजानन अपार्टमेंट, आसरा सोसायटीमागे सोलापूर ४१३००३ |
| प्रमोदकुमार अणेराव | – | ९ यमुराम सदन, समृद्धी नगर, भंडारा ४४१९०४ |
| विनय अपसिंगकर | – | भाग्यनगर, लातूर. |
| वसंत वाहोकार | – | जानकी अपार्टमेंट, २६ गजानन नगर, वर्धा मार्ग नागपूर ४४००१५ |
| कविता महाजन | – | १०१ नायगार ए १३ एव्हरशाईन सिटी वसई(पू) जि. ठाणे ४०१२०५ |
| सुनील साळुंके | – | ११, प्रेरणा सोसायटी, शिवाजी नगर, बाळे, सोलापूर |
| प्रवीण बांदेकर | – | बी-४, विठ्ठलकृपा अपार्टमेंट, सबनीसवाडा सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग ४१६५१० |
| विद्याधर म्हैसकर | – | 'यशोधन' ए ३०/१ कोयना वसाहत, कऱ्हाड ४१५११० |
| दत्ता हलसगीकर | – | २०अ, जवाननगर विजापूर रस्ता सोलापूर |
| प्रशांत असनारे | – | 'अभिनंदन' मुखर्जी बंगल्याजवळ, राऊतवाडी अकोला |
| मोहिनी पिटके | – | एस १ लोटस अपार्टमेंट, सोनामाता विद्यालयासमोर, रेल्वे लाईन्स सोलापूर |
| नारायण कुलकर्णी | – | ३१५/४ विजयनगर, विजापूर रस्ता सोलापूर ४१३००४ |
| लक्ष्मीकांत तांबोळी | – | 'कृष्णकमळ' गांधी चौक, देगलूर ४३१७१७ जि. नांदेड |
| अंजली कुलकर्णी | – | ३, विघ्नहर अपार्टमेंट, जयवर्धमान सोसायटी बिबवेवाडी रोड पुणे-३७ |
| सुनील शिनखेडे | – | १६२/११ रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१ |
| बाळ राणे | – | १३ बी/ ८, सेंट्रल पार्क, छ.शिवाजी मार्ग, बोळिंग विरार (प) ४०१३०३ |
| आश्लेषा महाजन | – | २३०, चित्ररेखा सोसायटी, सहकार नगर क्र १ पुणे ४११३०९ |
| अनुराधा नेरुरकर | – | ए ३०३, वैकुंठ पार्क, लक्ष्मण म्हात्रे रोड, दहिसर (प.) मुंबई ४०००६८ |
| शोभा बडवे | – | द्वारा बडवे हॉस्पिटल, मालेगाव जि. नाशिक ४२३२०३ |
| मुकुंदराज कुलकर्णी | – | श्रीराम पाटील प्लॉट, शिवाजी नगर, बार्शी ४३१४०१ |
| सुरेश पाचकवडे | – | 'शिवदया', राऊतवाडी अकोला ४४४००५ |
| अनित जवंजाळ | – | द्वारा-व्ही एक बल्की, महाजन लेआऊट, छिंदवाडा रोड, सावनेर जि. नागपूर ४४११०७ |
| अर्जुन देशमुख | – | 'अक्षरपान' कोरडगाव, ता-पाथर्डी, जि-अहमदनगर |
| हेमंत डांगे | – | द्वारा ७ डी, गुरुप्रसादनगर कळंबा रोड, कोल्हापूर |
| विश्राम प्रामाणिक | – | १८ 'श्रीविश्व' छत्रपती कॉलनी, जुना जालना ४९१२१३ |
| रवींद्र जवादे | – | 'शब्दश्री' भट्टड ले आऊट समता नगर, मूर्तिजापूर अकोला ४४४१०७ |
| सुभाष वसेकर | – | 'सावली' ३३, भाग्य नगर नांदेड ४१३६०५ |
| निरंजन माधव | – | शिक्षक कॉलनी, वर्धा रोड, मु. पो. कोंढाळी, ना. काटोल जि. नागपूर ४४११०३ |
| अशोक सोनवणे | – | २७ सहयोग कॉलनी चोपडा, जि. जळगाव ४२५१०७ |
| पुरुषोत्तम नगरकर | – | ११४ मुरारजी पेठ गोगटे चाळ सोलापूर ४१३००१ |
| मुबारक शेख | – | १६२/८ब आळंदकर चाळ, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१ |
| तुकाराम खिल्लारे | – | ५७ 'पार्वती'जायकवाडीमागे हुडको रस्ता लोकमान्य नगर, परभणी ४३१४०१ |

000

## आशय दिवाळी अंकास शुभेच्छा !

**ॲड. विजय मराठे**
४४/२८, महावीर सोसायटी, सम्राट चौक,
सोलापूर.

**वल्लभदास गोयदानी**
डी-१, नाथ रिजन्सी, रुपाभवानी चौक,
सोलापूर. भ्रमणध्वनी : ९४२२०६८४०९

---

**आर्किटेक्ट - कल्पक शहा**
*स्थापत्य नियोजन / इंटिरिअर एक्सलन्स*
भगवानदास कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवी पेठ, सोलापूर.
भ्रमणध्वनी : ९२२५८३९९३७/९२२६११९९३७
E-mail - sthapatya_niyojan@yahoo.com

**पद्मा देशपांडे**
'श्री' ११७/९४, उमा नगरी, मुरारजी पेठ, सोलापूर -१
भ्रमणध्वनी : ९८२२३००५७९

---

**CHILDREN SHOWROOM WEAR**




PARAS ESTATE NAVI PETH, SOLAPUR - 413007.

---

**शुभदीपावली**


# शब्ददर्वळ

**दिवाळी वार्षिक २०१० प्रसिद्ध झाला**

**महाराष्ट्र व मराठी प्रेमाचा**
**आणि संस्कृतीचा पाजळता नंदादीप**

संपर्क
**श्रीकृष्ण बेडेकर**
पत्रसारांश प्रतिष्ठान, ९७/अ, ब्रजविहार कॉलनी,
वैशाली नजीक, अन्नपूर्णा मार्ग, इंदौर (मध्यप्रदेश)
भ्रणध्वनी : ०९४२४५५१४९६

---




**'श्यामची आई'**
आता सुविद्या प्रकाशन
सोलापूर तर्फे प्रकाशित

**बाबुराव मैंदर्गीकर**
९४०३२९२१११
फोन : २७२२५१०

**सुविद्या प्रकाशन**
'गंगा निवास' ३७४ उत्तर कसबा, पंजाब
तालीमजवळ, सोलापूर.
e-mail : suvidyaprakashan@gmail.com




*With Best Compliments from*

PANDHE GROUP

# Pandhe Infracons Pvt. Ltd. (PIPL)

234, 'PRANEET', Jaywant Palkar Marg, Worli, Mumbai - 400 030.
Tel. (022) 61483200 Fax : 022 - 61483201. E-mail : admin@pandheconstruction.com

**Head Office :** 157/C, Railway Lines, Solapur - 413001.
Tel. 0217 - 2743400, 2310442, Fax : 0217 - 231 1458
e-mail : adminsolapur@pandheconstruction.com, website : www.pandheconstruction.com

थोर मानवतावादी

# डॉ. द्वारकानाथ शांताराम कोटणीस

जन्मशताब्दी

१० ऑक्टोंबर १९१० – २०१०



